मन्त्रशास्त्र

मंत्रशास्त्र

लेखक
मंत्रमहार्णव-मंत्रमर्मभास्कर
मंत्रनिष्णात
श्री १०८ जगद्गुरु श्रीशंकराचार्य श्रीयोगेश्वरानंदतीर्थ
मठ–जगन्नाथपुरी

संग्राहक
गो. प्र. भावे

संवत् २०२६ शके १८९२ सन १९७०

मूल्य २५ रुपये

मंत्रशास्त्र



मन्त्रशास्त्रकार जगन्नाथ पुरीच ग्र० भू० शङ्कराचार्य

मंत्र शास्त्र

लेखक

मंत्रमहार्णव-मंत्रमर्मभास्कर

मंत्रनिष्णात

श्री १०८ जगद्गुरु श्रीशंकराचार्य श्रीयोगेश्वरानंदतीर्थ

मठ–जगन्नाथपुरी

संग्राहक

गो. प्र. भावे

संवत् २०२६ शके १८९२ सन १९७०

मूल्य २५ रुपये

प्रकाशन ५ वें

आवृत्ति ४ थी (नवसुधारित)
गुरुपौर्णिमा
शके १८९२ जुलै इ. स. १९७०

संग्राहक
© गो. प्र. भावे
यंत्रादि सर्व प्रकारचे हक्क
संग्राहकाच्या स्वाधीन

प्रकाशक
सौ. लता केशव जोशी
कार्यवाह-नवज्योती प्रकाशन
कॉलेज रोड, दादर-मुंबई २८

मुद्रक
वि. पु. भागवत
मौज प्रिंटिंग ब्यूरो
खटाववाडी, मुंबई ४

प्रथमावृत्ति १९३६
द्वितीयावृत्ति १९४२
तृतीयावृत्ति १९५७
चतुर्थावृत्ति १९७०

प्रकाशकांचें हृद्गत

ब्रह्मीभूत पूज्य श्रीशंकराचार्य योगेश्वरानन्दतीर्थ ह्यांचा दुर्मिळ व प्राचीन भारतीय संस्कृतीचा अमोल ठेवा ज्यांत आहे असा 'मन्त्रशास्त्र' हा ग्रंथ आमच्या हातून उच्चस्तरीय विचारी जनतेसमोर ठेविला येईल ह्याची आम्हांला कल्पनाही नव्हती. परमेश्वरी सूत्रें हालतच असतात; पण ती जाणीव आमच्या-सारख्या ल्हान जीवांना सुगम व सुसहज नसते. 'मन्त्रशास्त्रा'सारखी दिव्य ज्योत नवज्योतीमध्यें मिसळून त्यांत तेवत व तळपत रहावी ही त्या जगचालकाची इच्छा योगेश्वरानंदतीर्थ ह्यांच्या कृपाशीर्वादामुळेंच फलीभूत झाली असें म्हणावें लागतें.

आमची आर्थिक ताकद कमी, उलट सदरहू ग्रंथ मोठा. तशांत, त्यांतील अनेक आकृती प्रथमपासून तयार करण्याची मोठ्या खर्चाची योजना आणि मग भारतीय सांस्कृतिक अर्थानें आधुनिक पोन्या ' विज्ञानाच्या मागें लागलेल्या हीन-श्रद्ध वा गतश्रद्ध आमच्या वाचकवर्गापुढें हा ग्रंथ ठेवणें ह्या सर्व कठीण समस्यांचा पर्वत आमच्यासमोर उभा राहिला. यापेक्षाही कठिणतम काम म्हणजे 'मन्त्रशास्त्रा' तील विचारधारा नवदृष्टीच्या उसमय समाजाच्या गळीं उतरविणें हा आमच्या पुढें एक यक्ष प्रश्न होता व आहेही. पण अधिक विचार केल्यानंतर पुढील गोष्टी ध्यानांत येतात व आल्या. (१) नवविज्ञान किंवा आधुनिक विज्ञान ह्या नांवानें ओळखलें जाणारें 'ज्ञान' हें केवळ भौतिकी आहे (२) त्या ज्ञानाप्रमाणें जगणारा मानव सुखी व समाधानी नसून मन:शांतीच्या अभावीं दु:खीच आहे (३) त्यामुळें मानवाची मानवता उत्तरोत्तर कमी होत आहे. (४) 'सुख' म्हणजे काय ! तें कोठें, कसें मिळेल ह्या तळमळीनें तो व्याकुळ होत आहे (५) यामुळें जागतिक मानवी मनांत मोठी पोकळी निर्माण झाली आहे आणि नेमकी हीच पोकळी भरून काढण्याचें काम आज करावयास हवें असें वाटतें. त्याचा प्रयत्न म्हणून आम्ही 'मन्त्रशास्त्र' या दुर्मिळ ग्रंथावरील विचारधारेची नवसुधारित आवृत्ति श्री. गो. प्र. भावे (योगेश्वरानंदांचे अनुग्रहीत व वरील विचारधारेची

चिकित्सा, करून ती पद्धित सातवळेकर व सिद्ध योगी रंगावधूत महाराज या उभयतांच्या दीर्घ सहवासात राहून त्यांच्या मार्गदर्शनाखाली तयार झालेल्या आवृत्तीचे चालक) यांच्या मेहेरबानीनें आम्ही वाचकांना सादर करीत आहों. या आवृत्तींत सप्तश्लोकी सप्तशति; श्री रंगावधूत महाराजांचा प्रसाद म्हणून कांहीं मंत्र, श्री सूक्ताची विशेष पाठपद्धति व कांहीं नवीन यंत्रेंहीं दिलेलीं आहेत. या आवृत्तीचीं विशेष वैशिष्ट्यें श्री. भावे ह्यांनीं सादर केलेलींच आहेत. अशा ह्या अद्वितीय मराठी ग्रंथाला सक्रिय सहकार वाचक देतीलच या अपेक्षेनें आम्ही आगाऊ मूल्य न मागतां हें आर्थिक धाडस केलें आहे. याचा विचार सहृदय ग्राहक करतीलच अशी आशा आहे.

शंकराचार्यांचे एक चहाते नागपूरचे दानशूर श्री बाबुराव घनवटे यांनीं कागदाची जी थोडीफार निरपेक्ष मदत केली, त्यामुळें आम्हाला उत्साह वाटला. या दृष्टीनें आम्ही त्यांचे आभारी आहों. तसेंच दादर येथील इंजीनियर श्री मो. श्री. फडके गणेशबाग, माटुंगा-मुंबई यांनींही ह्या प्रकाशनाला मदत म्हणून रु. ५०० दिले. याबद्दल आम्ही त्यांना धन्यवाद देतों.

—प्रकाशक

सेवासमर्पण—

ब्रह्मीभूत पूज्यपाद श्री योगेश्वरानंदतीर्थ—शंकराचार्य पुरीमठ यांच्या 'मंत्रशास्त्र' या ग्रंथाची तिसरी आवृत्ती ते छापवीत असताना (इ. स. १९५७) या ग्रंथाचीं प्रुफं तपासण्याचें काम ते मुंबईस असत तेव्हा मजकडे देत—त्यावेळीं मी पुढील दोन गोष्टी त्यांच्या निदर्शनास आणून देत असे; त्या अशा : (१) "महत्त्वाचा अंश म्हणून सदरहू ग्रंथात द्विरुक्ति, पूर्वापर संबंधाच्या मजकुराचा जोडविजोड, मंत्रस्वरोच्चारातील छपाईचे दोष, गारुडादि मंत्रसंकल्पनादिकातील भाषादोष इत्यादि आणि (२) आधुनिक केवळ बुद्धिवादी वा अश्रद्ध लोकांना प्राचीन मंत्रयंत्र तंत्रादिकामागील 'विज्ञान' त्यांना पटेल अशा नवविज्ञानी मार्फत विशद करून सांगाल तर जास्त उपयोग होईल. यातील पहिल्या मुद्द्याबद्दल शक्य तो प्रयत्न करीन असें ते म्हणत. पण त्यांचा अस्थायी मुक्काम व सकलनें मिळविण्याची आवड ह्यामुळें अनेक उणीवा तशाच राहिल्याचें त्यानाही आढळलें. दुसऱ्या मुद्द्याबाबत सखोल चर्चा व विनिमय होऊन त्याबाबत एकमत होई. व ते तशीं टाचणें करण्याबाबत मला सांगत. तीं मी त्यांसमोर ठेवीत असे. पण तशी मांडणी करणें त्या आवृत्तींत शक्य झालें नाहीं. म्हणून तशी मांडणी व जुळवा-जुळव करून तशी नवीन आवृत्ति काढा असे सांगून तशा प्रकारचें जरूर तें कार्य करावें या हेतूनें त्यांनीं त्यांचे लिखित, व अर्धे लिखित सर्व ग्रंथ माझी तशी इच्छा व तयारी नसतांनाच माझ्याकडे पाठवून त्या सर्व वाङ्मयाची सर्व प्रकारची जबाबदारी मजवर टाकिली आणि तिसऱ्या आवृत्तीची छापील प्रत पुढील व्यवस्थे-करितां माझ्या स्वाधीन केली।

परन्तु 'अनुक्तंच दुरुक्तं च योऽद्धन्य तच पंडितैः। नहि एकस्य क्षमप्रज्ञा मंत्रशास्त्र विनिर्णये' ही माझी वस्तुस्थिति आणि 'कोऽहम् मंदमतिर्मूढः। क्व चात्मविषया मतिः' अशी माझी २ री वस्तुस्थिति *असल्यामुळें या ग्रंथाचें* जरूर तें काम, ते हयात असे तों (इ. स. १९६१) मी करू शकलों नाहीं याबद्दल मला सारखी रुखरुख वाटत आहे. पण या गुरुपौर्णिमेला ती पूर्ण करून घेतली ही 'गुरुकृपाहि केवलम्'.

माझा त्यांच्याशीं 'अनुगृहीत' या नात्यानें संबंध आहे. यामुळें त्यांच्या आज्ञा पाळून कर्तव्यातून मुक्त व्हावें ह्या हेतूनें मी ब्रह्मर्षि **पंडित सातवळेकर** (पारडी) आणि **सिद्धयोगी रंगावधूत महाराज** (नारेश्वर)—आज हे उभयतांही ब्रह्मलीनच आहेत—ह्यांच्या सहवासात सुमारें पांच वर्षें घालविलीं. त्यांशीं विचार विनिमय करून उभयतांचे अनुभव समजावून घेतले. व मगच सदरहू ग्रंथासंबंधाचे माझे विचार पुढें ठेविले. तेव्हां उभयतांनीं ग्रंथाची तशीच मांडणी करण्यास आनंदानें व उत्सुकतेनें प्रोत्साहन दिलें. त्याप्रमाणें मी महत्त्वाचें लिखाण वेद-मंत्रांची शुद्धाशुद्धता, आणि बहुतेक नवविज्ञानी मांडणी उभयतांच्या दृष्टिखालून घालविली. ग्रंथाची अद्यतनता ठेवण्याचे प्रयत्न, श्रीसूक्त, व सप्तशती ह्यांबद्दलचे अनुभव, नवग्रहोपासनेचें शास्त्रीय स्वरूप आणि त्याचबरोबर आमच्या मंत्रतंत्र विधींमागील 'विज्ञान' आम्हां प्राचीन भारतीयांचें ब्रह्मांड ज्ञान व आधुनिक नवविज्ञान' ह्यांची तुलना इत्यादि गोष्टी पाहून उभतांनीं उत्साहानें आशीर्वाद दिले. पूज्य योगेश्वरानंदांचे बंधु श्रेष्ठ व निष्ठावंत राजकारणी श्री. ना. भा. खरे ह्यांनींही उचंबळून अंतःकरणपूर्वक "असाच विचारांचे अनेक भारतीय आज हवे आहेत. आपल्या गुरुजींची खरोखरच सार्थ सेवा करीत आहां. त्वरा करा" असा आशीर्वाद दिला! परंतु दुःखाची गोष्ट ही कीं, आशीर्वादानंतर पांचच दिवसांनीं ते आम्हांस सोडून गेले!

आतां या नवसुधारित आवृत्तीची रूपरेषा वाचक, उपासक, साधक व अनु-ग्रहीत ह्यांच्यापुढें थोडक्यांत ठेवीत आहें ती अशी :—

(१) पूर्वीचे छपाईचे दोष नाहींसे करून जरूर तेथच भाषेची सुगमता केली. पण मांडणी मात्र पूर्णतया त्यांचीच ठेविली. कारण तशा प्रकारचा विषयाधिकार माझा नाहीं; तथापि मुद्रणदोष राहिलेच. (२) ग्रंथाच्या **पूर्वार्धांत** त्यांचे सर्व विचार सुसंबद्धित रीतीनें एकत्रित केले. (३) **उत्तरार्धांत** अनुभूत व अनुभाव्य मंत्रांचें त्याचप्रमाणें (४) देवदेवतांची उपासनापद्धति, (५) श्रीसप्तशती व श्रीसूक्त यांची उपासना पद्धति, (६) नवग्रहोपासना आणि गारुडादिभाग या सर्वांचे एकत्रीकरण केलें. (पूर्वीच्या आवृत्तींत ह्या सर्व गोष्टी इतस्ततः विखुर-लेल्या होत्या.) (७) उत्तरार्धांतील प्रत्येक प्रकरणाच्या प्रारंभीं वाचकांसाठीं त्या

विषयाचा परिचयात्मक भाग लिहिला. (८) पूर्वार्धामध्यें प्रत्येक प्रकरणाच्या शेवटीं 'अमृतमंजिरी' नावाचीं अति उद्बोधक सुवचनें प्राचीन भारतीय अस्मितेची जाणीव रहावी म्हणून दिलीं आहेत. (९) इस्लामी, याहुदी व ख्रिस्ती या धर्मीयामधील मंत्र व यंत्रप्रतीकें ह्यासंबंधीं उद्बोधक माहिती दिली आहे. ही माहिती पूर्वावृत्तींत नव्हती. **असामान्य विशेषता :** (१०) प्रत्येक विषय या प्रकरणातील मूळची माहिती जागोजाग भरपूर टीपा देऊन शक्यतितकी अद्यतन ठेविली आहे. (११) पाश्चिमात्याचे बहुतेक अद्यतन नवविज्ञान एकदेशीय व प्राचीन भारतीय ज्ञानाच्या मानानें किती थिटें आहे हे तुलना करून साधार दाखविण्याचा प्रयत्न केला आहे. (१२) साधक, उपासक, व मनानें पाश्चात्तीभूत झालेले वाचक ह्याचे डोळे उघडावे म्हणून भारतीय आचारविधींमागील विज्ञानाचें थोडे अंजन घालण्याचाही प्रयत्न केला असून (१३) सर्वांना उपयोगी अशा विचारप्रवर्तक मार्गदर्शनपर सूचना दिल्या आहेत. 'यत्रोचते तद्ग्राह्यम्' ही विनंति.

साराश, अशा रीतीनें गुरुजींर्ना सोंपविलेली त्याच्या एका ग्रंथाची कामगिरी त्याच्याच चरणीं "गुरुणा कृपया कुर्वे अल्पमतिः प्रबोधनम्" या वृत्तीनें सादर केली आहे. ती ते गोड करून घेतील ही खात्री आहे. रगयं.

संदर्भ ऋणनिर्देश—(१) ज्या ज्या ग्रंथातून, व मासिकातून माहिती उद्धृत केली त्या सर्वांचा मी ऋणी आहे (२) श्रीयत्र व श्री सूकयंत्र म्हणून मिळालेल्या छापी आकृति, या ग्रंथाच्या उपयोगासाठीं दिल्याबद्दल विद्याविनोद नारायणशास्त्री जोशी (आजर्ले) ह्याचा उल्लेख करणें जरूर आहे. (४) प्रस्तुत ग्रंथाची टक प्रत करून देणारे त्याचेच अनुग्रहीत पा. के. दातार (ठाणें) आणि अशा क्लिष्ट ग्रंथाची काळजीपूर्वक छपाई करून देणारे श्री वि. पु. भागवत व छापखान्यातील सर्व ठसे जुळारी ह्या सर्वांच्या मदतीबद्दल मी ऋणी आहे.

गो. प्र. भावे

वाचकांसाठीं

१) वाचकांस विनंति : १) शुद्धिपत्राप्रमाणें दुरुस्ती करून मगच ग्रंथ वाचा. २) ग्रंथ हे मार्गदर्शक गुरु-पण त्या त्या मंत्रांत वा शब्दोच्चारात तज्ज्ञ उपासकाच्या वाणींतून ऐकिल्यावरच जिवंतपणा येतो, म्हणूनच गुरुमुखा शिवाय घेतलेला मंत्र फलदायी होत नाहीं ३) भावादिक ग्रंथवाचनानें व पारायणें करण्यानें क्रमाक्रमानेंच मन व बुद्धि ह्यांमध्यें जागृति होते, जाणीव होते मगच आचार प्रचोदना होते. ४) त्यासाठींही **कृतितज्ज्ञ गुरु हवाच.** केवळ ग्रंथ वाचनानें ज्ञान मिळतें पण अनुभव मिळत नाहीं. ५) मंत्रानुभव आल्यास तो जरूर कळवा ही विनंति.

२) वाचकांसाठीं विचारधारा : १) सारें विश्व गणिताच्या नियमांवर चाललेलें आहे २) वैदिक मंत्र जागृत ठेवणाऱ्यांची जरुरी आहे ३) देशाच्या गुलामगिरीपेक्षां मानसिक गुलामगिरीच घातक व नुकसानकारक असते ४) शीलसंवर्धन करणारें तेंच सुशिक्षण होय ५) ब्रह्म हें अ-ज आहे ६) आकाश-अवकाश-मोकळी हें विश्वव्यापक तत्त्व आहे. पण तें ब्रह्म नव्हे ७) तत्त्वज्ञान हें मानवी जीवनाचें उत्तर आहे ८) 'सहनाववतु सहनौभुनक्तु व तेजस्वीनावधीतमस्तु । मा विद्विषावहै सर्वे सुखिनः संतु' हें आर्य ऋषीचें जीवन होतें. ह्यात नाहीं असा कोणता जीवन विज्ञानवाद आहे ? ९) 'त्यक्तेन भुंजीथाः (प्रथम द्या व मगच घ्या) ह्यात विश्वशांतीचीं बीजें आहेत. कोणता समाजवाद इतका व्यापक आहे १०) वर्णशुद्धि, जातिशुद्धि, कुलशुद्धि ह्या गोष्टी स्त्रियांच्याच स्वाधीन आहेत. ११) स्त्रियांची स्थिति (शारीरिक व मानसिक) ही समाजस्थितीचा निकषप्रावा आहे. १२) मेधा व प्रज्ञा ह्या स्त्रियात उपजतच असतात १३) गुलाब पुष्पाचें गुलाबपण रक्षण करण्यासाठींच जसे त्याच्या भोंवतीं काटे असतात, तसेच स्त्रियांवरील निर्बंध हें त्यांच्या 'शीला'चें रक्षण करण्याकरिताच असतात. ते त्यांना गुलामगिरींत ठेवण्यासाठीं नसतात. १४) स्त्रियांतील गुप्त व सुप्त दैवी तेज प्रगट होण्यासाठीं 'लग्न'-हा उत्तम उपाय

आहे. १५) स्त्री–पत्नी–याचेंच नाव 'गृह–घर'. पण हें ज्या समाजात नाहीं त्या मार्गी नेहमीच घर–घर! १६) स्त्री–पत्नी–ही कामविकार जिंकण्यासाठींच असून मुलें हीं क्रोध, लोभादि विकार जिंकण्यासाठीं आहेत. १७) मुलांना केवळ विद्यावान् करण्यापेक्षा गुणवान् करणें हें ध्येय असावें १८) 'गृहिणी सचिवः सखी मिथः। प्रियशिष्या ललिता कलानिधौ' ही भारतीय स्त्रीत्वाची मांडणी १९) आपल्या वंशात सुप्रजा निर्माण व्हावी हाच विवाहबद्ध होण्याचा मुख्य हेतु २०) 'पातिव्रत्य' रक्षण हेंच भारतीयत्वाचें मुकुटमणि वैशिष्ट्य आहे. २१) 'पतिव्रता न स्यात् केवल योनि रक्षणात्' २२) स्वयपाकगृह, स्नानगृह व बागबगीच्या ह्यातील कामाइतका स्त्रीच्या आरोग्यासाठीं दुसरा श्रेष्ठ व्यायाम व उपाय नाहीं. (२३) यज्ञोपवीत धारण हें भारतीय राष्ट्रीय एकात्मतेचें प्रतीक आहे. (२४) संध्याविधीनें कुलपरंपरा टिकविता येते. (२५) **थोडा वेळ तरी स्वस्थ बसण्याचा रोज अभ्यास करा.** व चमत्कार पहा.

पूजोपचारासंबंधीं कृति खुलासा : पत्रपुष्पें कोणतीं कशीं वहावीं धूपदीप कसे ओवाळावे, नैवद्यपदार्थ कसे अर्पावे इत्यादि बाबतींत प्राचीन ऋषीमुनींनीं दूरदृष्टीचे व्यवहार व आरोग्य ह्याचा संबंध लक्षात घेऊन त्याचा उपयोग सांगितला. ती माहिती उपासक व साधक यांना उपयोगी पडावी ह्या हेतूनेच येथ दिलेली आहे.

(१) **पुष्पार्पण :** मध्यमा तर्जनी व अंगुली ह्यांनीं उचलून फुलाचा देठ भाग करून तें वहावें. **पत्र :** सरळें वा उताणें देवतेकडे देठ करून वहावें. तुळस बेल, दूर्वा उत्तान व आपणाकडे टोकें करून वहावीं. अनुत्तान (उताणें नव्हे) वहावें असं काहींचें मत आहे. देवदेवतेला वस्त्र पुष्पादिकांनीं सजविल्यानंतर ती देवदेवता ध्यानयोग्य व शोभिवंत दिसावी हा हेतु. **फल :** फलाचें मुख देवाकडे करावें. **धूप :** उत्तम गुग्गुळाचा वा दशांगधूप (कृष्णागरु–चंदन, कापूर इत्यादि) सुवासिक व जन्तुघ्न पदार्थांचा असावा. **आरती** देवाच्या नाभीपासून दृष्टीपर्यंत तीनदां वा पांचदा ओवाळणें व तीहि सांप्रदायाप्रमाणें. **पंचारती** मात्र देवतेच्या पायापासून मस्तकापावेतों तीन पांच किंवा नऊ वेळा ओवाळावी. **नैवेद्य :**—अर्पित पदार्थावर तुळसीपत्र ठेऊन धेनु मुद्रेनें दृष्टि बंद करून देवतेचें स्वरूप ध्यानात आणून डाव्या हाताचा आंगठा वर उभी केलेली मूठ हृदयाला देऊन अर्पावा. ताम्बूल मस्यतों त्रयोदश गुणी, (शिरा काढीलेला पान, सुपारी-

सळी, चुना, खैर कात, केशर, कस्तूरी वा खोबरें बदाम, कंकोळ, जायपत्री, लवंग, वेलची, वर्ख, जायफळे,) **नमस्कार**—दंडवत, पंचांग (हात, पाय, मस्तक, वाणी, बुद्धि) वा अष्टांग (वरील पांच अंगें व छाती, दृष्टि व गुडघे टेकून करावा.) **प्रदक्षिणा** सावकाश, पाऊल न वाजतां वाणीनें अर्थलक्षी नामोच्चार करीत. गणपतीला १ वा ३, शंकराला साडेतीन-सोमसूत्री; विष्णूला चार, सूर्याला दोन वा सात, अंबेला एक. अश्वत्थ सात. प्रदक्षिणेचा प्रारंभ देवाच्या उजवीकडून. (जास्त माहिती तृचाकल्प, ज्ञानार्णव वा मनमहोदधि इत्यादि ग्रंथांतून पहावी.)

या प्रत्येक विधीमागें, तसेंच देवदेवतांना वहावयाचीं पत्र पुष्पें व नैवेद्याचे योग्यायोग्य पदार्थ ह्या विधीमागे देह, आरोग्य व अंतर्मन ह्यासंबंधें फार मोठें विज्ञान भरलेलें आहे.

ह्या सर्वांचा विचार येथें करणें अप्रस्तुत. परंतु भारतीयांचें सर्व कर्मकांड विज्ञानांतून ब्रह्मज्ञानाकडे नेणारें असून अखेरीस तें ब्रह्मांडांत विलीन होऊन जातें. तथापि तें केव्हांही जागृत होऊं शकतें. तेथें नष्ट न होतां विलीन होतें म्हणजे ब्रह्माशीं एकरूप होऊन जातें, हा अर्थ—

मंत्रशास्त्रांतील कांहीं संप्रदाय : सप्तशतीचे पाठ करितांना पोथीचीं पानें उलटतांना (१) तीं एकामागून एक वाचकानें आपल्या आंगावर, उलटून वाचीत जाणें ह्या पद्धतीला 'गौडपादीय संप्रदाय' असें म्हणतात व (२) याच्या उलट पोथीचीं पानें वाचकानें आपल्या समोर उलटून मंत्राचा पाठ करावयाचा ही दुसरी सामान्य पद्धत आहे. अशाच रीतीनें मंत्रशास्त्राचेही भारतांत तीन मुख्य संप्रदाय आहेत. ते असे—केरळीय संप्रदाय, काश्मीरी, व गौड संप्रदाय. वैदिक धर्मावलंबी मांत्रिक केरळीय पंथाचे आहेत. केरळीय संप्रदाय हा मिश्रमार्गी संप्रदाय आहे, म्हणजे यांत मुख्यतः दक्षिणमार्गी अर्थात् सौम्य सात्त्विक मार्गीय मंत्रोपासना असून वाममार्गीय मंत्रोपासनाही आहे. पण ती वाममार्गीय मंत्रोपासना उघडपणें नव्हे, तर छुप्या वा गुप्त मार्गानें थोडी चालते. या मार्गांतील साधक महालक्ष्मीसारख्या देवतांचे उपासक असून क्वचित् तामसी मंत्रोपासना पण करितात, म्हणून हा संप्रदाय मिश्रवादी संप्रदाय म्हटला जातो. कारण वाममार्गीयांचे पंचमकार जरी उपयोगिले जात नाहीत, तथापि त्यांचे प्रातिनिधिक पदार्थ उपयोगिले जातात.

काश्मीर संप्रदायी मंत्रोपासक सरस्वतीसारख्या सात्विक देवतांची उपासना करितात. गौड संप्रदायी भैरव, तारा, काली इत्यादि तामस प्रकृतीच्या वा त्या देवतांची उपासना करितात.

तसेच मंत्रशास्त्रामध्ये वेदागम, बौद्धागम, जैनागम असेही तीन भेद आहेत. जैनागम प्रणाली दक्षिण सव्यमार्गी असून काश्मीर संप्रदाय-प्रधान आहे. बौद्धागमी मंत्रप्रणाली, मुख्यतः वाममार्गी असून गौड संप्रदाय-प्रधान आहे. आणि वेदागम मंत्रप्रणाली, केरळ संप्रदायप्रधान आहे. या सर्व संप्रदायांत गुरुदीक्षा हें मुख्य अंग आहे. (गोपाळ प्रसादजी बक्षी—उपासनांक १९६८)

मंत्रशास्त्रांतील कांहीं आधारभूत ग्रंथांचा खुलासा : आधारभूत ग्रंथांच्या नांवापैकीं कांहीं नांवावरून त्यांतील विषयासंबंधानें पूर्ण कल्पना येत नाहीं. म्हणून त्यांपैकीं कांहींचा जरूर तेवढा खुलासा येथें करणें योग्य व जरूर आहे. तो असा—

(१) कल्प-ग्रंथ : ज्या ग्रंथामध्यें, मंत्र-विधान, यंत्रविधान, मंत्र-यंत्रोद्धार, बलिदान, दीपदान, आवाहन, पूजन, विसर्जन व साधना इत्यादि विषयाचें वर्णन दिलेलें असत, त्या ग्रंथांना '**कल्प-ग्रंथ**' असे म्हणतात.

(२) तंत्र-ग्रंथ : ज्या ग्रंथामध्यें गुरु-शिष्य-संवाद-रूपानें अथवा शिव-पार्वती यांच्या संवादरूपानें मंत्र, यंत्र, तंत्र व औषधिवल्ली वा वनस्पति व त्यांचे गुण यांचें वर्णन आहे. त्या ग्रंथांना '**तंत्र-ग्रंथ**' म्हणतात; तंत्र म्हणजे कृति करण्याची पद्धति.

(३) बीज-कोश : मंत्राचे पारिभाषिक शब्द, त्यांचे अर्थ व खुलासा व्याख्या इत्यादि गोष्टी ज्या ग्रंथात दिलेल्या असतात त्यांना '**बीज-कोश**' किंवा '**मंत्र-कोश**' असे म्हणतात.

(४) पटल-ग्रंथ : आराध्य देवदेवतासंबंधानें मंत्र, यंत्र, साधने व साधना-विधि, तसेंच, मंत्रभूमिकेचें वर्णन किंवा काम्य-कर्मांत निष्णात कसे व्हावें इत्यादि माहिती देणाऱ्या ग्रंथांना '**पटल-ग्रंथ**' असे म्हणतात.

(५) पद्धति-ग्रंथ : ज्यामध्ये देवदेवतांच्या साधनेसंबंधानें वर्णन केलेलें असतें, त्यांना '**पद्धति-ग्रंथ**' असे म्हणतात.

प्रस्तावना

(तृतीयावृत्तेः)

श्रीगुरुगणेशाय नमः

अखंडं ब्रह्माण्ड सृजसि विनिहंसि क्षणलवात्
अतो गायन्ति त्वा कतिचन चिदानंदलहरीम्
अथ त्वं मां मुक्त्वा चरणशरणोऽहं तव शिवे
ददासि प्रेम्णा मां जननि तव सायुज्यपदवीम्

अखिल–ब्रह्माण्डोदर–जगल्ललामभूत–श्रीमहा–भट्टारिका–श्रीमहा–त्रिपुर सुंदरी–कृपापीयूषलहरीलवप्रतापात् अस्य मंत्रशास्त्रग्रंथस्य पंचदशवर्षानंतरं तृतीयसंस्करणं भक्तानां वाचक–वृन्दानां च पुरतः महाराष्ट्रभाषायां प्रकटी क्रियते। अन्यथा तस्य ग्रंथस्य प्रकटीकरणं अशक्यमेव संजातमासीत्।

मंत्रशास्त्र

औपपत्त्यनुभवाविवरणात्मकमंत्रशास्त्रग्रंथः प्रस्तुतमंत्रशास्त्रसमानः कुत्रापि न दृश्यते। पूर्वस्मिन् काले श्री ११०८ विद्यारण्यस्वामिभिर्मंत्रशास्त्रग्रंथो निर्मित इति श्रूयते, परं स न दृष्टिपथं याति, तथैव श्री त्रिपुरसुंदरीप्रसादाप्त-कृतैः श्रीमद्भास्कररायमहाशयैरधुना शतवर्षांप्राक् "सौभाग्य चंद्रोदय" इति मंत्रशास्त्रग्रंथः निर्मितः, परं स ग्रंथोऽपि न प्राप्यते। अस्माभिस्तत्प्राप्तये बहुविधाः प्रयत्नाः कृताः। प्राप्तो भवेत् चेत्तस्य प्रकटनार्थमचिरादभिलाषा वर्तते।

मंत्र–महिमा

श्रीभगवता नारायणेन श्रीकृष्णरूपं धरता स्वकथितायां भगवद्गीतायां आर्तो जिज्ञासुरर्थार्थी ज्ञानीति च चत्वारः सुकृतिनो भक्ताः कथिताः। तत्र भक्तानां श्रद्धा कस्य कुत्र भवतीति विषयमधिकृत्य—

यो यो यां यां तनुं भक्तः श्रद्धयार्चितुमिच्छति ।
तस्य तस्याचलां श्रद्धां तां एव विदधाम्यहं ॥

इत्युक्तवान् स्वय भगवान् । अस्मिन् कराले कलिकाले दैनंदिनीया जीविका सपादयितुमपि बहवो जना असमर्था सजाता: । धर्मशास्त्रादि-ग्रथेषु ऐहिकामुष्मिक–सौख्य–प्राप्त्यर्थं, धर्मार्थकाममोक्षादिपुरुषार्थाना साधन कर्तव्य इति आदिष्टम् । परतु धर्ममोक्षविषयकं साधन अर्थं काम च विहाय कैश्चिदपि कर्तुं नेष्यते इदानीम् । अर्थकामपुरुषार्थेषु एव सर्वेषा जनाना प्रवृत्ति । तत्प्रवृत्तिपुष्ट्यर्थं कैश्चिन् "यया कया च विधया वद्धनं प्राप्नुयात्" इति वाक्य पुरस्क्रियते । पर च तद्वाक्यस्य पूर्वे सदर्भे उपरिनिर्दिष्टवद्धनप्राप्तिस्तु नीतिधर्मविहितकर्माचारान् अनुलघ्य कर्तव्या इति विवेचन वर्तते ।

अर्थनामकस्य पुरुषार्थस्य साधन प्रथम कर्तव्य इति मनीषा चेत् शरीर-मनोबलप्राप्तये भगवद्गीताया 'बलं बलवतामस्मि कामरागविवर्जित' इत्युक्त । अतो बलप्राप्तये अर्थप्राप्तये च भगवदुपासना अवश्य कर्तव्या । सा तु मत्रानुष्ठानेन सुसाध्या भवति । मत्रोच्चारणसमये मत्रस्थितवर्णाना यथार्थानुपूर्व्यात्मकेनोच्चारणेन मत्रशक्तिरुत्पद्यते । सा शक्तिस्तु द्विविधा । इष्टफलप्रापिका प्रारब्धकर्मविहितानिष्टफलविनाशिका च मत्रोच्चारण–समये साधकस्य चतुर्षु दिक्षु अनुकूलकिरणशलाकाना कवच समुत्पद्यते । यथार्थमत्रोच्चारणात् मत्रप्रकाशलहरीणा तेजोवलय च समुद्भवति । तस्य तेजोवलयात् बाणसदृशा किरणशलाका उत्पद्यन्ते तथा छेदाकृतयश्च । बाणाकृतिशलाकाभिर्मत्रोच्चारणकर्तुं चतुर्षु दिक्षु पजर समुद्भवति, तथा च अनिष्टग्रहोत्पन्नकिरणशलाकाना निर्मूलन छेदकरक्षणाकृतिभि सपद्यन्ते । एतत्सर्वं मत्रजपकर्तु कवचरूप भवति ।

मानवेन प्रपचशकट वोढु स्वसामर्थ्येन धर्मानुकूलाचारेण अर्थसपादन कर्तव्यमिति पूर्वं कथितम् । धनसपादन विना अस्मिन् समये सर्वेषा जनाना मनसि द्वौ प्रश्नौ समुपस्थितौ भवत । मन स्वास्थ्य कथ लभेद्धर्मसाधन च कथ स्यादिति । अर्थसाधनेन विना मन स्वास्थ्य न लभ्यते । अर्थसाधनावाप्तये

एतद्ग्रंथस्य पूर्वमुद्रितायां द्वितीयावृत्तौ द्रव्यप्राप्तिसाधनानि न प्रदर्शितानि। परं च अस्मिन् दशवर्षीये काले सकलजनानां मनसि धनं कथं प्राप्येतेति महान् कोलाहलः समुद्भूत इति दृश्यते। अतोऽस्य ग्रंथस्य अस्मिन् तृतीये संस्करणे धनसंपादनार्थं बहवो मंत्राः, अनेकानि यंत्राणि, स्तोत्राणि, मंत्रसिद्धिसाधनानि, पुरश्चरणानि, पुरश्चरणविधयश्च अनेकाः प्रपंचिताः। कामपुरुषार्थ-सिद्ध्ये यथाभिमतवरप्राप्त्यर्थं अभिमतकामिनीप्राप्त्यर्थं तथा च पतिपत्न्योर्मध्ये संशयपिशाचिकया संजातस्य दौर्मनस्यस्य निराकरणार्थं, पितापुत्रयोर्मध्ये संजातकलुषभावनाशनार्थं उभयोर्मध्ये सौहार्दप्राप्तये मंत्राणां प्रकटीकरणं कृतम्। देवतोपासनया देवताप्रसादप्राप्त्यर्थं तथा देवतादर्शनात्मकसगुणसाक्षात्कार-प्राप्त्यर्थं आत्मानात्मसाक्षात्कारदर्शनार्थमपि मंत्रपुरश्चरणानि अत्र संगृहितानि।

मंत्रसिद्धिप्राप्त्यर्थं बहवो निबंधाः सन्ति। निर्बंधं विना देवतासामीप्यं कथं सिद्ध्यतीति प्रश्नकर्तारो बहवः आसन् सति च, परं बंधनं विना न किंचित्प्राप्यते इति सत्यमेवास्ति। व्यवहारेऽपि बहूनि बन्धनानि सन्ति। तान-विगणय्य व्यवहारस्य सिद्धिरपि न भवति। अस्य उदाहरणं द्रष्टव्यम्। मोहमय्यां दुग्धप्राप्तये पडवादनपूर्वमेव गंतव्यम्। अन्यथा शुद्धदुग्धप्राप्तिर्न भवति। नियमोल्लंघनस्य फलं एकमेव भवति। इष्टफलप्राप्तये मंत्रजपविषये नानाप्रकारका नियमा वर्तन्ते। बन्धनानां नियमानां पालनं च यदि न स्यात् तर्हि मंत्रफलप्राप्तिरपि नैव भवत्। कानि बंधनानि के च नियमा इति ये पृच्छन्ति तेषां समाधानार्थं अधोलिखितं अत्र वक्तुमिच्छाम। आधुनिका भारतवर्षीया वैदिकधर्मिणां कुलजा जनाः अपि तिलक-यज्ञोपवीत-शिखाविहीनाः चित्रपटदर्शनव्यसनिनः संजाताः। एतानि विरुद्धाचरणानि त्यक्त्वा यदि तैः वर्णाश्रमधर्मानुकूलानि आचरणानि श्रद्धापूर्वकं अनुष्ठीयन्ते, मंत्रानुष्ठानं वा क्रियते, तदा तेषामैहिकामुष्मिकोन्नतिः असंशयं भविष्यति। सामान्याचरणविधिना यदि मंत्रसिद्धिर्न भवति तर्हि किं कर्तव्यमिति संदेहेऽस्मिन् ग्रंथे कानिचित्साधनानि विशेषरूपेण निर्दर्शितानि। तथापि अन्यानि साधनान्यपि यानि अन्येषु ग्रंथेषु सन्ति तान्यपि संगृह्यन्तेऽधोलिखित-श्लोकावल्यां।

"द्रावणं बोधनं वश्यं पीडनं शोषपोषणम्।
दहनान्तं क्रमं कुर्वंस्ततः सिद्धो भवेद् ध्रुवम्॥
द्रावणं वारुणे बीजे ग्रंथनं क्रमयोगतः
तन्मात्राद्यन्तमालिख्य शिलाकर्पूरकुंकुमैः॥
उशीररोचनाभ्यां च मंत्र संग्रथितं लभेत्।
क्षीराज्यतोयमधुभिर्मध्ये तं लिखितं क्षिपेत्॥
पूजनाज्जपनाद्धोमाद् द्रावितः सिद्धिदो भवेत्।
द्रावितोऽपि न सिद्धश्चेद् बोधनं तस्य कारयेत्॥
सारस्वतेन बीजेन सम्पुटीकृत्य संभवेत्।
एवं बुद्ध्या जपेत् सिद्धो नो चेत् तन्तु वशीकुरु॥
आरक्तचंदनं काष्ठं हरिद्रा मदनं शिला।
एतैस्तु मंत्रमालिख्य भूर्जपत्रे सुशोभने॥
धार्यं कंठे भवेत् सिद्धो वशमेवद् प्रकीर्तितम्।
वशीकृतो न सिद्ध्यश्चेद् पीडनं तस्य कारयेत्॥
अधरोत्तरयोगेन यदा तु परिजप्यते।
ध्यायीत देवतां तद्वदधरोत्तरपूरिणीम्॥
विद्यां महिपिदुग्धेन लिखित्वाऽऽक्रम्य चांघ्रिणा।
तथा भूतेन मंत्रेण होमः कार्यो दिने दिने॥
पीडितो लज्जयाविष्टः सिद्धः स्याद्वाथ पोषयेत्।
नित्याय त्रैपुरं बीजमाद्यन्ते तस्य योजयेत्॥
गोक्षीरैर्मधुनालिख्य विद्यां पाणौ विधारयेत्।
पोषितोऽयं भवेत सिद्धो नोचेत् कुर्यात्तु शोषणम्॥
द्वाभ्यां द्वाभ्याञ्च बीजाभ्यां मंत्रैः कुर्याद् विदर्भणम्।
एपा विद्या गले धार्या लिखित्वा वटभस्मना॥
शोषितोऽपि न सिद्धश्चेद्दहनीयोऽग्निबीजतः।
आग्नेयेन च बीजेन मंत्रस्यैकैकमक्षरम्॥
आद्यन्तमध्य उर्ध्वं तु योजयेद्दाहकर्मणि।
भल्लातकस्य तैलेन मंत्रमालिख्य धारयेत्॥

कण्ठदेशे ततो मंत्रसिद्धिः स्याच्छंकरोदितम् ।
इत्येवं सर्वमंत्राणामुपायः शम्भुनोदितः ॥

मन्त्रोच्चारणे यथा देवताया मूर्तय उत्पद्यन्ते तथैव तत्तद्देवतायन्त्राण्यपि समुद्भवन्ति । यन्त्रोत्पत्तिस्तु प्रथमोत्पत्तिः । गृहारामाणां निर्माणसमये प्रथमतो व्यवहारे भाविगृहारामस्य रेखाकितचित्र निर्मीयते, तदनन्तर गृहारामाणां निर्माणं तथैव प्रथमत' तत्तद्देवताना रेखाकितं चित्र समुद्भवति तदन्तर देवताना सर्वावयवात्मिका मूर्तिरापतत प्रकटीभवति । पूर्वैर्ऋषिभिरुपासनासमये यानि यन्त्राणि तेषां दृष्टिपथे आगतानि तथैव तैर्नानाप्रकारकाणि यन्त्राणि शिष्येभ्यो दत्तानि गुरुशिष्यपरपरया प्राप्तानि यन्त्राणि वर्तन्ते । तान्येवास्मिन् सस्करणे समुल्लिखितानि ।

अस्त्रविद्या । अस्त्रविद्यात्मको मन्त्रराशिस्तु कथितोऽस्मन्मन्त्रशास्त्रग्रथे । पाश्चात्याना अणुध्वनिप्रयोगे कर्ताणुध्वनिक्रियां परिवर्तयितु न शक्नोति पर चास्त्रविद्याकर्मणि यदाकदाचिदस्त्रोपसहार. प्रशस्त. स्यात्तदास्त्रोपसहरण कृत्वास्त्रपरिणाम निवर्तयितु शक्नोति । ब्रह्मास्त्रप्रयोग कृत्वा यदि प्रयोगात्मकसहारमपनेतुमिच्छति । अस्त्रोपसहरण कृत्वा ब्रह्मास्त्रसहारमपनेतुमचिरात् संहारप्रतिबंधो भविष्यति । आग्न्यस्त्रप्रतिशमार्थं वारुणास्त्रप्रयोग उपदिष्टः । एषा तु पौर्वकालिकी वार्ता । अधुना एते प्रयोगाः खपुष्पवत् इति क्वचन वदेयु. । वदन्तु, नास्माक तेन काचिदपि हानि. । उत्कटप्रयत्ना॰ रसाध्यन्तिऽसाध्यानि कार्माणि । तत्र न कोऽपि सदेह. । सभास्तभन वाक्स्तभन सभागतानां जनानां तत्र स्थाने स्तभन भवितु शक्यते प्रयोगान्तेरण । धूम्रोत्पत्तिकारका धूमावतीप्रयोगा वर्तंते । शतवर्षात्पूर्वं ग्वाल्हेयरनगरे तत्रस्थितार्थवणवेदीयमान्त्रिकेण धूमावतीप्रयोग कृत येन समागता सैनिका धूमेनाधीकृता तेषां पुरोगमन स्थगित कृत । उपरिनिर्दिष्टप्रकरणे व्यावहारिकी मन्त्रसामर्थ्यदायिनी क्रिया प्रकटिता मन्त्रोपासनया; केषाचित् श्रीभगवतीपूजाप्रसगे सुगधितपुष्पाणा धूपाना च सुगधप्राप्ति भवति । कर्पूरसुगधधूपसुगंधादि द्रव्याणामभावेऽपि उच्चद्रसुमुगधप्राप्ति सपादिता भवति । श्री भगवती-श्रीगणेश-श्रीशकर-श्रीवटुक-भैरवादिदेवतानां प्रत्यक्षदर्शनानि सजातानि ।

कथा भाविकाना नानासंकटात् निर्मुक्तिः संजाता। "मंत्रसिद्धिस्तु केरल इति" प्रवाद सत्यमेव मद्रासप्रान्ते सेलमनगरे अस्ति। अस्मत् समीपे कश्चिन्महान्पदस्थो मुमुक्षु समाप्त स तस्य मायामोहनमपनेतु प्रार्थयामास श्री हनुमत्प्रसादात्तस्य मोहन निर्वीर्यं जातम्। तस्य भार्या प्रतिमास भर्तुर्वचनात् चतु शतरूप्यक स्वभगिन्यै प्रेषितवती।

मंत्राणा पुरश्चरणात्प्राक श्रीगायत्रीमंत्रस्यायुतजप कथितस्तथैव यंत्राणा लेखन सहस्रवार कर्तव्य। बृहद्यन्त्राणा लेखन शतवारमेवोच्यते। अस्मिन् ग्रंथे सप्तशतीमंत्राणा कतिचनमंत्रा शारदापीठस्थाऽस्मत्परमेष्ठिगुरु कै वा श्री १०८ त्रिविक्रमतीर्थाना मंत्रसंग्रहात् समाप्ता। कै वा रतलामस्थ लालजीमहाराजाना अस्त्रसंग्रहात् अस्त्रमंत्र समुद्धृत। ब्रह्मास्त्रादि–अस्त्रमंत्राणामुपसंहारमंत्रा श्री कै वा विष्णुतीर्थाना भ्रातृणा श्री अखंडानंदतीर्थाना संग्रहात् संगृहीता। श्री सूक्तांतर्गतमंत्राणा यंत्राणि बेळगावस्थ श्री रामचंद्रबळवंतकुलकर्णीना संग्रहात् प्राप्तानि। द्रावण बोधनादिश्लोकसमूह गोंडलरसशालया मुद्रितरसमालास्थितमंत्रखंडात् संगृहीत। तत्तुगादलस्थभुवनेश्वरीपीठस्थ आचार्य श्री १०८ श्रीचरणतीर्थाना सकाशात् प्राप्त। ज्योतिषाचार्य हिमतराम महाशंकर जानि (कर्णावतिनगरस्थ) तथा परमहंस परिव्राजकाचार्य श्री १०८ श्री नारायणानंद यतिस्वामी तथा श्रीमंत राजश्री नारायणशंकर गुप्ते तथा श्रीमंत राजश्री नरहर खंडेराव क्षीरसागर एतेषा सर्वेषा सज्जनाना कृपयैते मंत्रयंत्रादि संग्रहा सम्प्राप्ता। वयमेतेषा महाभागाना महत उपकारान् प्रकटीकुर्म। एतद्ग्रंथस्य अस्मच्छिष्यैर्लिखितानि मंत्रपत्राणि बहुशोऽशुद्धानि लिखितान्यासन्। पर च तेषा मुद्रणसमये महामहोपाध्यायपण्डितसातवळेकरमहाशयैर्मंत्रशुद्ध्यर्थं अतीवपरिश्रम कृत तेषामपि परिश्रमसहाय वर्णितु न शक्यते। प्रस्तुत–ग्रंथे स्थिताना मंत्राणा विवरणात्मकानि शताधिकचित्राणि सचित्रितानि। सत्कार्यार्थं बहव प्रयत्ना कृता द्रव्यव्ययश्च बहुतर जात। एतद्ग्रंथनिर्माणकालेऽस्मच्छरीरोपरि बहुविधरोगानामाक्रमण जातम्। बहुविधास्त्रुटय अस्मिन् ग्रंथे वर्तन्ते, तदर्थं वाचकवृंदाना पुरस्तात् क्षमा याच्यतेऽस्माभि। अततोऽस्मद्गुरु श्रीभारती कृष्णतीर्थमहाशयानाऽस्मत्पीठदेवता

श्रीराधाकृष्णस्वामिना तथा श्रीमद्द्वारिकामहात्रिपुरसुन्दर्या श्रीकोल्हापूरस्थश्री-महालक्ष्मी प्रसादेनैव मत्कार्यग्रन्थः समाप्तिं गत इति। तान् सर्वान् नमस्कृत्य दण्डवत् प्रणिपत्य विरमामि।

योगेश्वरानंद तीर्थः
श्रीमत् जगद्गुरुश्रीशंकराचार्यः
प्रथम श्रीशारदापीठाधीश्वरः अनंतरं
श्री गोवर्धनपीठाधीश्वरः (पुरी मठ)

❦ ❦

मराठी प्रस्तावना

(तृतीयावृत्तींतील)

उषादेवी या साऽवनयति जनानां गद्चयाम्
उषःकाले मुंचन् कुमुदपिहितं भ्रामरकुलम्
क्षुणद् विप्रौघानां निखिलदुरितान् वेदविदुषाम्
चिरं वः सौहार्द्रं वितरतु परब्रह्ममहिषी॥ (स्वकृत)

हा अखिल ब्रह्माण्डात महाकालक्रीडेनें प्रत्येक वस्तुजात अवस्थात्रयीच्या बंधनात निगडीत झालेलें आहे. अर्थात् आब्रह्मस्तंभपर्यंत प्रत्येक पदार्थाला उदय-काल, मध्यकाल व अस्तकाल असे तीन काल लागू आहेत. आज आपल्यापुढें जें जगत् दृग्गोचर होत आहे त्याची परिस्थिति "नीचैर्गच्छत्युपरि च दशा चक्रनेमिक्रमेण" या न्यायानें उच्चावचत स्थितीला जात असते, असें आपल्या अवलोकनात येत असतें. जेथें महान् उदधि असतो, तेथें पर्वतराजी उत्पन्न होते; जेथें अधित्यका असेल तेथें उपत्यका झालेली दिसून येते. जेथें महान् अरण्य असेल तेथें सरोवर उत्पन्न होतें. जें राष्ट्र सुधारणेच्या उत्तुंग शिखरावर पोहोंचलेलें असेल, तें सुम्यूरियन, अटलांटियन किंवा मोहेनजोडारो येथील राष्ट्राप्रमाणें नामशेष होऊन जातें. आणि ज्या जाती वन्यपशुप्रमाणें राहत होत्या त्या आज उच्च कोटीला पोहोंचलेल्या आहेत असें दिसतें. असा हा कालाचा महिमा आहे.

२. ह्या कालाचें मूर्तस्वरूप कोणतें असा विचार केला तर सूर्यदेवता हेंच तें मूर्तस्वरूप होय. सप्तस्वर्ग व सप्तपाताल ह्यापैकीं भूर्लोकाशीं तदंगभूत पातालादि लोकाशीं सूर्यदेवतेचा संबंध उत्पन्न होतो; त्यावरून उदयास्तकालाची परिमिति ठरविण्यात आली आहे. स्वर्लोकादि लोकासंबंधीं कालगणना व त्याचें उदयास्त-काल ठरविणें ही गोष्ट मानवी बुद्धीच्या आकलनशक्तीच्या पलीकडे असल्यानें केवळ आप्तप्रमाणावरूनच तिची अस्पष्ट कल्पना करितां येते. ह्या भूर्लोकात राहून "रमणीय चरणा रमणीयां योनिमापद्यन्ते, तथाच कपूयचरणा कपूया योनिमा

पद्यन्ते, देवयोनिं चाडालयोनिं सूकरयोनिं वा। "उपनिषद्" त्रैविद्या मां सोमपाः पूतपापाः। यज्ञैरिष्ट्वा स्वर्गतिं प्रार्थयन्ते। ते पुण्यमासाद्य सुरेन्द्रलोकमश्नन्ति दिव्यान्, दिवि देवभोगान्। ते तं भुक्त्वा स्वर्गलोकं विशालं। क्षीणे पुण्ये मर्त्यलोकं विशन्ति। (भगवद्गीता अध्याय ९, २०।२१). प्राप्य पुण्यकृतान् लोकान् उषित्वा शाश्वतीः समाः।" (भगवद्गीता अध्याय ६ श्लोक ४१). अशा प्रकारच्या औपनिषदिक विचारपरंपरेनें व पौराणिक विचारपरंपरेनें पाहता यज्ञयागादिक कर्में करणारे स्वर्गलोकाला जातात व पुण्यकर्मभोगाचा काळ संपल्यावर पुन्हा भोगायतन अन्नमय शरीर धारण करून भूलोकात जन्माला येतात, असे आधार सांपडतात. परंतु स्वर्गलोकात वास करण्याची कालगणना किती असते, याचा अद्यापि विचार स्पष्ट मांडण्यात आलेला नाहीं.

३. अलीकडे अस्तित्वांत आलेल्या परलोकविद्या शास्त्राप्रमाणें (Spiritualism) प्रयोग झाले आहेत व होतही आहेत. त्यावरून असे दिसून येतें कीं, रोमन व ग्रीक साम्राज्याच्या वेळीं मृत्युलोकात पांचभौतिक देहानें वावरत असलेले जीवात्मे, तत्कालीन देशस्थिति, लोकांच्या चालीरिती, पोशाख, पेहराव, वाहनें, राज्यव्यवस्था, मोठमोठ्या लढायांतून उपयोगात आणलेलीं शस्त्रास्त्रें, कवित्व आणि वाङ्मय, सृष्टिकर्त्याबद्दल व सृष्ट्युत्पत्तीबद्दलचे सिद्धान्त या संबंधीं जे संदेश देतात, त्या संदेशांतील माहिती हल्लीं अस्तित्वात असलेल्या ग्रंथात जी जी तत्कालीन माहिती संकलित केलेली आहे त्या माहितीशीं तंतोतंत जुळते. म्हणजे ते जीवात्मे स्वर्गांत अजूनपर्यंत वास्तव्य करीत आहेत व त्याची माहिती दोन हजार वर्षांपूर्वीची आहे. अर्थातच ते जीवात्मे दोनहजार वर्षांपूर्वींचे आहेत. ही दोनहजार वर्षांची गणना त्यांच्या स्वर्गादि लोकांत कशी करतात या प्रश्नाचें समर्पक उत्तर त्या जीवात्म्याकडून मिळूं शकलें नाहीं. यामुळें स्वर्गलोकांत किती अवधीपर्यंत राहता येतें याचा मागमूस लागत नाहीं. अशा कालगणनेचा सूक्ष्म व सूक्ष्मतम विचार केला व ऋग्वेदीय नासदीय सूक्ताच्या अर्थावरून पाहता काल हा अनन्त आहे. तसी वेदांची अवस्था नाहीं.

४. वेद हे त्रिकालाबाधित आहेत, अनन्त आहेत व अव्यय आहेत. तरी प्रस्तुत काळीं उपलब्ध झालेल्या ऐतिहासिक संशोधनावरून असे दिसून येतें कीं,

वेदाभ्यास करणाऱ्याची व वैदिक ज्ञानाबद्दल अभिमान बाळगणाऱ्याची संख्या कालगतीनें कमी कमी होत चाललेली आहे व वेदाबद्दल आदरही कमी होत चालला आहे. ऋग्वेदाचा बराच भाग आज लुप्तप्राय झालेला आहे; कित्येक शाखांचे ब्राह्मण नाहींत व त्या शाखांचे ग्रंथही नाहींत शंखासुरानें वेद पाताळात नेले व श्रीविष्णूनीं मत्स्यावतार धारण करून ते परत आणले असा जो पौराणिक इतिहास उपलब्ध आहे, ती इतिहासाची पुनरावृत्ति केंव्हा तरी होणार आहे, असे वाटत. कारण आजही अगस्त्यसंहिता, मयसंहिता इत्यादि ग्रंथ जर्मनांतील ग्रंथालयात सांपडतात. परन्तु हिंदुस्थानातील ग्रंथसंग्रहांत मिळत नाहींत. म्हणून वेद हे त्रिकालाबाधित असूनही उदयास्ताच्या भोंवऱ्यात सांपडलेले आहेत असा भास होतो. "यावज्जीव अग्निहोत्र जुहुयात्" या वैदिक संदेशाप्रमाणें आपले पूर्वज ऋषि सांवत्सरिक, द्वादशवार्षिक व शतवार्षिक यज्ञ करीत असत, व त्या यज्ञाच्या प्रारंभींची व प्रारंभापासून समाप्तिकाळापर्यंतची कालगणना ते इष्टिकांच्या व वालुकायंत्राच्या साह्यानें करीत असत. अशा कालगणनेंत घटिका, प्रहर, दिवस, मास आणि वर्ष यांचे काल स्पष्ट समजून येत असत व या प्रमाणेंच कृत, त्रेता, द्वापार व कलियुग अशा प्रकारची युगपरिमितीही त्यांनीं करून ठेविली आहे. या युगपरिमितीवरून असें दिसून येतें कीं, कृतयुगांत सर्वच समाज वेदज्ञानात उच्च दर्जाला पोहोंचलेला असावा असे नाही. व त्यावेळीं समाजातील मोठा भाग वेदज्ञाननिपुण असेल व काहीं थोडा भाग अज्ञानावस्थेत ही असेल. कारण सृष्ट्युत्पत्तीबद्दल "धाता यथापूर्वमकल्पयत" असे वाक्य दिसून येतें. यावरून कृतयुगात वेदविद्येचा प्रचार उच्चतम भूमिकेचा होता व तो जसजसा कमी कमी होत जाईल तसतशी युगाची योजना त्रेता, द्वापार व कली अशी केली असली पाहिजे. कृतयुगात जसे त्रेता, द्वापार व कली या युगाना शोभतील असे काहीं पुरुष होते, त्याप्रमाणेंच हल्ली कलियुगातही कृत, त्रेता, द्वापर या युगातील स्वभावाचे मनुज थोडे तरी आहेत. यावरून हल्लीचा कलियुगाचा काळ म्हणजे मानवी संस्कृतीच्या दृष्टीनें वेदज्ञानरूपी सूर्याच्या अस्ताचा काळ असावा असें वाटते असा हा अस्ताचा काळ जाऊन उदयाचा काल यावयाचा आहे. उदयकालाच्या आधींचा काल प्रस्तुतचा असावा असे अनुमान करण्यास काहीं प्रत्यवाय नाहीं.

५. वेदांच्या उप:कालाच्या पूर्वीचा काल हल्लीं आहे, म्हणजे थोडक्यांत सांगावयाचें तर आपण सध्या अंधःकारांतच आहांत, असें म्हणण्यास हरकत नाहीं, हल्लीं मुद्रणकला अस्तित्वांत आल्यानें वेद व वेदांगें मुखोद्गत ठेवण्याची जरूरी भासत नाहींशी झाली आहे कारण उदरनिर्वाहाच्या साधनाची इतकी दुर्मिळता झाली आहे, व जीवनकलह इतका दुर्दम्य झाला आहे कीं, वेदविद्या मुखोद्गत ठेवण्याइतका अवधीच शिल्लक राहात नाहीं. पाश्चिमात्य शिक्षणानें दिशाभूल झालेल्या लोकांच्या मतानें वेद म्हणजे सृष्ट्यारंभींचें कवित्व होय. या खेरीज त्यास जास्त महत्त्व नाहीं. आर्यावर्तांतील ब्राह्मणवर्गांत वेदज्ञानाबद्दल जितकी उदासीनता व अनास्था आहे तितकीच किंबहुना अधिक आस्था व प्रेम शार्मण्य मात्र (German) देशीय पंडितांमध्यें आहे, व ती दिवसेंदिवस वृद्धिंगत होत आहे. अशा प्रकारची वेदाबद्दल अनास्था होण्याचें कारण त्याचा दैनंदिन व्यवहारास कांहींच उपयोग होत नाहीं असें अलीकडे दिसत असल्यानें वेदाचें पठनपाठन त्याज्य वाटूं लागलें आहे. परंतु हा अंधःकाराचा काल आतां संपत आला आहे व अलीकडे वेदमंत्र, तंत्रमंत्र, पौराणिक मंत्र, यांत कांहीं तरी शक्ति असावी, परंतु ती अनुभवांत आणणारे कोणी दिसत नाहींत, असे अनुभवी सज्जन कोणी असतील तर पाहावें अशा प्रकारच्या विचाराचा ओघ सुरू झाला आहे. यावरून वेदवेदांगाचें पुनरुज्जीवन होण्याचा उप:काल समीप आला असावा अशी अस्पष्ट कल्पना उद्भूत झाल्यावरून लेखकानें मंत्रशास्त्र व मंत्रशक्तियोग या विषयावर लिहिण्याचा उपक्रम केला आहे. असें जरी आहे तरी "प्रयोजनमनुद्दिश्य न मंदोऽपि प्रवर्तते" या वाक्याप्रमाणें वर नमूद केलेलें प्रयोजन पुरेसें व हृदबलिष्ठ नाहीं नुसत्या प्रयोजनानें एखाद्या ग्रंथाची निर्मिति प्रभावशाली होईल असें नाहीं, तर प्रयोजनाशिवाय विषय, संबंध व अधिकारी ह्या तीन अनुबंधनाचीही एखाद्या ग्रंथनिर्मितीला आवश्यकता असते; व अशा चार अनुबंधांना ग्रंथाचें अनुबंधचतुष्टय असें म्हणतात.

६. प्रयोजन—इंदूर येथील प्रख्यात राजयोगी कै. वा. योगाभ्यानंद श्रीमाधवनाथ महाराज यांचा व लेखकाचा गुरुशिष्यसंबंध दहावर्षांपासून झालेला होता. व त्यानंतर चार वर्षांनीं श्रीमहाराजांनीं सुचविलें कीं, योगमार्गाबद्दल कांहीं

वाङ्मय प्रसिद्ध करावें. त्याप्रमाणे "श्रीसमर्थ आणि त्यांचा योग" असा योगपर एक लेख लिहिला, व धुळें येथील वाग्देवतामंदिरामार्फत प्रसिद्ध झालेल्या पहिल्या वाक्कुसुमसमुच्चहारांत तो प्रसिद्ध झाला. नंतर असा विचार मनांत आला कीं, आपल्या आयुर्दायाचा अभुक्त काल थोडाच राहिला आहे. म्हणून आपल्याला प्राप्त झालेलें ज्ञान श्रीसमर्थ रामदास स्वामींच्या शिकवणीप्रमाणे "जें जें आपणास ठावें। तें तें इतरांस शिकवावें।" म्हणजे तें लेखरूपानें प्रसिद्ध करावें आणि जनतेपुढें तें मांडावें; कोणास तें पसंत पडो वा न पडो. "उत्पत्स्यते हि मम कोऽपि समानधर्मा कालो ह्ययं निरवधिर्विपुला च पृथ्वी।" कोणीतरी आज नाहीं तर आणखी कांहीं कालानें आपण जें लिहितों त्याचा चाहता निघेल या भावनेनें योग आणि तदनुषंगिक चार लेख लिहिण्याचें ठरविलें. ते असे :—कुंडलिनी शक्तियोग, प्राणशक्तियोग अथवा मंत्रशास्त्र व मनःशक्तियोग. या लेखांपैकीं पहिला लेख इंदूर येथील 'आत्मबोध' मासिकांत छापून निघाला व नंतर तोच लेख हिंदी भाषेंतील प्रख्यात 'कल्याण' मासिकाच्या विशिष्ट अंकांत छापून निघाला. नंतर प्राणशक्तियोग लिहून काढला व तोही आत्मबोधांत छापून निघाला व कल्याण मासिकाच्या १९४० च्या साधनांकांत प्रसिद्ध झाला. वरील चार लेखांपैकीं प्रस्तुतचा लेख तिसऱ्या क्रमांकाचा आहे.

७. हा मंत्रशास्त्राचा ग्रंथ इतक्या लवकर तयार होईल अशा प्रकारची लेखकास आशा नव्हती. कारण त्याच्या निर्वाहाचा व्यवसाय निराळ्या स्वरूपाचा व निराळ्या विषयाचा आहे व प्रस्तुतसारखा ग्रंथ लिहिण्यास पुरेसा अवधि प्राप्त होईल व तोही लवकरच प्राप्त होईल अशी त्यास अपेक्षा नव्हती. तथापि बलवत्तर इच्छाशक्ति असल्यास प्रयासानेंही घडून न येणारें कार्य सहजासहजीं घडून येतें व अशी इच्छा होण्यास कांहीं कारणें घडून यावीं लागतात. अशीं दोन कारणें घडून आलीं. पुण्यस्थ वैदिक शास्त्रोत्तेजक सभेनें आपल्या हीरक महोत्सवाच्या स्मारकाप्रीत्यर्थ एक धार्मिक स्वरूपाचा ग्रंथ प्रसिद्ध करण्याची योजना आखली, व या ग्रंथांत अनेक धार्मिक विषयांपैकीं मंत्रशास्त्र या विषयावर एक लेख असावा असें ठरवून त्या विषयावर लेख लिहिण्याची इच्छा असणाऱ्यांची माहिती वर्तमानपत्रद्वारें घोषणा करून मागविली, व त्या घोषणेंत असें सुचविलें कीं,

सभेनें नेमलेल्या समितीनें तो लेख पसंत केल्यास त्या लेखकास लेखाच्या योग्यतेनुरूप पारितोषिक देण्यात येईल, पाच सहा महिने गेले; कोणीही लेखक तयार झाला नाहीं. सभेचे चिटणीस श्रीमंत रा. रा. बाबासाहेब जोगळेकर, बी. ए. एल् एल्. बी. बेलबागवाले हे अशा विचारात होते कीं मंत्रशास्त्राच्या लेखाच्या अभावीं सभेच्या धार्मिक प्रथास न्यूनता न यावी व कोणी लेखक मिळाल्यास पाहावा म्हणून ते पुणें येथील मंत्रविद्याविशारद कै. वा. रा. सीतारामपंत भट गुरुजी याचेकडे गेले होते. त्याच वेळीं जनतेच्या आपन्निवारणार्थ ऋग्वेदातील मन्युसूक्ताचे पाठ करावे अशाबद्दल लेखकास श्रीमाधवनाथ महाराजाचा स्वप्नसंदेश झाला होता. त्या मन्युसूक्ताचें विधान समजून घेण्याकरिता लेखक कै. वा. श्री. रा. रा. सीतारामपंत भटगुरुजींकडे गेला होता तेव्हा तेथें त्याची व श्री. रा. रा. बाबासाहेब जोगळेकर याची गाठ पडली. त्यावेळीं मंत्रशास्त्रावर कोणी लेखक मिळाला नाहीं असे त्यानीं लेखकास सांगितलें. कोणी लिहिण्यास तयार होत नाहीं आणि आपणास अशा प्रकारचा लेख लिहिणेंच आहे तर आपणच ते काम अंगावर घ्यावें असे लेखकास वाटलें. व कै. वा. श्री. सीतारामपंत भटगुरुजींनीही असें सांगितलें कीं लेखकास पुण्यास आणवून ठेवून त्याचेकडून लेख लिहून घ्यावा व त्याचेकडूनच हें कार्य होणार आहे. कै. वा. श्री. रा. रा. भटगुरुजींची आग्रहाची वाणी ऐकून लेखकास हा लेख लिहिण्याचे कार्य हातीं घेणें अपरिहार्य होऊन बसले. हा लेख दहापंधरा पानाचा व्हावा अशी सभेच्या चिटणिसाची अपेक्षा होती. परंतु लेख लिहिण्यास हातीं घेतल्यावर तो लेख दोन अडीचशें पानाचा ग्रंथ होऊन बसला. वर लिहिलेल्या प्रस्तुत ग्रंथनिर्मितीला उत्तेजक होतील अशा दोन कारणापैकी वर नमूद केलेलें एक कारण होय.

८. शके १८५७ सालीं केडगाव येथील श्री. दत्तमंदिर संस्थानचे उपासक श्री १०८ नारायण महाराज यांनीं एक मोठा धार्मिक समारंभ केला. त्यावेळीं लेखक त्या समारंभास उपस्थित होता. त्याप्रसंगीं चारी वेदाचें, अठरा पुराणाचे व भारताचे भगवत्पूज्यपाद श्रीमदाद्यशंकराचार्यांची प्रस्थानत्रयी व महाराष्ट्र भाषेतील आद्यग्रंथ ज्ञानेश्वरी इत्यादिकाचे रोज पाठ होत असत. वेदचतुष्टयातील मंत्रशास्त्राला आधारभूत असा जो आथर्वणवेद तोही श्रवण करण्याचा लाभ लेखकाला मिळाला.

त्याच वेळी असे आढळून आले की आथर्वणवेद आर्यावर्तात लुप्तप्राय झालेला आहे. म्हणजे आथर्वणवेदी ब्राह्मण तर अनामिकेला साथवर्ती करण्याइतकेच राहिले आहेत व आथर्वण वेदाचें प्रायोगिक ज्ञान तर अगदींच लुप्तप्राय झालेलें आहे. अशा परिस्थितींत ब्राह्मण्याचा अभिमान असणाऱ्याचें इतिकर्तव्य कांहीं असेल तर आथर्वण वेदाची महति ब्राह्मण वर्गापुढे मांडून त्या वेदाच्या अभ्यासाला अग्रस्थान मिळेल असे करणें हेंच होय. या हेतूनें आपल्याकडून होण्यासारखी जर कोणती गोष्ट असेल तर ती आथर्वणवेदप्रमुख मंत्रशास्त्रावर व मंत्रशक्तियोगावर चार ओळी लिहाव्या हीच होय. प्रस्तुत ग्रंथनिर्मितीला उत्तेजक होतील अशा दोन कारणापैकीं प्रस्तुत कारण हें दुसरें कारण होय. याकरिता मंत्रशास्त्रावर लिहिण्याचा निश्चय केला व त्या निश्चयाचें फळ म्हणून हा इतक्या पुष्कळ पृष्ठाचा ग्रंथ वाचकापुढें येत आहे.

९. **हा ग्रंथ स्वतंत्र स्वरूपाचा नाहीं.** एखादा मालाकार ज्याप्रमाणें उद्यानांतील निवडक निवडक सुमनांचा हार तयार करितो त्याप्रमाणें निरनिराळ्या ग्रंथांतून वेंचे काढून ते या ग्रंथांत एकत्र केले आहेत. हा ग्रंथ लिहितांना "नामूलं लिख्यते किंचित्" हें वाक्य आधारास सर्वांश घेतलें आहे. संकलनचातुर्य या ग्रंथात किती प्रमाणानें साधण्यात आलें आहे हें लेखकाला अजमावता येणार नाहीं. तें ठरविण्याचें कार्य वाचकवृंदाकडे आहे. थोडक्यात लिहावयाचें तर हा लेखक प्रथितयश ग्रंथकार या पदवीला पोंचलेला नाहीं व ती तशी त्याची आकांक्षाही नाहीं. याकरितां भाषाशास्त्रांत प्राविण्य संपादन केलेल्या लेखकाच्या कृतींत दृग्गोचर होणारें भाषासौष्ठव, अर्थगांभीर्य, विषयपरिपोषकता, एवंविशिष्ट गुणसमुच्चय या लेखांत दिसून येणार नाहींत.

१०. हा ग्रंथ लिहिण्यासंबंधीं वर निर्दिष्ट केलेलीं कारणें असलीं तरी तीं बाह्य कारणें होत. वस्तुतः ग्रंथाची निर्मिती, वित्तेषणा अथवा लोकेषणा याकरिता होत असते. द्रव्यसंपादन अथवा ग्रंथकार म्हणून कीर्तिसंपादन हा हेतु धरून हा ग्रंथ लिहिण्यात आला नाहीं. काहीं विशिष्ट ग्रंथ एक प्रकारच्या अंतःस्फूर्तीने होत असतात. कोठीं ग्रंथकाराची स्फूर्ति आपला समाज सदबल व वीर्यशाली व्हावा अशी असते. नीति कोणती अनीति कोणती व अवनति कोणती ? व नवनीतीच्या

आधारें प्रस्तुत समाजरचना मोडून नवीन समाजरचना करण्याच्या उद्देशानें प्रचलित आचारविचारात क्रान्ति घडविण्याकरिता व प्रचलित धर्मबंधनें झुगारून देऊन नवनीतीचा व नवमतवादाचा प्रचार करण्याकरिता काहीं ग्रंथकाराची स्फूर्ति उदित होते; व काहींची स्फूर्ति मन्वादि ऋषींनीं प्राचीन धर्मबंधनें कोणत्या हेतूनें घातलेलीं आहेत, याचा साधकबाधक विचार करून धर्मबंधनास परिपोषक होतील असे लेख लिहिण्याकडे वळलेली असते. प्रस्तुत लेखकाची भूमिका व स्फूर्ति तिसऱ्या प्रकारापैकीं आहे. प्रस्तुत लेखकाच्या ठायीं वेदांबद्दल अत्यादर आहे. भूतपिशाचापासून अगर विषयुक्त जीवाच्या दंशापासून लोकांना जे कष्ट होतात, त्याचें परिमार्जन आपल्याकडून व्हावें व तें वेदमंत्राच्या साहाय्यानें व्हावें अशी प्रबल इच्छा असल्या वैदिक ब्राह्मणाच्या सहवासात असतांना असे वेदमंत्र मिळावे म्हणून त्यानें पुष्कळ प्रयत्न केला. अशा प्रकारचे मंत्र यावनी भाषेत आहेत, त्यांच्याकडे लेखकानें लक्ष दिलें नाहीं. हा लेख लिहिण्याचें हातीं घेण्याच्या पूर्वी वेदमंत्राच्या अस्तित्वाबद्दल त्याची जिज्ञासा तृप्त झाली नाहीं. अर्थात् हा ग्रंथ लिहून तयार करण्याच्या वेळीं अशा प्रकारचे मंत्र त्याला उपलब्ध झाले, व त्याच्या आयुष्यातील एक प्रखर जिज्ञासा तृप्त झाली.

११. विषय—बहुतेक वाचकाचा असा प्रघात असतो कीं प्रथम प्रस्तावना वाचून मग ग्रंथातील विषय मनोवेधक असल्यास किंवा त्यांत काहीं नाविन्य असल्यास तो ग्रंथ संपूर्ण वाचून काढावयाचा. तसें नसल्यास ग्रंथाच्या प्रस्तावनेच्या वाचनानेंच समग्र ग्रंथाचें वाचन संपवून टाकावयाचें. अशा व इतर वाचकाची जिज्ञासा तृप्त करण्याकरिता व ग्रंथाच्या अनुबंधचतुष्टयापैकीं विषय या अनुबंधाची पूर्तता करण्याकरिता या ग्रंथातील विषयाचें थोडक्यात विवरण करणें जरूर आहे. वस्तुतः पुढें या विषयप्रवेश या शीर्षकाखालीं ग्रंथातील विषयांचें स्पष्टीकरण केलेलेंच आहे. ते विषय खालीं लिहिल्याप्रमाणें आहेतः—

१२. मंत्र शब्दाची व्याख्या, मंत्रजपाचा परिणाम, वेदांचें अपौरुषेयत्व, वेदाच्या शाखा, चार वेद व त्यांच्या शाखा म्हणणाऱ्या ब्राह्मणांची पूर्वकालीन वसतिस्थानें, ऋग्वेद, यजुर्वेद, सामवेद व अथर्ववेद यांतील मंत्र व त्याचे विनियोग व त्या मंत्रांपैकीं काहीं मंत्राचे अनुभव घेतलेल्या सज्जनांचे नामनिर्देश व त्यांची

चक्षतिस्थाने, सामवेदातील मंत्र व सूक्तें, पारशी लोकांची गाथा व त्यातील मंत्र व त्यांचे विनियोग, जैन सांप्रदायातील मंत्र, बौद्ध सांप्रदायातील मंत्र, तंत्रें व आगम यांच्या व्याख्या, यंत्रें व त्यांची निश्चयता, मूर्तिपूजेचें पुराणत्व, गायत्री मंत्राचें महत्त्व व गायत्री यंत्र, चाक्षुषीविद्या, गारुड मंत्र, मानवाचे संस्कार मंत्र जागृतीचें विधान, मंत्र सिद्ध झाल्याचीं लक्षणें, मंत्रसिद्धि नष्ट झाल्यानें ब्राह्मण वर्णीयांचा व तदनुषंगानें इतर आर्यधर्मीयांचा झालेला व होत असलेला अधःपात व उपसंहार.

१३. ग्रंथांत वर्णिलेली गायत्री मंत्राची महती हेंच या ग्रंथातील सारसर्वस्व होय. कारण कोणत्याही मंत्राची सिद्धि प्राप्त करून घेणें असल्यास व त्या सिद्धी-करितां अनुष्ठान करावयाचें असल्यास प्रथम गायत्री मंत्राचा जप करावा असें सांगितलें आहे. या गायत्री मंत्राच्या जपाबद्दल लिहितांना असें प्रतिपादन करण्यांत येतें कीं श्रीगायत्री मंत्र पूर्ण म्हणावयाचा तर तो चतुष्पाद मंत्र आहे. अर्थात् त्या मंत्राचीं बत्तीस अक्षरें होतात. व असा चतुष्पाद् मंत्र म्हटला तर त्या मंत्राच्या अंतीं प्रणवाचा उच्चार होतो. वस्तुतः संध्या करणाऱ्या सर्व त्रैवर्णिकांच्या पाठांत त्रिपदा गायत्री आहे. तथापि ह्या त्रिपदा गायत्री मंत्राच्या अंतीं प्रणवाचा उच्चार करण्याचा प्रघात कोठेंच पाहण्यांत आला नाहीं. नारायणोपनिषदांत व देवी भागवतांत त्रिपदा गायत्रीचा उल्लेख प्रणवरहित आलेला आहे व तोच आधार प्रणव न लावण्याचे बाबतींत घेण्यांत येतो. वस्तुतः उपनिषत् म्हणावयाचें असल्यास किंवा देवी भागवत वाचावयाचें असतां गायत्री मंत्रानंतर प्रणव न लावला तरी चालेल. परंतु संध्यावंदनाचे आचरणांत फलप्राप्ति सांगितलेली आहे व परमेश्वर प्रीति संपादन करणें अशा महत्फलाची आशा व्यक्त केलेली आहे म्हणून गायत्री उपासनेच्या प्रांतांत आपण गेल्यावर श्रीगायत्री देवता प्रसन्न व्हावी, तिनें आपलें ऐहिक व आमुष्मिक कल्याण करावें ही भावना असते. या करितां गायत्र्युपासनेंत त्रिपदा गायत्रीचे अंतीं प्रणव लावावा अशाबद्दल श्रीमत् भगवत्पूज्यपाद श्रीधराचार्यांनीं आपल्या गायत्री भाष्यांत आदेश दिला आहे व 'मंत्राणां पल्लवो (भूः भुवः सुवः) वाचः मंत्राणां प्रणवः शिरः ॥ शिरः पल्लवसंयुक्तो, मंत्रः कामदुघो भवेत् ॥' 'प्रणवाद्याः, सर्वविद्याः, प्रणवाग्राश्च सन्ति हि। एवं विद्यासु सर्वासु शास्त्रेषु च

कलासु च। आदावन्ते च विज्ञेयः प्रणवार्थः परीक्षया। विद्यार्थिभिश्च सर्वैर्हि धर्मोऽयं हि सनातन । अय भारत सूनेच योगव्यासेन कीर्तितः। यथा चेव हि गायत्री ह्यादावन्ते च धर्मत । प्रणवेनाभियुक्ता च सर्वेषा सिद्धिदा भवेत्।' असे मंत्रसिद्धी प्राप्त करून घेण्यासबधीं एक वाक्य आहे त्याचप्रमाणे असें सुचवावेंसे वाटलें कीं गायत्र्युपदेश झालेल्या प्रत्येक द्विजानें त्रिपदा गायत्रीचे अतीं प्रणवाचा उच्चार करावा तसेच गायत्रीच्या पहिल्या पादात "तत्सवितुर्वरेण्यम्" असें पद आहे हीं सातच अक्षरें होतात व तसें म्हटलें तर चतुर्विंशत्यक्षरा गायत्री होत नाहीं म्हणून तत्सवितुर्वरेणियम्" असा त्या प्रथम पादाचा उच्चार करावा

१४. सारसर्वस्वाचा दुसरा मुद्दा मूर्तिपूजेसबधीं आहे. साधक यंत्र अगर मूर्तीचे ठिकाणीं मूर्तीचें मनोमय ध्यान करून आवाहन करितो. ध्यान मानसिक असतें. म्हणज ध्यानगत मूर्तीची मनोमय प्रतिमा ध्यानकर्ता साधक आपल्यापुढ आसनावर विराजमान झालेली आहे अशी भावना करीत असतो ध्यानवर्णित मूर्ति ध्यानश्लोक म्हटल्याबरोबर ध्यान शब्दोच्चाराच्या परिणामानें प्रत्यक्ष तयार झालेली असते. अशा प्रकारची भावना किंवा निश्चिती शकडा नव्याण्णव साधकाची नसते. परतु ही गोष्ट सत्य आहे व त्यामुळ ध्यानकर्त्याची निष्ठा केवळ अंधश्रद्धेची राहू नये वर बुद्धिनिष्ठ राहावी असें लेखकाचे आग्रहाचे सागण आहे. या बाबतींत अमेरिकत एक प्रयोग करण्यात आला, त्याची माहिती लेखकाला मिळाली ती खालीं देण्यात येत आहे

१५. फ्रान्स देशात एका गावीं मॅडम फेनलाग नावाची बाई ध्वनि, वेग व त्याचा परिणाम या बाबतींत शोध करीत असे व शोध करीत असताना प्रयोगाकरितां तिनें एक फलक तयार केला. त्या फलकावर ध्वनिवाहक तारांचे पुंज लावून त्या प्रत्येक पुंजाचे टोकटीं एक एक लहूवी काडी लावलेली असे. उच्चनीच अगर समान स्वराच्या उच्चाराप्रमाणें त्या लहूच्या काड्यांच्या टोकानीं फलकावर आकृती उटत असत. श्रीगोवर्धनपीठाचे के. वा. शकराचार्य श्री १००८ श्रीभारतीकृष्णतीर्थ याचेकडे वरील अष्टकाच्या पठणान मुद्रित झालेल्या श्री भैरवाच्या मूर्तीची सत्यतेबद्दल माहिती विचारण्यात आली व ती सत्य आहे ह्याबद्दल 'सायंटिफिक

रिव्हयूमधील' उतारा त्यांना वाचून दाखविला व ही गोष्ट सन १९०८ सालीं घडलेली आहे असें त्यांनीं सांगितलें. अलीकडे विद्युल्लतेच्या साह्यानें दूरचीं गाणीं व भाषणें आपण ऐकतों; तशीं दूरच्या मनुष्याचीं चित्रेंही दाखविण्याचा प्रकार सुरू झाला आहे. तो सुद्धा ध्वनिलेखनाच्या साहाय्यानेंच होत असतो. आपलेकडे एखादा मृदंगवादक मृदंग वाजवीत असताना त्या मृदंगावर वस्त्रगाळ वाळू ठेविली तर त्या वाळूवरतीं नानाप्रकारच्या आकृती उत्पन्न होतात असा अनुभव आहे. आपल्या पूर्वज गायनाचार्यांनीं राग व रागिणी यांच्या अधिष्ठात्री देवतांचीं चित्रे, राग व रागिणी गात असता कशीं दिसतात त लिहून ठेवलें आहे. पूर्व कथित गायनाचार्यांनीं राग रागिणींच्या अधिष्ठात्री देवतांचीं चित्रें लिहून ठेविली ही गोष्ट वरील प्रयोगानें सिद्ध झाली, त्याअर्थीं ध्यानश्लोक म्हणत असताना ध्यानगत मूर्ति मूर्तिमत दिसते हेंही सिद्ध झाल. असो!

१६. या ग्रंथात विशेष कांहीं असेल तर तें हें कीं मंत्राच्या फळाचा आजच्या काळात अनुभव देत असलेल्या सज्जनांचा उल्लेख केला आहे. ही माहिती मिळविण्यास फार प्रयास पडले त्याचें वर्णन ग्रंथात आलेलेंच आहे. आजच्या आर्यावर्ताच्या विपन्न स्थितीला व विशेषत: ब्राह्मण वर्गाच्या विपन्न स्थितीला अशा मंत्रसिद्ध पुरुषांचा लोप होणें हें एक दर कारण आहेच, तसेंच आजच्या आर्यावर्तातील ब्राह्मणांची आचारभ्रष्टता हेंही एक मुख्य कारण आहे. अशा मंत्रसिद्ध पुरुषांना स्वयंख्याती करण्याची इच्छा नसते. त्यामुळे करकंकण न्यायानें असे सज्जन जवळपास असूनही मंत्रशक्ति दाखविण्याचा किंवा पाहण्याचा प्रसंग आल्याखेरीज मंत्रसिद्ध पुरुष कोण आहेत हें समजून येणें दुरापास्त होऊन बसलें आहे. मंत्रशक्ति जागृत असलेल्या सज्जनांत साठीच्या जवळ असलेले अगर साठी उलटून गलेले अशी मंडळी आहेत. लेखकाचा व त्यांचा लेभ जुळल्यापासून ह्या ग्रंथ प्रसिद्ध होईपर्यंत सोबतच्या ग्रंथात नमूद केलेले कितीएक सज्जन स्वर्गवासी झालेले आहेत. या ग्रंथात नमूद कलेल्या सज्जनांत कांहीं आंग्लविद्याविभूषित व प्राध्यापक पदवीवर विराजमान असणारेही सज्जन आहेत

१७. हा ग्रंथ अशा प्रकारानें लिहिला गला आहे कीं कोणालाही केव्हांही मंत्रांतील मंत्रशक्तीचा स्वतंत्र रीतीनें स्वतः अनुभव घेता येईल. म्हणजे त्रैवर्णिकांना

वैदिक व तांत्रिक मंत्राचा व त्रैवर्णिकाखेरीज इतरांना तांत्रिक मंत्राचा अनुभव घेतां येईल. कलियुगात ब्राह्मण व शूद्र असे दोनच वर्ण शिल्लक राहिले आहेत असे वाक्य कांहीं ग्रंथात आहे. परंतु जयपूर जोधपूर व नेपाळ या राज्याचे मालक व इतर क्षत्रिय संस्थानिक यांचे संस्कार वैदिक मंत्रांनीं आजही होत आहेत व मारवाडी समाजात वैश्यवर्ण आहे व त्यांचे संस्कार आजही वैदिक विधीनें होत असतात; म्हणून त्रैवर्णिक हा शब्द योजला आहे. मंत्र हे गुरूच्या साहाय्याशिवाय साध्य होत नाहींत. म्हणजे गुरुमुखानें मंत्र मिळाल्याशिवाय केवळ ग्रंथांत मंत्र दिलेला आहे तो पाहून त्याचें अनुष्ठान अगर जप केला तर कार्यसिद्धि होणार नाहीं. तथापि द्रोणाचार्यांना गुरु मानून एकलव्यानें अर्जुनापेक्षाही श्रेष्ठ प्रकारची धनुर्विद्या साध्य केली. गुरूंच्या ठिकाणीं पूज्यबुद्धि बसेल असे गुरु मिळत नाहींत; अशा वेळीं परलोकस्थ विभूतींना गुरु मानून मंत्र घेण्याचा विधी ग्रंथात दिलेला आहे. परंतु जिज्ञासूच्या ठिकाणीं उत्कट इच्छा असावी, तो सदाचारप्रवण, परोपकारनिरत, स्वार्थविन्मुख असा असल्यास त्यास हा ग्रंथ केव्हांही मार्गदर्शक होईल. परंतु अशी सिद्धि अपवादात्मकच होय. असे समजावें.

१८. **अधिकारी** : या शीर्षकांत हा ग्रंथ कोणाकरितां लिहिला गेला याबद्दल विवेचन करावयाचें आहे. लेखकानें आजपर्यंत पाश्चिमात्य शिक्षणविभूषित चार पिढ्यांतील लोकांच्या विचारसरणीचा अनुभव घेतला आहे. पहिली पिढी मंत्रशास्त्राबद्दल अगदींच अनास्था दाखविणारी होती. लेखकाच्या बरोबरीची पिढी थोडी आस्था दाखविणारी होती; परंतु या दोन्ही पिढ्यांतील मंडळी आतां निरर्थकच आहेत. तिसरी पिढी लेखकाचे विद्यार्थीवर्गाबरोबरीची, म्हणजे वयाच्या पन्नाशीला पोचलेली, व वयाच्या वीस ते तिशीच्या सुमाराची चवथी पिढी. तिसऱ्या पिढींतील मंडळी या ग्रंथातील मार्गाचा अनुभव घेऊं शकतील व चवथी पिढी म्हणजे वेदशास्त्र शाळांतून अध्ययन करीत असलेली अगर अध्ययन करून संसारात पडलेली होय, अशांच्या करितां हा ग्रंथ लिहिलेला आहे. वेदशास्त्रोत्तेजक सभेच्या पुरस्कारानें प्रसिद्ध होणाऱ्या धर्मग्रंथाचा हा लेख एक भाग म्हणून हा ग्रंथ तयार करण्यांत आला आहे. हा लेख फार वाढल्यामुळे

सभेच्या ग्रंथात याचा समावेश करिता आला नाहीं. तेव्हां वेदशास्त्र शाळांतून शिकत असलेल्या विद्यार्थ्यांस ह्या ग्रंथाचा फार उपयोग होणार आहे व तेच ह्या ग्रंथाचे अधिकारी आहेत. मंत्रशास्त्रातील मंत्राच्या उपयोगितेबद्दल विचार करून कालानुकूल्य व शक्त्यनुकूल्य असूनहि नास्तिक वादानें भारून गलेले व धर्म ही विषाची गोळी व धर्मबंधनें हीं कारागृहें असे प्रतिपादन करणारे व मंत्रांत कांही तथ्य नाहीं असे म्हणणारे अशा सर्व आचारविहीन तरुणांना ह्या ग्रंथाच्या स्थानं प्रेमाचं आवाहन आहे. त्यांना ग्रंथात दिलेल्या सज्जनाकडे जाऊन मंत्र सिद्धीचा अनुभव घेऊन पहावा. नंतर आपलें मत बनवावें. दुसऱ्याच्या सांगी सांगीवरून फसून मंत्ररूपी बहुमोल खजिना गमाऊन बसू नये. शिवाय मंत्रशास्त्राच्या अस्ति साबद्दल शोध करणारे यांच्या करिताही या ग्रंथाचा उपयोग होईल.

१९. सप्तशती मंत्राचा व आथर्वणवेदातील मंत्राचा प्रत्यक्ष अनुभव घेण्याकरितां वरील स्तंभात वर्णन केलेल्या मंडळीस असें विनविण्यांत येत कीं त्यांनी कोल्हापूर येथे श्री. १०८ अच्युतानंदतीर्थ स्वामी, महालक्ष्मीचे मंदिराजवळ राहातात, त्यास भेटावें व आथर्वणवेदातील मंत्राच्या अनुभवाकरिता रा. रा. गणपतराव जामोटकर, मोहन बिल्डिंग, गिरगांव मुंबई, व नेपाळ थापा येथील स्वामी नयनानंद तीर्थ व काशी येथील वेद महाविद्यालयाचे आथर्वण वेदाचे गुरुजी वे. शा. सपत्र वैद्य गुरू यास भेटावें. इतर शास्त्राप्रमाणें मंत्रशास्त्र वादविवादाचं शास्त्र नाहीं. या शास्त्रांत प्रत्यक्ष अनुभवास पटणारें ज्ञान सांगितलेलं आहे. ज्योतिष व वैद्यशास्त्र हीं शास्त्रं जशीं पदोपदीं अनुभव देणारीं आहेत तसेच हें शास्त्रही पदोपदीं अनुभव देणारं आहे. म्हणून आधुनिक पिढीनें अनुभव घेण्याकरितां या शास्त्राचा स्वीकार करावा. प्रयत्नेंऽकाल। खात्री आहे कीं त्याचे प्रयत्न निष्फळ होणार नाहींत.

२०. संबंध—अनुबंधचतुष्टयांपैकीं हें चवथ पद आहे. प्रतिपाद्य विषया मागील स्तंभांतून स्पष्ट तऱ्हेनें मांडला आहे. प्रतिपाद्य विषय व प्रतिपादक ग्रंथ यांचा संबंध अधिकारी मानवाशीं येतो. त्या मानवाच्या अज्ञानध्वांताचें निरसन करणें हा त्या संबंधाचा हेतु होय. हा हेतु किंपत साध्य झाला आहे हें वाचकद्वारा अनुभव घेऊन ठरविलेल्या निर्णयावर अवलंबून आहे.

मूळ ग्रंथात दिलेल्या मंत्रांच्या अर्थेल्याचे मंत्र ऋग्वेद, यजुर्वेद, सामवेद, व आथर्वणवेद या आनुपूर्वीने दिलेले आहेत, बीजयंत्राच्या स्पष्टीकरणाचा बीज-कोशातील काहीं भाग दिलेला आहे; फार प्रयासाने उपलब्ध झालेले गायत्री कवच व ब्रह्मविद्येचे काहीं मंत्रही दिलेले आहेत.

२२. हा ग्रंथ तयार करितांना ज्या ज्या ग्रंथांचा उपयोग करण्यांत आला आहे त्या ग्रंथांचीं नांवें खालीं देण्यांत येत आहेत:—

चार वेद, अग्निपुराण, वायुपुराण, ब्रह्मपुराण, लिंगपुराण, गृह्यपरिशिष्ट, कर्मविपाक, प्रज्ञापनादिग्रंथ, देवीभागवत, स्कंदपुराण, कौशिकसूत्र, गोपथ-ब्राह्मण, अवेस्तागाथा (पारशी लोकांचे वेद), कुलार्णवतंत्र, कालिकावृत्ति, वाराहीतंत्र, वामकेश्वरतंत्र, कामकलाविलास, कुल्लूक, सर्वज्ञनारायण, मेधातिथी, गोविंदराज, गायत्रीशांकरभाष्य, गौडपादकारिका, चिदंबररहस्य, आनंदलहरी, परशुरामसूत्र, मेरुतंत्र, पिच्छिलातंत्र, कुलागम, रुद्रयामल, गुरुतंत्र, निश्वसारतंत्र, भुवनेश्वरीतंत्र, शाक्ततरंगिणी, श्रीमार्चनचंद्रिका, कालिकल्प, मत्स्यसूक्त, योगिनी-तंत्र, भैरवीतंत्र, बौधायन, प्रपंचसार, समयाचारसुरतरू, चरणव्यूह इ० इ०

२३. हा ग्रंथ प्रसिद्ध करण्यापूर्वी काही सज्जनांना दाखविण्यांत आला आहे. त्यांनीं दाखविलेल्या शंकांचें व दोषांचें लेखकाच्या दृष्टीनें निराकरण करणें उचित आहे असें वाटल्यावरून काहीं शंकांचें स्पष्टीकरण करण्यात येत आहे. पुढील ग्रंथात हिमकालानंतर वैदिक लोक मध्य एशिया मधील सप्त सिंधू नावाच्या प्रदेशांत आले असें लिहिलें आहे, तेथून ते हिंदुस्थानांत आले असें लिहिलें नाहीं. लेखकाची समजूत अशी आहे कीं त्या काळीं म्हणजे वैदिक काळीं सर्व पृथ्वीवर वैदिक लोक पसरलेले होते. कारण मंत्रपुष्पाचे मंत्रांत "समुद्रपर्यंताया एकराट्" असें श्री. मरुत्त सार्वभौमाच्या अंकित असलेल्या पृथ्वीचें वर्णन आलेलें आहे.

शूद्रांकरितां गायत्री पूर्वी 'ह्रीं' हें बीज लावावें असें लिहिलें आहे तर ही वैदिक गायत्री नव्हे तर महानिर्वाणतंत्रांत सांगितलेली ब्रह्मगायत्री होय असें समजावें.

आभार—हा ग्रंथ तयार करितांना कै. वा. श्री. सीतारामपंत भट गुरुजी व श्री. रा. रा. बाळासाहेब जोगळेकर बी. ए., एल्एल्. बी., वेलबागवाले,

श्री. भास्करराय सांप्रदायिक, श्री. १०८ रामशास्त्री गोडबोले मंत्रशास्त्रमयूख या सर्व मंडळींनीं जी वेळोवेळीं मदत केली त्याबद्दल त्यांचे मनःपूर्वक आभार मानल्याशिवाय राहवत नाहीं. शिवाय पुणें येथील वे. मू. रा. द्रविडशास्त्री सामवेदी यांनीं सामवेदांतील ऋचांचे सामगायन पद्धतीनें नकाशे तयार करून दिले याबद्दल त्यांचेही आभार मानण्यांत येत आहेत.

पुणें येथील डेक्कन पेपर मिलचे मॅनेजिंग डायरेक्टर श्री सरदार फरदुनजी शेट यांनीं गाथा व अवेस्तामधील मंत्रांची माहिती दिली याबद्दल त्यांचेही आभार मानण्यात येत आहेत.

हा ग्रंथ छापून तयार होत असतां आमचे परमस्नेही इंदूर येथील होळकर कॉलेजचे मराठीचे प्रोफेसर कै. वा. श्री. रा. रा. वामनराव ऊर्ध्वरेषे, एम्. ए. एम्., आर. ए. एस. काव्यतीर्थ यांनीं वेळोवेळीं ग्रंथात ज्या सुधारणा सुचविल्या त्याबद्दल त्यांचे आभार मानल्याशिवाय राहवत नाहीं.

२६. **विनंति :** लेखक हा मंत्रशास्त्रप्रवीण नाहीं व मंत्रशास्त्रांतील सर्व मंत्रांचा अनुभव घेतलेला असा नाहीं. म्हणून वाचकांनीं मंत्रांबद्दल माहिती विचारावयाची ती ग्रंथात नमूद केलेल्या गृहस्थाकडे विचारावी व **गुरूपदिष्ट-मार्गाशिवाय मंत्रांचें अनुष्ठान करूं नये अशी पुन्हां एकदां विनंती आहे.**

शेवटीं हा ग्रंथ पूर्णतेस नेल्याबद्दलें श्रीराजराजेश्वरी ललिता महात्रिपुर-सुंदरीची प्रार्थना करून तिच्या प्रेमप्रसादाची याचना करितों.

ग्रंथोऽपि पूर्णतामेव यातोऽयं त्वत्प्रसादतः
अतस्त्वां सच्चिदानंदे वन्दे सच्चित्स्वरूपिणी ।
देहि प्रेमप्रसादं मां जगदंब नमोऽस्तु ते ।

त्र्यंबक भास्करशास्त्री खरे

ग्रंथकर्ता

ब्रह्मीभूत योगेश्वरानंदतीर्थ – शंकराचार्य, पुरी – परिचय

एक कर्तबगार महाराष्ट्रीय शंकराचार्य

(अ) संन्यासपूर्व जीवन—श्रीयोगेश्वरानंदतीर्थ यांचें पूर्वाश्रमींचें नाव त्र्यंबकशास्त्री भास्करशास्त्री खरे. त्यांचा जन्म रत्नागिरी जिल्ह्यात गुहागर या गावीं दि. १८ मार्च १८६८ रोजी एका कोकणस्थ ब्राह्मण कुटुंबात झाला. जन्मतःच खरे घराण्यातील आचारवान् व चारित्र्यसंपन्न संस्कारांचा वारसा त्यांना मिळाला होता. वयाच्या चौथ्या वर्षी माता दिवंगत झाली. आठव्या वर्षी मौंजीबंधन झालें. घराण्यातील ब्राह्मणी शिस्तीमुळे त्यांना गायत्रीजप, सूर्यनमस्कार या गोष्टी नित्य कराव्या लागत. वयाच्या १४ व्या वर्षी त्यांचा विवाह झाला (इ. स. १८८२). त्यांच्या घराण्यात देवी व गणपती यांची उपासना असे. त्याचे धडे त्यांना वडिलांमार्फत मिळत. त्र्यंबकशास्त्रींचे वडील भिवंडी येथें वकिली करीत व राजकारणातही भाग घेत. त्यांचे बाळकडू मुलालाही प्यावयास मिळे. इ. स. १८८४ सालीं भिवंडी येथें शृंगेरीच्या आद्य मठाचे शंकराचार्य आले असतां त्यांची व्यवस्था करण्याचे काम त्र्यंबकशास्त्रींच्या वडिलांकडे होतें. हा मुलगा (त्र्यंबकशास्त्री) पुढें 'जगद् गुरु शंकराचार्य बनेल' असे सूचक उद्गार त्यांनीं त्यावेळींच काढले होते.

इ. स. १८८५ सालीं त्र्यंबकशास्त्रींचे वडील दिवंगत झाले. व कुटुंबाची जबाबदारी त्यांचे अंगावर येऊन पडली. इ. स. १८८७ सालीं इंग्रजी शिक्षण घेण्यासाठीं ते एकटे पुण्याला आले. माधुकरी मागून व लहानसहान घरगुती कामें करून त्यांनीं आपल्या शिक्षणाला पुण्याच्या भावेस्कूलमध्ये सुरवात केली. तेथें ते १८९१ मध्यें मॅट्रिक परीक्षा पास होईपर्यंत होते. विद्यार्थी-दशेत असतांना ते नित्य पहाटे स्नान करून संध्या, नमस्कार, गायत्री जप व पूजापाठ आटोपून मग शालेय अभ्यास करीत. शालेय अभ्यासांत पंचतंत्र, हितोपदेश, अमरकोश, रघुवंश इत्यादि संस्कृत ग्रंथ त्यांनीं पूर्ण अवगत केले होते. मॅट्रिकच्या

वर्गात असताना त्यानीं एक निबंध संस्कृत मध्येच लिहिला होता. तेव्हापासून त्यांचे गुरुजी त्यांना 'शास्त्री' म्हणून संबोधू लागले.

विद्यार्थीदशेतील परमार्थ साधना : मूळची धार्मिक प्रवृत्ति व घराण्याचा प्रभाव या संस्कारामुळे कोणीही सत्पुरुष वा साधुसंत आल्यास त्र्यंबकशास्त्री त्याजपाशीं जाऊन काहींतरी आत्मसात करण्याची तीव्र इच्छा व प्रयत्न करीत. इ. स. १८८८ सालीं पुण्यात आलेल्या बाळ महाराजाकडून गायत्रीजप व गुरुचरित्रपाठ करण्याचा आदेश त्यांना मिळाला. त्यानंतर काहीं दिवसांनीं पुण्यात आलेल्या एका योगीमहाशयानीं 'षट्चक्रोपदेश' दिला. 'हंस' संप्रदाय हा नाथपंथी संप्रदाय खरा; परंतु त्याचा अंतर्भाव समर्थसंप्रदायात होतो. पुण्यात असताना हंसदास (माधवराव मराठे) यांच्या सहवासामुळें ते समर्थ रामदासांचे कट्टे भक्त बनले. दासबोधाचीं अनेक पारायणें त्यानीं केलीं.

वैवाहिक जीवन : एकंदर संसारिक बोजा लक्षात घेऊन त्यानीं इ. स. १८९२ मध्यें मुंबईस येऊन एका व्यापाराकडे तीन वर्षे नोकरी केली. १८९५ मध्यें त्यांना पहिलें पुत्ररत्न झालें. वडिलांप्रमाणेंच ते देशकार्य व समाजकार्य यात भाग घेत असत. १८८५ मध्यें मद्यपान निषेधाच्या सत्याग्रहात कै. शि. म. परांजपे यांचेबरोबर त्यांनी भाग घेतला होता. त्यानंतर ६ महिन्यानीं वज्रेश्वरीस येऊन त्यानीं देवीच्या अनुष्ठानास सप्तशतीच्या पाठांनी सुरवात केली. पाठ सुरू असतानाच एक पन्नाशीतील वृद्ध गृहस्थ नेहमीं पाठाला बसे. एके दिवशीं पाठ संपताच तो वृद्ध गृहस्थ त्र्यंबकशास्त्री यांचा हिमालयात जाण्याचा मनोदय जाणून "वैवाहिक ऋण फेडा व मगच हिमालयात जाण्याचा बेत करा" असा आदेश देऊन अदृश्य झाला. त्यामुळें चकित होऊन अनन्यगतीकत्वानें देवीला शरण जाताच तिनें दर्शन दिलें व तोच आदेश दिला.

सत्संग सहवास व आशीर्वाद : पुढें त्र्यंबकशास्त्री पंढरपूरला येऊन १८९७ सालीं एका शाळेचे 'सुपरिंटेंडेंट' बनले. पंढरपूरच्या वास्तव्यात योगाभ्यासी माधवनाथमहाराज, गोंदवलेकर महाराज, धोंडे महाराज, सीताराम महाराज, लक्ष्मण महाराज पासरीकर (यांची छाया पदव नसे) इत्यादि संत सज्जनांच्या भेटी झाल्या. इ. स. १९०० सालीं सोलापूर येथे एका व्यापारी

शिक्षणाच्या शाळेचें चालकत्व त्यांनीं पत्करिलें व तेथें त्यांनीं त्यात वर्षेपर्यंत काम केलें. या काळात त्यांनीं (१) व्यापारी शिक्षण (२) व्यापारी साम्राज्य व (३) औद्योगिक सुधारणा हे तीन ग्रंथ लिहून प्रकाशित केले. त्यानी गोनधबंदी व स्वदेशी चळवळ याचा जोरांत प्रचार केला त्यामुळें त्याचे नाव सरकारच्या 'काळ्या' यादींत दाखल झालें होतें.

इ. स. १९१० मध्ये मुंबईस येऊन 'कॉमर्स कॉलेजच्या' सर्व परिक्षा दिल्या व त्याच वर्षी त्याना इंग्लंडमधील 'असोसिएटेड अकाउंटंट्स्' या संस्थेनें 'ऑडिटर' ही पदवी देऊन संस्थेचे सभासद बनविलें. नंतर त्यांनीं मुंबईला 'खरे आणि कंपनी' ऑडिटर्स अशी संस्था स्थापिली व स्वतंत्र धंदा सुरू केला. संस्थेला निरनिराळ्या गिरण्यांचीं कामे मिळूं लागलीं. देवीच्या आदेशाप्रमाणें इ. स. १९१४ सालीं त्याना परदेशातील हिशेबनिशाचा धंदा करण्याचा परवाना मिळाला व १९१५ सालीं जबलपूर येथील 'परफेक्ट पॉटरी'चे हिशेब तपासण्यासाठीं सरकारी अधिकारी म्हणून मासिक १५०० रुपयांवर त्याची नेमणूक झाली।

पुनः सत्समागम व आशीर्वाद : एकीकडे वाढता यशस्वी धंदा व त्याचबरोबर त्याची अध्यात्म प्रगतीची पण चढती कमान होती. इ. स. १९१५—१९२० ह्या काळात, गुलाबराव महाराज, काका पुराणिक, वासुदेव महाराज इत्यादि साधुपुरुषाकडून योग, प्रकाशानुभव इत्यादि अनुभव मिळाले. लवकरच म्हणजे १९२२ सालीं त्याची पत्नी निवर्तली. गृहस्थाश्रम संपला व सुरू असलेलें 'स्मार्त अग्निहोत्रही' संपलें. १९४० पर्यंत धंदा चालू असतानाच त्र्यंबकशास्त्रींचा ओढा उत्तरोत्तर परमार्थाकडेच वाढत होता. त्याच्या या प्रगतीला इंदोरचे योगी श्री. माधवनाथ महाराज हेच कारण झाले. ते त्याचे योगगुरु तर झालेच पण मोक्षगुरुही झालें असें दिसतें. सन १९३० सालीं त्यानी दूरश्रवण व दूरदर्शन दीक्षा त्याचेकडून घेतली. १९४२ मध्यें श्री. माधवनाथानीं त्र्यंबकशास्त्रींना बोलावून त्याच्याकडून 'पंचदशी' मंत्राचा १ लक्ष जप करवून त्याना 'तुला लवकरच शंकराचार्य बनावें लागेल' असा आशिर्वाद दिला.

(आ) संन्यासोत्तर जीवन

आचार्यपीठावर नियुक्ति—इ. स. १९४३ साली द्वारका व गोवर्धन या दोन पीठांसाठीं शंकराचार्य म्हणून कोणत्यातरी लायक व्यक्तीची निवड करावयाचें कार्य ब्र. भू. भारतीकृष्ण तीर्थ करीत होते. अखेरीस त्र्यंबकशास्त्र्यांची द्वारका पीठाचे शंकराचार्य म्हणून निवड झाली. त्याना भूज येथें संन्यास देऊन लगेच त्याच वर्षी त्या पीठाचे शंकराचार्य म्हणून त्यांच्यावर अभिषेक झाला. अशा रीतीनें त्र्यंबकशास्त्री खरे हे त्यांच्या पत्रिकेंतील ग्रहयोगाप्रमाणें 'खरे सन्यासी शंकराचार्य' बनले! १९४३ मध्यें पीठाधिष्ठित होण्यापूर्वी ३ वर्षे म्हणजे १९४० *साली त्यानीं प्रस्तुत 'मंत्रशास्त्र' व 'परकायाप्रवेश'* हे दोन महान ग्रंथ लिहिले होते. हे ग्रंथ पाहून श्री भारतीकृष्णतीर्थ यांनीं त्याना 'विद्वन्मणि' 'मंत्रमहार्णव' 'मंत्रनिष्णात' व 'मंत्र मर्मभास्कर' अशा बहुमानाच्या पदव्या देऊन 'मंत्रशास्त्र' ग्रंथाला गौरवाचा पुरस्काररूप आशीर्वादही दिला होता.

द्वारका पीठाचे कांहीं व्यावहारिक गोष्टींचे दावे कोर्टांत चालू होते व त्यामुळें पीठाधीशाला कोर्टासमोर येणें अपरिहार्य होतें. हें अपमानास्पद वाटून खरेशास्त्रींनीं द्वारका पीठाधीशत्वाचा त्याग केला. *तावडतोब* त्या पीठावर दुसऱ्या इसमास त्याचेच हस्तें बसविण्यास येऊन खरेशास्त्रींना गोवर्धन-जगन्नाथ—पुरी पीठाधीश म्हणून अभिषेक करण्यांत आला. *व त्याना श्रीयोगेश्वरानंदतीर्थ* म्हणून संबोधण्यात आलें.

धर्मकार्याचें उद्दिष्ट व पूर्ति—जगद्गुरु शंकराचार्य या भूमिकेवरून पीठस्थ व्यक्तीकडून होणाऱ्या कार्याचें मुख्य उद्दिष्ट 'धर्मरक्षण' हें होय. हिंदु धर्म हा इतर धर्मांप्रमाणें आक्रमक ध्येयाचा नसून सरक्षक उद्दिष्टाचा प्रचोदक आहे. यामुळें स्वधर्मरक्षणासाठीं स्वधर्मज्ञानाचा प्रचार व त्यावरील श्रद्धा उत्पन्न करणें, श्रेयस् व निःश्रेयस, व्यवहार व परमार्थ, भौतिक व आध्यात्मिक अभ्युदय यांचा उत्कृष्ट समन्वय स्वधर्मपालनानें कसा होतो हें पटवून देणें, धर्मच्युतीमुळें व धार्मिक उदासीनतेमुळें धर्माधिष्ठानाला बसणारे हादरे व पडणारीं खिंडारें हीं प्रतीकारात्मक व संरक्षक शक्तीनें भरून काढणें ह्या गोष्टी योगेश्वरानंदांनीं पीठाच्या एवं मर्यादा सांभाळून अत्यंत उत्कृष्ट रीतीनें केल्या.

धर्मकार्य व प्रचार : इ. स. १९४४ साली योगेश्वरानंदांनी प. पू. करपात्रीजी महाराज यांचे निमंत्रणावरून दिल्ली येथे शतकोटी हवनात्मक गायत्री महायज्ञ केला. १९४५ साली दिल्ली येथें झालेल्या हिंदुमहासभेच्या अधिवेशनाला आशीर्वाद देण्यासाठी ते गेले होते. १९४६–४९ या तीन वर्षांत दक्षिण भारतात ते, सर्वत्र प्रचारार्थ फिरले. १९४६ मध्यें मद्रास येथें 'अखिल भारतीय धर्मपीठ असोसिएशन' या संस्थेचे ते अध्यक्ष म्हणून गेले होते. इ. स. १९४७ मध्ये मद्रासला बनारसप्रमाणे एक हिंदुविश्वविद्यालय स्थापण्याची योजना पूर्ण केली. नंतर ते तंजावरपासून ९ मैलावर असलेल्या 'तांब्रम' या गावीं 'डिव्हाइन लाइफ' (दैवी जीवनप्रणाली) या संस्थेच्या वार्षिक अधिवेशनाचे अध्यक्ष म्हणून गेले होते. पुढे श्री रमणमहर्षींनीं स्थापिलेल्या श्रीमहात्रिपुरसुंदरी व मातृभूतेश्वर यांच्या प्रतिष्ठापनेकरिता त्यानाच बोलविलें होतें. आपल्या पीठाच्या स्थल मर्यादा सोडून त्यांनी महाराष्ट्र, गुजराथ, मद्रास, आंध्रप्रदेश वगैरे ठिकाणीं जाऊन वैदिक धर्मप्रचार व कृतिमय कार्य केले. त्या प्रचाराचा व प्रत्यक्ष कृतीचा काळ १९४९ ते १९६१ हा होता. म्हणजे वयाच्या ८१ ते ९३ वर्षांपर्यंतचा काळ.

योगेश्वरानंदतीर्थ हे निरनिराळ्या ठिकाणीं चातुर्मासास मुक्कामास असत व नंतर प्रचारपर्यटन करीत. अशा वेळीं सर्व ठिकाणीं लिंगार्चन, देवीपाठ व हवनें, रुद्रस्वाहाकार व गणेशयाग हीं धर्मकृत्यें सतत चालू असत. स्त्रीपुरुषांसाठीं धर्मपर, धर्मजागृतीकारक व्याख्याने देत. हे करीत असताना आर्त, अर्थार्थी, ज्ञानपिपासू व मोक्षार्थी स्त्रीपुरुषांना त्यांच्या लायकीप्रमाणे मंत्र, तंत्र, यंत्र यासह जपानुष्ठानादि मार्गांनीं त्यांनीं अनुग्रह दिले. साक्षात्कारहा अनुभवही दाखवून दिले. काहीं ठिकाणीं स्पर्शदीक्षादि प्रकारांनीं अनुभव दिले व योगमार्गातील कुंडलिनी जागृतीचेही अनुभव दिले. १९५४ साली त्यांनीं कोल्हापूरच्या देवीच्या वज्रलेपाचे अत्यंत कठीण कार्य पुरें करवून घेतलें.

अखेरचा चतुर्मास व देहावसान : इ. स. १९६१ साली म्हणजे वयाचे ९३ वर्षी निरनिराळ्या ठिकाणच्या अनुगृहीतांना भेटी देत देत योगेश्वरानंद अमरावती येथील अंबाबाईचे मंदिरात चतुर्मास व्यतीत करण्याच्या इराद्याने

दाखल झाले. नेहमीचा धार्मिक कार्यक्रम चालू असतानाच त्यांचे मठ्ठांत विवाह झाला. सकाळच्या पूजेची सर्व मांडणी झाली होती. तेव्हां त्याच आसना शेजारीच शय्येवर त्यांनी देह ठेविला ! अशा रीतीने गोवर्धन पीठाच्या शंकराचार्यांचे देहावसान नित्य कर्मे करीत असताना जगदंबेच्या मंदिरात तिच्या पायाशीं झाले. हा असामान्ययोग आचार्यपीठाच्या व पीठस्थाच्या इतिहासात विशेष आहे.

गुरुपरंपरा : योगेश्वरानंद हे योगी, मंत्रशास्त्रज्ञ व दीक्षाधिकारी गुरु असल्यानें त्यांची गुरुपरंपरा निरनिराळी होती. ते साम्राज्य दीक्षाधिकारीही होते.

मंत्रसिद्धि व सिद्धमंत्र : योगेश्वरानंद ज्ञानपिपासू असल्याने त्यांनी अनेक प्रकारचे, अनेक धर्मातील अनेक मंत्र संग्रहित केले. वाममार्गी मंत्राच्या सिद्धतेकडे त्यांना कधीही लक्ष दिले नाहीं. तथापि त्यातील मंत्र यंत्र व तंत्र यात खोल बुडी मारून त्यातील साधनेत खोल अवगाहन केलें हें खरें. त्यांनी अनेक मंत्र्यांच्या उपासना, यंत्र तंत्र मंत्रादि सिद्ध करून अनुभव घेतले व घेवविले होते. त्यांच्या उपासनेचें व मंत्रतंत्राचें ध्येय आत्मसाक्षात्कार हेंच होत. हरिद्वार, पुरी, शृंगेरी व द्वारका ह्या चार पीठाधीशानाच 'जगद्गुरु' असे बिरुद आहे. इतर उपपीठाधीशाना (जसे संकेश्वरादि) शिष्य स्वामी शंकराचार्य असे संबोधितात.

'शास्त्रे परे च निष्णात' अशा या महान् योग्याच्या लेखणींतून उतरलेल्या 'मंत्रशास्त्र' ह्या अमोल ग्रंथाची ४ थी आवृत्ति आम्ही वाचकांस सादर करीत आहीं.'

प्रकाशक

---

१ टीप : जास्त सविस्तर माहितीसाठीं "श्री योगेश्वरानंद तीर्थ यांचें चरित्र' नांवाचें एक स्वतंत्र पुस्तक श्री गो ग भावे यांनीं १९५२ सालीं प्रकाशित केलें आहे (किंमत १ रुपया) तें पहावें

अनुक्रमणिका

उत्तरार्ध—अनुभूत व अनुभाव्य मंत्र-तंत्र यंत्र-प्रयोग-संग्रह

पृ. २१७–५४२

□ □

मंत्र शास्त्र

पूर्वार्ध

तात्त्विक – ऐतिहासिक – व्यावहारिक
विवेचन

अनुक्रम

ॐ

पुरस्कार

पू. गोळवलकर गुरुजी सरसंघचालक (रा. स्व. सं.)

जगातील सर्वांत प्राचीन वाङ्मय व ज्ञानभांडार म्हणून प्रसिद्ध असलेले व आपल्या हिंदु जीवनप्रणालीचे, तत्त्वज्ञानाचे, अध्यात्मशास्त्राचे मूलस्रोत म्हणून गौरविलेले वेद, हा श्रेष्ठतम मन्त्रसमुच्चय आहे. त्या मंत्रांच्या उच्चाराचे नियम ठरलेले असल्यामुळें त्यांच्या गायनांतून विशिष्ट ध्वनिलहरी उत्पन्न होऊन वातावरणांत भरून प्रसृत होतात व त्या लहरींच्या आघातामुळें निरनिराळे परिणाम घडून येतात असा जुन्या काळापासूनचा अनुभव आहे. या अनुभवांतून पुढें भिन्न भिन्न अभीष्ट परिणाम घडवून आणणाऱ्या अनेक संस्कृत व प्राकृत मंत्रांचा आविष्कार क्रान्तदर्शी महापुरुषांनीं केला. त्या त्या महात्म्यांच्या तप सामर्थ्यानें प्रभावसंपन्न झालेले हे मन्त्ररूप शब्दसमुच्चय, कित्येकदां अर्थशून्य भासतात, पण त्यांची शक्ति त्यांच्या अर्थांत नसून त्यापासून निर्माण होणाऱ्या ध्वनिलहरींत असल्याकारणानें ते शब्दसमुच्चय परिणामकारी असल्याचा अनुभव येतो म्हणून मानवी जीवनांतील दुःख निवृत्ति सुखप्राप्ति व आध्यात्मिक उन्नति साधण्याकरितां आपल्या पूर्वजांनीं मंत्रांचा प्रयोग करण्याची व्यवस्था दिली. मंत्रांना यंत्ररूपानें प्रत्यक्ष करून त्यांची उपासना करण्याचें सविस्तर व संपूर्ण तंत्रहि प्रकट केलें. त्याचें शास्त्र ही बनविलें.

सामान्य भौतिक विज्ञानाला अनाकलनीय असे हें शास्त्र आहे. स्वरोदयादि-शास्त्रेंहि अशाच प्रकारचीं आहेत. म्हणून आधुनिक विज्ञानाच्या चमत्कृतिपूर्ण अशा शोधामुळें तेंच सत्य, तद्विरहित तें असत्य, असे मानणाऱ्या व स्वतःला बुद्धिवादी म्हणून अश्रद्ध बनलेल्या व त्या शास्त्रावर विश्वास ठेवणाऱ्याना अंधश्रद्ध म्हणून हिणविणाऱ्या आजच्या विद्वानाची प्रवृत्ति त्याची हेटाळणी करण्याकडे असलेली दिसते. परंतु आज जें अनाकलनीय वा असभाव्य वाटतें तें कालांतरानें सत्य म्हणून अनुभवाला येऊ शकतें हें विज्ञानाच्या वाटचालीनेंच सिद्ध झालेलें आहे. दूरभाषण, दूरदर्शन, अणुविभाजन, चंद्रादि ग्रहाची यात्रा इत्यादि थक करणारे शोध गेल्या शतकात केवळ काल्पनिक परीकथाच वाटल्या असत्या. पण आज त्या प्रत्यक्षात आलेल्या आहेत. शभर वर्षापूर्वी तशा विचाराची हेटाळणी जर कोणी केली असेल तर ती चूक होती हे स्पष्ट झालेलें आहे. प्रत्यक्ष प्रयोग करून पाहणे, तेहि पहिल्यादा फसले, तरी चिकाटीनें अधिकाधिक निर्दोषपणें प्रयोग करून सफलता प्राप्त होईतों प्रयत्न न सोडणें, ही खरी विज्ञानवादी दृष्टि आहे. **म्हणून आधुनिक विज्ञानच काय तें अंतिम सत्य, अशा अधश्रद्धेच्या आहारीं न जातां आपल्या शास्त्रांचा प्रत्यक्ष प्रायोगिक अनुभव घेऊन त्याची सत्यता पारखुन पहावी हेंच योग्य.**

गेल्या कित्येक वर्षात मंत्राची, उपासना शास्त्र या दृष्टीनें उपेक्षितशी झाल्यानें मंत्र कोणचे, त्याचा विनियोग कशासाठीं, त्याची मंत्रतंत्रें कशी, त्याकरिता पूर्व सिद्धता कोणच्या प्रकारची, आदि सर्व ज्ञान इतस्ततः विखुरलेलें एकत्र आणून त्याची पद्धतशीर माडणी झाली नाहीं असे म्हणावें लागतें. त्यामुळें या शास्त्राकडे एक दुर्बोध, दुर्गम, अज्ञेय गौडबंगाल म्हणून पाहण्याची प्रवृत्ति बळावली. शास्त्राच्या पद्धतशीर माडणीच्या अभावीं खोटे, फसविणारे, भोळ्या लोकाच्या साधेपणाचा फायदा उठविणारे, लबाड, ढोंगी, मांत्रिक म्हणून उत्पन्न झाले व त्यांच्या खोटेपणामुळे व स्वार्थीपणामुळे शास्त्रासबधीं अश्रद्धा मात्र बळावयास मदत झाली. ही अश्रद्धा दूर व्हावी व आपलें लोपाचें मंत्रशास्त्र शुद्ध स्वरूपात सर्वांसमोर यावें व त्याचें प्रत्यक्ष प्रयोगानें सत्यत्व सिद्ध करण्याची व त्याद्वारा समाजकल्याण करण्याची सोय व्हावी म्हणून जगन्नाथपुरीच्या गोवर्धनपीठाचे

श्रीमज्जगद्‌गुरू शंकराचार्य, श्रीमत् स्वामी योगेश्वरानन्दतीर्थ यानीं, देशभर भ्रमण करून मंत्रांचा संग्रह केला असंख्य ग्रंथांचे परिशीलन करून त्यासंबंधीच सांगोपांग ज्ञान संपादन केलं, स्वतः कांहीं मंत्रांचा प्रयोग करून त्यांच्या सत्यतेसंबंधीं स्वतःची खातरी पटवून घेतली व आपल्या परिपक्व ज्ञानाच्या व अनुभवाच्या आधारावर प्रस्तुतच्या "मंत्रशास्त्र" या ग्रंथाची निर्मिति केली. या ग्रंथांत वेदापासून तो प्रचलित अशा गारुड, शाबर, डाबर व अन्यान्य महात्म्यांच्या पुण्याईनें प्रभावसंपन्न झालेल्या अनेक मंत्रांचा संग्रह त्यांनी केला आहे. भिन्नभिन्न संप्रदायांतही मान्यता पावलेल्या अनुभूत मंत्रांचा अल्प कां होईना येथें संग्रह आहे. मंत्र सिद्ध करून अपेक्षित व ईप्सित फल प्राप्त्यर्थ करावयाच्या अनुष्ठानादिकंचा सविस्तर ऊहापोह करणें लाभदायी झालें असतं; पण ग्रंथाच्या विस्ताराला मर्यादा घालणें अपरिहार्य असल्यानं तें शक्य झालें नसावें असें वाटतें. तसेंच ध्वनिलहरींच्या परिणामाचें आधुनिक विज्ञानाच्या परिभाषेंतून अधिक सविस्तर वर्णन व मंत्रांची वैज्ञानिकता, मंत्रांच्या मांडणीतील शास्त्रीयत्व यांचें स्पष्टीकरणहि मोलाचें व अश्रद्धांना श्रद्धावान करणारें ठरलें असतें पण तेंहि स्थळसंकोचास्तव झालेलें नसावें. अशी या ग्रंथांतही कांहीं न्यूनें राहून गेलीं आहेत हें खरें.

त्यांचा परिहार करण्याचा अल्पसा उद्योग 'मंत्रशास्त्रा'ची ही सुधारलेली आवृत्ति प्रसिद्ध करणारे श्रीयुत गो० प्र० भावे यांनीं केला असून ग्रंथांत मधून मधून व शेवटीं स्वतंत्र अध्यायांतून त्यांनीं मंत्रशास्त्राचें वैज्ञानिक श्रेष्ठत्व मांडण्याचा प्रयत्न केला आहे. तोहि अर्थातच त्रोटक स्वरूपाचा आहे. मंत्रांचें शास्त्रत्व सांगोपांग सिद्ध करण्याचा व आधुनिक विज्ञानालाहि आश्चर्यचकित करील इतकी वैज्ञानिक क्रान्तिदृष्टि मंत्रद्रष्ट्यांत होती हें प्रमाण पटवून देण्याचा उपक्रम ग्रंथरूपानें प्रकट करण्याच्या उद्योगांत ते आहेत, हें त्यांनींच सांगितलं आहे. त्यांच्या या ग्रंथाची आपणास कांहींकाळ प्रतीक्षा करणें भाग आहे, पण तोंपर्यंत प्रस्तुतचा मंत्रशास्त्र हा ग्रंथ अभ्यासावा व आपल्याला रुचेल त्या मंत्रांची सिद्धि करून अनुभव घ्यावा, हें उचित होईल.

श्रीमत् स्वामी योगेश्वरानंदतीर्थ महाराज व श्री० गो० प्र० भावे यांनीं हें अज्ञानाच्या कारांत दडून राहिलेलें शास्त्र ग्रंथरूपानें आपणा सर्वांना उपलब्ध करून

दिलें याबद्दल आपण त्यांचे ऋणी राहिलें पाहिजे व या ग्रंथाचा योग्य उपयोग करून **स्वधर्म, संस्कृति, आपलें ज्ञान विज्ञान यांच्यासंबंधी सार्थ अभिमान जागृत करून त्यांच्या रक्षणार्थ. संवर्धनार्थ, प्रत्यक्ष कृति करण्याचा निश्चय जागवावा, अशा रीतीनें त्यांचे अंशतः उतराई व्हावें अशी माझी सर्व बंधूंना आग्रहाची विनंति आहे.** अनेकांनीं व स्वतःहि घेतलेल्या अनुभवाचे दाखले देऊन ह्या विनतीला बळकटी आणता आली असती, पण या पुरस्काराचा कंटाळवाणा विस्तार करू नये व स्वतःचा दंभ मिरवूं नये, म्हणून तसे केलेलें नाहीं, तरी सूज्ञ वाचक यांतून योग्य तो अर्थ ग्रहण करतीलच. सर्व ज्ञानाचा आगर, ज्याच्यामुळें शब्दांना, अक्षरांना मंत्रसामर्थ्य प्राप्त होतें त्या सृष्टिस्थितिविनाशाच्या चालकाचें परम शक्तिमान श्रीपरमेश्वराचें स्मरण करून श्री० गो० प्र० मावे यांनीं मूळ ग्रंथलेखक श्रीमत् योगेश्वरानंदतीर्थां-विषयींच्या भक्तिभावांतून केलेली ही वाङ्मयसेवा सफल होवो अशी त्यांचे चरणीं प्रार्थना करतों. इति शम् ।

स्थूल परिक्षण

डॉ. श्रीधर भास्कर वर्णेकर, एम्. ए., डी. लिट्.
प्राध्यापक, नागपूर विद्यापीठ.

जगन्नाथपुरी मठाचे परमपूजनीय शंकराचार्य श्री. योगेश्वरानंदतीर्थ यांनीं आपल्या पूर्वाश्रमात (पूर्वाश्रमीचे नाव श्री. त्र्यंबक भास्करशास्त्री खरे) असताना ऑडिटरच्या व्यवसायातील व्यग्रता सांभाळून आध्यात्मिक विद्येचा गहन व्यासंग निरंतर चालू ठेवला. व त्याचें परिपक्व फळ म्हणून 'मंत्रशास्त्र' हा प्रस्तुत ग्रंथ १९३६–१९४० मध्यें लिहून जिज्ञासु जनतेला समर्पण केला. प्रस्तुत ग्रंथामध्यें व्यक्त झालेलें श्री. त्र्यंबक भास्करशास्त्री खरे यांचें मंत्रशास्त्रावरील असामान्य पांडित्य पाहून जगन्नाथपुरी मठाचे तत्कालीन शंकराचार्य पूज्यपाद भारतीकृष्णतीर्थ यांनीं त्यांना 'मंत्रमहार्णव' 'मंत्रनिष्णात' 'मंत्रमर्मभास्कर', इत्यादि उपाधि देऊन त्यांचा मोठा गौरव केला. एवढेंच नव्हे तर १९४३ मध्यें भूज येथें संन्यास दीक्षा देऊन द्वारकापीठाच्या आचार्यपदीं त्यांचा अभिषेक केला.

प्रस्तुत ग्रंथाची पहिली आवृत्ति प्रसिद्ध झाल्यानंतर त्याचा सर्वत्र मोठा बोलबाला झाला होता. त्याचें कारण मंत्रशास्त्राविषयीं भारतातल्याच नव्हे तर साऱ्या जगाच्या आध्यात्मिक आणि आधिदैविक साधना करणाऱ्या लोकांच्या अन्तःकरणातील अत्यंत तीव्र जिज्ञासा! मंत्र तंत्र आणि योग यांच्याविषयींचें ज्ञान बाळगणाऱ्या मनुष्याविषयीं साऱ्या जगात मोठें कुतूहल आहे. त्याचा लाभ घेऊन मांत्रिक, तांत्रिक किंवा योगी म्हणून स्वतःची प्रसिद्धि करून अज्ञानी

आर्त लोकांना स्वतःच्या भजनी लावून घेणाऱ्या ढोंगी लोकाचा फार मोठा वर्ग आपल्या समाजात आढळून येतो. असल्या ढोंगी बोवालोकाचें बिंग पुढें उघडकीस येऊन समाजाकडून त्याची मानहानी झाल्याचेंहि पाहण्यात येतें. त्याचा दुष्परिणाम असा कीं, सर्वसामान्य सुशिक्षित समाजात मन्त्रतंत्रयोग यासारख्या आध्यात्मिक व आधिदैविक शास्त्रासबंधीं व त्यातील साधनासबंधीं अनादर किंवा तिरस्कार निर्माण होतो. ज्या विद्येविषयीं सुशिक्षित समाजात आस्था राहत नाहीं, त्या विद्येची अप्रतिष्ठा होऊन पुढें ती लयाला जाण्याची शक्यता असते. संस्कृत भाषेचा व तदन्तर्गत शास्त्रादिकाचा झपाट्यानें होणारा लय हे आमच्या या विधानाचें फार मोठें निदर्शन आहे।

अशा विपरीत परिस्थितींत विल्यास जात असणाऱ्या प्राचीन विद्याचें महत्त्व सुशिक्षित लोकातील सुविचारी वर्गाला नीट कळेल व पटेल अशा स्वरूपाच भाषण–लेखनादींच्या द्वारा त्याचा नवाविष्कार करणें अत्यंत आवश्यक असतें.

नवागत पाश्चात्य तत्त्वज्ञानाच्या प्रचारामुळे नवशिक्षिताच्या उपेक्षेचा विषय झालेला व सनातनी पंडिताच्या रूढ कल्पनापायीं जुनाट पोथ्यामध्यें लिहपत पडलेला तेजस्वी वेदान्त स्वामी विवेकानंदांनीं अभिनव स्वरूपात प्रतिपादन केल्यामुळेंच जगताच्या जिज्ञासेचा विषय झाला. **राष्ट्राच्या जीवनात सांस्कृतिक उत्कर्षाचा काळ येतो तसा अपकर्षाचा किंवा ग्लानीचाहि काळ येत असतो. त्या सांस्कृतिक ग्लानीच्या काळांत शास्त्र, विद्या, कला इत्यादींचें उज्जीवन नवीन रीतीनेंच करावें लागतें व तसें न झाल्यास राष्ट्राचें सारें सांस्कृतिक निधान काळाच्या भक्ष्यस्थानीं पडतें. जगद्गुरू शंकराचार्य, भगवान् पतञ्जलि, भगवान् बुद्ध, संत ज्ञानेश्वर,** तुलसीदास इत्यादि थोर पुरुषाच्या महान परंपरेंत झालेल्या सर्व आचार्यांनीं व संतकवींनीं भारताचें वैचारिक निधान आपापल्या काळांत उज्ज्वलित करून भावी पिढ्यांच्या स्वाधीन केले, म्हणूनच तें आजवर टिकून आहे. **सांस्कृतिक निधान पुनरुज्ज्वलित करण्याची प्रक्रिया राष्ट्रामध्यें कदापि बंद होतां कामा नये. ती बंद पडली की, जुनी परंपरा उत्सन्न होऊन कोणती तरी परकीय संस्कृति तें स्थान काबीज करते.**

मन्त्रशास्त्राभासनीं असलेल्या गूढतेच्या तेजोवलयामुळें त्याच्यासंबंधींची तीव्र जिज्ञासा अन्तःकरणात बाळगणारा फार मोठा वर्ग असला तरी त्याला त्या शास्त्रा-संबंधींची व्यापक व सखोल माहिती देणारा आधुनिक शैलीत लिहिलेला एखादा उत्कृष्ट प्रबंध ग्रंथ उपलब्ध नव्हता. डॉ. केतकरांच्या महाराष्ट्रीय ज्ञानकोशात तंत्रशास्त्रासंबंधीं कांहीं माहिती संकलित केलेली आहे. पण मंत्रशास्त्राचा नामनिर्देशसुद्धा नाहीं. तंत्रशास्त्रविषयक लेखातच तुरळक मंत्रविद्येचे उल्लेख आढळतात. अशा परिस्थितींत या लुप्तप्राय शास्त्राविषयींचा प्रस्तुत ग्रंथ हाच प्रथम प्रबंध होय, असे म्हणणें चुकीचें होणार नाहीं.

"हा ग्रंथ स्वतंत्र स्वरूपाचा नाहीं. एखादा मालाकार ज्याप्रमाणें उद्यानांतील निवडक निवडक सुमनांचा हार तयार करतो, त्याप्रमाणें निरनिराळ्या ग्रंथांतून वेंचे काढून ते या ग्रंथात ग्रथित केले आहेत. हा ग्रंथ लिहितांना 'नामूलं लिख्यते किञ्चित्' हें वाक्य आधाराप्रमाणे सर्वांस घेतलें आहे. या शब्दांत स्वतः ग्रंथकारानेंच आपल्या ग्रंथाचें स्वरूप सांगितलेलें असून तें किती यथार्थ आहे याची जाणीव संपूर्ण ग्रंथाचें नुसतें अवलोकन केलें तरी येऊं शकते.

ग्रंथाच्या पूर्वार्धांतील "अन्यधर्मीयांचे देव, मंत्र व यंत्रतंत्र" (पृ. १८८–२१३) हें आठवें प्रकरण मंत्र-यंत्र-तंत्र हें हिंदु धर्मांतील खूळ आहे अशी चुकीची समजूत उराशी कवटाळून बसलेल्यांच्या डोळ्यात अंजन घालण्याच्या दृष्टीनें फार महत्त्वाचें आहे. उत्तरार्धाच्या नऊ प्रकरणांत विविध प्रकारचें मंत्रतंत्राचें विधान सविस्तरपणें सांगितलें आहे, त्यातहि **"व्यवहारोपयोगी मंत्रतंत्रविधान"** ह्या ९ व्या प्रकरणांत दिलेली (श्री. गो. भावे यांनी संकलीत केलेली) माहिती फारच मोलाची आहे. शेवटचें उपसंहारात्मक "प्राचीन भारतीय ब्रह्मांड ज्ञान व आधुनिक विज्ञान हें गो. प्र. भावे यांनीं लिहिलेलें प्रदीर्घ प्रकरण (पृ. ४८०–५३८) म्हणजे या **संपूर्ण ग्रंथाचें हृद्गत आहे. वैज्ञानिक वृत्तीच्या जिज्ञासूनें तें अवश्य वाचावयास हवें.**

एकूण ग्रंथाची उद्‌बोधकता वाढविण्याच्या दृष्टीनें ठिकठिकाणीं दिलेली देव-तांचीं व यंत्रादींचीं चित्रें पाहिलीं म्हणजे या ग्रंथाच्या विद्वान् लेखकांनीं व

प्रकाशकानीं हा जिज्ञासित पण उपेक्षित विषय केवढ्या कळकळीनें प्रकाशात आणला आहे याची कल्पना येते.

मन्त्राची साधना करून त्याचे परिणाम अनुभविणाऱ्या व्यक्तींची ओळख पटत नाहीं, तोंपर्यंत सर्वसामान्य चिकित्सक वृत्तीच्या मनुष्याचा मन्त्रशास्त्रावर विश्वास बसणें कठीण असतें. ग्रंथकारानीं मोठ्या प्रयासानें या संबंधींची दुर्लभ माहिती गोळा करून ती या ग्रंथात दिल्यामुळे एक मोठा विवाद्य विषय अनायासें निकालात निघाला आहे. जिज्ञासूंनी मन्त्रसाधकाचे हे अनुभव अवश्य वाचावयास हवेत, स्वतः ग्रंथकारानी एकूण नास्तिक समाजाला तसें आवाहन प्रस्तावनेंत केलें आहे.

"वेदशास्त्र शाळांतून शिकत असलेल्या विद्यार्थ्यांस या ग्रंथाचा फार उपयोग होणार आहे. व तेच या ग्रंथाचे अधिकारी आहेत." असे लेखकाचें म्हणणें असल्यानें त्या क्षेत्रातील प्रत्येक व्यक्तीनें म्हणजे सुशिक्षितपण पौरोहित्य करणाऱ्या लोकानीं या ग्रंथाचें सर्वंकष आलोकन करणें व स्वतःच्या ज्ञानाचा लाभ आपल्या आस्तिक यजमानवर्गास देणें अत्यंत उचित होईल. तसेंच इतरहि अधिकारसंपन्न साधक लोक या ग्रंथाचें सखोल अध्ययन करून त्यांत सांगितलेल्या साधना सत्पुरुषाच्या मार्गदर्शनाखालीं विधियुक्त शास्त्रोक्त पद्धतीनें करून आपले अभ्युदय व निःश्रेयस प्राप्त करण्यास समर्थ होवोत अशी अपेक्षा व्यक्त करून व या मन्त्रशास्त्र ग्रंथाच्या रूपानें महान् धर्मसेवा करणाऱ्या सत्पुरुषाना प्रणाम करून आपलें निवेदन संपवितों!

१ मंत्रशास्त्र परिचय

१. विषयप्रवेश

नमामि प्रणवाकारं श्रीविघ्नेशं कृपानिधिं ।
निःश्रेयोभ्युदयार्थे च कामेशीं कामरूपिणीम् ॥

मंत्रशास्त्र या विषयावर आजपर्यंत महाराष्ट्र भाषेत एकही ग्रंथ प्रसिद्ध झाला नाही. हिंदी, गुजराथी अगर प्राकृत या भाषांची जी मायजननी संस्कृत भाषा, त्या भाषेतही मंत्रशास्त्र अशा शीर्षकाचा ग्रंथ नाही. इंग्रजी भाषेत 'थिऑसफिकल् सोसायटी' मार्फत प्रसिद्ध झालेला मंत्रशास्त्र असा एक ५० पानांचा ग्रंथ अस्तित्वात आहे. संस्कृत भाषेत, तंत्रग्रंथ, आगम, यामल वगैरे ग्रंथ आहेत, परंतु त्या ग्रंथांतून वैदिक मंत्रांचा ऊहापोह केलेला नाही. तंत्रग्रंथ म्हटले की, सार्वजनिक जनसमुदायाची अशी कल्पना झाली आहे की, तंत्रग्रंथ म्हणजे आगम अथवा यामल. हे ग्रंथ शाक्त सांप्रदायाचे आहेत व शाक्त सांप्रदायी लोक हे मद्यमांससेवक असतात असा सर्वतोमुखी प्रवाद असल्याने व त्या प्रवादाप्रमाणे शाक्त सांप्रदायी लोक कनिष्ठ दर्जाला पोचल्यामुळे तंत्रग्रंथाकडे महाराष्ट्रात कोणी ढुंकूनही पाहिले नाही. तंत्रग्रंथ केवळ शक्तिविशिष्ट सांप्रदायरूपी नाहीत. त्यांत सूर्य, गणपति, शंकर, विष्णु या देवतांच्या मंत्रांचा उहापोहही केलेला आहे. तसेच मंत्रमहोदधि, मेरुतंत्र रुद्रयामल, ब्रह्मयामल, वगैरे ग्रंथ केवळ मंत्रांचा विनियोग, जपक्रिया व जपफलें ह्याच गोष्टी सांगतात. परंतु महानिर्वाणतंत्र, कामकलाविलास, प्रपंचसार इत्यादि ग्रंथ तात्त्विक आहेत.

त्या ग्रथाकडे कोणा महाराष्ट्रीयाचे लक्ष गेलेले दिसत नाहीं. एकदरींत पुढील लेखात वदिकमत्र, आगमोक्त मत्र म्हणजे तत्रोक्त मत्र व पौराणिक मत्र याची माहिती देण्याचा प्रयत्न केला आहे.

शीर्षकात मत्रशास्त्र हे शब्द अशा हेतूनें घातले आहेत की, यापुढील लेखात केवळ मत्रशास्त्राचें शाब्दिक विवेचन न करिता, मत्रशास्त्रातील प्रमेयाचे प्रायोगिक उपबृंहणही करण्यात आले आहे, व त्या योगानें प्रत्यक्ष क्रिया करून अनुभव घेण्याची इच्छा वाचकाचे ठायीं जागृत व्हावी अशी लेखकाची इच्छा आहे. मत्रशास्त्रात इतर प्रकारच्या मत्रा-बरोबर आकर्षण, जारण, मारण, स्तभन, उच्चाटन, विद्वेषण वगैरे सबधींही मत्र असतात, परतु ते येथें सप्रयोग दिलेले नाहीत येथे फक्त श्री भगवद्गीतेतील अशा प्रकारचे मत्रात्मक श्लोक दिलेले आहेत परतु त्याची सविस्तर विधाने दिलेली नाहींत. कारण मनुष्याची निसर्गतःच प्रवृत्ति स्वार्थसाधनाकडे ओढा घेत असते. हे व *अशा तऱ्हेचे प्रयोग गुरुसाप्रदायावाचून फलद्रूप होत नाहींत* व गुरूही, *शिष्य अगदीं परार्थपरायण व स्वार्थविन्मुख झाल्यासेरीज ह्या विद्या शिष्याना सागत नाहींत*. म्हणून साध्या व्यवहारास उपयोगी पडतील अशा मत्राचा सन्निवेश पुढील लेखात करण्यात आला आहे.

शीर्षकातील विषयाचा ऊहापोह करण्याकरिता खालीं नमूद केल्या-प्रमाणे त्याचे विभाग पाडण्यात आले आहेत. शास्त्र, मत्राची व्याख्या, वेद व वेदाचे अपौरुषेयत्व, वेदाच्या शाखा, वेदाच्या शाखा म्हणणाऱ्या ब्राह्मणाचीं वसतिस्थानें, वैदिक मत्राचे प्रकार, ऋग्वेद, यजुर्वेद, सामवेद व अथर्वणवेद यातील व्यवहारोपयोगी मत्र व त्याचे विनियोग, वेदमत्राचा अनुभव घेतलेल्या सज्जनाचे नामनिर्देश, अवेस्ता व गाथा (पारशी लोकाचे वेदतुल्य ग्रथ) यातील मत्र व त्याचे विनियोग, जैन साप्रदाया-तील मत्र, बौद्ध सांप्रदायातील मत्र, आगम व तत्रे, याच्या व्याख्या, आगमोक्त मत्राचे प्रकार, मत्रशक्ति, मत्रशक्तियोग, यत्र व त्याची विरचना,

मूर्ति, देवालयें व त्यांचे पूर्वकालीन अस्तित्व, मंत्रशास्त्राच्या साधनेंतील मूर्तिपूजेचें स्थान, कलियुगात साध्य होणारे मंत्र, गायत्री मंत्र व त्याचें रहस्य, साबर मंत्र, गारुड मंत्र, पौराणिक मंत्र व यंत्रें, आधुनिक साधुपुरुषांना सांगितलेले सिद्ध मंत्र, तांत्रिक व पौराणिक मंत्रांचे अनुभव घेतलेल्या सज्जनांचे नामनिर्देश, मानवाचे संस्कार व साधारण नियम मंत्र सिद्ध न झाल्यास त्या मंत्राबद्दल साधकानें करावयाचे मंत्र-संस्कार, मंत्रसिद्धि होण्याचीं साधनें, गुरुतत्त्व, क्रिया व गुरु, कुलगुरु, दीक्षा, मंत्र सिद्ध झाल्याचीं लक्षणें, मंत्रसिद्धीचा पूर्वकालीन उपयोग, मंत्रसिद्धि नष्ट झाल्याचे परिणाम आणि उपसंहार.

२. शास्त्र.

प्रथमतः शास्त्र म्हणजे काय याचा साधारण लौकिकरीत्या विचार करूं. एका विषयाबद्दल अनेक विचारवान् लोक निरनिराळ्या दृष्टींनी निरनिराळीं गृहीत कृत्यें आधाराला घेऊन निरनिराळ्या भूमिकेवरून आपापले विचार प्रदर्शित करितात, अथवा निरनिराळे प्रतिभाशाली संशोधक निरनिराळ्या उपकरणांनी निरनिराळे प्रयोग करून त्या प्रयोगांनी सिद्ध झालेले सिद्धांत एकत्र करून ठेवतात. असे सिद्धांत दोन प्रकारचे असू शकतात. कांहीं सिद्धांत निरनिराळ्या पदार्थांच्या मिश्रणानें सिद्ध होणारे असतात व कांहीं सिद्धांत एका पदार्थांत अवगुंठित असलेलीं मूलभूत तत्त्वें विघटित करण्याच्या प्रयोगांनी सिद्ध होतात. म्हणजे कांहीं सिद्धांत पदार्थांच्या मिश्रणजन्य प्रयोगांनीं सिद्ध होतात व कांहीं सिद्धांत पदार्थांतील तत्त्वें निरनिराळीं करण्याच्या प्रयोगांनी सिद्ध होतात. अर्थात् कांहीं सिद्धांत भिन्न पदार्थांच्या संघटनेनें वसविलेले असतात. कांहीं सिद्धांत प्रायोगिक असतात व कांहीं सिद्धांत अज्ञेय सृष्टिरचनेची व मानवी जीवनाची आणि मानवाच्या अंतिम ध्येयाची बुद्धिकौशल्यानें मीमांसा करण्याच्या हेतूनें सिद्ध केलेले असतात. याप्रमाणे निरनिराळ्या बुद्धिविशारदांनी निरनि-

राळ्या भूमिकेवरून निरनिराळ्या प्रकारचे सिद्धांत प्रदर्शित केलेले असतात. असे सिद्धांत व त्यांचे प्रयोग अथवा सिद्धांत व ते सिद्ध करण्याकरितां पूर्वपक्षरूप व उत्तरपक्षरूप प्रमेय-प्रणालिका ज्या ग्रंथांत व्यवस्थित रीतीनें मांडण्यात येते, तो ग्रंथ त्या विशिष्ट विषयाचा शास्त्रग्रंथ होय.

पूर्वकालापासून षट्शास्त्रें म्हणजे न्याय, वैशेषिक, सांख्य, सेश्वरसांख्य, पूर्व मीमांसा व उत्तर मीमांसा; यांना शास्त्रग्रंथ अथवा षड्दर्शनें अशी संज्ञा देण्यांत आलेली आहे व ह्या शास्त्रांच्या बरोबरीचीं गणितशास्त्र, व्याकरणशास्त्र, ज्योतिःशास्त्र, धर्मशास्त्र वगैरे शास्त्रेंही पूर्वकालापासून अस्तित्वांत आहेत, परंतु त्यांची गणना षट्शास्त्रांत केलेली नाहीं. शिवाय चार वेदांचे चार उपवेदही शास्त्र या संज्ञेखालीं येत असत, जसें-आयुर्वेद, धनुर्वेद गंधर्ववेद व स्थापत्यवेद. या उपवेदांचे पुन्हां वनस्पतिशास्त्र, रसायनशास्त्र, प्राणिशास्त्र, ज्योतिर्गणितशास्त्र, गायनशास्त्र, तंतुवादनशास्त्र, मृदंगवादनशास्त्र, अगस्त्य संहितेंतील वास्तुशास्त्र व विद्युच्छास्त्र हीं शास्त्रें प्राचीनकाळीं प्रसिद्ध होतीं. प्रस्तुतकाळीं अगस्ति संहितेंतील विमानशास्त्राचा शोध लागला आहे.' असें ऑगस्ट १९३५ च्या सह्याद्रि मासिकांत प्रसिद्ध झालें आहे. आशिया मायनरमध्यें (तुर्कस्थानमध्यें) इसवी सनापूर्वी प्रसिद्ध असलेल्या खाल्डियन लोकांनीं लिहिलेल्या मातीच्या विटा सांपडल्या आहेत. त्यांमध्येंही विमानविद्येचा सप्रयोग इतिहास दिलेला आहे असें अलीकडे प्रसिद्ध झालें आहे.

वस्तुतः शास्त्र हा शब्द 'शास् अगर शासु' या धातूपासून झालेला आहे. या शास् धातूचा अर्थ अनुशासन करणें अथवा सुसंघटित करणें

---

१. कै. पंडित सातवळेकर यांनीं 'पुरुषार्थ' मासिकांत (१९६७–६८) लेख लिहून प्राचीन विमानासंबंधें वेदांतील वचनें देऊन आकार व गति ह्यांची माहिती दिली आहे. तसेंच कै. वझे इंजिनियर (नाशिक) यांनीं आपल्या 'शिल्पशास्त्र (इ. स. १९२८) या ग्रंथांत 'शिल्पशास्त्र विस्तार' या प्रकरणांत विमानविद्या ह्याबद्दल बरीच माहिती दिली आहे. (गो. प्र. भावे)

असा होतो. 'शास्यते अनेन इति शास्त्रम्' अथवा 'शास्ति शास्यते इति शास्त्रम्' म्हणजे ज्या वाक्यरचनेच्या योगानें कोणत्याहि विषयाचे ज्ञान सम्यक् रीतीनें लिहिलेलें असतें ते 'शास्त्र' होय. कोणत्याहि विषयासंबधीं अनेक प्रयोगकर्त्यांनीं अगर अनेक कुशाग्रबुद्धीच्या लोकांनीं विशिष्ट ज्ञान संपादन करण्याकरिता अनेक वेळा प्रयत्न केलेले असतात. अथवा अनेक सिद्धांत बसविलेले असतात व अनेक प्रकारच्या उपपत्ति लावलेल्या असतात. ते त्यांचे क्रियासंभार व अनुभवजन्य ज्ञान संपादनाकरिता केलेले प्रयत्न एकत्र करून एका विवक्षित विषयाबद्दल जी व्यवस्थित वाक्यरचना सुसंबद्ध रीतीनें एकत्र केलेली असते, त्या वाक्यसमूहाला शास्त्र म्हणावें. उदाहरणार्थ–आचारशास्त्र, नीतिशास्त्र, मानसशास्त्र, विद्युन्मानसशास्त्र, व्याकरणशास्त्र, अलंकारशास्त्र, छंद शास्त्र, स्वरशास्त्र, तंतुशास्त्र, वनस्पतिशास्त्र, भूगर्भशास्त्र, प्राणिशास्त्र, रसायनशास्त्र, विद्युच्छास्त्र, वेदान्तशास्त्र, योगशास्त्र, परलोकविद्याशास्त्र इत्यादि प्राचीन व अर्वाचीन शास्त्रांचीं निवडक अशीं नावे आहेत.

योगशास्त्राचे प्रणेते *पातंजल महामुनि यांनीं* योगशास्त्रातील सूत्रांचे चार विभाग केले आहेत समाधिपाद, साधनपाद, विभूतिपाद, व कैवल्यपाद असे ते चार पाद अगर विभाग होत. या चार पादांपैकीं शेवटील कैवल्यपादातील पहिल्या सूत्रांत योगसिद्धि कशा प्राप्त होतात याचें वर्णन केलें आहे. तें सूत्र असें आहे. "जन्मौषधिमंत्र-तप-समाधिजा सिद्धयः" या सूत्रांत सिद्धि प्राप्त होण्याचे पांच मार्ग सांगितले ते असे कीं, कांहीं पुरुषांस जन्मादारभ्यच सिद्धि प्राप्त झालेल्या असतात, कांहीं लोकांना औषधींपासून सिद्धि प्राप्त होतात कांहींना मंत्रजपापासून व तपश्चर्येपासून व कांहींना समाधिपासून सिद्धि प्राप्त होतात. त्या पांच प्रकारांपैकीं मंत्र अथवा मंत्रशास्त्र हाहि एक सिद्धि-प्राप्तीचा उपाय आहे म्हणून मंत्रशास्त्र या विषयावर विवेचन करावयाचे योजिलें आहे.

३. मंत्राची व्याख्या

मंत्रशास्त्रात मंत्राची विशेष माहिती दिलेली असते, म्हणूनच प्रथम मंत्र या शब्दाच्या व्याख्येचा विचार करू. मंत्रधातूचा अर्थ गुह्य परिभाषण असा आहे. 'मंत्रयते' म्हणजे गुह्य गोष्टी मिळवितो, असाही ह्या धातूचा अर्थ होतो. कोणत्याही कार्याकरिता कोणत्याही देवतेचे आमंत्रण म्हणजे आवाहन करणें, असाही मंत्र धातूचा अर्थ आहे. ज्याच्या मननानें सर्व जगाचें ज्ञान होतें. अर्थात जीव, ब्रह्म आणि ब्रह्माण्ड याच्या ऐक्याचें ज्ञान होतें, ज्याच्या मननानेंच संसारपाशबंधनापासून प्राप्त होणारी जीवदशेची मुक्ति साध्य होते व ज्याच्या जपापासून धर्मार्थकाममोक्षादि चतुर्विध सिद्धि प्राप्त होते, तो मंत्र होय. 'मननात् त्रायते इति मंत्र' अशीही मंत्र शब्दाची व्याख्या तंत्रशास्त्रात आढळून येते. श्रीविद्यारण्य स्वामींनी मंत्र शब्दाची व्याख्या या श्लोकात दिलेली आहे, तो श्लोक असा--

> मकारो मननं प्राह त्रकारस्त्राणमुच्यते ।
> मननत्राणसंयुक्तो मंत्र इत्यभिधीयते ॥
> ब्रह्मक्षा ब्राह्मणाः पूर्वं जलवाय्व्यादिस्तंभनैः ।
> शक्तेरुत्पादनं चक्रुस्तन्मंत्रमिति गद्यते ॥
> मननाद्वस्तुशक्तीनां त्राणात् संकटसागरात् ।
> [1]मंत्ररूपा भवेच्छक्तिर्मननत्राण धारिणी ॥ जामदग्न्य धनुर्वेद.

वरील सर्व मंत्रव्याख्याचा उत्तानार्थ असा आहे की, कोणत्याही

---

१. या वाक्यावरून पुढील गोष्टी सिद्ध होतात.
(१) मंत्रविद्या मनननिष्ठ आहे. म्हणजे मंत्रविद्येचें अधिष्ठान वैचारिक—बौद्धिक आहे. (२) मनावर परिणाम होऊन एकाग्रता साधते. (३) मंत्रविद्येनें देवता येऊन जपकाला मदत करितात. (४) मंत्राच एक प्रकारचें तंत्र असतें व त्यामुळें आत्मीय व परकल्याण होतें आणि (५) मंत्रविद्येनें भौतिकावर स्वामित्व गाजविता येतें (गा. प्र. भा.)

अक्षर समुच्चयाचे मनन म्हणजे अभ्यास अर्थात् मन्त्राचे पुनः पुन मनन-पूर्वक मनोमय उच्चारण करणें, व ते उच्चारण केल्याने उच्चारकर्त्याचे मनोरथ ती अक्षरमाला अगर तो अक्षरसमुच्चय पूर्ण करितो. श्रीविद्यारण्य स्वामींच्या वर उद्धृत केलेल्या श्लोकाचा अर्थही असाच आहे. अशा नाना प्रकारच्या वर्णयोजना (उदाहरणार्थ 'हसक्षे') योजून नाना प्रकारचीं इष्ट फळे देणारे जे शब्दसमूह अगर वर्णसमूह त्यास मन्त्र म्हणावें. एकदरींत मन्त्राचा उपयोग मन्त्रातील गूढशक्ति प्रकाशात आणण्याकरिता होतो. अगर आरंभी निरर्थक दिसणाऱ्या शब्दसमूहाला तो इष्ट फलदायी आहे असे अनुभवता येते. म्हणजे या प्रकारच्या मन्त्रातील सामर्थ्यानें इष्टफलप्राप्ति व अनिष्ट फलपरिहार ह्या गोष्टी साध्य होतात. अमुक वर्णसमुच्चयाचा जप केल्यानें अमुक इष्टफलप्राप्ति होते व अमुक अनिष्टफल निवारण करिता येते, असा आदेश पूर्वकालीन ऋषिमुनींनी किंवा अर्वाचिन सिद्धपुरुषांनी दिलेला असतो. म्हणून त्या वर्णसमुच्चयास तत् फलदायी अगर तत्तदनिष्टफलनिवारक मन्त्र म्हणावें. "ज्याच्या अर्थाच्या प्रकाशनासाठी आम्हाला काहीं मनन करावें लागते, आणि काहीं प्रयोगही करावे लागतात, मननाने व प्रयोगानी ज्याच्या अर्थावर प्रकाश पडतो, तसेच ज्याचा अर्थ उत्तरोत्तर विकसित होऊ शकतो वा होणारा आहे त्याला मन्त्र म्हणतात." विनोबा भावे. (मराठा २९–१२–१९६८ गो. प्र. भा.)

४. शब्द व ध्वनि

वेदमन्त्राचा उच्चार म्हणजे ध्वनी होय. ध्वनिपासून गति व गतीपासून ध्वनि ही परस्परावलंबी उपपत्ति आहे. गतीचीं-रंग, प्रकाश, उष्णता, आकर्षणशक्ति व विद्युत् अशीं रूपांतरें होतात. योगशास्त्राच्या सिद्धान्ता-प्रमाणें पाहिले तर ध्वनीला रंग व आकार आहे. मानवी शरीरातील षट्चक्रांपैकीं अनाहत विशुद्धि व आज्ञा या चक्रात उत्पन्न होणारे ध्वनि

योगशास्त्रांत सांगितल्याप्रमाणें बरोबर आहेत, असें पाहून मगच मंत्रद्रष्ट्या ऋषींनीं मंत्रांतील ऱ्हस्व, दीर्घ, प्लुत, उदात्त, अनुदात्त, स्वरित असे स्वर कायम केले व इष्ट फलप्राप्तीकरितां इष्ट अशी विद्युत्शक्ति निर्माण होते, याचे प्रयोग पाहूनच मंत्रांचे निरनिराळे विनियोग (उपयोग) त्यांनीं ठरविले. *अशा प्रकारच्या वेदमंत्रांच्या पठणानें अतींद्रिय जगांतील सुप्त विद्युतशक्ति जागृत करून तिचा पुरवठा जगत्कल्याणकरितां व जगद्धारणेकरितां व्हावा या हेतूनेंच त्यागमूर्ति ब्राह्मणाचें तें आदि कर्तव्य समजलें गेलें व म्हणूनच त्यांस सर्व वर्णांचे गुरू ही संज्ञा दिली गेली.* ध्वनीपासून म्हणजे *अर्थपूर्ण* शब्दापासून उत्पन्न होणाऱ्या अनंत शक्ति व शक्तीपासून जी अनंतविध कार्यें घडतात, त्यांना अनुलक्षूनच त्या ध्वनींचे अर्थ त्या ध्वनींमध्येंच अनुस्यूत असतात, असें सिद्ध होतें. म्हणून शब्द *आणि अर्थ यांचा सृष्टींतील परस्पर संबंध स्वयंभू आहे, नित्य सिद्ध आहे, अखंड आहे व चिच्छक्तियुक्त आहे;* परंतु मानवी वाचारूपी यंत्रांतून हे ध्वनि बाहेर पडतांना त्या मंत्रांच्या कार्यक्षमतेप्रमाणें ते बाहेर पडणार व त्याच्यापासून तितक्या प्रमाणानेंच कार्यें होणार हें सिद्धच आहे.

असे शब्द दोन प्रकारचे आहेत. मानवी व्यवहार संपादण्याकरितां योजलेले जे शब्दसमूह, त्यांच्या योगानें बनलेल्या भाषेस 'सांकेतिक भाषा' असें म्हणतात व इतर पशुपक्ष्यादिकांच्या शब्दाला 'ध्वनि' म्हणतात. मानवी व्यवहाराकरितां योजलेली ही सांकेतिक भाषा निरनिराळ्या मानववंशामध्यें निरनिराळ्या प्रकारची असते. अन्नपानादिकांचे संपादन, इंद्रियसुख संपादन, आनंद, भय, शोकदर्शन हेंच मानवी व्यवहार होत. तसेंच पशुपक्षी यांचेही ध्वनिरूप उच्चार वरील मानसिक सुखदुःखदर्शक असतात. पशुपक्षी यांची भाषा जाणणाऱ्या ज्ञानी लोकांनां पशुपक्ष्यांच्या विशिष्ट ध्वनीनें उच्चार विशिष्ट इच्छादर्शक असतात, असें प्रत्यक्ष प्रयोग करून सिद्ध केलें आहे. 'गोरिला' नांवाच्या वानराच्या ध्वनीवरून एका गृहस्थानें गोरिलांची भाषा ठरविली आहे. म्हणून

सांकेतिक भाषेपैकीं मानवी भाषेला शब्द व पशुपक्षी यांच्या उद्‌गारांना ध्वनि म्हणणे अशा प्रकारचा भेद फार सूक्ष्म आहे.[१] असो. आतां एखादी इष्ट परिणामकारक गोष्ट करावयाची असल्यास ठरविलेली अशीच शब्दयोजना केली पाहिजे. अशा शब्दयोजनेस सिद्ध भाषा असें म्हणतात. उदाहरणार्थ, पर्जन्य पडण्याकरितां जीं पर्जन्यसूक्तें म्हणावीं लागतात. या पर्जन्यसूक्तासंबधानें होणाऱ्या परिणामाचा अनुभव लेखकानें घेतल्याचा उल्लेख पुढील भागांत आलेला आहे. त्या सूक्ताची भाषा सर्वत्र सारखी असली पाहिजे म्हणजे मग अशा त्या भाषेनें घडून येणारा इष्ट परिणाम सर्वत्र सारखा होईल.

---

१. फार फार जुन्या काळचीं माणसें पशुपक्ष्यांचीं भाषा जाणत असत. कोल्हा, भालू (म्हातारी कोल्ही) हुमण, कुत्रे, घुबड इत्यादि प्राण्यांच्या 'ध्वनि' म्हणजे आवाजावरून, ओरडण्यावरून भावी अनर्थाची कल्पना जाणणारे लोक असत. (भारताच्या कांहीं जंगली भागांत अद्यापि क्वचित आहेतही.) मुंग्या, चिमण्या, खारुडी (हिंदींत 'रवटी म्हणतात', इंग्रजींत squirrel म्हणतात) यांची पण भाषा आहे असें सूक्ष्म निरीक्षणानें ध्यानांत येईल. वानर व माकडें ह्यांची भाषा आहे 'टार्झान' Tarzan या इंग्रजी चित्रपटांत ह्या प्राण्यांची भाषा कशी असते तें समजून येतें. त्या त्या प्राण्यांच्या—पशु पक्षी इत्यादि हालचाल व ओरडणें यावरून भावी घटनांची आगाऊ कल्पना कशी होते व ती कशी समजावी ह्याचें सूक्ष्म निरीक्षण करून भारतीय ज्योतिर्विदांनीं कांहीं सिद्धांतही बसविले आहेत. महाभारतीय युद्धाच्यावेळीं ज्या अशुभ घटना घडत होत्या त्या, प्राण्यांच्या आवाजावरून ओळखून त्यांचें वर्णनही केलेलें आहे. राजा भर्तृहरीला पक्ष्यांची भाषा येत होती हें ऐतिहासिक उदाहरण विचारार्ह आहे.

आयुर्वेदामध्यें प्राण्यांची भाषा जाणी अवगत व्हावी या हेतुनें गर्भिणी, दर म्हायर्धेय पदार्थांचे प्रयोगही सांगितले आहेत. पाश्चिमात्यांनीं अनेक प्रयोग करून पाण्यांतील माशांचीही भाषा असते असें शोध पाण्यांत राहून करून त्यांचें निरीक्षण करून त्यांची भाषा समजून घेण्याचा प्रयत्न कांहीं पाश्चिमात्य शास्त्रज्ञ करीत आहेत. (Science 1963) गो. प्र. भा.

५. मंत्रोच्चारपद्धति व परिणाम

अशा मंत्राचा जप तीन प्रकारचा असतो. व्यक्त, उपांशु व *मानस*, अशा त्या तीन प्रकारच्या जपक्रियेचीं निरनिराळी फळेंही सांगिली आहेत.

जिव्हेनें स्पष्ट उच्चारलेल्या जपास 'व्यक्त' जप म्हणतात. असा जप दुसऱ्यास ऐकू येतो. ह्या जपानें आधिभौतिक प्रतिबंधाचा परिहार होतो. जिव्हेनें अस्पष्ट म्हणजे दुसऱ्यास ऐकू न जाईल व आपणास ऐकू येईल अशा जपास '*उपांशु*' जप म्हणतात. ह्या जपानें आधिदैविक प्रतिबंधाचा परिहार होतो. '*मानसिक जप*' म्हणजे मनातच, परंतु मोठ्या आवाजानें जप केल्यास त्यास मानसिक जप म्हणतात. हा जप आपल्या अंतर्रसनेनें होतो व तो आपल्या सूक्ष्म श्रवणेंद्रियास ऐकू येतो. अशा प्रकारचा जप आपल्या प्राणमय शरीरातील वाचेनें होतो. स्वप्नातील शब्द जसे स्वप्नावस्थेंतील श्रवणेंद्रियास ऐकू येतात व जागृतींत आल्यानंतर केवळ स्मरणानें त्याचा अनुभव अन्नमय शरीरात येतो, तसा मानसिक जपाचा अनुभव जागृतावस्थेंत असताना येतो. अशा प्रकारच्या जपास '*मानसिक जप*' म्हणतात. ह्या जपानें आध्यात्मिक प्रतिबंधाचा परिहार होतो असे सांगितलें आहे. वैखरी वाणीनें होणारा जप 'व्यक्त' होय. मध्यमा वाणीनें होणारा जप '*उपांशु*' होय व पश्यंती वाणीनें होणारा जप '*मानसिक*' होय. व परावाचेनें होणारा जप 'उन्मनी' म्हणजे मन प्रांताच्या पलीकडील वाचेनें होणारा जप होय. *ह्या जपानें आत्मसाक्षात्कार होतो.*

जिव्हेनें स्पष्ट उच्चारलेल्या जपानें अगर अस्पष्ट उच्चारलेल्या उपांशु जपानें प्रत्येक वर्णाचे ठायीं जी गूढशक्ति असते ती उच्चाराबरोबर जागृत होते. व त्या वर्णोच्चाराबरोबर अंतराळात उच्चारकर्त्याच्या आसमंतात विद्युद्वलयें, विद्युत्पुंज व विद्युच्छलाका उत्पन्न होतात. त्या विद्युच्छक्तीनें अंतराळातील दृश्य व अदृश्य तत्त्वें जागृत होऊन जपकर्त्याकडे आकर्षित केलीं जातात. *ह्या क्रियेनें वातावरणावर मंत्रोद्दिष्ट परिणाम होऊन परंपरया*

वातावरणातून स्थूल सृष्टीवर म्हणजे जपकर्त्याच्या अन्नमयादि कोशावर ते मन्त्रोद्दिष्ट परिणाम होतात. पौर्वात्य योगशास्त्रातील प्रक्रियात वर्णन केल्याप्रमाणे मानवी शरीरात 'कुंडलिनी शक्ति' वास करते, तसेच ब्रह्मांडात 'महाकुंडलिनी' शक्तीचे वास्तव्य आहे. 'पिंडीं ते ब्रह्मांडीं' या उक्तीप्रमाणे या दोन्ही 'कुंडलिनी शक्ति' आपापलीं कार्ये करीत असतात. ही महाकुंडलिनी म्हणजे महाविद्युत् शक्ति होय. सर्व ब्रह्मांडातील घडामोडी जशा महाकुंडलिनी शक्तीनें चालतात, तशाच शरीरस्थ कुंडलिनी शक्तीनें म्हणजे विद्युत् शक्तीनें शरीरस्थ सर्व क्रिया चालतात. मानव शरीर उत्पन्न झाल्यावेळीं ज्या आकाशस्थ ग्रहाचे जसे परिणाम घडून येणार असे ठरलेलें असतें, त्याप्रमाणे शरीरस्थ कुंडलिनी शक्ति कार्य करते, परंतु या ग्रहाच्या अनिष्ट परिणामाचा परिहार करणें झाल्यास त्या ग्रहाचे त्या त्या वेळीं जे परिणाम घडणार असतील, त्या परिणामाची प्रतिक्रिया मन्त्रशक्तीनें साध्य करिता येतें. प्रत्येक व्यक्तीला याप्रमाणें मन्त्रजपानें मन्त्रशक्ति उत्पन्न करून स्वतःवर आक्रमण करणाऱ्या आगामी अनिष्ट परिणामाचा परिहार करिता येतो, इतकेंच नव्हे तर अशी *मन्त्रशक्ति जागृत करून दुसऱ्याच्याही* भावी अनिष्ट परिणामाचा प्रतिकार करता येतो. यावरून *मन्त्रशास्त्र हें प्रयोगसिद्ध शास्त्र आहे* असें सिद्ध होतें. फल ज्योतिषशास्त्रानें मनुष्यास आगामी *संकटाची सूचना मिळते. प्राक्तन म्हणजे दैव व प्राक्तनकर्मापासून* उत्पन्न होणाऱ्या संकटाचा परिहार अद्यतन कर्मे करून करिता येतो; हेंच मानव जन्मातील इति कर्तव्य होय व तें मन्त्रशक्तीच्या साह्यानें साध्य करिता येतें. हीच मन्त्रशास्त्राची महती होय.

६. जपाचा परिणाम

आधुनिक पाश्चात्य *शास्त्रज्ञांनी शोधबुद्धीनें* असा सिद्धांत स्थापित केला आहे कीं, *मानवी शरीर हें एक विद्युत् घटयन्त्र आहे.* (Battery-

Electric Power house) तेव्हा अशा ह्या कुडलिनी शक्तियुक्त मानवी शरीराच्या साधनाने जो वर्णघटित मत्राचा उच्चार होतो, त्या उच्चाराच्या योगाने विद्युच्छक्ति उत्पन्न होणे, ही गोष्ट क्रमप्राप्तच आहे. जगातील आद्य ग्रथ जे वेद ते म्हणणाऱ्या ऋषिवर्यांनी आपल्या दिव्य-दृष्टीने व योगिक बलाने मत्राच्या ठायीं गूढ असलेल्या दिव्य शक्तींचा अनुभव घेतला व त्यांनी इष्टफलप्रापक व अनिष्टफलनिवारक शक्तींचा सचय असलेल्या मत्राचा विशिष्ट कार्मी विनियोग करिता येतो, असा सिद्धात बसवून अखिल मानव जातीच्या कल्याणार्थ मत्र व त्याचे विनियोग (उपयोग) शिष्यपरपरेत चालू ठेविले.

७. मंत्रशास्त्राची उत्पत्ति

आतापर्यंत शास्त्र, मत्र व शब्द याचे निवरण झाले. वस्तुतः मत्र-शास्त्राचे निराळे असे शास्त्रग्रथ उपलब्ध नाहींत. तत्र व आगम, यामल व कल्प हेच ग्रथ मत्रशास्त्राचा ऊहापोह करीत असतात. वैशेषिक, साख्य, न्याय वगैरे षट्शास्त्रात मत्रशास्त्र असा निराळा शास्त्रीय ग्रथ उपलब्ध नाही. निदान लेखकास तरी तो उपलब्ध झाला नाहीं. तत्रशास्त्र ग्रथात असें वर्णन आहे की, श्रीशकराच्या चार मुखापासून 'वेद' निर्माण झाले व पाचव्या ऊर्ध्व मुखापासून 'आगम' उत्पन्न झाले, वेद व आगम हे एकदाच म्हणजे एका वेळीच निर्माण झाले आणि शास्त्रे मागाहून निर्माण झालीं. शास्त्राचे कर्ते निरनिराळे ऋषि मुनि आहेत. वर नमूद केलेलीं षट्शास्त्रें निर्माण झालीं त्यावेळीं अगर त्यानतर मत्रशास्त्र असें एक शास्त्र कोणी निर्माण केलेल आहे असे दिसत नाही.

एकदरीत मत्रशास्त्र असे निराळे शास्त्र नाही याचे कारण असे असावे की, चार वेदापकीं एकच वेद म्हणजे अथर्वणवेद मत्रशास्त्रमय आहे. म्हणजे इतर उर्वरित तीन वेदात मत्र नाहीत असे नाही. परतु ह्या अथर्वणवेदात इष्ट फलदायी व अनिष्ट परिहारक असेच मत्र पुष्कळ

आहेत, म्हणून कदाचित् निराळा मन्त्रशास्त्राचा ग्रंथ निर्माण केला नसावा. यज्ञकर्म व यज्ञमीमांसा हाच वैदिक काळात वैदिकांचा मुख्य व्यवसाय असल्याने व यज्ञीय कर्मे म्हणजे मासिक, षाण्मासिक, वार्षिक व द्वादश-वार्षिक असे निरनिराळे यज्ञ त्या यज्ञीय कर्माचे भाग पाडलेले असल्याने यज्ञामध्ये तीन ऋत्विक्, यजमान व यजमानपत्नी यांचे रक्षण करण्याचे कार्य ब्रह्म्याकडे म्हणजे अथर्वणवेदवेत्याकडे सोपवून दिलेले असे. अर्थात् अथर्वणवेदवेत्याच्या रोजच्या *व्यवहारात मन्त्रविद्या जागृत ठेऊन तिचा* उपयोग *करण्याची जरुरी असल्याने रोजच्या व्यवहाराचें निराळें शास्त्र लिहिलेलें* नसावें *असें वाटतें.*

□ □

अमृत–मंजिरी

१. मंत्रशास्त्र हे अनुभवदर्शी शास्त्र आहे
२. मंत्रजप अर्थानुलक्षी केला तरच फलप्रद होतो.
३. सर्व वेद मंत्रमय आहेत.
४. वेदमंत्र संस्कृत भाषेत आहेत
५ संस्कृत ही एकच भाषा सर्वांत जास्त प्रगत व प्रगल्भ आहे.
६. संस्कृत इतके जास्त वर्णाचार जगातील कोणत्याच भाषेत नाहींत

२ वेद व आगम विचार

१. वेद व त्यांचे अपौरुषेयत्व

अशा प्रकारच्या सर्व प्राचीन व अर्वाचीन मन्त्राचे उगमस्थानभूत झालेले असे *सर्व जगातील आद्य ग्रंथ म्हणजे वेद हे होत.* वेद हे ज्ञान-रूप आहेत, अनंत आहेत, अपूर्व आहेत व अपौरुषेय आहेत. अपौरुषेय म्हणजे त्याचा निर्माता असा एक पुरुष नाही. "यस्य निश्वसितं वेदाः" या वचनानें वेदाची उत्पत्ति पंचभौतिक देहधारी पुरुषाकडून न होता ती परमात्म्याच्या शक्तीपासून झाली आहे असें निर्णित केले आहे. *ब्रह्मदेवाच्या मुखापासून वेद निर्माण झाले म्हणजे त्याच्या निश्वासाबरोबर ते अमूर्तातून अगर अव्यक्त अवस्थेतून व्यक्तावस्थेंत आले.* ब्रह्मदेवानें श्वास आत घेतल्याबरोबर पुन्हा ते अव्यक्त रूपात अंतर्धान पावतात. मानवी प्राणी श्वास व उच्छ्वास करितात व म्हणून ते आपल्या श्वासोच्छ्वासाचे निर्माते होत नाहीत. या उदाहरणाप्रमाणेच ब्रह्मदेव हे वेदाचे कर्ते होऊ शकत नाहीत. या ब्रह्मदेवाच्या श्वासापासून उत्पन्न होऊन ऋषींना तेजोरूपानें प्रत्यक्ष दृश्य झालेले व श्रुत झालेले असे वेद असल्यानें "ऋषयो मन्त्रद्रष्टार आसन्" *ऋषी मन्त्रद्रष्टे होते. पण काही ऋषि मन्त्रकर्तेही होते.* त्यांची प्रज्ञा अतिमानव कोटींतील होती.

वेदाचे भाष्यकार श्रीसायणाचार्य यांना वेदाचे लक्षण खालीं नमूद केल्याप्रमाणे लिहिले आहे.

"इष्टप्राप्त्यनिष्टपरिहारयोरलौकिकमुपायं यो ग्रंथो वेदयति स वेदः। प्रत्यक्षेणानुमित्या वा यस्तूपायो न बुद्ध्यते एव विंदति वेदेन तस्मात् वेदस्य वेदता॥

इष्टफलप्राप्ति व अनिष्टफलपरिहार दर्शविणारे व प्रत्यक्ष *अथवा अनुमान या प्रमाणानी ज्याची कल्पना करिता येत नाही अशा प्रकारचे उपाय* सागणारे जे ग्रंथ ते वेद होत.

तसेच अथर्ववेदाची प्रस्तावना लिहिताना वेदभाष्यात श्रीसायणाचार्य लिहितात की—

"ततः शब्दार्थस्तत्संबंधानां नित्यत्वेन अपौरुषेयत्वात्पुरुष बुद्धिप्रभवदोषानुप्रवेशाभावेन वेदाना स्वतः सिद्धिप्रामाण्यम्। पुरुषप्रयत्नाऽनिवर्त्यत्वेन नित्यत्वम्"

वेदाचे अपौरुषेयत्व असे सिद्ध होतें की, वेदातील शब्द व त्याचे अर्थ याचा नित्य संबंध आहे. म्हणून वेद अपौरुषेय आहेत पुरुषबुद्धीमध्ये दोष होणे अपरिहार्य आहे व अशा पुरुष-बुद्धिजदोषाचा वेदामध्यें *अभाव आहे, म्हणून ते स्वत.सिद्ध आहेत.* पुरुषप्रयत्नानी ते साध्य होण्यासारखे नाहात कोणी म्हणेल मी वेदातील ऋचेसारखी एक ऋचा तयार करतो, तर त्याने तयार केलेल्या ऋचेच्या विनियोगानें अमुक फल साध्य करून देणे ही गोष्ट त्याला साध्य होणार नाही, म्हणून वेद हे *अपौरुषेय आहेत.*

वेद हे *स्वयप्रकाश आहेत. कारण ते स्वयभू आहेत.* ज्याला प्रकाशित होण्यास दुसऱ्या पदार्थाच्या सहाय्याची अपेक्षा नसते व जो दुसऱ्या पदार्थास आपल्या प्रकाशाच्या सहाय्यानें प्रकाशित करितो तो स्वयप्रकाश होय. स्वभावत जो पदार्थ मधुर आहे त्याला मधुरिमा आणण्यास दुसऱ्या मधुर पदार्थाची अपेक्षा नसते दूध, दही, ताक या पदार्थांस माधुर्य आणण्यास गूळ, साखर अगर मध या पदार्थाची जरूर लागते परंतु साखर, गूळ व मध हे पदार्थ स्वत सिद्ध मधुर असल्यानें त्यास माधुर्य आणण्यास दुसऱ्या पदार्थांची आवश्यकता भासत नाही. एखाद्या

नृपप्रासादातील पदार्थ समजवून घेण्यास प्रकाशाची जरूर लागते परंतु प्रकाशास व्यक्त होण्यास किंवा आपल्या प्रकाशकत्वाचा गुण सिद्ध करण्यास दुसऱ्या कोणत्याही पदार्थांची जरूर लागत नाहीं. सर्व जगात प्रकाश ही अशी वस्तू आहे कीं, ती इतर सर्व पदार्थांस व्यक्त करिते. प्रकाश झाला कीं, त्याबरोबरच अंधकाराचा विनाश होतो. प्रकाश व अंधकार या जोडीत प्रकाश वस्तू आहे. अंधकार ही कांहीं वस्तू नव्हे. ती एक शून्यावस्था आहे. प्रकाश हा स्वयंप्रभविष्णु आहे, ज्योतिष्मान् आहे. आणि असें आहे, म्हणून असें म्हणण्यास कांहीं हरकत नाहीं कीं, ज्याप्रमाणे प्रकाशाचे दिग्दर्शन करण्याकरिता कोणत्याही इतर साधनाची अपेक्षा नसते, त्याप्रमाणेच वेद हे अखिल ब्रह्मांडातील दृश्य व अदृश्य मनोनुभवी वस्तू प्रकाशित करणारे आहेत, म्हणून वेदाचे दिग्दर्शन वेदच करूं शकतात. सर्व *पंचभौतिक वस्तुजाताच्या अंती एक अज्ञेय, अप्रमेय, अमूर्त, चिद्विलासमय वस्तू म्हणजे ब्रह्म आहे*, तेंच वेदाचे मूळ होय, याकरिताच वेदांना स्वयंप्रकाशादि सर्व उपपदे लागू होतात. वेदाच्या नित्यत्वाबद्दल आणखी ऊहापोह करण्याचें हा निबंध हें स्थळ नव्हे.

२. योगशास्त्रदृष्ट्या वेदांचें अपौरुषेयत्व

(अ) या विषयाचा विचार करावयाचा तर त्याचे तीन भाग पडतात (१) वेद व त्याची उत्पत्ति किंवा उपपत्ति. (२) वेद प्रगट करणारे वेदद्रष्टे ऋषि व वेदश्रोते ऋषि. (३) वेद श्रवण व वेद दर्शन होण्याचे साधन.

वेद व त्याची उत्पत्ति किंवा उपपत्ति — वेद व वेदज्ञानाची अभिव्यक्ति करणाऱ्या मात्रा व पादरूप अक्षरसमूह, अर्थात प्रत्येक वस्तूचे मूलभूतशब्द व शब्दसमूह, ज्यांचीं रूपे व नाद आकाशतत्त्वात अनगुंठित असतात ते वेद होत. म्हणजे *आकाशतत्वाच्या लहरींतील संघर्षणानें प्रगट झालेली नाद व रूपें हेच वेद होत.*

ऋचो अक्षरे परमे व्योमन् ।
तस्मिन् इंद्रो वरुणो मित्रो अर्यमा ओकांसि चक्रिरे ।

'न क्षरति इति अक्षरः' क्षरणरहित व अनश्वर म्हणजे नित्य अशीं वेदाक्षरे 'परमे परमव्योम्नि' म्हणजे महदकाशरूपी परमक्षांत असतात व तेथें अग्नि, वरुण इन्द्रादि देवताचीं स्थानें आहेत. म्हणजे परमाकाशातील अणुअणूत तीं ऋगादि वेदाक्षरे निविष्ट झालेलीं आहेत. अशा त्या ब्रह्मरूप परमात्म्याचे ठिकाणीं सर्व देव रहातात. सूक्ष्मदर्शी ऋषींना ते देव व तीं वेदाक्षरें दृग्गोचर झालीं. तसेच वरील वर्णनाला उद्बोधक असे श्रीज्ञानेश्वरमहाराजांचे एक वाक्सुमन उद्धृत करण्यात येत आहे. तें असे—

घोषणाचिया कुंडि । नादचित्रांची रूपडि ।
प्रणवाचिया मोडि । रेखिली वेदीं ॥

आकाश संघटित आकाशफलकातील परमाणूच्या लहरीतील परमाणूच्या संघर्षानें उत्पन्न झालेल्या नादात वेदाक्षरें ऐकूं येतात, हाच अर्थ घोषणाचिया कुंडि, नादचित्राची रूपडि (चित्रे) ह्या ओवीत आहे. प्रणवाच्या अंगभूत असलेल्या उच्चाराची अर्थात् मात्राची रेखिव मांडणी केलेली असते, तीच वेदाक्षरें होत. वरील वेदाक्षराचा अनुभव योगातील 'शब्दानुविद्ध' व 'दृश्यानुविद्ध' या समाधींत येतो. समाधि अखंडेक— रसानें संवित् स्फुरण होणें हीच समाधि होय.

दृश्यानुविद्ध समाधि—वृत्तीतून इतर नामरूपें काढून टाकून अस्ति भाति प्रियतास्फूर्तीची महदाकाशातील प्रकाशाचे ठिकाणीं धारणा केली तर महदाकाशात जीं ऋगादि वेदाक्षरें अनुस्यूत आहेत, तीं दिसणे हाच 'श्रुति' होत. ह्या समाधीस दृश्यानुविद्धसमाधि असें म्हणतात. अशीं वेदाक्षरें ज्या महर्षींना दिसलीं तेच *मन्त्रद्रष्टे ऋषि होत.*

शब्दानुविद्ध समाधि—श्रवणउपयोगी वाच्यार्थ म्हणजे वाच्याकाशाचा त्याग करून महदाकाशाचे ठिकाणीं धारणा करावी म्हणजे त्या योगानें अनुभूतींत येणारे वेदाक्षराचे नाद हाच श्रुति होत व ऋषींनीं ह्या श्रुति

ऐकल्या म्हणून त्यास 'वेदश्रोते ऋषि' असे म्हणतात. त्यांनीं ऐकलेल्या वेदाक्षरास मूर्तस्वरूप देऊन तीं पठणांत लेखनांत आणलीं म्हणून ते ऋषि वेदद्रष्टे व वेदश्रोते ऋषि या अतिमानुष पदवीस प्राप्त झाले. अशा प्रकारची समाधि प्राप्त होण्यास त्यावर जन्मापासूनचे सर्व संस्कार झालेले होते व तीव्र तपश्चर्येने त्यांना दूर श्रवण व दूरदर्शनादि सिद्धि प्राप्त झालेल्या होत्या. अशा समाधि साधनांनि मूळ अस्तित्वात असलेले वेद, ऋषींना ऐकले व पाहिले म्हणून ते ऋषि वेदकर्ते होऊ शकत नाहीत. अर्थात वेद पुरुषयत्नाना निर्माण झालेले नाहीत. ते स्वयंभूच आहेत हे सिद्ध होतें.

३. वेदोत्पत्ति परिचय

अशा वेदाचे चार विभाग झालेले आहेत. वेद हे एकच, परंतु यज्ञादि कर्मांच्या पूर्तीकरिताच ते चतुर्भागात्मक झालेले आहेत, असे स्पष्ट होतें.

"ऋचां त्वः पोषमास्ते पुपुष्वान् गायत्रं त्वा गायति शक्वरीषु।
ब्रह्मा त्वो वदति जातविद्यां यज्ञस्य मात्रां वि मिमीत उ त्वः ॥"

ऋ संहिता १०७१–११

ह्या ऋग्वेदातील अवतरणात यज्ञाकरिता चार ऋत्विजाची चार दिशेकडे जरुरी आहे, असें म्हटलं आहे. ऐतरेय ब्राह्मणात असे म्हटल आहे की "त्रयो वेदा अजायन्त, ऋग्वेद एवाग्नेरजायत यजुर्वेदो वायो सामवेदो आदित्यात्, इति" सत्यापाढ सूक्तात असे म्हटल आहे कीं, "ननु यज्ञ व्याख्यास्याम स त्रिभिर्वेदैर्विधीयते। ऋचः सामानि जज्ञिरे यजुस्तस्मा-दजायत" (ऋ.स) परंतु उपरिनिर्दिष्ट 'ऋचां त्वः पोषमास्ते' या ऋग्वेदातील वचनानें ऐतरेय ब्राह्मणामध्ये अशी शंका घेतली आहे की, 'अथ केन ब्रह्मत्व क्रियते?' या शंकेचें निराकरण असे केले आहे का, यदेतत्त्रय्यै विद्यायै शुक्रं तेन ब्रह्मत्वं क्रियते" यावर श्री सायनाचार्य आपल्या अथर्वणे वेदभाष्यात लिहितात कीं—

याद्दग्वर्णं तथा वर्णान्यसंहृतिधराणि च ।
पश्चिमं यद्विभोर्वक्त्रं ब्रह्मणः परमेष्ठिनः ।
आविर्भूतानि सामानि तत्तच्छंदांसि नान्यथा ।
आथर्वणमशेषं च भृङ्गांजनचयप्रभम् ॥" (मार्कंडेय पुराण)

ब्रह्मदेवाच्या पूर्वमुखापासून जपाकुसुमाच्या म्हणजे जास्वंदीच्या फुलाच्या रंगाप्रमाणे वर्ण असलेले ऋग्वेद निघाले. दक्षिण मुखापासून धूलिधूसर रंगाचे यजुर्वेद निघाले. पश्चिम मुखापासून शुभ्रवर्ण सामवेद निघाले. उत्तर मुखापासून नीलवर्णाचे अथर्वण वेद निघाले. ब्रह्मदेवाच्या मुखापासून निघाले म्हणजे अमूर्त रूपातून मूर्तरूपात आले. त्याचा अर्थ असा की, श्री ब्रह्मदेवाच्या श्वासातून ध्वनिरूपाने वेदाचा उच्चार झाला. ध्वनिरूपानेच ते अतराळात राहिले. अशा प्रकाराने ध्वनिरूपात असलेले वेद योगारूढ ऋषिवर्यांनी आपल्या दिव्य अशा योगज-दृष्टीने पाहिले व आपल्या दिव्य श्रुतिशक्तीने त्या वेदमत्राचे श्रवण केले आणि श्रवण करून त्यानी ते म्हटले म्हणून वेदाना 'श्रुति' असें म्हणतात व ज्या ज्या ऋषींनी ते वेदमत्र पाहिले, श्रवण केले व पठण केले, त्या त्या ऋषीस 'वेदमत्रद्रष्टे' ऋषी असे सबोधण्यात आले व ते ते ऋषी त्या मत्राचे 'ऋषी' झाले अशा मत्राच्या दर्शनाचे वेळीं वेदद्रष्ट्या ऋषीस त्या मत्राच्या देवताही योगज दृष्टीने दिसल्या. त्या त्या देवता त्या त्या 'मत्राच्या देवता' होत असे त्या मंत्रद्रष्ट्या ऋषींनी आपल्या शिष्यास सागून ठेवले.

वर लिहिल्याप्रमाणे ब्रह्मदेवानी उच्चारलेल्या वेदमत्रापासून सृष्टि उत्पन्न झाली. ब्रह्मदेवानी वेदमत्राचा उच्चार करण्यापूर्वी वेदमत्र होतेच व सृष्टीही होतीच. परतु ते वेदमत्र व सृष्टि हे द्वद्व महाप्रलय झाल्यामुळें अमूर्त स्वरूपातच होतें. म्हणजे महाप्रलयाचे वेळीं ही सृष्टि वेदमत्रात लीन झाली व वेद हे ब्रह्मरूपात अतर्धान पावले इतकेच, वेद ब्रह्मरूप असल्यानें ते लय पावत नाहीत. तर ब्रह्मरूपच होऊन जातात. कारण ब्रह्म ही वस्तु अविनाशी व एकमेवाद्वितीय आहे

४. वेदमंत्र व आगमोक्तमंत्र समन्वय

सर्व वेद मंत्रमयच आहेत व वेदाचे पठनपाठन हेच तत्कालीन ब्राह्मणाचें मुख्य कर्तव्य होतें. यज्ञक्रिया चालू असताना नाना प्रकारचे प्रत्यूह उत्पन्न होत असत. अनिष्टफलनिवारण व इष्टफलप्राप्ति या दोन्हाची नित्यनैमित्तिक कर्मांत इष्टापत्ति असल्यानें मंत्रशास्त्र अशा स्वतंत्र ग्रंथाची प्रारंभीं आवश्यकता वाटली नसावी. म्हणून लेखकानें निबंधाच्या शीर्षकांत "मंत्रशास्त्र व मंत्रशक्तियोग" असा या लेखाचा नामनिर्देश केला आहे. मंत्रशास्त्राची केवळ शास्त्रीय रीतीनें मांडणी केली असती, तर त्या उपक्रमाचा विशेष उपयोग झाला नसता. म्हणून मंत्रशास्त्राचा विषय आचारात कसा आणावा हे समजण्याकरिता योगशास्त्रातील मंत्रयोग व तंत्र आणि आगम ग्रंथातील मंत्र, यंत्र व इतर प्रतीकें यांची साधना कशी करावी या सर्वांचा समन्वय केला आहे. मंत्रशास्त्रांतर्गत मंत्रविद्या आजच्या आचारविहीन काळांतही कशी अनुभविता येईल हे दाखविण्याकरता हा प्रयत्न केला आहे. असो. आता प्रथमतः वेदमंत्राबद्दल विचार करू.

५. वेदमंत्रद्रष्टे ऋषि व वेदशाखा

प्रत्येक युगचतुष्टयाच्या शेवटीं वेदअभ्यासकाचे बुद्धीस मालिन्य प्राप्त होऊन वेदपठन बंद पडत व वेदज्ञानही नष्ट होतें. अशा वेळीं व्यासरूपानें श्रीभगवान् महाविष्णु प्रगट होतात, व वेदांचा उद्धार करण्याकरिता आपल्या शिष्यांना वेद शिकवून त्यांचेकडून वेदमंत्राचा प्रचार करवितात. याप्रमाणे सत्ताविसाव्या युगपरिवर्तनाचे शेवटीं श्रीव्यासांना आपल्या "पैल" नामक शिष्यास ऋग्वेद शिकविला. पैल ऋषींनी त्याच्या पाच शाखा सांगितल्या. त्या पाच शाखा खालीलप्रमाणे आहेत—आश्वलायन, सांख्यायन, शाकल, बाष्कल व मांडूक्य. वैशंपायन नामक शिष्यास यजुर्वेद

सांगितला.[१] त्याच्या शाखा तेरा आहेत. त्या अशा—चरक, आल्हारक, कट, प्राच्यकट, कपिष्ठल, चारायणीय, वारायणीय, वार्तांतवीर्य, श्वेताश्वतर, औपमन्यव. पाताडनीय, मैत्रायणीय, वतैत्तिरीय. हा कृष्ण यजुर्वेद होय. याज्ञवल्क्य ऋषींना श्रीसूर्य देवतेने अश्वरूपाने शुक्लयजुर्वेद सांगितला. त्याच्या शाखा सोळा आहेत. त्या अशा :—काण्वाः, माध्यंदिनाः, जाबालाः, बौधेयाः, शाणाकटाः, शावीय नागराः, श्रापणीयाः, कापोलाः, पाड्वत्साः, आवटिकाः, परमावटिकाः, पाराशर्याः, वैधेयाः, वैनेयाः, गालवाः, वाजपेयाः, व कात्यायनीयाः, जैमिनी नामक शिष्यास सामवेद सांगितला, त्याच्या शाखा नऊ झाल्या.

त्या अशा—जेमिनीया, गौतमा, कौथुमाः, लांगलाः, महाखल्वलाः, खल्वलाः, मुद्गलाः, शाट्यायनीयाः, तसेच सुमंत नामक शिष्यास आथर्वण वेद सांगितला. त्याच्या शाखा नऊ आहेत. पैप्पलाः, दान्ताः, प्रदान्ताः, स्तोतागः, औतराः, वल्मदाः, शौनकीयाः, देवदर्शाः, चरणविद्याः कुन्जकाः (गयावळाः), आजामिलाः (गंगापुत्रा), रोमवसु, श्रावका, (मरुदेशे). या शाखांच्या उपशाखा आणखी आहेत. कृष्ण यजुर्वेदाच्या मैत्रायणीय शाखेच्या सात उपशाखा आहेत. मानवाः, दुंदुभा इत्यादि व तैत्तिरीय शाखेच्या उपशाखा औख्य व कांडिकेय अशा आहेत, व कांडिकेय उपशाखेच्या आणखी पाच प्रति उपशाखा आहेत. त्या अशा :—आपस्तंभाः, बौधायनाः, सत्याषाढिनाः, हिरण्यकेशीयाः, औधेयाः, कृष्णयजुर्वेदातील कठ शाखेच्या तेरा उपशाखा आहेत व शुक्ल यजुर्वेदाच्या जाबाल शाखेच्या चोवीस उपशाखा आहेत व बौधेय शाणाकट या उपशाखेच्या बावीस

---

१. मंत्रब्राह्मण संहिता । मिळोनि पदक्रम निश्चिता । मूळ प्रख्याता । यजुर्वेदा बोलिजे ॥ ७५ ॥ गुरुचरित्र अ. २६ आणिक असे एक खूण । संहिता मिळोनि ब्राह्मण । तोचि यजुर्वेद मूळ जाणा । वरकड शाखा [illegible] ॥ ७६ ॥ (गो. प्र. मा.)

उपशाखा आहेत या बावीस उपशाखात पाल्शा (महाराष्ट्रातील पळशे) ही उपशाखा येते. म्हणजे पाळ–शा हे शुक्लयजुर्वेदीय ब्राह्मण होत.[1]

वरील शाखाची माहिती "चरणव्यूह" या ग्रंथावरून व रा रा. दत्तात्रय लक्ष्मण जोशी यानी प्रसिद्ध केलेल्या पुस्तकावरून घेतली आहे. वरील शाखापैकीं पुष्कळ शाखा लुप्तप्राय झालेल्या आहेत.

पृष्ठ २४ वरील स्तंभात वर्णन केलेल्या शाखाचे ब्राह्मण त्या त्या ठिकाणीं उपलब्ध आहेत असे म्हणता येत नाहीं. खरोखर पाहिले तर वेदविद्येत निष्णात् असणाऱ्या ब्राह्मणाची सख्यागणना म्हणजे खानेसुमारी केली पाहिजे. म्हणजे प्रत्येक शाखेंतील वेदवेत्ते ब्राह्मण किती आहेत हे, व किती शाखा अस्तित्वात आहेत हे समजून येईल. वेदविद्येतील मन्त्रशक्ति जागृत ठेवणाराची परपरा नष्ट झाल्यानें मन्त्रपठणाकडे सार्वत्रिक ब्राह्मणवर्गाचें दुर्लक्ष होत आहे. मन्त्रशक्ति ज्यानीं आजच्या कालातही जागृत ठेविली अशीं काहा रत्ने वैदिक मटळींत आहेत. परतु अलीकडे आचारभ्रष्टता इतकी वाढली आहे कीं, केवळ गायत्री मन्त्र कामिक फलप्राप्तीकरिता कसा जपावा हे बऱ्याच लोकास माहित नाही. वैदिक धर्माची व वैदिक सस्कृतीची मोडत चाल्लेली घडी पुन्हा बसविणे हे जगत्कल्याणकारक किंबहुना राष्ट्रकल्याणसाधक कार्य करणे हाही महत्त्वाचा प्रश्न आर्य सस्कृतीच्या अभिमान्यापुढें असावयास पाहिजे

केडगाव क्षेत्राचे सस्थापक क. वा. श्री १०८ नारायण महाराज याना मागें जो मोठा यज्ञसमारभ केला त्या यज्ञसमारभास व्यक्तिशः सामील

---

१. श्रीगुरुचरित्र २६ व्या अध्यायात चारही वेदाच्या शाखोपशाखा सविस्तर दिलेल्या असून त्याबद्दल जास्त सशोधन व्हावयास हवे. लेखकानें वर उल्लेखिलेल्या, त्याचप्रमाणें पडित सातवळेकर ह्याच्या लिखाणांतून वर्णिलेल्या शाखापेक्षा जास्त व निराळ्या शाखा वरील २६ व्या अध्यायात आहेत. (गा. म. मा.)

वेदाच्या शाखा व वेदशाखाच्या ब्राह्मणाचीं वसतिस्थानें.

आता या शाखाचे ब्राह्मण आर्यावर्ताचे बाहेर कोठे कोठे होते याचे दिग्दर्शन करू

देशाचे नाव	ऋग्वेद	यजुर्वेद	सामवेद	अथर्वण वेद
सिंध वाहीक		काशिका		
कूर्म (कच्छ भूज)		मलना, कुशेद्रवा		
सिंहल (लंका)		पालिभद्रा, साभरकटा		औतरा
माध		दासलकहा, कुब्जका, वारूणा (गयानल) हिरण्यश्रृंगा		कुब्जका
गुर्जर देश		हरिद्रनीया, रोहिणा, आदोचा	महाखल्वला मुद्गला	
काशी	आश्वलायनाया	हिरण्यकेशीया, आपस्तंभा		अजामिला
नारायण सरोवर			महाखल्वला	
विदेह देश		मैथिला		देवनर्णा, शौनकेया
ताम्रपर्णी				
यवनदेश (बलुचिस्थान)		कटा, प्राच्यकटा, चारायणीया हसलेकटा		
मथुरा		चाभगा (चोम)		
गांधार		सानरा, मुद्गलकटा, उर्ध्वगजा, मुद्गला	लागला	स्तोभगा

देशाचे नाव	ऋग्वेद	यजुर्वेद	सामवेद	अथर्वण वेद
आंध्र देश	बाष्कला:	आंख्या:	कौथुमा:	चरणविधा:
नेपाळ		येताला:, शौनका:	जैमिना:	स्तोतारा:
त्रिपुरा (अफगाणिस्थान)				
महाराष्ट्र, कर्नाटक	आश्वलायनीया:, शाकला	बौधेया:, त्रिगुला:, देवरूखा:. मानवा:, शामायनीया:, कायस्ता: पालाशा: (पलशे), मैत्रायणीया: तैत्तिरीया:, बौधेया:, राणावटा:. काण्वा:, माध्यंदिना:	राणायणीया:	
मरुदेश (मारवाड)		शाटयायनीया:, पुष्करणीया:, भैरवा:, पाराशर्या:, वाराहा:, शैवजा:, जयत्रवारा:		श्रावका:
हिमवत देश (हिमालयाचा आसमंतात भाग)	माडूक्या:	कुथुथवा:, धूम्राक्षा:, टोंभिला:		
सरयू-सरस्वती		काण्वा:, माध्यंदिना:		
गोमती तीर		सारस्वत:		दाना:
मालव देश (माळवा)		श्रीमाळी, कपोला:, पौंड्रवत्सा:		
वंग देश (बंगाल)	माडूक्या.	कोसलरुटा:, कुब्जका:, चौंभगा:, (चोभे) वारुणा: (गयावळा:).		
आसुरी (एशिया मायनर)			मगब्राह्मणा:	

होण्याचा सौभाग्य-योग मंत्रशास्त्रखद्योत कै. वा. श्री. १०८ रामशास्त्री गोडबोले-वास्तव्य मुंबई-याच्या कृपेनें लेखकास प्राप्त झाला होता. त्यावेळीं ऋग्वेदादि प्रत्येक वेदात पारगत असलेल्या ब्राह्मणास पाचारण करण्यात आले होतें. त्यावेळी मंत्रशास्त्राचा मूळ वेद जो आर्थवण वेद आहे, त्यात पारगत असलेले व मणि, मंत्र व औषधी यांचा अनुभव असलेले एक दोनच वेदवेत्ते ब्राह्मण पाहण्यात आळे. आथर्वणवेद पोथी-धरून म्हणणारे सुद्धा जमेस धरले तर एकंदर सर्व *भारतवर्षात आठच ब्राम्हण दिसून आले.* आथर्वणवेदी ब्राह्मणाकडे यज्ञामध्यें ब्रह्मयाचें कार्य असते व त्याने होता, उद्गाता, अध्वर्यु, यजमान व यजमानपत्नी यांचें संरक्षण करावयाचे व यज्ञकार्यांत उत्पन्न होणाऱ्या इतर प्रत्यूहाचें निरसन करण्याचे कार्यही करावयाचे हे कर्तव्य त्या अथर्ववेदीय ब्राह्मणाकडे असे. राजगुरु *आथर्वण वेदवेत्ता असावा* लागतो व त्या राजगुरूनें राजानें करावयाचीं हव्य कव्य कर्मे, व त्याला नेहमीं उत्पन्न होणाऱ्या संकटांतून त्यास निभावून नेण्याचेही कार्य करावयाचे असे. या वेदाची परंपरा नष्ट झाल्यामुळे वेदाबद्दल आज सर्वथैव अनास्था दिसत आहे, व वेद ही एक जुनी भाषा आहे म्हणून वेदाचें संरक्षण करावयाचें इतकीच वेदग्रंथाची महती आज राहिली आहे. *आथर्वण* वेदात जसे इष्ट फलदायी व अनिष्टफलपरिहारक मंत्र आहेत तसे ऋग्वेद व सामवेद या वेदातही आहेत. वेद मंत्रातील व्यवहारोपयोगी मंत्र कोणते व त्याचा अनुभव कोणास आहे कीं काय, अशाबद्दल लेखकानें पुष्कळ शोध केला, परंतु त्याची त्या बाबतींत काही अंशी निराशाच झाली आहे. एकंदरीत अशा प्रकारच्या वेदाभ्यासास चालना मिळाली तर "वेदाभ्यास जड" अशी जी आधुनिक वैदिक वर्गास निंदास्पद व्याजोक्ति म्हणजे उपरोधिक पदवी मिळाली आहे ती निरर्थक ठरेल.

ब्रह्मांडपुराणात वेदसमाजबद्दल स्पष्टीकरण केलेलें आहे, तें असे आहे.—

६. वेदमंत्रांचे प्रकार

मंत्रा नवविधाः प्रोक्ता ऋग्यजुःसामलक्षणाः।
मूर्तिर्निंदा प्रशंसा च आक्रोशस्तोष एव च।
प्रश्नानुज्ञानमाख्यानं आशास्त्रिविधयोगतः।
प्रशंसा स्तुतिराक्रोशो निंदा च परिदेवना।
अभिशापो विशापश्च प्रश्नः प्रतिवचस्तथा।
आशीर्यज्ञस्तथाऽऽक्षेपाः अर्थाख्यानं च संकथा।
वियोगा ह्यभियोगाश्च कथा संख्या वरश्च वै।
प्रतिषेधोपदेशौ च नमस्कारः स्पृहा तथा।
विलापश्चेति मंत्राणां चतुर्विंशतिरुद्धृता।
मंत्राणां नवविधत्वं चतुर्विंशति भेदा इति।

ब्रह्माण्डपुराण अध्याय ३३–३४

मूर्ति, निंदा, प्रशंसा, आक्रोश, तोष, प्रश्न, अनुज्ञा, आख्यान व आशा असे मंत्रांचे नऊ विधि आहेत. तसेच प्रशंसा, स्तुति, आक्रोश, निंदा, परिदेवना, अभिशाप, विशाप, प्रश्न, प्रतिवचन, आशीः, यज्ञ, आक्षेप अर्थाख्यान, संकथा, वियोग, अभियोग, कथा, संख्या, वरप्रदान, प्रतिबंध, उपदेश, नमस्कार, स्पृहा, विलाप असेही मंत्राचे चोवीस भेद आहेत.

पाणिनाय श्रुतीनि विधार्थी, अभिधार्थी व विनियोगार्थी असे भाग पाडलेले आहेत.

तत्र च विधार्थी श्रुतिर्लिंगाद्यात्मिका
द्वितीया धात्वादिश्रुतिः
यस्याः श्रवणादेव शब्दस्य संबंधः
प्रतीयते सा विनियोगार्थी।

म्हणजे प्रत्यूहपरिहारक ऋचास 'नियोक्त्री ऋचा' असे म्हणतात. वेदकालीन समाजामध्ये ब्राह्मणवर्गीयाचा काळ यजन, याजन, अध्ययन, अध्यापन या कर्मांमध्ये जात असे. त्रैवर्णिकाचीं नित्य नैमित्तिक कर्में समंत्रक करणे हेही काम त्याचेकडे असे. त्रैवर्णिकाच्या अध्यापनाचें कार्य त्याचेकडे असल्याने आयुर्वेद धनुर्वेद, गंधर्ववेद, ज्योतिःशास्त्र, शाल्हिहोत्र इत्यादि विषयातही त्यास पारगत असावें लागे. यज्ञीय कर्में आचरीत असताना ज्या अडचणी उत्पन्न होत असत त्याच्या निरसनाचें ज्ञान अगस्त्य क्षत्रियांना धनुर्वेदशिक्षा देत असताना नानाप्रकारचे व्यवहारोपयोगी मंत्र अगर अस्त्रमंत्र व त्याचा विनियोग कसा करावा हे ज्ञान तत्कालीन ऋषि-वर्यांनी नमूद करून ठेवलेले असे, व हे ज्ञान गुरुशिष्य परंपरेत टिकून रहात असे. याचप्रमाणे पाठ्यमंत्राचे गर्भितार्थ, उत्तानार्थ व विनियोग (वेदमंत्र मुखोद्‌गत असल्याने) तत्कालीन ब्राह्मणवर्गीयास सुतराम करतला-मलकवत् भासत असत.

७. वेदमंत्रांचे अनुभव न येण्याची कारणें

कालांतराने ब्राह्मणवर्गीयाची तीव्र बुद्धि आणि ग्राहकशक्ति व पाठशक्ति या क्षीण झाल्या त्रैवर्णिकाची नित्यनैमित्तिक कर्में घडवून आणण्याकरिता म्हणजे व्रतबंध, विवाह इत्यादि संस्कारात लागणारे मंत्र, संहिता व उपनिषदे इत्यादि विषय पाठ करण्यातच त्याचा काल निघून जाऊ लागला वेदमंत्राचा अर्थ व त्याचा विनियोग करताना व्याकरणशास्त्र न समजल्यामुळे त्याच्या कर्मात व्याकरणशास्त्रदृष्ट्या *विभक्तिप्रत्ययात* चुका होऊ लागल्या ब्राह्मणवर्गांत भिक्षुक व गृहस्थ असे भेद पडले व वैदिक व शास्त्री असेही भेद पडले अशा वेळीं श्री सायणाचार्यांनी चारी वेदांवर भाष्य लिहिले व त्यात वेदमंत्राचे विनियोगही लिहिले. कालांतरानें त्याच्या प्रयत्नाचा उपयोग करून घेण्याचे कार्यही बंद पडले हे खरें.

८. वेद मंत्रांचे विनियोग

प्रथम गृह्यसूक्तात मंत्राचे विनियोग सापडतात. पुढें अग्निपुराण वायुपुराण व ब्रह्मांडपुराण या ग्रंथातही वेदमंत्राचे विनियोग आढळून येतात. याच वेळीं श्रीमहर्षि शौनक ऋषीनें ऋग्वेदातील मंत्राचा विनियोग लिहून ठेवलेला आहे. त्याचे नाव 'ऋग्विधान' असे आहे लेखकाला अशीं ऋग्विधानें दोन उपलब्ध झालीं. एक विधान श्रीरंगम् येथें 'वाणी विलास' छापखान्यात छापलेले व दुसरे ऋग्विधान पुणे येथील ग्रंथ-प्रकाशक रा. गोडबोले यानी छापलेल्या ऋग्वेदाच्या संहितेत असलेलें. श्रीरंगम् येथील ऋग्विधान वे. शा स. वेंकटरमण शास्त्री व वे शा स रामभट दीक्षित या विद्वानद्वयाना प्रसिद्ध केलेलें आहे श्रीरंगम् येथें छापलेल्या व पुणे येथे छापलेल्या ऋक्संहितेच्या पोथींत छापलेलें अशा दोन्ही ऋग्विधानाचा साकल्याने विचार केल्यास त्यातून खालीं लिहिलेल्या विषयाचा निर्देश केलेला आहे

स्वर्णस्तेय, व्यसनवादन, सुरूपस्त्रीचें भार्यार्थसंपादन, क्षय, अपस्मार, महारोग, शत्रुपीडा वगैरेचें निवारण, वाक्सिद्धि, ऋणनाश, प्राणाकर्षणा-विद्या, परकायाप्रवेश व परकायानिर्गमविद्या, अग्निविद्या, वातरोगपरिहार, महाविषपरिहार, आणिमादि अष्टसिद्धिप्राप्ति, कारागृहवासनिवृत्ति, भूत, प्रेत पिशाचादिकाच्या पीडेचा नाश, भगेंद्रादिरोगपरिहार, वैश्वनरविद्या, कन्या विवाह वगैरे विषय आलेले आहेत अशा मंत्रापैकीं काहा थोड्या मंत्राचा निर्देश पुढील स्तंभात केलेला आहे व मूलमंत्र या ग्रंथाच्या उत्तरार्धांत दिलेले आहेत.

९. ऋग्वेदांतील मंत्र व विनियोग

अष्टक	वर्ग	ऋचा	ऋचा प्रारंभ	विनियोग-(ऋषि-देवता-छंद)
१	७	७	जातवेदसे सुनवाम'—वेद.	दुष्टश्वापद भीति नाश—छंद—त्रिष्टुप—ऋषि—मारीचपुत्र कश्यप—देवता—जातवेद अग्नि
२	५	१४	नकतो न कस्तोऽथो सता न कस्तो/—	सर्प विंच्वादिप्राणिज विषनाश अनुष्टुप् अगस्त्य—अप्तृणसूर्य.
८	४	१०	हविष्पांतमजरं स्वर्विदि दिविस्पृशा हुत-जुष्टमग्नौ	वैश्वानर विद्या—त्रिष्टुप्—परमेष्ठी प्रजापति—परमात्मा
७	४	१७-१८-१९	सहस्रशीर्षा पुरुषः सहस्राक्ष. सहस्रपात्	नारायणदर्शन
८	७	१७	नासदासीन्नोसदासीत्तदानीं नासीत् रजो नो व्योमा परो यत् (नासदीयसूक्त)	योगसिद्धि
८	८	१९	मुचामि त्वा हविषा (ब्रह्मणस्पतिसूक्त)	क्षयरोगनाश, पुत्रप्राप्ति, —कन्याविवाह कोर्टीय कामे—पांच अनुष्टुभ—इतर त्रिष्टुप्—इद्र. अनुष्ठानीं ब्राह्मणद्वारा गणपतीस २१ वेळ अभिषेक.

२	२	१	सुषुमादिसूक्ते पाच ऋचा =	मार्गशीर्ष महिन्यात १० हजार जप-परकायाप्रवेश
७	७	१	न निर्तंध्य सूक्त (आठ ऋचा)	परकायेतून परत आल्यावर ३० हजार जप-विष्णु मंदिरात = भृगुच्यवन-गोगायत्री सूक्त;
७	७	२	अग्निमीळे भुजा मृगत (१० ऋचा)	प्राणाकर्षण विद्या-रोज शंभर वेळा म्हणणे.
५	४	३०	ॐ त्र्यंबकं यजामहे	अपमृत्युहरण-३० हजार प्रणव संपुटित वसिष्ठ
८	८	११	इत्रपती सूक्त (५ सूक्ताचे)	कुष्ठनाश-माघ महिन्यात बेलवृक्षाखाली रोज शंभर जप = शासननाम-रुद्र-अनुष्टुप्
३	७	१४	हंस शुचिषद् अनियिर्दुरोण सत् (पाच ऋचा)	(i) कुष्ठनाश-विष्णु मंदिरात २० हजार जप व ३० हजार अर्घ्य देणे (ii) सर्व कार्यसिद्धी-रोज १०८ जप. वामदेव दक्षिणा-त्रिष्टुभ्
२	६	२९	गणानात्वा श्रवस्तमग्	विघ्ननाश-कार्यसिद्धी-रोज १०८ जप
४	४	१	ऋतस्य गोपा मत्यधर्मोणा ४ ऋचा,	मूत्ररोगनाश-यातील १ ऋचा अश्वत्थ-वृक्षाशी जप.

१	२	३	४	५
२	७	२३	वायो शुक्रो अयामि....दिविष्टुषु	वातरोगनाश–माघांत अश्वत्थवृक्षाखालीं रोज ३० हजार जप. सौभरिकाण्व—आग्नि—सतोबृहती.
१	७	७	जातवेदसे सुनवाम सोममराति	अणिमादिसिद्धिप्राप्ति–बिल्ववृक्षाखालीं एकलक्ष जप. मरीचपुत्र कश्यप–जातवेद–त्रिष्टुप्
५	६	१७	ध्रुवासु, त्वासु क्षितिषु क्षियन्तो ॥ (सात ऋचा ७ मंत्र)	कारागृहमुक्ति–२० हजार जप करावा वसिष्ठ–वरुण–अनुष्टुप्
७	८	२	यदादीध्ये न दविषाण्येभि....५ ऋचा ॥	अकालकृत कर्म निवृत्ति–रोज १० वेळ म्हणणे कवष–अक्षर–जगती
८	७	१४	रात्री सूक्त	भूतप्रेत-व्याघ्र-चोरादि भयनाश–रोज ३ दा व रात्री एकदां म्हणणें–कुशिक–रात्रीं–गायत्री
४	७	११	नृगृणानो–गृणते–नृत्रचसे रिरीहि ॥	भगंदरनाश–विष्णुमंदिरांत पाण्यात उभे राहून ३० हजार जप.
३	८	१९	वधेन दस्यु....वाजे अस्मान् ॥	व्याधिनाश व भूमिप्राप्ति–रोज १० वेळ जप.

वर लिहिलेले ते मंत्राचे *आदि शब्द आहेत*. परंतु अशा मंत्राचा अनुभव घेतलेले असे सत्पुरुष सापडण्याची हल्लींच्या काळांत मोठीच उणीव आहे. लेखकानें या बाबतींत बरेच परिश्रम केले. ठिकठिकाणीं भिक्षा मागणाऱ्याप्रमाणे दारोदार फिरण्याचे व कटुशब्द ऐकण्याचे प्रसंग सोसले. काहीं सज्जनांना असें म्हटलें कीं, "संध्येचें नांवसुद्धां न घेणारे असे तुम्ही ही उठाठेव कां करितां? इराण्याच्या हॉटेलांत जा, महार-मांगाच्या समूहांत सहभोजन करा, आमचेकडे कां येतां? लघुशंकेला पाणी न घेणारे तुम्ही भ्रष्ट लोक तुमचे मुखावलोकनही नको." हे शब्द खरे आहेत. परंतु त्या मंत्रज्ञ सज्जनांना लेखकाबद्दल जेव्हां लेखकाच्या समागमांतील मंडळींनी लेखकाच्या वर्तनाची खात्री दिली, तेव्हां कोठें मंत्राबद्दल बोलण्याची त्यांची प्रवृत्ति दिसली.

मंत्रशक्तीचा प्रभाव वर्णन करीत असतां लेखकाला आधुनिक सुधारणानीं मूर्तिमंत भ्रष्ट झालेल्याशीं बोलण्याचेही प्रसंग आले. तेव्हां ते म्हणत कीं, "अहो मंत्र आहेत म्हणतां तर आम्हाला अनुभव सांगू नका, अनुभव घेतलेलीं माणसें दाखवा" अशा पृच्छकांचीं कुतूहलें पुरविणे हें काम सोपें नव्हे. लेखक स्वतः मंत्रशास्त्रज्ञ नाहीं, म्हणून त्याला अशीं कुतूहलें पुरविण्यास दुसऱ्याकडे पहावें लागतें. अशा मंत्रशक्तिसंपन्न मनुष्याकडे गेल्यास त्यांना म्हणावें, आम्हीं कांहीं तमाशा मांडला नाहीं, किंवा जादूचा खेळ आमचेकडे नाहीं. आमचे सहवासांत रहा, प्रसंग येईल तेव्हां अनुभव दिसेल. परंतु असे अनुभवी मंत्र जर नमूद करितां न आले तर हा लेख लिहिण्याचा उपक्रम केवळ पिष्टपेषणवत्, किंवा केशनिकृंतनवत् होईल, म्हणून कांहीं मंत्र व मांत्रिक मिळाले तर त्यांचा यथायोग्य काळीं उपक्रम करण्याचा विचार ठरवून प्रस्तुत ऋग्वेद मंत्रांतील अनुभवित मंत्राचीं उदाहरणे दिलीं आहेत तीं अशीं—

१	२	३	४	५
३	७	२३	यो शुक्रो अयामि....द्विगिष्टुप्	**वातरोगनाश**–माघांत अश्वत्थवृक्षाखालीं रोज २० हजार जप. सौभरिकाण्व—आग्नि—सतोबृहती.
१	७	७	जातवेदसे सुनवाम सोममराति	**अणिमादिसिद्धिप्राप्ति**–बिल्ववृक्षाखालीं एकलक्ष जप. मरीचपुत्र कश्यप–जातवेद–त्रिष्टुप्
५	६	१७	प्रुगासु, त्वासु क्षितिषु क्षियन्तो ॥ (सात ऋचा ७ मंत्र)	**कारागृहमुक्ति**–२० हजार जप करावा वसिष्ट–वरुण–अनुष्टुप्
७	८	३	पदार्दाध्ये न नृमिपाण्येभि....५ ऋचा ॥	**अकालकृत कर्म निवृत्ति**–रोज १० वेळ म्हणणे कश्यप–अक्षर–जगती
८	७	१४	रात्री सूक्त	**भूतप्रेत-व्याघ्र-चोरादि भयनाश**–रोज ३ दा व रात्री एकदां म्हणणें–कुशिक–रात्री–गायत्री
४	७	११	नृगृणानो–गृणते–नृनृचसे रिरीहि ॥	**भगेंद्रनाश**–विष्णुमंदिरात पाण्यांत उभें राहून २० हजार जप.
२	८	१९	वधेन दस्यु....वाजे अस्मान् ॥	**व्याधिनाश व भूमिप्राप्ति**–रोज १० वेळ जप.

वर लिहिलेले ते मंत्राचे *आदि शब्द आहेत*. परंतु अशा मंत्राचा अनुभव घेतलेले असे सत्पुरुष सापडण्याची हल्लींच्या काळात मोठीच उणीव आहे. लेखकाने या बाबतींत बरेच परिश्रम केले. ठिकठिकाणीं भिक्षा मागणाऱ्याप्रमाणे दारोदार फिरण्याचे व कटुशब्द ऐकण्याचे प्रसंग सोसले. कांहीं सज्जनांनी असे म्हटले कीं, "संध्येचें नांवसुद्धां न घेणारे असे तुम्ही ही उठाठेव कां करितां? इराण्याच्या हॉटेलांत जा, महार-मांगांच्या समूहांत सहभोजन करा, आमचेकडे कां येतां? लघुशंकेला पाणी न घेणारे तुम्ही भ्रष्ट लोक तुमचे मुखावलोकनही नको" हे शब्द खरे आहेत. परंतु त्या मंत्रज्ञ सज्जनांनी लेखका बद्दल जेव्हां लेखकाच्या समागमांतील मंडळींनी लेखकाच्या वर्तनाची खात्री दिली, तेव्हां कोठें मंत्राबद्दल बोलण्याची त्यांची प्रवृत्ति दिसली.

मंत्रशक्तीचा प्रभाव वर्णन करीत असतां लेखकाला आधुनिक सुधारणांनीं मूर्तिमंत भ्रष्ट झालेल्याशीं बोलण्याचेही प्रसंग आले. तेव्हां ते म्हणत कीं, "अहो मंत्र आहेत म्हणतां तर आम्हाला अनुभव सांगू नका, अनुभव घेतलेलीं माणसें दाखवा." अशा पृच्छकांचीं कुतूहलें पुरविणें हें काम सोपें नव्हे. लेखक स्वतः मंत्रशास्त्रज्ञ नाहीं, म्हणून त्याला अशीं कुतूहलें पुरविण्यास दुसऱ्याकडे पहावें लागतें. अशा मंत्रशक्तिसंपन्न मनुष्याकडे गेल्यास त्यांनीं म्हणावें, आम्हीं कांहीं तमाशा मांडला नाहीं, किंवा जादूचा खेळ आमचेकडे नाहीं. आमचे सहवासांत रहा, प्रसंग येईल तेव्हां अनुभव दिसेल. परंतु असे अनुभवी मंत्र जर नमूद करितां न आले तर हा लेख लिहिण्याचा उपक्रम केवळ पिष्टपेषणवत्, किंवा केशनिकृन्तनवत् होईल, म्हणून कांहीं मंत्र व मांत्रिक मिळाले तर त्याचा यथायोग्य काळीं उपक्रम करण्याचा विचार ठरवून प्रस्तुत ऋग्वेद मंत्रांतील अनुभवित मंत्राचीं उदाहरणें दिलीं आहेत तीं अशीं—

१०. ऋग्वेदीय कांहीं मंत्र व कांहीं अनुभवी सज्जन

'कृणुष्वपाज'—या मंत्राच्या पाच ऋचा—या मंत्राला 'दहरासो' ह्या शेवटल्या अर्धेलीचें संपुटीकरण केलें पाहिजे.—'रक्षोघ्नदेवता त्रिष्टुप छंद' १० हजार जप—त्यापूर्वीं ३० हजार गायत्रीमंत्र जप करावा. या योगानें ब्रह्मराक्षसादि भूतबाधा नष्ट होते.

अनुभवी गृहस्थ वे. मू. प्रल्हादगुरु, इंदूर. [पारनेरकर महाराज]

कुषुंभकस्तदब्रवीत् गिरेः प्रवर्तमानकः
वृश्चिकस्यारसं विषमरसं वृश्चिक ते विषम्।

प्रथम मंडळ $\frac{१९१}{१६}$ शान्तिपाठांत हा मंत्र आहे.

ह्या मंत्राचा १० हजार जप केल्यावर वृश्चिकदष्ट मनुष्याच्या दंशाच्या ठिकाणीं भस्म मंत्रून लावावें.

मुंचामि त्वा हविषा—या मंत्राचा विनियोग क्षय, अपस्मार, यांच्या रोगशमनार्थ होतो. (ऋग्वेद ८-८-१९)

कै. वा. त्र्यंबकशास्त्री वैद्य, लोधी मोहल्ला, इंदूर.

सोमो अप्सु मे अंतर्विश्वानि भेषजा
आपो याचामि भेषजम्
आपः पृणीत भेषजं वरूथं तन्वे ३ मम् ज्योक् च सूर्यं दृशे
पयस्वानग्न आगहि तं मा संसृज वर्चसा।

व्याहृतींनी पूरकप्राण म्हणजे प्राणायाम करावा. विशिष्ट स्थळीं कुंभकांत विशिष्ट दुःखादि वेदना काढण्यास प्राण सांठविणें व गायत्री शिरानें तें दुःख, तो विकार, त्या वेदना उच्छ्वासाबरोबर रेचकानें बाहेर पाठविणें. या क्रिया केल्या असतां तो विकार, दुःख अगर वेदना नाहींशा होतात" (हें सर्व मनोमय वाणीनें उच्चारीत व ध्यानानें क्रिया करीत मनोचार,

१. असेच कांहीं मंत्र पुढें उत्तरार्धांत दिले आहेत.

झाला पाहिजे.) सुजलेल्या भागावर वरील मंत्राने २१ वेळा मार्जन दररोज केलें तर तीन दिवसात गुण येतो. अपस्माररोग बरा होतो.

क्षयरोग :— वे. शा. स. करदीकर गुरु तासगाव, सातारा.

पर्जन्य पडण्याचा वैदिक मंत्र

ध्रुवासु त्वासु क्षितिपु क्षियन्तो व्यस्मत् पाशं वरुणो मुमोचत् ।
अवो वन्वाना अदितेरुपस्थाद् यूयं पातः स्वस्तिभिः सदा नः ।
ऋ. ५।६।१०

नाभिमात्र जळात उभे राहून दहा हजार जप करावा. घृत, दुग्ध व वेताच्या समिधांनी १ हजार हवन करावें.

पर्जन्य पडण्याकरितां पौराणिक श्लोक :

मुंच मुंच सलिलं दयानिधे नाथ नास्ति समयो विलंबितः ।
चातकस्य मृतके कुटुंबके वारि वारि जल किं करिष्यति ।।

या श्लोकाचा १ लक्ष सामुदायिक जप करावा.

वे. शा. स. दत्तात्रय भालचंद्र दीक्षित,
दुर्गाघाट, भटकचेरी, बनारस.

ऋग्वेदोक्त मन्युसूक्त चार ब्राम्हणांनी दरमहा प्रत्येकीं एक हजार जप करावा.

कोणतेंही कठीण कार्य साधण्यास

१० ब्राह्मणांनीं दररोज प्रत्येकीं १ हजार जप करावा. असे हे १० दिवसाचें अनुष्ठान आहे. जप १ लक्ष होईल. त्यानंतर घृताक्त तिलाचे १० हजार हवन. नंतर मार्जन–तर्पण १ हजार. ब्राह्मणभोजन २४ ब्राह्मणाचें.

वे. शा. स. रामदेव शास्त्री तुळापूरकर
दुर्गाघाट, काशी बनारस.

महानसंकट निवारणार्थ "प्रत्यंगिरा" मंत्राचा अनुभव घेतला आहे.

(लेखक)

११. यजुर्वेदांतील मंत्र व त्यांचा उपयोग

आता यजुर्वेदातील मंत्राचे विवेचन करू. यजुर्वेदाचे दोन भेद आहेत. एक कृष्ण यजुर्वेद व दुसरा शुक्ल यजुर्वेद. शुक्ल यजुर्वेदातील संहिता मंत्रात्मक आहे व कृष्ण यजुर्वेदात मंत्र व गाथा (गद्यात्मक) युक्त संहिता आहे. काही मंत्र दोन्हीं वेदात आहेत.

ब्राह्मण ग्रंथातही कृष्णयजुर्वेदातील मंत्र व संहिता असे भाग येतात. तसे शुक्ल यजुर्वेदातील ब्राह्मण ग्रंथात संहितेतील मंत्र येत नाहीत. काण्व व माध्यंदिन शाखेतील संहितेतील मंत्रोच्चारात फरक असतो. 'ष'च्या ऐवजीं 'ख'चा उच्चार होतो म्हणजे मंत्राक्षराच्या उच्चारात फरक दिसतो. एकंदरीत याज्ञवल्क्यांनी पुरस्कारिलेला तो शुक्ल यजुर्वेद व वैशंपायनांनी पुरस्कारिलेला तो कृष्ण यजुर्वेद होय. ऋग्वेदातील मंत्राचा विनियोग जसा श्री. शौनक ऋषींना सांगितला तसा यजुर्वेदातील मंत्राचा विनियोग श्री कात्यायन ऋषींनी यजुर्विधान या ग्रंथात नमूद केला आहे. तसेच राजा *काळनाथ* यांनी *'यजुर्मंजिरी'* या नावाची टीका लिहिली त्या ग्रंथातही यजुर्वेदीय मंत्राचा विनियोग सांगितला आहे. श्री *मदनमार्तंड* याचा *'कर्मविपाक'* नावाचा ग्रंथ आहे, त्यातही यजुर्वेदीय मंत्राचा विनियोग आहे. परंतु या कर्मविपाक ग्रंथात कुष्ठ, क्षय, अपस्मार व शीर्षरोग या रोगनिवारणाकरिता शान्ति दिलेल्या आहेत त्या शान्ति करणे म्हणजे हल्लींच्या काळात अशक्यप्रायच गोष्ट आहे.

श्री गायत्रीमंत्र हा सर्व मंत्राचा राजा आहे. हा मंत्र चारी वेदात वर्णन केलेला आहे.

यजुर्वेदातील मोठा महत्त्वाचा मंत्रसमुच्चयाचा भाग म्हणजे 'रुद्र' होय. महामांत्रिक श्री *भास्करराय* यांनी रुद्राच्या अनुवाकाचे विनियोग रुद्रभाष्य ग्रंथात दिलेले आहेत. रुद्रभाष्याचा मांत्रिक दृष्टीने हा स्वतंत्र ग्रंथच लिहिलेला असल्यानं, मंत्रशास्त्रदृष्ट्या रुद्रमंत्राचा विचार करणाऱ्याला

टळतो. धोत्र्याच्या एक लक्ष आज्ययुक्त फुलांनीं होम केल्यास त्र्यंबकेश्वराचें दर्शन होतें.

७. 'विष्णो रराटमसि विष्णो पृष्टमसि'—या मंत्राचा दहा हजार जप केला तर सर्व बाधा नाश पावतात.

८. 'अग्नो स्वाहा'—या मंत्राचा १ हजार जप करून तिल, यव व अपामार्ग यांनी होम व एक हजार जप केला व गोरोचनाचा तिलक केला तर सर्व वश्यता होते.

९. 'मधु वाता ऋतायते'—या मंत्रानें तिलाज्यांनी होम केला तर सर्व वश्यता प्राप्त होते.

१०. 'स्वस्ति न इंद्रो वृहस्पति'—या मंत्राच्या जपानें सर्व व्याधी नाहींशा होतात.

११. 'ॐ समिन ९ सङ्कल्पेयाथ ९ संप्रियो रोचिष्णो'—या मंत्राच्या जपानें मूळव्याध बरी होते.

१२. 'स्रुवेण देवस्य'—या मंत्राचा अपामार्ग तंडुलांनी होम केला तर दुसऱ्यानें केलेला अभिचार निष्फळ होतो.

१३. 'रुद्र पातु'—या ऋचेनें पळसाच्या समिधांनी होम केल्यास द्रव्य प्राप्त होतें

१४. 'अन्नपतेऽन्नस्य नो देहि'—या मंत्राने तिलाज्यानें सहस्र होम केला तर अन्न प्राप्त होतें

१५. 'हंसक शुचिषत् वसुरंतरिक्ष'—जलांत उभें राहून जप केल्यास सर्व पापांचा नाश होतो.

१६. 'नम स्वाहा'—याचा तीन लक्ष वेळा जप केल्यास बंधनांतून मुक्त होतो.

१७. 'इह गाव प्रजायध्वम्'—या मंत्राचा एक सहस्र जप केल्यास बुद्धिवर्द्धन होतें.

१८. 'मुञ्चन्तु मा शपथ्यात्' — या मंत्राच्या सहस्र जपाने अपमृत्यु नाहींसा होतो.

१९. 'काण्डात् काण्डात् प्ररोहन्ति' — या दहा हजार दूर्वाखण्डाचा होम केल्यास महामारी नष्ट होते

२०. 'मधुमान्नो वनस्पति' — औदुंबराच्या समिधांनी सहस्र होम केल्यास धन, सौभाग्य व व्यवहार यात जय मिळतो.

२१. 'अपागर्भ व्यधदात् पुरूत्रा' — या ऋचेनें यव व दुग्ध यांनी सहस्र आहुतींचा होम करावा, पाऊस पडतो.

२२. 'अप पिबेति' — दधि — मधु — यांनी सहस्र होम केल्यास महाव्याधि नष्ट होते.

२३. 'नमस्ते रुद्र मन्यव' — या ऋचेच्या एक लक्ष जपाने सर्व उपद्रवशान्ति होते

२४. 'अध्यवोचदधिवक्ता प्रथमो' — व्याधिपीडिताचें रक्षण होते. मोहऱ्या घेऊन एक हजार जप करून घरात फेकल्यास ब्रह्मराक्षसादि भूतें पळून जातात

२५ 'प्रमुञ्चधन्वनस्त्वमुभयोरा' — ह्या सहा मंत्रांनीं आयुध मंत्रण करावें, रिपूचा नाश होतो.

२६ 'समित स्मकल्प यथा सप्रियो रोचिष्णौ सुमनस्यमान्' — (अष्टक ४ यजुर्वेद) रक्ती मूळव्याध बरी होते ११ वेळ पाणी मंत्रून तें पिण्यास व शौचास घ्यावें, ३ दिवसात मूळव्याध बरी होते

२७ 'केतु कृण्वन्' — या मंत्राचा सहस्र जप केल्यास संग्रामात जय प्राप्त होतो

२८. 'यमेन दत्त' — कोटी होम केल्यास संग्रामात विजयप्रद रथ प्राप्त होतो.

२९. 'इम जीवेभ्य' — या मंत्राने दगड अथवा लोखंडाचे तुकडे मंत्रून टाकले तर सर्व चोरभय नाहींसें होतें

३०. 'गणानां त्वा गणपतिं'—या मंत्रानें चतुष्पथावर होम केला तर सर्व भय नाहींसें होतें.

३१. 'आयतनन्त कनय पुराणा'—'कालाग्निरुद्रऋषि, रुद्रोदेवता अनुष्टुप् छंद.'—या मंत्राचा एक हजार जप केल्यास ज्वरनाश होतो

यजुर्वेद मंत्रांचे अनुभवी सज्जन

या व्यतिरिक्त काही अनुभवाचे मंत्र लिहिण्यात येत आहेत—'प्रमदिने पितुमत्, कुत्सऋषि त्रिष्टुप् छंद, इंद्रोदेवता, गर्भनुसविवेपाम्'—गर्भमुक्त होण्याचा विनियोग आहे.

वे. शा. स. गणेश लक्ष्मण साने गुरु, नाशिक.

'नमोस्तु रुद्रेभ्यो'—या मंत्राचें अनुष्ठान केल्यानंतर पिशाच्चबाधा नष्ट होते

'त्र्यंबकं यजामहे'—या मंत्राचे अनुष्ठान ओसाड गृहात रात्री १२ वाजता करणे अपमृत्यूचे निवारण होतें

'या व्याघ्रविषूचिके'—या मंत्राच्या जपानें व्याघ्रभय, वा विषारी जनावराचें भय नाहीसे होतें

'या ते रुद्र शिवातनू'—आगंतुक उपद्रव नाहींसे होतात.

'ओषधयः समवदन्ते'—सर्व रोगनिवारणार्थ दहा हजार जप करावा. या मंत्रानें पाणी मंत्रावें कॉलरा, महामारी, प्लेग 'या ते रुद्र शिवातनू' या मंत्राने पाणी मंत्रावें म्हणजे वरील रोग बरे होतील

'देवाना भद्रसुमति नमोस्द्रेभ्यो पृथिव्या' या मंत्रानें २१ वेळा जप करावा. स्त्री असल्यास कुंकु, पुरुषास भस्म मंत्रून वरून खालीं उतरून पाण्यात टाकावें

वे. शा. स. महादेवशास्त्री जोशी, जांभूळपाडा, भोर स्टेट.

परमृत्यो अनुपरेहि पथा यस्ते स्व इतरो देवयानात्
चक्षुष्मते शृण्वते ते ब्रवीमि मान प्रजारिरिषो मोत वीरान्।

ऋषि यमपुत्रस्य सकुसुम देवता मृत्यु छंद जगती
अग्निविद्या, अग्नि उत्पन्न होतो
कुसुमकस्तदब्रवीत् गिरे प्रवर्तमानक ।
वृश्चिकस्याऽरसंविष अरस वृश्चिक ते विषम् ॥
अनुष्टुपछंद, अगस्त्यऋषि, अप्तृणसूर्योदेवता
विंचू आदि विषयुक्त प्राण्याच्या दशापासून मुक्ति

कै. व. वे शा. स श्रीधरशास्त्री वारे, नाशिक.

गायत्रीमंत्राचा १०८ जप २५ वर्षे केला – किरकोळ बाबी बऱ्या होतात

प्रो. रामचंद्र दामोदर करमरकर, बुधवार पेठ, पुणें.

सामवेदी मंत्र व वर्णन

४५. सामवेद – चार वेदापैकीं सामवेदीयाचे कार्य 'प्रशसने'चें म्हणजे प्रशसा अथवा स्तुति करण्याचें आहे श्रीशुक्राचार्य म्हणतात "उद्गाथ यस्य शाखादेर्यज्ञे तत्सामसंज्ञक । औद्गात्र सामभिश्चैव" यज्ञात उद्गात्याचें कार्य सामवेदीयांनी करावें असें ठरलें आहे सामवेद हा गायन वेद आहे अर्थात् गायनविद्या म्हणजे गधर्व वेद, हा सामवेदाचा उपवेद आहे गायनविद्येचे प्रथमाचार्य श्रीनारद मुनी हे होत त्याचा "नारद-शिक्षा" या नावाचा गायनशास्त्रावरील आद्य ग्रथ होय गोपालकृष्णांनी श्रीभगवद्गीतेत आपल्या विभूतीचें वर्णन करिताना चतुर्वेदापैकीं, 'वेदाना सामवेदोस्मि' "सामवेद ही वेदापैकीं माझी मुख्य विभूति आहे" असें सागितलें आहे यजुर्वेदात असलेल्या ऋचाचा पुनरुद्धार सामवेदातील ऋचात झालेला आहे व सामवेदातील ऋचा ऋग्वेद व अथर्ववेदातही दिसून येतात यावरून वेद हे एकच होत निरनिराळ्या कार्याकरिता त्या मूळ वेदाचे निरनिराळे विभाग श्री ब्रह्मदेवाच्या मुखातून निघाले ऋग्वेद प्रथम झाला व अथर्वणवेद शेवटीं झाला अशा प्रकारचें आधुनिक शोधकाचे मत आहे परतु खरी गोष्ट अशी असावी कीं, एका कार्याकरिता

जी एक ऋचा उपयोगात आणली तिचा पुन्हा दुसऱ्या कार्याकरिताही उपयोग केला आहे. दुसरें कार्य मागून उपस्थित झालें म्हणून ती ऋचा मागून झाली असें म्हणता येत नाहीं. त्या ऋचेच्या दुसऱ्या वेळीं निराळ्या कार्याकरिता विनियोग सांगितला म्हणून ती ऋचा अगर ऋचाचा समुदाय नतर अस्तित्वात आला हें म्हणणें योग्य दिसत नाहीं. सामवेदात एकदर ऋचा १४७८ आहेत. सामवेद संहितेचे 'पूर्वार्चिका ऋचा' व 'उत्तरार्चिका ऋचा' असे दोन भेद आहेत. सामगायनाच्या प्रक्रियेत 'प्रकृति गान' व 'विकृति गान' असे दोन भेद आहेत. याशिवाय वैष्णवी संहिता, स्कान्दी संहिता व पैत्री संहिता असेही तीन भेद आहेत.

सामवेदातील सामगायनाच्या ऋचा कशा म्हणाव्या याचें स्पष्टीकरणही दिलेलें आहे जर्मन पंडित डॉ. इरविन फेलर यानी सन १९१२ सालीं सामवेदातील लेखात "आज्यदोह" या ऋचेची स्वरावर्त लिहिलेली आहे. त्यांनी कलकत्ता संस्कृत कॉलेजचे प्रोफेसर धर्मव्रत चट्टोपाध्याय याच्या सल्ल्याने ती स्वरावर्त तयार केलेली आहे परंतु त्या स्वरावर्ती प्रमाणे ती ऋचा गाइल्यास व तें गाणें ऐकल्यावर ज्याला गायनाचें थोडें तरी ज्ञान असेल त्याला समजून येईल कीं, वरील स्वरावर्त चुकीची आहे. पुणें येथें वे मू लक्ष्मणशास्त्री द्रवीड (सामवेदी) सामवेदी शाळेचे संस्थापक, खुन्या मुरलीधर मदिराचे समोर सदाशिवपेठ पुणे, यानी वरील "आज्यदोह" या ऋचेची स्वरावर्त तयार करून ज्या आपल्या विद्यार्थ्यांस शिकविली, त्या विद्यार्थ्यांनी गाइलेले साम लेखकाने ऐकले. व जर्मन प्रोफेसरानी तयार केलेल्या स्वरावर्तीप्रमाणे गाइलेलेही ऐकिलें. त्यावरून लेखकाचें मत असे झाले की, वे मू द्रवीड शास्त्री यानी बसविलेली स्वरावर्त बरोबर असावी श्री १०८ नारायण महाराज केडगावकर यानी मागें जो मोठा यज्ञ केला त्यावेळीं विष्णुकांची येथील सामवेदी ब्राह्मण आलेले होते त्याचेंही मत जर्मन प्रोफेसराची स्वरावर्त चुकीची आहे असेंच पडले सामवेदाचे मत्र व त्याची स्वरावर्त लेखकास वे मू. लक्ष्मणशास्त्री द्रवीड,

पुणें, याचेकडून मिळाली. या त्याच्या मदतीबद्दल लेखक फार आभारी आहे. असो. आता पहिल्यानें सामवेदातील व्यवहारोपयोगी ऋचाचे वर्णन देऊन मग गायनाचे सामाचाही निर्देश करावयाचा आहे.

१. 'यत इन्द्र भजामहे'—ह्या ऋचेचा जप केल्यास हिंसादोष नाहीसे होतात.

२. 'अद्या नो देव सवित्'—दुःस्वप्ननाश होतो.

३. 'अबोध्यग्नि'—घृतानें होम करून शेष घृताने अभ्युक्षण केले तर मेखलाबंध होतो. म्हणजे गर्भपतन होत असेल तर गर्भ टिकतो.

४. 'सर्पसाम'—हें साम म्हटल्याने सर्पभीति नष्ट होते.

५. 'मघत्वा बाधते'—सहस्र होम करून शतावरी वनस्पतीचा मणी बांधावा, शत्रुभीति नष्ट होते.

६. 'समभ्यायन्ति'—मंत्राच्या जपाने तृषा नाहींशी होते.

७. 'पथिदेवव्रतम्'—मार्गांतील भयाचा नाश होतो.

८. 'भगोन चित्र'—या मंत्राच्या जपानें नेत्रांस अंजन केले तर नेत्ररोग नष्ट होतात.

९. 'रथंतर वामदेव्य'—वचा (वेखंड) चूर्ण तुपात घालून मुलास खाण्यास देणे. बुद्धिवर्धन होते.

१०. 'गव्येपुणेति'—या मंत्राचें गाईच्या गोठ्यात अनुष्ठान केलें तर गाई सतत राहतील.

११. वात आ यातु भेषज—यव घृताक्त करून होम केल्यास ऐंद्रजाल नाहीसें होतें.

आथर्वणवेद व त्यांतील मंत्र

आथर्वणवेद.

त्रयो लोकास्त्रयो देवास्त्रयो वेदास्त्रयोऽग्नयः ।
मात्रार्धे विलयं यान्ति वेदश्चाथर्वणः स्मृतः ॥

तीन लोक, तीन देव, तीन वेद व तीन अग्नि हे सर्व अर्धमात्रेत लय पावतात व ही अर्ध मात्राच अथर्वणवेद होय. इतर वेदाचा लोप होईल, परतु चवथ्या अर्धमात्रारूपी वेदाचा लोप होणार नाही (कौशिक परिशिष्ट). राजा व प्रजा याची दैवी व मानवी आपत्ति दूर करण्याचें कार्य अथर्ववेदीयाकडे असते, व राजा व प्रजा याची आपत्ति दूर झाल्याखेरीज दोघाच्या हातून धर्मरक्षण व तपादि कार्य होऊ शकत नाहीं. सृष्टीची उत्पत्ति करण्यापूर्वी ब्रह्मदेवास सृष्टि उत्पन्न करण्याकरिता साधनीभूत म्हणून श्री महाविष्णूनी हसावतार धारण करून 'तप तप' असा आदेश केला. असें तप करीत असताना त्या तप प्रभावापासून भृगुऋषी उत्पन्न झाले व भृगुऋषीपासून आगिरस ऋषि उत्पन्न झाले. ही उत्पत्ति ब्रह्मदेवाच्या मानसपुत्रापैकीं होय. या भृगुआगिरस ऋषींनी अथर्ववेदवाणी श्रवण केली व त्यानी आपल्या वाणींतून अथर्ववेदाचा बाहेर उच्चार केला. म्हणून आथर्ववेदाला अथर्वांगिरस वेद असे म्हणतात. त्या आगिरस ऋषींचे वीस पुत्र होते. त्या प्रत्येकानें एक एक काण्ड म्हटले, म्हणून आथर्ववेदाचीं वीस कांड झालीं.

एतद्वै भूयिष्ठं ब्रह्म यद् भृग्वांगिरसः।
येऽङ्गिरसः स रसः।
येऽथर्वाक् तद्भेषजम्। यद् भेषजं तदमृतम्।
यदमृतं तद्ब्रह्म (गो ब्रा. ३-४)
एवं सारभूतब्रह्मत्वात् ब्रह्मकर्तव्यप्रतिपादनात्।
अयं ब्रह्मवेदः इत्यप्याख्यायते।

आर्यावर्त हे वेदाचे मूलस्थान व आर्यावर्तांतील दशविध ब्राह्मण हे वेदाचे आश्रयस्थान होत. मोगलाईपासून ब्राह्मण ब्रह्मकर्मापासून च्युत झाले मधला काल म्हणजे मराठाई व पेशवाई या काळात कोठे डोकें वर निघतें तोच त्याचाही अत झाला व आग्लाई सुरू झाली. इंग्रजी शिक्षणाबरोबर ब्राह्मणवर्गीयात, वेदाभ्यासाची उपेक्षा झाली. आज तर

ब्राह्मणवर्गीयांना जीवनरक्षणाचीच चिंता पडल्यामुळें वेदाभ्यासाकडे सर्वस्वी दुर्लक्ष होऊन ते परकीयांच्या उपहासास पात्र होत आहेत. आर्यावर्तांतील ब्राह्मण वेदाभ्यासविमुख होत आहेत, तर शार्मण्य (जर्मन) देशीय पंडित वेदाभ्यासतत्पर होत आहेत. चार वेदांपैकीं सामवेद व आथर्वणवेद हे लुप्तप्राय झाले आहेत. शके १८५८ साली श्रीनारायण महाराज केडगांवकर यांनीं जो महायाग समारंभ केला त्या वेळीं सर्व आर्यावर्तांतील आथर्वणवेदी ब्राह्मणांस आमंत्रणें दिलीं असता केवळ आठच ब्राह्मण उपस्थित झाले. त्या वेळी शार्मण्य देशीय राजप्रतिनिधी (German Ambassador) यांनीं या आथर्वणवेदाच्या रक्षणाबद्दल श्रीनारायण महाराज यास विद्युत्संदेश पाठविला होता, असें ऐकण्यांत आलें. एतद्वरून शार्मण्य देशीयांची या आथर्वण वेदाभ्यासाबद्दल किती उत्सुकता व आथर्वणवेद रक्षणाबद्दल किती तत्परता आहे हे दिसून येतें.

आथर्वणवेदी ब्राह्मण यज्ञसंरक्षण व यजमान व यजमान-पत्नी यांचें संरक्षण करीत असतो, असा मागें उल्लेख आलेला आहे तथापि इतकेंच नव्हे तर राजाचें राज्य, सैन्य व प्रजा यांचेंही सरंक्षण त्यास करितां येतें तसेंच समाजावर एकदम धाड घालणारे व कुटुंबेंचीं कुटुंबें नाहींशीं करणारे, विषूचिका (cholera) सन्निपात, यक्ष्मा, वातमार, अशा रोगांचेंही निराकरण त्यास–आथर्वण वेदांतील मणिमंत्र व औषधि यांच्या सामर्थ्यानें करितां येतें.

आंग्लाईच्या राज्यांमध्यें सनातनधर्मीय राजे रजवाडे नामशेषच झालेले आहेत ते केवळ नामधारी राजे आहेत. त्यास वेदाचें अर्थात आथर्वण वेदाचें महत्त्व समजत नाहीं. नानाप्रकारच्या अडचणींतून पार पडण्यास आथर्वणवेदवेत्ता ब्राह्मण उपयोगी पडेल ही भावनाच नाहींशी झालेली आहे त्यामुळें सर्व हिंदीमराठी ब्राह्मण संस्थानांतून या वेदाची जोपासना नष्ट झाली आहे. लेखकानें कै. वा. श्रीनारायण महाराज केडगांवकर यास साम व आथर्वणवेदशाळा स्थापन करण्याबद्दल विनंती केली होती, तिचा उपयोग झाला नाहीं! आज चाळीस वर्षांत आपल्या

महाराष्ट्रातील बहुतेक कुटुंबात चाललेल्या वेदशाळा बंद झाल्या व कुटुंबातील अध्वर्यु वेदवेत्ते नष्ट होऊन त्यांच्या मुलांनाळांनी आंग्ल शिक्षणाची कास धरून कोणी रेल्वे, कोणी रेल्वे मेल सर्विस, अशा ठिकाणीं नोकऱ्या पत्करल्या आहेत व ते कसाबसा तरी आपला उदर-निर्वाह करीत आहेत. जे ब्राह्मणवर्गांतील इनामदार जाहागीरदार आहेत त्यांनी तरी वेदाभ्यास करावा, तर त्यांचीं व्यसनें इतकीं वाढलीं व राहणी इतकी बदलली कीं, ते ब्राह्मण तरी आहेत किंवा काय याचीच शंका येऊं लागली आहे. काय करावें, कसें जगावें, नवनीति प्रचाराचा ओघ कसा थांबवावा अशी ज्यांना चिंता लागली आहे, अशांनी या लेखाकडे दृष्टिक्षेप करून या आथर्वण वेदाचें अध्ययन सुरू केल्यास उत्तम मार्ग त्यांस मिळेल, अशी लेखकाची दृढ समजूत आहे.

शुक्राचार्य म्हणतात—

> अथर्वांगिरसो नाम सूपास्योपासनात्मकः।
> इति वेदचतुष्कं तु ह्युद्दिष्टं च समासतः।
> विविधोपास्यमंत्राणां प्रयोगस्तु विभेदतः।
> कथिताः सोपसंहारास्तद्धर्मनियमैश्चषट्।
> अथर्वणा चोपवेदस्तंत्ररूपः स एव हि।

सर्व तऱ्हेच्या मंत्राचा उपासनामार्ग आथर्ववेदातच आहे. ह्या वेदांत सर्व तऱ्हेचे मंत्र व त्यांचे प्रयोग परिपूर्ण रीतीनें सांगितलेले आहेत. तंत्र ग्रंथ या आथर्वणवेदाचे उपवेद आहेत. वस्तुतः आगमादि तंत्रग्रंथ हा पांचवा वेद होय.

श्रीपतंजलि भाष्यकारांनीं वेदचतुष्टयाचा उल्लेख करितांना 'ऋग्यजु-साम' असा उल्लेख न करितां 'अथर्वयजुर्ऋक्साम' असा केला आहे. "त्रेता साध्यानुश्रविके कर्मण्यथर्ववेदस्याभिचारादि प्रधानस्यानुपयोगित्वेन विहारनिर्माणादि तदुपकरणसंपादनाद्भूतरक्ष पिशाचादिनिराससाधनीभूतानां मंत्रविशेषाणां कर्मविशेषाणां च तत्र सद्भावेन प्रथमं तस्योपयोगात् प्रथममुपस्थितिः ॥"

यज्ञयागादि कर्मांत भूतपिशाचादिकांपासून रक्षण करण्याचें कर्म आणि त्या कर्माच्या मंत्राचा विस्तृत विचार आथर्ववेदामध्यें आहे. तसेंच नाना प्रकारच्या रोगाच्या निवारणाकरिता औषधि व मणि विशेष याचाही उल्लेख ह्याच वेदात असल्यानें व्यावहारिकानाही तो फारच उपयोगी होईल. म्हणून 'शन्नो देवीरभिष्टये' या आथर्ववेदीय मंत्राचा प्रथम निर्देश केला आहे.

न तिथिर्न च नक्षत्रं न ग्रहो न च चंद्रमा ।
आथर्वमंत्रसंप्राप्त्या सर्वसिद्धिर्भविष्यति ॥
यस्तत्रार्थवर्णान् मंत्रान् जपेत् श्रद्धासमन्वितः ।
तेषां अर्थोद्‌भवं कृत्स्नं फलं प्राप्नोति सध्रुवम् ॥
(स्कंदपुराण, कमलाल्या खंड)

आथर्ववेद मंत्राचें अनुष्ठान करावयाचें असल्यास नक्षत्र, चद्र, तिथि इत्यादि पाहण्याची जरूर नाहीं. मंत्राच्या वर्णांचा सार्थ विचार करून जो मंत्राचा जप करील त्याला इष्ट फलप्राप्ति निश्चयानें होईल असे सांगितलें आहे. तथापि चारी वेदाच्या मंत्राचे अनुष्ठान करण्यापूर्वी कोणकोणते संस्कार केले पाहिजेत याचा उहापोह 'संस्कार' या शीर्षकाखालीं पुढें केलेला आहे.

आथर्वण वेदाचे उपवेद

आथर्वणवेदाचे उपवेद पाच आहेत ते असे – प्रजापति पूर्वेकडे पहात असता सर्पवेद उत्पन्न झाला, दक्षिणेकडे पहात असता पिशाचवेद, पश्चिमेकडे पहात असता असुरवेद, उत्तरेकडे पहात असता 'इतिहासवेद व उर्ध्वा दिशेकडे पहात असता उर्ध्वाम्नाय,' म्हणजे आगम व पुराणवेद. असे पाच उपवेद उत्पन्न झाले (गो ब्र १–१०)

ऐहिक व आमुष्मिक चतुर्विध पुरुषार्थ याच्या ज्ञानाला कारणीभूत झालेल्या या आथर्ववेदाचे दहा भेद आहेत, ते असे –स्तौदा, पैप्पलादा, मौदा, शौनकीया, जाजला जलदा, ब्रह्मवदा, वेददर्शना, चारणा, वैद्या, त्यापैकीं शौनकादि चार शाखामध्यें अनुवाक्, सूक्त व ऋचा याचा

विनियोग गोपथ ब्राह्मणाप्रमाणें पाच प्रकारच्या सूक्तांनी सांगितला आहे ते पाच प्रकार असे — *कौशिक, वैतानस, नक्षत्र, आंगिरसकल्प* व *शांतिकल्प.* असे हे पाच भेद होत

कौशिकसूत्र — यांत पुढें दिलेले विषय येतात

गार्ग्योक्त लोममणि, शत्रुहस्तित्रासनानि, इषुनिवारणानि, सर्वशस्त्रनिवारणानि, मोहनकर्माणि, स्वसेना रक्षणानि, वैश्यसग्रामविधि, नवे रथे घटिके सस्कार, कृषिकर्माणि, समुद्रकर्माणि, कृषिकर्मबीजवापन, ज्वरातिसारे अतिमात्रे अगनाडीप्रवाहे च भैषज्य, पिशाचभैषज्य, पिशाचोच्चाटनकाम जलोदरभैषज्य, अतिकासे शीर्षर्तिशिरोवेदनाया भैषज्य, वातगुल्मे भैषज्य, धनुर्वाते अगकपने भैषज्य, श्वेतकुष्ठभैषज्य, ज्वरभैषज्य, राजयक्ष्मादि भैषज्य, कर्ण व्याधिविसर्पणे भैषज्य, ब्रह्मग्रहे भैषज्य, तृषाक्रातभैषज्य, उदरगडुल भैषज्य, गडमालाभैषज्य, केशदृढीकरणे केशवृद्धिकरणे च भैषज्य, वृष्टिनिवारण कर्म, अभिचार-दोषनिवारण कर्म, नदीभये नदीदूरगमनकर्म, वृष्टिकर्म, पुरुषबधने मोचनशांति, वाचा बंधनस्य मोचने शान्ति, नष्टे द्रव्ये लाभकर्म, मेधाजनन

नक्षत्रकल्प — नक्षत्रपूजनविधि, रक्षाबंधन, महाशान्तिशमनानिर्णय, अमृतामहाशान्तिनिर्णय, मणिबधनदक्षिणादि, हस्ति अश्वादीना इंद्रमहोत्सव, कार्तिक्या रम सपान्य *अभिमत्र्य* राजान प्राशयेत्, ब्रह्मयाग, स्कन्दयाग, अस्त्रविद्या, धनुर्विद्यामत्रलक्षण, आसुरीकल्प, भूमिकपलक्षण,[1] अथर्वहृदय, सर्वकामसिद्धि उपाया

वैतानसकल्प — दर्शपूर्णमासादिषु अयनान्तेषु त्रयीविहित कर्मसुब्रह्मा, ब्राह्मणाच्छसी, आग्नीध्र, होता, चतुर्णां ऋत्विजा कर्म, दर्शपूर्णमासा अग्न्याधान, अग्निहोत्रम्, सोमयाग, वाजपेय आप्तोर्याम, अग्निचयन, सौत्रामणि, *गवामयन, राजसूययज्ञ, अश्वमेध, सत्रिमत्राणि, सांवत्सरिकायणानि*

१ कै वेदव्यास पंडित सातवळेकर यांनी प्रसिद्धिलेल्या आथर्वणवेदाच्या पाच भागात प्रत्येकी ५०० पृष्ठ वरीलपैकी बरेच विषय स्पष्ट केलेले आहेत. [गो प्र भा]

आंगिरसकल्प. — अनुष्ठानक्रम, मंत्रसिद्धिदेश. मालामंत्रलक्षण, यंत्रलेखनद्रव्याणि, यंत्रलेखनी, मंत्रान्ते पल्लवसपुटाश्च, शत्रुनाममंत्रेषु प्रयनविधि, दिशासननिर्णय, मालारज्जुनिर्णय लक्ष्मीसूक्तविधान, प्रणवमंत्र, अग्निमंत्र भद्रकालीमंत्र, धूमावतिमंत्र, महाप्रत्यंगिरामंत्र, त्रिपुरभैरवीमंत्र, भुवनेश्वरीमंत्र, सोममंत्र, नृसिंह-उपासनाखंड, सिद्धोदनविधि, यास्यदेवीरीति देवीसूक्तविधान, गणपतिमंत्र, लक्ष्मीमंत्र, काममंत्र

शान्तिकल्प : महाशान्तिसंभारकथन, व्रतनियम, कर्मक्रम विनायकशान्ति, आहुतिमंत्र, नवग्रहआवाहनमंत्र, ग्रहयाग, शान्तिगण, कृत्यादूषण, चातन, मातृनामा, वास्तोस्पत्यादिगणहोम

आथर्ववेदातील मंत्र व त्याचे विनियोग —

आमावास्या, पूर्णिमा, पुष्य नक्षत्र, असे तीन काळ सर्व कर्मांस प्रशस्त आहेत.

अद्भूत कर्म करण्यास सर्व काळ प्रशस्त आहे अभिचार कर्माबद्दल माहिती मूळ ग्रंथात पहावी

मंत्रमुच्चारयन्नेव मंत्रार्थत्वेन संस्मरेत् ।
शेषिणं तन्मना भूत्वा स्यादेतदनुमंत्रणम् ।
एतदेवाभिमंत्रस्य लक्षणं चेक्षणादिकम् ।

अनुमंत्रण म्हणजे — शेषिणी मंत्रार्थत्वेन अनुसंधानपुरःसर मंत्रजप अभिमंत्रणस्य ईक्षणविशेष ।

आथर्वण वेद मंत्र व त्यांचे विनियोग

जन्मान्तरकृत-पापं व्याधिरूपेण जायते ।
तच्छान्तिरौषधैर्दानैर्जपहोमार्चनादिभिः ।

या वचनावरून असे दिसते की, व्याधि नानाप्रकारच्या असतात आहार, देशान्तर, जलांतर, इत्यादिकांनी झालेल्या व्याधींचा उपशम वैद्यशास्त्रोक्त चिकित्सेनें होतो पूर्वजन्मकृत पापानें उत्पन्न झालेल्या व्याधींची निवृत्ति आथर्वण वेदातील होमहवन केल्यानें होईल

सूक्त	ऋषि	देवता	विनियोग
१. निदुमाशरस्य पितर	अथर्वा	मन्त्रोक्त	ज्वर, अतिसार, अतिमूत्र, नाडीव्रण, संग्रामजय, आज्य सक्तूंनी होम १००० आहुति, धनु व शर यांचें अभिमंत्रण, ज्वरादि अतिसार, अतिमूत्र, निवारणास मुंज नावाच्या तृणाची दोरी करून बांधावी, क्षेत्रमृत्तिका, व वल्मिक मृत्तिका अंगाला लावावी.
२. विषित ते वस्तिबिल	,,	,,	मूत्ररोगांत वस्तिद्वार मूत्र निरुद्ध होतें. तें या सूक्तानें मुक्त होतें. विधि वरील ऋचेप्रमाणें (धनुराकारो मूत्राशये बस्तिं रुच्यते).
३. अम्बयो यन्त्यध्वभिर्जामयो अध्वरीयताम्	सिंधुद्वीप.	आप	गाईम्हशींना रोग झाला तर सलवणजल या मंत्रानें अभिमंत्रण करून पाजावें. सर्व रोग शमनाकरितां आज्य, पलाश, व औदुंबराच्या समिधांनी १००० हवन केलें तर कार्य होतें.
४. अप्स्वन्तरमृतमप्सु भेषज	सिंधुद्वीप	आप	मूर्छित मनुष्यावर या ऋचेनें १००० अभिमंत्रित जलसिंचन केलें तर तो मनुष्य उत्क्रांत असला तरी जागा होतो.

५. अस्मिन् वसुवसनो	”	”	सर्प सपत्कर्म त्रयोदशीला कृष्णवर्णाचे दोन मणी वस्त्रात बाधून दधिमधु यात बुडवावे; चार दिवसानतर हातास बाधावे; दधिमधु यानी रोज १०८ वेळा वरील मत्रानें मत्रण करावें, व तें दधिमधु प्राशन करावें.
६. अय देवानामसुरो विराजति	अथर्वा	असुरोवरुण	दर्भपिंजूलियुक्त घटजलानें जलोदर रोगनाशार्थ वरून खालीं अभिषेक करावा.
७. अमूर्या यान्ति योषितो	”	”	स्त्रीरजवहननिवृत्ति एक हजार जप. शस्त्रघातादि रुधिर प्रवाह निवृत्ति. या कार्याकरिता केदार मृतिका बाधावी
८. सुकेपु ते हरिमाण	”	”	श्वेतकुष्ट शमन, १००० जप. भृगराजहरिद्रेंद्रवारुणीनीलिकापिष्ट्या शुष्कगोमयेन श्वित्रप्रदेशे आलोहितदर्शन प्रघृस्य लेपयेत्. पलितनाशेऽपि उपरिनिर्दिष्ट कर्म कारयति.
९. किलास च पलित	”	”	ह्या मत्रानें केशाना शौक्ल्य. श्वित्रादि (पांढरे केश, पाढरें कोड) रोग निवृत्ति होते—नीली (नील) श्वित्राला लावावी.

मंत्र	ऋषि	देवता	विनियोग.
१०. यदग्निरापो अदहत, नम शीताय तक्मने	अथर्वा	असुरोवरुण	एकाहिकशीत ज्वरवेलाज्वरादिशानये लोहकुठार अग्नौ संताप्य उष्णोदकमध्ये स्थापयित्वा व्याधित अभिसिंचयेत्.
११. रेनस्तत् परस्त	,,	,,	आज्य हुत्वा खड्गादिशस्त्र सपात्य अभिमंत्र्य प्रयच्छेत्. कार्यसिद्धो. उदकपूर्णे कुंभे आचमेत्, ऊनेन अधिकेन वा कार्यसिद्धि, दर्भस्तंभ अभिमंत्र्य कार्यं चिंतयित्वा गणयेत, समसंख्याया अभिमतसिद्धिः अक्षान् अनेन मंत्रेण अभिमंत्र्य प्रक्षिपेत्, इष्टसंख्यापततेन कार्यसिद्धि.
१२. अग्निर्नः शत्रून् प्रत्येतु, स सेना मोहयतु	,,	,,	परसेनामोहनमंत्र. ह्या मंत्राचा १०८ जप करून एकविंशति शर्करा शूर्पे (शर्करा=वाळूचे बारीक दगड) कृत्वा परसेना प्रति प्रेरयेत्.
१३. मुंचामि त्वा हविषा जीवनाय	,,	,,	राजयक्ष्मा, पूतिगंध मत्स्यसहित ओदन अभिमंत्र्य भोजनकाले प्राशयेत्, आरण्यतिलैश्च ज्वालि-

			तोदपात्रेण उपःकाले गृहे व्यथितं अवसिंचयेत्, व्यथित उपस्पृश्य अभिमंत्रयेत्. ह्या मंत्राचा १००० जप करावा.
१४. योगिरिव्र जायता. (१ ते १० ऋचा).	अथर्वा	असुरोनरुण'	राज्यक्ष्माकुष्ठादिरोगशान्तये पिशितं नवनीतं अभिमंत्र्य, प्रतिलोम व्याधित शरीर प्रतिलिंपेत्.
१५. ददिर्हि मह्य वरुणो, यत्ते अपोदक, वृषामेरवो	„	„	तृतीयया दष्टस्थान पीडयति, विषमन्यत्र गच्छति, मृदादि तोयेन अप्रदक्षिणा रेखा करोति, वंधदष्टस्य शिखा बध्नाति, श्वेतवस्त्रेण ग्रंथि बध्नाति.
१६. अपचितः प्रपतत, सुपर्णो सवतेरिव	„	„	'गण्डमाला अपचितः' या मत्रानें शंख उगाळावा, तो लेप लावावा. या मत्रानें जल मंत्रून गडमाळेस लावावें. सैंधवाचें पाणी मत्रून गडमाळेवर लावावें.
१७. या वभ्रवो याश्च शुक्रा.	„	„	केशवृद्धि, कासनिवृत्ति होण्याकरितां पालाश, उदुंबर, जंबु, काम्पील, सारू, वड, शिरीष, स्रक्त्य, वेरणः, बिल्व, जागिडः, कुटक, गृह्य गलानलः, वेतस् शिवलः सिपुनः स्यदनः कारणिका, अश्मयो, वनः, तुन्यु, पूतदारुः, [यांपैकीं] कोणत्याहि वृक्षाचा शाकलमणि अभिमंत्रून बांधावा.

मंत्र	ऋषि	देवता	विनियोग
१८. इन्द्रस्य प्रथमो	अथर्वा	असुरोवरण	पैद्व सुवर्ण रंगाचा किडा चिरडून नस्य करावें, नागविषाचा परिहार होतो.
१९. अयं मे हस्तो हस्ताभ्यां दशशाखाभ्यां	"	"	मोहनास्त्र, दुसऱ्यास मोहन करणे हा 'हिप्नाटिझमचा' प्रयोग होय.
२०. ब्रह्मजज्ञानं प्रथमं	"	"	भक्तमभिमंत्र्य ददाति. स्त्रीप्रसव सुखाने होतो.
२१. जांगिडोसि	"	"	द्विपाद, चतुष्पाद यांचें रक्षण. सर्वरक्षाकर उत्तरदेशांत जांगिड वृक्ष आहे, त्याचा मणि वरील ऋचेनें अभिमंत्रून घ्यावा. व तो बांधावा.
२२. दर्भमणि	"	"	शत्रूविजय
२३. शतावरिमणि[1]	"	"	श्वित्र पामा ग्रहापस्मार निवारण.

इत्यादूपण निलोहमणि वगैरे मंत्रानुभव घेतलेले वैग्कि, वे. शा. सखारामभट वैद्य, गोयन्का महाविद्यालय, ललिता घाट, बनारस.

---

१ शूल, निद्रानाश, श्वास, पांडुरोग, भगंदर, कर्णरोग, सर्पविष, जलोदर, या मंत्राचा अनुभव जनार्दन गणपतराव जांभोटकर, मंत्रचिकित्सालय, मोहन बिल्डिंग, गिरगांव, मुंबई ४. ह्यांनी घेतला असून ते अजूनही लोकोपकाराचें कार्य करीत असतात. (गो प्र. भा.) आधुनिक वेद व्यास कै. पंडित सातवळेकर ह्यांनीं 'आथर्व वेदाचें सुबोध भाषांतर' (मराठी वेदा-

विशेषत आथर्ववेदाच्या मत्राची सिद्धि होण्याकरिता वरील क्रम करून पचभूतात्मक देहाचा पचन्यात लय कराना व देहातील पापपुरषाचा नाश झाला अशी भावना करावी नतर अतर्मातृका भावना, बहिर्मातृका व प्राणप्रतिष्ठा करावी व नतर षडग न्यास करावे. नतर तत्वादि न्यास षट्चक्रे व त्यात चक्रातील देवतांचे ध्यान करावे (हीच अजपाजपगायत्री होय) पुरुषसूक्त व विष्णुसूक्त याचे न्यास करावे. नतर मत्रजप करावा. सिद्धि होईल मत्रसिद्धीला अडथळे सस्काराचे आहेनच. परतु ह्या शिवाय आणखीही अडथळे आहेत ते असे —

जिह्वा दग्धा परान्नेन हस्तो दग्धः प्रतिग्रहात् ।
मनो दग्धं परस्त्रीभिः मंत्रसिद्धिः कुतो भवेत्. ॥

(मागील पानावरून)

नुवाद) भाग पाच प्रसिद्ध केले असुन (प्रत्येकी ७०० पृ) त्यात भाग ४ 'दीर्घजीवन व आरोग्य' या भागात वर उल्लेखिलेले रोग व उपाय यावद्दल थोडेसे स्पष्टीकरण आहे. (गो प्र. भा.)

वर उल्लेखिलेले 'मणि' हे वैडूर्य, माणिक्य इत्यादि खनिज मण्याप्रमाणे किंवा काचेचे मणि नसून उद्भिज्ज वनस्पति वृक्षातर्गत असे 'वशलोचना'-प्रमाणे लहानमोठ्या आकाराचे उत्कृष्ट औषधी पदार्थ आहेत. (गो. प्र भा)

अमृत–मजिरी

१ देवदेवता मत्रामध्येच असतात आवाहन केल्यावरच येतात
२ वैदिक मत्र हे विज्ञानाचे अथाग भाडार आहे
३. वैदिक मंत्र नित्य सिद्ध व स्वयभु आहे वेदाना 'श्रुति' असेंही म्हणुतात
४. वैदिक मत्रातील विज्ञान दैविक विज्ञान आहे
५ वैदिकमत्र विज्ञान केवळ पचभौतिक नाही

३ मंत्र व उपासना

१. सगुणोपासना

यानंतर आगम ग्रंथात मूर्धिनस्थान पावलेल्या सगुणोपासनेबद्दल विचार करणे जरूर आहे.

बहिरंग उपासना, बाह्यपूजा अथवा सगुणोपासना यांचे विविध क्रम, पूजासंभाराचे प्रकार, या गोष्टी अनंत कालापासून अस्तित्वात आहेत व पुढें अनंतकालपर्यंत अस्तित्वात रहातील. म्हणजे एका महाकल्पाच्या आरंभापासून परिसमाप्तीपर्यंत किंवा एका महाप्रलयापासून दुसऱ्या महाप्रलयापर्यंत थोड्या फार प्रमाणात त्या अस्तित्वात रहात असतात. वस्तुतः मनुष्यप्राणी हा उत्सवप्रिय आहे. धर्मग्रंथात मानवी संस्काराच्या उन्नतावनत स्थितीच्या अनुरोधानें कृत, त्रेता, द्वापार व कली असे कालखंड केलेले आढळतात व 'कृते यद्ध्यायते विष्णु' 'त्रेताया यजतो मखैः' 'द्वापारे परिचर्यायां' कलौ तद्धरिकीर्तन व कलि. शयानो भवति सजिहानस्तु द्वापारः उत्तिष्ठन्स्त्रेता भवति कृतं संपद्यते चरन्' कृतत्रेतादि कालखंडात मानवी जीवनाचे व्यापार कसे होतात, हें यात वर्णन केलेलें दिसतें. कृतयुगात उद्योगसंपन्नता दिसते व कलियुगात आलस्य-प्रचुरता दिसते. कलियुग म्हणजे वादविवादाचें, भांडणाचें, दुःखाचे युग, अथवा कलियुग म्हणजे नाना प्रकारच्या मानवी सुखसंवर्धक व मानव सहायक कलांची उत्पत्ति व संवर्धन होणारें युग, असेंहि कांहींचे म्हणणें आहे. स्वार्थलोलुपता म्हणजे राक्षसी स्वार्थ, कलियुगात जास्त

त्व्यानतो असेंहि निदर्शनास येते. असें जरी आहे तरी कृत, त्रेता द्वापार व कलि ह्या *महायुगात पुन्हा लघुयुग पर्याय असतात.* म्हणजे कृतयुगात कृतकृत, कृतत्रेता, कृतद्वापार आणि कृतकली अशीं लघुयुगें असतातच. इतकेंच नव्हे तर *आज कलियुगातही कृतयुगीन, त्रेतायुगीन व द्वापारयुगीन मनुज – सर्व दिसून येतात.* चारी वेदावून परब्रह्माच्या सावयव व सगुण मूर्तीचा उल्लेख आहे 'अनता वै वेदा' वेद अनत असल्यानें व आथर्वणवेदात नमूद असलेलीं सूक्तें ऋग्वेदातही असल्यानें प्रथम ऋग्वेद, नतर यजुर्वेद, नतर साम व अनतर आथर्वण अशी वेदोत्पत्ति लावणें हे योग्य दिसत नाहीं. विश्व एका काळीं उत्पन्न झालें असे म्हणता येत नाहीं. अखिल विश्वात काही स्थळीं लय, काहीं स्थळीं उत्पत्ति व काहीं स्थळीं उत्पत्तीनतरची पूर्णावस्था असा क्रम चालू असतो. म्हणजे ह्या *विश्वांत उद्भव – स्थिति – लय पुन्हा उद्भव – स्थिति – लय अशी योजना* चालूच असते 'धाता यथापूर्वमकल्पयत्' या वाक्यावरून एकदा वेदाची जागृति पुन्हा अस्तगतता हा क्रम चालूच आहे वेद प्रथम, नतर ब्राह्मण ग्रथ नतर आरण्यकें, उपनिषदें अशी वेदग्रथाच्या उपस्थितीची आनुपूर्वी लावता येत नाहीं. *गायत्री मत्र चारही वेदांत आहे.*

देव्यथर्वशीर्ष, गणपत्यथर्वशीर्षादि उपासनापद्धति अथर्वण वेदाच्या उपनिषद् भागात आहेत. मूर्तीची प्राणप्रतिष्ठा करिताना 'प्राणप्रतिष्ठाया जप्त्वा' असा देव्यथर्वशीर्षाचा जप सागितला आहे. यावरून उपनिषदें हा वेदग्रथाचा शिरोभाग शेवटीं श्रुतिगोचर झाला असावा असें म्हटल्यास प्रथमत वेदसहिता नतर ब्राह्मण व नतर उपनिषदें अशी आनुपूर्वी लावता येणार नाहीं. न तशी लावली तर ऋग्वेदकालीं सध्याकर्माची प्रक्रिया उपलब्ध नव्हती असें म्हणावें लागेल म्हणजे ऋग्वेदकालीं सध्या-विधान नव्हते अशी आपत्ति उत्पन्न होईल म्हणून वेद ब्राह्मण व उपनिषदें एकदमच आविष्कार होतीं, असें म्हणणें अपरस्पर आहे सध्याकर्म करिताना इतर प्रार्थना व यज्ञीय कर्माचीं विधानें श्रुतिगोचर झालीं असावीं

अशी कल्पना करावी लागते. यावरून उपनिषद्काल, वेदकाल असे कालखंड कल्पिता येत नाहीत व कल्पिलेच तर त्या कालखंडाच्या पूर्वीपासून सूर्योपासना व अग्न्युपासना लोकात रूढ झालेल्या होत्या, अग्नीचे ध्यान "सप्तहस्तश्चतु शृगो सप्तजिव्हो द्विशीर्षक" "स्वाहातु दक्षिणे पार्श्वे देवीं वामे स्वधा तथा। बिभ्रदक्षिणहस्तैश्च शक्तिमन्न स्रुच स्रुव। तोमर व्यजन वामैर्घृतपात्र च धारयन्॥" असे आहे यजुर्वेदात "याते रुद्र शिवातनूरघोरापापकाशिनी। यामिषु गिरिशतहस्ते बिभर्ष्य स्तवे।" या वचनावरून वेदात देवताची हस्तपादादि इंद्रियविशिष्ट वर्णनें आढळून येतात. तसेच वेदकाळीं म्हणजे पाश्चात्याच्या अनुकरण-केलीप्रमाणे आधुनिक कालगणना विचारात घेता सात हजार वर्षांपूर्वी सूर्यमंदिरे होतीं, असें मोहनजोदारो येथील उत्खननात सापडलेल्या लेखावरून दिसून येते.

मनुष्याच्या भावना जागृत करण्याकरिता मूर्तिपूजा, मूर्तिरथोत्सव व देवताचे नित्यनैमित्तिक सामुदायिक उत्सव याची आवश्यकता आहे असें म्हणण्यास काहीं हरकत नाहीं आजकाल असा कोणताही धर्म नाही किंवा पथ नाही कीं त्यात अशा उत्सवाचें समूळ उच्चाटन केलेलें आहे निरीश्वरवादी रशिया देशात प्रार्थनालयाची निरर्थकता समजून त्याच्या जागा शिक्षणसस्थाकरिता उपयोगात आणलेल्या आहेत असे वाचण्यात येतें परतु ह्या ठिकाणीं सुद्धा शेंकडा ३० लोक प्रार्थनालयात जाणारे आहेत. म्हणजे शेंकडा ३० टक्के लोकाकरिता प्रार्थनामदिरें रक्षण केलेलीं आहेत असें म्हणावयास काही हरकत नाही दुसऱ्या युरोपियन युद्धाचे वेळीं रशिया देशावर आपत्ति (म्हणजे जर्मनीच्या हिट्लरची स्वारी) आली तेव्हा सर्व उर्वरित प्रार्थनामदिरातून रशियाला जय मिळावा अशा प्रार्थना कराव्या असे ठरविण्यात आल होते [१]

---

१. अमेरिकचे मानवचलित चद्रयान चद्राजवळून फेऱ्या घालून परत पृथ्वीवर सुखरूप आलें. (१९६९) ह्या विज्ञान विक्रमाच्या आनदामुळें निरीश्वरवादी

विशेषतः वेदान्तदुन्दुभि सारखा बारा महिने तेरा काळ दुमदुमून राहिला आहे, अशा या आपल्या भारतवर्षांत उपासकाची अर्थात् मूर्त्युपासकाकरिता देवतायतनाची अधिकच आवश्यकता आहे व तशी मूर्त्युपासना चालूही आहे. परंतु हल्लींच्या कराळ कलिकाळात ती उपासना वेगडी व केवळ ढोंगधत्तुरा माजविणारी झाली आहे. संध्या अगर पूजा करिताना न्यास करण्यास सांगितले आहेत, ह्या न्यासक्रियेनें धातुमय अगर पाषाणमय मूर्तींच्या अगर यंत्राच्या ठिकाणीं देवताआवाहनानें पूजाकाल-पर्यंत देवतेचा आविर्भाव होत असतो व उपासकानें आपल्या शरीरांतील विशिष्ट स्थानी देवताचे न्यास केल्यानें (दृढभावना जागृत केल्यानें) उपासक देवतामय होतो परंतु ही न्यासक्रिया, नाक, डोळे, कान यास भावनाविरहित स्पर्श करण्यापलीकडे राहिली नाहीं ! तशीच स्थिति वेदांत ग्रंथ म्हणजे प्रस्थानत्रयीच्या अभ्यासाची झाली आहे. प्रस्थानत्रयीच्या अभ्यासानें वेदान्तसूरी पंडित होतात. पूर्वपक्ष व उत्तरपक्षही करितात, सांख्य, पातंजल, जैमिनीय पूर्वमीमांसा, कणाद, गौतम व बौद्धदर्शन यांच्या अध्ययनानें विवेचक बुद्धि जागृत होण्याच्या ऐवजीं त्या त्या शास्त्रात गढून गेल्यामुळे "षट्दर्शनमहाकूपे पतिता पशव खग" (गरुडपुराण), अशी त्या अभ्यासकाची गति होते व मूलग्राही व ऐहिका-मुष्मिक फलदायी उपासनेकडे त्याचे दुर्लक्ष होते. म्हणून *आधुनिक कालात उपासना साधन परिणामी फलदायी होण्याकरिता वैदिक, तांत्रिक व पौराणिक मंत्रमूलक प्रतीकोपासनेकडे जनतेचें लक्ष वेधलें पाहिजे.*

मागील स्तंभामध्ये तंत्रशास्त्राचीं जीं सात अगर बत्तीस लक्षणे

रशियात हजारों लोक प्रार्थना मंदिरात जाऊन देवासमोर आनंद व्यक्त करून आले असें जाहीर झालें. लवकरच रशियाचीं शुक्रवेधी यानें अशीच परत येतील. सारांश प्रार्थना व त्यांचीं मंदिरें ह्यांचें समूळ उच्चाटन झाले आहे, असा एकही देश नाहीं. म्हणजे तें कृत्य वा ती स्थिति अमानवी व अस्वाभाविक आहे हेंच खरें. (गो. प्र भा.)

सांगितलीं आहेत, त्या लक्षणांत देवतार्चनरूपी उपासनासाधन सांगितलें आहे. या साधनाबद्दल तन्त्रशास्त्र असें प्रतिपादन करितें कीं, मन्त्रशास्त्र हें प्रत्यक्षशास्त्र आहे म्हणजे या शास्त्रांत आत्मदर्शनाचीं साधनें सांगितलीं आहेत. इतर शास्त्रांत वादविवादरूप पूर्वपक्ष, उत्तरपक्ष, न्यायशास्त्रांतील परिष्कार इत्यादि वाक्शक्तीचे व स्मरणशक्तीचे विषय येतात. परंतु *मन्त्रशास्त्रांत प्रत्यक्ष अनुभवाचेच विषय असतात.* विश्वास असो वा नसो औषधीप्रयोगानें जसें वृश्चिकपीडाहरणाचें कार्य होतें, तसेंच विश्वास असो वा नसो, वृश्चिकमन्त्रानें वृश्चिकदंशाची पीडा नष्ट होते. नागदंशानें मूर्छित झालेल्या मनुष्याचे ठायीं विश्वास अगर भावनाचा उद्गम होणें शक्य नसतें, असा मनुष्य सर्पमन्त्रानें बरा होतो. यावरून *मन्त्रशास्त्र* हें *प्रत्यक्षानुभवदर्शी शास्त्र* आहे. मन्त्रशास्त्राचा असा निर्वाळा आहे कीं, मन्त्रशास्त्र हें रोग, कष्ट, पीडा यांचें निवारण करणारें व शरीरसुखलब्धीस साधनभूत आहे. इतकेंच नव्हे तर या *शास्त्रांत सर्व मानवांस आत्मोद्धाराचा मार्ग निदर्शित केलेला आहे.*

स्त्री, शूद्र, द्विजबंधु, दास किंवा अनार्य लोक अथवा जे जे मानव वेदत्रयी पठनपाठनास अयोग्य मानण्यांत आले आहेत व ज्यांचे संस्कार वेदोक्त ऋचांनीं होऊं शकत नाहींत त्यांचा समावेशही आगमोक्त आचारधर्मांत करितां येतो. म्हणजे त्यांचे सर्व संस्कार आगमोक्त मन्त्रांनीं करितां येतात. वेदमन्त्रांप्रमाणें *आगमोक्त मन्त्रांना ऱ्हस्व, दीर्घ, प्लुत, उदात्त, अनुदात्त असे स्वर नसतात.* त्यामुळें ज्यांची वाणी परंपरेनें उत्कृष्ट संस्कृतीस प्राप्त झाली नाहीं, त्यास आगमोक्त मन्त्रांचा जप, पाठ अगर आवृत्ति करण्यास सुलभ पडतें. वरील स्तंभांत वर्णन केल्याप्रमाणें मन्त्रसामर्थ्याची सत्यता सर्व मानवजातीला अनुभवितां येते, असा लेखकाचा दृढ विश्वास आहे, अंधविश्वास नव्हे. लेखकाच्या माहितींतील एक यावनी मन्त्र आहे. तो मन्त्र एका ब्राह्मणानें यवन अवलियास सांगितला त्यानें तो मन्त्र एका जैनास दिला, त्या जैनानें एका ब्राह्मणास सांगितला

इतक्या प्रकारच्या भिन्न जातींच्या लोकांत जरी तो मंत्र परंपरेनें दिला गेला तरी त्या *मंत्राची सिद्धि नष्ट झाली नाहीं.* त्या मंत्राचें वार्षिक विधान हिंदूंकरितां बलिप्रतिपदेला करावें व यवनांनीं मोहरमच्या दहाव्या दिवशीं करावें असें सांगण्यांत आलें आहे. त्या मंत्राचे विधान हिंदूंकरितां असें आहे कीं, मंत्र म्हणून १०८ तांबड्या कण्हेरीचीं फुलें तांब्याच्या ताम्हनांत पाणी घालून त्या पाण्यांत चंद्राला उद्देशून तीं वहावयाचीं एवढेंच. या विधीनें त्या त्या जातींतील अगर वर्णांतील मनुष्यानें वरील विधान केल्यास त्याला त्या मंत्राच्या सिद्धीचा अनुभव येतो.

अशा प्रकारचे विधि व दीक्षाविधानासारखे उत्सव यांनीं मनुष्याच्या मनावर उत्कट परिणाम होतात. सर्व सृष्टीच्या मुळाशीं मन सृष्टि आहे, व मन सृष्टीनेंच स्थूलसृष्टि निर्माण झाली आहे. मंत्रांतील गूढशक्ति विधियुक्त आचारांनीं व गुरूच्या संस्कारांनीं जागृत होते व गुरूनीं ती शिष्याच्या मन पटलावर स्थापित केलेली असते. ती प्रभावशाली होण्यास शिष्याचाही अधिकार असावा लागतो. जशी ज्या शिष्याची आचारशुद्धि, जसा त्याचा अधिकार तशी त्याचे ठिकाणीं मंत्रशक्ति आरूढ होते. अधिकारपात्रतेप्रमाणें म्हणजे संस्कारशुद्धतेनें आगीं असलेल्या सामर्थ्या-प्रमाणें लहानापासून मोठ्या अधिकारसंपन्न शिष्याला उपयोगी पडतील अशीं नानाप्रकारचीं मंत्रविधानें हीं मंत्रशास्त्रांत उल्लेखित केलेलीं आहेत. आचारविचार आणि व्यवहार यांत परद्रव्यापहार, परस्त्रीसंपर्क हें वर्ज्य आहे परंतु मंत्रसिद्धि प्राप्त होण्यास परान्न घेणें, प्रतिग्रह म्हणजे दक्षिणा घेणें, हेही आचारदोष गणिलेले आहेत. 'सत्यपूतां वदेत् वाणीं' असें सांगण्यांत येते व 'नास्ति सत्यात् परो धर्मः' असेंही सांगण्यांत येते सर्व प्रकारची आचारशुद्धिसंपन्नता असूनही असत्यभाषणी मनुष्य असेल तर त्याला मंत्रसिद्धि प्राप्त होणार नाहीं. यदाकदाचित् गुरुसामर्थ्यानें मंत्रसिद्धि प्राप्त झाली तरी तीही टिकणार नाहीं. एका गृहस्थानें आपला मुलगा असा पाहिला कीं, तो कधींही असत्यवाणी वदला नाहीं त्या मुलाला

सांगितलीं आहेत, त्या लक्षणात देवतार्चनरूपी उपासनासाधन सांगितलें आहे. या साधनाबद्दल तंत्रशास्त्र असें प्रतिपादन करितें कीं, मंत्रशास्त्र हे प्रत्यक्षशास्त्र आहे म्हणजे या शास्त्रात आत्मदर्शनाचीं साधनें सांगितलीं आहेत. इतर शास्त्रात वादविवादरूप पूर्वपक्ष, उत्तरपक्ष, न्यायशास्त्रातील परिष्कार इत्यादि वाक्शक्तीचे व स्मरणशक्तीचे विषय येतात. परंतु *मंत्रशास्त्रात प्रत्यक्ष अनुभवाचेच विषय असतात.* विश्वास असो वा नसो औषधीप्रयोगानें जसें वृश्चिकपीडाहरणाचें कार्य होतें, तसेंच विश्वास असो वा नसो, वृश्चिकमंत्रानें वृश्चिकदंशाची पीडा नष्ट होते. नागदंशानें मूर्छित झालेल्या मनुष्याचे ठायीं विश्वास अगर भावनाचा उद्गम होणे शक्य नसतें, असा मनुष्य सर्पमंत्रानें बरा होतो. यावरून *मंत्रशास्त्र* हे *प्रत्यक्षानुभवदर्शी शास्त्र* आहे. मंत्रशास्त्राचा असा निर्वाळा आहे कीं, मंत्रशास्त्र हे रोग, कष्ट, पीडा याचे निवारण करणारें व शरीरसुखलब्धीस साधनभूत आहे. इतकेंच नव्हे तर या *शास्त्रात सर्व मानवास आत्मोद्धाराचा मार्ग निदर्शित केलेला आहे.*

स्त्री, शूद्र, द्विजबंधु, दास किंवा अनार्य लोक अथवा जे जे मानव वेदत्रयी पठनपाठनास अयोग्य मानण्यात आले आहेत व ज्याचे संस्कार वेदोक्त ऋचांनी होऊ शकत नाहींत त्याचा समावेशही आगमोक्त आचारधर्मांत करिता येतो. म्हणजे त्याचे सर्व संस्कार आगमोक्त मंत्रांनीं करिता येतात. वेदमंत्राप्रमाणें *आगमोक्त मंत्रांना ऱ्हस्व, दीर्घ, प्लुत, उदात्त, अनुदात्त असे स्वर नसतात.* त्यामुळें ज्याची वाणी परंपरेनें उत्कृष्ट संस्कृतीस प्राप्त झाली नाहीं, त्यास आगमोक्त मंत्राचा जप, पाठ अगर आवृत्ति करण्यास सुलभ पडतें वरील स्तंभात वर्णन केल्याप्रमाणे मंत्रसामर्थ्याची सत्यता सर्व मानवजातीला अनुभविता येते, असा लेखकाचा दृढ विश्वास आहे, अंधविश्वास नव्हे. लेखकाच्या माहितींतील एक यावनी मंत्र आहे. तो मंत्र एका ब्राह्मणानें यवन अवलियास सांगितला. त्यानें तो मंत्र एका जैनास दिला, त्या जैनानें एका ब्राह्मणास सांगितला

इतक्या प्रकारच्या भिन्न जातींच्या लोकांत जरी तो मंत्र परंपरेनें दिला गेला तरी त्या *मंत्राची सिद्धि नष्ट झाली नाहीं*. त्या मंत्राचें धार्मिक विधान हिंदूकरिता बलिप्रतिपदेला करावें व यवनांनीं मोहरमच्या दहाव्या दिवशीं करावें असें सांगण्यांत आलें आहे. त्या मंत्राचें विधान हिंदूकरिता असें आहे कीं, मंत्र म्हणून १०८ तांबड्या कण्हेरीचीं फुलें तांब्याच्या ताम्हनांत पाणी घालून त्या पाण्यांत चंद्राला उद्देशून तीं वहावयाचीं एवढेंच. या विधीनें त्या त्या जातींतील अगर वर्णांतील मनुष्यानें वरील विधान केल्यास त्याला त्या मंत्राच्या सिद्धीचा अनुभव येतो.

अशा प्रकारचे विधि व दीक्षाविधानासारखे उत्सव यांनीं मनुष्याच्या मनावर उत्कट परिणाम होतात. सर्व सृष्टीच्या मुळाशीं मन सृष्टि आहे, व मन सृष्टीनेंच स्थूलसृष्टि निर्माण झाली आहे मंत्रांतील गूढशक्ति विधियुक्त आचारांनीं व गुरूच्या संस्कारांनीं जागृत होते. व गुरूनी ती शिष्याच्या मन पटलावर स्थापित केलेली असते. ती प्रभावशाली होण्यास शिष्याचाही अधिकार असावा लागतो. जशी ज्या शिष्याची आचारशुद्धि, जसा त्याचा अधिकार तशी त्याचे ठिकाणीं मंत्रशक्ति आरूढ होते. अधिकारपात्रतेप्रमाणें म्हणजे संस्कारशुद्धतेनें आगीं असलेल्या सामर्थ्या-प्रमाणें लहानापासून मोठ्या अधिकारसंपन्न शिष्याला उपयोगी पडतील अशीं नानाप्रकारचीं मंत्रविधानें हीं मंत्रशास्त्रांत उल्लेखित केलेलीं आहेत. आचारविचार आणि व्यवहार यांत परद्रव्यापहार, परस्त्रीसंपर्क हे वर्ज्य आहे परंतु मंत्रसिद्धि प्राप्त होण्यास परान्न घेणें, प्रतिग्रह म्हणजे दक्षिणा घेणें, हेही आचारदोष गणिलेले आहेत 'सत्यपूतां वदेत् वाणीं' असें सांगण्यांत येतें व 'नास्ति सत्यात् परो धर्म' असेंही सांगण्यांत येतें. सर्व प्रकारची आचारशुद्धिसंपन्नता असूनही असत्यभाषणी मनुष्य असेल तर त्याला मंत्रसिद्धि प्राप्त होणार नाहीं यदाकदाचित् गुरुसामर्थ्यानें मंत्रसिद्धि प्राप्त झाली तरी तीही टिकणार नाहीं. एका गृहस्थानें आपला मुलगा असा पाहिला कीं, तो कधींही असत्यभाषणी वदला नाहीं. त्या मुलाला

गायत्रीमंत्राशिवाय दुसरा मंत्रही अवगत नव्हता. असें असून त्या मुलाचे वाणींतील शब्द अक्षरशः खरे होत असत. उदाहरण देण्याचा हेतु हा कीं, सर्व संस्कार असूनही मंत्रसिद्धि प्राप्त होण्याकरिता व ती स्वताचे ठायीं टिकून राहावी, याकरिता *सत्यवचनाचीही पूर्णतया आवश्यकता आहे.*

मंत्रशास्त्राचा मुख्य गुण म्हणजे त्यामध्ये निरनिराळ्या साधना सांगितल्या आहेत हाच होय. ही साधना म्हणजे केवळ पूजा अगर प्रार्थनाच नव्हे. ह्या साधनेंत देवांची करुणा भाकणें, 'पापोऽहं पापकर्माहं पापात्मा पापसंभवः त्राहि मां कृपया देव' इत्यादि *वचनें म्हणणें व तशी भावना करून घेणें, अगर इष्टपदार्थ अगर इष्टवासनापूरणार्थ याचना करणें, या गोष्टी येत नाहीत पापकर्म घडल्याबद्दल पश्चात्तापपूर्वक क्षमायाचना करणें इत्यादि मार्ग नाहीत. पण उलट ह्या साधनेंत पुरुष व प्रकृति यांचें ऐक्यसाधन करणें ही गोष्ट प्रामुख्यानें येते.* तसेंच शरीरातील प्रकृतितत्त्व व पुरुषतत्त्व यांचें ऐक्य संपादन करण्याकरिता प्रकृतितत्त्व म्हणजे सगुणरूप आकलन करून, म्हणजे त्या रूपाशीं तादात्म्य करून, निर्गुणरूप म्हणजे पुरुषतत्त्व यांत कसें विलीन करावें हीच गोष्ट ही साधना शिकविते. उदाहरणार्थ, आपली वाचाशक्ति म्हणजे आपली जिव्हा शाबूत आहे. कंठाजवळील शब्दोच्चार तार-मंद-मध्यमस्वरोत्पादक एक पेटिकाही आहे. इतकें असूनही शब्दोच्चार कसा होतो व तो शब्द कोण उच्चारितो याचा विचार करितां त्या शब्दाला व उच्चार करणाऱ्याला रूप नाहीं असें दिसून येतें, तेव्हा या दोघांचा संयोग झाल्याशिवाय म्हणजे प्रकृति-पुरुषाची ऐक्यता झाल्याशिवाय शब्दोच्चार होणार नाहीं. हें जसें सत्य आहे तशी *प्रकृतिपुरुषाची ऐक्यता संपादन करण्याचें साधन म्हणजे एक विशिष्ट पद्धतीची पूजासाधना हें आहे. म्हणून ही साधना साध्य करण्याकरितां शरीरांतील गूढ शक्ति जागृत करावी लागते.* या साधनेंत तोच पुरुष सिद्ध झाला असें समजावें कीं, ज्यानें आपल्या शरीरांतील कुंडलिनी शक्ति जागृत करून तिच्या साहाय्यानें शरीरांतील षट्चक्रें

चक्राचा अनुभव घ्यावा लागतो. ही साधनासिद्धि परोक्षानुभूति व अपरोक्षानुभूति प्रत्यक्ष करून देणारी आहे. पंचदशी पंचीकरणादि ग्रंथाच्या अभ्यासानें व वेदान्तावर व्याख्यानें दिल्याने वा वेदान्तातील प्रस्थानत्रयींतील शब्दसृष्टीच्या आधारानें ही अनुभूति प्राप्त होणार नाहीं. वेदान्तात शिरल्यावर सगुणोपासना 'अधमाप्रतिमापूजा' या वचनानें टाकाऊ झालेली असते. पण मोरोपंत म्हणतात

सगुणिं अनादर करुनी जो कोणी आदरील पंचदशी।
ह्याच्या ज्ञानाग्नीनें न जळे एकहि पटप्रपंचदशी'॥

हेंच खरें. मंत्रशास्त्र असें सांगते की योग्य गुरूपाशीं जाऊन अभ्यास करा. कुंडलिनीशक्ति जागृतीचा अभ्यास करा व नंतर अनुभव न येईल तर सोडून द्या. दुसऱ्या मार्गांत इतकी शर्त दिलेली नाहीं व रोकडा परमार्थ सांगितलेला नाहीं. या मंत्रमार्गीय साधनानें पातंजलीय योगशास्त्राला प्रत्यक्ष शास्त्राची योग्यता आणून दिलेली आहे.

पूजा करण्याकरिता मूर्ति कोणकोणत्या प्रकारच्या असाव्या याचाही उल्लेख करणें इष्ट आहे.

शैली दारुमयी लौही लेख्या लेप्या च सैकती।
मनोमयी मणिमयी प्रतिमाष्टविधाः स्मृताः।

(मणि म्हणजे स्फटिक, वैडूर्य, मुक्ता, हीरक, पाचु, लालक)

यांत शैली, (दगडाची) दारुमयी, लोही, मणिमयी या प्रतिमा स्थूलप्राधान्य भावनामय आहेत.

सूक्ष्म प्राधान्य भावना मनोमयी प्रतिमांनी (स्थूलप्रतिमाचा आकार मनात आणण्यानें) साध्य होते व परभावना मंत्रमय प्रतिमानी साध्य होते. मंत्रविद्या श्रीज्ञानेश्वरमहाराज व श्रीएकनाथमहाराज यांस अवगत होती. कारण मंत्रपुरश्चरणहवन हे विधी श्रीएकनाथीं भागवतांत वर्णन केलेले आहेत. श्रीसमर्थ रामदासस्वामींना मंत्रशास्त्र अवगत होते. कारण त्यांनी

स्त्रिया शूद्र यात भेद नसतो. एकमेकाचे एकमेक पादवदन करितात, त्यावेळीं एखाद्या फडावरील मुख्य निरूपणकारही, पादवदन करावयाची व्यक्ति कोणीही असो, त्या व्यक्तीचें पादवंदन करण्यास कचरत नाहीं. पढरपूरच्या यात्रेंत ही गोष्ट प्रामुख्याने दिसते.

२. मंत्र व त्यांतील शब्द

येथपर्यंत तत्रमार्गाची व्याप्ति कशी आहे हे वर्णन केले. तत्रमार्ग दर्शविणारीं तत्रें व आगम या सर्वांत अनुस्यूत असणारें मत्रशास्त्र व तदगभूत यत्रें व मूर्ति याचेकडे आता वळू. मत्र आणि शास्त्र या शब्दाची व्याख्या पूर्वी आलेली आहे म्हणून मत्राबद्दल विचार करिताना मत्रातील व मत्रशब्दसमूहातील शब्द व इतर शब्दसमूहातील शब्द यातील शब्दशक्तीचा फरक पाहणे आवश्यक आहे मत्रघटित शब्दसमूहच इतर शब्द व शब्दसमूह यातील कार्य करण्याचें सामर्थ्य यात फरक आहे. सामान्य शब्दसमूहाचें सामर्थ्य विशिष्ट प्रसगापुरतेंच असतें. उदाहरणार्थ, काहीं युद्धगीतें, युद्धप्रसगातील सेनानायकानें सैनिकात उत्साह वाढविण्याकरिता उच्चारिलेलीं वाक्यें, आप्तविरहप्रसगीं विरहीजनाचें सात्वन करण्याकरिता बोललेले उपदेशपर शब्द, इत्यादि शब्दसमूहातील सामर्थ्य अगर शक्ति क्षणिक परिणामकारक असते. परतु *मत्रशब्दस्थित मत्रशक्ति निरतर टिकणारी असते*.

काहीं शब्दोच्चार असेहि आहेत कीं, त्याच्या उच्चाराबरोबर काहीं एक प्रकाराचा परिणाम श्रोत्याच्या मनावर नेहमीं होईल. 'खडे रहो' असें म्हटल्यावर ऐकणारीं मनुष्यें उभीं राहतील. परतु या उदाहरणातसुद्धा श्रोत्याच्या मनोनुकूलतेची जरूर आहे व भाषा समजण्याचीही जरूरी आहे म्हणजे हें कार्य एकदेशीय होईल. परतु मत्रोच्चारित शब्दसमूहातील शक्ति अनन्यसाधारण आहे. वृश्चिकाच्या मत्राची भाषा वृश्चिकदष्ट मनुष्यास अगर मात्रिकासही न समजो, अगर त्याचा त्या

वृश्चिकमंत्रावर विश्वासही नसो, अर्थात त्याची मनोनुकूलताही असो वा नसो, परंतु मांत्रिकानें मंत्राचा उच्चार केल्याबरोबर वृश्चिकदष्ट मनुष्याची विषबाधा नष्ट होते ही गोष्ट अनुभवसिद्ध आहे. यावरून मंत्रातील अक्षरसमूहाच्या उच्चाराचा परिणाम चिरसिद्ध आहे असें दिसून येतें. मंत्रोच्चार झाल्याबरोबर मंत्रशक्ति प्रकाशमय आहे असें दिसतें. मंत्रातील अक्षरसमूह अगर शब्दसमूह याचा कांहींच स्पष्ट अर्थ समजून येत असो वा नसो, परंतु त्या मंत्रोच्चारापासून अतिमानुष शक्ति उत्पन्न होते, हें मात्र खास होय. या *अतिमानुष चिरसिद्ध शक्तीलाच आपण सिद्धि अगर चमत्कार म्हणतों.*

३. मंत्र-सिद्धि व चमत्कार

सिद्धि व चमत्कार होतात हे कांहीं अबाधित नियमांनीच होतात *आपणास ते नियम अज्ञात असतात, म्हणून आपण त्यास चमत्कार अगर सिद्धि म्हणतों.* पन्नास वर्षांपूर्वी आज अंतराळातील विद्युत्शक्तीनें सिद्ध होणाऱ्या दूरश्रवण व दूरदर्शन ह्या गोष्टी चमत्कारातच गणल्या जात असत व त्या अजूनही तशाच मानिल्या जातात. योगी मनोवहा नाडीच्या साहाय्यानें हृदयक्रिया अगर नाडीची गति वगैरे बंद करितात,[१] हाही आजच्या सृष्टिविज्ञान शास्त्रज्ञांना चमत्कार वाटतो परंतु योगी लोकांना ही एक सहजसाध्य क्रिया असते, व मनोवहा नाडीच्या साहाय्यानें ही क्रिया होते, म्हणून त्यास हा चमत्कार वाटत नाहीं. आपल्या स्थूल सृष्टीच्या पलीकडे सूक्ष्म सृष्टि आहे, प्राण्यांना स्थूल शरीराप्रमाणेंच सूक्ष्म शरीर आहे, याची सत्यता ज्यांना पटली नाहीं,

---

१. *आपल्या मनोवहा नाडीवर ताबा चालवून सर्कसवाले प्रो. एकनाथमूर्ति किंवा ताराबाई ह्यांच्या तळहातावर बंदुकीनें गोळी मारली असताही ती शरीरात न जातां चपटी होऊन खालीं पडे! हें दृश्य पाहिलेलें आहे. याचें नाव रक्त वाहिन्या बंद करण्याची सिद्धि!*

श्रीगायत्रीमंत्राचीं पुरश्चरणें करून श्रीरामरायाचा सगुण साक्षात्कार करून घेतला होता.

आणवादि मलाचा आत्मज्ञानाने नाश करून चैतन्य म्हणजे प्रकाशरूप असा जो परशिव त्याची प्राप्ति होते. यात प्रकाशरूपाचाच विशेष असल्यानें त्यास शांभवयोग किंवा शांभवउपाय असें म्हटलें आहे. त्रिपुरसुंदरीरूप भुवन हा परशिव आहे. यात प्रकाशरूप शिवाचे ध्यान सांगितलें आहे.

मंत्रशास्त्रात अर्थात तंत्रमार्गांत वारंवार असें सांगितलें आहे कीं, 'शिवो भूत्वा शिवं यजेत्' पूजेकरिता समोर ठेवलेलें प्रतीक ही एक निराळी देवता आहे असे नाही. पूजा सुरू करण्यापूर्वी व पूजा समाप्त झाल्यावर प्रतीक तें प्रतीकच होय. पूजकानें पूजा सुरू करण्यापूर्वी प्रतीकामध्यें प्राणप्रतिष्ठा करावी लागते व ती करिताना "द्वारेण ब्रह्मरंध्रस्य नासारंध्रात् विनिर्गत । पुष्पांजलौ समाह्वाय्य ।। व "आत्मसंस्थ महाशुद्ध त्वामहं परमेश्वर । *आरण्यमिव हव्याश मूर्तावा आवाहयाम्यहं ।" असें म्हणून मूर्तीचे ठिकाणीं* आपल्या आत्मतत्त्वाची स्थापना करावी लागते, हीच प्राणप्रतिष्ठा होय. यावरून *तंत्रशास्त्राची महती, क्रियाप्रवणता व तदंगभूत होणारी प्रत्यक्ष अनुभवाची प्राप्ति या गोष्टी सिद्ध होतात*, प्राणप्रतिष्ठा केल्याशिवायही मूर्तीमध्यें देवतेची जागृती होते. कॅप्टन् वखले (लाहोर) यांचेकडे श्री गणपतीची मूर्ति होती, तिचा असा अनुभव होता. याप्रमाणे कांहीं मंत्राचाही अनुभव आहे

शक्ति म्हणजे पराशक्ति, म्हणजे *पूर्णाहंत* विश्वस्फुरण करणारी शक्ति, जी मंत्रवीर्याला प्रकट करिते, अशी सत्ता ती ही. या योगात त्रिपुरसुंदरीच्या मंत्रांचे विशेषत्व आहे व मी त्रिपुरसुंदरीरूप आहें अशी भावना दृढ केल्यानें हे जगत् त्रिपुरसुंदरीरूप आहे असें भासतें व दिसते म्हणून तसे सिद्ध होतें म्हणजे आरशात ज्याप्रमाणें नाना प्रकारचीं चित्रें दाखविलीं तरी तीं चित्रे आरशावर कांहीच परिणामकारक होत नाहींत, त्याप्रमाणें हें

जगत् त्रिपुरसुंदरीरूप आरशातील चित्राप्रमाणे परशिवाच्या प्रकाशरूपावर चित्रित झालें असलें तरीही परशिवावर त्याचा काहींच परिणाम न होता तो प्रकाशरूपच असतो व राहतो. सारांश असें हें जगत् परशिवाच्या प्रकाशांत दृश्य होतें म्हणजे तें परशिवरूप आहे, म्हणजे त्रिपुरसुंदरीरूपच आहे अशा प्रकाराची भावना जागृत ठेवणे हाच शाक्तयोग किंवा शक्तियोग असें म्हटले आहे यांत त्रिपुरसुंदरीचे ध्यान सांगितले आहे.

तंत्रमार्गांत पुनर्जन्मतत्त्व अबाधितपणे मानण्यांत येतें. केवळ परंपरा व अंधानुकरण या बाबी या मार्गांत नाहींत व पूर्वी हे तत्त्व मानिलें गेलें म्हणून तें मानावें असा त्या तंत्रमार्गाचा हव्यास पण नाहीं. एखाद्या देशाचा नकाशा जसा पुढें ठेवावा व त्यावरून मार्ग क्रमीत इष्ट स्थळीं जाण्याची रूपरेषा आखावी, त्याप्रमाणें साधना करणाऱ्या साधकासमोर साधनेचे क्रम मांडून त्या क्रमांकाप्रमाणें ह्या जन्मांत जितके क्रमांक संपले, त्या पुढील क्रमांक आक्रमीत जाण्याकरितां पुढील जन्म आहे असें साधकास पटवून देण्यांत येतें पंढरपुरास जाण्यास निघालेला यात्रेकरू जसा मुक्काम करीत करीत शेवटीं पंढरपुरीस (षट्चक्र भेद करीत करीत सहस्रारचक्रातील पंढरपुरीस) जाऊन पोंचतो, तशी साधना करणारा साधक दरकूच दर मुक्काम करीत ह्या जन्मांत मणिपूरचक्रातील विष्णुपदाला पोंचला तर पुढील जन्मांत विष्णुपदापासून निघून अखंडैश्वरस परमशिवपदाला पोंचेल अशी साधकाची निष्ठा कायम करण्यांत गुरूचा हातखंडा व्यवहार असतो. तंत्रमार्गांत समाजधर्म व साधनधर्म असे दोन भेद आहेत समाजधर्माप्रमाणे तंत्रमार्गांत जातीबंधनें व जन्मबंधनें मानितात. पण साधनधर्मांत जातिविशिष्टता अथवा पुरुष स्त्री अशी लिंगविशिष्टता मानीत नाहींत लेखकास असें वाटतें कीं, वारकरी सांप्रदाय प्रवर्तकांनीं हीच प्रथा अमलांत आणली असावी तंत्रमार्गांत जशी उपासना तशी वारकरी सांप्रदायांत भजन, कीर्तन व निरूपण ह्या गोष्टी होत निरूपणाच्या वेळीं, भजनाच्या वेळीं, वा नगर प्रदक्षिणेचे वेळीं, वारकरी सांप्रदायांत

स्त्रिया शूद्र यात भेद नसतो. एकमेकांचें एकमेक पादवंदन करितात, त्यावेळीं एखाद्या फडावरील मुख्य निरूपणकारही, पादवंदन करावयाची व्यक्ति कोणीही असो, त्या व्यक्तीचे पादवंदन करण्यास कचरत नाहीं. पंढरपूरच्या यात्रेंत ही गोष्ट प्रामुख्यानें दिसते.

२. मंत्र व त्यांतील शब्द

येथपर्यंत तंत्रमार्गाची व्याप्ति कशी आहे हे वर्णन केलें. तंत्रमार्ग दर्शविणारीं तंत्रें व आगम या सर्वांत अनुस्यूत असणारें मंत्रशास्त्र व तदंगभूत यंत्रें व मूर्ति यांचेकडे आता वळू मंत्र आणि शास्त्र या शब्दांची व्याख्या पूर्वीं आलेली आहे म्हणून मंत्राबद्दल विचार करिताना मंत्रातील व मंत्रशब्दसमूहातील शब्द व इतर शब्दसमूहातील शब्द यातील शब्दशक्तीचा फरक पाहणे आवश्यक आहे. मंत्रघटित शब्दसमूहच इतर शब्द व शब्दसमूह यातील कार्य करण्याचें सामर्थ्य यात फरक आहे सामान्य शब्दसमूहाचे सामर्थ्य विशिष्ट प्रसंगापुरतेंच असतें. उदाहरणार्थ, काहीं युद्धगीतें, युद्धप्रसंगातील सेनानायकानें सैनिकांत उत्साह वाढविण्याकरिता उच्चारिलेलीं वाक्यें, आप्तविरहप्रसंगीं विरहीजनाचें सांत्वन करण्याकरिता बोललेले उपदेशपर शब्द, इत्यादि शब्दसमूहातील सामर्थ्य अगर शक्ति क्षणिक परिणामकारक असते परंतु *मंत्रशब्दस्थित मंत्रशक्ति निरंतर टिकणारी असते.*

काहीं शब्दोच्चार असेहि आहेत कीं, त्याच्या उच्चाराबरोबर काहीं एक प्रकाराचा परिणाम श्रोत्याच्या मनावर नेहमीं होईल 'खडे रहो' असें म्हटल्याबरोबर ऐकणारीं मनुष्यें उभीं राहतील. परंतु या उदाहरणातसुद्धा श्रोत्याच्या मनोनुकूलतेची जरूर आहे व भाषा समजण्याचीही जरूरी आहे म्हणजे हे कार्य एकदेशीय होईल. परंतु मंत्रोच्चारित शब्दसमूहातील शक्ति अनन्यसाधारण आहे वृश्चिकाच्या मंत्राची भाषा वृश्चिकदष्ट मनुष्यास अगर मांत्रिकासही न समजो, अगर त्याचा त्या

वृश्चिकमंत्रावर विश्वासही नसो, अर्थात त्याची मनोनुकूलताही असो वा नसो, परंतु मांत्रिकानें मंत्राचा उच्चार केल्याबरोबर वृश्चिकदष्ट मनुष्याची विषबाधा नष्ट होते ही गोष्ट अनुभवसिद्ध आहे. यावरून मंत्रातील अक्षरसमूहाच्या उच्चाराचा परिणाम चिरसिद्ध आहे असें दिसून येतें मंत्रोच्चार झाल्याबरोबर मंत्रशक्ति प्रकाशमय आहे असें दिसतें. मंत्रातील अक्षरसमूह अगर शब्दसमूह याचा कांहींच स्पष्ट अर्थ समजून येत असो वा नसो, परंतु त्या मंत्रोच्चारापासून अतिमानुष शक्ति उत्पन्न होते, हे मात्र खास होय. या *अतिमानुष चिरसिद्ध शक्तीलाच आपण सिद्धि अगर चमत्कार म्हणतों.*

३. मंत्र-सिद्धि व चमत्कार

सिद्धि व चमत्कार होतात हे कांहीं अबाधित नियमानींच होतात. *आपणास ते नियम अज्ञात असतात, म्हणून आपण त्यास चमत्कार अगर सिद्धि म्हणतों.* पन्नास वर्षांपूर्वी आज अंतराळातील विद्युत्शक्तीनें सिद्ध होणाऱ्या दूरश्रवण व दूरदर्शन ह्या गोष्टी चमत्कारांतच गणल्या जात असत. व त्या अजूनही तशाच मानिल्या जातात. योगी मनोवहा नाडीच्या साहाय्यानें हृदयक्रिया अगर नाडीची गति वगैरे बंद करितात,[1] हाही आजच्या सृष्टिविज्ञान शास्त्रज्ञांना चमत्कार वाटतो. परंतु योगी लोकांना ही एक सहजसाध्य क्रिया असते, व मनोवहा नाडीच्या साहाय्यानें ही क्रिया होते, म्हणून त्यास हा चमत्कार वाटत नाहीं आपल्या स्थूल सृष्टीच्या पलीकडे सूक्ष्म सृष्टि आहे, प्राण्यांना स्थूल शरीराप्रमाणेंच सूक्ष्म शरीर आहे, याची सत्यता ज्यांना पटली नाहीं,

---

१. आपल्या मनोवहा नाडीवर ताबा चालवून सर्कसवाले प्रो. एकनाथमूर्ति किंवा ताराबाई ह्यांच्या तळहातावर बंदुकीनें गोळी मारली असताही ती शरीरांत न जातां चपटी होऊन खालीं पडे! हे दृश्य पाहिलेलें आहे. याचें नांव रक्त वाहिन्या बंद करण्याची सिद्धि!

त्याना सृष्टीतील सूक्ष्मदेहधारी जीवाकडून अगर देवाकडून जीं कार्यें होतात, तीं चमत्काररूप वाटतात. पुण्यातील आहिताग्नि वे. शा. स. राजवाडे याचेकडे रा. रा जोशी या आडनावाच्या मान्त्रिकानें वीरमंत्राच्या साधनानें वीरदेवता प्रसन्न करून त्या देवतेकडून श्रीगुरुदत्त असें म्हटल्याबरोबर अगदीं गरम पेढे आणविले ही गोष्ट पुण्य-नगरात सर्वश्रुत आहे. ही मन्त्रसिद्धि व घटना इतरास चमत्कार वाटतात, परंतु त्या मान्त्रिकास ही सहजसाध्य गोष्ट आहे असें वाटतें.

४. मंत्रसिद्धि

मन्त्रसिद्ध होण्यास म्हणजेच मन्त्राची सिद्धि होण्यास त्या मन्त्राचें पुरश्चरण केलें पाहिजे गायत्रीमन्त्राच्या पुरश्चरणविधीचें एक स्वतन्त्र पुस्तकच आहे, म्हणून त्याची पुनरुक्ति येथें नको. याशिवाय वैदिक मन्त्राचें पुरश्चरण-विधान मागील स्तभात आलेलें आहे. तथापि आगमोक्त मन्त्र व शाबर मन्त्र याच्या पुरश्चरणाची विधानें प्रत्येक मन्त्राकरिता निरनिराळीं सागितलीं आहेत. तथापि सर्व मन्त्राना लागू होणारें असें पुरश्चरणविधान देण्यात येत आहे तें असें—

प्रथम ब्रह्मकूर्चविधीनें[1] प्रायश्चित्त घेऊन पुरश्चरण सुरू करण्यापूर्वी एक लक्ष प्रणवाचा जप करावा. तो असा, "प्रणवस्य ब्रह्माऋषि । गायत्रीच्छद । परमात्मा देवता। सकलदोष निवारणार्थे सकलमन्त्रसिद्धयेच प्रणवस्यैकलक्ष जपे विनियोग ।" तिलाज्य होम करून नतर दहा हजार गायत्रीमन्त्राचा जप करावा व्याहृतीसह गायत्री मन्त्राच्या चतुर्विंशति अक्षरानतर प्रणव

---

१. ब्रह्मकूर्च विधि ठराविक जातीचे व रगाचे ठराविक सख्येइतके दर्भ एक प्रकारचे विशेष कार्यासाठी योग्य अशीं घटक द्रव्यें असणारे घेऊन त्याचा जुडगा किंवा कुचा बाधून ठराविक मन्त्र उच्चारून तयार केलेल्या पाण्याच्या मार्जनादि द्वारा उपयोग करणें यास ब्रह्मकूर्च विधि म्हणतात.

(गो. प्र भा)

म्हणावा. सामान्यतः सर्व ब्राह्मण गायत्रीमंत्र म्हणताना मंत्राच्या शेवटीं प्रणवाचा उच्चार करीत नाहींत, हे अयुक्त व अविधिपूर्वक जपाराधन होतें, पंचभूतात्मक देहातील पंचतत्त्वाचा म्हणजे पृथ्वीचा आपात, आपाचा तेजात, लय करून वासनामय पापपुरुषाचें कुंभकात चिंतन करून, त्याचा लय करून रेचकानें तो वासनामय पापपुरुष बाहेर टाकावा. नंतर प्राणप्रतिष्ठा, अन्तर्मातृका, बहिर्मातृका न्यास करून षट्चक्रातील देवताची मानसोपचार पूजा करावी. (षट्चक्राचें चित्र, देवता, बीजें, इत्यादि प्रकार पुढें परिशिष्टात अजपाजप विधानात नमूद केलेली आहेत.) नंतर पुरुषसूक्त व श्रीसूक्त यांनीं अंगन्यास व करन्यास करावे, नंतर ज्या मंत्राचें पुरश्चरण करावयाचें तो मंत्र वीस अक्षरांपेक्षा कमी अक्षरांचा असल्यास त्या मंत्राच्या अक्षरागणिक एक हजार जप करावा, व वीस अक्षरांपेक्षा अधिक असल्यास दहा हजार जप करावा. "कलौ चतुर्गुण प्रोक्त" या न्यायानें त्या प्रत्येक मंत्राचा चौपट जप करावा. नंतर जो जप पूर्ण झाला, त्याचें दशांश हवन, तद्दशांश तर्पण व तद्दशांश मार्जन व त्याचे दशांश ब्राह्मणभोजन करावें. हवन दशांश करावयाचें त्याचें द्रव्य घृतमिश्रित तिलाचें असावें. ब्राह्मणभोजन करण्यास असमर्थ असल्यास मूळ जपाइतका जप करावा व पांच ब्राह्मणास भोजन घालावें. एवढें तरी करावेंच. इतक्यानें इष्टदेवता प्रसन्न होईल व इष्ट हेतु साध्य होईल. न च झाल्यास स्वमस्थांत होईल. नंतर पुन्हां इष्टमंत्राचे मागें व पुढें 'अ' उच्चार करून पुढें प्रत्येक मातृका घेऊन आ, इ, ई, इत्यादि १०८ जप करावा. अवश्य सिद्धि होईल. वैदिक मंत्राची सिद्धि प्राप्त करून घेण्याचा दुसरा विधि असा आहे – मंत्रदृचेविधीनें प्रायश्चित्त घ्यावें. ग्राम्य पशूंचा शब्द ऐकू न येईल, अशा नदीकाठीं एका गावावर झोपडी करावी कुशास्त्र, कुशाच्छादन, कुशासन, कुशपवित्रांनी घेऊन गोदुग्धाहार करावा व गायत्रीमंत्राचा पाच लक्ष जप करावा. नंतर इष्ट मंत्राचा जप करावा. वैदिकमंत्र सिद्ध होईल. किंवा सूर्यग्रहणांत पर्वाग्रहणें गायत्रीचा जप

करावा व नंतर दशांश हवन करावें अशा चार ग्रहणाचा जप पुरा झाला म्हणजे इष्टमंत्राचा जप करावा, नंतर इष्ट मंत्राचा जप, होम, तर्पण व ब्राह्मणभोजन ही कार्यें झालीं पाहिजेत. नंतरच तो मंत्र सिद्ध होईल. हे दोन्ही क्रम अनुभविक आहेत.

मंत्र सिद्ध झाल्याचीं चिन्हें अशीं आहेत. सुवासिनी, चंद्र, सूर्य, गंगानदी, युद्धांत जय, गज, मयूर, हंस, कमळें, दीप, अश्व, पुष्पें, पर्वत हे पदार्थ स्वप्नांत दिसले तर मंत्र सिद्ध झाला असें समजावें, तसेंच,

चित्तप्रसादो मनसश्च तुष्टिः अल्पाशिता स्वप्नपराङ्मुखत्वं ।
स्वप्नेषु यानाद्युपलंभनं तु सिद्धस्य चिन्हानि भवन्ति सद्यः ॥
—परशुराम कल्पसूत्रम्

जोतिः पश्यति सर्वत्र शरीरं वा प्रकाशयुक् ।
निजं शरीरमथवा देवतामयमेव हि । —भैरवी तंत्र

मंत्राराधनसक्तस्य प्रथमं वासरत्रयम् ।
तृतीयवत्सरादूर्ध्वं राजानश्च महीभृतः ॥
प्रार्थयन्तेऽनुरोधेन गर्विता अपि मानिनः ।
नवमाद्वत्सरादूर्ध्वं स्वयं सिध्यति मंत्रराट् ॥
नानाश्चर्याणि हृदये मंत्रसिद्धिमयानिच ।
रात्रौ च दिवसा लोकं स सूर्य क्षणमीक्षते ॥
पूर्णेंदुसदृशः कान्त्या गमने विहगोपमः ।
विष्णुत्रयोऽपि अल्पत्वं भवेन्निद्राजयस्तथा ॥
(नारदपंचरात्र)

नाना प्रकारचीं गीतवाद्यें श्रवणेंद्रियास अनुभविता येतात. कापूर, कस्तुरी, केशरादिकाचे गंध अनुभवास येतात व दुसऱ्यासही ते गंध देता येतात. साधक तेजानें कांतिमान व बलवान् होतो

सिद्धेस्तु त्रीणि चिन्हानि दाता भोक्ताह्य याचकः । (बौधायन)

देवा नित्यं नमोऽस्मै विदधति फणिनो नैव दंशन्ति पुत्राः।
सम्पन्नाः स्युः सपुत्रास्तनुविपदि परं धाम विष्णोः स भूयात् ॥
(प्रपंचसार)

वरीलप्रमाणें मंत्रसिद्धि झाल्याचीं ५ चिन्हें थोडक्यांत वर्णन करण्यांत आलीं आहेत.

५. मंत्र-शक्ति

इतर वाक्यसमूह व मंत्रघटित शब्द यांमध्यें फरक असा आहे कीं, इतर वाक्यसमूहांतील शक्ति शब्दोच्चाराबरोबर उदय पावून आपलें कार्य करिते. तें कार्य संपलें कीं, ती शक्तिही अस्तंगत होते. मंत्रोच्चाराची अवस्था तशी नाहीं. *मंत्रोच्चाराची शक्ति नेहमी जागृत असते. ती अस्तंगत होत नाही, ती क्षयहीन व अविनाशी आहे.* जड आणि चैतन्य, जीव आणि ब्रह्म यांमध्यें जसा फरक आहे, तसाच फरक इतर शब्दसमूह व मंत्रघटित शब्दसमूह यांमध्यें आहे. *ज्याच्या मननानें चतुर्विध पुरुषार्थ साध्य होतात व त्रिविध पातकें नाश पावतात तो मंत्र असें गायत्री तंत्रांत सांगितलें आहे.*

वस्तुतंत्र गुणधर्मांचें प्रकटीकरण जिच्या योगानें होतें ती शक्ति होय. वस्तुतः शक्ति या शब्दानें मनुष्याच्या मनावर काय परिणाम होतो, अगर शक्ति म्हणजे काय या प्रश्नाचें उत्तर देण्याचा प्रयत्न करूं लागल्यास शक्तीचे परिणाम काय होतात ही गोष्ट मानवी बुद्धि सांगेल. परंतु शक्ति म्हणजे काय, शक्ति या पदार्थानें व्यक्त होणाऱ्या व्यापारांची मीमांसा काय हें सांगतां येणार नाहीं. चंद्रप्रकाशानें समुद्रांतील पाणी आकर्षण केलें जातें ही चंद्रप्रकाशाची शक्ति होय. समुद्राच्या लाटांमुळें मोठमोठीं जहाजें बुडून जातात. अगर किनाऱ्यावर फेकलीं जातात. भूकंप होऊन *शहरेंचीं शहरें नाश पावतात व पृथ्वीवरील समुद्राचे जागीं जमीन व* जमिनीचे जागीं समुद्र उत्पन्न होतात. या प्रकारचीं स्थित्यन्तरें होणें

हें त्या शक्तीचे परिणाम होत. या परिणामावरून शक्तीची कल्पना येते. ही गोष्ट स्थूल सृष्टीबद्दल जशी अनुभवास येते, तशीच सूक्ष्म सृष्टि म्हणजे विद्युत्, या पदार्थाचे परिणाम दृश्य व अदृश्य पदार्थांवर होतात. यावरून विद्युत्मध्ये असलेल्या आकर्षणास विद्युदाकर्षणशक्ति म्हणता येते. या दृश्य पदार्थास सत् या श्रेणींत घालितां येईल. परंतु चेतन पदार्थांवर, म्हणजे चैतन्ययुक्त स्थूल देहधारी प्राणी व सूक्ष्म देहधारी प्राणी याचेवर आकर्षण होण्यास चैतन्यरूपी श्रेणीचाच आश्रय केला पाहिजे. चैतन्य कोटींतील प्राण्याच्या ठिकाणीं ज्ञानाचा समावेश असतो. सृष्टजड पदार्थांतील आकर्षण जसें आपल्या प्रत्ययास येतें, तसें सृष्टचैतन्य पदार्थांतील गूढ असलेलें आकर्षणही आपल्या प्रत्ययास येतें. जसें एखाद्या लांडग्यानें एखाद्या शेळीला स्पर्श केला तर लांडग्याच्या अंगीं असलेल्या आकर्षणानें ती शेळी लांडग्याकडे आकर्षिली जाते. असें झालें म्हणजे व्यवहारांतील 'हुरळली शेळी व लागली लांडग्याचे पाठीस' या म्हणीप्रमाणे चैतन्ययुक्त प्राण्यांतील आकर्षण शक्ति आपल्या अनुभवास येते. अजगर नामक प्राण्याचे ठायीं अशीच आकर्षणशक्ति असते. एकदा एक मनुष्य झाडावर चढलेला होता व त्या झाडाखालीं एक अजगर वेटाळे घालून त्या मनुष्याकडे पहात बसला. तेव्हा त्या अजगराच्या दृष्टिपाताच्या ठायीं आकर्षण-सामर्थ्य होतें असें आढळून आलें. कारण त्या झाडापलीकडील दुसऱ्या झाडावर दुसरे लोक चढून त्या अडकलेल्या मनुष्यास दुसऱ्या झाडावर घेण्याचा प्रयत्न करूं लागले. परंतु तो म्हणे, मला त्या झाडावरून हालण्याची इच्छाच होत नाहीं. नंतर बरेच लोकांनी जमाव करून त्या अजगरास ठार मारलें, तेव्हा झाडावरील मनुष्य खालीं आला व बचावला. असेंच पूर्व संस्कारानीं प्राप्त झालेलें आकर्षण-सामर्थ्य एखाद्या मनुष्याच्या अंगीं जन्मसिद्धच असते किंवा मंत्रशक्तीनें प्राप्त होतें. एका फकीरानें आपल्या मंत्रसामर्थ्यानें एका युरोपियन अधिकाऱ्याच्या

वायकोस आपले पाठीमागें हिंडण्यास लावले होतें. असे अनेक प्रकार दृष्टोत्पत्तीस येतात.

अशाच प्रकारच्या मंत्रसामर्थ्यानें अदृश्य जीव म्हणजे भूतें अगर वीर, गंधर्व, वेताळ यांस आपले आज्ञाधारक बनविता येतें. दक्षिण हैद्राबादेतील एक मांत्रिक वै. वा. गंगाधरशास्त्री तोरो, यांनीं सोलापूर येथे आपल्या मुलाच्या लग्नांत पंचवीस पुणेरी पगड्या आणविल्या व लग्नांतील वऱ्हाडी मंडळींस दिल्या. *त्या पगडया कशा आल्या* असें विचारिता त्यांनी सांगितलें कीं, मंत्रसामर्थ्यानें प्रसन्न झालेली देवता हें कार्य घडवून आणते. गोळीगुडा (हैद्राबाद) येथील रामकृष्णपंत बाबासाहेब रजतकर, हेंही असेंच एक उदाहरण आहे. याप्रमाणें मुंजा व वेताळ याच्या साधनानेंही अशा गोष्टी साध्य होतात. अशाच मंत्रसामर्थ्यानें देवताप्रसादही होतो. लेखकाचे माहितींत असे दोन गृहस्थ आहेत कीं, त्यांनी मंत्रसामर्थ्यानें वेताळ, वीर हनूमंत यांची प्रीति संपादन केली. वेताळ देवतेने पाहिजे तेथील जड वस्तू आणून दिल्या. वीर हनूमंतांनी भक्ताला वायुगति दिली. रोगहरण करण्याचे सामर्थ्य दिलें. एका साधकास श्रीरामरायाचें दर्शन करवून दिलें. असें जें *आकर्षणसामर्थ्य तीच मंत्रशक्ति होय.*

अशा मंत्रशक्तीचे वाच्यशक्ति आणि वाचकशक्ति असे दोन भेद आहेत. मंत्राची प्रतिपाद्य देवता म्हणजे मंत्ररूप देवता ही वाच्यशक्ति होय व मंत्रांनीं वर्णन केलेली देवता म्हणजे मूर्तिमयी देवता ही वाचकशक्ति होय. मंत्रमयी देवता हीच दुर्गा मंत्राची निर्गुणरूप अधिष्ठात्री देवता दुर्गा होय व दुर्गामूर्ति ही दुर्गामंत्राची वाचकशक्ति देवता होय. विष्णु सहस्रनामांत परमात्मा श्रीकृष्ण ही प्रतिपाद्य वाच्य देवता व देवकीनंदन ही अधिष्ठात्री वाचक व मूर्त देवता होय. पुष्पांत जसें *बीज गूढरूपानें वास्तव्य करतें ("विद्या दैवतयोरपि न भेदलेशोऽस्ति* वेद-वेदकयो ") बीजांत जसें फळ गूढरूपानें वास करितें तशी

वाचकशक्तींत वाच्यशक्ति गूढरूपानें राहते "वाच्यवाचकभेदेन भवान् एव जगन्मय" असें अध्यात्मरामायणात वाच्यवाचक शक्तीचें रूप वर्णन केले आहे. आतां वाचकशक्ति म्हणजे सगुणरूप होय. त्याची पूजा केल्याशिवाय वाच्यशक्तीचें म्हणजे निर्गुणस्वरूपाचें अनुभविक ज्ञान होणार नाहीं. वाच्यशक्ति हा मंत्राचा प्राण आहे. परंतु *वाचकशक्तीची साधना केल्याखेरीज मंत्रांतील प्राण जागृत होणार नाही* व *मंत्रसिद्धी होणार नाही.* वाचकशक्तीच्या ध्यानावाहनादि *पूजाप्रकारांशिवाय मंत्रात चैतन्य प्रगट होणार नाही,* म्हणजे तो मंत्र जागृत होणार नाहीं (कोल्हापूरपासून २० मैलावर 'बाहुबली'चा उंच पुतळा बसवून प्राणप्रतिष्ठादि होत असताना २०–१०–१९६६ पासून सतत तीन आठवडे दुपारीं आकाशातून केशरमिश्रित चंदनाचा अभिषेक होत असे. हें दृश्य शेंकडों लोकांनीं पाहिल्याचें प्रसिद्ध झालें होतें! हा चमत्कारच नसून मंत्रशक्त्योद्भूत ईश्वरी शक्ति जागृत असल्याचें प्रात्यक्षिक आहे. निशानवाद्यांना याचें उत्तर देणें जड. गो प्र भा) सुप्त *मंत्राच्या साधनानें म्हणजे केवळ मंत्रपठणानें साधनसिद्धि प्राप्त होण्याची आशा करणें म्हणजे मृत बालकाला अंकावर घेऊन त्याच्याकडून हास्य-सल्लापादि* सुख प्राप्त करून घेण्याची आशा करण्यासरखें खपुष्पवत् *निरर्थक* होय.

६. मंत्रयोग

मंत्र व मंत्रशक्ति या दोन भागाबद्दल विवेचन झाल्यावर योग म्हणजे मंत्रशास्त्रातील मंत्रयोगाचें वर्णन करणें ही गोष्ट क्रमप्राप्तच आहे

या ठिकाणीं वस्तुत तांत्रिक दृष्टीने योगाचे जे भाग पडतात त्याबद्दल वर्णन करावयाचें आहे मंत्रशास्त्रातील मंत्रयोगसाधनेकरिता प्रतीकोपासना *मूलाधार घेतल्यामुळें या योगात प्रतीकाच्या ठायीं* आत्मशक्तीचा न्यास करून, म्हणजे आपल्या सहस्रारचक्रात वसत असलेल्या परमात्मतत्त्वाचें ध्यान करून, प्रतीकाच्या म्हणजे इष्टदेवतेच्या चर अगर स्थापित

मूर्तीच्या ठायीं पूजाकाल पूर्णपणें संपेपर्यंत त्या आत्मकलारूप ध्यान-गतमूर्तीचा प्रवेश झालेला आहे. अशी भावना करून त्या प्रतीकाची षोडशोपचार अगर द्वात्रिंशदुपचारपूर्वक पूजा करावी लागते.

ह्या योगाचे प्रकार दोन आहेत :—एक शक्त्युपाययोग व दुसरा शांभवोपाययोग. शक्त्युपाय योगांत इष्टदेवतेचीं प्रतीकें व भावना या गोष्टी प्रामुख्यानें येतात. शांभवोपाय योगांत शक्तीची मनोमय भावना प्रत्यक्षतेंत आणावयाची असते. परंतु त्या साधनांत आकाराचा अवलंब केला नसल्यानें शक्तिद्योतक देवतेची प्रत्यक्षता होत नाहीं व त्यामुळें साधक नेहमीं आपण कोणत्या भूमिकेवर आहों याबद्दल संशयग्रस्तच असतो. म्हणून प्रथमतः शक्त्योपाय योगाचें अवलंबन करावें व नंतर शांभवोपाय योगाकडे धाव घेतली तरच साधक मायाबंधनापासून मुक्त होईल अशी मंत्रशास्त्रांत ग्वाही दिलेली आहे.

आणवादि मलाचा आत्मज्ञानानें नाश करून चैतन्य म्हणजे प्रकाश-रूप असा जो परशिव त्याची प्राप्ति होते. यांत प्रकाशरूपचाच विशेष संबंध असल्यानें त्यास शांभवयोग किंवा शांभवोपाययोग असें म्हटलें आहे. हा परशिव त्रिपुरसुंदरीयुक्त आहे ध्यानाकरिता व्यक्तता असली पाहिजे, परंतु त्रिपुरसुंदरीरूपानें व्यक्तता आली तरी परशिवाचें वैशिष्ट्य असल्यानें यांत प्रकाशरूप परशिवाचें ध्यानच सांगितलें आहे.

शक्ति म्हणजे पराशक्ति. पूर्णहिंता विश्वस्फुरण करणारी पराशक्ति ती हीच, मंत्रवीर्याला प्रगट करिते अशी सत्ता ती हीच. या योगांत त्रिपुरसुंदरी मंत्राचें विशेषत्व मुख्य आहे व मी त्रिपुरसुंदरीरूप आहें अशी भावना दृढ केल्यानें हें जगत् त्रिपुरसुंदरीरूप आहे, म्हणजे आरशांत ज्याप्रमाणें नाना प्रकारचीं चित्रें दाखविलीं तरी तीं चित्रें आरशावर काहींच परिणाम करीत नाहींत, त्याप्रमाणें हें जगत् त्रिपुरसुंदरीरूप आरशांतील चित्राप्रमाणें परशिवाच्या प्रकाशरूपावर चित्रित झालें तरी परशिवाच्या कांहींच परिणाम न होतां तो जसा प्रकाशरूपच असतो तसें हें जगत्

परशिवाच्या प्रकाशात दृश्य होते म्हणजे परशिवरूपच आहे, म्हणजे त्रिपुरसुंदरीरूपच आहे, अशी प्रकाश भावना जागृत ठेवणे ह्याच शक्तियोग किंवा शक्त्युपाययोग होय असें म्हटलें आहे. यात त्रिपुरसुंदरीचें ध्यान सांगितलें आहे

ही शक्त्योपाययोगसाधना म्हणजे प्रतीकोपासना मंत्रशास्त्रात नव्यानेंच आली आहे असे नाहीं आरण्यकालीन ऋषींनी प्रतीकोपासनेचा मार्ग प्रचारात आणला व नंतर तंत्रशास्त्रकालात ह्या उपासनेवर अधिक भर देण्यात येऊन त्या उपासनेच्या संबंधानें विविध प्रकार, विविध विधि, व विविध उपचार यांचें एक निराळें 'प्रतीकोत्सव विधान' म्हणून शास्त्रच बनलें गेलें.

७. प्रतीकोपासना व तिचें पूर्वकालीनत्व

मंत्र व यंत्रें यांचेबद्दल विवेचन झालें. 'मंत्रदेवतयो अभेद' असें जें म्हटलें आहे त्यांत देवता म्हणजे देवतामूर्ति यांचेबद्दलही विवरण करणें आवश्यक आहे देवतामूर्ति व देवालयें हीं बुद्धधर्म आर्यावर्तांत उदय पावल्यानंतर झालीं असा सार्वत्रिक समज आहे व इतिहासतज्ञाचा निश्चयपूर्वक सिद्धांत आहे. पण वस्तुस्थिति तशी नाहीं. आगम व तंत्रें हीं वेद व उपनिषद् यांच्याबरोबरच उदयास आलीं असें वर दाखविलें आहे. तसेंच भारतीय युद्ध संपल्यानंतर कलियुग सुरू झालें व त्या कलियुगांतील मानवाच्या उद्धाराकरितां आगम व तंत्रें विशेषत प्रामुख्यानें पुढें आणिलीं गेलीं. कारण भारतीय युद्धाच्या वेळीं वर्णाश्रमधर्मविहीन इतर देशांतील लोक युद्धप्रसंगीं आले त्यांचे अवशेष आर्यावर्तांतच कायम वस्ती करून राहिले. त्यांच्या पारमार्थिक उन्नतीकरिता आगमाचा उपयोग करण्यात आला असें पूर्वी वर्णन आलेलेंच आहे आगम ग्रंथात मंदिरें वगैरे वाधांनी यांचें वर्णन आहे श्रीकृष्णावताराव श्रीकृष्णांनी श्रीरुक्मिणीला तिनें पाठविलेल्या प्रणयपत्रिकेवरून ती कुलाचाराप्रमाणें कुलदेवीच्या दर्शनास

आली असता, तिचे हरण केलें असे श्रीमद्भागवतग्रथात सांगितलें आहे. त्यावरून त्या काळीं देवीचीं मंदिरें होतीं असें सिद्ध होतें. व तसेच श्रीसुभद्रा अभिमन्यूला घेऊन द्वारकेस जात असताना वाटेंत राक्षसाशीं युद्ध करण्याच्या प्रसंगीं अपजय होत आहे असें दिसून येताच तिनें श्रीदुर्गेची प्रार्थना केल्याचा उल्लेख आहे. श्रीरामरायांनीं सेतुबंधनाच्या वेळीं श्रीरामेश्वराची स्थापना केली असा रामायणाचा इतिहास सांगतो. कलियुगाआरंभीं म्हणजे भारतीय युद्ध समाप्त झाल्यानंतर व श्रीकृष्णाची अवतारसमाप्ति झाल्यावर तन्त्र व आगमकालांत श्रीदुर्गा, गणेश, महेश, विष्णु व सूर्य या देवतांचीं आयतनें असत. द्वापारयुगांतही देवतायनें होतीं व देवतांची पूजा रूढ होती याचे गमक "द्वापरे परिचर्या च" या वचनावरून सिद्ध होत आहे. तसेच "कृतेयद्ध्यायते विष्णु" या वाक्यावरून श्री विष्णूचें ध्यान मूर्तिशिवाय होणार नाहीं. यावरून मूर्तिपूजा, मूर्तिध्यान ह्या गोष्टी होत्याच.

प्रतीकें, प्रतिमा व मूर्ति यांची पूजा वेदकालापासून चालू आहे. वेदकालीं अग्निपूजा विशेषत्वानें ब्राह्मणवर्णात असे. परंतु त्या त्या कालीं केवळ ब्राह्मणवर्णच अस्तित्वात होता हें म्हणणें केवळ आग्रहाचें आहे. समाजात ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, शूद्र या जाति व हे वर्ण होतेच. तेव्हा ब्राह्मणवर्णाशिवाय इतर वर्णांच्या पारमार्थिक उन्नतीकरिता तन्त्रागमाचा प्रचार असेच. हें 'वेदागमतन्त्राचार प्रथम परिकल्प्यते' या वाक्यावरून स्पष्ट दिसून येतें तसेच ऋग्वेदान्तर्गत रुद्राध्यायातील "या ते रुद्रशिवा तनूरघोरापापकाशिनी" "यामिषु गिरिश न हस्ते बिभर्ष्यस्तवे" "विज्य धनु कपर्दिनो विशल्यो बाणवाउत" इत्यादि वचनावरून हस्तांनी बाण धरणें ही क्रिया शिवाची मूर्ति असल्याशिवाय शक्य नाहीं "द्वेवाव ब्रह्मणो रूपे मूर्तं चैवामूर्तं च। उभय वा एतत्प्रजापति, परिमितश्चापरिमितश्च" ब्रह्माचीं रूपें दोन—एक मूर्त व एक अमूर्त. "उपासकानां कार्यार्थं ब्रह्मणो रूपकल्पना" या वाक्यांत रूपकल्पना ब्रह्माने केलेली, उपासकाने केलेली

नव्हे, म्हणजे उपासकाच्या सोईकरिता ब्रह्मानें निरनिराळीं रूपें धारण केलीं 'आयो धर्मणि प्रथम ससादत ततो वपूंषि कृणुते पुरूणि' (अथर्ववेद) 'नम किङ् शिलाय च' या रुद्रोक्त वचनावरून व एह्यश्मानमतिष्ठाश्मा भवतु ते तनु (अथर्व) या वचनाचा असा अर्थ आहे कीं, परमेश्वर सृष्टया-रभीं धर्मस्थापनेकरिता निरनिराळीं 'वपूंषि' शरीरें धारण करिता झाला. व हे परमात्मन् ह्या पाषाणमय मूर्तींत तू प्रवेश कर.

मूर्तिपूजा पूर्वकालापासून अमलात आहे हें दर्शित करणारी खालील वचनेंही देण्यात येत आहेत.

देवतानां हरादीनां पुष्पादिनार्चनं। (गोविंदराज)
अतः प्रतिमास्वेवैतत्पूजनविधानम्। (मेधातिथि)
देवतानामर्चनं पुष्पाद्यैः। (सर्वज्ञनारायण)
प्रतिमादिषु हरिहरादिदेवपूजनम्। (कुल्लूक)
यद्यार्चावानश्येद्वा प्रपतेत प्रभज्येद्वा सहसेद्वा प्रचलेद्वा।
(ऐतरेय ब्राह्मण)

'देवतायतनानि कम्पन्ते, देवप्रतिमा हसन्ति, रुदन्ति, स्विद्यन्त्युन्मील-यन्ति।' (षड्विंश ब्राह्मण-सामवेद) ह्या प्रमाणांनी वेदकालापासून देवतागारें, देवतायतनें व मूर्तिपूजा याचा उपक्रम होता, हें सिद्ध होतें. मंत्रसिद्धीकरिता मंत्राच्या अंगापैकीं मंत्रनिदर्शित देवताचीं ध्यानें हे मुख्य अंग सांगितलें आहे. मंत्राचीं मुख्य अंगें ऋषि, छंद, देवता, विनियोग, न्यास, ध्यान, जप, होम, इत्यादि आहेत. त्यापैकीं आधुनिक काळात मूर्तिपूजा वैदिक कीं अवैदिक याबद्दल बराच उहापोह होत असल्यानें मूर्तिपूजा व देवतायतनें हीं वेदकालापासून प्रचलित आहेत हें सिद्ध करण्याकरिता त्याबद्दल इतकें विस्तारानें लिहिणें आवश्यक झालें, प्रतिमेमध्यें देवतासन्निधि कशी असते त्याबद्दल श्लोक खालीं देण्यात येत आहे.

गवां सर्वांगजं क्षीरं स्रवते स्तनपुटात् यथा।
अभिरूप्याद्य यिंबस्य पूजायाद्य विशेषत.॥

तथा सर्वगतो देवः प्रतिमादिषु राजते ।
साधकस्य च विश्वासात् देवतासन्निधिर्भवेत् ॥
गयां सर्पिः शरीरस्थं न करोत्यंगपोषणम् ।
निसृतं कर्मसंयुक्तं पुनस्तासांतदौषधम् ॥
एवं सहि शरीरस्थ सर्पिवत् परमेश्वरः ।
विनाचोपासनादेव न करोति हितं नृपु ॥

८. मंत्रांचे प्रकार व उपयोग

आता मंत्राच्या जातीचा म्हणजे प्रकाराचा विचार कर्तव्य आहे मंत्र तीन प्रकारचे आहेत. [1]बीजमंत्र, मूळमंत्र व मालामंत्र असे ते प्रकार होत. वेदग्रथात वेदाच्या आरंभीं असलेल्या स्वरांनी 'ऐं' बीज तयार झालें. ऋग्वेदाचा आरंभ 'अग्निमीडे' या मंत्रानें होतो, त्या ऋचेंतील 'अ' हा स्वर घ्यावा. नंतर यजुर्वेदातील 'ईषेत्वोर्जेत्वा' या ऋचेतील 'ई' हा स्वर घ्यावा व सामवेदातील अग्न आयाहि या पहिल्या ऋचेतील 'अ' हा स्वर घ्यावा व अथर्वणवेदातील पहिली ऋचा 'शन्नो देवीरभिष्टय' या ऋचेंतील अनुस्वार घ्यावा याप्रमाणें अ + इ + अ अनुस्वार या प्रमाणे 'ऐं' बीज

---

१. समष्टि प्रकृतीच्या द्वितीय स्पंदनातून भगवद्गीतेंत सांगितल्याप्रमाणें अष्टधा प्रकृति उत्पन्न झाली तीमधून तदनुरूप अशीं अष्ट बीजें उत्पन्न झालीं. मंत्र शास्त्रीय ग्रंथात त्याचें वर्णन पुढें दिल्याप्रमाणें आहे. 'बीजमंत्रय पूर्वं ततोऽष्टौ परिकीर्तितं गुरुबीज शक्तिबीज रमाबीजं ततोभवेत ॥ १ ॥ कामबीज योगबीज तेजोबीजमथापरे । शांतिबीजं च रक्षा च प्रोक्ता चैषा प्रधानता ॥ २ ॥ भावार्थ–प्रथमचे तीन बीजमंत्र व नंतर आठ बीजमंत्र उत्पन्न झाले ते असे : (१) गुरुबीज · आ, ए, व मकार मिळून गुरुबीज. (२) शक्ति बीज हकार, रकार, ईकार, व मकार मिळून शक्तिबीज. (३) रमाबीज शकार, रकार, ईकार व मकार मिळून रमा बीज. (४) कामबीज क, ल, ई व मकार मिळून कामबीज. (५) योगबीज क, इ, ई व मकार मिळून योग बीज. (६) तेजो बीज टकार, रकार, ईकार व मकार मिळून तेजोबीज (७) शांतिबीज हकार,

तयार होतें. तसेंच "यदीं शृणोति अलकं श्रृणोति। नहि प्रवेद सुकृतस्य पथा।" (ऋग्वेद) या ऋचेंत 'ई' हा स्वर व लकार व ककार रहित अ हा स्वर मिळविला तर 'ऐं' बीज होतें असा ऋग्वेदात ऐं बीजाचा उद्धार सांगितला आहे. याप्रमाणे ॐ, ईं, क्लीं, ब्लू असे चार बीजमंत्र वेदात सांगितलेले आहेत. बाकीचे बीजमंत्र उपनिषद् भागात आलेले आहेत. मंत्रशास्त्राचा जणू काय आत्मा असा जो अथर्वण वेद आहे, त्यामध्येही अनेक बीजमंत्र व मूलमंत्राचे उद्धार दिलेले आहेत. श्री. गणपति अथर्वशीर्षांत 'ग' या एकाक्षरी गणेशमंत्राचा "ॐ ग ॐ" असा उद्धार दिलेला आहे व श्री. देव्यथर्वशीर्षांत "कामो योनि. कमला वज्रपाणिर्गुहा हसा मातरिश्वाभ्रमिंद्र पुनर्गुहा सकला मायया पृथक्चैपा विश्वमातादिविद्यों।" असा श्रीविद्या मंत्राचा उद्धार दिलेला आहे.

या ऋचेंत "वियदीकारसंयुक्त वीतिहोत्रसमन्वितं अर्धेंदुलसित देव्या बीज सर्वार्थसाधक" असा 'ह्रीं' बीजाचा उद्धार दिलेला आहे. तसाच 'वाञ्मायाब्रह्मभूस्तस्मात् पष्ठ वक्त्रसमन्वित सूर्योनाम श्रोत्रबिंदु संयुक्तष्टात् 'त्रितीयक नारायणेन संमिश्रौ वायुश्चाधरयुक्तत विच्चे नवार्णकोणस्यात्'

तकार, रकार, ईंकार व मकार मिळून क्षात्रीबीज. (८) रक्षाबीज : क्षकार, लकार, ईंकार व मकार मिळून रक्षाबीज. प्रत्येक बीजात ईंकार व मकार हीं दोन बीजें आहेतच हें लक्षात ठेवावें (मंत्रकल्पद्रुम—गो. प्र. भा.)

याशिवाय उपासनाभेदानें वरील बीजमंत्राशिवाय कृष्णबीज, रामबीज, शिवबीज, गणपतीबीज, इत्यादि निरनिराळे बीजमंत्र आहेत. तसेंच कांहीं मंत्र बीज शाखा व पल्लव यांनीं संपुटित झालेले असतात. तशा संपुटित मंत्राचा प्रभाव मोठा असून त्याचें फळही प्रभावी असतें. जास्त माहिती ग्रंथाच्या उत्तरार्धात येणारच आहे तथापि एक उदाहरणानें स्पष्ट करणें बरें : "ॐ क्लीं कृष्णाय नम या मंत्रात 'ॐ' हा प्रणव, 'क्लीं' हें बीज व 'कृष्णाय' हा शब्द 'शाखा' आणि 'नम' हा शब्द पल्लव आहे. या संपुटीकरणात मंत्राचें मोठें गूढ रहस्य भरलेलें आहे. (गो. प्र. भा.)

या वाक्याने नवार्णमंत्राचा म्हणजे 'ऐं ऱ्हीं क्लीं चामुंडायै विच्चे' या मंत्राचा उद्धार दिलेला आहे. "चमु त्रियदादिरूपा सेना रातीति लातीति चामुंडा" अथवा, "चमु अदने चामु अदनीय पदार्थान् ददाति लातीति" "चाना मुंडमिव स्थिता, चाना बुद्धीना मुंडमिव स्थिता चामुंडा." "विद्या मोचयित्री विच्चा–नामक देवी नाम–कर्नाटकभाषाया" 'वित् ज्ञान च आनंद' इ ईश्वरत्व ज्ञान व आनंद याचे ईश्वरत्व जिचे ठायीं आहे ती 'विच्चा' होय या शिवाय भगवतीच्या चक्रदेवतामध्ये "अमोघा चैव विच्चा च तथा च भगमालिनी" अशा प्रकारचा 'विच्चा' शब्दाचा अर्थ आहे त्या शब्दाचें संबोधन रूप 'विच्चे' असें होतें असा नवार्ण मंत्राचा उद्धार सांगितला आहे यांप्रमाणे नारसिंहमंत्र, नृसिंहतापनी उपनिषदांत व राममंत्र रामतापनी उपनिषदांत सांगितला आहे व अशा अनेक उपनिषदांमध्यें निरनिराळ्या देवतांचे मंत्र व त्यांचे उद्धार दिलेले आहेत या ठिकाणीं *उद्धार म्हणजे तो मंत्र कसा तयार होतो याचें विवेचन होय.* अशा मंत्रपरिभाषेनें तयार झालेल्या मंत्राचा विनियोगही त्या त्या उपनिषदांतून दिलेला आहे तसेंच उपनिषदांत ॐकार या बीजाचा एक कोटि जप केला तर ज्ञानप्राप्ती होते असे सांगितलेलें आहे शिवाय यज्ञीय क्रियेमध्यें ती क्रिया बरोबर झाली याबद्दल प्रतिवचन देण्याकडे ॐकाराचा उपयोग होतो या शिवाय इतर सर्व मंत्र आगम, यामल, तंत्र इत्यादि ग्रंथांत दिलेले आहेत

आगमोक्त सर्व बीजांचा व बीजमंत्राचा अर्थ लौकिकी व्याकरणज्ञाना करणें कठीण पडतें तथापि श्रीशिवाना आपल्या अधिकारवाणीनें बीजाचा अर्थ कसा करावा हें समजण्याकरिता 'बीजकोष' व 'वर्णकोष' केलेले आहेत त्यावरून त्या बीजाचा विनियोग निरनिराळी फलसिद्धि साध्य करण्याकडे कसा होतो हही त्यांनी सांगितलेलें आहे तथापि *इष्टफलप्राप्ती होण्यास ते बीजमंत्र गुरूपदिष्ट मार्गानेंच प्राप्त झाले पाहिजेत.* केवळ ग्रंथाध्ययनानें *किंवा पुस्तकावरून जप केल्यास त्या बीजमंत्राची सिद्धि*

होणार नाहीं. बीजमंत्र, मूलमंत्र अगर मालामंत्र यांतील शक्ति गुरूंनीं जागृत केलेली असते, अगर परंपरेनें गुरूस ती प्राप्त झालेली असते. त्यामुळें गुरूंनीं उपदेश केल्याबरोबर त्यांनीं जागृत केलेल्या मंत्रशक्तीचा प्रादुर्भाव शिष्याचे ठायीं झालेला दिसून येतो.

निरनिराळे बीजमंत्र निरनिराळ्या देवतांचे साध्य मंत्र असतात. 'गं ह्रीं श्रीं क्लीं हुं हूं' हीं गणेश, माया, लक्ष्मी, काली, दुर्गा, एकाक्षरी छिन्नमस्ता व 'धूं' धूमावती या देवतांचीं बीजें आहेत. 'हुंफट्' याच्या योगानें मंत्राचें रक्षण होतें. 'स्वाहा स्वधा' हे पल्लव होत. मंत्राच्या शेवटीं 'वषट्' पद असलें तर वश्यता सिद्धि होते व 'फट्' हें पद असलें तर शत्रूचें उच्चाटन होतें. हुं बीज द्वेष दाखविणारें, 'खें' बीज मारण प्रयोगांत 'स्वाहा' संतुष्टता संपादनाकरितां, नमः पदपुष्टी संपादनास व 'वौषट्' संपत्ति मिळण्याकरितां मंत्राचे शेवटीं योजितात. ही गोष्ट खालीं दिलेल्या वचनानें सिद्ध होते.

'वषट् वश्ये फडुच्चाटे हुं द्वेषे खें च मारणे ।
स्वाहा तुष्ट्यै नमः पुष्ट्यै वौषट् संपत्तिहेतवे' ॥

सौरमंत्र हे पुमान् मंत्र होत. सोममंत्र हे स्त्रीमंत्र होत. आणि दोन्हींचे समवायी मंत्र हे नपुंसक मंत्र होत. याप्रमाणें मंत्राचे तीन भेद आहेत. 'हुंफट्' हे शब्द शेवटीं असतील ते पुमान्‌मंत्र होत. 'स्वाहा' 'स्वधा' हे शब्द ज्या मंत्राच्या शेवटीं असतील ते स्त्रीमंत्र होत व 'नमः' ज्या मंत्राच्या शेवटीं असेल ते नपुंसक मंत्र होत. याचें विशेष स्पष्टीकरण पुढील श्लोकांत दिलेलें आहे.

वषडन्ताः फडन्ताश्च पुमांसो मनवः स्मृताः ।
वौषट् स्वाहान्तिका नार्यो हुं नमोन्ता नपुंसकाः ॥
वश्योच्चाटनरोधेषु पुमांसः सिद्धिदायकाः ।
क्षुद्रकर्मरुजां नाशे स्त्रीमंत्राः शीघ्रसिद्धिदाः ॥
अभिचारे स्मृताः क्लीबा, एवं ते मनवः स्मृताः ।

मंत्रापैकीं पुमान् मंत्राचा विनियोग वश्यकर्म, उच्चाटन कर्म, रोधन कर्म, या कर्मांकडे होतो. स्त्रीमंत्राचा विनियोग रोगशांती करण्याकडे होतो, व क्लीब मंत्राचा विनियोग अभिचार कर्माकडे होतो. मंत्रातील अक्षर-संख्येप्रमाणे बीजमंत्र, पिंडमंत्र, कर्तरिमंत्र, असे मंत्राचे दुसरे भेद आहेत, असे निबंधतंत्रात सांगितले आहे. बाल्यावस्थेंत बीजमंत्राचे पुरश्चरण करावें तारुण्यात पिंडमंत्र, कर्तरिमंत्र, अगर मूलमंत्र यांचे पुरश्चरण करावें व वृद्धावस्थेंत मालामंत्राचा जप करावा म्हणजे त्या मंत्राची सिद्धि होते दशार्ण *म्हणजे दहा अक्षरापर्यंतचे मंत्र मूलमंत्र किंवा बीजमंत्र होत, वीस अक्षरांचे पिंडमंत्र किंवा कर्तरीमंत्र व वीसापेक्षा अधिक अक्षरें असलेले मालामंत्र होत.*

मायाबीजं ब्राह्मणं स्यात् श्रीबीजं क्षत्रियः स्मृतम् । ॥
कामबीजं भवेत् वैश्यं वाग्भवं शूद्र ईरितम् ॥
चतुर्बीजैः परित्यक्तो मंत्र पौलस्त्यसंज्ञकः ॥
चतुर्बीजं ब्राह्मणानां क्षत्रियाणां त्रिबीजकं ॥
बीजद्वयं तु वैश्यानां शूद्राणां त्वेकबीजकं ॥

वरील श्लोकात बीजाच्या जाती सांगितल्या आहेत 'ह्रीं' बीज हें ब्राह्मणाकरिता उपयोगात आणावें 'श्रीं' बीज हें क्षत्रियासाठीं उपयोगात आणावें, 'क्लीं' बीज हे वैश्यासाठीं उपयोगात आणावें व 'ऐं' बीजाचा उपयोग शूद्राकरिता करावा चतुर्बीजरहित मंत्रांना 'पौलस्त्य मंत्र' म्हणतात चतुर्बीजमंत्र ब्राह्मणाकरिता उपयोजावे, त्रिबीज मंत्र क्षत्रियांना सांगावे, द्विबीज मंत्र वैश्यवर्णास सांगावे व एकबीज मंत्र शूद्रांना सांगावा पौलस्त्य मंत्र अवर्णी, यवन, शक, शबर, इत्यादिकांकरिता योजावा

कांहीं विद्या अशा आहेत की, त्या (स्मशानात सिद्ध होणाऱ्या) वाम मार्गाशिवाय सिद्ध होत नाहीत असे मंत्र तारा, काली, छिन्नमस्ता व गुह्यकाली ह्यांचे होत तसेच सुंदरी, लक्ष्मी, भुवनेश्वरी, भैरवी, बगलामुखी हे मंत्र वाममार्ग व दक्षिणमार्ग अशा दोन्ही मार्गांनी साध्य होतात ज्या

मंत्राची आराधना करावयाची त्याचे तर्पण व हवन केलेंच पाहिजे. हवन न केल्यास मंत्रोदिष्ट इष्टफल साध्य होत नाहीं. असें म्हटलें आहे कीं—

आराधितस्य मंत्रस्य न कुर्यात्तर्पणं यदि ।
हरत्यर्धशरीरं सः इत्युक्तं किल शंभुना ॥
मंत्रस्य तर्पणं कृत्वा हवनं न करोतिचेत् ।
मंत्रसिद्धिर्न भवति सत्यं सत्यं शिवोदितम् ॥

तथापि हे नियम सकाम कर्म करणाऱ्या जनालाही लागू आहेत त्याबद्दल असें वाक्य आहे कीं—

साधकानां बुभुक्षूनां विधिर्नियतियंत्रित. ।
मुमुक्षूनां तत्त्वविदां स एव च निरर्गलः ॥

उमामहेश्वर मंत्र, दक्षिणामूर्ति हयग्रीव, वाराह अष्टाक्षर मंत्र, प्रणवपूर्वक वासुदेव मंत्र, प्रणवपूर्वक लक्ष्मीनारायण मंत्र, हे मंत्र पहिल्या तीन वर्णास द्यावे. नारसिंह, पाशुपत, सुदर्शन, हे मंत्र क्षत्रिय व वैश्य वर्णांच्या मनुष्यास द्यावे. अग्निमंत्र, सूर्यमंत्र, तारामंत्र हे तीन वर्णांस द्यावे. अनुष्टुप छंदाचे शक्तिमंत्र, विंध्यावासिनी मंत्र हे मंत्र आदि वर्णांस द्यावे. मातंगिनी, उग्रतारा, कालिका, श्यामला, छिन्नमस्ता व बाला हे मंत्र सर्व वर्णांस द्यावे. हरिद्रागणपतिमंत्र सर्व सिद्धीप्रद आहे. व तो त्रैवर्णिकास द्यावा. त्रिपुरा मंत्र, बटुक मंत्र हे मंत्र सर्व वर्णांस द्यावे व विशेषत स्त्रियास द्यावे. हुं फट् अतीं असलेले मंत्र संकर वर्णांना द्यावे असे कुब्जा तंत्रात सांगितलें आहे.

खालीं दिलेले मंत्र कलियुगात सिद्धमंत्र आहेत .—

त्र्यर्ण एकाक्षरोऽनुष्टुप् त्रिविधो नरकेसरी ।
एकाक्षरोर्जुनोनुष्टुप द्विविधस्तुरगाननः ॥
चिंतामणिः क्षेत्रपालो भैरवो यक्षनायकः ।
गोपालो गजवक्त्रश्च चेटका यक्षिणी तथा ॥
मातंगी सुंदरी श्यामा तारा कर्णपिशाचिनी ।
शबर्येकजटा वामा काली नीलसरस्वती ॥

त्रिपुरा कालरात्रिश्च कलाविष्टप्रदा इथे ।
पुरा शापविहीनं च वर्तते मंत्रपंचकं ।
श्री विद्या सालुकंचैव नृसिंहार्कवराहकं ॥ १ ॥

(त्र्यक्षरी) ह्रीं क्षों न्हो ॐ क्षौं ॐ वाला मंत्र (त्र्यर्ण) श्रीं, ह्रीं, क्लीं, बत्तीस अक्षराचा तीन प्रकारचा मंत्र, नरसिंह मंत्र, प्रों (कार्तवीर्य मंत्र) दोन प्रकारचा, गणेशमंत्र क्षम्ल्यों, (चिंतामणि), क्षेत्रपाल (क्ष), भैरव, यक्षराज (कुबेरमंत्र), गोपाल मंत्र, गणेशमंत्र, (हरिद्रागणेश), वट यक्षिणी मंत्र, मातंगी, सुंदरी, श्यामा, तारामंत्र, कर्णपिशाचिनी मंत्र, शबरी, एकजटा, वामा, काली, नीलसरस्वती, त्रिपुरा, कालरात्रि हे मंत्र *कलियुगात सिद्ध आहेत.* श्रीविद्या, शरभमंत्र, नृसिंहमंत्र, सूर्यमंत्र वराहमंत्र हे पाच मंत्र *शापविहीन आहेत.* ह्या मंत्रांस सिद्धारिचक्रानें सिद्धसाध्य साध्य-साध्य वगैरे पाहण्याची आवश्यकता नसते.

याशिवाय खालीं लिहिलेले मंत्र कलियुगात अनुष्ठानास योग्य आहेत असे मंत्रसूरी सांगतात.

तारा तारयति क्लेशान् राज्यं तु भुवनेश्वरी ।
मातंगी राक्षसी सा तु भीतिं हरति नित्यशः ॥
शारिका शं ददात्येव सम्मतिं लोकपूजिता ।
राज्ञी राज्यं राजवश्यं मेडा भयविनाशिनी ॥
धनं ज्वालामुखी देवी भक्तेभ्यश्च प्रयच्छति ।
एता देव्या इष्टदात्र्या जपहोमार्चनादिभिः ॥

---

१ *नृसिंहराम विष्णुश्च चक्रश्चाक्रिका तथा गजाननो गुरुश्चैव सप्तैते सिद्धमन्त्रा ॥१॥*
अनेक सिद्ध मंत्राची यादी 'शारदातिलक' या ग्रंथात आहे. सिद्धमंत्रास सजीवनादि क्रियाची गरज नाहीं—तसेच 'श्रीराम, जयराम, जयजयराम, 'श्री दुर्गे, जय दुर्गे जयजय दुर्गे, किंवा 'श्रीगुरु जयगुरु, जयजयगुरु' अशा त्रिपाद सिद्ध मंत्रांचें सिद्धादि-चक्र-शोधन नको. त्यासही नकोत.
—संप्रदाय सुरतरू अ. २२

मुक्तिं ददाति त्रिपुरा लक्ष्मी लक्ष्मीं ददाति च
विद्यां ददाति वाग्देवी प्रत्येकं जन्मजन्मनि ॥

वरील श्लोकात प्रत्येक *मंत्राची फलश्रुति* सांगितली आहे. तो अर्थ उत्तान असल्यानें त्याचें भाषांतर लिहिण्यात येत नाही.

९. सिद्धारिचक्र–अकडमचक्र–घातचक्र

आतां मंत्र सिद्ध होण्याकरितां सिद्धारिचक्राप्रमाणें[१] जो मंत्र आपणास सिद्ध होणारा असेल तो शोधून काढावा लागतो. तसेंच कोणता मंत्र ऋणी आहे व धनी आहे हे ऋणी–धनी चक्रावरून पहावें लागतें. तसेंच कुलाकुल चक्राप्रमाणेंही मंत्र कोणता सिद्ध होईल याचाही विचार करावा लागतो. तसेंच मंत्रग्रहणाकरितां शुद्ध तिथी, वार, मास, नक्षत्र वगैरे पहावें लागतें परंतु *त्या गोष्टी मंत्र देणारे गुरु पहात असतात,* म्हणून त्याचा उहापोह येथें करीत नाहीं. जी यंत्रें पुढें देण्यात येत आहेत त्याप्रमाणें पाहून कोणीही मंत्रजप करूं नये *गुरूशिवाय असा*

---

१. निरनिराळ्या कामनासिद्धींसाठीं, सिद्धींचे निरनिराळे मंत्र असतात. देव देवताही निरनिराळ्या असतात; किंबहुना एकाच देवतेचे कामनाभेदाप्रमाणें मंत्रही भिन्न भिन्न असतात. यामुळें कोणता मंत्र कोणती कामना सिद्ध होण्यासाठीं म्हणजे पूर्ण होण्यासाठीं कोणता मंत्र योग्य आहे, हें ठरविण्याच्या पद्धतीला 'सिद्धारि-चक्र-शोधन' असें म्हणतात. त्याचप्रमाणें मंत्र घेणाऱ्या जीवाच्या जन्मतिथि, नक्षत्र व नांव ह्याचाही मंत्र फलप्राप्तीच्या दृष्टीनें विचार करणें अवश्य असतें. हें ज्या ज्योतिश्चक्रावरून समजतें, त्याला 'अकडम चक्र' असें म्हणतात, यांत घातचक्रही येतच, तसेंच त्या व्यक्तीच्या जन्म कुंडलींतील, द्वितीय, नवम, दशम व पंचम इत्यादि स्थानांतील ग्रहयोगाचा विचार करणेंही जरूर असतें. या सर्व गोष्टींचा विचार करून मगच मंत्र देणें व घेणें हिताचें असतें. पण ह्या सर्व गोष्टींची जबाबदारी मंत्रदात्या गुरूवरच असते, ती कशी तें पहा :

कामनेप्रमाणें देवदेवता ह्याच्या मंत्राचे सिद्धमंत्र, साध्यमंत्र, सुसिद्ध मंत्र

प्रयत्न केल्यास तो निष्फळ होईल. (गुरू का हवा याचें विवेचन पूर्वी केलेले आहे)

यानंतर मंत्राची विशेष माहिती देण्याचा विचार आहे. मंत्रमहोदधि, मंत्रमहार्णव व इतर आगम यामधून लक्षावधि मंत्र लिहिलेले आहेत. ते मंत्र देण्याचा हव्यास करण्याचें कारण नाहीं. या लेखात असेच मंत्र देण्याचें ठरविलें आहे कीं, जे मंत्र सिद्ध केलेले काहीं सज्जन आज हयातही आहेत

१०. मंत्रसिद्धिसाधना

सर्व मंत्र सिद्ध करण्याकरिता श्रीगायत्रीमंत्राचा जप सांगितला आहे. वास्तविक श्रीगायत्रीमंत्र पूर्वी दिलेल्या यजुर्वेदातील मंत्रात यावयास पाहिजे होता. परंतु श्रीगायत्रीमंत्राची महति सर्व वैदिक मंत्रात अग्रगण्यतेने वर्णिलेली आहे व सर्व आगम ग्रंथात प्रामुख्यानें तसेंच तंत्रशास्त्रात त्या मंत्राच्या संबधानें विशेष विधान सांगितलें असल्यानें, श्रीगायत्रीमंत्राच्या महत्त्वाबद्दल प्रथम लिहिण्याचे ठरविलें आहे.

आणि अरिमंत्र असे प्रकार आहेत, सिद्धमंत्र कालांतरानें फल देतात, 'साध्य मंत्र' जपहोमानंतरच फलप्रद होतात. सुसिद्ध मंत्र त्वरित फल देतात, पण अरिमंत्र (शत्रुत्ववाले) जापकाचा नाश करणारे होतात.

मंत्र ऋणी असावा व जापक धनी असावा लागतो, हें कार्य अकडमचक्र व घातचक्र यावरून ठरविता येत. ही माहिती ज्या गुरूला माहीत असेल. त्यापासूनच आपल्याला जरूर असेल त्या कार्याबद्दलचा जप घ्यावा मंत्र देणारानेंसुद्धा हा विचार करूनच मंत्र द्यावा सिद्धारिचक्र—शोधनाची भानगड चुकविण्यासाठीं सामर्थ्यसंपन्न गुरु किंवा सद्गुरु आत्मतेजानें शिष्याचें 'दीक्षानाव'च निराळें ठेवितात तसें केल्यानें शिष्याचा नवीन जन्म होतो असे शास्त्र आहे. जसें विवेकानंद, रामतीर्थ, श्रीवासुदेवानंद सरस्वती, श्री पांडुरंगाश्रम, ब्रह्मचैतन्य, सिद्धारूढ इत्यादि 'परशुराम कल्प सूत्र' वा 'मंत्रमहोदधि' या ग्रंथात वरील चक्रें व तंत्रें यांची पूर्ण प्रकारांची सविस्तर माहिती दिलेली आहे. (गो. प्र भा.)

यंत्राबद्दल माहिती लिहिताना प्रत्येक मंत्राचे यंत्र अगर मूर्ति असावी, त्या यंत्रावर देवतेचें आवाहन करून देवतेचे पूजन केलें असता देवताप्रसाद लवकर होतो, असे पुढें लिहिलें आहे.

तंत्रग्रंथात देवताआवाहन प्रथमत: यंत्रावर करावें व देवतेचें ध्यान करून आवाहित देवतेची देवता–यंत्रावर पूजा करावी असे सांगितलें आहे. सगुणोपासन अगर साकारोपासन याचें अस्तित्व पहिल्यापासून आहे, परंतु मानवामधील मनोदौर्बल्यामुळे ध्यानावाहित देवतेचें ध्यान पूजासमाप्तीपर्यंत एकाग्रतेने न राहिल्यानें ध्यानावस्थित देवतेच्या ध्यान-सदृश मृण्मय, वालुकामय अगर पाषाणमय देवताही मूर्तिपूजा–कर्माकरिता प्रचारात ठेवल्या होत्या. पण यावरून यंत्रमय पूजेचा एक कालखंड व मूर्तिमय पूजेचा एक कालखंड असावा असें अनुमान काढण्याचें कारण नाही. मानवसमाजाची बौद्धिक उन्नति होत आहे, असें आज आपण म्हणतो, परंतु खरी स्थिति अशी आहे कीं, आजही पृथ्वीतलावर असे मानववंश कीं, जे वन्यपशूच्या मांसावरच केवळ आपली क्षुधाशान्ति करीत आहेत. म्हणून एवढे म्हणता येईल कीं, मानववंशात निरनिराळ्या काहीं कमीअधिक प्रमाणानें मानवी संस्कृति कमीअधिक होत असते. तंत्रपूर्वकाळीं अग्निपूजा व सूर्यपूजा तंत्र या नावानें नव्हे, परंतु तत्वानें तंत्रवर्णित यंत्र व प्रतिमापूजा थोड्या अधिक प्रमाणानें अस्तित्वात असलीच पाहिजे. आजच्या कलियुगाच्या कालखंडात केवळ अग्नि उपासना करणारे 'अग्निमुखा वै देवा' असे म्हणून अग्निकुंडात समिधाहुती व आज्याहुती देणारे अग्निहोत्री आहेतच. गृह्याग्नि ठेवणारे व अमावास्येला इष्टी करणारे आहेतच. अग्न्युपासक पारसीक (पारशी) आहेत. केवळ मंत्रपाठक आहेत व केवळ मूर्तिपूजकही आहेत.

श्रीकोल्हापुरनिवासिनी महालक्ष्मीचे सन्निध श्रीयंत्राची स्थापना आहे. श्रीतुळजाभवानीची चरमूर्ति आहे व त्या मूर्तीच्या पायाखालीं श्रीयंत्र आहे. हरिद्वार येथें श्रीगायत्रीदेवीचें खालीं गायत्रीयंत्र आहे. काशी येथें

अन्नपूर्णेच्या मंदिरांत उजव्या बाजूस शिवलिंगावर श्रीयंत्र आहे. याप्रमाणे गुप्त अगर प्रगट रूपानें प्रत्येक प्रसिद्ध पीठदेवताचे जवळ अगर पायाशी श्रीयंत्राची अगर त्या विशिष्ट देवतेच्या यंत्राची स्थापना केलेली आहे, असें दिसून येतें.

गायत्रीमंत्राची उपासना व जप करिताना गायत्रीयंत्र पुढें ठेऊन त्याची षोडशोपचारें पूजा करावी. श्रीभगवत्पूज्यपाद आद्य शंकराचार्यांनी श्रीगायत्रीपुरश्चरणाचें विधान लिहिलें आहे. त्यातील यंत्र निराळ्या प्रकारचें आहे. कारण निरनिराळ्या संप्रदायात निरनिराळी योजना असते.

मंत्र सिद्ध होण्यास ब्रह्मचर्य[1], शुचिर्भूतपणा[2], व इंद्रियनिग्रह या गोष्टी मुख्य आहेत. तन, मन, धनेंकरून देवताराधना आवश्यक आहे. मंत्र-सिद्धि होण्याचेपूर्वी तीन घटनाकाळ असतात. पहिल्या काळात उपद्रव होतात अशा काळात न डगमगता मंत्राराधना सुरू ठेवावी हा पहिला घटनाकाळ होय. या काळात अजपाजपविधान[3] चालू ठेवावें व मूळमंत्राचा उद्देश लक्ष्यात ठेऊन जप करावा. दुसऱ्या काळात दृष्टांत होतात व तिसऱ्या काळात मन आनंदभरित होतें. जप पूर्ण झाल्यावर तर्पण व होमहवन करणें आवश्यक आहे. होमहवनानें देवता संतुष्ट होते व

---

१. योगशास्त्रात मंत्रयोग व सिद्धि ह्यासाठीं सोळा अंगें सांगितलीं आहेत. तीं अशीं.—भक्ति, शुद्धि, आसन, पंचांगसेवन, आचार, धारणा, दिव्यदेश सेवन, प्राणक्रिया, मुद्रा, तर्पण, हवन, बलि, याग, जप, ध्यान, समाधि त्याचें स्पष्टीकरण 'नामचिंतामणि २ री आवृत्ति शके १८९० यांत पहा!

२. ब्रह्मचर्य म्हणजे काम–प्रेरणेशीं संबंध असणाऱ्या वृत्तीला ताब्यात ठेवणें अशाच नसून आपल्या कर्मेंद्रियें व ज्ञानेंद्रिय या मार्फत शक्तीचा नित्य जो व्यय होतो. तो अडवून त्या त्या शक्तीचा संचय करणें, असा अर्थ अभिप्रेत आहे (गो. प्र. भा.)

३. याच पुस्तकात पुढे दिली आहे. तसेच याच ग्रंथकाराच्या 'सार्वजनिक प्रार्थना' या पुस्तिकेंत सविस्तर माहिती आहे (गो. प्र. भा)

त्यामुळें मंत्रसिद्धि तत्काळ होते. होमहवनांबद्दल अधिक जपाचा प्रतिविधि सांगितला आहे; परंतु त्या प्रतिविधीनें इष्ट कार्य सिद्ध होतेंच असें नाहीं.

११. मंत्रांचे संस्कार

सर्व प्रकारच्या मंत्राबद्दल माहिती दिल्यानंतर आतां संस्कार या मुद्याबद्दल विवरण करणें क्रमप्राप्त आहे. 'सम्यक्–करणं संस्कारणम्' असा या शब्दाचा विग्रह करितां येईल. कोणत्याही पदार्थाला पूर्वस्थितींतून उच्चस्थितींत आणणें, हा त्या पदार्थावर झालेला संस्कार होय, किंवा कोणत्याही वस्तूतील न्यूनता काढून टाकण्याची क्रिया हा त्या वस्तूवरील संस्कार होय. कोणत्याही निर्जीव अगर सजीव वस्तूच्या ठिकाणीं *असलेल्या गुप्त शक्तीचा विकास, व त्यांचे ठायीं त्या विकासाचें स्थिरीकरण अथवा गुप्त गुणाचा आविर्भाव व त्यांचें संवर्धन ज्या क्रियांनी अगर क्रियासंभारांनी होतात त्यांस 'संस्कार'* म्हणावें.

दोन पैशांचे किमतीचा हिऱ्याचा दगड घेऊन त्यावर संस्कार केल्यानें त्याची किंमत दोन लाख होते. एका संगमरवरी दगडाची जी मूर्ति पेशवाईंत, भिवा सुतार यानें तयार केली, व मुंबई येथील श्रीमाधवबागेंत जिची स्थापना झाली, त्या मूर्तीसारखी मूर्ती हिंदुस्थानांत मिळत नाहीं. अशी ही मूर्ती सर्व आस्तिक– नास्तिक मनुष्यांस पूजार्ह झालेली आहे. भिवा सुतारानें सूक्ष्म हत्यारांच्या संस्कारांनीं तयार केलेली ती मूर्ति आज सर्व जनतेस पूज्य व आदरणीय झाली आहे, याचें कारण संस्कारच होय. लेखनाचे साहित्यांतील लोखंडी टांक घ्या. लोखंड खाणींतून निघाल्यापासून दाह, छेद, ताडन–पाटन इत्यादि अनेक संस्कार झाल्यावर तो टांक लेखनास पात्र होतो. हा टांकाचा दांडा लांकडाचा आहे. त्या लांकडावरही अनेक संस्कार झाल्यावर त्याचा उपयोग लिहिण्याचे कामीं होतो. ज्या कागदावर लिहिणें चालू आहे, त्या कागदाच्या मूळ स्वरूपावर किती तरी संस्कार झाल्यानंतरच तो लेखनक्षम होतो. याप्रमाणें कोणतीही

जड वस्तु संस्काररहित असता अव्यवहार्य असते परंतु संस्कार झाल्या-बरोबर त्या वस्तूला निराळेच स्वरूप प्राप्त होते ज्या इमारतींत बसून हा लेख लिहिण्यात येत आहे, ती इमारत, दगड, लाकूड, लोखड, चुना या उपकरणानी झालेली आहे, परंतु हे पदार्थ जसेच्या तसेच इमारतीला उपयोगात आणले नाहींत त्या प्रत्येक पदार्थाला काहींना काहीं तरी संस्कार झालेलाच आहे

उद्यानात दिसणारी नितांतरमणीय वृक्षराजी व त्या वृक्षराजीपैकीं एकाच वृक्षास दिसणारी निरनिराळ्या रंगाचीं पुष्पें ह्या गोष्टी संस्कारा शिवाय होत नाहींत, तबला, सतार, जलतरंग, पेटी अशा प्रकारचीं श्रुतिमनोहर वाद्यें तयार होतात त्यास तयार करण्यास किती तरी लोकांचे संस्कार कारणीभूत झालेले आहेत, याची यादीच तयार करावी लागेल. नाना प्रकारचें खाद्य, पेय, चोष्य पदार्थ मूळभूत जिनसांवर संस्कार झाल्याशिवाय त्याचा विनियोग मनुष्याच्या भोजनादि व्यवहाराकडे होऊच शकत नाहीं पदार्थांवर ज्या प्रमाणानें संस्कार झालेले असतात त्या मानानें त्या पदार्थांची किंमत वाढत जाते संस्कार न झालेले लोख डाच्या खाणींतून निघालेले दगड गाडयाच्या अगर पाट्याच्या भावानें विकतात. त्याच लोखडी दगडावर थोडा संस्कार होऊन लोखडी खांब, पत्रे, नळ्या, याची विक्री शेरानें अथवा मणानें होते. घडयाळाच्या कमानी ह्यापेक्षाही महाग मिळतात, व शिवण्याच्या पोलादी सुया त्याहीपेक्षा महाग असतात, व लोखडाचें लोहभस्म दहा रुपये तोळा विकले जाते. रुपयास पाच तोळे मिळणारें अभ्रक त्यावर जसजसे संस्कार जास्त होतील तसतशी त्याची किंमत वाढत जाते सहस्रपुटी अभ्रकास शभर दोनशे रुपये तोळा किंमत येते याप्रमाणे पाणी दिलेल्या तरवारीची किंमत वाढत जाते, त्याचें कारण संस्कारच होत.

पशु पक्षी यांवरही संस्कार झाल्यानंतर त्यांची किंमत वाढत जाते साधीं कुत्रीं चार आठ आण्यास मिळतात, परंतु काहीं जातीचीं कुत्रीं

हजार रुपये किंमतीला विकलीं जातात. जितक्या लायी उचीचा घोटा शभर रुपयास विकतो, तितक्या लायी उचीचा घोडा संस्कारानतर हजार रुपये किमतीस विकण्यात येतो, पेशवाईंत रिसाल्यातील घोडीं पन्नास अगर शंभर रुपयास विकत मिळत. परतु जर्दाचित्या म्हणून जो घोडा शिकवून तयार करण्यात आला होता, त्याची किंमत एक लाख रुपये झाली होती?

पशुपक्ष्यादि सजीव प्राणी व काष्ठादि जड पदार्थ यावरसंस्कार करण्यास मत्राची अपेक्षा असतेच असें नाहीं. परतु मनुष्याच्या सस्काराना मत्राची अपेक्षा असते. काष्ठावर संस्कार करण्यास सुताराची जरुरी आहे, तशीच रंधा, पटाशी, गुण्या, करवत, तासणी वगैरे हत्याराचीही आवश्यकता असते. सोनारास सोन्यारुप्याचे दागिने घडविण्यास सुताराच्या हत्यारापेक्षा सूक्ष्म हत्यारें लागतात. व जवाहिऱ्यास सोनाराच्या हत्यारापेक्षाही सूक्ष्म हत्यारें लागतात. आता चिंचपेटी करावयाची असल्यास किंवा एखादा वज्रटीके-सारखा दागिना करावयाचा असल्यास किंवा हिऱ्यास पैलू पाडावयाचे असल्यास सुतार व लाकूड, सोनार व सोनें आणि हिरा व जव्हेरी असूनच इष्ट कार्य होणार नाहीं, तर त्या प्रत्येक कलावताचीं हत्यारें असलीं पाहिजेत, तरच इष्ट कार्य होईल. त्याचप्रमाणे मनुष्यप्राण्यावर सस्कार करावयाचे असल्यास मनुष्याची बुद्धि जशी सूक्ष्म रूपरगविहीन व अमेय आहे, तशीच त्या मानवी बुद्धीवर सस्कार करावयाचे असल्यास त्याकरिता लागणारी हत्यारेंही सूक्ष्मतर रूपरगविहीन व अमेय असलीं पाहिजेत, व त्या कलावताचें सुमस्कृत मन हेही एक साधन असले पाहिजे अशीं हत्यारें म्हणजे मत्र होत प्राथमिक शिक्षणाची सुरवात करायचे वेळीं नम सिद्ध (ओनामासीध) हा मत्र वेड्यावाकड्या उच्चारानीं शिकवावा लागतो

वैदिकैः कर्मभिः पुण्यैर्निषेकादिर्द्विजन्मना ।
कार्यः शरीरसंस्कारः पावनः प्रेत्य चेह च ॥

ब्रह्मक्षत्रियविट्शूद्रा वर्णास्त्वाद्यास्त्रयो द्विजाः।
निषेकाद्याः स्मशानान्ताः तेषां वै मंत्रत क्रियाः॥
गर्भे कर्मत्रयं कुर्याज्जायमाने तथा दश।
ततः कर्मत्रयं चेति संस्काराः षोडशाः स्मृताः॥
षडेव जन्मसंस्काराः प्रोक्ताः स्त्रीशूद्रयोरपि।
चांडालादिषु चत्वारि मन्याः प्रोक्तास्त एव ते॥

मेरुतंत्र, परशुरामतंत्र.

ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य याना अवश्य असे गर्भाधानादि सोळा प्रकारचे संस्कार आहेत. ते सर्व वैदिक मंत्रानी करावे असा शास्त्रकाराचा आदेश आहे वरील अवतरणात 'ब्रह्मक्षत्रियविट्शूद्र' असे शब्द आहेत, त्यात शूद्र असा शब्दही आहे. स्त्रिया व शूद्र याना वेदाधिकार नसल्याने 'शूद्रोप्येव विधि कार्यो विना मंत्रेण संस्कृत' स्त्री, शूद्र, द्विज-वधू याचे संस्कार पुराणोक्त मंत्रानी करावे असे लिहिले आहे व त्रैवर्णिक स्त्रियांच्या संस्कारासंबधीं असें लिहिलें आहे कीं, "तूष्णीमेता क्रिया विवाहस्तु समंत्रक" (व्यवहार मयूख). जी स्त्रीजाती गर्भांत असताना तिचे तीन संस्कार वैदिक पद्धतीने होत असतात (गर्भ स्त्री अथवा पुरुष आहे हे समजणे शक्य नसल्यानें) ती जन्म झाल्याबरोबर पुढील वैदिक संस्कारास अपात्र ठरते. व स्त्रीचे उपनयन म्हणजे 'पाणिग्राहो विधि स्त्रीणामौपनायनिक परं' विवाहविधीच होय असे ठरलें, व स्त्रियानी व्रतवैकल्ये करावयाचीं असता श्रुतिस्मृतिफलप्राप्त्यर्थं असें न म्हणता पुराणोक्त असें म्हणावें असा दंडक आहे. विवाहविधींत सुद्धा स्त्रियानीं म्हणावयाचे वैदिक मंत्र उपाध्यायच म्हणताल, ते स्त्रियानी म्हणण्यास प्रतिबंध नाहीं पण त्याना ते मंत्र शिकवीतच नाहींत

विवाह झाल्याबरोबर एखाद्या गृहस्थाने अग्निहोत्र घेतल्यास त्याचे पत्नीस वेदमंत्र म्हणावे लागतात त्या दृष्टीनेंही स्त्रीजातीला थोडातरी वेदाधिकार आहे वेदमंत्रानीं संस्कार करण्याचा प्रतिबंध असला, तरीं

आगमग्रंथात आगमोक्त विधीनें स्त्रीशूद्रादिकांचे व अतिशूद्रांचे सुद्धा संस्कार करण्याचे विधी सांगितले आहेत.

वैदिक संस्कार एकंदर अठ्ठेचाळीस आहेत.

ऋतुमगमन, गर्भाधान, पुंसवन, सीमंत, विष्णुबलि, जातकर्म, उत्थान, नामकरण, अन्नप्राशन, प्रवासागमन, पिंडवर्धन, चोडक, उपनयन, पारायण व्रतबंधविसर्ग, उपाकर्म, समावर्तन, विवाह, हे १८ शारीरसंबंधीं संस्कार झाले. १९ पंचमहायज्ञ (ब्रह्म-देव-पितृ-भूत-मनुष्य-यज्ञ), २० स्थालीपाक, २१ आग्रयण, २२ अष्टका, २३ पिंडपितृयज्ञ, २४ मासिकश्राद्ध, २५ चैत्री, २६ अश्वयुजी, २७ आग्न्याधेय, २८ अग्निहोत्र, २९ दर्शपूर्णमास ३० आग्रयणेष्टि, ३१ चातुर्मास्य, ३२ निरूढ पशुबंध, ३३ सौत्रामणी, ३४ अग्निष्टोम, ३५ , ३६ उक्थ, ३७ षोडशी, ३८ वाजपेय, ३९ अतिरात्र व ४० आप्तोर्याम. गौतमधर्मसूत्रात आणखी आठ संस्कार सांगितले आहेत. १ भूतमात्रावर दया, २ क्षमा, ३ अनसूया, ४ शौच (अन्तर्बाह्य) ५ अनायास, ६ मांगल्य, ७ अकार्पण्य, ८ अस्पृहा, असे अठ्ठेचाळीस संस्कार आहेत.

या ४८ संस्कारांपैकीं गर्भाधान[1], उपनयन, समावर्तन, विवाह, व अंत्येष्टि असे पाच संस्कार व उपनयन व विवाहाचे वेळीं बाकीचे अकरा, असे १६ संस्कार आज सनातन धर्मावलंबी समाजात चालू आहेत वा मानिले जातात. हे संस्कार आज कोणासही नको आहेत. अशा प्रकारच्या षोडश संस्कारांपैकीं आज उपनयन, समावर्तन, विवाह, गर्भाधान व अन्त्येष्टि हे पाच संस्कार तरी आर्थसमाईक व सनातन धर्मावलंबी लोकांनीं कायम ठेवण्याचा प्रयत्न करावा.

---

१. मुलींची लग्नवयोमर्यादा वाढल्यामुळे गर्भादान हा संस्कार क्वचित्‌च होतो. त्या ऐवजीं क्वचित् 'आचमुळे' हा विधि करतात. करणारे योग्य ब्राह्मण (भटजी) न मिळाल्यामुळें अंत्येष्टि हा संस्कारपण 'भडाग्नि' देऊन यथातथाच होतो! (गो. प्र. भा.)

हे वरील संस्कार[१] नित्य आहेत व हे संस्कार पुरे करण्याकरिता उपनयन व विवाह संस्काराचे वेळीं उर्वरित संस्कार–लोपाबद्दल प्रायश्चित्त म्हणून गोनिष्क्रयदाने सांगितलीं आहेत. नैमित्तिक आणि काम्य कर्मे करावयाचीं असल्यास, ज्या मंत्राचे विनियोग सांगितले आहेत, त्या मंत्राची सिद्धि प्राप्त व्हावी म्हणून निराळे संस्कार[२] सांगितले आहेत. त्यांचे वर्णन पुढें दिले आहे

इष्ट फलप्राप्त्यर्थ मंत्रसिद्धि प्राप्त व्हावी म्हणून ऋग्विधानात सांगितले आहे कीं, साधकानें पापदोपनिवृत्तीकरिता चांद्रायण व्रते करावीं.

---

२. संस्कार : मंत्र सिद्ध होण्यासाठीं त्यावर संस्कार करून त्यात चैतन्य आणावें लागते. ते संस्कार दहा असे आहेत :
मंत्रार्थं मंत्रचैतन्यं योनिमुद्रां न वेत्ति यः । शतकोटिजपेनापि तस्य विद्या न सिद्ध्यति ॥१॥ असें सरस्वती तंत्रात आहे. ते दहा संस्कार जनन, जीवन, ताडन, बोधन, अभिषेक, विमलीकरण, आप्यायन, तर्पण, दीपन, गुप्ति. गुरूने हें सर्व शिष्याला सांगून करवून घ्यावयाचे व मगच शिष्यानें त्याचा जप करावयाचा असतो ते संस्कार असे (१) योग शास्त्रोक्त मातृकाद्वारा, मंत्राच्या वर्णांचा उद्धार करणें म्हणजे जनन (२) मंत्रवर्णांच्या पंक्ति क्रमानें लिहून त्यातील प्रत्येक वर्ण प्रणवानें संपुटित करणें (निदान १० वेळा तरी) म्हणजे जीवन (३) मंत्रवर्ण पृथक् लिहून 'वं' मंत्रानें चंदनानें निदान १० वेळ तरी ताडन करावें (४) मंत्रवर्णांच्या संख्येप्रमाणें 'र' बीजानें लाल फुलांनीं मंत्राचें हवन करणें म्हणजे बोधन संस्कार झाला (५) मंत्रवर्ण लिहून मंत्रसंख्येनुसार 'र' बीजानें मंत्राचें प्रत्येक अक्षर रक्तकरवीर पुष्पानें मंत्रित करून विधीप्रमाणें अश्वत्थ पल्लवानें मंत्राच्या वर्णसंख्येनुसार सिंचन करणें म्हणजे विमलीकरण झालें. (७) मलत्रय नाशनासाठीं 'ॐ ह्रौं' या ज्योतिर्मंत्रानें सुवर्ण, दर्भ वा पुष्पें ह्यानें विधिपूर्वक 'आप्यायन' करणें (८), तसे ज्योतिर्मंत्रानें मंत्राला तर्पण करणें. (९) 'ॐ ह्रीं श्रीं.' ह्या अनुक्रमें तार–माया व श्री ह्या मंत्रानें मूळ मंत्राला दीपन करावें (१०) मंत्र गुप्त ठेवणें झाला गुप्ति म्हणतात. (गो म. भा)

एकेन शुद्धिमाप्नोति द्वाभ्यां पापैः प्रमुच्यते।
त्रिभिः सिध्यन्ति मंत्राश्च मुच्यते चोपपातकैः।
अष्टभिर्देवताः साक्षात् पश्यते वरदास्तथा
छंदांसि दशभिर्ज्ञात्वा सर्वान् कामान् समश्नुते।

या चांद्रायण व्रताखेरीज कृच्छ्रचांद्रायण, प्रजापत्यविधि, सांतपन, महासांतपन, शिशुसांतपन, पराकृच्छ, असे आणखी प्रायश्चित्ताचे प्रकार आहेत अशीं दहा चांद्रायणव्रतें झाल्यावर सात सात दिवसाप्रमाणें यावकाकण, पिण्याक व तक्र हें सेवन करून त्वक्, असृक्, पिशित, अस्थि, मेद, मज्जा आणि वीर्य या सात पदार्थांची शुद्धि एकुणपन्नास दिवसांत करावी व नंतर 'प्राणायामैर्दहेद्दोषान् मनोवाक्कायसंभवान्' प्राणायामांनीं मानसिक, वाचिक, शारीरिक दोषाचा नाश करावा. व नंतर 'मंत्राणां सिद्धिकामार्थी पुरश्चरणमाचरेत्' यानंतर मंत्रसिद्धीकरिता पुरश्चरण करावें

१२. वैदिक मंत्रांचें पुरश्चरणविधान

पंचांगोपासनेनेष्टदेवता प्रीतिदानतः।
पुरश्चति भक्तस्य तत्पुरश्चरणं प्रिये॥

पंचांग उपासना (कवच, पंजर, न्यास, ध्यान, आणि मंत्रजप) करून इष्टदेवता प्रसन्न करून घेणें हेंच पुरश्चरण आहे पुरश्चरणाचा अर्थ पूर्व क्रिया अर्थात् देवीपाशीं मागणें मागण्यापूर्वी जी क्रिया करावी लागते, तीच होय परंतु व्यवहारांत कोणापासूनहि कांहीं मिळावें अशी इच्छा धरली तर त्या व्यक्तीची थोडीबहुत सेवा प्रथम करावी लागतेच, देवतेकडून कार्य साधना व्हावी म्हणून देवीची सांग उपासना करून प्रथम त्या देवतेची कृपा संपादन करावी लागते त्यानंतरची जी कांहीं इच्छा-मागणें असेल तें निवेदन करावें लागतें

सांगो जपो महादेवी पुरश्चर्येति गीयते (यामल)
कृतेन येन (पुरश्चरणेन) लभते साधको वाञ्छितं फलं
(पुरश्चरणचंद्रिका)
पुरश्चरणहीनस्य मंत्रसिद्धिर्नजायते (वीरचूडामणि)
पंचांगोऽयं महायागः पुरश्चरण संज्ञकः (विष्वक्सेन)

पुरश्चरण पंचांग म्हणजे जप, होम, तर्पण, मार्जन, ब्राह्मणभोजन. पुरश्चरण सुरू करण्यापूर्वी चांद्रायण व्रत करावें. चांद्रायण व्रत म्हणजे मासारभात भोजन. १५ घासाच्या भोजनाचा अभ्यास करावा लागेल. नंतर शुद्धप्रतिपदेपासून पौर्णिमेपर्यंत एक एक घास कमी करणे. पौर्णिमेला एक घासाचेंच भोजन करणे आणि वद्य प्रतिपदेपासून एकेक घास वाढवीत जाणें. हविष्यान्नाच्या पदार्थांचे भोजन असावें अगर एकान्न भोजन उचित आहे. नंतर वद्य चतुर्दशी मंगळवार युक्त असेल तर ती घ्यावी व शुद्ध अष्टमीस जप समाप्त करावा नंतर जपाचे दशांश हवन. त्याचे दशांश तर्पण. त्याचे दशांश मार्जन व त्याचे दशांश ब्राह्मणभोजन. याप्रमाणें 'कलौचतुर्गुण प्रोक्त' या वाक्याप्रमाणे चार वेळ अशीच क्रिया करावी.

'विनाच समय देवी न ददाति फल क्वचित्,' फळ मिळाले नाही तर निराश होऊ नये. तस्मात् काल प्रतीक्षेत. आपल्या पूर्वजन्माची बंधनें प्रतिबंधक होत असतात. असे चार वेळ पुन्हा चार वेळ असें सोळा वेळ करावें. कार्य होईल हे निश्चित, 'अत्युत्कटै पुण्यै फल भवति तत्क्षणात्' कार्यसिद्धि होते. मागील जन्माचे प्रतिबंध फेडले जातात.[1]

साधारणत वैदिक मंत्राच्या सिद्धीकरिता वर लिहिलेल्या विधानापेक्षा

---

1. जीवहीनो यथा देहः सर्व कर्मसु न क्षम ।
पुरश्चरण हीनोऽपि तथा मंत्र प्रकीर्तित ।
तस्माद्गुरो स्वयं कुर्यात्कुर वा कारयेत बुध (योगिनी हृदये)
आदौ पुरश्क्रिया कुर्यात् चरित फलसिद्धये (काली तंत्रे)
अकृत्वा तु पुरश्चर्या यो यत्कर्म समाचरेत् ।
तत्सर्वंचाभिचाराय जायते नात्र संशय ।

सुलभ व कमी कष्टसाध्य अशी एक योजना खालीं देण्यात येत आहे–

प्रथमत ब्रह्मकूर्च विधीनें प्रायश्चित्त घेऊन त्रिकाल-स्नान करावें. बिल्ववृक्षाखालीं एका स्थानावर बसता येण्यासारखी झोपडी करावी, तेथें पाच लक्ष प्रणवाचा जप करावा. दुग्धाहार अगर एकान्न नक्त भोजन करावें. वस्त्र दर्भमय अगर तागाचें अगर केळीच्या दोराचें असावें शिखा व यज्ञोपवीतास दर्भ बाधावा. मौन असावें, व जपसंख्या नियमित असावी. ग्राम्य पशूंचा शब्द ऐकू येऊ नये. पाच लक्ष जप झाल्यावर पन्नास हजार तर्पण, व पाच हजार घृताक्त तिळाच्या द्रव्याचा होम करावा. ब्राह्मणभोजन शक्य नसल्यास पाच हजार प्रणवाचा जप करावा. असें शक्य न झाल्यास, वरील सर्व नियम पाळून सूर्यग्रहणात जप करावा. जितका जप होईल, त्याचे दशांश तर्पण, दशांश हवन, व दशांश ब्राह्मणभोजन करावें. नतर 'भूर्भुव स्व' या व्याहृतींचें तीन लक्ष पुरश्चरण करावें. पुरश्चरणास आरंभ करिताना तीनशें व्याहृतींनी अभिमन्त्रित

तस्मादादौ पुरश्चर्यां कृत्वा कर्मणी साधयेत् (आदि यामले)
पचागोऽय महायाग पुरश्चरणसज्ञक ।
अस्य पचाग यागस्य कला हन्ति षोडषीम् । (वैष्वकसेन्याम्)
मत्रो राजा पुरश्चर्या राज्यसंपत्तिरीरिता ।
संपत्त्यातु विना राजा शोभते न महेश्वरी ।
सपत्तिमूलमेतद्धि सर्वमेन प्रकीर्तितम् । (तत्रसार)

राजलक्ष्मी प्राप्त व्हावी म्हणून श्री विद्यारण्य स्वामींनीं तपश्चर्या केली. पण ती फलदायी झाली नाहीं ! यामुळें त्यानीं सन्यास घेतला–संन्यास घेता क्षणींच देवी साक्षात् प्रकट झाली व लगेच त्याच्यापुढें सोनाची धार ओतली ! 'आता मी संन्यासी झालों. मला द्रव्य नको' असें सागत असतानाही त्याच्यापुढें सोनाचा पाऊस पडत राहिला !! यावरून बोध दोन प्रकारचा निघतो. तो असा– एकतर जन्मातरित अडथळे नाहींसे व्हावे लागतात. कालवेळ यावीच लागते ! तरच फलित मिळतें. दुसरा बोध म्हणजे क्रिया झाली कीं त्याची प्रतिक्रिया झाल्याशिवाय रहात नाहीं. ज्या मत्राची उपासना केली गेली त्याचा परिणाम घडतोच. आघात–प्रत्याघात ही स्पदनेच. (गो. प्र. भा.)


जलानें स्नान करावें, त्यानंतर तीन लक्ष गायत्री मंत्रानें गायत्रीपुरश्चरण करावें. अशीं तीन गायत्री-पुरश्चरणें झाल्यावर वैदिक मंत्राचें पुरश्चरण मागील स्तंभांत सांगितल्याप्रमाणें करावें. म्हणजे वैदिक मंत्रोक्त हेतु साध्य होतात व त्यांच्या देवता प्रसन्न होतात.

प्रथम[1] ब्रह्मकूर्चविधी करून गायत्री मंत्राचा एक लक्ष जप करावा. पुण्यनदीच्या पात्रांत नाभिमात्र उदकांत उषःकालीं स्नानानंतर उभें राहून मध्यान्हापर्यंत इष्टमंत्र जपावा. परान्न घेऊं नये. मौन धारण करावें. दोन प्रहरीं वेदाध्ययन करावें. अशा प्रकारानें तीन वर्षें जप केल्यास वैदिक मंत्राची सिद्धि होते. वैदिक मंत्रांसही शापमोचन, उत्कलीन, संजीवन वगैरे करावें लागतें.

आतांपर्यंत मंत्र घेणारास लागणाऱ्या संस्कारांचा ऊहापोह केला. यापुढें मंत्राच्या संस्काराबद्दल विवेचन करावयाचें आहे. ..

विधि— जननं जीवनं पश्चात् ताडनं बोधनं तथा।
अथाभिषेको विमलीकरणाप्यायने पुनः।
तर्पणं दीपनं गुप्तिर्दशैता मंत्रसंस्क्रियाः।

जननं : गोरोचनानें भूर्जपत्रावर मंत्र लिहून त्याचेभोंवतीं बाजूस दिल्याप्रमाणें त्रिकोण काढावा. पश्चिम कोणापासून त्याचे सात भाग करावे. याप्रमाणें ईशान्यादि कोणाच्या नऊ घटका पडतात, त्यांत नऊ व चार मातृका लिहाव्या. अकारापासून हकारापर्यन्त



१. ब्रह्मकूर्चविधि – ठराविक जातीचे व लांबीचे दर्भ घेऊन त्यांचा कुंचल्याकारचा जुडगा बांधून त्यानें मार्जनादि क्रिया करणें.

ईशान्येपासून पश्चिमेपर्यन्त लिहाव्या. त्या भूर्जपत्रावर देवीचे आवाहन करावें व चदनादिकांनी पूजा करावी.

दीपनं : 'हस + इष्टमत्र + सोह' याप्रमाणे सहस्र जप करावा.

बोधनं : 'हस + इष्टमत्र + हस', याचा पाच हजार जप करावा.

ताडनं : 'फट् + इष्टमत्र + फट्', याचा एक हजार जप करावा.

अभिषेक : 'ऐं हस ॐ' हा मत्र प्रथम, नतर इष्ट मत्र व नतर 'ऐं हस ॐ' हा मत्र भूर्जपत्रावर लिहून अभिषेक करावा.

विमलीकरणं : 'ॐ त्रीं वषट् + इष्टमत्र + वषट् त्री ॐ' याचा एक हजार जप करावा.

जीवनं : 'स्वधा + वषट् + इष्टमत्र + वषट + स्वधा' याचा सहस्र जप करावा.

तर्पणं : दुग्ध, घृत व जल यांनी त्या भूर्जपत्रावर लिहिलेल्या मत्रावर एक हजार तर्पण करावें

गोपनं : 'ह्रीं + इष्टमत्र + ह्रीं याप्रमाणें एकहजार जप करावा.

आप्यायनं : 'हसो + इष्टमत्र + सोह्' यानी एक हजार जप करावा. (नित्योत्सव[1])

गायत्र्यादि मत्राना साधकानी शाप दिलेले आहेत. प्रत्यक्ष गायत्री-मत्र जपकर्त्याला ब्रह्मशाप, विश्वामित्रशाप, वशिष्ठशाप, शुक्रशाप असे चार शाप आहेत याचे निवारण 'ब्रह्मशापात् विमुक्तो भव' याप्रमाणे शापविमुक्ती करावी तसेंच आणखी एक विधान आहे. ते असे – सर्व

---

१. सरस्वती तत्रात हेच विधि थोडयाफार फरकानें दिलेले आहेत. शाप म्हणजे मत्रशुद्धि – म्हणजे ज्या उपयाने तो मत्र बधनरहित होईल तो उपाय. याचा अर्थ त्या मत्रासबधाचें आपलें अज्ञान नाहींसे करणें. राम, शकर, सावित्री इत्यादि देव-देवतानीं मत्राना शाप दिले आहेत. देवी भागवतात सध्येंतील गायत्री मत्राला दिलेल्या शापनिवृत्तीसाठीं 'देवी गायत्री – विरिंची वसिष्ठ – विश्वामित्र – वरुणशापेभ्यो मुक्ता भव.' एवढा त्रोटक मत्र दिला आहे. (गो. प्र. भा.)

गायत्रीमंत्र म्हणावा, नंतर 'त्र्यंबकं यजामहे' हा मंत्र म्हणावा, नंतर 'जातवेदसे सुनवाम' हा मंत्र म्हणावा. असा गायत्र्यादि सप्तकोटि महामंत्राच्या शापविमोचनाचा विधि आहे. नंतर सर्व व्याहृतींसहित गायत्री मंत्रानंतर 'जातवेदसे' हा मंत्र व नंतर 'त्र्यंबकं' हा मंत्र म्हणावयाचा. ह्या विधीने मंत्राचे उत्कीलन (खीळ काढणे) साध्य होतें. नंतर सर्व गायत्रीमंत्र व 'परोरजसे सावदो' हा चतुर्थपाद व 'हंसः सोहं' हा मंत्र व नंतर त्या संबंध मंत्राचा विलोम करावा. या पुढील प्रकार गुरूकडून समजून घ्यावा.

मंत्रजागृति : ही मंत्रजागृति गुरूने करावयाची असते. अग्निरूप म्हणजे रौद्रमंत्र असल्यास इडानाडी चालू असताना 'ॐ र' या बीजानी युक्त अशी त्या मंत्राची जागृति करावी. सौम्य मंत्राची जागृति उपरिनिर्दिष्ट बीजानी युक्तच परंतु पिंगला नाडी चालू असता तो जप करावा. याप्रमाणे प्रबोधकाळीं तो मंत्र जागृत होतो, अथवा 'ल व' हीं बीजें मंत्राचे मागें-पुढें लावून मंत्रातील प्रत्येक अक्षराला बिंदु लावून, (जसें अं-आं-कं इत्यादि) मंत्र जपावा, किंवा केवळ मंत्राक्षरांना विसर्ग लावून त्रिकाल मंत्र जप करावा. याप्रमाणे विधान केलें तर मंत्र जागृत होतो.

(मेरुतंत्र.)

इतर मंत्रांचे शापोद्धार व पुरश्चरणाचे विधिविधान.

शाबर[१] मंत्राची जागृति म्हणजे संस्कार कसे करावे ह्याचें वर्णन खालीं देण्यात येत आहे—

शाबर मंत्रांपैकीं प्रत्येक मंत्राला निरनिराळ्या देवताचे शाप आहेत ह्या मंत्राची जागृति करण्याचे विधि खालीं लिहिल्याप्रमाणें आहेत—

---

१. शाबर मंत्राचें फार मोठें वाङ्मय सांप्रदायिकांत उपलब्ध असून त्यांतही कांहीं मंत्रांना वैदिक बीजें लावून सिद्ध करणें व वाममार्गी पद्धतीनें क्षणभर मंत्र सिद्ध करणें असे प्रकार आहेत. (गो. प्र. भा.)

१ जागृति : मुमुक्षूनें मंत्रसिद्धीकरिता काश्याचें भांडें भस्मानें शुद्ध करावें. तें भांडे समोर ठेवून रविवारीं रात्रीं स्नान करून प्रत्येक प्रहराचे प्रारंभीं इष्टमंत्राचा एकशेंआठ जप करावा व चतुर्थ प्रहराचा एकशेंआठ जप झाल्यावर खैराची काठी घेऊन त्या भांड्यावर मारून तें भांडें वाजवावें, व 'हे मंत्र जागृतो भव' असें म्हणावें, म्हणजे तो मंत्र जागृत होतो. नंतर सोमवारीं प्रातःकाळीं स्नान संध्यादि कर्मे संपल्यावर भैरवाला वडेभाताचा बलि द्यावा. व इतर देवांना नारळ फोडावा.

२. शोधन : मुमुक्षूनें सिद्धासनावर बसून म्हणजे सिद्धासन[1] घालून मूलबंध करावा. नंतर मूलाधाराचे ठिकाणीं चित्स्वरूप कुंडलिनीचें ध्यान करावें, व शिष्यास जो मंत्र द्यावयाचा तो मंत्र दोषरहित झाला आहे, अशी भावना करून आपल्या गुरूचें चिंतन करावें, व नंतर मूलाधारा पासून सुषुम्ना मार्गांत इष्टमंत्राच्या अक्षरांचें चिंतन करावें, व जाता जाता मणिपूर, अनाहत, विशुद्धि व आज्ञाचक्रें यांचा भेद करीत करीत ब्रह्मरंध्रांत जाऊन सोममंडळांतील अमृतानें मंत्रवर्णांवर सिंचन करावें. नंतर तो मंत्र ऋष्या-[2]दिन्यासपूर्वक एक हजार आठ वेळा जपावा, अशा प्रकारानें तो मंत्र शापनिर्मुक्त झाल्यानंतर त्या मंत्राचा उपदेश करावा. वाचिक

---

१. आसनें, बंध, कुंडलिनी इत्यादि योगशास्त्रीय प्रक्रियांची माहिती तज्ज्ञ गुरूकडून घेऊन त्यांचे देखरेखीखालीं अनुभवून मगच आचरण करावें हें चांगलें. (गो. प्र. भा.)

२. न्यास बीजन्यास, मातृकान्यास, करन्यास, अंगन्यास, ऋषि इत्यादि अनेक प्रकारचे न्यास असून गुरुचरित्रांत (अध्याय ३६) त्यांचें स्पष्टीकरण दिलेलें आहे. 'पूजातत्त्व व यज्ञतत्त्व' ह्या दोन उत्तम बंगाली सत्पुरुषाच्या ग्रंथांत विज्ञानासह न्यास व मुद्रा ह्यांचें स्पष्टीकरण केलें आहे त्याचें हिंदी भाषांतर अलीकडे डॉ. गोपिनाथ कविराज यांनीं केलें आहे. तसेंच गायत्री मंत्राच्या प्रत्येक अक्षर त्यांचीं तत्त्वें, त्यांचे न्यास मुद्रा हीं दण्डीस्वामींच्या 'मानवता पूर्तिसाधना'त पृष्ठ १६१ यात पहा. (गो. प्र. भा.)

शापाच्या नाशाकरिता व पूर्वजन्मसंभूत पापाच्या शमनार्थ आणखी एक संजनन (सजीवन) नावाचा विधि सांगितला आहे.

३. **संजनन** : चंदनाच्या अथवा आम्रवृक्षाच्या पाटावर कस्तूरी व केशर यांच्या गंधानें पंचकोणात्मक यंत्र लिहावें व एकावन्न मातृकारूपी सरस्वतीचें आवाहन करावें (एकावन्न मातृका–अक्षरे वा वर्ण लिहून) यथाविधि श्रीसरस्वतीची श्रीसरस्वतीबीजानें (ऐं) षोडशोपचार पूजा करून, इष्टमंत्राचा एकशेंआठ वेळा जप करावा. नंतर गुरूंनीं सांगितल्याप्रमाणें पात्रस्थित लिखित मंत्रातील विसर्ग, स्वर, व्यंजन, बिंदु आदि अक्षरें पूजा केलेल्या पाटावरून आपल्या दृष्टीनें व भावनेनें आपल्या मनात ध्यानानें आणावीं, ह्याला मंत्राचें संजनन म्हणतात.

४. **जीवन** : मंत्राच्या आदि व अंतीं प्रणव योजून त्याचा एकशें-आठ जप करावा.

५. **ताडन** : भूर्जपत्रावर इष्टमंत्र गोरोचन व केशर यांनीं लिहून काढावा, व 'य' या वायुबीजानें म्हणजेच बीजाचा उच्चार करून बिल्वयष्टीनें भूर्जपत्रावर लिहिलेल्या मंत्राक्षरातील प्रत्येक अक्षरावर शंभर वेळा ताडन करावें. याप्रमाणे कुंठित झालेले शाबरमंत्र ताडनानें सिद्धि-दायक होतात.

६. **बोधन** : पूर्वीं वर्णन केलेल्या पाटावर इष्टमंत्राचीं अक्षरें लिहावीं आणि मंत्राक्षराइतकीं करवीरकुसुमे आणून, वन्हिबीजाचा (र) उच्चार प्रत्येक मंत्राक्षराबरोबर करून एक एक फूल त्या पाटावर वहावें ह्या क्रियेला बोधन म्हणतात.

७. **अभिषेक** : पूर्वींप्रमाणें पाटावर पूर्वीं सांगितलेल्या द्रव्यांनी अष्टदल कमल काढावें त्या कमलाच्या कर्णिकावर मालतीच्या कळीनें मंत्रात जितकीं अक्षरें असतील तितक्या वेळा मंत्रातील एक एक अक्षर लिहावें. नंतर पिंपळाचीं पानें घेऊन त्यांनीं मंत्राचा उच्चार करिताना शेवटीं 'नमः' असें म्हणून त्या मंत्रावर सिंचन करावें अशा एकशेंआठ

वेळा सुगंधि द्रव्यांनीं मंत्रावर अभिषेक केला तर त्या विधीस अभिषेक असे म्हणतात.

८. विमलीकरण : मूलाधारांतील अग्निमंडळांत 'ॐ ह्रौं' या मंत्रानें इष्टमंत्र दग्ध झालेला आहे, असे चिंतन करावें. मंत्रामध्यें आणव, कार्मिक आणि मायिक असे तीन[१] प्रकारचे मल असतात. वरील ज्योतिर्मंत्रानें म्हणजे 'ॐ ह्रौं' या मंत्रानें हे मल दग्ध झाले आहेत असे चिंतन करावें, ह्या विधीला विमलीकरण म्हणतात.

९. आप्यायन : पूर्वीप्रमाणे पाटावर कुंकुमादि द्रव्यांनी इष्टमंत्र लिहून काढावा. ताम्रादिपात्रांत कर्पूरवासित जल भरावें व त्यांत इष्टमंत्र १०८ वेळा कुशपुंजानें (दर्भांनीं) वरील पाटावर व ताम्रपात्रावर मंत्राक्षराच्या संख्येच्या प्रमाणानें प्रत्येक मंत्राक्षर तीन वेळा म्हणून प्रोक्षण करावें.

१०. तर्पणम् : पूर्वी लिहिल्याप्रमाणें ताम्रपात्रांत कस्तूरी कुंकुमादि युक्त जलानें मंत्र लिहावा. दुसऱ्या भांड्यांत कर्पूरवासित जल घेऊन मंत्रान्तीं 'तर्पयामि नमः' असें म्हणून १०८ वेळा तर्पण करावें.

११. दीपनं : 'ॐ ह्रीं श्रीं' हीं बीजें लावून इष्टमंत्र १०८ वेळा जपावा.

१२. गोपनं : मंत्र गुरूकडून घेतल्यानंतर तो कोणास सांगू नये. हे गोपन होय

असे हे बारा संस्कार झाले यानंतर जप, होम, तर्पण, ब्राह्मणभोजन असे चार मिळून मंत्राचे सोळा संस्कार झाले.

---

१. तीन प्रकारचे मल : पुरुषोद्भूत मलास 'कार्मण'मल स्त्री उद्भूत मलास (दोषास) 'मायिक'मल व दोघापासूनच्या मलास 'आनव' मल म्हणतात. हे मल बाधक असतात, म्हणून ते दोष नष्ट होण्यासाठीं 'ॐ ह्रौं'' ह्या ज्योतिर्मंत्रानें मूळ मंत्राच्या वर्णांना सुवर्ण, दर्भ किंवा पुष्प या जलाचें सिंचन करावयाचें. (सरस्वती-तंत्र—गो. प्र भा)

मंत्रशक्ति जागृतीचा परिचय

मागील स्तंभात मंत्रशक्ति जागृत करण्याचें विधान व जागृत झाल्याचीं चिन्हे यांचे वर्णन झाल्यावर पुराणकालीं मानवाच्या ठिकाणीं मंत्रशक्ति जागृत असल्यानें त्या शक्तीचे उपयोग कसे झाले या मुद्याकडे वळू. रामायणकालीं श्रीविश्वामित्रऋषींनी रामलक्ष्मण यास 'बलातिबला' विद्या दिली. *अगस्ति ऋषींनी श्रीरामास व लक्ष्मणास शिवपंचाक्षरी मंत्रदीक्षा दिली* व वसिष्ठांना श्रीविद्येचा मंत्र दिला व मंत्रसिद्धिही दिली. लोपामुद्रेनें सीता देवीस अष्टादशाक्षरी विद्या दिली. पौलस्त्यऋषींनी मंत्रवेत्त्या रावणास श्रीविद्याउपदेश केला, व इंद्रजितास अग्निविद्या दिली व या विद्याचे त्यांना उपयोगही झाले. महाभारतकालीं द्रोणाचार्यांनी मंत्रशक्तीपैकीं मंत्रविद्या, व अस्त्रविद्या साध्य केली होती, ही गोष्ट प्रसिद्धच आहे. मंत्रविद्या, अस्त्रविद्या व शस्त्रविद्या अवगत असूनही द्रुपद राजाकडून त्याला मान मिळाला नाहीं व गुरुकुल स्थापन करून ज्ञानदान करण्याचे सोडून धृतराष्ट्राकडे त्यास जावें लागलें. धृतराष्ट्र व पंडू यांचीं मुलें कंदुकक्रीडा करीत असतां त्यांचा कंदुक एका विहिरींत पडला. मुलांना वाईट वाटलें. परंतु त्या ठिकाणीं सहजासहजीं श्रीद्रोणाचार्य आले व त्यांनी आपल्या मंत्रसामर्थ्यानें कंदुक काढून दिला. त्यावेळीं मुलांनीं घरीं जाऊन ही बातमी श्रीभीष्माचार्यांस सांगितली. तेव्हां हा ब्राह्मण कोण असा शोध काढून ते श्रीद्रोणाचार्य होते हे पाहून आपल्या नातवास मंत्रास्त्र व अस्त्रविद्या शिकविण्याकरितां श्रीद्रोणाचार्यांस ठेऊन घेतलें. हा भारतकालीन मंत्रविद्येचा परिणाम आहे. *गुरुगृहीं मुलास पाठविण्याच्या ऐवजी घरींच शिक्षक ठेवण्याची प्रथा श्रीभीष्माचार्यांनी पाडली. ही गोष्टच ब्राह्मणांच्या तेजोभंगाला कारणीभूत झाली व क्षत्रियांनाही ही प्रथा विनाशकारक झाली.* कारण कौरव मंडळी गुरुगृहीं राहून विद्या न शिकल्यानें उद्दट व अहंतामय झाले. पांडवही तसेच झाले असते पण

संकटपरंपरेनें घेरल्यानें व श्रीकृष्णाचा आश्रय असल्यानें ते इतक्या अहंपणाच्या नीच वृत्तीस पोचले नाहींत. हें थोडें विषयांतर झालें. परंतु त्यास नाइलाज आहे. कारण ब्राह्मणवर्गाच्या मंत्रविद्येच्या ऱ्हासाचा तो पाया आहे म्हणून त्याबद्दल लिहिणें आवश्यक वाटलें.

श्रीधर्मराजानी सूर्योपासना करून सूर्यमंत्र साध्य केला होता. त्याचें फळ एकदा स्वयंपाक करून थालीमध्यें ठेवल्यावर सायंकाळपर्यंत कितीही मनुष्य भोजनास आले तरी त्यास तें अन्न पुरत असे. श्रीभीमाना नवनागाचें बळ याच मंत्रशक्तीनेंच प्राप्त झालें होतें. श्रीअर्जुनानें पाशुपत विद्या साध्य केली होती. नकुलसहदेव यानीही पशुविद्या साध्य केली होती. भीष्माचार्यांना मंत्रविद्या व अस्त्रविद्या परशुरामानीं दिली. कर्णानें सूर्यदेवतेची आराधना करून कवच संपादन केलें होतें. हें कवच म्हणजे काहीं स्थूल सृष्टींतील शरीरत्राण नव्हे, तर *सूर्यकवचाची मंत्रशक्तीच होय*. दुर्योधनानें नाभिविद्या साध्य केली होती. भारतीय युद्ध संपल्यावर दुर्योधन एका तळ्यात जाऊन बसला त्याला शोधण्याकरिता श्रीकृष्ण आणि श्रीभीम आले व त्याला पाहिल्याबरोबर श्रीभीम तळ्यात उडी टाकू लागला तेव्हां श्रीकृष्णानी सांगितलें कीं दुर्योधनाला नाभिविद्या अवगत आहे. तळ्यात तू गेलास तर त्या विद्येच्या योगानें तुझा नाश होईल. पुढें श्रीभीमानें तीरावरून दुरुत्तरें केल्यानें दुर्योधनाला बाहेर पडण्याचा मोह झाला व तो भीमाकरवीं मारला गेला. असो.

रामायणकाळीं ऋषींचे मोठमोठे आश्रम अरण्यात असत. त्यांचे संरक्षण व संगोपन राजाकडून होत असे या आश्रमांतून ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य या वर्णांच्या विद्यार्थ्यांस त्यांच्या वर्णानुकूल व्यावहारिक विद्या देण्यात येत असे, व मंत्रविद्या व अस्त्रविद्या, ब्राह्मण व क्षत्रियवर्णांस दिली जात असे पुढें भारतकालांत मंत्रविद्यासंपादनार्थ गुरुगृहीं न पाठविता गुरूलाच नोकर ठेवण्याची प्रथा सुरू झाली त्यामुळें ऋषींची ज्ञानदानाची आश्रमसंस्था लयास जाऊ लागली व मंत्रयज्ञसंस्थेंत जसा आथर्वणवेदी

ब्राह्मण असावा असा नियम आहे, त्याप्रमाणेंच पुढें मंत्रशास्त्रज्ञ शुद्धाचरणी आचार्य प्रत्येक राजाच्या पदरीं असावा असा निर्बंध घालण्यात येत असे परंतु त्या नंतरच्या कालांत ही प्रथा बदलली.

भारतीय युद्धांत कौरवपांडव यांच्या सैन्यांत अनार्य म्हणजे वर्णाश्रमधर्मविहीन लोक आले होते. त्यांच्या पाठींमागून पुष्कळ अनार्य लोक भारतवर्षांत कायमचे येऊन राहिले. आर्य लोकांतील वर्णाश्रमधर्माच्या कडक बंधनांना कंटाळलेले आर्यही ह्या अनार्य लोकांत सामील होऊन राहूं लागले. अशा लोकांचा उद्धार व्हावा म्हणून त्यांच्यांत आगमोक्त विधीनें संस्कार करण्याचा प्रघात सुरू झाला. कारण त्या लोकांचे संस्कारविधि होऊं शकले नाहींत. याबद्दल उहापोह मागें आलाच आहे. भागवतांत एकादश स्कंधांत जनक व नवयोगी यांचा संवाद आलेला आहे. त्या नव योग्यांनी नवनाथ या रूपानें दहाव्या शतकांत अवतार घेतले व त्यांनीं ह्या आगमोक्त धर्माचा प्रचार केला ह्या नवनाथांनीं धर्मप्रसाराकरितां संस्कृत, हिंदी, मराठी, कानडी, बंगाली, अरबी, ह्या भाषांतून ग्रंथरचना करून नाथपंथ स्थापन केला.

नाथपंथांतील कडक बंधनांना कंटाळून किंवा वैदिक मंत्रसंस्थेंतील पशुहिंसा नापसंत झाल्यानें जैन सांप्रदाय वैदिक परंपरेंतून बाहेर पडला. नागार्जुनासारखे शबर मंत्रसिद्धि संपादन केलेले सिद्ध होऊन गेले नागार्जुन हा पूर्वींचा ब्राह्मण होता, परंतु मंत्रसिद्धीच्या संपादनाकरितां तो जैन सांप्रदायांत गेला व मंत्रसिद्धि संपादन केल्यानंतर पुन्हा प्रायश्चित्त घेऊन ब्राह्मण धर्मानें वागूं लागला आगममार्गांत अथवा तंत्रमार्गांत प्रसिद्ध असलेले तारा, बगला, धूमावती असे मंत्र नागार्जुनानें सिद्ध केले होते. मंत्रसिद्धीनें आकाशगमन म्हणजे अंतराळांतून वायुवेगानें जाता येणें ही सिद्धि त्यांनीं संपादन केली होती आगममार्गांत किंवा तंत्रमार्गांत पातंजल योगाच्याच क्रिया प्रकारांनें वर्णन केलेल्या आहेत अशा पातंजल योगांतील अष्टमहासिद्धि जैनाचार्यांनी साध्य केल्या होत्या, असे दाखले

जैन ग्रंथातून उपलब्ध आहेत. मणि व औषधी, या साधनानींहि सिद्धि प्राप्त होतात. जैन ग्रंथातून व नागार्जुनप्रणित ग्रंथातून औषधी-मणी व मंत्र यांचे वर्णन विस्तारानें केलेलें आढळतें. विद्या ही सर्वांपासून घ्यावी असा नियम आहे. म्हणून न्याय, व्याकरण, अलंकार इत्यादि जैनग्रंथ वैदिक लोकांनी म्हणजे वर्णाश्रम धर्मपालन करणाऱ्यांनीही शिरसावंद्य मानले. अतएव जैन सांप्रदायाची जी उन्नति झाली ती मंत्र सिद्धीनेंच झाली. जैन सांप्रदायातील विद्यालयांत ज्ञानसंपादन करून कुमारिलभट्टांनी जैनांच्या मंत्रविद्येवर ताण करून सुधन्वा राजाच्या दरबारात जैन पंडिताशीं वाद करून त्यास जिंकले. परंतु पुन्हा जैन-मंत्रवेत्त्यांनी एका घटात नाग ठेवून तो बंद केला व त्या घटातील वस्तू कुमारिलभट्टांनी सांगितली तर आम्ही हरलो अशी पैज घातली त्यावेळी कुमारिलभट्टांनी मंत्रसामर्थ्यानें प्राप्त झालेल्या अतींद्रिय ज्ञानानें घटांत नाग आहे व त्यावर शेषशाई भगवान आहे असें सांगितले व घट उघडून पाहताच शेषशाई भगवानाची मूर्ती शेषावर दिसली त्यामुळें जैन पंडिताचा पराभव झाला. *मंत्रविद्येनेंच आर्यधर्माचा विजय झाला.*

जैन सांप्रदायामागून गौतमबुद्धाच्या बौद्धधर्माचा प्रसार झाला बौद्ध-धर्माचा प्रसार आर्यावर्तांतच नव्हे तर चीन, जपान, आसाम, सीलोन, मलाया, मेक्सिको, वगैरे सर्व देशात झाला. बौद्ध सांप्रदायांत हीनयान व महायान असे भेद पडले. या दोन्ही पंथभेदांत मंत्राचें महत्त्व होतें व आहे. चीन देशांत आर्यावर्तांतूनच एक पद्मसंभव नामक बौद्धधर्मी ब्राह्मण गेला व त्याने महायान पंथातील मंत्रयोगाची तत्कालीन चिनी लोकांस दीक्षा दिली. त्या महायान सांप्रदायांत नीलसरस्वती, पद्मावती, गौरी व धूमावती ह्या विद्यांचा प्रचार फार झाला. तिबेटातील लामागुरु हे या महायान सांप्रदायातील गुरु होत. पाश्चिमात्य लोक तिबेटांत राहून लामागुरूंचे चेले होऊन त्यांचेकडूनच मंत्रविद्या व तदंगभूत कमी दर्जाचे चमत्कार करावयास शिकून येतात. 'थियोडोर इलियान' यानें (इन

सीक्रेट तिबेट) 'तिबेटातील गुह्यमार्ग' या विषयावर ग्रंथ लिहिला आहे. त्यांत त्यानें आजही दर तासास पधरा मैल भूमीला स्पर्श न करिता प्रवास करणारे लांग गम पास (Long gam pass) या नावाच्या साधूचा अनुभव दिला आहे. आजमितीसही तिबेटात मंत्रविद्येची गुह्य साधनें चालू आहेत असें ऐकिवात आहे. व त्या साधनाच्या योगानेंच आजकाल पर्यंत तिबेट व तिबेटातील लामा हे प्रसिद्धीस पावलेले आहेत. आज तिबेट देश चीनच्या अंकित आहे तरी तेथें मंत्रविद्येंत प्रवीण लामा आहेत.[1]

जैन व बौद्ध सांप्रदायांत मंत्रविद्येची किती महती होती हे वरील वर्णनावरून दिसून येतें. नाथसांप्रदायातील सिद्ध पुरुषांनी मंत्रसिद्धीनें पुष्कळ चमत्कार केले. त्यांचे वर्णन नवनाथभक्तिसार ह्या मराठी ग्रंथांत आलें आहे. त्याचे पुन्हा येथें चर्वितचर्वण करण्यांत येत नाही. मंत्रसिद्धीचा उपयोग नवनाथांना पुष्कळ केलेला आहे एवढें खरें. नाथ सांप्रदायाचे आखाडे उत्तर हिंदुस्थानांत हिमालयाच्या पायथ्याशीं अथवा नेपाळ-भूतानसारख्या हिमालयातील गिरिकंदरांत उपलब्ध आहेत व त्या आखाड्यातील गुरूंचे ठायीं अद्यापही मंत्रविद्या जागृत आहे. तसे आखाडे (नाथपंथीयांचे) भारतवर्षांतील दक्षिण भारतवर्षांत दिसून येत नाहींत. म्हणजे नाथसांप्रदायातील मंत्रविद्येचा दक्षिणभारतांत लोप झालेला आहे. श्रीगोरखनाथाचे मराठी व संस्कृत भाषेंत योग या विषयावर कांहीं ग्रंथ आहेत, परंतु महाराष्ट्रदेशांत गोरक्षाचा आखाडा कोठेंच उपलब्ध

---

१. तिबेटी लामा विपुल शरीर धारण करून हवे तिकडे भ्रमण करणारे, सूक्ष्म शरीरानें पंचभौतिक देहातून बाहेर पडून कार्य करून येणारे बरेच लामा आहेत. त्यांपैकीं T Lobsang Rampa (वय सुमारें ६०० वर्षे व त्यांचे गुरु Dondrup Rampa वय सुमारें १५०० वर्षे) हे जिवंत असून ते सिद्ध पुरुष आहेत असें T Lobsang Rampa ह्यांच्या अनेक इंग्रजी ग्रंथांवरून दिसतें. सध्या भारतात असलेले तिबेटी लामा ह्या गूढमंत्रविद्येंत फार पुढें गेलेले आहेत. (गो. प्र. भा.)

नाहीं. श्रीत्र्यंबकेश्वराचे ब्रह्मगिरीचे पर्वतावर एक गोरक्षाची गुहा दाखविण्यात येते. व पर्वताचे पायथ्याशीं एक लहान आखाडाही आहे. परंतु त्या आखाड्यात मंत्रसिद्धीची परंपरा दिसत नाहीं.

महाराष्ट्रात नाथसांप्रदाय, श्रीज्ञानेश्वरमहाराज, श्रीनिवृत्तिमहाराज यांचेपासून प्रचारात आहे. परंतु निवृत्तिनाथांनी अथवा श्रीज्ञानेश्वरांनीं मंत्रविद्येची माहिती कोणास दिली नसावी व दिली असल्यास ती परंपरा लुप्त झाली आहे. लेखकाचे ऐकिवात असें आहे कीं, श्रीज्ञानेश्वरमहाराजांनीं आपल्या ज्ञानेश्वरींत मराठी भाषेंत मंत्र सांगितले आहेत. व पारा साध्य करण्याची क्रिया, व औषधी वनस्पतीच्या साह्यानें ताम्र्यापासून सुवर्ण बनविण्याची क्रिया संकेतानें सांगितली आहे. तथापि किमयेच्या उद्‌बोधक अशा कांहीं ओंव्या लेखकास मिळाल्या आहेत. परंतु त्यांचे वर्णन करणें हा ह्या ग्रंथाचा उद्देश नसल्यानें त्या येथें देण्यात येत नाहींत. परंतु वर लिहिल्याप्रमाणें ज्ञानेश्वरींतील मंत्रविद्या व किमया यांची परंपरा नष्ट झाल्यानें मंत्रविद्या व किमयेची विधानें नष्ट झालीं आहेत. ज्ञानेश्वरीच्या सहाव्या अध्यायात इच्छापूर्ति साध्य करण्याचा एक मंत्र आहे असें लेखकास समजलें आहे.

एकंदरींत महाराष्ट्रात नाथसांप्रदायिक मंडळींत भजनपरंपरा चालू आहे व मंत्रविद्या वरीक त्यास अवगत नाहीं. श्रीज्ञानेश्वरमहाराजांनी आपल्या अभंगात भागवतातील द्वादशाक्षरी मंत्राचा अनुवाद करून तो मंत्र जपावा असें नमूद केलें आहे व ज्ञानेश्वरीचा प्रत्यक्ष उपदेश झालेले आळंदीक्षेत्रात समाधिस्थ झालेले श्रीनरसिंहसरस्वतीमहाराज यांचे शिष्य श्रीअण्णासाहेबमहाराज आपदेव, आपदेवपुरा, नागपूर यांचेकडून लेखकास श्री वैष्णवी महाविद्या नावाचा महामंत्र मिळालेला आहे व श्रीज्ञाननाथ, सत्यामलनाथ, गुप्तनाथ, (ताईमहाराज देशपांडे) व चित्रकूट मठस्थ कै. वा. योगाभ्यानंद श्रीमाधवनाथ महाराजांकडून ते देवलोकीं गेल्यावर ऋग्वेदातील मन्युसूक्त म्हणत जा असा संदेश मिळाला आहे परंतु वैष्णवी

महाविद्या व मन्युसूक्ताचें निधान त्यास आयुष्याच्या चरम भागात मिळाल्यामुळे ती विद्या मिळूनही निरर्थक झाली आहे. सागावयाची गोष्ट ही की, आज नाथसांप्रदायिकांपैकीं मंत्रसिद्धि झालेले पुरुष क्वचितच पाहण्यात येतात

श्रीनाथसांप्रदायाचा महमदी धर्मांतील लोकांवर व विशेषत. महमदी धर्मांतील सुफी पथावर इतका पगडा बसला कीं सुफी पथी लोक गहिनीनाथाना गैबी अवलिया, मत्स्येंद्रनाथाना बावा मलग (मुंबई कल्याण-जवळील डोंगरावर हें स्थान आहे, तेथील पुजारी वंशपरंपरा केतकर या आडनावाचे कल्याण येथील ब्राह्मण आहेत.) व इतर नवनाथाना निरनिराळीं नावें देऊन त्याच्या भजनीं लागलेले होते व आहेत. गहिनीनाथानीं व गोरखनाथानीं महमदीय शिष्याकरिता हिंदी व अरबी भाषेंत मंत्र केलेले आहेत व ते मंत्र महमदीय फकीर मंडळींत जागृत आहेत. आजकाल पुणे, सातारा, सोलापूर, मुंबई, वाई इत्यादि ठिकाणीं महमदीय फकीर, मराठे लोक व त्याच्या बायाबापड्या यास उसण, पोटदुखीसारख्या रोगाच्या वेदनापासून बरे करिताना रस्त्यातून दिसतात व कायमचा उपाय करण्याकरिता रोग्याना दर्ग्यांवर बोलावून पुढें मुसलमान करून घेण्याची युक्ती करितात. अशा वेळीं नाथसंप्रदायी मंत्रसिद्ध पुरुष पुढें येऊन त्यानीं आपला सांप्रदाय वाढविला पाहिजे व अशा प्रकारानें परधर्मीयाचें हिंदुधर्मावरील आक्रमण बंद केलें पाहिजे

महमदीयाच्या स्वाऱ्या भारतवर्षावर होऊं लागल्या त्यावेळपर्यंत उत्तर हिंदुस्थानात प्रत्येक रजपूत संस्थानिकाच्या दरबारात राजपुरोहित असे तो मंत्र सिद्ध केलेला, सिद्धमांत्रिक असावा लागे महमद घोरी व रज-पुताच्या लढाया चालल्या असता कनोजचा राजा पृथ्वीराज चव्हाण व महमद घोरीची लढाई सुरू झाली. राजाचा मामा, राजा जयचंद राठोड हा महमद घोरीला मिळाला होता. तेव्हा राजाच्या पुरोहितानें एक बाण मंत्रून दिला व सागितलें कीं महमद घोरीवर हा बाण मारलास

तर तो ह्या बाणानें मरेल. परंतु त्या राजानें तो बाण राजा जयचंदावर मारला व तो मेला. नंतर महंमद घोरीनें त्या राजाचा पराभव केला व दिल्लीची हिंदुपदपादशाही बुडाली. राजपुरोहितानें सांगितलेलें राजानें ऐकिलें असतें तर हिंदुपदपादशाही लवकर लयास गेली नसती. सांगण्याचा हेतु की, त्या वेळेपर्यंत राजपुरोहितामध्यें मंत्रसिद्ध पुरुष असत.

१८५७ सालच्या बंडाच्या वेळीं उत्तर हिंदुस्थानातील एक संस्थानिक बंडात सामील झाले नाहींत व इंग्रजासही मिळाले नाहींत. राजधानी सोडून निघून गेले. त्यावेळीं तेथें वैद्य आडनावाच्या अथर्ववेदी ब्राह्मणाचें घराणे मंत्रसिद्धीकरिता प्रख्यात होतें. त्या संस्थानाचे अधिपति राजधानी सोडून गेले असे पाहून इंग्रजाचे सैन्य त्या संस्थानिकाची राजधानी सर करण्याकरिता निघालें. त्या प्रसंगीं तेथील राणीसाहेबांनी वैद्य नावाच्या ब्राह्मणाकडे निरोप पाठविला. राज्य बुडण्याची वेळ आली तेव्हा आपल्या मंत्रसिद्धीचा उपयोग करून राज्यरक्षण करा. तेव्हा त्या सिद्ध मांत्रिकानी 'धूमावती महाविद्येचा' प्रयोग केला त्या प्रयोगाचा परिणाम असा झाला कीं, इंग्रजाच्या सैन्यात धूर भरमसाट पसरला व धुरामुळें सर्व सैनिक हतबल झाले व राजधानी सर करण्याचा विचार सोडून इंग्रजी सैन्य परत गेलें. त्या वैद्य घराण्यातील तिसऱ्या पिढीचे गृहस्थ आज तेथें हयात आहेत. परंतु ती विद्या त्याचेजवळ सिद्ध नाहीं. अशी ऐकीव माहिती लेखकास मिळाली आहे.

पिसाळलेल्या कुत्र्याचा, विंचवाच्या दंशाचा, नागाच्या दंशाचा परिहार करणारे मंत्र हल्लींही अनुभवास येतात. पिसाळलेल्या कुत्र्याच्या मंत्राचे ज्ञाते गृहस्थ लेखकास माहीत आहेत दर शनिवारी भिजवलेल्या पिठाचे दोन गोळे दोघास द्यावयाचे दोघे म्हणजे एक मांत्रिक व दुसरा विषबाधा झालेला इसम. नंतर ते दोन्ही गोळे हातात घेऊन मांत्रिक मंत्र म्हणत असतो. पंधरा मिनिटांनी ते गोळे उकलले तर त्या दोघांच्याही डोळ्यातून पिसाळलेल्या कुत्र्याच्या रंगाचे केस निघतात. असा विधी चार

शनिवार केला तर तो पिसाळलेल्या कुत्र्याचा दंश बरा होतो असेच विंचवाचे व नागाचे मांत्रिक लेखकास माहीत आहेत

मंत्रसिद्धि नष्ट झाल्याचे स्वरूप

याप्रमाणे मंत्रसिद्धीपासून काय परिणाम झाले व होतात हे वर्णन वर केले. आता प्रस्तुत काळी मंत्रसिद्ध पुरुष नसल्याने विशेषत ब्राह्मण-वर्गाची किती हीन स्थिति झाली आहे हे सांगण्याचे कारण नाही वैदिक ब्राह्मणास यजमानाच्या घरीं पाटभाडीं करण्यापासून मुलास सांभाळण्याचे व मुलास दूध पाजण्याचींही कामें करावीं लागतात व गुरुजी, आचार्य या नावाच्या ऐवजीं, भटजी, भटो, अशीं नावे त्यास पडली आहेत[1] व वैदिक ब्राह्मणांनीही आपला दर्जा ठेवला नाही वेद पढून नव्हे तर हव्यकव्य नित्य नैमित्तिक कर्में करण्यापुरतेंच ज्ञान संपादन करून भिक्षुकीचा धंदा सुरू करण्यात येतो. संस्कृत भाषा येत नसल्याने श्राद्धादि संकल्पाचे वेळी विभक्तिप्रत्ययही बरोबर लावता न आल्याने अल्पसंस्कृत शिकलेले यजमान त्याची थट्टा करितात व ती थट्टा त्यास सहन करावी लागते गंगेवरून स्नान करून जाणाऱ्या ब्राह्मणास आज असा प्रसंग आला आहे कीं, मला शिवू नको असें म्हणण्याची त्याला शक्ति राहिली नाही कारण वेदविद्या पूर्ण न झाल्याने व वैदिक किंवा पौराणिक अथवा आगमोक्त मंत्र त्यानें सिद्ध केलेले नसल्यानें त्याच्या ठायीं ब्राह्मणतेज राहतच नाही जोडे विकण्याचा धंदा ब्राह्मण करावयास लागले दूध, तेल, तूप आदि रसविक्री करावयास लागले अशा वेळी इतरांनी ब्राह्मणास दोष दिला तर त्यात इतर वर्गाचा काय दोष आहे[2] वैदिक ब्राह्मणाचीं मुले आंग्लविद्या शिकावयास लागलीं व वरिष्ठाची हांजी हांजी करावयास लागलीं! इतकी अवनत दशा ब्राह्मणवर्गास प्राप्त झाली आहे!

अशा रीतीनें ब्राह्मणवर्गास परमार्थाची नीच दशा प्राप्त झाली असताना ब्राह्मणवर्गानें (तो ब्राह्मण गृहस्थ असो किंवा वैदिक अथवा भिक्षुक असो)

सिंहावलोकन करण्याची वेळ प्राप्त झाली आहे. आज असा काल आला आहे की ब्राह्मणवर्गाला ब्राह्मण्य नकोसें झालें आहे. उदरभरणाकरितां ब्राह्मणवर्ग नोकरीशिवाय इतर व्यवसाय करण्यास तयार नाहीं. सदाचार सुटत चालले आहेत. ब्राह्मण इराणी चहावाल्याच्या दुकानीं जाऊन चहा पिऊं लागले आहेत. गृहस्थ म्हणून जो वर्ग तो फारच बहकला आहे. संध्या सर्वस्वी लोपत चालली आहे. मौंजीबंधन हा एक चैनीचा विधि होऊन बसला आहे. मौंजीबंधन झाल्यावेळेपासूनच संध्या भटजी करतील असें मुलें म्हणूं लागलीं आहेत. शिखानष्टांप्रमाणें शिखेला रजा मिळाली आहे. यज्ञोपवीतही नष्ट होत चाललें आहे. ब्राह्मणवर्गांत जन्म झाला याचा त्या ब्राह्मणपुत्रांना विषाद व दुःख वाटूं लागलें आहे. अशा प्रकारची अवनति होत असल्यानें आर्यसंस्कृतीचे तारूं फुटण्याच्या पंथास लागले आहे.

असे अवनतीचे काळ पूर्वींही येऊन गेले. श्रीसमर्थ रामदासस्वामींच्या वेळीं त्यांचे उद्‌गार असे आहेत. किती एक दावलमलकास भजती, ब्राह्मण ब्राह्मण्यापासून भ्रष्टले, अशा वेळीं श्रीसमर्थादि साधुसंतांच्या परिश्रमानें बिघडलेली घडी पुन्हां बसली. परंतु हल्लीचा काळ त्या समर्थ काळापेक्षांही कठीण आहे. पाश्चिमात्यांच्या शिक्षणानें वेदांवर व वर्णाश्रम धर्मावर श्रद्धा राहिली नाहीं. वाडवडिलांबद्दल पूज्य बुद्धि नष्ट झाली आहे. अर्थ पुरुषार्थ व काम पुरुषार्थ यांखेरीज दुसरे पुरुषार्थच दिसेनासे झाले. नानाप्रकारचीं व्यसनें सुरू झालीं व नाना प्रकारचे रोग सुरू झाले. पंचवीस वर्षांची मुलगी वृद्धावस्थेस पोचली व पंचवीस वर्षांच्या पुरुषास चाळिशी आली!

असो. अशाही परिस्थितींतून आपली संस्कृति टिकविण्याची बुद्धि सुचली तरी संस्कृतीपुनरुज्जीवनाचें कार्य साध्य झाल्याशिवाय राहणार नाहीं. श्रीभगवान् रामप्रभूंना ही दीन दशा दिसत नाहीं असें नाहीं. आपण ब्राह्मणवर्णीयांनीं प्रयत्न करावयास पाहिजे. ब्राह्मण हे सर्व वर्णांच्या गुरुस्थानीं आहेत. त्यांनींच मनावर घेतल्यास वर्णाश्रम-धर्माची मोडलेली

घडी पुन्हा बसेल. इतर वर्णीयांनी ब्राह्मणवर्णास मान द्यावा अशी इच्छा ब्राह्मणाच्या ठायीं असल्यास त्यांनी गुरुपदास योग्य असेंच आचरण ठेवलें पाहिजे. 'आचारः प्रभवो धर्मः धर्मस्य प्रभुरच्युत.' कृपा व्हावी अशी इच्छा असल्यास त्यांनी रामगीतेंत, 'आदौ स्ववर्णाश्रमवर्णिता. क्रिया कृत्वा' असे सांगितले आहे. त्याप्रमाणें वर्णाश्रमधर्माप्रमाणे वागण्यास लागावें. व मंत्रसिद्धि प्राप्त करून घेण्याच्या प्रयत्नास लागावें.

प्रस्तुतच्या धर्मच्युतीच्या काळांतही सत्पुरुषश्रेष्ठ आहेत. त्यांच्याकडे जाऊन परंपरा समजावून घेऊन त्याप्रमाणें आचरण करावें. अजूनही शुद्धबीजाचे ब्राह्मण हयात आहेत. त्यांचेकडे जाऊन परिप्रश्नेन सेवया मंत्रसिद्धि कशी प्राप्त होईल तें विचारावें व ते सांगतील तसें आचरण करावें. ब्राह्मणवर्णांतही अद्यापि शुद्ध बीजाचे ब्राह्मण बालक आहेत. त्यांनी इतरांचे अंधानुकरण न करून शुद्ध आचरणानें मंत्रसिद्धि प्राप्त करून घ्यावी. अशी ब्राह्मणसमाजात सद्बुद्धि उत्पन्न झाल्यास आजकालची अधार्मिकता खास नाहींशी होईल व ब्राह्मणवर्गास पूर्वीचे गुरुत्वाचे स्थान मिळेल.

□ □

अमृत-मंजिरी

१ तज्जपस्तदर्थभावनम्.
२ देवदेवता मंत्रांमध्येंच असतात. मंत्रोच्चार होताच त्या प्रकट होतात. त्यांना आवाहन केल्यास त्या येतात. तशा आलेल्या देवदेवता विशिष्ट फोटोग्राफीनें दिसतात.
३ जापकानें काम संपल्यावर आवाहित देवतांचें विसर्जन करणें जरूरच. तसें न केल्यास त्या येईनाशा होतात.
४ सिद्धि हा नियमबद्ध कर्पनसिद्ध प्रक्रियेचा परिणाम आहे
५ प्रत्येक गुरु तारक असतोच असें नाहीं, पण गुरुभाव मात्र तारक असतोच.
६. मंत्रजपानें मनुष्याची आकर्षणशक्ति वाढते.

४ भारतीय गुरुसंस्था व परंपरा

गुरु व त्यांचे प्रकार

वर लिहिल्याप्रमाणे मंत्राचे संस्कार झाले. तसेच तत्पूर्वी मनुष्याच्या संस्काराबद्दलही वर्णन केले. मागील स्तंभातून वेदमंत्र, आगममंत्र, शाबर-मंत्र व पुराणमंत्र निवेदन केले आहेत व केवळ मंत्र न देता हल्लींच्या काळात काहीं सत्पुरुषाच्या सहवासानें मंत्रशक्ति जागृत असलेल्या मंत्राचे व त्या सत्पुरुषाचे त्यांच्या परवानगीनें नामनिर्देश केले आहेत. मनुष्याच्या संस्काराचे वर्णन करितांना संस्काराबद्दल आधुनिक वाचकास संस्कार घडवून आणण्याची अशक्यताच उभी राहील. तथापि ज्याला मंत्रसामर्थ्य संपादनाची खरी जिज्ञासा उत्पन्न होईल त्याला ते संस्कार कठीण वाटणार नाहींत. या बाबतींत गुरूची आवश्यकता आहे म्हणून गुरु व गुरुतत्त्व या विषयाकडे वळू.

भगवान् पतंजलींनी सेश्वर सांख्य मीमांसेत "क्लेश कर्मविपाकाशयैर-परामृष्टपुरुषविशेष ईश्वरः" अशी सगुण परमात्मतत्त्वाची व्याख्या दिली आहे व 'स सर्वेषां गुरुः कालेनानवच्छेदात्' व तोच आदिनारायण अप्रनष्ट कालपरंपरेनें सर्वांचा गुरु आहे. भगवान् गोपालकृष्णांनी धनंजयास गीता सांगतांना 'बहूनि मे व्यतीतानि जन्मानि तव चार्जुन। तान्यहं वेद सर्वाणि न त्वं वेत्थ परंतप।' असे सांगितले आहे. श्रीआदिनारायणाचा श्रीकृष्ण अवतार हा पूर्णांशाचा आहे, अशी उक्ति आहे. आदि-नारायणरूपी श्रीमहाविष्णूंनी श्रीब्रह्मदेवास वेद आपल्या हृदयातील परा-

चार्यांनीं सांगितलें. पहिला गुरुशिष्यसंबंध असा आहे. तसेंच आगम मंत्र श्रीशंकरांनी पार्वतीला सांगितले. म्हणजे ही मंत्रदीक्षा प्रत्यक्ष होती. तसेंच ब्रह्मदेवानी नारदाना दीक्षा दिली. ही दीक्षा प्रत्यक्ष म्हणजे श्रवणेंद्रियानें प्राप्त झालेली. गुरुसंप्रदायाची सुरवात अशी झालेली आहे.

'गृणाति उपदिशति धर्मं गिरति (नाशयति) अज्ञानं, यद्वा गीर्यते स्तूयते देवादिभि, इति गुरु ।'

अविद्या हृदयग्रंथिबन्धमोक्षो यतो भवेत् ।
तमेव गुरुरित्याहुर्गुरुशब्देन योगिनः ॥

—भगवान् श्रीशंकराचार्य

तंत्रशास्त्रात गकार म्हणजे सिद्धिदाता, रेफाचा अर्थ पापनाशक आणि उकार म्हणजे विष्णु, म्हणजे सिद्धि देणारा, पापाचा नाश करणारा व मंगलकारक असा जो पुरुष तोच गुरु होय. अथवा गकार म्हणजे ज्ञान, रेफाचा अर्थ तत्त्व प्रकाशक व उकाराचा अर्थ शिवतादात्म्य करणारा विष्णु असा जो पुरुष तो गुरु होय. गुरुचरित्र अध्याय २६ यात 'गुरू'च्या अशाच व्याख्या दिलेल्या आहेत.

कूर्मपुराणात दहा प्रकारच्या गुरूचें वर्णन आहे—

उपाध्यायः पिता माता जेष्ठो भ्राता महीपतिः ।
मातुलः श्वशुरश्चैव मातामह .पितामहौ ॥
वर्णज्येष्ठः पितृव्यश्च सर्वे ते गुरवः स्मृताः ।

उपेत्य अधीयते म्हणजे अध्ययन करवितो तो उपाध्याय होय.

एकदेशं तु वेदस्य वेदाङ्गान्यपि वा पुनः
योऽध्यापयति वृत्यर्थं उपाध्यायः स उच्यते

आपल्या जीविकावृत्तीकरिता वेद आणि वेदाङ्गे पढून दुसऱ्यासही

पढवितो तो उपाध्याय गुरु होय व उपनिषदांसह सर्व वेदादिकांचा जो पाठ देतो तो आचार्य होय.

'यस्मात् पुरुषादयं माणवको धर्मानाचिनोति शिक्षते स आचार्यः' आणि जो—

स्वयमाचरते यस्मादाचारं स्थापयत्यपि ।
अचिनोति च शास्त्राणि आचार्यस्तेन सोच्यते ॥

मुनींच्या संघाचा अधिपति व संघातील मुनींस जो प्रमादाबद्दल प्रायश्चित्त देतो तो आचार्य होय. महर्षि वसिष्ठांनीं म्हटलें आहे कीं—

उपाध्यायान् दशाचार्या आचार्याणां शतं पिता
पितुर्दशगुणं माता गौरवेणातिरिच्यते

उपाध्यायापेक्षां दसपट आचार्य व आचार्यापेक्षां पिता शतपट व पित्यापेक्षा दसपट माता श्रेष्ठ गुरु आहे.

तथापि आपस्तंब धर्मसूत्रात—

शरीरमेव मातापितरौ जनयतां ।
आचार्यस्तु सर्वं पुरुषार्थक्षमं रूपं जनयति ॥

मातापिता शरीरच देतात; परंतु आचार्य पुरुषार्थ–साधन–सामग्री तयार करितो, म्हणून तो वरिष्ठ होय. 'आचार्यः श्रेष्ठो गुरूणां' (गो. धर्मसूत्र)

'प्र तद्वोचेदमृतं नु विद्वान् । गंधर्वोधाम विभृतं गुहासत् ।
त्रीणि पदानि विहिता गुहास्य यस्तानि वेद स पितुः पितासत् ॥

वेदविद्या धारण करून त्या विद्येचें प्रवचन करितो, जो ब्रह्मगुहेमध्यें आनंदमग्न होऊन राहिला आहे, व त्या गुहेतील तीन पदें जो जाणतो तो पित्याचाही गुरु आहे. ब्रह्माची तीन पदें म्हणजे जागृत, स्वप्न, सुषुप्ति, उत्पत्ति, स्थिति, लय, अथवा 'तत्, त्व, असि' अशा त्रिपदाना

जो जाणतो तो ब्रह्मनिदरिष्ट गुरु[1] होय.

गुरूनें शिष्याचे समोर प्राणायाम करून शिष्याची समाधि लावणें ही वेधदीक्षाच होय. अशी दीक्षा देणारे गुरु खरे गुरु होत. म्हणात अमुक मंत्र सांगितल्याबरोबर दुसरे दिवसापासूनच त्या मन्त्रोदित सिद्धि शिष्यास प्राप्त होणें ही शब्ददीक्षा. अशा प्रकारच्या गुरूची आवश्यकता मंत्रशास्त्रांतील मत्रांच्या दीक्षेस जरूर आहे. 'मम हृदये हृदयं ते अस्तु, मम चित्तमान्वेहि, मम वचमेकमना जुपस्व बृहस्पतिस्त्वा नियुनक्तु मह्यं,'

---

१. ईश्वरच सर्वांचा आदिगुरु : 'तत्र निरतिशय सर्वज्ञ बीजम्। स एष पूर्वेषामपि गुरुः कालेनानवच्छेदात्। (पतंजली–योगदर्शन) ईश्वरात सर्वज्ञतेचे बीज असून तो कालानें अनवच्छिन्न आहे–तसे इतर लोक नाहींत. म्हणून ब्रह्मादि देवाचा तोच गुरु. गुरुगीतादि ग्रंथात (१) 'गु' = अंधकार; 'रु' = तमाचा नाशक; (२) गु – मायादि गुण प्रकाशक; 'रु' – मायाजनित भ्रांतीचा नाशक. (३) गु – सगुण प्रतिपादक; रु – निर्गुण प्रतिपादक (४) 'ग'कार सिद्धिदाता, 'र'कार – पापहर्ता – 'उ'कार – शिव. म्हणून ग्+उ, र+उ = सिद्धिदाता व पापहर्ता शिव." असे अनेक अर्थबोधक श्लोक आहेत. 'गुरु' हें रक्तमांसजनित स्थूल शरीराचें नांव नसून 'गुरु' ज्ञानाधिकरणाचें नांव आहे.

याज्ञवल्क्य स्मृति, (१) मनुस्मृति यात माता, पिता, अन्नदातादि २० प्रकारचे 'गुरु' सांगितले आहेत. रामदासांनीं दा. बोध द. ५ समास (२) यांत मंत्रगुरु, तंत्रगुरु विद्यागुरु, मातागुरु, पितागुरु इत्यादि १७ प्रकारचे गुरु सांगितले आहेत.

उपास्य देवताही 'गुरु' बनतात. जसें:—जनार्दनस्वामी, दासोपंत, नारायणमहाराज जालवणकर, वासुदेवानंद सरस्वति, नारायण महाराज केडगावकर, पुरोहितस्वामी (श. गजा. पुरोहित–वकील), ह्यांना दत्त या उपास्य देवतेनें गुरूपदेश दिला; समर्थ रामदासस्वामींस रामानें, तुकारामाचे गुरु राघवचैतन्य यांना प्रत्यक्ष व्यासांनीं, रामकृष्ण परमहंसास कालिमातेनेंच उपदेश दिला.—सारांश, साधकाची तयारी झाली कीं गुरु येतातच. व तें उपदेश देतात. (गो. म. भा.)

मन्त्रदीक्षा देणारे गुरु, प्रकाशात्मक मन्त्राक्षराचा उपदेश करितांना 'मम व्रते हृदय दधामि' माझ्याप्रमाणे तुझ्या ठिकाणी मन्त्राक्षरें प्रकाशमय प्रकट होवोत, असे म्हणून शिष्यास मन्त्राक्षरांचा उपदेश करितात, तेव्हा शिष्यास तीं मन्त्राक्षरें प्रकाशमय दिसू लागतात. वरील दीक्षाच्या प्रकारापैकीं हाही एक प्रकार आहे.

वरील प्रकारचे गुरु हल्लीं क्वचितच उपलब्ध होतात, म्हणून साधकानें निराश होण्याचे कारण नाहीं यासंबंधीं असे वचन आहे की—'यावन्नानुग्रह साक्षात् जायते परमेश्वरात् तावन्न सद्गुरु सेव्य सच्छिष्यश्चापि नो भवेत्' मन्त्रसिद्धि सगुण परमेश्वराची भक्ति केल्यानेंही होते, व अशी परमेश्वराची भक्ति म्हणजे परमेश्वराच्या अवतारविभूतींची भक्ति होय पंचोपासना म्हणजे पंच देवोपासना श्रीमदाद्यशंकराचार्यांनी प्रस्थापित केली. हीं पंचदेवते म्हणजे गणपती, शिव, हरि, भास्कर आणि जगदंबा अशी होत. साधकाच्या आवडीप्रमाणे ह्या पंचदेवतांचे मंत्र ग्रहण करून पुरश्चरण केलें, तर ह्या मन्त्रसिद्धीमुळें देवतादर्शन व देवताप्रसाद होतो व त्या प्रसादानें अष्टमहासिद्धि प्राप्त होतात देवता प्रसन्न होऊनच साधकाची इच्छा पूर्ण करितात, असा अनुभव आहे म्हणून श्रीमदाचार्य, मध्वाचार्य, वल्लभाचार्य, राधापंथी स्वामी, नारायणपंथी, श्रीसमर्थ सांप्रदाय, चैतन्य सांप्रदाय, नाथ सांप्रदाय, वारकरी सांप्रदाय या सांप्रदायापैकीं परंपराशुद्ध गुरूपासून मंत्र घेतला तरी कार्यसिद्धि होते असे आहे

पिच्छिला तंत्रात असें लिहिलें आहे कीं, गुरु दोन प्रकारचे आहेत. एक दीक्षागुरु व दुसरा शिक्षागुरु. मंत्राची दीक्षा देणारे ते दीक्षागुरु. हे गुरु शुद्ध पूर्वपरंपरेनें प्राप्त झालेल्या मंत्राची दीक्षा देतात. शिक्षागुरु समाधि, ध्यान, धारणा, जप, स्तव, कवच, पुरश्चरण, महापुरश्चरण आणि *साधनेचे निरनिराळे विधि व योग ह्या सर्व गोष्टी शिकवितात. वस्तुत इष्ट* देवतेचा मंत्र ज्याचेपासून प्राप्त झाला त्याची महती जास्त आहे

कुलागमात गुरूचे सहा प्रकार सांगितले आहेत. प्रेरक, सूचक,

वाचक, दर्शक, बोधक आणि शिक्षक असे ते सहा भेद आहेत प्रेरक गुरु म्हणजे दीक्षा व साधना यांचे महत्त्व वर्णन करून साधकाच्या मनात मंत्रग्रहणाबद्दल दीक्षा घेण्याची प्रेरणा करितो तो होय, व सूचकगुरु म्हणजे साधना व दीक्षा यांचे निरनिराळे प्रकार वर्णन करितो तो होय.

वाचक गुरु म्हणजे साधनाचे वर्णन करतो तो होय. कोणती साधना व दीक्षा साधकाला योग्य आहे हें सांगतो तो दर्शक गुरु होय शिक्षक गुरु म्हणजे योग्य दीक्षा व साधना साधकास शिकवितो तो होय. बोधक गुरु म्हणजे दीक्षा व साधना यांच्याबद्दल तात्त्विक दृष्टीने साधकाच्या सदसद्विवेकबुद्धीला विविध प्रमाणांनी पटेल, अशा रीतीनें स्पष्ट करून सांगतो, तो बोधक गुरु होय. या गुरुषट्कापैकीं शेवटील बोधक गुरु वरिष्ठ आहे. कारण बुद्धीला पटल्याशिवाय मागील पांच प्रकारच्या गुरूंचे कार्य सफल होणार नाहा. भृगुऋषी यांनीं सर्व ग्रंथभांडारांतील ज्ञान संपादन केल्यावर ते आपले पिते वरुण ऋषी यांचेकडे गेले व "अधीहि, भगवन्ब्रह्मेति" अशी त्यांनीं पित्याला पृच्छा केली, तेव्हा "अन्नं ब्रह्मेति व्यजानीयात्" म्हणजे अन्नमयकोश हेंच ब्रह्म आहे, याचा विचार कर, व तें पटल्याशिवाय येऊ नको, असें त्यांनीं सांगितलें लिहिण्याचा हेतु हा की साधना व दीक्षा यांचा तात्त्विक गूढ अर्थ समजल्याशिवाय व बुद्धीला पटल्याशिवाय साधना व दीक्षा यांचें वर्णन ऐकून कांहीं उपयोग होणार नाहीं म्हणून विधिला तत्रांत वर्णन केलें आहे कीं, साधनादांग सर्वस्वी गुरुदेवावरच अवलंबून आहे.

पांडवप्रतापाच्या पांचव्या अध्यायांत पुढें दिल्याप्रमाणें 'बारा प्रकारचे गुरु आहेत—

१. धातुवादीगुरु : शिष्याकडून तीर्थाटन करवून नाना साधनें सांगून शेवटीं ज्ञानप्राप्ति करून देतो

२. चंदनगुरु : चंदनवृक्ष जसा आपल्या जवळच्या वृक्षांना आपल्यासारखाच चंदन बनवितो. पण (पण हिंगणघेकर व घेकें हें पृष्ठ

सोडून) तसा अभक्त शिवायकरून आपल्या केवल समागमानेंच हा गुरु भक्तास तारून नेतो.

३. **विचारगुरु** : नित्यानित्यविचारानें शिष्यास ज्ञान करून देऊन पिपीलिकामार्गाने साक्षात्कार करून देतो.

४. **अनुग्रहगुरु** : शिष्यावर कृपानुग्रह करतो. त्याच्या प्रतापानेंच सायास न होता शिष्यास ज्ञान होते.

५. **परीसगुरु** : परीस ज्याप्रमाणे स्पर्शमात्रेंकरून लोह तें सुवर्ण बनवितो त्याप्रमाणे स्पर्शानें शिष्यास गुरुत्व प्राप्त होते.

६. **कच्छपगुरु** : कूर्म म्हणजे कासवी ज्याप्रमाणें नुसत्या अवलोकनाने पिलाचें पोषण करिते, त्याप्रमाणे हा कृपावलोकनानेंच शिष्याचा उद्धार करतो.

७ **चंद्रगुरु** : चंद्र उदय पावताच चंद्रकातास पाझर फुटतो, त्याप्रमाणे याचे अतर द्रवताच दूरचे शिष्यही तरतात.

८. **दर्पणगुरु** : आरशात पाहिल्याबरोबर आपले मुख आपणास दिसतें. त्याप्रमाणें त्याच्या नुसत्या दर्शनाने स्वरूपज्ञान होतें कसलेच आयास पडत नाहीत.

९. **छायानिधिगुरु** : छायानिधि या नावाचा एक मोठा पक्षी आकाशात फिरत असतो. त्याची छाया ज्याच्यावर पडते तो राजा होतो. त्याप्रमाणे हा गुरूची छाया ज्याच्यावर पडते तो तत्काळ स्वानद साम्राज्याधिपति होतो.

१०. **नादनिधिगुरु** : नादनिधि नावाचा मणि आहे ज्या धातूचा ध्वनि त्याच्या कानात पडतो त्या सर्व धातू स्वस्थानीं सुवर्ण बनतात. त्याप्रमाणें मुमुक्षूची करुणवाणी त्याच्या कानीं पडताच मुमुक्षूस दिव्य ज्ञान होतें.

११. **क्रौंचपक्षीगुरु** : क्रौंच नावाची पक्षीण समुद्रतीरीं पिलें ठेवून चारा घेण्यासाठीं सहासहा महिने दूरदेशीं फिरावयास जाते. व वारवार

आकाशाकडे डोळे करून पिलाची आठवण करते. त्या योगाने तेथें पिलें पुष्ट होतात. त्याचप्रमाणे हा गुरु ज्याची आठवण करितो ते आपापल्या स्थानीं असताच तरून जातात.

१२. **सूर्यकांतगुरु** : सूर्यदर्शनाने सूर्यकांत मण्यात अथवा भिंगात अग्नी पडतो व खाली धरलेला कापूस जळून जातो. (सूर्याची इच्छा नसतानाही) त्याप्रमाणे ह्या गुरूची दृष्टि जिकडे झळकते ते पुरुष तात्काळ विदेहत्व पावतात.

रुद्रयामलात सांगितले आहे कीं, ग्रंथवाचनानेंच व गुरुप्राप्तीशिवाय जपतपादि साधनें केलीं तर त्याचा विशेष उपयोग होणार नाहीं अधिकारी गुरूशिवाय इष्टदेवता साधन प्राप्त होणार नाहीं. गुरुतंत्रात सांगितलें आहे कीं, "शिवे रुष्टे गुरुस्त्राता गुरौ रुष्टे न कश्चन। तस्मात् शुद्धमना नित्य तमेवाराधयेत् गुरु" श्रीसमर्थ रामदासस्वामींनी नवविधा भक्तीचे वर्णन करिताना अर्चन व पादसेवन गुरूचेंच करावें असें सांगितलें आहे. त्याचें रहस्य हेच होय.

वरील उद्धृत केलेल्या मंत्रग्रंथातील वचनावरून गुरुदेव ही व्यक्ति मनुष्य जीवरूप नसून देवतारूप आहे, असा साधकानें निश्चय करावा. गुरुदेव मनुष्यच आहे अशी शंका घेतली तर ज्याअर्थी ब्रह्मरूपी गुरुशक्ति गुरूचे ठिकाणीं जागृत होते, व देवतेच्या ठिकाणीं देवताशक्ति जागृत झालेली साधकास अनुभवास येते त्या अर्थी ती देवताही मृण्मय, धातुका-मय अगर पाषाणमय नसली पाहिजे, व गुरुदेव ही व्यक्ति मनुष्य नसली पाहिजे. म्हणून आपण घेतलेल्या शंका व्यर्थ आहेत, असा निष्कर्ष काढ-ण्यास काही प्रत्यवाय नाहीं. वस्तुत: गुरुतत्त्व अविभाज्य, सर्वस्पृक् आणि अनंत आहे. ब्रह्म सर्वव्यापी असल्यानें तें मृत्तिका अथवा पाषाणांत आहेच आहे. व म्हणून त्यास विशिष्ट स्थाननिष्ठ म्हणता येत नाहीं. मृत्तिका अगर पाषाण यापुरतीच जर ब्रह्मरूपाची व्याप्ति रहात नाहीं, तर एका मनुष्याच्या ठिकाणींच केवळ त्याची व्याप्ति कशी राहील? साधकाला

आपल्या साधनाबलानें अचेतन मूर्तीच्या ठिकाणीं ब्रह्मशक्ति जागृत करितां येते. परंतु जो साधक नाहीं, व अधिकारी साधक होण्याची प्रतीक्षा करीत असतो, त्याला मूर्तीच्या ठिकाणीं प्राणशक्ति जागृत आहे, असा अनुभव येणार नाहीं. म्हणून साधकानें मूर्तीच्या ठिकाणीं प्राणशक्तीची जागृति व सुप्तावस्था यांतील फरक समजण्याची शक्ति गुरुसमाश्रयानें प्राप्त करून घेण्याचा प्रयत्न केला पाहिजे. प्राणशक्ति जागृत करण्याची कला ज्याला अवगत आहे, त्याला अचेतन मूर्तीच्या ठिकाणीं प्राणशक्ति प्रगट करितां येते. मग सचेतन साधकाचे ठिकाणीं जागृत करितां येईल यांत काय संशय? म्हणून शास्त्रकारांनीं अशा प्रकारच्याच सत्पुरुषाला साधकानें गुरु करावा, असें सांगितलें आहे. शास्त्रनिपुण गुरूंनां प्राणशक्तीची जागृति कशी करावी हें शास्त्राधारें शाब्दिक ज्ञानानें सिद्ध करून दाखवितां येईल, परंतु ही शक्ति बाह्यशक्ति होय. म्हणजे असे गुरु शाब्दे निष्णात असल्याची खात्री पटेल, परंतु गुरु 'परेच निष्णातः' म्हणजे अंतःशक्तिसंपन्न असला पाहिजे. म्हणजे त्याला साधकाचे ठिकाणीं अंतःशक्ति प्रत्यक्ष जागृत करितां आली पाहिजे. म्हणजे तो 'शाब्दे परे च निष्णातः' असा असला पाहिजे व त्यालाच गुरुदेव अथवा सद्‌गुरु ही पदवी देणें इष्ट आहे. शास्त्रांत गुरूबद्दल इतकी चर्चा करून गुरूची इतकी कसोटी पाहाण्याची आवश्यकता ठेविली आहे, त्याचें कारण वेषधारी गुरु, धंदेवाईक गुरु, बोवाबाजी करणारे गुरु, यांच्यापासून साधकाचा बचाव व्हावा हेंच होय.

कुलागमांत असें सांगितलें कीं, दिव्यज्ञान व दिव्यशक्तिसंपन्न सत्पुरुषांनीं ज्या साधकाला उपदेश दिला आहे, व दीक्षा दिली आहे, तो साधक दिव्यज्ञान व दिव्यशक्तिसंपन्न होतो. बाह्यशक्तिसंपन्न अथवा शाब्दिकज्ञानसंपन्न असलेला पुरुष, दुसऱ्याला शब्दज्ञान देईल. म्हणजे मंत्र सांगून देईल. परंतु त्याचे ठिकाणीं मंत्रशक्ति जागृत करून देऊं शकणार नाहीं. ज्याला मंत्रशक्ति अवगत आहे तोच दुसऱ्याला ती देऊं शकेल.

विश्वसार तंत्रात सांगितले आहे कीं, गुरु सर्वशास्त्रज्ञ, मंत्रशक्तिसंपन्न, सुशोभित, सर्वावयवसंपन्न, संयमी, पितृभक्त, वर्णाश्रमधर्मानुकूल वर्तन करणारा, कुलाचारसंपन्न,कुलीन (कुल म्हणजे मुलाधार चक्र व कुलीन म्हणजे मूलाधारादि षट्चक्र–भेदन जाणणारा), शांतचित्त, शिष्याचे जवळ राहणारा (शिष्य व गुरु एकाच प्रांतात राहणारे असावे), शिष्याची चिंता वाहणारा व ब्राह्मण असावा. भुवनेश्वरी तंत्रात सांगितलें आहे कीं, ब्राह्मण हा सर्व वर्णांना दीक्षा देऊ शकतो. ब्राह्मण उपलब्ध नसेल तर सदाचारसंपन्न क्षत्रिय गुरु वैश्य व शूद्र यांना दीक्षा देण्यास पात्र आहे. व वैश्य गुरूंनी शूद्रास दीक्षा देण्यास हरकत नाहीं. शाक्तरंगिणींत सांगितलें आहे कीं, शूद्रानें शूद्रापासून दीक्षा घेऊ नये.

रुद्रयामलात सांगितले आहे की पतीनें पत्नीस, पित्याने कन्येस व पुत्रास, भ्रात्याने भ्रात्यास दीक्षा देऊ नये. परंतु पति अगर पिता सिद्ध-मांत्रिक असला तर त्याने वरील नियमाला अपवाद म्हणून कन्येला व पुत्राला दीक्षा देण्यास हरकत नाहीं, असें क्रमार्चनचंद्रिका या ग्रंथात सांगितले आहे. सिद्धमांत्रिक याचा अर्थ असा की ज्याला काली, तारा, षोडशी, भुवनेश्वरी, धूमावती, बगला इत्यादि विद्यांचा उपदेश झालेला आहे तो सिद्धमांत्रिक गुरु होय. तसेंच कालीकल्पांत सांगितलेलें आहे कीं, तीन पिढ्यापर्यंत वरील मंत्रांपैकीं एक चालू असेल, तर तो सिद्धमंत्र होतो. मत्स्यसूक्तांत सांगितले आहे कीं, ज्येष्ठ पुत्र अगर कोणताही पुत्र जर सदाचार संपन्न व पितृभक्त असेल तर त्याला पित्याने मंत्रदीक्षा द्यावी.

रुद्रयामलांत सांगितले आहे कीं स्त्रियाही गुरुपदवीला योग्य आहेत. पण त्या स्त्रियांच्या पितृस्थानीं षट्चक्राचा अभ्यास करणारे पुरुष असावे व 'कुलं तु ब्रह्मशक्तिः स्यात् अकुलं ब्रह्म चोच्यते कुलाकुलात्मतत्त्वज्ञः कुलीनः स च कथ्यते' अशा कुलीनाची स्त्री व कुल म्हणजे मूलाधारचक्राचे जवळचे चक्र व अकुल म्हणजे सहस्रार चक्र यांच्या ज्ञानानें व अभ्यासाने पुनीत झालेली अशी कुलजा व कुलीन, सदाचारशील, पतिव्रता, पवित्र,

इंद्रियनिग्रही, वृद्धांची सेवा करणारी, मंत्रज्ञ, मंत्रार्थज्ञ, व मंत्रजपपरायण व इष्टदेवताप्रसाद मिळालेली, अशा स्त्रियेपासूनही उपदेश घेता येतो. विधवेला उपदेशाधिकार नाहीं तथापि स्त्रियांनीं पुत्रांना दीक्षा देण्यास हरकत नाहीं, सिद्धमंत्रसंपन्न स्त्रिया असतील तर त्यांनाही मंत्रदीक्षा देता येते पुत्रसंपन्न सती पतिव्रता आपण होऊन मंत्रदीक्षा देते, असें ती म्हणेल, तर त्या मंत्राचें फल आठपट येतें श्रीसमर्थांना स्त्रियास शिष्य करण्याची आज्ञा दिली होती त्याचा आधार तरी याच रुद्रयामलातील वरील वाक्यावर असावा

स्वप्नांत मंत्र मिळाल्यास गुरु करण्याची आवश्यकता नाही तरी गुरूपदेशाचा संस्कार करावयास पाहिजे, तो असा स्नान करून आपले पुढें पाटावर तांदूळ पसरून त्यावर ताम्रपात्र (घट) ठेवावे, त्यांत आम्रपल्लव ठेवावें व फुलें वहावीं, व त्यावर स्वप्नांत ज्याला मंत्र दिला त्याचें आवाहन करावें मग पिंपळाच्या पानावर कुंकुमानें (केशर) तो मंत्र बिल्व किंवा तुळसीच्या काडीनें लिहावा, गुरूचें ध्यान मनांत आणून तो वाचावा, अशा प्रकारचा स्वप्नमंत्राचा विधि योगिनीतंत्रांत सांगितला आहे

गुरुवंश अथवा कुलगुरु म्हणजे आपल्या गुरूचे पुत्रपौत्र असतील त्यास आपल्या पुत्रांनीं किंवा पौत्रांना गुरु करावें परंतु त्यांच्या ठिकाणीं गुरूचीं लक्षणें नसतील तर त्यांना गुरु करूं नये

एकदा गुरुपद कोणास दिल्यावर त्यास जर बाह्य रोग झाला, तरी त्यास आदर दाखविण्याचें विसरूं नये परंतु ज्याला असे रोग असतील त्याला गुरुपद देऊंच नये म्हणजे त्याला गुरु करूं नये

मनाप्रमाणें शुद्धाचरणी गुरु मिळत नाही असें झालें व योग्य गुरु न मिळाला, तर गुरु करण्याचा विधि पूर्वजन्मस्मृत म्हणजे आपणास आवड जशी असेल त्याप्रमाणे किंवा आपल्या कुळांत जी कुलदेवता चालू असेल त्या देवतेचा मंत्र मंत्रमहोदधी अथवा मंत्रमहार्णव, मेरुतंत्र इत्यादि ग्रंथांतून निवडून काढावा, किंवा कोणाकडून निवडून घ्यावा व मेरुतंत्रांतील

विधीप्रमाणे विधि करून, तो मंत्र मंत्रदेवतेकडून आपणाला मिळाला अशी भावना करून मंत्रोपासना करावी. तो विधि असा आहे—

अथ तांत्रिकमंत्राणां दीक्षां शृणु गुरुं विना ।
शुक्लपक्षे त्रयोदश्यां चंद्रतारावलान्विते ॥
गत्वा च दक्षिणामूर्तेः सन्निधौ पूजयेच्च तम् ।
कलश-स्थापनं कृत्वा तदग्रे तु परिक्षिपेत् ॥
तालपत्रे लिखित्वाथ मंत्र-देवंच पूजयेत् ।
देवोगुरुरिति ध्यात्वा मंत्रं व्यस्त तु वाचयेत् ।
अष्टोत्तरशतं चैव मंत्रग्रहणमुच्यते ।
एतत्तत्व समाख्यातं गोप्यं मातरि जारवत् ॥
गुरौ लोभादयो दोषास्तस्मादुद्विजते जनः ॥ —मेरुमंत्र

चंद्रतारावल पाहून त्रयोदशीदिनी दक्षिणामूर्ति (शंकर) मंदिरात जाऊन किंवा जी जी उपास्य देवता असेल तिच्या मंदिरात जाऊन षोडशोपचार पूजा करावी. अथवा श्रीज्ञानराज, श्रीसमर्थ यांची पूजा करून त्यांचेकडून मंत्र मिळाला, अशी भावना करावी. मंत्र ताडपत्रावर किंवा अश्वत्थपर्णावर लिहून त्याची पूजा करावी. नंतर सूर्यरूप पिंगला नाडीने (उजव्या नाकपुडीतून वाहाणाऱ्या श्वासाने) आपला वासनामय देह दग्ध झाला अशी भावना करावी व चंद्रामृतरूप डाव्या नाकपुडीतून वाहणाऱ्या इडेनें अमृतवर्षाव करून देह पुनीत करावा नंतर उपास्य देवतेचे गुरु म्हणून किंवा श्रीज्ञानराज अथवा श्रीसमर्थ यांचें नांव घेऊन तो मंत्र वाचावा, व मंत्र मिळाला अशी भावना करावी या विधीत समोर माता, वडीलबंधु, पिता, गुरुबंधु अथवा धेनु असावी असा विधि करून मंत्र घेतल्यानंतर पुढे जर उत्तम सद्‌गुरु भेटले तर स्वतः घेतलेला मंत्र गुरुकडून उजळून घ्यावा. हा मंत्र ग्रहणविधि गौण होय

संप्रदाय सुरतरु (श्रीगुळवणी महाराज)

मंत्रग्रहण करून त्याचे अनुष्ठान करण्याचा हेतु ज्ञानप्राप्ति हा आहे.

मंत्रोदित ज्ञानानें धर्म प्राप्त होतो, इष्टपदार्थ प्राप्त होतात, आणि शेवटीं गुरुकृपेनें विज्ञान प्राप्त झालें म्हणजे त्याच्या योगानें मोक्ष प्राप्त होतो अशा ऐहिक व पारमार्थिक लाभाकरिताच साधक आपल्या इष्टदेवतेची आराधना करितो आणि तपस्येचें व तदंगभूत भक्तीचें फळ ज्ञानच आहे श्रीतुकाराममहाराज म्हणतात — " भक्ति ज्ञानाची माऊली, भक्तीपासून मुक्ति जहाली "

मधुलुब्धो यथा भृंगः पुष्पात् पुष्पांतरं व्रजेत् ।
ज्ञानलुब्धस्तथा शिष्यो गुरोर्गुर्वन्तरं व्रजेत् ॥

मधूची इच्छा करणारा भ्रमर जसा एका पुष्पापासून दुसऱ्या पुष्पावर जातो त्याप्रमाणें ज्ञानलालसा असणाऱ्या शिष्यानें एका गुरुपासून ज्ञान घेतल्यानंतर दुसऱ्या गुरूकडे जावें शिष्याचें हृत्तापहरण करणारे, शिष्यास सिद्धमंत्रविद्या देणारे फारच विरळा " अज्ञानतिमिरांधस्य (शिष्यस्य) ज्ञानांजनशलाकया चक्षुरुन्मीलितं येन स एव गुरुरुच्यते, " शिष्याचें अज्ञान घालवून त्यास तृतीय नेत्राचा अनुभव देणारा गुरूच खरा गुरु होय व अशा गुरूजवळ राहून गुरुशुश्रूषया विद्या गुरूची सेवा करून विद्या म्हणजे ब्रह्मविद्या संपादन करावयास पाहिजे

वरीलप्रमाणे गुरूची योग्यता सांगितली त्याचप्रमाणे शिष्याची अथवा, साधकाची योग्यताही सांगितली पाहिजे साधकानें ज्याप्रमाणे गुरूची परीक्षा करावी, तशीच गुरूनेंही साधकाची परीक्षा करावी वशिष्ठ आणि याज्ञवल्क्याप्रमाणे गुरु पाहिजेत तर शिष्यही श्रीरामचंद्र आणि श्रीजनकाप्रमाणे पाहिजेत पूर्वी संस्कार या विषयावर लिहिल्याप्रमाणें शिष्यानें अथवा साधकानें पूर्ण संस्कारयुक्त तयार होऊन योग्य गुरूकडे जावें साधकानें कसें तयार व्हावें व कसें वागावें याबद्दल आता जास्ती उहापोह न करिता व दीक्षेबद्दलही जास्त न लिहिता मंत्रजागृति झाली किंवा नाहीं याचीं लक्षणे नमूद करण्यात येत आहेत दीक्षेबद्दल जास्त माहिती 'दीक्षासर्वस्व' या लेखकाच्या ग्रंथात पहावी

शिष्याची पात्रता

मंत्रशास्त्राच्या दृष्टीनें मागील भागांत गुरु कसे असावे याचा विचार झाला. आता शिष्याचे ठायीं कोणते आचार व गुण असावे हे थोडक्यांत पुढें दिलें आहे.

पुरुषांनां ३० वर्षांचे पूर्वी मंत्रसिद्धि लवकर होते. स्त्रियांनां विवाहापूर्वी मंत्रसिद्धि प्राप्त होते. पुरुषांनां ३० ते ५० वर्षांपर्यंत उशिरां होते व ५० ते ६० पर्यंत कष्टसाध्य असते.

ब्राह्मणानां मंत्रसिद्धि होण्यास ते सदाचारसंपन्न असावे. संध्या प्रतिदिनीं त्रिकाल करून १०८ गायत्री मंत्राचा जप करावा लागतो. शिखा यज्ञोपवीत धारण करणारे व मातृपितृभक्त व एकपत्नीव्रती असावे. ब्रह्मचारी असल्यास उत्तमच.

क्षत्रिय व वैश्य संस्कारसंपन्न असावे. मद्य, मांसविवर्जित, स्नान, विष्णुसहस्रनाम, रामरक्षा पाठ करीत असलेले, गीता, ज्ञानेश्वरी, दासबोध, एकनाथी भागवत यापैकीं एकाचा तरी पाठ करीत असलेले असावे.

स्तुति, निंदा. वर्ज्य असावी, कायिक, वाचिक व मानसिक शुद्धिसंपन्नता असावी. सत्यवाणी, परदारविवर्जित, परदु:खेन दु:खित, परोपकारनिरत, न्यायानें धनोपार्जन करणारे, कुलदेवता, इष्ट देवता उपासक असावे, गुरूचे ठायीं आदरबुद्धि ठेवणारे, गुरुवचनावर पूर्ण श्रद्धा ठेवणारे व गुरुवचनावर पूर्ण विश्वास ठेवणारे असावे.

कोणी न विचारता बोलणारा व अनास्तत्व बोलणारा, आपल्याशींच बोलणारा, असा नसावा, मित भाषण करणारा, बोलतांना लहानमोठ्याशीं नम्र भाषण बोलणारा, सदा आनंदी, गुरुसेवेला तत्पर असणारा, इष्ट-देवतेतर देवताची निंदा न करणारा, इंद्रियनिग्रह असणारा, सत्य, न्याय, दया, इत्यादि रक्षण करणारा असा असावा.

मंत्रसिद्ध होईपर्यंत गुरसानिध्य असावें. तो शारीरिक व्यंगरहित, निरोगी असावा.

व्यवहारांत शिष्यानें गुरूला योग्य सल्ला द्यावा. गुरु घोडी शिष्य जोडी असा व्यवहार शिष्यानें गुरूशीं करू नये.

दीक्षा व प्रकार

दीयते ज्ञान सद्भावः क्षीयते पशुवासना ।
दान क्षपण संयुक्ता दीक्षा तेनेह कीर्तिता ॥

आत्मस्वरूपाचें ज्ञान देणें व पशुवासनेचा क्षय करणें हीं दोन्ही कार्यें साधण्याचा प्रयत्न ज्या साधनानें साध्य होतो त्या साधनाला दीक्षा असें म्हणतात.

इंद्रियविशिष्ट भोगाची लालसा मनुष्यमात्राच्या ठायीं जन्मत.च असते व हे इंद्रियजन्य भोग इंद्रियें शिथिल झालीं तरीं अन्योन्य उपायानी भोगण्याची इच्छा पुरवून घेण्याचा मनुष्य प्रयत्न करीत असतो. उदाहरणार्थ, विडा किंवा लाडू चावता येत नाहीं तर विडा किंवा लाडू कुटून खाणें, दात पडले तर दुसरे दात लावणें, एक बायको मेली तर दुसरी, तिसरी, चवथी करणे. इंद्रियें शिथिल झालीं तर इंद्रिय जागृतिकरिता माकडें मारून त्याच्या शिराचा उपयोग करणें, इत्यादि अनेक प्रकारानी प्रयत्न करून इंद्रियभोग सुखाकडील प्रवृत्ति जोंपर्यंत कमी होत नाहीं तोपर्यंत मनुष्यप्राणी सुधारलेला पशूच होय. तेव्हा अशा नरपशूच्या पशुवासना नष्ट होण्याचें साधन दीक्षा हे होय.

मंत्रशास्त्र हें योगशास्त्राचेंच एक अंग आहे असें पूर्वीं प्रतिपादन केलेलें

---

१. लेखकाच्या (शंकराचार्य योगेश्वरानंदतीर्थांच्या) 'दीक्षामर्त्तंड' (१९६४ व्हीनस प्रकाशन पुणें २) या ग्रंथात या विषयाचें संपूर्ण विवेचन दिलेलें आहे. (गो. प्र. भा.)

आहे. म्हणून योगशास्त्रातील निरनिराळ्या दीक्षांचें वर्णन देण्यात येत आहे. मंत्रशास्त्रातील दीक्षा व योगशास्त्रातील दीक्षा यांचें बरेच साम्य दिसून येतें, परंतु हें साम्य ज्या दीक्षांत अवलोकनांत येत नाही, अशाच योगशास्त्रांत कोणकोणत्या दीक्षा आहेत त्याचा विचार करूं.

योगशास्त्रांत *कुमारदीक्षा* ही मुख्य दीक्षा होय. कारण भूलोकांत दीक्षा देण्याचें काम कुमारांकडे सोपविलेलें आहे. हे कुमार पांच आहेत. सनक, सनातन, सनंदन, सनत्कुमार व सनत्सुजात असे ते पांच कुमार होत. सप्त लोकांतील सप्तदेशांकरिता निरनिराळे कुमार दीक्षा देण्याकरिता योजलेले आहेत. त्यांपैकीं भूर्लोक ही प्रथम रेषा होय. तिला वासुदेव रेषा असें म्हणतात. या वासुदेव रेषेतील जीवांना दीक्षा देण्याकरिता वरील कुमारपंचकांपैकीं सनत्कुमार यांची योजना केलेली आहे. या दीक्षेत मनुष्याच्या मनोमय कोशांत जागृत असलेल्या आत्म्याचा साक्षात्कार करून देण्यात येतो. कुमारदीक्षेचे तीन भेद आहेत, ते असे : *नाददीक्षा*, *मंत्रदीक्षा* अथवा *विद्यादीक्षा* व *विद्याधिदेवतादीक्षा* अथवा *भगवद्रूपदीक्षा*.

नाददीक्षा : भूर्लोकांतील पंचमहाभूतांपैकीं सूक्ष्मतम भूत म्हणजे आकाश हें होय. अशा आकाश शरीरांत जीवात्म्याचा वास असतो. आकाश-तत्त्वाचा गुण शब्द हा आहे. म्हणून आकाश शरीरांतील परिमाणभूत स्पंदन उत्पन्न व्हावें व त्या स्पंदनानें जीवात्म्याला बोध होण्याकरिता नाददीक्षेची योजना आहे. नाददीक्षेची अंगभूत लघुदीक्षा "आकाशे खेचर आग्नेयादित्य चंद्रमस" म्हणजे खेचरीदीक्षा–अग्निदीक्षा, सूर्यदीक्षा व चंद्रदीक्षा अशा नाददीक्षाच्या अंगभूत लघुदीक्षा आहेत. आणि 'कटपयथी' या पद्धतीनें गणना केली तर एकंदर २६२ दीक्षा होतात.

विद्यादीक्षा अथवा **मंत्रदीक्षा** : ही दीक्षा झाल्याबरोबर शिष्याला जो मंत्र सांगितला असेल, तो दीप्तमंत्र होतो. या दीक्षेनें शब्दाचे सत्य अर्थ

समजून येतात, ही दीक्षा सिद्ध झाली म्हणजे साधकाला स्वरोदय परिचित ज्ञान व दूरदर्शन ह्या सिद्धि प्राप्त होतात. मंत्राक्षराचा उच्चार झाल्याबरोबर आकाशफलकावर त्या मंत्रोच्चारित शब्दाचे ठसे उमटतात व चंद्रभानु-लोकांत त्याच शब्दाचीं प्रतिबिंबें उमटतात व त्या चंद्रभानुलोकांत ह्या मृत्युलोकांत उच्चारलेल्या ज्या ज्या शब्दाचे ठसे उमटलेले असतात त्याचें ज्ञान साधकाला प्राप्त होतें.

विद्याधिदेवतादीक्षा : ह्या दीक्षेनें साधकाला मंत्रवर्णित देवतेचा साक्षात्कार होतो. ह्या दीक्षेच्या साधनानें देवतेच्या रूपाचें दर्शन होतें. म्हणून ह्या दीक्षेला भगवद्रूपदीक्षा असें म्हणतात.

नारायणदीक्षा : ही शेवटची दीक्षा होय. या दीक्षेंत भगवान नारायण ऋषी स्वतः दीक्षा देतात व यालाच वासुदेवरहस्य असें संबोधण्यात येतें. तंत्र ग्रंथांत समयीदीक्षा, योगदीक्षा, साधकदीक्षा लोकधर्मिणीदीक्षा व मोक्षदीक्षा अशा दीक्षांचें वर्णन येतें

समयीदीक्षा : सांप्रत गर्भाधान, पुंसवन, अन्नप्राशन, उपनयनादि संस्कार योग्य तऱ्हेनें होत नाहींत. यामुळें योनीबीज, आहार, देश यांची शुद्धि दीक्षेपूर्वी करावी लागते व ती शुद्धि गुरु मंत्रशक्तीनें करून घेतात. उपनयन करण्याचे वेळीं उपवीत देत असतात. मंत्राच्या साह्यानें आम्याशीं जीवाचा संबंध घडवून आणता येतो. नंतर गुरूनी शिष्याचें प्रोक्षण व ताडण करावें व नंतर रेचक करून आपल्या देहांतून निघून शिष्याचे देहांत जाऊन वासनामय शरीरांतील पुर्यष्टकेच्या ग्रंथी शिथिल कराव्या व त्या ग्रंथी नष्ट करून पुर्यष्टका मस्तकांत सहस्राराजवळ स्थापन करावी व शिष्याच्या जीवाला आपल्याशीं अभेद रूपानं आणून त्याचेकडून हृदयांतील ब्रह्म, कंठांतील विष्णू, तालूतील रुद्र, भ्रूमध्यांतील ईश्वर, ललाटांतील सदाशिव, ब्रह्मरंध्रांतील परब्रह्म या देवतांचें सामरस्य करून घ्यावें व अशा तऱ्हेनें ईश्वराराधनेचा मार्ग शिष्यास सांगावा

वर लिहिलेल्याशिवाय आणखी पांच प्रकारच्या दीक्षा आहेत त्या अशा :

क्रियावती, वर्णमयी, कलावती, वेधमयी, सांप्रदायिकी. कलावती दीक्षेत स्पर्शदीक्षा, वाग्दीक्षा आणि दृग्दीक्षा अथवा चाक्षुषीदीक्षा असे भेद आहेत. अशा दीक्षा देण्याचें सामर्थ्य ज्याचे ठायीं आहे तेच खरे सद्गुरु होत. दृग्दीक्षा अथवा दृष्टिदीक्षा – चाक्षुषीदीक्षा – "चक्षुरुन्मील्य यत्तत्त्व ध्यात्वा शिष्य समीक्षते, पशुबंध विमोक्षाय दीक्षेय चाक्षुषी मता." स्पर्शदीक्षा म्हणजे स्पर्श केल्याबरोबर प्रकाश साक्षात्कार होणें, वाग्दीक्षा म्हणजे वाक्सिद्धीनें शिष्यास अमुक मंत्र तुला सिद्ध झाला असें म्हटल्याबरोबर शिष्याला तो मंत्र सिद्ध होणें हें होय. दृग्दीक्षा म्हणजे शिष्याच्या दृष्टीशीं आपली दृष्टी लावून जी दीक्षा दिली जाते ती दृग्दीक्षा होय. वेधीदीक्षा म्हणजे शिष्याचे ठायीं षट्चक्राचा अनुभव देणें अशा त्या दीक्षा होत.

योगदीक्षा : या दीक्षेंत पाशशुद्धि वा अध्वाशुद्धि करावी लागते. लोकधर्मिणीदीक्षा – या दीक्षेनें संचित व क्रियमाण कर्मांतील अशुद्धांश नष्ट होतात. शुभ फलयोग भोगल्यावर आणखी भोगाची इच्छा असल्यास ऊर्ध्व लोकांत त्या साधकास पाठविता येतें व शेवटीं वैराग्य प्राप्त झाल्यावर श्रेष्ठ लोकांतील अधीश्वराचेसह राहून सायुज्यमुक्ति प्राप्त होते.

योगदीक्षा ही सबीज, निर्बीज व सद्योनिर्वाणदायिनी अशा तीन प्रकारची असते. निर्वाणदीक्षा स्त्री, बाल, अंध व रोगी याकरिता आहे यात गुरुभक्तीच्या साधनानें मुक्ति प्राप्त होते. हिलाच पर्यंकदीक्षा असेंही म्हणतात.

□ □

अमृत-मंजिरी

१. सद्गुरूच्याद्वारेंच अजर व अमर असें आध्यात्मिक शरीर मिळतें
२. पंडित हे ग्रंथाचा अभ्यास करितात पण ज्ञानी हे वृत्तीचा – तदाकारतेचा – अभ्यास करितात.
३. गुरुमुखातूनच घेतलेले मंत्र सिद्ध होतात कारण त्यामागें गुरूची इच्छाशक्ति असते.
४. ब्रह्माचा मंत्र व चिदंश गुरुमुखातूनच सहज मिळतोच
५ भारत हें कुळीनाचें राष्ट्र आहे.
६. आपली तयारी करीत राहा 'गुरु' आपोआप मिळतो

५ मंत्र, तंत्र व यंत्र यांचा परामर्ष

१ तंत्र व आगमांची उत्पत्ति व प्रचार

या भागात तंत्र व आगमाची उत्पत्ति व प्रचार याची माहिती देण्यात येत आहे.

वेद आणि अवेस्ता याचे उपासक निरनिराळ्या ठिकाणीं जाऊन स्थाईक झाले. त्याचा काल कांहीं विद्वानानी आठ हजार वर्षांचा धरला आहे व जैन ग्रथाचा आधार धरल्यास हा काळ बारा हजार वर्षांच्या पलीकडे जातो. यावरून असे अनुमान निघते कीं, मत्राचा निर्देश व विनियोग जरी वेद व अवेस्ता या ग्रथात आलेला आहे, तरी मत्रशास्त्र या पदवीला पोहोचणाऱ्या ग्रथाची निर्मिती वेद व अवेस्ताचे काळीं झालेली नव्हती. ज्या ज्या काळीं ज्या ज्या ग्रथाची समाजाच्या धार्मिक गरजा भागविण्यासाठीं जरुरी असते, त्या त्या प्रकारचे ग्रंथ निर्माण होतात. वैदिक काळात सूर्योपासना व अग्न्युपासना प्रचारात होती व त्या उपासनेस अनुकूल असे अग्निष्टोम वार्षिक वा द्वादश वार्षिक अशा यज्ञाचा प्रचार होता अशा यज्ञाच्या पूर्तीकरिता ज्योतिःशास्त्र व त्याच्या अनुरोधानें पचागनिर्मिति होत आली आहे, तसेच अग्न्युपासनेकरिता दर्भ, समिधा, दूध, तूप याची जरूर लागत असल्यानें आयुर्वेद व तदतर्गत पशुवैद्यकही तयार झालें. वेदत्रयी म्हणून वेदाचें वर्णन श्रीभगवद्गीतेंत आलेले आहे. त्यात वेदत्रयी याचा अर्थ तीन वेद असा नाहीं. चारी वेदातील ऋचाचे तीनच प्रकार आहेत म्हणून वेदत्रयी

म्हटलें आहे. प्रकार १ पद्यऋचा (कविता). प्रकार २ गद्य व पद्य ऋचा (कविता व वाङ्मय), प्रकार ३ गीति (गाण्याच्या ऋचा). आथर्वणवेदाची आवश्यकता यज्ञकर्मांत ऋत्विज, होता, उद्गाता यांचें व यजमान व यजमानपत्नी यांचे रक्षण करण्याकरिता असे मंत्रविद्या व तंत्र यांचा घनिष्ट संबंध पिता – पुत्रवत् आहे व ही मंत्रविद्या व मंत्रशास्त्र यांचा उगम आथर्वण वेदापासून झालेला आहे.

आगमाची उत्पत्ति व वेदाची उत्पत्ति श्रीशंकराच्या मुखापासून झाली असा कांहीं ग्रथांत उल्लेख आलेला आहे. त्या ग्रथांत आगमांना 'ऊर्ध्वाम्नाय' असें म्हटलें आहे. म्हणजे श्रीशंकराच्या ऊर्ध्वमुखापासून आगम व तंत्रें निर्माण झालीं असें प्रतिपादन केलें आहे. कुल्लूक भट्टांनी "वैदिकी तान्त्रिकी चैव द्विविधा कीर्तिता श्रुति" असें म्हटलें आहे. "स्त्रीशूद्रद्विजबन्धूनां त्रयी न श्रुतिगोचरा" ह्या पहिल्या प्रकारच्या श्रुति व "मानवानां हितार्थाय अपरा श्रुति दर्शिता" ह्या दुसऱ्या प्रकारच्या आगमश्रुति होत. सत्ययुगांत वालखिल्य ऋषींना श्रीशंकरांनी 'आगम' सांगितले, पुढें युगपरिवर्तनानें ते लुप्त झाले. महाभारतातील शांतिपर्वांत महर्षि कपिलांनी स्यूमरश्मि ऋषींना विचारलें कीं, आगमाशिवाय आणखी कोणते श्रुतिग्रंथ आहेत. तेव्हां स्यूमरश्मि ऋषींनी पुष्कळ अज्ञात असलेल्या श्रुति व उपनिषदें सांगितलीं. यावरून आगम हेही श्रुतिग्रंथच आहेत असें मानलें गेलें होतें असें दिसतें. वृहद्गौतमसंहिता, वृद्धहारीतसंहिता व हारीतसंहिता या ग्रथांत आगमोक्त दीक्षाचीं विधानें सांगितलीं आहेत बृहदारण्यकोपनिषद, मनुसंहिता, कात्यायनसंहिता व व्याससंहिता या ग्रथांत गणेश, गौरी इत्यादिकांच्या मंत्रांचे जप करण्यास सांगितलें आहे व श्रीविद्येचाही जप सांगितला आहे. तसेंच जपमाळांचे प्रकारही सांगितले आहेत. ह्या गोष्टींचा उल्लेख आगम ग्रथांत आला आहे. मनुसंहितेची महति सांगतांना "यत्किंचिन्मनुरब्रवीत् तद्भेषजम्" असें म्हटलेलें आहे. तसेंच यजुर्वेदातील रुद्राध्यायांत "अध्यवोचदधिवक्ता प्रथमो दैव्यो भिषग्" असेंही सांगितलें

आहे. वरील सर्व उल्लेखावरून आगम ग्रंथ अथवा तंत्र ग्रंथ हे वेदाप्रमाणेंच फार प्राचीन काळापासून अस्तित्वात आहेत असें सिद्ध होतें. पूर्वी वेदांना निगम व तंत्रांना आगम असें संबोधण्याची प्रथा होती. कारण श्रीमदाद्य-शंकराचार्यांच्या बिरुदावलींत (सकलनिगमागम सांख्यत्रय—प्रतिपादक सर्वतंत्रस्वतंत्र) असा आगम व निगम यांचा उल्लेख आलेला आहे. श्रीविश्वा-मित्र ऋषींनी श्रीराम—लक्ष्मणास तंत्र शास्त्रातील आगमोक्त 'बलातिबला' विद्या शिकविल्या होत्या असें अध्यात्म रामायणांत विधान केलें आहे, व श्रीरामचंद्रांनी श्रीलक्ष्मणास पूजा सांगतांना आगमोक्त प्रकाराचें विधान सांगितलें होतें असाही अध्यात्म रामायणांत उल्लेख आलेला आहे.

भारतीय युद्धाचे वेळीं अनार्य देशांतून लढवय्ये लोक भारतीय युद्धांत भाग घेण्याकरितां आले व युद्धांतून बचावलेले लोक येथेंच राहिले अशा लोकांना आर्य लोकांत संमिलित करून घेण्याकरितां श्रुतींत 'कृण्वन्तु आर्यम्'....एवढाच निर्देश होता परंतु आर्यकरणाचे विधि व अशांना आर्य बनविल्याचे आचार कसे असावे, त्यांना उपासना कोणत्या मंत्रांनी द्यावी वगैरे विधिविधानें उपलब्ध झालेलीं नव्हतीं तेव्हां तत्कालीन शास्त्रकारांना शोध करितांना आढळून आले कीं, आगम आणि तंत्र यांत अशा 'आर्य' होऊं घातलेल्यास कोणत्या संस्कारांनी 'आर्य' करून घ्यावें याची आगाऊच योजना केली आहे. म्हणून त्यांनी खालीं नमूद केलेला दंडक घातला—

> कृते श्रुत्युक्तकाचाराः त्रेतायां स्मृतिसंभवाः ।
> द्वापारे तु पुराणोक्ताः कलावागमसम्मताः ॥
>
> कुलार्णवतंत्र

भारतीय युद्धानंतर कलियुग लवकरच सुरू झालें असें धर्मराजाच्या कारकीर्दीतील उदाहरणावरून दिसून येतें. आर्यांचे ग्रंथ अद्वैतपर आहेत. परंतु नवीन आर्य करून घेतलेल्या अनार्य लोकांस आपलेसें करून

घेण्याकरिता व त्याच्या पूर्व संस्कारास अनुकूल होईल व त्याच्या पचनीं पडेल या हेतूने प्रथम द्वैत उपासना त्यांस देण्यांत आली. म्हणजे प्रथम पंचदैवतोपासना प्रचारात आणली गेली 'उपासकांना कार्यार्थं ब्राह्मणोरूप-कल्पना' म्हणजे आद्य ब्रह्मशक्तीनें उपासकांच्या सोईकरिता नाना प्रकारचीं रूपें धारण केलीं, नाना अवतार धारण केले असें त्या नूतन आर्यांना समजावून देण्यात आलें व त्या निरनिराळ्या रूपाचे व अवताराचे मंत्र कोणते, जप कसा करावा, पूजा कशी करावी व शेवटीं मोक्ष कसा संपादन करावा हे सांगण्याकरिता तंत्रशास्त्राचा म्हणजे आगमाचा आविर्भाव पुन्हा झाला. यापुढील विवेचनांत आगम अगर मंत्रशास्त्र असा उल्लेख न करितां 'तंत्रशास्त्र' असा उल्लेख करण्याचें ठरविलें आहे. म्हणजे पुढील विवेचन जरी तंत्रशास्त्राधारें केलेलें आहे, तरी तें मंत्रशास्त्राचेंच विवेचन आहे असें समजण्यास कांही प्रत्यवाय नाहीं

वरील स्तंभात वर्णन केल्याप्रमाणे तंत्रशास्त्र हें युगपरिवर्तन झाल्याचें दर्शक असे कलियुगाचें युगशास्त्र आहे आगम ग्रंथात आगम व निगम या शब्दांच्या व्याख्या खालीं दिल्याप्रमाणे आहेत

> आगत. शंभुवक्त्रेभ्यो गतश्च गिरिजाश्रुतिम् ।
> मतश्च वासुदेवेन तस्मादागम उच्यते ॥
> निर्गतो गिरिजावक्त्रात् गिरीश श्रुतिमाप्नुयात् ।
> मतश्च वासुदेवेन निगम परिकल्प्यते ॥

श्रीशंकरानीं पार्वतीस सांगितलेले व वासुदेवाना संमत झालेले असे जे मंत्रसमुदाय त्यास 'आगम' असें म्हणावें व श्रीगिरिजेनें श्रीशंकराना सांगितलेले व श्रीवासुदेवाना संमत असलेले असे मंत्र व त्याचीं विधानें ज्या ग्रंथात वर्णिलीं आहेत त्यास 'निगम' असें म्हणावें 'निगमकल्पतरोर्गलित फल' या वाक्यात आलेल्या निगम शब्दाचा अर्थ वेद असा होतो या पुढील काळात वेदाचे महत्त्व कमी होऊन आगमाना शिरोधार्य करण्यात आलें असें दिसते कारण तंत्रग्रंथात मंत्रशास्त्राच्या शरीराचे वर्णन करिताना

निगम म्हणजे वेद हे जीव, आगम हा आत्मा, पट्शास्त्रें म्हणजे पड्विकार, दशोपनिषदें म्हणजे दशेंद्रियें होत असें म्हटलें आहे. अशा प्रकारें मंत्रशास्त्राची योग्यता वाढविण्यात आली. मंत्रशास्त्ररूप शरीरातील आत्मा म्हणजे आगम व जीव हे वेद अशी उपमा देणाऱ्याचा हेतु असा दिसतो कीं, वेद व तंत्र याचा घनिष्ठ संबंध आहे व ते दोन्ही एकाच दर्जाचे आहेत इतकेंच.

कामिकागमात तंत्राची व्याख्या केली आहे, ती अशी आहे :—

तनोति विपुलं अर्थं तत्त्व-मंत्रसमन्वितम् ।
त्राणं च कुरुते यस्मात् तंत्रमित्यभिधीयते ॥

कालिकावृत्तीत तंत्र शब्दाची व्युत्पत्ति अशी दिली आहे कीं, 'तन् = प्रसरणें' या धातूपासून 'त्राण' असा शब्द झाला. वाचस्पती, आनंदगिरी व गोविंदानंद हे तिघेही तंत्र या शब्दाची उत्पत्ति व्युत्पादनाचे अर्थी तन्त्री अगर तंत्री या धातूपासून झाली असे मानतात. अशा व्युत्पत्तिपासून "तनुते विस्तार्यते ज्ञान अनेन इति तंत्र." ज्या ज्ञानाने मानवाचें रक्षण होतें ते ज्ञान ज्यात वर्णन केलें आहे तें तंत्र होय. अशा तंत्ररूपी मंत्रशास्त्राचें वर्णन खालील श्लोकात दिसून येते

अन्यान्यशास्त्रेषु विनोदमात्रम्, न तेषु किंचित् भुवि दृष्टमस्ति ।
चिकित्सितज्योतिषतंत्रवादाः पदे पदे प्रत्ययमावहन्ति ॥

इतर शास्त्रग्रंथ प्रत्यक्ष अनुभव दाखविणारे नाहींत. परंतु वैद्यशास्त्र, ज्योतिषशास्त्र व मंत्रशास्त्र ह्या शास्त्राच्या ज्ञानापासून पदोपदीं अनुभव घेता येतात. मंत्रशास्त्रातील ग्रंथात उपासनेचें ज्ञान, औषधींचें ज्ञान, रसायनशास्त्राचें ज्ञान ह्या सर्व ऐहिक व पारमार्थिक सुखसंपादनाचे मार्ग सांगितलेले आहेत.

वाराही तंत्रात आगमरूपी मंत्रशास्त्राचीं सात लक्षणे सांगितलेलीं आहेत.

सृष्टिश्च प्रलयं चैव देवतानां यथार्चनम् ।
साधनानां च सर्वेषां पुरश्चरणमेव च ॥

षट्कर्मसाधनं चैव ध्यानं योगश्चतुर्विधः ।
सप्तभिर्लक्षणैर्युक्तश्चागमोस्तीति बुद्धयते ॥

सृष्टि, प्रलय, देवतार्चन, पुरश्चरणसाधन, षट्कर्मसाधन, ध्यान, चतुर्विधयोग अशीं तीं सात लक्षणे होत. इतर तंत्रग्रंथामध्ये सृष्टि, प्रलय, उत्पत्ति, देवतापूजनतत्त्व, जीवाचे भेद, स्वर्ग, पाताल, देव याचे वर्णन आलेले आहे. तसेच स्त्री–पुमान भेद, मानवी शरीरातील षट्चक्र वर्णन, आश्रमधर्म, युगधर्म, संस्कार, देवतामूर्तीची प्राणप्रतिष्ठा व स्थापना मंत्र, यंत्र, मुद्रा, साधनें, अंतर्योग, बहिर्योग, गृह–वापी–प्रासार याचे संस्कार, जप, व्रत, षट्कर्म, साधन, ध्यानयोग, राजधर्म, प्रजाधर्म, देशविभाज, औषधी, रसायन, कल्प याची माहिती सांगितलेली आहे.

२ तंत्रें–प्रकार व त्यांचे प्रचारित भूभाग

वेदाप्रमाणे तंत्रे अनंत आहेत. कांहीं वेदशाखा जशा आज लुप्त आहेत, तशीं बरींच तंत्रेही लुप्त झालीं आहेत. तंत्राचा उत्कर्ष झाला त्या कालात भारतवर्षांतील निरनिराळ्या भागात निरनिराळीं तंत्रें ग्राह्य मानलीं जात असत. तंत्रकाळात आर्यावर्ताचे देशविभाग अश्वक्रांत, रथक्रांत, विष्णुक्रांत, गजक्रांत या प्रकाराने केलेले होते. शक्ति-संगल तंत्राप्रमाणें विंध्यपर्वतापासून चितागाग म्हणजे सर्व बंगाल मिळून झालेल्या देशाला विष्णुक्रांत असें म्हणत असत. महाचीन व नेपाळ या भागाना रथक्रांत व उर्वरित इतर भागाला अश्वक्रांत म्हणत असत महासिद्धसार तंत्राप्रमाणे अश्वक्रांत म्हणजे दिनाजपुराजवळील करतोया नदीपासून यवद्वीपापर्यंतचा भाग होय. (हल्लीचें जावा बेट) (या पुण्य नदीचें जल इतर पुण्य नद्याप्रमाणे श्रावण महिन्यात तीन दिवसही अपवित्र होत नाहीं)

विष्णुक्रान्त देशांत सिद्धीश्वर, कालीतंत्र, कुलार्णव, ज्ञानार्णव, नीलतंत्र, देवन्यागम, श्रीक्रम, सिद्धियामल, मत्स्यसूक्त, सिद्धसारतंत्र, वाराहीतंत्र, योगिनीतंत्र, गणेशविमर्शिनी, हंसतंत्र, महेश्वरतंत्र, निरूत्तर, गांधर्व,

ललिता, समयाचार, भावचूडामणी, कामधेनुयामल, ब्रह्मयामल, रुद्रयामल, कुब्जिकातंत्र वगैरे ६४ तंत्रें चालू होतीं.

गजक्रांत–गांधार (कंदाहार) काबूल, चित्रळ, कैकेय (इराण), काश्यप कास्पियन समुद्राचा कांठ, सप्तसिंधु[1] (तुर्कस्थानांत सप्तसिंधु–सात नद्या आहेत). या गजक्रांत देशांत सांबरतंत्र, डामरतंत्र, नील सरस्वतीतंत्र, सिद्ध वाराहीतंत्र, योगद्रुमतंत्र, कुंडलिनीतंत्र अशीं ६४ तंत्रें चालू होतीं.

रथक्रांत देशांत मातृकोदय, महानिर्वाण, मेरुतंत्र, भूतडामर, देव-डामर, वासुदेव–रहस्य, बृहद्गोतमीय ब्रह्मज्ञान, गारुड वर्णविलास, बाला–विलास, पुरश्चरणचंद्रिका, नवरत्नेश्वर, आकाशभैरव, इंद्रजालतंत्र, कृकनास–दीपिका, आचारसार, सरस्वती, शारदातिलक शक्तिसंगमतंत्र वगैरे ६४ तंत्रें चालू होतीं.

अश्वक्रांत देशांत गुरुदीक्षा, भूतशुद्धि सिद्धमंत्र, धर्मकेतु तंत्र, महायोगिनी तंत्र, शिवार्चनतंत्र बिंदुतंत्र, शूलिनी, महामालिनी, मोहनतंत्र, भूतेश्वर, योगार्णव, यंत्रचूडामणि, लीलावती, जयराधामाधवतंत्र, धूमावतीतंत्र, महानिर्वाणतंत्र, वगैरे ६४ तंत्रें चालू होतीं. ह्या २५६ तंत्राचें सार 'सर्वतंत्रस्वतंत्र' या तंत्रांत निर्वाचित केलेलें आहे.[2]

---

१. ही सप्तसिंधु म्हणजे सध्याचा कोणता भाग याबद्दल विविध मतें आहेत. Rig-Vedic India — Das Gupta, Orion B G Tilak व प्राचीन भारतीय स्थळसूचि-चित्राव शास्त्री इत्यादि ग्रंथांत मतभिन्नता आहे. (गो प्र. भा.)

२. तंत्रशास्त्राचा उगम शिवपार्वती संवादांत आढळतो. आगमनिगम ह्याचा अर्थ व संबंध शिव व पार्वती (आगम), पार्वती व शिव संवाद (निगम) असा असल्याचें वर सांगितलेंच आहे. भारतामध्ये गौडपादाचार्य, शंकराचार्य, सुंदराचार्य, भास्करराय, सुभगानंद, अप्पैय्या दीक्षित, देवनाथ ठाकूर इत्यादि अनेक तंत्रकार होऊन गेले. परंतु परदेशी लोकांपैकीं न्यायाधीश वुडरॉफ व सर ॲव्हेलोन आणि एच्. एच्. विल्सन ह्यांनीं या तंत्रशास्त्राचा फार सूक्ष्म अभ्यास करून त्यासंबंधीचीं आपलीं मतें पूर्ण विचारांतीं नमूद केलेलीं आहेत.

३. यंत्रें त्यांचें महत्त्व व नित्यता

मत्रशास्त्रातील मत्र, मत्रशक्ति व मत्रयोग यांचें वर्णन केल्यानर मत्रशास्त्रातील मूलभूत प्रतीकोपासना साधनेचें आद्यस्वरूप म्हणजे यत्रें त्याचें वर्णन करण्यात येत आहे. मत्रशास्त्रात मत्राचें जितकें महत्त्व आहे, तितकेंच महत्त्व यत्राचेही आहे. मत्र हे जसे स्वत.सिद्ध व अविनाशी

त्यात त्याच्या अभ्यासाची दृष्टि सखोल व दुराग्रहरहित असून आस्थेवाईक अभ्यासकाची आहे असें दिसतें—पुढील माहिती 'तत्रमार्गाचीं मूलतत्त्वें'–(Principles of Tantras 1952) १९५२ या ग्रथावरून दिलेली आहे. ती अशी : "कलियुगाची सुरवात होण्यापूर्वी पर्वतप्राय तान्त्रिक ग्रथाचा नाश झाला. काहीं तत्राचार्यांच्या मतें ही ग्रथसख्या एक लक्षावर होती. ॲव्हलॅन यानीं सशोधनात उपलब्ध झालेल्या ३१३ 'तत्र' ग्रथाची यादी प्रसिद्ध केली आहे. ते म्हणतात, वामकेश्वर तत्राप्रमाणें ६४ तत्र ग्रथ होते. ज्ञानकोशकाराच्या मताप्रमाणें ती सख्या १९२ होती. आद्यशकराचार्यांनीं ६४ ग्रथाचा उल्लेख केला. कालपर्याय तंत्राप्रमाणे शाक्ततत्रें ३२७, उपतत्रें ८, यामल ४, डामरस २. याशिवाय अनेक सहिता, चूडामणी, अर्णवें, पुराणें, उपवेद काक्षपुताजविमर्षिणी व चितामणि इतकी ग्रथसपत्ति होती. वैष्णवाचीं ७५ तत्रें. शिवाय यामल व कल्प हीं शास्त्रें, शैवाचीं ३२ तत्रें, गाणपत्याचीं ३० तत्रें, उपतत्रें व कल्प इत्यादि ग्रथ आहेत; याशिवाय बौद्ध वर्गाचीं अनेक प्रकारचीं तंत्रें, सूक्तें, कामधेनु, कल्प इत्यादि आहेत. एवढेंच नव्हे तर अद्यापिही कैलास पर्वतावर गणपति नित्य नवीं तंत्रें तयार करून भूतलावर पसरवीत असतो!" वुड्रॉफही असेंच म्हणतात, यामुळें प्रत्येक ठिकाणीं गणपतीला सर्वत्र महत्व आहे. विल्सन म्हणतात, बगालमधील ¾ विधि या तत्राप्रमाणेंच चालतात. दक्षिणाचारी शाक्तपथीयाचीं तत्रें शुद्ध व वेदप्रमाण असतात. पण वामाचारीयाचीं शूद्राप्रमाणें असतात. वामाचारी यामध्यें पचमकाराना (मद्य, मास, मीन, मुद्रा, मैथुन) महत्त्व असतें. अशा वामाचारी पथाला 'कौलपथी' म्हणतात. ते प्रत्यक्ष सुदर तरुणींच्या वास्तव योनीची पूजा करितात. याशिवाय फार बारीक माहितीही दिलेली आहे. त्यावरून ते किती खरे कर्मवादी अभ्यासू होते हें स्पष्ट होतें. (देवीकोश भाग २रा प्र. भा.)

आहेत, तशींच यंत्रेंही स्वत सिद्ध व अविनाशी आहेत. *मंत्र म्हणजे सूक्ष्म शक्तीवर स्वामित्व करणारी प्रक्रिया. मंत्र म्हणजे अतींद्रिय शक्तीची प्रेरक शक्तीच होय. आणि यंत्रें ही सूक्ष्म शक्तीवरून स्वामित्व सिध्द करून दाखविणारी साधनें आहेत.*

यंत्रं मंत्रमयं प्रोक्तं मंत्रात्मा देवतैव हि ।
देहात्मनोर्यथाऽभेदः यंत्रदेवतयोस्तथा ॥

कोणत्याही मंत्राची सिद्धि करावयाची असल्यास वाचकशक्तीची पूजा आवश्यक आहे, असे मागील स्तभात प्रतिपादन केलें. ही वाचकशक्ति प्रादुर्भूत प्रथम यंत्ररूपानें होते व नंतर प्रतिमारूपानें होते. आरण्यकांत वर्णिलेली प्रतीकोपासना मंत्रमयच होती व ती काही काळानंतर मूर्तीरूपानें अथवा प्रतिमारूपाने उदयास आली. मंत्रसृष्टि ज्याप्रमाणें स्वत सिद्ध अनादि आहे, तशीच यंत्रसृष्टिसुद्धा अनादि व अनंत आहे. अष्टधा प्रकृतिरूप प्रभूची प्रार्थना करणारा भक्त त्या प्रभूला म्हणजे अष्टधा प्रकृतीला नित्यत्व व अनादित्व आहे असें मानीत असतो श्रीभगवद्गीतेंत "प्रकृतिं पुरुष चेव विद्धयनादि उभावपि" असे सांगितलें आहे. आथर्वणवेदांत, "कासित्व महादेवी, अह ब्रह्म, ब्रह्मणि द्वे ब्रह्मणि वेदितव्ये इत्याथर्वणी श्रुति अहमखिलं जगत्" असें वाक्य आहे. नामरूपात्मक ब्रह्म आहे नामरूपात्मक ब्रह्माचीच उपासना शक्य आहे. मंत्रशास्त्र हे उपासनेचेंच मुख्य शास्त्र आहे. नामरूपाच्या पलीकडे असलेल्या ब्रह्माचा अनुभव घेणारा पुरुष लक्ष मनुष्यात एखादाच असेल. मंत्रामध्ये गूढ असलेल्या देवता यंत्राचे साहाय्याशिवाय प्रगट होणार नाहींत. मंत्रात गूढ असलेल्या चैतन्य शक्तीचे मंत्र हे जसे नित्य व अनादित्वदर्शक आहेत, तशीच यंत्रात मंत्रात्मकदेवता गूढ असल्याने यंत्रेंही नित्य व अनादि होत. प्रकृतिपुरुषात्मक जग जसें नित्य, तशी प्रकृतिही नित्यच आहे व प्रकृतिसंघटित वर्तुल त्रिकोण हेंही नित्यच होत. ही गोष्ट पुढील स्तंभातील अवतरणावरून लक्षात येईल.

यासान्तरोऽहरूपा परामहेशी त्रिभाविताकारा ।
स्पष्टा पश्यन्त्यादि त्रिमातृकात्मा च चक्रतां याता ॥

(कामकलाविलास)

चक्रस्यापि महेश्या न भेदलेशोऽपि भाव्यते विबुधैः ।
अनयोः सूक्ष्माकारा परैव सा स्थूलयोश्च कापि भिदा ॥

"एको हं" असा नाद उत्पन्न झाला व हा नाद बिंदुरूपानें उदयास आला. बिंदूला रूप नाहीं. तो वृद्ध बिंदू झाला तेव्हाच त्याला वर्तुलाकार प्राप्त झाला. हा वर्तुलाकार येणें हाच चक्रसंभव होय. चक्राचा उल्लेख म्हणजे लेखन करण्याकरिता उत्पन्न झालेली रेषा हीच रेषा वर्तुलाकार-रूपानें प्रगट झाली. "बहु स्या" असा दुसरा स्फोट झाल्याबरोबर त्या वर्तुलाकारात पश्यति, मध्यमा, वैखरीरूप तीन मात्रा उत्पन्न झाल्या.

'विवक्षा व्यवसायोक्तिरूपा एतास्त्रिमातरः । पश्यन्त्यादि महा-देव्या स्वरूपं नात्र संशयः ॥ एवं रूपा त्रिमातृका, सैव चक्रतां याता, चक्रस्य त्रैलोक्यमोहनादि सर्वानन्दमयबैन्दवान्तनवाव-रणात्मकस्य सुंदर्योधिष्ठानभूतस्य महेश्याः तदधिष्ठात्र्याः सुंदर्याश्च भेदलेशः बुधैर्नानुभूयते । श्रीसुंदरीस्वरूपत्वात् श्रीचक्रस्य । महत्तरा महिमा देवतानां नवयोनिर्नवचक्राणि दीधिरे । नवैव योगा नवयोगि-नीश्च । नवानां चक्राणां अधिनाथस्योना नवमुद्रा नवभद्रामहीनां एका साऽऽसीत् प्रथमासा नवाऽऽसीत् ।

(उपनिषत्)

तच्छक्तिपंचकं सृष्ट्या लयेनाग्निचतुष्टयं ।
पंचशक्तिचतुर्वन्हिसंयोगात् चक्रसंभवः
एतच्चक्रावतारं तु कथयामि वरानने ॥


(वामकेश्वर तंत्र)

वरील उताऱ्यात त्रिमातृका उत्पन्न झाल्या असे लिहिले. पुढे ह्या त्रिमातृका चक्ररूपांत प्रगट झाल्यानंतर त्रैलोक्यमोहनचक्र, सर्वानंदमयचक्र

अशी चक्रोत्पत्ति झाली. त्या चक्राची अधिष्ठात्री देवता त्रिपुरसुंदरी आहे. त्यावरून हे त्रैलोक्यमोहनचक्र, श्रीचक्र आणि त्रिपुरसुंदरी यांत पूर्ण अभेद आहे, आणि त्रिपुरसुंदरी प्रकृति ही पुरुषाविष्टात्री असल्यानें श्रीचक्रयंत्र त्रिपुरसुंदरीप्रमाणेंच नित्य, शुद्ध व अनादि आहे, हे सिद्ध झालें.

वरील स्तभात श्रीचक्रयंत्र जसें अनादि व नित्य सिद्ध होते त्या प्रमाणानेंच त्रिकोणात्मक सर्व यंत्रें व त्यांची अधिष्ठात्री देवता यांचा अभेद असल्यानें सर्व यंत्रें नित्य, शुद्ध व अनादि आहेत, हे सिद्ध झाले तथापि पुन्हा त्रिकोणात्मक यंत्राचीही उत्पत्ति कशी झाली ते पाहू.

प्रथमत बिंदु उत्पन्न झाला. त्यापासून धूद्रबिंदु उत्पन्न झाला, म्हणजे रेषा उत्पन्न झाली, व तिचे आंदोलन होताना उजवीकडे वामा नामक बिंदु झाला. त्या बिंदूपासून जी रूपशक्ति उत्पन्न झाली, ती शक्ति विष्णुरूपिणी, सूर्यदेवतारूपी, सत्वगुणमयी इच्छाशक्तिरूपिणी होय डावीकडे आंदोलन झालें. त्यापासून जी जेष्ठा शक्ति उत्पन्न झाली, ती अग्निदेवता-रूपी ज्ञानरूपिणी व तमोगुणमयी होय. ह्या दोन्ही शक्ति खालीं पतन पावल्यानंतर जी रौद्री शक्ति उत्पन्न झाली, ती शक्ति रौद्री रजोगुणात्मक व चंद्रदेवतारूप असून क्रियाशक्तिमयी होय



अशा प्रकारानें त्रिकोणात्मक यंत्र तयार झालें. “स्वभाविकी ज्ञानबल-क्रिया च” या उक्तीप्रमाणे ही त्रिगुणात्मिका शक्ति — ह्या त्रिकोणयंत्राच्या-रूपानें वास करणारी शक्ति, नित्य, अनंत व अनादि आहे हें सिद्ध झालें, व हे *त्रिगुणात्मिकशक्तिदर्शक यंत्र तिचेंच रूप असल्यानें तें यंत्रही नित्य*, अनंत व अनादि आहे, हे उघडच आहे यास प्रमाणभूत वाक्य असें आहे ·

"श्रुतिस्तिस्रः पुरस्तिस्रस्त्रिपथा विश्वचर्षणी। यत्रकथा अक्षरा सन्निविष्टा अधिष्ठायैनां अजरा पुराणि महत्तरा महिमा देवतानाम्।"

मेयमातृप्रभामानप्रसरैः संकुचत्प्रभम्।
शृंगाटरूपमापन्नं इच्छाज्ञानक्रियात्मकम्।

धामत्रयं नाम सोमसूर्याग्निमंडलं। शक्तित्रयं नाम इच्छाज्ञान-क्रियादि। एवंविधसमस्तवस्तुपूरणात् समष्टिरूपा त्रिपुरा नाम पराशक्तिः आविर्बभूव। त्रिमूर्तिसर्गाच्च पुरोभवाच्च, त्रयीमयत्वाच्च पुरोऽपि देव्या।

अयं त्रिलोकीमयपूरणाच्च प्रायोऽम्बिकायास्त्रिपुरेति नाम॥
आधैरग्निरवीन्दुबिंदुनिलयैरिति। वामा, ज्येष्ठा, रौद्री त्रिनाम-भिर्गीयते महादेवी। वामास्त्रान्तस्थितप्रपंचवमनात् विश्वजनयित्रीति अभिधीयते, ज्येष्ठा सर्वमंगलकारिणी, रौद्री सर्व रोगविद्राविणी।
(कामकलाविलास)

त्रिबिंदुरूप त्रिकोणरूप असा शृंगाटकत्रिकोण प्रथम उत्पन्न झाला. या शृंगाटकाच्या तीन बिंदूना निरनिराळीं अभिधानें दिलेलीं आहेत. तीं अशीं मेय, माता आणि प्रभा, इच्छा, ज्ञान, क्रिया; सोम, सूर्य, अग्नि, वामा, ज्येष्ठा, रौद्री, यापैकीं पहिल्या चार त्रयींचे अर्थ उत्तान आहेत, म्हणून शेवटल्या त्रयीचा अर्थ दिला, तो असा—वामा म्हणजे सर्व विश्व वमन करणारी, अर्थात विश्वजननी, ज्येष्ठा म्हणजे सर्व मंगलकारिणी व रौद्री म्हणजे सर्व रोग हरण करणारी.

याप्रमाणे पश्यन्ति, मध्यमा, वैखरीरूप शृंगाटक त्रिकोण आरंभीं उत्पन्न झाला. त्या तीन कोणबिंदूना उष्णता, प्रकाश व शक्ति; बाष्प जल व हिम; जन्म, आयुर्दाय व मृति; शरीर, मन व जीव अशीं हीं आणखी विशेषणें देता येतील. शास्त्रवेत्ते या त्रयीला, शक्ति, अवकाश व काल असेंही म्हणतात. गूढविद्येच्या दृष्टीनें हा शृंगाटक त्रिकोण प्रकाश जीवन व प्रेम या त्रयीनें व्यापला आहे असे म्हणता येईल. जीवाची

गूढशक्ति प्रत्येक जन्मात अधिकाधिक उत्क्रान्त होत असल्यास हा त्रिकोण मार्गदर्शक आहे असेंही म्हणता येईल.

वरील त्रिकोणातील पहिला बिंदु इच्छाशक्तीचा आहे. मनुष्य समाजातील अगदीं खालच्या पातळीतील वर्ग आपातत. उत्पन्न होणाऱ्या इच्छा पुरविण्याची खटपट करणारा असतो. या वर्गांतील मनुष्याचा कल कार्यकारणभाव न पाहता शक्याशक्यता अगर इष्टानिष्टता या गोष्टींकडे न पाहता, आपोआप, सहजासहजीं ज्या इच्छा पूर्ण होतील, त्या पूर्ण करण्याकडे असतो. क्षुधा लागल्यास मिळेल ते खावें, तृषा लागल्यास मिळेल तें पाणी प्यावें, निद्रा आल्यास मिळेल त्या जागेत निद्रा करावी, ही पशुवर्गीय प्रणाली त्याचे वागण्यात दिसून येते. जणु काय पशुवर्गांतून नुकताच हा वर्ग मनुष्ययोनींत आला आहे. या वर्गांतीलच परंतु थोडा पुढें गेलेला वर्ग असा कीं, त्याचें इच्छासामर्थ्य विवक्षित उत्क्रांतीला पोचलेलें असतें व तो वर्ग सदसत् बुद्धि जागृत ठेऊन मार्ग क्रमीत असतो. या दोन्ही पातळींतील मनुष्ये जितकी इच्छाशक्ति व सदसत् बुद्धि जागृत ठेवतील, तेवढी त्याची प्रगती होत असते आणि जोपर्यंत त्याच्या इच्छाशक्तीची धाव चुकीच्या पायावर उभारलेली असते अथवा अव्यवस्थित किंवा कमकुवत असते, तोंपर्यंत ती त्याना उच्चदर्जाच्या स्थळीं पोहोचविण्यास अपात्र ठरते व ते अपक्रांतीला जातात.

उत्क्रांतीला जाणारा वर्ग ज्ञानार्जन करण्याची हाव बाळगतो. व त्यामुळें त्याला दुसऱ्याचा उपदेश ऐकावा, त्याचप्रमाणे कांहीं ग्रंथ वाचावे व वाचन झालेल्या विषयाचें मनन करावें असें वाटतें, आणि अशा प्रकारें ज्ञानसंपादनार्थ तो अहर्निश परिश्रम करीत असतो. अशा प्रकारानें त्रिकोणाचा दुसरा बिंदु जो ज्ञानशक्तीचा द्योतक असतो, त्याकडे त्याच्या वृत्तीची धाव असते. त्याच्या कल्पना दृश्य वस्तूवरच स्थिर झालेल्या असतात व कधीं अदृश्य व अमूर्त वस्तूबद्दलही विचार त्याचे मनात जागृत होतात. बुद्धिनिकषाला पटणाऱ्या गोष्टींकडे त्याचा कल असतो

व तो असा बुद्धिनिष्ठ असल्यानें देहाभिमानी बनतो, तरी तो उत्क्रांतिपथावर असतो हे खास. बौद्धिक चिंतनाने त्याची सद्-असत् विवेक बुद्धि जागृत होते व त्याचा परिणाम असमाधान, अपूर्ण-बुद्धिग्राहकता या गोष्टींत दिसून येतो. तथापि जर तो केवळ बुद्धिसर्वस्वावर अवलंबून राहाणार नाहीं तर कालान्तराने व निसर्गत त्याचे ठिकाणीं उत्साहवर्धक ज्ञानाचा प्रादुर्भाव होतो.

अशा दुसऱ्या श्रेणींतील मनुष्यात आतापर्यंत प्रयत्न करून उत्पन्न झालेल्या ज्ञानाचा परिणाम विज्ञानात होतो. शृगाटक त्रिकोणाचा जो ज्ञानाचा दुसरा बिंदु वरील स्तभात निरूपिला आहे त्या बिंदूची अधिष्ठात्री शक्ति जी ज्ञानशक्ति तिचे आकलन त्या वर्गांतील मनुष्यास होतें. ही शक्ति प्राप्त होण्यापूर्वी मनुष्यास वस्तूचे व वस्तूच्या स्थित्यतराचे निरीक्षण व वस्तूचें अनुभवजन्य ज्ञान प्राप्त झालें पाहिजे. थोडक्यात सागावयाचें तर *कल्पनाशक्ति ही आरभी श्रद्धेवर अवलंबून असते. बुद्धीच्या कसोटीला ती टिकलेला* नसते. परतु मनात एखादी कल्पना आली तर प्रत्यक्ष व्यवहारातील अनुभवाशीं ती ताडून पहाता टिकली पाहिजे आणि ही कल्पना जर चुकीच्या पायावर आधारलेली असली तर ती टिकणार नाहीं किंवा टिकलीच तर हटवादीपणाने किंवा रूढीच्या वजनानें टिकेल. म्हणून "*अनुभव*" असे *ज्यास आपण म्हणतों तो सत्याचे पायावर उभारलेला असतो* व त्यामुळें त्या अनुभवाच्या सत्यतेची त्यास खात्री पटलेली असते. हाच *सत्य वस्तूचा साक्षात्कार होय.*

बुद्धिनिकषावर परजून उत्पन्न झालेले ज्ञान प्रकाशरूप आहे इतकेंच समजलें. परतु ह्या प्रकाशाचा अनुभव आल्यास सर्वांभूतीं असेंच प्रकाश-रूपी ज्ञान आहे असें अपरोक्षसाक्षात्कारानें अनुभवास आलें तर ह्या मनुष्याचे ठिकाणीं "सर्वे भद्राणि पश्यन्तु मा कश्चिद् दुःखमाप्नुयात्" या वाक्याप्रमाणें सर्व प्राणिजाताबद्दल प्रेम उत्पन्न होईल.

असें प्रेम उत्पन्न झालें म्हणजे शृगाटक त्रिकोणाच्या बिंदूपैकीं क्रियाश-

कीच्या बिंदूला मनुष्य पोचतो अपरोक्षानुभूति प्राप्त झाल्यानंतर आपल्याच ठिकाणीं नित्य तृप्त राहून निष्क्रिय जीवन घालविणे यातच वेदान्तज्ञानाची परिसमाप्ति आहे असे मानणारा मनुष्य खऱ्या जीवन्मुक्तीला पोचलाच नाहीं असे म्हणणे भाग आहे म्हणून तिसरा बिंदू जो क्रियाशक्तिरूप आहे ती क्रिया म्हणजे प्रेमाची श्रेष्ठ भूमिका होय एखादा साधा मनुष्य अणु म्हणजे काय, त्याचे घटक काय आहेत हें समजून घेऊन स्वस्थ बसेल, एखादा सृष्टिविज्ञानशास्त्रज्ञाला त्या अणूच्या घटकाच्या ज्ञानानें जे परिणाम होतात ते माहीत असल्याने ज्ञानाबद्दल त्याला अधिक महत्त्व वाटेल व एखादा शोधक रसायन शास्त्रज्ञ मनुष्यजीवनास अधिक सुखी करण्याकरिता त्या अणूच्या घटकाच्या ज्ञानाचा उपयोग करील त्याप्रमाणे गणित, विद्युत्शास्त्र, वाद्यवादनशास्त्र याचाही असाच मनुष्याचें सामाजिक जीवन सुखमय करण्यास उपयोग होतो, त्याचप्रमाणे वस्तूच्या अपरोक्ष ज्ञानाचा उपयोग अपरोक्षज्ञानी मानवी जीवन सुखकर करण्याचा प्रयत्न करील तर तो वरील नमूद केलेल्या शास्त्रज्ञापेक्षा कमी दर्जाचा आहे असें म्हणता यावयाचे नाहीं

याप्रमाणे या शृंगाटक त्रिकोणाच्या तीन बिंदूचे वर्णन झाल ह्या बिंदु त्रयाचीं कार्ये एकमेकाशीं किती सलग्न झालेलीं आहेत हे दाखविण्याकरिता त्या तीन बिंदूना तीन रेषाना जोडून टाकलें आहे आणि मुमुक्षरूपी जीवाची काही विशिष्ट कामगिरी असली, तर ती या त्रिकोणदर्शक बिंदु-युतीच्या योगानें इच्छा, ज्ञान व क्रिया याचा इतका परस्पर संयोग त्याच्या आयुष्यक्रमात व्हावयास पाहिजे की, या क्रिया एकसमयावच्छेदेंकरून जगत्कल्याणाचें कार्य करण्यास समर्थ होतील व "जगाच्या कल्याणा सताच्या विभूति" देह कष्टविती उपकारें या श्रीतुकाराममहाराजाच्या उक्तीप्रमाणें हा मुमुक्षु वर्तन करीत असतो, असे जगाच्या निदर्शनास यावें असें जगाच्या निदर्शनास आल्यास तो जरी मुमुक्षु आहे असें बाह्यात्कारी दिसले तरी तो मुक्तच होय व सिद्धच होय यांत काहीं संशय नाहीं

शृंगाटकत्रयाचें म्हणजे शृंगाटक यंत्राचें इतकें वर्णन करण्याचा हेतु हाच कीं मंत्रोद्दिष्ट यंत्रस्थित देवतेची केवळ पूजा करूनच कार्यभाग झाला असें मुमुक्षूंनी व मंत्रवेत्त्यांनी समजूं नये. मंत्रसिद्ध देवतांच्या प्रसादानें मुमुक्षूंना मानवी समाजाची आधुनिक काळांत जी दुःखपरंपरा दिसत आहे ती दुःखपरंपरा नष्ट करण्याकरितां मंत्रशास्त्रवेत्त्यांचें लक्ष जावें, हीच खरी देवपूजा होय, असें मंत्रवेत्त्यांनीं समजलें पाहिजे. हें थोडें विषयांतर झालें, परंतु शृंगाटक त्रिकोणाची वरिष्ठ भूमिका वर्णन करण्याकरिताच तें केलें आहे. याप्रमाणे यंत्राप्रमाणें त्यांचीही नित्यता सिद्ध झाली असो.

मागें सिद्ध केल्याप्रमाणें त्रिकोण यंत्र व चक्ररूप यंत्र हीं श्रीत्रिपुरसुंदरीरूप आहेत असें सिद्ध झाल्यानंतर आदिशक्तीपासून उत्पन्न झालेल्या सर्व देवता व त्यांचीं यंत्रें हीं पण नित्य व अनादि आहेत असें सिद्ध होते. प्रत्येक देवतेच्या मंत्रानें त्या देवतेची उपासना करण्याकरितां त्या त्या देवतेचें यंत्र संपादन करून त्या यंत्रामध्यें देवतेचें आवाहन करून मंत्र जप झाला पाहिजे तर तो सिद्ध होईल, अन्यथा होणार नाहीं.

४ विश्व व तदंगभूत यंत्रें

विश्वप्रपंच नित्यच आहे. मुमुक्षूला विश्वातील पदार्थांची क्षणभंगुरता दाखवून विश्वाच्या नामरूपापलीकडे असलेल्या वाच्यशक्तिरूप परब्रह्माची ओळख पटवून देण्याकरिताच फक्त विश्व हें क्षणभंगुर आहे, असें संबोधण्यांत येतें. श्रीविष्णुसहस्रनामांत विश्व हें पहिलेंच नाव आहे. म्हणून विश्व नित्य आहे असें समजावें. द्वैत सांप्रदायांत हा प्रश्नच उद्‌भवत नाहीं कारण श्रीविष्णु ही देवता नित्य, शुद्ध, अविनाशी व अनादि आहे असें ते मानतात. त्या विश्वातील दृश्य ग्रह व नक्षत्रें तसेंच सूर्य, चंद्र, ह्या देवता यंत्रात्मकच आहेत. *गायत्रीचें गायत्री यंत्र हें त्रिकोण व अष्टदलात्मक आहे. सूर्य देवतेचें यंत्र द्वादशकोणात्मक, चंद्राचें षोडशकोणात्मक, मंगळाचें त्रिकोणात्मक, बुधाचें अष्टकोणात्मक, गुरूचें षट्कोणात्मक, शुक्र*

यंत्र पंचकोणात्मक व शनियंत्र षट्कोणात्मक आहे. असे ग्रहांच्या यंत्रांचे प्रकार आहेत. याप्रमाणें श्रीवराह, श्रीनारसिंह, श्रीराम, श्रीकृष्ण, इत्यादि अवतारांच्या बहिरंग व अंतरंग पूजेकरितां निरनिराळीं यत्रें सांगितलीं आहेत.

५ बीजप्रबन्धः

मंत्रशास्त्रांत बीजांचा महिमा फार वर्णन केलेला आहे. निरनिराळ्या देवतार्चीं निरनिराळीं बीजें असतात. म्हणजे बीज मंत्र असतात. बीजमंत्र, मूलमंत्र, मालामंत्र असे मंत्रांचे प्रकार पूर्वी सांगितले आहेत. मंत्राभिधान नांवाच्या प्रकरणांत अ आदि मत्रांचे अर्थ दिलेले आहेत, व शेवटीं कांहीं बीजमंत्रही दिलेले आहेत. ते असे :

ॐ	प्रणव, अथवा तार	आं	पाशबीज
ऱ्हीं	गिरिजाबीज	सौ	देवीबीज अथवा वरुणबीज
क्लीं	माया अगर शक्तिबीज	क्लीं	कामबीज
श्रीं	कमला अगर लक्ष्मीबीज	ग्लौं	भूमिबीज अगर गणेशबीज
स्वाहा	अग्निजाया	श्रीं	विश्वबीज
ऱ्हूं	कूर्च कवच	क्ष्रौं	नारसिंहबीज
हुं	वर्मबीज	हौं	प्रसादबीज अथवा शिवबीज
स्त्रीं	वधूबीज	गं	गणेशबीज
ऐं	वाग्बीज	ईं	वेदमाता गायत्रीबीज अथवा लक्ष्मीबीज.

वरील प्रकारांनंतर मंत्राभिधान याच प्रकरणांत खालीं लिहिल्याप्रमाणें मातृकाचे अर्थ दिलेले आहेत. त्यांपैकीं कांहीं खालीं देण्यांत येत आहेत.

ॐ कारबीज हे वर्तुलाकार आहे. सर्व मंत्राच्या पूर्वी याचा उच्चार व्हावा लागतो व सर्व बीजाची उत्पत्ति ह्या 'प्रणव' बीजापासून होते. हा वेदसारच आहे व वेदबीजच होय. त्रिकूटात्मक म्हणजे अ, उ,

म अशा कूटाचा बनलेला आहे व ह्याला अ, आ, उ, ऊ, म व अनुस्वार असे पाच रश्मि म्हणजे किरणपुज आहेत. हा भवनाशक आहे. मत्रविद्या ह्या बीजापासून उत्पन्न झाली व सर्व मातृका ह्या प्रणवापासून उत्पन्न झाल्या. हा अनादि आहे व अद्वैतसिद्धि करणारा आहे

अ श्रीकण्ठबीज व कामाकर्षिणी बीज.

आ अनतबीज, विनायकबीज व भगमालिनीबीज.

इ चद्रबीज, विघ्नविनायकबीज, रुद्रबीज व नित्यक्लिन्नाबीज

ई त्रिमूर्तिबीज, भेरूण्डाबीज व कामकलाबीज, बिंदुमालिनी व त्रिपुरसुदरीबीज.

उ शकरबीज, षडाननबीज, वन्हिवासिनीबीज.

ऊ मधुसूदनबीज, भैरवबीज, रूपाकर्षिणीबीज.

ऋ त्रिविक्रमबीज, शिवदूतीबीज, गन्धाकर्षिणीबीज.

ॠ श्रीधरबीज, दीर्घजिव्हाबीज, चित्ताकर्षिणीबीज.

ऌ कमला हृषीकेशबीज, धैर्याकर्षिणीबीज.

ए मरुत्‌बीज, वन्हिबीज, एकादशीबीज, कुण्डलीबीज.

ऐ वाग्भवबीज, सरस्वतीबीज, विजयाबीज, द्वादशीबीज.

ओ सद्योजातबीज, त्रयोदशीबीज, वासुदेवबीज, गायत्रीबीज. सर्वमगलाबीज, त्रैलोक्यविजयाबीज, बीजादिकर्षिणीबीज.

औ ज्वालिनीबीज, आकाकर्षिणीबीज, ज्वालमालिनी बीज.

अं सोमबीज, अमृताकर्षिणीबीज, कुब्जिकाबीज

अः रतिबीज, सुयशाबीज.

क महाकाली स्कन्धबीज, कामेश्वरीबीज

ख आकाशबीज, तारिनीबीज

ग गगाबीज, गणेशबीज, विश्वमाबीज, भोगिनीबीज.

घ चरणबीज, त्रैलोक्यविद्याबीज.

ङ भैरवबीज, परमेशीबीज.

च बुधबीज, चंद्रमाबीज, कुलानतीबीज.
छ सदाशिवबीज, विलासिनीबीज.
ज नन्दीबीज, भोगदाबीज, विजयाबीज.
झ गुहबीज, द्राविणीबीज.
ट पृथ्विबीज, मरुत्बीज.
ठ वन्हिबीज.
ड त्रिवक्त्रबीज, योगिनीबीज.
ढ यज्ञेशबीज, विघ्नेशबीज, मालिनीबीज.
त वाराहीबीज, श्याममुखीबीज.
थ भद्रकालीबीज.
द धराबीज.
ध शंखिनीबीज, धनेशबीज.
न ज्वालिनीबीज.
प कालरात्रिबीज, शनिबीज.
फ कालकुन्जिनीबीज.
ब क्लेदिनीबीज, तापिनीबीज.
भ क्लिन्नाबीज, वा क्लिन्नाबीज.
म कालीबीज, मातंगमालिनीबीज.
य वायुबीज, चामुण्डाबीज.
र अग्निबीज, क्रोधिनीबीज, त्रिपुरसुंदरीबीज.
ल शक्रबीज, अमृतबीज, पृथ्वीबीज, शवबीज.
व वरुणबीज.
श कामबीज, सुभगाबीज.
ष सूर्यात्माबीज.
स सम्मोहा ब्राह्मीबीज.
ह शिवबीज.

ळ पृथ्वीबीज, व्यापिनीबीज.

क्ष नृसिंहबीज, कालजिव्हबीज.

बीजनिघटु म्हणून एक बीजमंत्राचा भाग आहे. त्यावरून खालीं लिहिल्याप्रमाणे मातृका व इतर बीजें यांचे विवरण केलेलें आहे. खालीं लिहिलेले श्लोक स्पष्टार्थदर्शक आहेत. सर्व ते जसेच्या तसेच दिले आहेत.


अ विद्युजिव्हा, आ कालवज्री, इ गर्जिनी, ई धूम्रभैरवी, । उ कालकूटा, ऊ विदारी, ऋ महारौद्री, ॠ भयकरी, ॥ ऌ संहारिणी, ॡ करालिनी, ए ऊर्ध्वकेशी, ऐ उग्रभैरवी, । ओ भीमाक्षी, औ डाकिनी, अं रुद्राकिणी, अः चण्डिका ॥ क क्रोधीश , ख वारण', ग चण्ड., घ कामुक । ङ उन्मत्तभैरवी, च ज्वालामुख', छ रक्तदंष्ट्र', ज असिताग. ॥ झ वलयामुख , ञ विद्युन्मुख , ट महाज्वाली, ठ कपाली, । ड भीषणः, ढ गुरुः, ण प्रहारी, त रोरेव , थ दण्डी, ॥ द वलिन', ध शूलधृक्, न सिंहनादी, प कपर्दी,। फ प्रलयाग्निः, ब भयकरः, भ बहुरूपी, म महाकाल , । य स्थिरात्मा, र क्षतजोक्षित , ल बलभेदी, । व रक्तपटः, श चण्डीश , ष ज्वलनध्वज', स धूम्रध्वज , ह योगवक्त्रः ॥

श्रीं विष्णुप्रिया ह्रीं धूम्रभैरवी क्लीं कालीबीज हू रुद्राकिणी । ऐं वाग्भव-बीज फट् विद्युजिव्हा क्रों क्रोधीशबीज स्वाहा । अग्निवल्लभाबीज क्लीं कामबीज हु कालकूटबीज हूं डाकिनीबीज । स्त्रीं धूम्रभैरवीबीज भ्रं क्षत-जोक्षितबीज स्फें कालाग्निबीज फ्रें वेतालबीज ॥ क्रूं स्वाहा कम्पिनीबीज प्रीं घोराक्षीबीज ठ ठ ठ ठ महाकालबीज स्फीं प्रलयाग्निबीज हूं कालरा-त्रिबीजं ह वैवस्वतबीज हसखफ्रें ऊर्ध्वकेशीबीज । ए योनीबीज दु दुर्गाबीज नाद लोकमाता बिंदु लोकपिता ॥

वर लिहिल्याशिवाय आणखीं कांहीं बीजें खालीं देण्यात येत आहेत.

आ असाध्यसाध. ह्रीं सर्वभूतिप्रद. सौं सर्वमन क्षोभण. द्रां चिरजीवन ब्लूं सम्मोहन वषट् वशीकरण. वौषट् आकर्षण. हु द्वेषण. ट ट स्तंभन सौ सकलाभिवर्धन, नम मवर्न्नकरण. खें खे मारणबीज. आणखी २६ बीजांचे अर्थ मिळाले नाहीत. 'ह्रीं' हें प्रसादबीज आहे.

गायत्री जपासाठीं चोवीस मुद्रा




१ सुमुखम्




२ संपुटम्




३ विततम्




४ विस्तृतम्




५ द्विमुखम्



६ त्रिमुखम्




७ चतुर्मुखम्



८ पंचमुखम्



९ षण्मुखम्



१० अधोमुखम्



११ व्यापकांजलिकम्



१२ शकटम्

मुद्रा प्रकरण


मंत्रशास्त्रांत मुद्रांचें महत्त्व यंत्रांप्रमाणेंच आहे. त्या त्या मुद्रेनें त्या त्या




१३ यमपाशम्




१४ ग्रंथितम्




१५ उन्मुखोन्मुखम्



१६ प्रलंबम्



१७ मुष्टिकम्



१८ मत्स्यः




१९ कूर्मः



२० वराहकम्



२१ सिंहाक्रान्तम्



२२ महाक्रान्तम्



२३ मुद्गरम्



२४ पल्लवम्

देवतेची प्रसन्नता संपादन करावी लागते. परंतु ह्या मुद्रा गुरुमुखानेंच व गुरूंनी दाखविलेल्या पद्धतीनें कराव्या लागतात. गायत्रीमंत्रारंभीच्या चोवीस मुद्रा व दशमुद्राचे फोटो खाली दिले आहेत.

सुमुखं संपुटं चैव विततं विस्तृतं तथा ।
द्विमुखं त्रिमुखं चैव चतुः पंचमुखं तथा ॥ १ ॥
षण्मुखाधोमुखं चैव व्यापकांजलिकं तथा ।
शकटं यमपाशं च ग्रंथितं चोल्मुकोल्मुकं ॥ २ ॥
प्रलम्बं मुष्टिकं चैव मत्स्यं कूर्मं वराहकं ।
सिंहाक्रान्तं महाक्रान्तं मुद्गरं पल्लवं तथा ॥ ३ ॥
एता मुद्रा न जानाति गायत्री निष्फला भवेत् ।
एता मुद्रास्तु कर्तव्या गायत्री सुप्रतिष्ठिता भवेत् ॥ ४ ॥

गायत्रीजपानंतरच्या मुद्रा—

सुरभिर्ज्ञानशूर्पं च योनि कूर्मोय पंकजं ।
लिंगनिर्वाणमुद्रां जपान्तेष्टौ प्रकीर्तिताः ॥

पूजारंभीं करावयाच्या पंचमुद्रा —

अभयमुद्रा, चिन्मुद्रा, वरदमुद्रा, साक्षात्कार, निद्राग्निणी अशा आहेत.
नीराजन दर्शनानंतर करावयाच्या मुद्राः—

कालमुद्रा, योगमुद्रा, सिद्धिमुद्रा, वैहायसीमुद्रा, रसमुद्रा, सक्षोभणमुद्रा, शत्रुक्षयकरीमुद्रा, पातालमुद्रा, अंजलिमुद्रा, परमामुद्रा, आवाहनादि नवमुद्रा.

आवाहनादि मुद्रा—

विष्णुपूजेंतील अकरा मुद्रा —


शंख-चक्र-गदा-पद्म-वेणु-श्रीवत्स-कौस्तुभाः ।
वनमाला तथा ज्ञानमुद्रा विद्याह्वया तथा ।
गुरुडाख्या तथा मुद्रा विष्णोः संतोषदायकाः ।

शिवपूजेंतील दशमुद्रा —

लिंगयोनित्रिशूलाक्षमालाऽभीतिमृगाख्यिकाः ।
खट्वाङ्गा च कपालाख्या डमरूः शिवतोषदाः ॥

सूर्यपूजेंत पद्मा नावाची एकच मुद्रा आहे.

पूजेसाठीं अष्टमुद्रा



गजानन पूजेंत सप्तमुद्रा आहेत —

> दन्त पाशाङ्कुशाविघ्नपरशुर्लड्डुकस्तथा ।
> बीजापूराह्वया मुद्रा ज्ञेया गणपपूजने ॥

देवीपूजेंतील नवमुद्रा —

> पाशाङ्कुश वराभीतिः खड्गचर्म धनुः शरा. ।
> मुशली मुद्रिकाः दौर्गी मुद्रा शक्तेः प्रियंकरा. ॥

ब्रह्मास्त्रजपपूजनाचे वेळीं करावयाच्या मुद्रा —

> मुद्राः पाशं च वज्राख्या जिव्हा ब्राह्मी तथैव च ।
> पंचमुद्राः समाख्याता ब्रह्मास्त्रजपपूजने ॥

वाग्वादिनी व लक्ष्मी पूजेला लक्ष्मी व अक्षमाला, वीणा, व्याख्या, पुस्तक या मुद्रा होत.

वन्हिपूजेंत सप्तजिव्हा मुद्रा सांगितली आहे.

त्रिपुरसुंदरी पूजनांत दहा मुद्रा सांगितल्या आहेत. त्या अशा :—

सक्षोभिणीमुद्रा, बाण, आकर्षण, वश्य, उन्माद, महाकुशमुद्रा, खेचरी, विजयिनी, त्रिखंडा, व धनुर्मुद्रा

अभिषेकाचे वेळीं कुंभमुद्रा, आसनाकरिता पद्ममुद्रा, निम्नप्रशमनाकरिता काळाकर्षिणी, जलशोधनाकरिता गालिनी

गोपाळपूजेंत वेणुमुद्रा, रामार्चनाकरिता धनुष्य व बाणमुद्रा, परशुराम पूजनात परशुमुद्रा करावी जगन्मोहन पूजेंतील जगन्मोहन कर्मात् काममुद्रा योजावी वासुदेव पूजेंत, कुंजवनमुद्रा योजावी प्रार्थना करावयाचे वेळीं प्रार्थना मुद्रा करावी

आवाहनी, स्थापनी, सन्निधापिनी, संबोधिनी, सन्मुखीकरणी, अवगुंठन मुद्रा, या मुद्रा पूजनाचे आधीं कराव्या.

□ □

अमृत-मंजिरी

१. मंत्राचे विधि म्हणजे त्यांचीं 'अभौतिक' यंत्रेंच होत.
२. यंत्र म्हणजे सूक्ष्मशरीरावर स्वामित्व गाजविण्याचें साधन.
३. तंत्रविद्या ही 'कृष्ण विद्या' नाहीं. ती शक्तिविद्येचें एक स्वरूप आहे.
४. मंत्रशक्तिप्राप्त्यर्थ सर्वप्रकारच्या 'शुचितेची' निकडीची आवश्यकता असते.
५. मुद्रामुळें ज्ञानतंतूवर परिणाम होतो.
६. मुद्रा म्हणजे त्या त्या स्थानातील देवतारूपी शक्तिकेंद्रें जागृत करण्याची कृति.

६ तेजोबलवर्चसी गायत्र्योपासना

गायत्री — यंत्र व मंत्र महिमा

गायत्री यंत्र ताम्र्याच्या अगर चांदीच्या पत्र्यावर उठवून घ्यावें कोण खालीं यावा व 'भो भो गायत्री' हीं अक्षरे वर यावीत ह्या अक्षराचे वर त्रिरेखात्मक जागेंत 'ॐ भूर्भुव स्व ॐ' असे यावें. नंतरच्या अर्धरेषेंत 'तत्सवितुर्वरेण्य' नंतरच्या जागेंत 'ॐ' नंतर भर्गोदेवस्यधीमहि 'नंतर ॐ' नंतर 'धियोयोनः प्रचोदयात्' नंतर 'परोरजसे सावत्' नंतर 'ॐ' अशीं अक्षरे लिहावीं (हे मंत्रसिद्धि साधनाकरिता उपयोगावयाचे गायत्रीयंत्र निराळें आहे) पण पुढें अष्ट-कोनात्मक गायत्री यंत्र दिलें आहे


सा हैषा गयास्तत्रे प्राणा वै गयांस्तत् प्राणांस्तत्रे तद्यत् गयांस्तत्रे तस्मात् गायत्री नाम ॥ १ ॥ (शतपथ ब्राह्मण १८-४-१५ १०)
यस्मा अन्वाह तस्य प्राणांस्त्रायते। (बृहदारण्यकोपनिषद)
वाग् वै गायत्री वाग् वा इदं सर्वं भूत गायति च त्रायते च
(छांदोग्योपनिषद)

गानात् त्राणाच्च गायत्र्या गायत्रीत्यम् गायतं त्रायते इति।
गायतस्त्रायसे देवि तद् गायत्रीति गद्यते।
गय प्राण इतिप्रोक्तस्तस्य त्राणादपीतिवा।

गय म्हणजे प्राण ह्याचें रक्षण करितें म्हणून तिला गायत्री म्हणतात. हे गायत्री देवी, जो नेहमीं तुझी प्रार्थना करितो, त्याचें तू रक्षण करितेस. वाणी

हीच गायत्री, वाणी हीच सर्व जगताचे वर्णन करिते व रक्षण करिते. वर्णन करणाऱ्याचे रक्षण केल्यामुळे गायत्रीला गायत्रीत्व येतें.

गायत्री यंत्र



गायत्रीमंत्राचें सामगायन केल्यामुळें सामगायकाचें ती रक्षण करिते.

सर्वे शाक्ता द्विजाः प्रोक्ता न शैवा नच वैष्णवाः ।
आदिदेवीमुपासन्ते गायत्रीं वेदमातरम् ।

वस्तुतः शैव, वैष्णव, सौर व गाणपत्य हे भेद व्यर्थ होत, कारण सर्व द्विज गायत्रीची उपासना करितात म्हणून सर्व नैसर्गिक शक्ति उपासक होत. मुक्ता, विद्रुम, हेम, नील, धवल, अशा पांच रंगांनी युक्त श्रीगायत्री देवीच्या पंच मुखांचे वर्णन पुराणांतरीं केलेलें आहे व अशा

गायत्रीमंत्राचे अर्थहि पंचदेवात्मक केलेले आहेत. पंचदेवोपासना ह्या एका गायत्रीमंत्रानेंच सिद्ध होते, म्हणून ह्या मंत्राची महती वर्णन केलेली आहे.

> जिह्वा दग्धा परान्नेन हस्तो दग्धः प्रतिग्रहात् ।
> मनो दग्धं परस्त्रीभिः कथं सिद्धिर्वरानने ॥

मंत्रसिद्धि कशानें होईल याचा विचार करीत असतां असें म्हटलें आहे 'हस्तो दग्धः प्रतिग्रहात्' म्हणजे मंत्रसिद्धीची इच्छा करणाऱ्या साधकानें प्रतिग्रह म्हणजे दान घेऊं नये. सिद्धि प्राप्त व्हाव्या अशी इच्छा करणाऱ्याला हा नियम लागू आहे. तथापि गायत्रीमंत्राची उपासना शास्त्रीय रीतीनें सर्वात्मभावनारूप अभेद भावानें अपरोक्षानुभूति प्राप्त व्हावी म्हणून जो करील त्यानें प्रतिग्रह घेतला तरी गायत्रीमंत्राच्या प्रथम पादाच्या उपासनेच्या फलानें तो प्रतिग्रहरूपी पातकत्रयप्रतिबंधांतून मुक्त होतो. तीन लोकांतील धनसंपत्तीचा प्रतिग्रह करील तरीसुद्धां प्रथम पादाच्या उपासनेच्या फलानें त्याचे प्रतिग्रहरूपी पातक नष्ट होईल. वेदत्रयींच्या फलाचा प्रतिग्रह करील तर त्या पातकापासून गायत्रीच्या दुसऱ्या पादाच्या उपासनेनें उत्पन्न होणाऱ्या फलानें वेदत्रयीच्या प्रतिग्रहरूपी पातकापासून तो मुक्त होईल, व सर्व जगत्‌रूपी प्रतिग्रह जरी केला तरी गायत्रीच्या तृतीय पादाची उपासना करणारास प्रतिग्रहाचें पातक लागत नाहीं. गायत्रीमंत्राचा चतुर्थ पाद परब्रह्मस्वरूप असल्यानें त्या चतुर्थ-पादाच्या उपासनेचें फल अतुल आहे.

> य एतां वेद गायत्रीं पुण्यां सर्वगुणान्विताम् ।
> तत्त्वेन भरतश्रेष्ठ स लोके न प्रणश्यति ॥

या श्लोकानेंही गायत्रीमंत्राचें महत्त्व समजून येत आहे.

---

१. हस्तौ दग्धौ असाही पाठ आहे.

तत्र गायत्रीं प्रणवादिसप्तव्याहृत्युपेतां
शिरःसमेतां सर्ववेदसारमिति वदन्ति।
त्रिपदा गायत्री तु प्रणवान्ता ज्ञातव्या।

(शाङ्कर गायत्रीभाष्य)

गायत्रीमंत्र चारी वेदांत आहे. ऋग्वेदात अ. ४. व १० मंत्र ३ सूक्त ६२ मध्यें आहे. यजुर्वेद संहितेच्या तिसऱ्या अध्यायात ३५ वा मंत्र गायत्रीमंत्र होय. सामवेदात गायत्री उपनिषद् स्वतंत्र आहे. नारायण उपनिषदांत ३५ सावा मंत्र गायत्रीमंत्रच आहे. अथर्ववेदात सूर्योपनिषद् या उपनिषदात गायत्रीमंत्र आहे. छांदोग्य उपनिषदांत व बृहदारण्यकांत गायत्रीमंत्राचा महिमा वर्णिलेला आहे. 'गायत्री छंदसां माते इदं ब्रह्म जुषस्व मे' असें श्रुति म्हणते.

महर्षि वाल्मिकीऋषींनी वाल्मिकी रामायणाच्या चोवीस हजार श्लोकांपैकीं प्रत्येक सहस्र श्लोकाचे आरंभीं गायत्रीमंत्रातील एकएक अक्षर घातलेलें आहे. श्रीभागवताचेही द्वादश स्कंध लिहितांना गायत्रीमंत्रातील दोन दोन अक्षरांचें प्रत्येक स्कंधात वर्णन आहे व पहिल्या श्लोकांत गायत्री मंत्रातील धीमही हे पद 'सत्यं परं धीमही' या श्लोकांत आणलें आहे श्रीभगवद्गीतेंत श्रीभगवान गोपालकृष्णानी 'गायत्री छंदसामहं' म्हणून गायत्रीची महती गायिली आहे पराशरसंहिता, भविष्यपुराण, अग्निपुराण व पद्मपुराण या पुराणांत गायत्रीची महती वर्णिलेली आहे. महाभारतग्रंथ प्रथमतः 'जय' या नावानें संबोधिला जात असे. त्याचे चोवीस हजार श्लोक होते व त्या जय ग्रंथात श्रीभगवद्गीतेचे चोवीस अध्याय नमूद केलेले होते. या चोवीस अध्यायाचे आरंभीं गायत्रीमंत्राचीं चोवीस अक्षरें आलेलीं होतीं असा चोवीस हजार श्लोकाचा जय ग्रंथ आज उपलब्ध नाहीं. एतद्दर्शनं गायत्रीमंत्र किती पूज्य, प्रीतिपात्र व महनीय होता तो प्रस्तुतकालीं तसा मानला जातो काय? हें वाचकांनींच ठरवावें.

कोणीही आपल्या गुप्तधनाची प्रसिद्धी करूं इच्छित नाहीं व यामुळें ऋषीमुनी यांनी गुप्तधनरूपी गायत्रीमंत्राच्या शक्तीचा परिस्फोट केलेला नाहीं. शिवपुराण, कालिकापुराण याप्रमाणें गायत्रीमहापुराणही कोणा ऋषीला सहज लिहिता आलें असतें असें एक छोटेसें शतश्लोकी गायत्री पुराण आमचे पाहण्यात आलें आहे. गायत्रीमंत्राबद्दल याज्ञवल्क्यऋषींनीं असें म्हटलें आहे कीं

यथा च मधुपुष्पेभ्यो घृतं दुग्धाद्रसात् यथा ।
एवं हि सर्ववेदाना गायत्री सारमुच्यते ॥

गायत्रीउपासना त्रैवर्णिकाच्या संध्येंत प्रामुख्यानें येते प्रत्यक्ष गायत्री मंत्राचा जप व सूर्योपस्थानात गायत्रीचें दर्शन व सूर्यचरणाची स्तुति असा संध्येचा क्रम आहे ही संध्या त्रिकाळ करावयाची असते. उपनयनाचे वेळीं गायत्रीमंत्राचा उपदेश होतो 'उपदिशति' म्हणजे जवळ बसवून दाखवितो. गायत्रीमंत्रात वर्णिलेलें सूर्यतेज बटूच्या ठायीं आहे, तें तेज बटूला दाखविणें असा अर्थ आहे आपल्या ठिकाणीं तें सूर्यतेज आहे अशा प्रकारचा अनुभव बटूस आणून देणे ही गोष्ट किंवा ही क्रिया आजकाल सर्वतोपरी लुप्त झाली आहे 'भूर्भुव स्व' ह्या तीन व्याहृति म्हणून व त्यांनीं निर्दिष्ट केलेल्या स्वर्गलोकात असलेल्या म्हणजे आपणास दृगोचर होणाऱ्या सूर्यदेवतेजवळ जाऊन तेथून पुढें दिसणारा 'तत्सवितुर्भर्गो' दुसऱ्या सूर्याचें म्हणजे आपल्या शरीरातील भ्रूमध्यस्थित आत्मतेजाला सहस्रार चक्रस्थित परमात्मतेजाचें दर्शन करवून देणें, ही क्रिया एखाद्यासच परिचित असेल! त्यामुळें बटूला गायत्रीदेवीच्या मंत्राचा उपदेश करणें ही बाब केवळ उपहासात्मक झाली आहे असो केवळ गायत्रीमंत्राचा शब्दश उपदेश करणे ही गोष्ट कस्पटाप्रमाणे निरर्थक झाली आहे। *गायत्रीमंत्राचा उपदेश करण्यापूर्वी उपदेशाधिकार प्राप्त्यर्थ बटूच्या पित्याला अगर पितृसदृश दायादाला गायत्रीमंत्राचा*

चाराशें गायत्रीमंत्र जपावा लागतो. तसा जप स्वतः करण्याऐवजीं तो जप ब्राह्मणद्वारा केला तरी चालेल अशी शास्त्रज्ञाकडून सोय निघाली आहे. परंतु तो क्रमही आतां बहुतांशीं लुप्त झाला आहे. गायत्रीमंत्र कसा म्हणावा ही गोष्ट उपदेशकर्त्यालाच अननुभूत असेल तर तो उपदेशकर्ता बटूला तरी काय शिकविणार? "अन्धेनैव नीयमाना यथान्धाः' असा क्रम चालला आहे. 'गायंत त्रायते गायत्री' ही गोष्टही अशक्यच होऊन बसली आहे. गायत्रीमंत्रात प्रणव कोठे म्हणावा हेंही माहीत नाहीं. भूशुद्धि, भूतशुद्धि, प्राणप्रतिष्ठा, अंतर्मातृका, बहिर्मातृका, शापविमोचन, उत्कीलन, सजीवन व अस्त्रोपसंहार या क्रियाही माहीत नसतात.

वैदिक संध्या व तांत्रिक संध्या त्रिकालीं करावयाच्या असतात. तांत्रिक संप्रदायात तुरीय संध्या असते, म्हणजे ती मध्यरात्रीं करावयाची संध्या होय. वस्तुतः प्रातःसंध्या आणि सायंसंध्या या दोन मुख्य संध्या होत. रात्र व दिवस याचा जो संधि ती संध्या वेळा होय. स्वरशास्त्राचा अभ्यास करणारे योगी सूर्योदयापासून सूर्यास्तापर्यन्त एकच स्वर म्हणजे इडा (डाव्या नाकपुडींतून वाहाणारा स्वर), अगर पिंगला (उजव्या नाकपुडींतून वाहणारा स्वर) कायम करीत असतात. सूर्योदयाबरोबर इडा नाडीचा उदय होतो. हा जो इडापिंगलेचा उदयास्त त्या दोन्ही नाड्यामध्ये सुषुम्ना नाडी पंधरा अगर वीस पळेंपर्यंत चालू असते म्हणजे त्याच वेळीं दोन्ही नाड्या सारख्या चालू असतात. अशा या सुषुम्ना नाडीची वेळा अभ्यासानें वाढविता येते, हा जो सुषुम्ना नाडीचा काल तीच खरी संध्यावेळा होय. आणि ही वेळा सूर्योदय व सूर्यास्तकाल हीच होय. योगी लोक याच नाडीस ध्यानगत होत असतात. 'महाजनो येन गतः स पंथा.' या न्यायानें सामान्य लोक प्राकृतिक सूर्योदय व सूर्यास्त यास संध्या म्हणतात व त्याप्रमाणे संध्याची योजना केलेली आहे.

वैदिक संध्येंत त्रिकाल संध्याच्या देवता ब्रह्मा, रुद्र व विष्णु अशा दिलेल्या आहेत. परंतु तांत्रिक संध्याच्या देवता बाला, युवती व वृद्धा

अशा दिलेल्या आहेत. तदनुरूप रुद्रदेवता संहारकर्ती म्हणजे वृद्ध अशी योजना दिसते. वैदिक संध्येत माध्यान्हकाळीं रक्षण करणारी विष्णुदेवता असावी. परंतु सायंकाळीं म्हणजे प्रलयकाळीं विष्णु देवता नियत केलेली आहे याबद्दल लेखकाचे म्हणणे असे आहे कीं, माध्यान्ह मध्येचा वेद यजुर्वेद आहे व यजुर्वेदात रुद्रदेवताराधन नमकचमकात्मक रुद्रपाठानें करावें असें सांगितलें, म्हणून रुद्रदेवता माध्यान्हकाळीं ठरविली असावी. तसेंच सायंसंध्येला सामवेदसंहिता सांगितली आहे व गीतेत श्रीकृष्णानीं 'वेदानां सामवेदोस्मि' असें सांगितले आहे. यामुळे सायंसंध्येला विष्णुदेवता नियत केली असावी

वस्तुत ब्रह्मदेव हे रज प्रकृत्य - - - - - -
विष्णु तम प्रकृत्यात्मक आहेत.
तीं अनुक्रमे रजोगुणात्मक, तमोगुणात्मक व सत्वगुणात्मक आहेत म्हणजे अधिकार जे दिले ते म्हणजे ब्रह्मदेवाला सृष्ट्युत्पादनाचा अधिकार, रुद्राला संहाराचा अधिकार व श्रीविष्णूला सृष्टीपालनाचा अधिकार हे होत. म्हणजे ब्रह्मा रजोगुणात्मक, शिव तमोगुणात्मक व श्रीविष्णु सत्वगुणात्मक असे त्यांचे गुण आहेत. म्हणून त्यानीं ह्या जबाबदाऱ्या पत्करिल्या आहेत. *प्रकृति म्हणजे स्वाभाविक धर्म व गुण म्हणजे* अस्वाभाविक धर्म. अस्वाभाविक धर्मस्वीकार करणें म्हणजे स्वाभाविक प्रकृतिलोप करणे होय, म्हणजे आपल्या स्वभावाला न पटणाऱ्या सत्ताधिकाऱ्याची भूमिका धारण करणे होय. जसे सात्विक स्वभावाच्या मनुष्याला सेनानायकाची सत्ता चालविण्याचा प्रसंग येणें. सृष्ट्यारंभपूर्व-स्थिति म्हणजे निर्गुणत्व व प्रकृति स्थायित्व होय. स्वाभाविक धर्मलोप म्हणजे अधिकारग्रहण म्हणजे सगुणरूप धारण. सृष्टिक्रिया सुरू झाली म्हणजे श्रीविष्णु हे सत्वगुणी व श्रीशिव हे तमोगुणी होत असें त्यांचें ध्यान करावयाचें व मूळप्रकृत्यात्मक ध्यान म्हटलें तर माध्यान्हकाळीं सत्वप्रकृत्यात्मक शिवदेवतेचें ध्यान पाहिजे व सायंकाळीं तम प्रकृत्यात्मक श्रीविष्णुदेवतेचे ध्यान करावयास पाहिजे, व त्याचे उलट गुणात्मक

ध्यान म्हटलें तर माध्यान्हकाळीं सत्त्वगुणी श्रीविष्णुदेवतेचें ध्यान व सायंकाळीं तमोगुणी श्रीशिवदेवतेचें ध्यान करावें तमोगुणी श्रीशिवाचा मुलगा श्रीगजानन हे विघ्नहारक व सत्त्वगुणी श्रीविष्णूचे चिरंजीव मदन हे विघ्नकारक. यावरून श्रीशिव हे सत्त्वप्रकृति आहेत व श्रीविष्णु हे तमप्रकृति आहेत गुण आणि प्रकृति याच्या योगानें हे दोघेही उलटसुलट तमोगुणप्रधान अगर सत्त्वगुणप्रधान होतात याप्रमाणे माध्यान्हसंध्येत श्रीशिवाची योजना ते सत्त्वप्रकृत्यात्मक म्हणून केली असावी व श्रीविष्णूची सायंसंध्येची देवता ते तमप्रकृत्यात्मक म्हणून केली असावी असा लेखकाच्या म्हणण्याचा आशय आहे व या प्रकारच्या विचारसरणीला स्कंदपुराणाचा आधार आहे

वेदग्रथांतील पुरुषसूक्तात शूद्राची योजना वेदपुरुषाच्या चरण कमलाजवळ केलेली आहे म्हणजे 'पद्‌भ्यांशूद्रोऽजायत' वेदपुरुषाच्या चरणाजवळ ते असतात त्यांच्या उपासनेबद्दल कांहीं उल्लेख दिसत नाहीं परंतु वेदाबरोबरच अस्तित्वात असलेल्या आगमादि ग्रंथात शूद्राच्या उपासनेबद्दल पुष्कळ उहापोह केलेला आहे म्हणजे शूद्राकरिता गायत्री व ध्यान सांगितलं आहे व त्याशिवाय शक, शबर, यवन, असे जे आर्यावर्ताबाहेरील लोक अथवा आर्यावर्तांतील हीन संस्कृतीचे लोक यांच्याकरिता दीक्षादि विधान वर्णन केलेलं आहेत उदाहरणार्थ, महानिर्वाण तंत्रात सांगितलं आहे कीं, श्रीसावित्री देवतेचा महिमा जसा वेदग्रथांत सांगितला आहे तसाच तिचा महिमा आगमादि तंत्रग्रथांतही सांगितला आहे. कलियुगांत गायत्रीमंत्रारंभी ब्राह्मणांना 'प्रणव' म्हणावा, क्षत्रियांनीं गायत्री मंत्रारंभीं 'श्रीं' बीज लावावें वैश्यांना गायत्री मंत्रारंभीं 'ए' बीज लावावें व शूद्रांना आगमोक्त गायत्रीमंत्राचा जप करावा कलियुगात सर्वतोपरी संस्काराचा लोप झाल्याने ब्राह्मणादि त्रैवर्णिक सर्वच संस्कारहीन झालेले आहेत त्या ब्राह्मणकुलांत तीन पिढ्या वेदपठणाचा लोप झाला त्या ब्राह्मणकुळातील चवथी पिढी ब्राह्मणत्वापासून च्युत होते

म्हणजे त्या पिढींतील लोक शूद्रवर्णाशीं समरस होतात. ही गोष्ट आज व्यवहारांत आपणांस दिसतच आहे. आज ब्राह्मणकुलांतील आंग्ल शिक्षणानें होरपळून निघालेले सोळा वर्षांपासून छत्तीस वर्षांमधील पुरुष पहा. शंभरांपैकीं वव्हंशीं पुरुष संध्याविहीन, श्राद्धविहीन, पंचमहायज्ञविहीन, शिखासूत्रविहीन असे दिसून येतात. अशांनां जर ईशकृपेनें सद्बुद्धि उत्पन्न झाली व त्रैवर्णिकांनां वैदिकसंध्या व शूद्रांनां आगमोक्त ब्रह्मगायत्री जप व ध्यान करावयाची व सूर्यनमस्कार करण्याची इच्छा झाली तर त्यांनीं आगमोक्त गायत्रीचा जप व ध्यान करावें. ही आगमोक्त ब्रह्मगायत्री 'ओं परमेश्वराय विद्महे। परतत्वायधीमहि। तन्नोब्रह्मप्रचोयात्।' अशी आहे. व 'विप्राविप्रेतराश्चैव सर्वेऽप्यत्राधिकारिणः' उल्हास २ महानिर्वाणतंत्रांत हा उल्लेख आलेला आहे. सविता म्हणजे सूर्य, त्याचें शक्तिरूप म्हणजे सावित्री.

२. ऋग्वेदांतील सावित्रीमंत्र

अर्चनापुत्र	तत्सवितुर्वृणीमहे। वयं देवस्य भोजनम्।
शावाश्व ऋषिः	श्रेष्ठं सर्वधातमम्। तुरं भगस्य धीमहि॥
अनुष्टुप छंद	
सविता देवता	ऋग्वेद मंडळ, ५-८२-१

३. गुप्त सांप्रदायांतील सावित्रीमंत्र

विश्वामित्र ऋषि–'ॐ भूः सावित्रीं प्रविशामि। ॐ तत्सवितुर्वरेणियम'॥ ७॥
गायत्री छंद–'ॐ भुवः सावित्रीं प्रविशामि। भर्गो देवस्य धीमहि'॥ ८॥
सविता देवता–'ॐ स्वः सावित्रीं प्रविशामि। धियो यो नः प्रचोदयात् ॐ'॥

हा मंत्र मोठा यशस्वी आहे. *परंतु गुरुमुखाशिवाय ह्याचा उपयोग होणार नाहीं.*

हे वैदिक गायत्रीमंत्राचें महत्त्व वर्णन केले. आता त्या मंत्रातील प्रत्येक पदाचें महत्त्व काय आहे ते पाहूं. प्रथम गायत्रीमंत्रात प्रणवाचा उच्चार करावा असे सांगितलें आहे. कठोपनिषदात धर्मराजानें नचिकेतास प्रणवाचें महत्त्व सांगितले आहे.

सर्वे वेदा यत्पदमामनन्ति तपांसि सर्वाणि च यद्वदन्ति ।
यदिच्छन्तो ब्रह्मचर्यं चरन्ति ॥
तत्ते पदं संग्रहेण ब्रवीम्योमित्येतत् ।
एतध्द्येवाक्षरं ब्रह्म एतद्ध्येवाक्षरं परम् ॥
एतद्ध्येवाक्षरं ज्ञात्वा ब्रह्मलोके महीयते ।
एतदालंबनं श्रेष्ठमेतदालंबनं परं ।
एतदालंबनं ज्ञात्वा ब्रह्मलोके महीयते ॥

संपूर्ण वेदानी ज्या पदाचा महिमा वर्णिलेला आहे व ज्या पदाचा जप करावा असे सांगितलें आहे व ज्या पदाचें ज्ञान होण्याकरिता ब्राह्मण ब्रह्मचर्याचें आचरण करितात, तें पद तुला सांगावयाचे तर ते ॐकार हे पद होय. हेंच पद ब्रह्मरूपाचे दिग्दर्शक आहे व ह्याच पदाचे आमूलाग्र ज्ञान झाल्यास ब्रह्मलोक प्राप्त होतो. ब्राह्मणाना हेंच पद एकमेव निर्वाणाचें आश्रयस्थान आहे व श्रेष्ठ पदवीला पोंचविणारें आहे. हे आश्रयस्थान आपलेसेंकरून म्हणजे आत्मसात् करून घेतलें तर ब्रह्मलोक प्राप्त होतो. श्रीमद् भगवद्गीतेत 'ॐ इत्येकाक्षरं व्याहरन् मामनुस्मरन्-मद्भावं याति न संशय:' असे विधान सर्वांकरिता सांगितलें आहे.

प्रश्नोपनिषदात सत्यकामाने पिप्पलाद ऋषींना विचारलें कीं, जो मानव आमरण प्रणवाचें ध्यान करितो त्यास कोणत्या लोकाची प्राप्ति होते ? तेव्हा त्यास त्यांनी सांगितले की, त्या ॐकार जपकर्त्या मानवास सगुण व निर्गुण ॐकारस्वरूप ब्रह्मपदाची प्राप्ति होते.

युञ्जीत प्रणवे चेतः प्रणवो ब्रह्मनिर्भयम् ।
प्रणवे नित्ययुक्तस्य न भयं विद्यते क्वचित् ॥

प्रणवं हीश्वरं विद्यात् सर्वस्य हृदि संस्थितम् ।
सर्वव्यापिनमोंकारं मत्वा धीरो न शोचति ॥
अमात्रोऽनन्तमात्रश्च द्वैतस्योपशमः शिवः ।
ॐकारो विदितो येन स मुनिर्नेतरो जनः ॥ (गौडपादकारिका)

निर्भय ब्रह्मरूप ॐकाराचें चिंतन करावें. प्रणव हाच ईश्वर आहे व हा सर्वांच्या हृदयात वास करितो. प्रणवाला मात्रा नाहींत, असें म्हटलें तर त्यास अनंत मात्रा आहेत. कारण सर्व अक्षरें प्रणवाच्या ॐकाररूप शरीरातील अवयवात्मक आहेत. द्वैत–अद्वैत–नादाची प्रणवाच्या योगानें परिसमाप्ति झाली आहे. ज्यानें 'ॐकार' समजून घेतला त्याला मुनीच म्हणावें, इतरे जनामध्ये त्याची गणना करिता येत नाहीं.

श्रीमद्भगवद्गीतेंत म्हटलें आहे कीं–

ॐमित्येकाक्षरं ब्रह्म व्याहरन्मामनुस्मरन् ।
यः प्रयाति स मद्भावं याति नास्त्यत्र संशयः ॥

प्रणवाचें महत्व वर्णन करिताना सांगितलें कीं, जो ॐ अक्षर-ब्रह्माचा जप व माझें स्मरण प्रयाणकालीं करील त्याला मत्स्वरूपाची प्राप्ति होईल यात संशय नाहीं.

ॐकार या मंत्राचा ऋषि ब्रह्मा, छंद गायत्री व सर्व कर्मारंभीं उच्चार हा त्याचा विनियोग आहे. ॐकार मंत्राचा कोटी जप केला असता सगुणब्रह्मदर्शन होतें असें सांगितलें आहे.

गायत्रीमंत्रारंभींच्या भूरादि सप्तव्याहृतींपैकीं व्याहृतित्रयाचे महत्व वेदांत फारच सुरस केलेलें आहे. एका वेळीं प्रजापती हे ह्या जगात सार वस्तु कोणती हें जाणण्याकरिता तप करूं लागले. त्यावेळीं त्यांना पृथ्वीवर अग्निदेवता, अंतरिक्षात वायुदेवता आणि स्वर्गांत आदित्यदेवता ह्याच मुख्य देवता आहेत असें समजून आलें. व पुन्हा तपश्चर्या केल्यावर अग्नीमध्यें ऋग्वेद, वायूत यजुर्वेद व आदित्यामध्यें सामवेद सारभूत आहे

असें दिसलें. पुन्हा तपाचरण केल्यावर ऋग्वेदांत भूमि, यजुर्वेदांत भुवः व सामवेदांत स्वर्लोक आहे, असें त्यांस समजून आलें. 'भूः' चा अर्थ सत्, 'भुवः' चा अर्थ चित् व 'स्वः' चा अर्थ आनंद होय. 'महः' चा अर्थ सर्वातिशय महत्त्व, 'जनः' चा अर्थ आदिकारण व 'तपः' याचा अर्थ तेजोरूप परतेज असा असून सत्य याचा अर्थ सर्वबाधराहित्य असा आहे.

प्रणवान्ता गायत्री जपादिभिरुपास्या ।
तत्र शुद्धागायत्री प्रत्यग् ब्रह्मैकबोधिका ॥
बुद्ध्यादि सर्वदृश्यसाक्षिलक्षणं ।
यन्मे स्वरूपं तत्सर्वाधिष्ठानभूतं ॥
परमानंदं निरस्त-समस्तानर्थरूपं स्वप्रकाशचिदात्मक ।
ब्रह्मेत्येवं धीमहि । ध्यायेम ॥
सोऽयं इति न्यायेन सर्वसाक्षिप्रत्यगात्मनो ।
ब्रह्मणा सह तादात्म्यरूपमेकत्वं भवति इति ॥
सर्वात्मकब्रह्मबोधकोऽयं गायत्रीमंत्रः संपद्यते ।

(शांकर गायत्री भाष्यम्)

प्रणवादि व प्रणवान्ता गायत्री जपतप अनुष्ठान करण्यास उपास्य देवता म्हणून योग्य आहे. शुद्ध गायत्री मंत्र प्रत्यक्षतेनें अभिन्न असलेल्या ब्रह्म-तत्त्वाचा बोधक आहे. दृश्य जगताला साक्षीभूत असें जें माझें रूप तेंच सर्व जगताचें अधिष्ठान आहे. मायोपाधिनिर्मित सर्व अनर्थ माझ्या स्वरूपात दृग्गोचर होत नाहींत. माझें स्वरूप परमानंदमय आहे, व स्वयंप्रकाश चिदात्मक असें जें माझें स्वरूप त्याचें सर्व साधक लोक ध्यान करितात, अशा प्रकारचा ब्रह्मात्मबोधक गायत्री मंत्र आहे व प्रणवतत्त्वाशीं या मंत्राचें अतिशय साम्य आहे असें दिसतें. श्रीदेवीभागवतांत प्रणवान्ता गायत्री दिलेली नाहीं. पुराण वाचतांना पुराणोक्त रूपानें तो मंत्र वाचावा. संध्येंत मंत्रज्ञांनीं तो गायत्री मंत्र म्हणावयाचा असतो म्हणून त्या गायत्रीमंत्राचा प्रणवान्त जप करावा.

प्रणव तत्त्वाच्या अ, उ, म, अशा तीन मात्रा आहेत, यांपैकीं अकाराचा अर्थ व्यष्टि, समष्टि, वैश्वानर, विराट् असा आहे. उकाराचा अर्थ तैजस् व हिरण्यगर्भ व मकाराचा प्राज्ञ व ईश्वर असा आहे. त्याचप्रमाणें 'तत्सवितुर्वरेण्य' या गायत्रीमंत्राच्या प्रथम पादाचा अर्थ असा आहे कीं, त्यात सर्व विश्वाची उत्पत्ति करणाऱ्या ईशशक्तीचें प्रतिपादन केलें आहे, आणि कार्यकारणभाव ईश्वराच्या ठिकाणीं एकत्व रूपानेंच असल्यानें कर्तृत्वशक्तीमध्यें कार्य करणाऱ्या शक्तीचा अंतर्भाव होत आहे द्वितीय पादामध्यें तैजस व हिरण्यगर्भ याचें प्रतिपादन आहे. तेजवाचक 'भर्ग' पदानें व ध्यानकर्तृवाचक 'धीमहि' पदानें द्वितीयपदाचा अर्थ स्पष्ट होतो. क्रियावाचक 'प्रचोदयात्' पदानें वैश्वानर पदाशीं अभिन्न असलेल्या विराट् स्वरूपाचें दिग्दर्शन होतें.

न्यायशास्त्राप्रमाणें गायत्री मंत्राच्या शेवटल्या पादापासून म्हणजे, 'प्रचोदयात्' या पदानें आरंभ केल्यास प्रथम सृष्टि उत्पत्तीचे वेळीं संकल्प परिमाणूत चेतना उत्पन्न होते. नंतर 'यो न' (यू मिश्रण) य' ह्या पदानें संकल्प परिमाणूचें मिश्रण होतें. याप्रमाणे आरंभवादाच्या रीतीनें संयोगपूर्वक सृष्टीची उत्पत्ति होते. 'धिय' पदानें मन व आत्मा याच्या संयोगानें सांसारिक बुद्धि उत्पन्न होऊन सांसारिक भोग भोगण्याची वृत्ति उत्पन्न होते. 'धीमहि' या पदानें ईश्वरविषयक ध्यानादि क्रियाचे योगानें सात्त्विक ज्ञान प्राप्त होतें. नंतर 'अ देवस्य भर्ग' या पादानें अ देव म्हणजे अज्ञान व भर्ग म्हणजे नाश, अज्ञानाचा नाश होतो. अशा मिथ्या ज्ञानाचा नाश झाल्यावर 'वरेण्य' म्हणजे श्रेष्ठ मुक्ति प्राप्त होते. ही मुक्ति म्हणजे 'सवितु' कर्तारूप आत्म्याची एकवीस प्रकारच्या दु:खाचा नाश झाल्यानंतरची अवस्था होय.

योगशास्त्राप्रमाणें ह्या गायत्री मंत्राचा अर्थहि समजून घेतला पाहिजे. 'प्रचोदयात्' या पदानें कुंडलिनी समुत्थानापासून षट्चक्रभेदन अथवा षट्चक्रांतून जाणाऱ्या कुंडलिनीची भावना करून सहस्रार चक्रनिवास

होईपर्यंतची क्रिया अभिमत आहे. या क्रियेनें क्लेश कर्मादिकाचा लेश नसलेला असा जो ईश्वर म्हणजे सविता आमच्या बुद्धीला शुभचिंतन करण्यास प्रवृत्त करो व अन्य सांसारिक भोगाकडे आमची प्रवृत्ति न होवो. याप्रमाणे मंत्रातील अन्य पदाचाही अर्थ दाखविता येईल.

याप्रमाणे गायत्रीमंत्राचे निरनिराळ्या भूमिकांवरून अर्थ केल्याने केवळ आद्य प्रकृतीला मूलभूत धरून केलेले अर्थ बरोबर नसावे. कारण त्या अर्थांवरून प्रकृतीची अनादिता सिद्ध होते, व पुरुषाचीही होत आहे, व प्रकृति व पुरुष अशीं दोन तत्त्वें अनादि मानावीं लागतात. 'प्रकृतिं पुरुषं चैव विद्ध्यनादि उभावपि' या गीतोक्त वचनाकडे विवेचनाचा कल जाऊन मूळ मंत्रातील अद्वैतसिद्धि बाजूस पडते अशी शंका कोणास येईल. परंतु उपासना प्रकरणातील हे विवेचन असल्यानें प्रारंभीं द्वैत मानल्याशिवाय उपासना हा विषय मांडताच येत नाहीं. आज जगांत अद्वैत मार्गीयाना व्यवहारांत द्वैत मानल्याशिवाय व्यवहार करिता येतो का? श्रीसमर्थांनी 'उपासना उपासना' अशा द्विरुक्तीनें साधकास उपदेश केला ती उपासना म्हणजे जवळ बसणें. तें कोणाच्या? इष्टदेवतेच्या. या विचारपरंपरेंत द्वैतकल्पना असल्याखेरीज उपासना शक्यच नाहीं 'शिवो भूत्वा शिवं यजेत्' म्हणजे शिवच झाल्यावर दुसरा शिव राहिला कोठें व त्याची पूजा ती काय? तेव्हा शिवो भूत्वा म्हणजे शुद्ध व निर्मल भावना धारण करून, स्थूल सूक्ष्म कारणादि देहाच्या अनिष्ट वृत्तींकडे असलेल्या प्रवृत्तींचा निरोध करून सर्व कल्याणनिधान उपास्य देवतेची पूजा करावी असाच त्या वचनाचा अर्थ आहे नवविधा भक्तींत आठ प्रकारच्या भक्तींचें अनुष्ठान असताना द्वैतभाव असतोच असतो.

असा द्वैतभाव असल्याशिवाय 'ह्रीं क्लीं श्रीं' अशा बीजांनीं युक्त असलेले मंत्र सिद्ध होणार नाहीत. 'अध्यारोपापवादाभ्यां निष्प्रपंचं प्रपंच्यते' या वचनाप्रमाणें अधिकारभेदानें भिन्नभिन्न संस्काराच्या साधकांस भिन्नभिन्न प्रक्रियांचा उपयोग करावा असें शास्त्रांत सांगितलें

आहे. 'अधिकार तैसा करूं उपदेश' असें तुकाराम महाराज व श्रीसमर्थ रामदास स्वामी महाराज सांगतात. मागील स्तंभात वर्णन केलेलें शास्त्रीय विवेचन अध्यारोपात्मक आहे व वेदान्त शास्त्रीय विवेचन म्हणजे अद्वैत सिद्धीचें विवेचन अपवादात्मक आहे. सर्व शास्त्राचें ध्येय एकच आहे. व तें ध्येय गायत्री मंत्राची श्रेष्ठता हेंच होय. 'आपोज्योतिरसोऽमृतम् ब्रह्म भूर्भुवः स्वरोम्' या गायत्री मंत्राच्या शिर म्हणजे शेवटल्या पंक्तींत अद्वैतसिद्धीच सिद्ध केलेली आहे. 'आप' या शब्दानें सर्वव्याप्ति, 'ज्योति' या शब्दानें प्रकाशरूप, 'रस' या शब्दानें व 'अमृत' या शब्दानें मरणादि संसारपाशापासून मोक्ष होणें असें सच्चिदानंदरूप ॐकारात्मक ब्रह्म तेंच मी आहे अशी भावना असावी असा त्या मंत्राचा इत्यर्थ आहे.

गायत्री मंत्राचा जप करावयाचा तर,

> **मंत्राणां पल्लवो वासः मंत्राणां प्रणवः शिरः।**
> **शिरः पल्लवसंयुक्तो मंत्रः कामदुघो भवेत्॥**

या वचनाप्रमाणें त्रिपाद गायत्रीचा जप करितांना 'प्रचोदयात्' या पदानंतर प्रणवाचा उच्चार करावयास पाहिजे. व्याहृति म्हणजे भूर्भुवस्व याचे आरंभीं ॐ, नंतर 'तत्सवितु' याचे आधीं ॐकार व प्रचोदयात् याचे शेवटीं प्रणव असावा. नेहमीं प्रचारांत दोनच प्रणव म्हणण्याचा प्रघात दिसतो. परंतु तो मंत्रशास्त्राप्रमाणें चुकीचा आहे. कांहीं ठिकाणीं प्राणायामाचे वेळीं दशप्रणव संयुक्त गायत्रीचा जप सांगितला आहे. गायत्री त्रैवर्णिकास सांगितली असल्यानें त्या गायत्रीचा जप करीत असतां ब्राह्मणांनी तीन प्रणव, क्षत्रिय व वैश्यांनी दोन प्रणव म्हणावे असें शास्त्र सांगतें. आजकाल क्षत्रिय व वैश्य समाज गायत्रीजपनिन्मुख झालेले आहेत ही मोठी शोचनीय स्थिति आहे. गायत्री-मंत्र-जपापूर्वी गायत्री कवचाचा पाठ नेहमीं करावा. कवच हें साधकाचें रक्षण करतें (हें कवच पुढें दिलेले आहे.)

'ॐ भूः भुवः स्वः । ॐ तत्सवितुर्वरेण्यं
भर्गो देवस्य धीमहि । धियो यो नः प्रचोदयात् । ॐ'

अशा प्रकारच्या गायत्री मंत्राचा जप द्विजांनीं करावा इतकी गोष्ट तरी ह्या लेखानें प्रचारात आल्यास बरें होईल. असें न जमल्यास भोगमोक्षार्थी द्विजानी चतुष्पदा गायत्रीचा जप करावा. या वचनाला चिदंबर रहस्यात आधार आहे, तो असा—

चतुष्पदा गायत्री भोगमोक्षार्थिनां नृणाम् ।
यज्जपात् सर्वसिद्धिः स्यात्कामधुक् सा प्रकीर्तिता ॥
द्वात्रिंशदक्षरीं यस्तु जपेत् व्याहृतिपूर्विकां ।
अर्धरात्रे सहस्रं तु षण्मासं प्रयतः शुचिः ॥
स मेधावी भवेत् वाग्मी गद्यपद्यविशारदः ।
भवेत्येव न संदेहो नान्यथा शिवभाषितम् ॥

(चिदंबर रहस्ये)

श्रीसूर्यनारायणाचे मंडळात श्रीगायत्रीदेवीचें प्रातर्, माध्यान्ह व सायंकाळचें ध्यान करावें असें सांगितलें आहे. व्याहृतींचा अर्थ असा कीं, भुर्लोक, भुवर्लोक, व स्वर्गलोक अशा तीन लोकांपैकीं दोन लोकांचें उल्लंघन करून स्वर्गलोकात म्हणजे सूर्यलोकात भावनेनें जावें व त्या ठिकाणीं 'तत् सवितु' म्हणजे *आपणास स्थूल नेत्रेंद्रियानी दिसतो तो प्रकाश प्रतिबिंबाचा आहे व खरें सूर्यबिंब सूर्यलोकात अर्थात् स्वर्गलोकात गेल्यावर दिसूं लागतें*, त्या सूर्यदेवाच्या प्रभावशाली तेजाचें ध्यान आम्हीं करितो, जो सूर्यदेव आम्हाला सद्‌बुद्धीची प्रेरणा करितो. (अलीकडे आपली सूर्यमाला दुसऱ्या एका अतिदूर व अनिर्वचनीय व अमित आकर्षण-शक्तियुक्त अशा दुसऱ्या सूर्याकडे आकर्षिली जात आहे असा शोध लागला आहे.) वरील गायत्रीमंत्राचा अर्थात् सवित्याच्या लोकात जाऊन तेथून दिसणाऱ्या दुसऱ्या सवित्याचें वर्णन आलें आहे. *अलीकडील शोध व पूर्वीचे अनुभव यांचें योग्य संमेलन कसें होत आहे, ही एक आपल्या*

पूर्वजांच्या *ज्ञानशक्तीच्या आपलेपणाची दिग्दर्शकच गोष्ट आहे* असें म्हटल्याखेरीज राहवत नाहीं.

वरील स्तंभात गायत्रीदेवीची बाह्यांग उपासना वर्णन केली. आतां अंतरग उपासनेबद्दल विवेचन करण्यांत येत आहे. आपल्या हृदयस्थित स्वयंज्योतिरूप गायत्रीउपासनेच्या अगप्रत्यगरूप असलेल्या द्वारपालाची उपासना छांदोग्य उपनिषदांत वर्णन केलेली आहे.

ते वा एत पञ्चब्रह्मपुरुषाः स्वर्गस्य लोकस्य
द्वारपाः स य एतानेवं पंचब्रह्मपुरुषान्
स्वर्गस्य लोकस्य द्वारपान् वेदास्यऽ कुले
वीरो जायते प्रतिपद्य स्वर्गलोकम्।

(छां० ३-१३-६)

ज्याप्रमाणें प्रचारात राजाच्या द्वारपालांची प्रीति संपादन केली तर राजाची भेट होते, त्याप्रमाणे प्राण, अपान, व्यान, उदान, समान हे चैतन्यज्योतिरूप गायत्रीच्या ब्रह्मरूप स्वर्गलोकाचे द्वारपाल आहेत. हे द्वारपाल वश झाले म्हणजे हृदयस्थित-हें हृदय ब्रह्मरंध्राजवळ आहे-- गायत्रीब्रह्माची प्राप्ति होते व उपासकाला प्रत्येक ज्योतिरूप स्वर्ग प्राप्त होतो व त्याच्या *कुलांत वीरपुरुष अथवा वीरशिष्य उत्पन्न होतो.*

२५. गायत्री ब्रह्मरूप हृदयभवनाला पाच छिद्रें आहेत. त्या छिद्रांतून वास करणारे प्राणापानादि पच पुरुष हेच द्वारपाल आहेत असें वर लिहिलें. त्यापैकी पूर्वाभिमुख पुरुषाच्या हृदयाचें जें पूर्व छिद्ररूप द्वार आहे त्या द्वारात प्राणरूपी द्वारपाल असतो, तो चक्षु होय, तोच आदित्य होय. ह्या प्राणाचें तेज व अन्न या रूपानें जो चिंतन करितो तो तेजस्वी व दीप्ताग्नि होत्साता जागृत पचनशक्तीनें युक्त होतो, तसेंच ज्या हृदयाचें दक्षिण छिद्र रूप द्वार आहे, त्याचा द्वारपाल व्यान हा आहे. हाच द्वारपाल श्रोत्ररूपी व चद्रमारूपी आहे. श्री आणि यशरूपानें व्यानाची उपासना करितो तो श्रीमान व यशस्वी होतो.

तसेंच पश्चिम द्वाराचा द्वारपाल अपान आहे. तो वायुरूपी व अग्निरूपी आहे.

ह्या अपान वायूचे ब्रह्मवर्चस व अन्नादि रूपानें जो चिंतन करितो तो ब्रह्मवर्चसी होतो व सुप्रास अन्न प्राप्त करून घेतो. तसेंच उत्तरद्वाराचा द्वारपाल समान वायू आहे. तो मनरूप व पर्जन्यरूप आहे. ह्या समान वायूची आराधना जो परोक्ष व अपरोक्ष कीर्तिरूपानें करितो त्यास परोक्ष व अपरोक्ष कीर्ति प्राप्त होते. तसेंच उर्ध्वद्वाराचा द्वारपाल उदान वायू आहे. याच्या ओज व महः स्वरूपाचें जो चिंतन करितो तो ओजस्वी व महान् होतो.

ही चतुर्विंशत्यक्षरा गायत्री चतुर्थपादासह द्वात्रिंशदक्षरा होते. 'त्र्यंबक यजामहे' व 'जातवेदसे' या दोन मंत्रांसहवर्तमान तिचा उच्चार केला तर ती शताक्षरा गायत्री होते. याच गायत्रीमंत्राच्या पादाचे लोम विलोम केल्यानें 'बला अतिबला' या विद्या तयार होतात व ब्रह्मास्त्र व ब्रह्मशिरोस्त्र हीं अस्त्रें तयार होतात. ह्या विद्या व हे मंत्र लेखकाजवळ आहेत. त्याचा परिचय उत्तरार्धांत केलेला आहे. पण त्यांचा अनुभव घेतलेले व सध्यां हयात असलेले सज्जन लेखकास भेटले नाहींत.

४. गायत्री मंत्रानुभवाचीं उदाहरणें

गायत्रीमंत्राचें पुरश्चरण करण्याची पद्धति, न्यास, गायत्री, कवच व गायत्रीमंत्राचें शापमोचन, उत्कीलन, संजीवन व अस्त्रोपसंहरण हें कांहींही माहीत नसतांना केवळ गायत्रीमंत्राचा जप चोवीस वर्षेंपर्यंत श्री. सप्तशृंग देवीसन्निध एक ब्राह्मण करीत होता. वणीहून पायऱ्या चढून गेल्यावर त्याचा मठ पहिल्यानें लागतो. या मठातील वाटेंतून श्रीभगवती सप्तशृंगाधिष्ठित महालक्ष्मीच्या वारा मास पुष्पें जात असतात. या गायत्री वोरांस लेखक भेटला व गायत्रीमंत्रजपाचें फळ काय प्राप्त झालें असें विचारतां प्रस्तुतची जागा, मठ व वारा महिने फोगाजवळ निर्वाहाकरितां

तोंड वेंगाडावें लागत नाहीं, यात्रेच्या वेळीं यात्रेकरूंची सोय करितां येते, इतकेंच फल आहे, असें ते म्हणाले.

आज मंत्रविद्या म्हणजे सत्र झूट असें मानणारेच गृहस्थ पुष्कळ आहेत, व मंत्रांची सिद्धि नसल्यानें हा वर्ग वाढत चालला आहे. संस्कारांचा लोप व आचारभ्रष्टता यामुळें मंत्रसिद्धि होत नाहीं, ही गोष्ट खरी आहे. परंतु ती गोष्ट पटविणें आजकाल दुरापास्त झालें आहे. गायत्री कवचाचे १००० पाठ पलाशवृक्षाखालीं १० दिवसांत केले. परीक्षा पास झाली.

विष्णुकांत गोपीनाथ त्रिपाठी
जळगांव

हल्लींच्या पिढींत वेदमंत्र, पुराण मंत्र, आगममंत्र, शाबरमंत्र इत्यादि मंत्रांवरील व त्याचप्रमाणें वेद, पुराणें, आगम यांवरील श्रद्धा नाहींशी झालेली दिसते. ती खरी अश्रद्धा नव्हे, असें लेखकाचें मत आहे. हीच नवीन पिढी पूर्ण आस्तिक होण्यास मंत्रसिद्धि पटवून देणें हाच एक उपाय आहे. मंत्रसिद्धि प्राप्त झालेल्या गृहस्थांस ही कार्यकारण परंपरा सांगून मंत्रसिद्धीचा अनुभव हल्लींच्या पिढीस पटवावा अशी विनंती केल्यास ते म्हणतात "आम्ही कांहीं तमाशा मांडला नाहीं किंवा नाटक नाहीं." त्यांचें हें प्रतिपादनही खरेंच आहे. यांतूनच मार्ग निघावा व तो निघण्यासाठीं वैदिक अभ्यास करणारे विद्यार्थी स्वतः मंत्र सिद्ध करण्याकरितां पुढें आले पाहिजेत. ते तसे पुढें आले तर त्यांचा दर्जाही वाढेल व त्यांचेबद्दल आंग्लभाषा व आंग्लभाषेतून आधुनिक अपुऱ्या शास्त्राचा परिचय झाल्यानें जे पुरुष अविश्वासी बनून गेलेले आहेत, त्यांच्या ठिकाणीं वरील वैदिक विद्यार्थ्यांबद्दल आदरहि वाढेल व नित्यनैमित्तिक कर्मे करण्याकरितां वैदिक मंडळींनां बोलावण्याचा प्रसंग आल्यास त्यांस 'भटजी' या कनिष्ट दर्जाच्या नांवानें त्यांचा निर्देश न होतां 'गुरुजी' या नांवानें त्यांचा निर्देश होईल. बहकलेल्या आंग्लविभूषितांकरितां 'तान्प्रति नैष यत्नः'

हा लेख लिहिण्याचा प्रयत्न नाहींच नाहीं. वेदशास्त्रोत्तेजक शाळेच्या विद्यार्थ्यांकरितां व वैदिक परंपरा कायम टिकविण्याची इच्छा असणाऱ्यांकरितां हा प्रयत्न आहे.'

श्री गायत्री कवच

(हें रुद्रयामलांतील २ रें कवच)

श्रीगणेशायनमः ।। श्रीगणाद्यायैनमः ।। श्री गायत्री देव्यै नमः ।। नारद उवाच ।। स्वामिन्सर्वजगन्नाथ संशयोऽस्ति मम प्रभो ।। चतु षष्टिकलाभिज्ञ निग्रहायोगनिद्वर ।। १ ।। मुच्यते केन पुण्येन ब्रह्मरूपः कथं भवेत् ।। देहश्च देवतारूपो मंत्ररूपो विशेषतः ।। २ ।। कर्म तच्छ्रोतुमिच्छामि न्यास च विधिपूर्वकं ।। ऋषिच्छंदोऽधिदैवं च ध्यानं च विधिवत्प्रभो ।।३।। श्री नारायण

---

१. गायत्री उपासना–विधिविधान–पुरश्चरण व उपयुक्तता, त्याचप्रमाणें गायत्री मंत्राचे प्रकार व त्याप्रमाणें पुरश्चरणें व विधिविधान ह्यासंबंधें बरेच वाङ्मय मराठी, हिंदी, व गुजराथी मार्फत अलीकडे उपलब्ध झालेलें आहे. त्यांपैकीं अगदीं अलीकडे [मे १९६९] प्रसिद्ध झालेलें 'गायत्री विज्ञान व उपासना' –मीमांसातीर्थ विजवडेकरशास्त्री–ईशावास्य प्रकाशन पुणें–हें एक पुस्तक आधुनिक वैज्ञानिक वृत्तीच्या जिज्ञासूंना वा उपासकांना बरेंच मार्गदर्शन करील असें आहे. संध्याविधि व विज्ञान (गो. म. भावेकृत) हें पण तितकेंच उपयुक्त पुस्तक आहे.

'अखंड आनंद' नावाचें मासिक मथुरा येथून प्रसिद्ध होत असतें. स्वामी दयानंदी विचारप्रणालीप्रमाणें विचाराचा धारा यात वहात असतो. तो विधिविधानाच्या बाबतींत वैदिक सनातनी परंपरेशीं विसंगत आहे. बंगाली व दाक्षिणात्य द्राविडी संस्कृतीलाही ती विचारधारा मान्य नाहीं. तथापि हा सर्व वाङ्मयाचा व उपासनेचा साग्र विचार केलेला ग्रंथ "गायत्रीपंचांग व उपासना" नांवाच्या प्रसिद्ध होऊ घातलेल्या 'नवज्योति प्रकाशन' संस्थेच्या ग्रंथात पहावयास मिळेल (गो. म. भा).

उवाच ॥ अस्त्येक परम गुह्य गायत्रीकवच तथा ॥ पठणाद्धारणान्मर्त्य॰ सर्वपापै प्रमुच्यते ॥ ४ ॥ सर्वान्कामानवाप्नोति देवीरूपश्च जायते ॥ गायत्रीकवचस्यास्य ब्रह्मविष्णुमहेश्वरा ॥ ५ ॥ ऋषयो ऋग्यजु सामाऽथर्वच्छंदासि नारद ॥ ब्रह्मरूपा देवतोक्ता गायत्री परमा कला ॥ ६ ॥ तद्वीज भर्ग इत्येपा शक्तिरुक्ता मनीषिभि॰ ॥ कीलक च धिय प्रोक्त मोक्षार्थे विनियोजनम् ॥ ७ ॥ **न्यासः**—चतुर्भिर्हृदय प्रोक्त त्रिभिर्वर्णै शिर स्मृत ॥ पचभि स्याच्छिखा पश्चात्त्रिभिस्तु कवच स्मृत ॥ ८ ॥ चतुर्भिर्नेत्रमुद्दिष्ट चतुर्भि स्यात्तदस्त्रक ॥ **अथ ध्यानम्** प्रवक्ष्यामि साधकाभीष्टदायक ॥ ९ ॥ मुक्ताविद्रुमहेमनीलधवलच्छायैर्मुखस्त्र्यक्षणैर्युक्तामिंदुकलानिबद्धमुकुटा तत्त्वार्थवर्णात्मिका ॥ गायत्रींवरदाभयाऽङ्कुशकशा शूल(शुभ्र) कपाल गुण ॥ शखचक्रमथारऽरविंदयुगुल हस्तैर्वहन्तीं भजे ॥ १० ॥ गायत्री पूर्वत पातु सावित्री पातुदक्षिणे ॥ ब्रह्मसध्या तु मे पातु पश्चादुत्तराया सरस्वति ॥ ११ ॥ पावकीं[1] मे दिश रक्षेत्पावकी जलशायिनी ॥ यातुधानी[2]दिश रक्षेद्यातुधानभयकरी ॥ १२ ॥ पावमानी[3]दिश रक्षेत्पवमानविलासिनी ॥ दिश रौद्रीं च मे रक्षेत् रुद्राणीं रुद्ररूपिणी ॥ १३ ॥ ऊर्ध्वं ब्रह्माणि मे रक्षेदधस्ताद्वैष्णवी तथा ॥ एव दशदिशो रक्षेत्सर्वांग भुवनेश्वरी ॥ १४ ॥ **अंगन्यासा:**—तत्पद पातु मे पादौ, जघे मे सवितु पद ॥ वरेण्य कटिदेशे तु, नाभिं भर्गस्तथैव च ॥ १५ ॥ देवस्य मे तद्हृदय धीमहीति च गल्लयो ॥ धिय पद च मे नेत्रे य पद मे ललाटकम् ॥ १६ ॥ न पद पातु मे मूर्ध्नि शिखाया मे प्रचोदयात् ॥ **अक्षरन्यासा॰** तत्पदं पातु मूर्धांन स कार पातु भालक ॥ १७ ॥ चक्षुषी तु विकाराणों

१. पावकी–आग्नेय दिशा, २ यातुधानी–नैर्ऋत्य, ३ पावमानी–वायव्य. रौद्री–ईशान्य इत्यादि नावासबधी पाठभेद आहेत. व त्याच्या महत्त्वाचें विज्ञानही आहे त्याचें ईषद्दर्शन 'विज्ञान' या प्रकरणात केलें असून सपूर्ण विचार "गायत्री पंचाग" या भावी ग्रथात दिसेल गायत्रीच्या ध्यानात 'मुंडैस्त्रीक्षणै' असाही पाठ भेद आहे (गो प्र. भा)

तुकारस्तु कपोलयो ॥ नासापुटेर्वकारार्णो रेकारस्तु मुखे तथा ॥ १८ ॥ णिकार ऊर्ध्वमोष्ठ तु यंकारस्त्वधरोष्ठक ॥ आस्यमध्ये भकारार्णो गों कारश्चिबुके तथा ॥ १९ ॥ देकार कठदेशे तु वकार स्कंधदेशक ॥ स्यकारो दक्षिण हस्त धीकारो वामहस्तक ॥ २० ॥ मकारो हृदय रक्षेत् हिकार उदरे तथा ॥ धिकारो नाभिदेशे तु योकारस्तु कटिं तथा ॥ २१ ॥ गुह्य रक्षतु योकार ऊरू द्वौ न पदाक्षर ॥ प्रकारो जानुनी रक्षेच्चोकारो जघदेशक ॥ २२ ॥ दकार गुल्फदेशे तु याकार पदयुग्मक ॥ तकारव्यंजन चैव सर्वांगे मे सदाऽवतु ॥ २३ ॥ इद तु कवच दिव्य बाधाशतविनाशन ॥ चतुःषष्टिकलाविद्यादायक मोक्षकारक ॥ २४ ॥ मुच्यते सर्व पापेभ्य पर ब्रह्माधिगच्छति ॥ पठनाच्छ्रवणाद्वाऽपि गोसहस्रफल लभेत् ॥ २५ ॥ इति श्रीदेवीभागवते पुराणे नारायणोक्त गायत्रीकवच सम्पूर्णम् ॥

□ □

अमृत – मंजिरी

१. गायत्री मंत्र हा गुरुमंत्र म्हणूनहे सर्वश्रेष्ठ मंत्र आहे
२. गायत्री मंत्र सर्वांत लवकर सिद्ध होतो
३. गायत्री मंत्रानें अनेक अर्थ प्राप्त करितां येतात.
४. गायत्रीउपासनेमुळें अनेक सिद्धि प्राप्त होतात

७ पंचदशी विद्या व विधि विचार

१ पंचदशी विद्या

ॐ नमो विष्णुरूपाय नमस्ते ब्रह्मरूपिणे ।
नमस्ते रुद्ररूपाय नमः त्रिमूर्तिधारिणे ॥ १ ॥

पार्वती बोलते, हे महारुद्र, तुम्ही सर्व जगताची उत्पत्ति, स्थिति व लय करणारे आहां. तुम्हीच ब्रह्मदेव होऊन जगाची उत्पत्ति, विष्णु होऊन जगाचें पालन आणि रुद्र होऊन जगाचा संहार करीत असतां. तुम्ही त्रिगुणात्मक आणि पंचभूतात्मक आहां. तीं पंचमहाभूतें–पृथ्वी, आप, तेज, वायु आणि आकाश हीं आहेत, पंच तन्मात्रा–शब्द, स्पर्श, रूप, रस, गंध ह्या आहेत. पंच इंद्रियें–त्वक्, चक्षु, रसना, घ्राण व शब्द हीं आहेत. हीं सर्व पंधरा तत्त्वें तुमचे इच्छेनें आदिमाया शक्तीला घेरतात, तेव्हां सर्व तत्त्वांचे परिणाम राजस, तामस, व सत्त्वगुण हे उदय पावतात. मी (पार्वती) तुमच्या मायेला जाणत नाहीं, आणि संसार करण्याची इच्छा करीत आहें. म्हणून संसाराचा निर्वाह होईल, अशी उत्तम विद्या मला तुम्ही सांगा. ईश्वर सांगतात:–ऐक पार्वती, एक विद्या तुला सांगतों. ही विद्या मी कोणत्याहि देवाला किंवा ऋषीला सांगितली नाहीं, ती तुला सांगतों. ही विद्या देवनिंदक, तीर्थद्वेषी, गुरुद्रोही, असत्यवादी, अविश्वासी, मातापिता सेवाहीन, अहंकारी, दांभिक, पाखंडी अशा लोकांना सांगूं नको. सांगशील तर गुरु व शिष्याचें अकल्याण होईल. या विद्येनें गुरूचा छळ करील त्याला कोटी कालपर्यंत ही विद्या फलद्रूप होणार नाहीं. या

विधेनें जो शिष्य गुरूला संताप आणील, त्याला श्वेत कुष्ठ फुटेल. तसेंच जो गुरु निष्कपटी शिष्याला ही विद्या सांगणार नाहीं तो गुरु ही दोषी होईल. एक वर्षपर्यंत शिष्याची परीक्षा करून मग त्याला गुरूनें ही विद्या शिकवावी. नाहीं तर गुरूला मोठा दोष येतो.

२ पंचदशीयंत्र पद्धति, कृति व विधि.

श्री महादेव पार्वतीला म्हणाले, हे देवी, मी सर्व मंत्र व यंत्रें साध्य केलेलीं आहेत. परंतु फक्त हें पंचदशी यंत्र साध्य केल्याशिवाय ठेवलें आहे. हें अतिशय गुप्त आहे. ती विद्या मी तुला आतां सांगतों व तूंही ती अतिशय गुप्त ठेव. स्त्रीलंपट, नास्तिक व दुष्ट यांस देऊं नकोस. हें मन देऊन ऐक. नदीच्या काठावर सुंदर वृक्ष असलेल्या ठिकाणीं जाऊन माती व उत्तम शेणानें एक जागा सारवून तयार करावी, तीवर अष्टगंधानें एक मोठा (कोठा) बीजमंत्र जमिनीवर लिहावा. त्याचें पूर्वेकडे तोंड करावें आणि डोक्यावर अर्धचंद्र अनुस्वार द्यावा. त्याचप्रमाणें अष्टगंधानें पृथ्वीवर पंचदशी यंत्र काढिलें पाहिजे. त्याच्यावर एक दिवा ठेवावा. दिवा सोनें, चांदी, तांबें, लोखंड अथवा माती याचा असावा. (चांदी, ताम्र, लोह यांच्या पत्र्यावर पंचदशी मंत्र लिहावा) तो दिवा गाईच्या शुद्ध तुपानें भरावा. त्यात लाल सुताची वात (१००० किंवा १०८ किंवा १८ किंवा १२ हात लांब असलेली) लावावी. (पूर्व विधीप्रमाणें) नंतर मध्यें लाल कापडाचे आसन घालून यंत्र लिहणाऱ्यानें बसावें. जर क्रूरकार्य करावयाचें असेल, तर सूर्यश्वासानें श्वास चालवावा. लाल वस्त्र, लाल धोतर, लाल आसन, यामध्यें कोणत्याहि इतर रंगाचा धागा असू नये. आसनावर बसून 'ह्रीं' या मायाबीजाचा जप करावा. अष्टगंधानें यंत्र लिहावें, आणि जें आपलें काम असेल तें त्याच्यावर लिहावें. दररोज ५०-१००-२००-५०० अथवा १००० वेळां (जितकें पहिल्या दिवशीं लिहिलें असेल तितकें रोज) लिहावें. यंत्रात 'ह्रीं' हें मायाबीज लिहावें आणि येणेंप्रमाणें केशराच्या

गधानें एक लाख वेळा लिहिले म्हणजे हनुमान प्रगट होऊन दर्शन देतील. याचप्रकारें नेहमीं लिहावें आणि प्रत्येक यत्राला निरनिराळें कापून कणकेंत त्याची गोळी करून मासोळ्याना खायाला द्यावें. तलाव, बावडी, विहिरी जेथें असतील तेथें तेथें माशाना असे दिलें नाहीं तर कार्यसिद्धि होणार नाहीं. यत्र लिहणें बद केले तर मासोळ्याना खाणे देणे बद केलें तरीसुद्धा हा बीज मत्र जपत राहावा, **जेव्हा एक लाख मंत्र पुरा होईल** तेव्हा एक लाखाचा दशाश इतके हवन पाण्यात करावे. अग्नीमध्यें नाहीं. ज्याप्रमाणे बली वैश्वदेव होतो, त्याप्रमाणे बीजमत्र 'स्वाहा' म्हणून पाण्यात सोडावा. नतर दशाश (हवनाच्या) तर्पण, मार्जन, गोदान वगैरे करावें. प्रथम एकापासून नऊपर्यंत प्रारभ करून ९ पर्यंत लिहून शेवटीं १ लिहिला तर **राजा वश होतो.** दुसरा प्रकार तीन पासून आरभ करून ९ पर्यंत लिहावे नतर १, २ लिहावे म्हणजे *व्यापारवृद्धि* होईल. चारापासून आरभ करून ९ पर्यंत लिहून नतर १, २, ३ लिहावे म्हणजे साधकाच्या क्रोधविकाराचें उच्चाटण होते. ५ पासून आरभ करून ९ पर्यन्त लिहिले व नतर १, २, ३, ४ लिहिले तर साधकाचें स्थान भ्रष्ट होते. ६ पासून आरभ करून ५ पर्यंत लिहिले व नतर १, २, ३, ४, ५ लिहिले तर *मारण होणार नाहीं*. ७ पासून आरभ करून लिहिले तर (९ पर्यंत) व नतर १, २, ३, ४, ५, ६, असे लिहिले तर *अशुभ चितकांना* विपत्ति येते. ९ पासून आरभ करून १, २, ३ ४, ५, ६, ७, ८ असे लिहिले तर अवश्य धनवृद्धि होते. ह्या प्रकारें ८ बोटें (अगुले) अशा चमेलीच्या काडीच्या लेखणीनें अष्टगधानें १ लाख प्रमाणे नऊ कोठयात लिहावे. द्वी[२] नद[९] वेद[४] अग्नी[३] बाण[५] नि[३] षट्[६] शशि[१] वसु[८]. पण आदिमाया बीजाचें साधन जमणार नाहीं तर मायाबीजाशिवायच अष्टगधानें, एक, एक, लिहावें. एक पासून ९ पर्यंत जर दीपक वगैरे सामान मिळू शकलें नाहीं तर माया बीज हे अवश्य जपावें. व गोळ्या पूर्वोक्त विधिप्रमाणें बनवून त्या

मासोळ्याना देत राहिले तरी सुद्धा कार्य सिद्धीस जाईल. जर मत्र लिहून पर्वताच्या शिखरावर चढवून उडवले तर उच्चाटन सिद्ध होतें. पृथ्वीवर (जमिनीवर) खडीनें (दगडानें) लिहिलें तर बदी सुटतो. ब्रह्मचर्यानें रहावें. हविष्यान्न खावें. स्वत ची इच्छा मत्रावर लिहावी. जर मासोळीनें लवकर गोळी खाल्ली तर यत्र लिहावें. खाल्ली नाही तर लिहू नये. अष्टगध (१) चदन (२) अगर (३) जटामासी (४) देवदार (५) कस्तुरी (६) केशर (७) कापूर (८) वाळा याच्याशिवाय कापूर व केशर यानीं हे यत्र ल्हिावें, असें त्रिपुर सुप्रयोगात लिहिलें आहे.

पचदशी विद्या व श्रीविद्या ह्यासबधें जास्त माहिती उत्तरार्धांत 'देव देवता मत्र' ह्या प्रकरणात दिलेली आहे. तसेंच पचदशी यत्र, त्याचे प्रकार व उपयोग उत्तरार्धांत अनेक ठिकाणीं सागितले आहेत.

३. पंचदशीयंत्राचा विधि व विनियोग

शुभ कार्याला शुभ दिवस, क्रूर कार्याला क्रूर दिवस पाहून आरभ करावा. व यत्र लिहून नदींत सोडून द्यावें जें वाहून जाणार नाहीं तें स्वत जवळ ठेवावें त्यायोगें सर्व कार्यसिद्धि होईल. खालीं दिल्याप्रमाणें यत्राची सख्या लिहिली असता त्या त्या समोरील कार्यसिद्धि होते.

संख्या	फळ	संख्या	फळ
२०००	लक्ष्मी प्रसन्न होते.	२०००	शत्रु वश होतो.
६०००	निरोगी होतो.	३०००	सर्व वश होतें.
१०००	सरस्वती प्रसन्न होते.	२०००	सभामोहन होते.
१०००	औषधी सिद्ध होतात.	६०००	गर्भमोचन होतो.
२०००	मत्र यत्र सिद्ध होतें.	२०००	विदेशीं घर होतें.
४०००	ईश्वर प्रसन्न होतो.	२०००	ख्याति-प्रसिद्धि होते.

संख्या	फळ	संख्या	फळ
३०००	वैरी प्रसन्न होतो.	१०	विपनाश होतो.
६०००	गेलेली वस्तु प्राप्त होते.	५०००	वध्या स्त्री गर्भवती होते.
५०००	देव प्रसन्न होतो.	३०००	मित्रलाभ होतो.
२०००	दु:खनाश व सुख होतें.	४०००	राजा प्रसन्न होतो.
४०००	उद्योग प्राप्त होतो.	१५०००	मनातील इच्छा पूर्ण होते.

यत्र लिहून पाण्यात सोडावें. सिद्ध होईल. जर काही इच्छा असेल तर कणकेंत गोळी बनवून मासोळीला खाऊ घातली तर सर्व कार्यसिद्धि होईल. यत्र लेखन विधि शुभ कार्याला उत्तर दिशेकडे तोंड करून व अशुभ कार्याला दक्षिण दिशेकडे तोंड करून करावा.

अथ मंत्रविधि— (१) स्त्रीसग करू नये. (२) ब्रह्मचर्यानें रहावें. (३) यत्र लिहिण्यापूर्वी 'ॐ ह्रीं क्लीं स्वाहा' हा जप एक लक्ष जपावा. लोकास मोहिनी पाडण्यासाठीं १० यत्रे रोज लिहावीं. २० आकर्षणासाठीं, ३० जपासाठीं, १००० कार्यसिद्धीकरिता लिहावीं. लेखणी आठ अगुलें असावी.

मोहनासाठीं	सुवर्णाची लेखणी	मधानें लिहावें.
स्तभन	चादीची लेखणी	हळदीनें लिहावें.
देवदर्शन	सुवर्णाची लेखणी	केशराने लिहावें.
द्रुतगमन	लोखडाची लेखणी	शवभस्मानें लिहावें.
द्वेष	लोखडाची लेखणी	भणवृक्षरसानें ल्हिावें
उत्पात शाति	दूर्वांची लेखणी	चदनानें लिहावें.

बदीमोचन	१०००० ल्हिावीं.	सर्व सिद्धि	४०००० लिहावीं
राज्यप्राप्ती	२००००० लिहावीं.	मोहनविद्या	५०००० लिहावीं
	३००००० ल्हिावीं.	राजा वश होतो	४०००० ल्हिावीं.
	४००००० ल्हिावीं.	पाण्यात न बुडणें	४००००० लिहावीं

वाक्‌सिद्धि ५०००००लिहावीं. लक्ष्मीप्राप्ति ७००००लिहावीं.
गत राज्यप्राप्ति २००००० लिहावीं. अष्ट सिद्धि ८००००० लिहावीं.
नव निधीप्राप्ति ९००००० लिहावीं. महादेवासारखे होणे १ लक्ष लिहावीं.

दररोज १०,२०, ३२, ५० किंवा १०० वेळा लिहावें. ब्राह्मणानें भूर्जपत्रावर लिहावें. क्षत्रियानें ताडपत्रावर, वैश्याने कागदावर लिहावें. शूद्रानें पृथ्वीवर लिहावें. लाल आसन व लाल कपडा अनुष्ठान सुरू असे-पर्यन्त घालावा. जमिनीवर झोपावें. मूग व तांदूळ भोजनाला घ्यावे. वरीलप्रमाणे जोपर्यंत यंत्रलिखाण चाललेलें आहे तोंपर्यन्त तसें रहावें व वागावें. श्रीगुरुदत्तात्रेयार्पणमस्तु.

८ अन्यधर्मीयांचे देव, मंत्र व यंत्रतंत्रें

१ पारसीक वेद—अवेस्ता व गाथा

वेदातील मत्र पूर्वीच्या स्तभात वर्णन केले आहेत. पारशी लोकाचे फार जुनाट असलेले गाथा व अवेस्ता हे ग्रथ होत. आपण वेदाना जसा मान देतो तसा मान पारशी लोक त्याच्या *गाथा* व *अवेस्ता* यास देतात व पारशी ते ग्रथ अपौरुषेय मानतात. हिमकाल सुरू झाल्यानतर देव, असुर, मानव, दानव, हे उत्तरध्रुव प्रदेशातून बाहेर निघाले अवेस्तामध्यें 'हप्तहेंदु' या स्थानात आर्य लोक आले असें वर्णन आहे. हप्तहेंदु म्हणजे सप्तसिंधु.

य ऋक्षदंहस्ते मुचद्यो वार्यात सप्तसिंधुषु ८–२४–२७

सप्तसिंधु हे देशाचें नाव आहे. यावरून सप्तसिंधु देशात आर्यांची वस्ती होती. त्यावेळीं आर्यावर्तांतही आर्यांची वस्ती होती द्वापार युगातील म्हणजे १२००० वर्षांपूर्वी भारत राजा सार्वभौम राजा होता व त्याचें वर्णन करिताना 'समुद्रपर्यंताया पृथिव्या एक राट्' असें नमूद केलेलें आहे. वेदकाळीं वैदिक लोकाची विचारपद्धतीच अशी होती कीं, सर्व पृथ्वींतील मानवानां 'आर्य' करावयाचें. ही गोष्ट "स्व स्व चरित्र शिक्षेरन् पृथिव्या सर्व मानवा." या वाक्यावरून सिद्ध होतें. सप्तसिंधु असलेला तो देश हल्लीं तुर्कस्थानात रशियाचे अमलाखालीं आहे. त्या भागाचे रशियन भाषेतील नाव 'सेमिरिटचेन्स्किकाय' 'सात नद्याचा

प्रांत' असें आहे. 'एदेनवेजो' म्हणजे आर्यांचे स्थान, असा निर्देशही वरील सप्तसिंधूचे प्रदेशाबद्दल ठिकठिकाणीं आला आहे. पण हे पारशी म्हणजे 'अहुरमझ्जद' या देवतेचे पूजक होत.

पारशी लोकाच्या अवेस्ता ग्रंथाचीं एकवीस पुस्तकें होतीं. त्यापैकीं दोनच शिल्लक राहिलीं आहेत. यापैकीं ऋषी 'जरथुस्त' यानी श्रवण केलेल्यापैकीं थोडे मूळ श्लोक शिल्लक राहिले आहेत, त्यास 'गाथा' असें म्हणतात, ह्या गाथाचे पाच विभागात एकदर २३८ श्लोक आहेत व त्यापैकीं पहिल्या भागात २०० श्लोक आहेत. त्या शंभर श्लोकात 'अहुनवर' हा शब्द येतो. हा शब्द 'जरथुस्त' धर्माचा मूलमंत्र (१ ला मंत्र) आहे व सृष्टि उत्पन्न होण्यापूर्वी ईश्वरानें हा शब्द उच्चारिला व ह्या शब्दापासून सृष्टि उत्पन्न झाली असा त्या धर्माचा दडक आहे.

ह्या मंत्रामध्ये अष् हा शब्द येतो. 'अष्' याचे एक रूप 'अर्त' असें होतें. अर्त याचें वैदिक रूप ऋत हें होय. 'अष् हे पन्ता ओ' 'ऋतस्य पथा' असा वैदिक शब्द तयार होतो. 'स्तु' म्हणजे ऋति असाही अर्थ आहे, हा 'अहुनवर' मंत्र खालीं लिहिला आहे.

दुसरा मंत्र—'अशेमवोहु वहीश्तमेअस्ती
अशेम वस्तु वसिष्म अस्ती
अशना अस्ती अशल आह्माये
ह्यद् अशाय वहेश्ताय अशेम
ह्यायत् अशाय वशिष्ये अशेम'

(१) यथा अहू अहूर्यो अथा रतुश् अषात् ह चित् ह चा.

(२) वङ्हे उश दज्दा मनङ्हो श्योथननाम् अङ् हे उश मज्दाई

(३) क्षथ्रेमचा अहुराई आ यिम् द्रगुब्यो ददत् वास्तारम्

(१) ज्याप्रमाणे राजा सर्वोपरि असतो, तसे ऋषीही आपल्या पवित्रतेला साधनी भूत आहेत.

(२) शुद्धमनाचा पुरस्कार प्रभूचेकरिता सृष्टिकार्य करणाऱ्यांस प्राप्त होतो.

(३) गरिबाचा जो वाली होतो, त्यास ईश्वराचें बल (क्षत्र) प्राप्त होतें.

पारशी लोकात असा नियम आहे कीं जो मनुष्य वरील सर्व मत्राचा शुद्ध उच्चार करून ४० दिवस पाठ करील त्याचे सर्व मनोरथ पूर्ण होतील. दुसऱ्या कोणत्याही मत्रसाधनेची जरूर पडणार नाहीं.

मि. ए फिरोज शापुरजी मसाणी, एम्. ए., एलएल्. बी , सॉलिसिटर, मुबई, यानी अवेस्तामधील मत्राच्या वर्णनपर सात पुस्तकें प्रसिद्ध केलीं आहेत. त्यापैकीं तिसरें पुस्तक लेखकानें मागवून घेतलें. पुस्तककर्त्यानें सर्व हक्क स्वाधीन ठेविले आहेत असें कळविलें आहे. लेखकाचा हेतू ह्या पुस्तकाचें भाषातर करू न देण्याचा नाहीं. फक्त वेदासारखा[१] मत्रभाग अवेस्ता मध्येंही आहे हे दाखविण्याचा हेतु आहे. एकदरींत ह्या लेखातील मत्रशास्त्राच्या उहापोहाला ह्या पुस्तकातील कांहीं गाथाचा, मत्राचा विनियोग दाखविला तर वाचकाची खात्री होईल कीं, इतर *धर्मग्रथातही मत्रांचा विनियोग सांगितला आहे*. मेहेरबान मसाणी साहेब याच्या पुस्तकातील पाचसहा मत्र येथें देण्यात येत आहेत व ह्याबद्दल लेखक मि. मसाणी याचा आभारी आहे.

---

१. पारशी गाथा व मत्र . पुढें दिलेले मत्र अवेस्ती भाषेंतील असून त्याची लिपीही अवेस्ती आहे. त्या लिपीचें वळण अशत: जुन्या पर्शियन व याहुदी लिपीशीं जुळतें आहे. भाषाशास्त्रीय दृष्टया ग्रथातील विचार व शब्द ऋग्वेदीय सस्कृत शब्दासारखेच आहेत जसे वैदिक 'सर्वतत्' म्हणजे 'हौर्वतत्' 'अमृत' 'अमृतात्' म्हणजे अमरेतत्–अमरदाद–(अमरता) वैदिक 'क्षत्र' (सत्ता–तेज) म्हणजे त्याचे 'क्षथ्र' इ. अवेस्तामधील मूळ सूक्ताना 'यास्न' म्हणतात. गाथा म्हणजे 'यास्न'चे भाग असून त्याची ७२ मडलें आहेत अहुनावैति गाथा, उश्तवतीगाथा, स्पेन्तमैंनु गाथा, वोहूक्षत्र गाथा आणि 'वाहितोश्ति गाथा' असे पाच भाग आहेत झरतुष्टी धर्मविचाराचे हुमत (सद्विचार) हुक्त (सद्शब्द, सद्भाषा) आणि हुवरश्त (सदाचार) हे तीन आधारस्तंभ आहेत. ते देवाला हिंदु धर्मीयाप्रमाणें षड्गुणैश्वर्यसंपन्न समजतात. नौशेर्वान अझार Weekly Illustruated २१–७–६९ (गो. प्र. भा.)

वेदाचा अभ्यास जसा वेदधर्मीय ब्राह्मणामध्यें आहे, तशा प्रकारचा अभ्यास जरथुस्त्र म्हणजे पारशी मंडळींत नाहीं. 'मंत्र' असे अवेस्तांत कांहीं भाग आहेत, हें पुष्कळ पारशी मंडळीस माहीत नाहीं. यांत आश्चर्याची गोष्ट नाहीं, व येथें त्या मंत्राचा उपक्रम केल्यानें पारशी मंडळीस फायदा व्हावा हा लेखाचा हेतु नाहीं. लिहिण्याचा मुख्य हेतु हाच आहे कीं, वैदिक ब्राह्मण अगर वैदिक गृहस्थ यांच्या ठिकाणीं जशी वैदिक मंत्राबद्दल अनास्था आहे तशीच किंबहुना अधिक अनास्था पारशी मंडळींत दिसून येते परंतु मोठा शिक्षित असो वा अशिक्षित असो अग्निपूजा व वरुणपूजा ही मात्र पारशी मंडळींत जागृतावस्थेंत आहे वैदिक धर्मीय सुशिक्षित मंडळींत श्राद्धविधि लुप्त होत आहे, तसाच तो पारशांतही लुप्त होत आहे, म्हणजे ते आपल्या पुरोहिताला तें कर्म करण्यास सांगत असतात व पुरोहितानें तें श्राद्धकर्म अग्निमंदिरांत करावयाचें ही रूढीच होऊन बसली आहे असो हा गोष्टीचा उल्लेख करण्याचा हेतु हा आहे कीं *ब्राह्मणादि त्रैवर्णिकांनी सूर्योपासना तरी कायम ठेवावी*

वैदिक लोक ज्याप्रमाणे मुसलमान वगैरे मांत्रिक मंडळींकडे जाऊ नये, त्यांनी आपल्या वैदिक, पौराणिक किंवा शाबर मंत्राचा अनुभव घ्यावा असें सांगतात, त्याप्रमाणे पारशी लोकही हिंदू मुसलमान यांच्या मधील मांत्रिक लोकांकडे जाऊ नये असें सांगतात *ज्या धर्मांत ईश्वरानें आपणास जन्म दिला त्या धर्माला धरून रहावें व त्या धर्मांतील मंत्रांचा उपयोग करावा असें पारशी* लोकांतील गुरू सांगतात आर्यलोक जसे सूर्योपासक आहेत, तसे पारशी लोकांना बृहस्पति देवतेची व अग्नीची उपासनाही सांगितली आहे हिंदू मुसलमान धर्मांप्रमाणें 'झोरोआस्टर' धर्मांतही रोगी लोकांस अंगारा, ताईत मंतरून दिलेले दोरे देण्याची प्रथा आहे

गाथेंतील मंत्र व त्यांचा विनियोग

आतां अवेस्तामधील कांहीं मंत्र व त्यांचा विनियोग देण्यात येत आहे मुलांना दृष्ट पडते ती निर्मूलन करण्याचा मंत्र—

'नीरंग व दीदन् पस्ती यानी कसी राके दर्द कजल व अम्रूलक वाशद् चुन् आन कसीरा वेवीनद इन् नीरंग आवायद् बखानदन्'

अर्धशिशी दुखते त्यावर मंत्र :—'नीरंग वराय दफे कर्‌दने दर्दे नीमसर'

नाग मारण्याचा मंत्र : 'नीरंग मार जदन् वर्प नाहे....आपमवाहू'

शेतांत किडे पडतात ते मारण्याचा मंत्र : 'अबस्त भूर जदमू इन् आस्ता के चुन कशाद इन् खानंद बस्फतम अवजन एत....आपयवाह'

बाळंतीण सुख प्रसूत होण्याचा मंत्र : 'नीरंग आन अस्त के झन् वा वकते फरझंद झांदन दुशवार वाशद् इन् नीरंग व खानंद' किंवा *तांब्याच्या ताइतांत हें यंत्र लिहून बांधावें* : आरम पाहलुम् विशाम्' (७ वेळ) हा मंत्र ताइत हातांत घेऊन म्हणावा. व मग तें यंत्र ताइतांत घालावें.

४	९	२
७	५	३
६	१	८

दाढदुखीवर मंत्र : 'नीरंग वराय दर्द इरान्'

पति-पत्नीमध्यें *वैमनस्य* असल्यास तें दूर *करण्याचा* मंत्र : 'नीरंग तावीज नवस्तन वराय सुलेह करदन ह ई मर्द व जन नाम ई यऽद-शुहरवाद'

एक, दोन, तीन दिवसांचा ताप नाहींसा करण्याचा मंत्र—नीरंग दूर करदन ई तप ई यक्र रोज व दो रोज व से रोज ई यऽद....द्रगुव्यो वीश्रआत् जरथुस्तनो'

गरमी व सर्दीचा *ताप नाहींसा* करण्याचा मंत्र—

'नीरंद दूर करदन ई तप ई गर्म व सर्द निजवयोभ....आपव दाम दातम्'

शयतान् व देवाचा जादू तोडण्याचा मंत्र :—

'नीरंग ई होम यश्त नीरंग शक्तन् ई-जादू-ई शयतान व दीवान् कु शेकनम्....आपमवाह'

याप्रमाणें अवेस्तामधील कांहीं मंत्र लिहिलेले आहेत. याप्रमाणें अनेक

रोगावर अनेक विधींचे वेळीं म्हणण्याचे मंत्रही अवेस्तांत आहेत. वरील मंत्र देण्याचा हेतु हाच कीं, मंत्रविद्या हा विषय अवेस्ता व गाथा या ग्रंथांतही आहे. या मंत्रांत एक गोष्ट दिसून आली ती अशी कीं, अवेस्ताच्या मंत्रात सैतान व देव एकाच श्रेणींत घेतले आहेत या पारशी म्हणजे असुर लोकांचें देवाशीं वैर होतें. त्यांचे देव वरुण, बृहस्पती हे होत. आपल्या पुराणग्रंथांत बृहस्पतींनीं अवतार धारण करून असुरांना यज्ञापासून परावृत्त करण्याचा व हिंसादि दोषापासून मुक्त राहण्याचा उपदेश केलेला होता असें वर्णन आहे. देव जसे होमहवन करून सिद्धि प्राप्त करून असुरांचा पाडाव करीत असत, तसेंच होम-हवन करून असुरही देवांचा पाडाव करीत असत. असा क्रम अव्याहत चालत असे. अशा वेळीं देवाचें हित साधण्याकरिता बृहस्पतीचा अवतार हा असुरास उपदेश करण्याकरिता झाला होता. म्हणून ह्या असुरांमध्यें देवांचा द्वेष व बृहस्पतीची स्तुति आढळून येते

सप्तसिंधु[1] :—हा भाग कोठे होता याबद्दल ऋग्वेदांतील ऋचा मागील भागांत दिली आहे. त्यांतच रशियन तुर्कस्थानांतील रशियन भाषेंतील सप्तसिंधू या अर्थाच्या शब्दाचें रूपहि दिलें आहे व तेथें सातच नद्या आहेत परंतु इराणांतील या आर्यवंशी लोक व आर्यावर्तांतील आर्य लोक काश्मीरपर्यंत एकमेकांच्या सहवासांत असतांना सप्तसिंधु ह्या पूर्वस्थित देशाची स्मृति रहावी म्हणून काश्मीर व अफगाणिस्थान या पठारांतून वहात जाणाऱ्या सिंधू नदीच्या पश्चिमेकडील भागालाही 'सप्तसिंधू' व पूर्वेकडील भागालाही सप्तसिंधू असें संबोधीत असत सिंधूच्या पूर्वेकडील भागांत राहणारे आर्य म्हणजे इराण देशांतील आर्य असें म्हणतां येईल

१. सप्तसिंधु–झेंदावेस्ता म्हणजेच अवेस्ता व ऋग्वेद व त्यांतील ऋचा भारतांतील आर्य, इतर स्थलीय आर्य, आणि उभयतांतील मंत्र इ. गोष्टी 'वेदांचें उत्तर ध्रुव प्रदेशांतील वसतिस्थान' ह्या लो. टिळकांच्या ग्रंथांत सविस्तर सांगितलें आहे, (गो. म. मावे)

या दोन्ही सप्तनद्या मिळून चवदा नद्या होतात व प्रत्येक गटानें आपापल्या भागास सप्तसिंधू असेच नामाभिधान दिलेलें आहे. या ठिकाणीं येथपर्यंत दोन्ही गटात भेद नव्हते असें वाटते, कारण ह्या १४ नद्याचा उल्लेख ऋग्वेदातील सूक्तात दिसून येतो. आपल्या आर्यावर्तांतील फक्त सिंधूच्या पूर्वेकडील नद्याचाच उल्लेख येतो. म्हणून त्या सिंधूच्या पूर्वेकडील व पश्चिमेकडील सात नद्याच्या वैदिक नावाची व हल्लीं प्रचलित असलेल्या धार्मिक विधि करिताना, स्थलाचा नामनिर्देश करिताना व पुण्य नद्याचा उल्लेख करिताना नावाची माहिती उद्बोधक होईल अशाकरिता ती खालीं दिली आहे.

सिंधूच्या पूर्वेकडील सात नद्याचा उल्लेख असलेली वैदिक ऋचा खालीं लिहिल्याप्रमाणे आहे.

'इमं मे गङ्ग यमुने सरस्वति शुतुद्रिस्तोमं सचता परुष्णिया
असिक्निया मरुद्वृधे वितस्तयार्जीकीये श्रृणुह्यासुषोमया

१ गंगा २ यमुना ३ सरस्वती ४ शुतुद्री (सतलज) ५ परूष्णी (इरावती अथवा रावी) ६ असिक्निन् (चंद्रभागा–चिनाब व वितस्ता–जेहलम)– चंद्रभागा आणि जेहलम ह्या एकत्र वहातात तेव्हा त्यास मरूद् वृधा असें म्हणतात ७ वितस्ता ही सुषोमाबरोबर वाहते, त्यावेळीं तिला अर्जिकीया (जेहलम) आणि सुषोमा (सुवन) हिलाच विपाशा–बियास म्हणतात. या नदीचें प्राचीन नाव उरूजिरा असें आहे. सिंधूच्या पश्चिमेस वाहणाऱ्या सात नद्याचीं नांवें.

तृष्टामया प्रथमं यातवे सजू: सुसर्त्वा रसया श्वेतया त्या
त्वं सिंधो कुभया गोमतीं कुभुं मेहत्न्वा सरथं याभिरीयसे

ऋ. १०–७५–७॥–६॥

सिधूनदीच्या पश्चिमेस असणाऱ्या नद्याची वैदिक नावें व त्याचीं हल्लींचीं नावें.[1]

---

१. 'प्राचीन स्थळ नाम सूची' या श्री चित्रावशास्त्री याच्या ग्रंथात दिलेलीं काहीं नावें निराळीं आहेत. (गो. प्र. भावे).



ा
)
)
तु
धू
त
ही
या
गी
री
थे
तर
टी
)

झरतुश्त दर्शनचे प्रतीक

तीगनर इराणातील आर्य व आर्यावर्तातील आर्य
यांच्यामध्ये झाला या मग्रामानतर असुर शब्दाचा अर्थ बदलला व यासरिता
वरील शब्दाचा अर्थ कसा काय दिसून येतो यास विवेचन करणें बरें

अहुरमझ्द—

'असुर' हा शब्द ऋग्वेदात आरंभीं चागल्या अर्थाने आला आहे

यमयमीसंवाद (म. १० सू. १० ऋ. २) महस्पुत्रासो असुरस्यवीरा दिव पुत्रास्ते असुरस्य वीरा / या दोन्ही चरणात महस् म्हणजे महर्लोक व दिव म्हणजे देवलोक असा आहे.

तैत्तिरीयब्राह्मण (खण्ड ३ पाठ २१ अनुवाक २) 'त्वमग्ने रुद्रो असुरो महोदिव .'

हे अग्ने तू रुद्र म्हणजे भयकर आहेस, असुर म्हणजे शत्रुहता आहेस व द्युलोकातील तेजोरूप 'तू आहेस.' आणि त्याच प्रसगात पुढें मरुतादि-देवगणाचा तू नियामक, ईश्वर आणि सरक्षक आहेस. आणि तेहतीस देवाचीं निरनिराळीं रूपें तूच धारण केलीं आहेस, असें वर्णन केलेलें आहे.

(१) त्वं विश्वेषां वरूणासि राजा ये च देवा असुर ये च मर्त्याः
(ऋग्वेद १०, १७, १५)

(२) समिधे अग्नाव कृतं इद्वदेम महत् देवानां असुरत्वमेकं.
ऋग्वेद (३, ५५, १).

(१)–'हे वरुणा, तू सर्व विश्वाचा राजा आहेस अर्थात् देवाचा व असुराचाही राजा आहेस.

(२)—या जातवेद अग्नीसमोर मी सत्यच भाषण करितों कीं, सर्व देवामध्ये एकच ईशतत्त्व आहे.

याप्रमाणे पुढें काहीं ठिकाणीं असुर हे निर्गुणोपासक व देव हे सगुणोपासक असा भाव उत्पन्न झाला असें दाखविलें आहे व त्यामुळें परस्परात वैमनस्य उत्पन्न होऊन असुर या शब्दाला 'दस्यु-दैत्य' असा अर्थ लावण्यात आला आहे वस्तुत असुर हे आर्यच होत यांत काहीं सशय नाहीं

मझ्द—ईश्वरकृष्ण याच्या *साख्यकारिका* श्लोक (६८–७०) यात सांगितले आहे कीं, साख्य दर्शनाचे सस्थापक *कपिल मुनी* याच्या एका शिष्याचें नाव 'आसुरी' असें होतें. ह्या आसुरी मुनींनी आपला शिष्य

'पंचशिख' याला सांख्य-विद्या शिकविली व ह्या पंचशिख मुनींनी ती विद्या मिथिलेश विदेही जनक राजास शिकविली. शतपथ ब्राह्मणाचा वंश ब्राह्मणात व बृहदारण्यकोपनिषदात (अध्याय ६ तील वंशावळींत) असें लिहिलें आहे कीं उद्दालक ऋषींचे शिष्य याज्ञवल्क्य होते, व त्याचा शिष्य आसूरी व त्याचा शिष्य आसुरायण आणि आसुरायणाचा शिष्य प्राश्नीपुत्र हा आसुरीवासी होता. आसुरी म्हणजे हल्लींचा 'असिरिया' देश होय हा देश इराकजवळच आहे. त्यामुळे सांख्य शास्त्राचा जसा असीरियात प्रसार झाला तसाच इराणातील आर्य लोकांतही झाला होता हे आसुरी पंथाचे लोक सांख्य शास्त्रज्ञ, विद्वान व बुद्धिवान असे समजले जात असत, म्हणून आसुरी हा शब्द 'महद्' या शब्दाचा पर्याय शब्द आहे असें मानण्यात आलें असावें

उपनिषत्काराांनी आत्मा व ईश्वर हीं तत्त्वें मानलीं आहेत, पण त्याप्रमाणें सांख्य दर्शनकार ईश्वरतत्त्वाचा स्वीकार करीत नाहींत. ते ज्ञानरूप पुरूषाचा स्वीकार करितात. परंतु ज्ञानरूप पुरुष हा आत्मा व ईश्वर याहून निराळाच आहे असें ते मानतात. उपनिषदामध्यें महत् तत्त्वाला बुद्धीच्या पलीकडील स्थिति दाखविली आहे व सांख्य दर्शनात समग्रबुद्धिरूपच तो पुरुष आहे असें मानण्यात आलें आहे. ह्या सांख्य शास्त्राचा प्रसार इराणातील आर्य ब्राह्मणात म्हणजे 'मग' ब्राह्मणात पुष्कळ प्रमाणात झाला. परंतु इराणातील बुद्धिवान मंडळीस तो रुचला नाहीं, म्हणून त्यांनीं महत् या शब्दाला 'दा' हा धातु लावून महत्द्-मस्जद् असा शब्द तयार केला. इराणी आर्यांच्या 'मग' ब्राह्मणाच्या किंवा पारसिक धर्म स्थापकाच्या मताप्रमाणे मस्ज़्द शब्दात महान् प्रभु, महान् पुरुष अर्थात बुद्धिप्रेरक विश्वेश्वर असाच अर्थ ध्वनित होतो असें दिसतें. याप्रमाणें 'अहुर मज्झ्द्'-म्हणजे 'असुर महत्दा' असा अर्थ तयार होतो

इ. सन पूर्व ६८८ ते ६७० मध्यें असिरीयाचा राजा असुर बनिपाल याचा एक शिलालेख सापडला आहे. या शिलालेखात त्या देशातील प्रजाजनाचा महान् देव म्हणून असुर मसदाचें (मज्दाचें) नाव कोरलेलें

आहे. यावरूनही अहुरमज्द म्हणजे 'असुर महस्' म्हणजे 'महान् पुरुष' असे असावें असे दिसते.

झरतुष्ट (झरदुस्त) ...

ऋग्वेद संहितेंत अक्षर संख्यानुसार मुख्य सात छंदाचा उपयोग करण्यात आला आहे, ते सात छंद असे—

गायत्री छंद २४ अक्षराचा, उष्णिक् छंद २८ अक्षराचा, अनुष्टुप् ३२ अक्षराचा, बृहति ३६ अक्षराचा, पंक्ति ४० अक्षराचा, त्रिष्टुप् ४४ अक्षराचा आणि जगति ४८ अक्षराचा, असे छंद आहेत. परंतु यजुर्वेद संहितेंत प्रत्येक छंदाचे आर्ष, दैव, आसुर, प्राजापत्य, याजुष, साम्न आर्च आणि ब्राह्म अशा प्रकारचे आठ भाग केलेले आहेत या विभागात आसुरछंद म्हणून एक भाग आहे. त्यामध्यें आसुरी गायत्री छंदाची अक्षरसंख्या १५ आहे. आसुरी उष्णिक १४, आसुरी अनुष्टुप् १३, आसुरी बृहती १२, आसुरी पंक्ति ११ आसुरी त्रिष्टुप् १० आणि आसुरी जगती छंदाची अक्षरसंख्या १० आहे यांप्रमाणें यजुर्वेदामध्ये कांहीं ऋचा आसुर छंदात गाइलेल्या आहेत.

असुर लोकात स्त्रीपुरुषाकरिता मौजीबंधनाचें विधान होतें व आहे. आपल्या आर्यावर्तांतही "पुरा कल्पे तु नारीणां मौंजीबंधनमिष्यते" स्त्रियांच्या मौंजीबंधनाची चाल होती परंतु हल्लीं ती बंद आहे. हे असुर अग्नि व वरुण देवताचे उपासक होते व आहेत. ते यज्ञोपवीत घालीत असत. व हल्लींचे पारसीकहि यज्ञोपवीत घालतात. हे असुर लोक निर्गुणोपासक होते व आर्यावर्तांतील आर्य लोक विष्णू, इंद्र, रुद्र इत्यादि सगुण देवताचे उपासक होते. यामुळें, त्या दोघात मोठी लढाई झाली व पारसीक असुराचा[1] पराभव झाल्यानें ते (असुर) इराणात वस्तीकरितां निघून गेले.

१. 'ततो पारसिकान् जेतुं प्रतस्थे स्थलवर्त्मना' असें कालिदासाच्या काव्यांत (रघुवंशात) आहे हें कोणत्या कालचें ! (गो. म. भा.)

अशा प्रकारानें हप्तहद् देशांतून इराणांत (इलाम्) गेलेल्या असुर लोकांत कालांतरानें "झरतुस्त" नांवाचे धर्मसंस्थापक होऊन गेले त्यांच्या पूर्वजांच्या ज्या दहा पिढ्या आहेत, त्यावरून झरतुस्त हे ब्राह्मण कुळांतील होते व त्यांचे कुल श्वेत होतें व गोत्र हरिदश्व म्हणजे हरिद्रवेय होतें असें दिसतें ते पुढील माहितीवरून दिसून येईल झरतुस्ताच्या पिढ्या खालीलप्रमाणें आहेत

१ झरतुस्त, २ पौरुषाश्व, ३ प्रतिअश्व, ४ ओर्नाश्व, ५ सेचदश्व, ६ चक्षण, ७ प्रतिअश्य, ८ हरिद्रवेय किंवा हरिदश्व, ९ हरिद्रव, १० श्वित्र.

वरील दहा नावांपैकीं पांच नावें अश्वान्त आहेत, आपल्या श्वेताश्वतर उपनिषदाच्या उद्गात्या ऋषीचें नाव श्वेताश्वतर होतें या नावांत अश्वतर हें ऋषीचे नाव व श्वेत हें त्याच्या कुळाचें नाव होय

ऐतरेय ब्राह्मणामध्यें विश्वजित् नावाच्या यज्ञाचें वर्णन करितांना 'बुडिल' ऋषीचे नाव आश्वि अगर अश्वतर असें दिलेलें आहे

श्रीसायणाचार्यांनीं आश्वि याचा अर्थ अश्व या नावाच्या ऋषीचा पुत्र आणि अश्वतर याचा अर्थ अश्वतर ऋषीचा वंशज असा केला आहे. छांदोग्य उपनिषद् (अ ५, ११, १ व १६, १) यांत असें वर्णन आलेलें आहे कीं, वर नमूद केलेले 'बुडिल' ऋषी हे उद्दालक ऋषींना बरोबर घेऊन कैकय (इराण अथवा इलाम्) देशाचा राजा अश्वपति यांनीं बोलाविलेल्या ब्रह्मपरिषदेंत उपस्थित झाले होते व या परिषदेंत वैश्वानर ब्रह्मविद्येबद्दल त्यांनी चर्चा केली होती यावरून असें अनुमान निघतें कीं, अश्वतर आणि अश्व या वंशांतील पुरुषास उपनिषदीय वाङ्मयांत फार मान दिलेला आहे

कृष्ण यजुर्वेदाच्या ८० शाखा आहेत त्यांत चरक नांवाची एक शाखा आहे ह्या चरक शाखेच्या १२ उपशाखा आहेत त्यामध्यें श्वेताश्वतर आणि मैत्रायणी अशा शाखांचा उल्लेख आहे

मैत्रायणी शाखेच्या ७ उपशाखा आहेत त्यांत हरिद्रवेय या नावाची

उपशाखा आहे. 'झरतुष्ट' या धर्मसंस्थापकांच्या दहा पिढ्या वर दिल्या आहेत. त्यांत आठव्या पुरुषाचें नांव 'हरदश्व' म्हणजे 'हरिद्रिवेय' असें आहे. यावरून झरतुष्ट यांचे पूर्वज 'श्वेत कुलांतील' कृष्ण यजुर्वेदाचे अनुयायी होते असें दिसते.'

झरतुष्ट या शब्दाचा उगम हरित (झरत) हिरण्मय 'उष्ट' म्हणजे प्रकाश. एकंदरींत हिरण्मय प्रकाशरूपी असा याचा अर्थ होतो.

देव—पारसिकांच्या ग्रंथांत पापी नष्ट अशा अर्थी 'दवेयु' असा शब्द येतो. देव असा क्वचितच येतो. याकरितां देव म्हणजे दैत्य, दानव असा अर्थ पारसिकांच्या ग्रंथांत नसावा अशी आमची समजूत झाली आहे.

(आ) जैन सांप्रदायांतील मंत्र.

जैन सांप्रदाय भगवान् ऋषभदेव यांचेपासून सुरू झाला. परंतु त्यावेळीं वेदांबद्दल *अप्रीति नव्हती, तर हिंसेबद्दल होती*. त्यांचे शिष्य अरिहंत (अर्हत) हे होते. त्यांनीं जैन धर्म स्थापन केला. यापूर्वी असे एकंदर २४ धर्मप्रचारक होऊन गेले असें जैन ग्रंथांत वर्णन आहे. त्या सांप्रदायांत वेदांचें वरिष्ठत्व अमान्य झालें. पुराणग्रंथ त्यांस मान्य नाहींत. परंतु त्या सांप्रदायिकांनीं नवीन पुराणांची रचना केली. त्या नवीन पुराणांत श्रीराम, हनुमंत, श्रीकृष्ण हे श्रेष्ठ पुरुष जैन सांप्रदायी होते असें वर्णन आहे. गुरुपरंपरेला मान्यता आहे. पण अवतार-परंपरेला मान्यता नाहीं. योगमार्गानें मुक्ति साध्य होते अशी त्या सांप्रदायांत ग्वाही दिलेली आहे.

---

१. 'झरतुष्ट—त्याची पीठिका—पारसीकांच्या गाथा, त्यांतील व्यावहारिक व पारमार्थिक मंत्र–तंत्र व यंत्रें (तावीज–ताइत) प्रचार व प्रघात यांचा बराच विचारपरिप्लुत परामर्श Weekly Illustrated—३१ ऑगस्ट १९६१ यांत दिलेला आहे. त्यावरून योगेश्वरानंदांच्या वरील विवेचनाला पुष्टीच मिळते. पण कांहीं बाबतींत विवाद्यता आहेच. (गो. प्र. भा)

त्या सांप्रदायांत श्वेतांबर व दिगंबर असे दोन पंथ आहेत. इष्ट कामना-सिध्यर्थ देवी मंत्र व यंत्रें या सांप्रदायांत प्रचलित आहेत. हे मंत्र व यंत्रें तंत्रग्रंथांतून घेतलेलीं आहेत. पद्मावती व गौरी या देवतांची आराधना इष्ट फलप्राप्त्यर्थ करण्यांत येते. चीना यंत्र व ज्वरबंधन यंत्रें त्यांच्या सांप्रदायांत विशेषत्वानें दिसून येतात. जैन सांप्रदायांतील मंत्र संस्कृत, पाली व अर्धमागधी या भाषांत लिहिलेले आहेत. वेद, उपनिषदें व पुराणें या ग्रंथांत वर्णाश्रम धर्मप्रणीत आचार सांगितलेले आहेत. पण वर्णाश्रम धर्माचार न मानणाऱ्यांपैकीं असुर (पारसी) जैन व बौद्ध हे असल्यानें यांपैकीं जैनधर्माच्या प्रवर्तकांनीं आर्यधर्मांतून आपला निराळा सुभा काढला व इष्टफल-साधनार्थ वेद, उपनिषदें व पुराणें यांच्यावर विश्वास नसल्यानें वैदिक किंवा पौराणिक मंत्र न घेता तंत्रग्रंथांतील मंत्र उपयोगांत आणिले. कारण आगम व तंत्र ह्या मार्गांत मंत्रदीक्षा देण्याचे बाबतींत वर्ण-जाति-स्त्रीपुरुष असा भेद मानण्यांत येत नाहीं.

श्रीसिद्ध सारस्वताचार्य श्रीबालचंद्र सूरी हे जैन सांप्रदायांत एक मोठे कवी होऊन गेले. तसेंच न्याय, अलंकार, व्याकरण या शास्त्रांवरही जैन सांप्रदायांत मोठमोठे ग्रंथकार होऊन गेले. त्यांच्या ग्रंथांना आर्यधर्मांतील ग्रंथकारांनीं मान्यता दिलेली आहे. श्रीबालचंद्र सुरींनीं 'वसंतविलास' नामक महाकाव्याची रचना केली आहे. त्या काव्याच्या मंगलाचरणाच्या श्लोकांत 'श्रीसरस्वती' देवीची उपासना करून मला कवित्वाची स्फूर्ति झाली असा निर्देश केला आहे. अर्थात् श्रीसरस्वती देवीची उपासना ह्या सांप्रदायांत प्रचलित आहे याशिवाय या सांप्रदायांत पूर्वीं होऊन गेलेल्या २४ तीर्थंकरांपैकीं प्रत्येक तीर्थंकराची ती शासनदेवता असते तिच्या प्रसन्नतेकरितां तिचे मंत्रही प्रचारांत आलेले आहेत श्वेतांबर मताप्रमाणें २४ देवता मानल्या आहेत व त्या देवतांचे विविध पूजाविधि व मंत्रही त्यांच्या ग्रंथांत वर्णन केलेले आहेत श्रीसरस्वतीदेवीचे १६ व्यूह आहेत व प्रत्येक व्यूहाची एक अधिष्ठात्री देवता व तिचा विशिष्ट मंत्र व तिचें

विशिष्ट पूजाविधान म्हणजे तंत्र वर्णिलेलें आहे. अशा १६ अधिष्ठात्री देवतांचीं १६ विधानें निश्चित केलीं आहेत. वरील विवेचनावरून जैन सांप्रदायात मंत्रविद्या प्रचारात आहे व यात तंत्रशास्त्रातील[1] मंत्र व तंत्रेंही आहेत ही गोष्ट शोधकास त्याचे ग्रंथ पाहून समजेल.[2]

(इ) बौद्धसांप्रदायांतील मंत्र.


वेद, उपनिषदें व पुराणें यास न मानणारा व वर्णाश्रमधर्म न पाळणारा

---

१. जैन मंत्र तंत्र . इ. स. १ ल्या शतकापासून जैनधर्मीयांनीं *तंत्रसाधनेचा* प्रारंभ केला असे मानितात. ते शक्तिसिद्धांत मानितात. वैदिक लोक जाति-वर्ण इत्यादि पाहिल्याशिवाय मंत्रदीक्षा देत नाहींत. म्हणजे मानसिक धारणा अजमावून मगच मंत्र देतात. पण जैन लोकांनीं तान्त्रिकाची दीक्षा घेतली खरी; तथापि ते तात्रिक वर्ण, जाति, इत्यादि भेदभाव मानीत नाहीत. जैनधर्मात मानवदेवसुरी, मानतुंगसुरी, शांतीसुरी, धर्मघोष, जिनप्रभ, यशोविजय इत्यादि अनेक तान्त्रिक होऊन गले. त्याचे सर्व मंत्र 'ह' या अक्षरानें सुरू होत असल्यानें त्या तंत्रमंत्राला 'हादिमत' म्हणतात. *ही प्रथा वैदिक नाहीं* (राहुरी येथील होरारत्न आर. जी. सप्रे हे *हादिविद्या युत श्रीचक्रम्* म्हणून एक फोटोप्रिंट विकत देतात। ह्याचा विचार वैदिक साधकांनीं अवश्य करावा) या पंथात सरस्वति, अंबिका, पद्मावती सिद्धार्यिका, इद्राणी, अच्युता, चक्रेश्वरी इत्यादि तान्त्रिक देवता आहेत. जास्त माहितीसाठी भारतीय संस्कृति-कोश. भाग ४ था पहा. (गो. प्र. भा.)

२. *परमात्मा अनंत गुणात्मक असून त्याचें चिंतन करण्याचे अनेक मंत्र आहेत.* तो परमात्मा मंगलरूप लोकोत्तम व शरण्यभूत असा आहे त्याला 'पञ्च-परमेष्ठी' असे ते म्हणतात. या पञ्चपरमेष्ठींना मुख्य मंत्र पञ्च 'ण' युक्त आहे तो असा 'णमो अरिहन्ताणम्। णमो सिद्धाणम्। णमो आइरि-याणम्। णमो उवज्झायाणम्। णमो लोए सव्वसाहूणम्।' पञ्च णकारात्मक महामंत्राच 'अरिहनासिद्ध', 'असि-आ-उ-सा', 'अरिहन्त', 'सिद्ध' व 'ॐ' असे सहा, पांच, चार, दोन व एक अक्षरी मंत्र बनविलेले आहेत (गो. प्र. भा)

दुसरा सांप्रदाय म्हणजे बौद्ध सांप्रदाय होय. या सांप्रदायात हीनयान व महायान असे दोन पथ आहेत. हीन-यानात पुन्हा अठरा उपपथ आहेत. ह्या सांप्रदायापैकीं हीन–यान हा पथ दक्षिणापथ, सीलोन, यवद्वीप व बालीद्वीप या भागात प्रचलित झाला व महायान हा पथ चीन, जपान, उत्तराखंड, वंगदेश, सयाम या देशात प्रसार पावला. महायान शाखेंत माध्यमिक व वज्रयान अगर मंत्रयान अशा दोन उपशाखा निघाल्या. मंत्रयान या शाखेचे नऊ भेद आहेत. पद्मसंभव नावाच्या ब्राह्मणानें तिबेटात जाऊन तेथें मंत्रयान या शाखेचा उपक्रम केला. मंत्रयानात मंडळरचना, बीज, न्यास, मंत्रजप, मुद्राप्रदर्शन, उपचार, अभिषेक व ध्यानादि विधि तंत्रशास्त्राप्रमाणेच प्रचारात आहेत. याची जास्त माहिती मंत्र व उपासना या प्रकरणात दिलेली आहे. मंत्रयानातील मंत्र संस्कृत व पालीभाषेंत आहेत. 'वज्रवाराही' व 'तारा' अशा मुख्य देवता मानल्या आहेत. बौद्ध धर्मांत व वैदिक धर्मांत 'ॐकार' याला 'तार' असें म्हणतात. तेव्हा 'तार' ही पुमान् देवता व 'तारा' ही स्त्रीरूप देवता असें बौद्ध सांप्रदायातील धर्मग्रंथात निदर्शित केलें आहे. जशा महायानातील



बौद्ध धर्मातील एक महत्वाचें अष्ट धारणात्मक प्रतीक

वज्रयान अगर मंत्रयान या शाखेंत वज्रवाराही व तारा अशा देवता आहेत, त्याप्रमाणें हीनयानात '*मणिमेखला*' देवीची उपासना आहे. वज्रयानात अगर मंत्रयानात तारार्चन–चंद्रिका, तारा–पंचांग, तारा–सहस्रनाम, तारा–अष्टोत्तर शतनाम, तारा–त्रिशति ह्याच्या पाठाचे व पूजेचे क्रम सांगितलेले आहेत व हे सर्व पूजाक्रम व पूजाप्रकार तंत्रग्रंथात वर्णन केल्याप्रमाणेच आहेत.

जैन सांप्रदाय व बौद्ध सांप्रदाय याच्या सांप्रदायातील वर्णन देण्याचा हेतु हाच आहे कीं, मंत्रविद्या ह्या दोन्ही सांप्रदायात तंत्रमार्गांतूनच गेली आहे.

रुद्रयामल व ब्रह्मयामल यात असें सांगितलें आहे कीं, वसिष्ठमुनि

मानससरोवराजवळ नीलसरस्वतीची उपासना करण्यास गेले होते व तेथून सयामधील कामाख्या देवीची उपासना करण्यास गेले होते. ही गोष्ट साक्यमुनि ज्यास 'बुद्धदेवव' बुद्धधर्मस्थापक' म्हणतात, त्याच्या वेळची नव्हे. परंतु साक्यमुनींच्या पूर्वीही (जैनांच्या २४ तीर्थंकराप्रमाणें) २४ बुद्ध होऊन गेले त्याच्यावेळची असेल. नीलसरस्वतीची उपासना तिबेटात व चीनमध्यें अजूनही चालू आहे व मणिपद्मेची उपासनाही चालू आहे. नीलसरस्वतीचा मंत्र पुढें उत्तरार्धांत आहे व मणिपद्मेचा मंत्र 'हुं मणिपद्मे हुं'[२] हा चुकीचा असावा. खरा मंत्र "ॐ मणिपद्मे ॐ" असा असावा. असो. याप्रमाणें इतर पंथामध्येही[१] मंत्रविद्या चालू आहे हेंच सांगण्याकरिता एवढा पाल्हाळ केला आहे.

आतापर्यंत वेद, अवेस्ता-गाथा, यांच्या धर्मग्रंथाबद्दल विचार केला. या दोन धर्मग्रंथांत मंत्रविद्या आहे, मंत्रशास्त्र नाहीं, हें दाखविलें आहे अशा दोन धर्मग्रंथांचा विचार झाल्यानंतर महमदीयांच्या कुराणग्रंथांतही मंत्रविद्या आहे हे पण येथें नमूद करीत आहे. जैनधर्म व बौद्धधर्म या धर्मांच्या ग्रंथांत व त्या धर्मीयांच्या आचारांत मंत्रविद्या आहे हे पण सिद्ध केलें आहे, परंतु वेद हे सुरांचे म्हणजे देवांचे ग्रंथ व अवेस्ता हे असुरांचे ग्रंथ आहेत. सुर म्हणजे देव व असुर यांचीं युद्धें झालीं याचें वर्णन वेदांत


---

१. विनयतोष भट्टाचार्य यांच्या मतें गौतमबुद्ध स्वतः तांत्रिक तत्त्वांचा पुरस्कर्ता होता. '*मंजुश्री कल्प*' हा त्यांचा या विषयावरील पहिला ग्रंथ होता. शाक्यमुनि व मंजुश्री यांच्या संवादामधून या ग्रंथाची निर्मिती झाली. बुद्धोक्त अशीं बरीच तंत्रें संस्कृतांत आहेत. (देवीकोश-भाग २ पृ. ४१२—गो. प्र. भा.)

२. 'ॐ मणिपद्मे हुम्' सिक्कीम व भूतान येथील बौद्धलामा लोक असाच मंत्र म्हणून जप करतात. तिबेटमधील श्रेष्ठ लामाही असाच मंत्र जपतात. "You for ever" "Saffron Robe" "Third eye" by T L Rampa) या ६०० वर्षांच्या लामांच्या या पुस्तकांत असाच दिला आहे. (गो प्र. भा.)

असें आहे कीं, युद्धें संपल्यावर देवानीं पृथ्वीच्या निरनिराळ्या भागात म्हणजे आर्यावर्त, महाचीन, त्रिविष्टप (तिबेट) जबुद्वीप वगैरे भागात वैदिक धर्माचा प्रचार होता तेथें वस्ती केली. असुरानीं असिरिया, इराण या भागाचें आक्रमण केलें. दनुजानी डान्यूब नदीच्या काठच्या प्रदेशाचें आक्रमण केले. पाताल म्हणजे अमेरिका वगैरे देशातही असुर गेले. पाडवानी अश्वमेधाच्या वेळीं पातालस्थ असुराना जिंकले, परतु त्याच्याशीं सख्य केलें. व राजसूय यज्ञाचे वेळीं मयासुराकडून मयसभा बाधवून घेतली. असो. भारत वर्षात किंवा आर्यावर्तात वेद, उपनिषदें याचे एकनिष्ठ भक्त व सेवक असे आर्य हे वर्णाश्रमधर्माचाराप्रमाणें वागत होते. असुर, दानव, दस्यू यास वर्णाश्रमधर्मआचार मान्य नव्हते. परतु शिव, देवी, गणपति या देवताच्या उपासना मात्र त्याच्यात चालू होत्या. आज इतर सर्व जगात सनातनी हिंदु पद्धतीचा वर्णाश्रमधर्म मुळीं अस्तित्वात नसला तरी तो आर्यावर्तात मात्र निकृष्ट स्थितींत तरी पाळला जात आहे. वर्णाश्रमधर्माचरण व त्याचे नियम कडक आहेत. त्यामुळें ह्या आर्यावर्तात चार्वाक, सौत्रातिक, जैन, बौद्ध असे साप्रदाय निघाले. यापैकीं जैन व बौद्ध साप्रदायातील मत्राबद्दल असलेली माहिती मागील स्तभात देण्यात आली आहे.

चीनमध्यें महायान या बौद्धपथाचा प्रचार झाल्यानतर त्यातूनच 'कन्फ्यूशस' व 'ताऊ' वा 'ताओ' हे दोन उपपथ निघाले. त्यापैकीं 'कन्फ्यूशस' या पथप्रवर्तकानें व्यक्तीचा व वैश्विक चिच्छक्तीचा विशेष सबध असून तीच वैश्विक चिच्छक्ति सर्व प्राणिमात्राची नियामक शक्ति आहे असें प्रतिपादन करून त्या शक्तीचें प्रतीक म्हणून सोबत दर्शविलेल प्रतीक बनवून व मानून हे उपासनात रूढ केलें (Great Religions of the World—Life International Book Co -गो प्र. भा.)


वैश्विक शक्तीचें चिनी प्रतीक

(ई) इस्लामी सांप्रदायांतील मंत्र व उपासना (गो. प्र. भावे)

इस्लामी एकेश्वरी तत्र प्रतीक



'अल्लाहो अकबर'

जगातील सर्व धर्मांमध्ये अगदी अलीकडचा असा इस्लामी धर्म (व त्यांतील सांप्रदाय) हा आहे. त्यांत पोटभेद म्हणजे उपसांप्रदाय आहेत. त्यापैकी 'सूफी' सांप्रदाय हा त्यातल्यात्यात जास्त अध्यात्मप्रवण आहे. त्याचे आचार व विचार ह्याचा पाया मानवी मानसशास्त्र व थोडीबहुत अतिमानस दृष्टि हा आहे.

इस्लाम धर्मी लोक जरी मूर्तिपूजक नाहीत, तथापि त्याचा दर्गा, इदगा वा मशीद ह्यामध्ये एक लहानशी जागा वा स्थान हे एक प्रकारचें प्रतीकरूप परमेश्वराचे स्थान वा जागा मानिली जाते. 'मक्का' ह्या त्या मूळच्या धर्मस्थानी 'काबा'[1] हा काळा पवित्र

---

१. हा एक काळ्या उत्कृष्ट पाषाणाचा स्तंभ आहे. प्राचीनकाळी अरबस्तान ह्या भागात शिवलिंगपूजा फार होती. 'काबा' हें एक शिवलिंगच होतें. दक्षिण भारतातील लोकाच्या तिकडे वसाहती होत्या. त्याबरोबर शिवलिंग पूजाही तिकडे गेली 'अरबस्तान' यापैकीं 'अरब' हा शब्द द्राविडी भाषीय आहे. अरबी लिपीचें वळणही द्राविडी वळणाचें आहे. (Shastri-Dravidian Culture Vol I & II)
तसेच 'काबा' ह्या स्तंभावर त्याच्या एका बाजूच्या भिंतीवर सुवर्णाक्षरानीं वेदमंत्र अरबी वा द्राविडी लिपीत लिहिलेले आहेत. त्यांना तसेच 'काबा' या स्तंभाला शंकरप्रिय अशीं पांढरी वा गुलाबी फुलेच वहातात. 'काबा'चे फोटो अनेक इंग्रजी मासिकांतून प्रसिद्ध झालेले आहे. ही मूर्तिपूजा नव्हे का ? गो. प्र. भा.)
गुलाशरीफ इस्लामी सांप्रदायापैकीं कांहीं पंथात 'गुलाशरीफ' नावाचा हिंदु धर्मीय 'सत्यनारायणा'सारखा एक विधि आहे. त्या विधींत पूजाप्रतीक म्हणून फनरचना हरितगुच्छमंडित अशी वस्तुरचना केलेली असून तिची यथाविधि पूजा केलेली असते व सत्यनारायणाप्रमाणें गोष्टी वाचिल्या जातात. ही प्रतीकोपासना नव्हे का ? (गो. प्र. भा.)

स्तंभरूप भाग सर्व श्रेष्ठ असें प्रतीकच आहे. सर्वत्र एकच परमेश्वर आहे हा एकेश्वर वादच इस्लामीयांचें ध्येय व धर्मतत्व आहे. त्यांच्यांत परधर्म-साहिष्णुता हें तत्त्व नाहीं. धार्मिक वावर्तीन व्यक्तीला मानसिक स्वातंत्र्य नाहीं. इतर धर्मीयांप्रमाणें इस्लामचें तसें प्रतीकही आहेच. त्याचें अक्षर-रूपचिन्ह वर दिलें आहे.

सूफीपंथाचा '*हु अल्लाह हु*' हा अत्यंत श्रेष्ठ व प्रिय मंत्र आहे. त्यांच्या उपासनासाधनेचे मुख्य चार आधारस्तंभ आहेत. ते असे. *शरीअत, तरीकत, मारीफ़त* व *हकीक़त* त्याचें थोडक्यात स्वरूप असें : १ *शरीअत* यांत अन्तःकरणशुद्धता व शुद्ध विचार यावर जोर असतो–नमाज–जकात (दान) सौम (उपवास-रोजा) व हज हे मुख्य आचार भाग आहेत. त्यांची मंत्रजप पद्धति *स्मरण-उच्चारण*-मोठ्यानें-मनांत वा श्वासावर ध्यान ह्यांना धरून आहे. २. *तरीकत*–यांत गुर्वाज्ञा पालन, इंद्रियनिग्रह व मौन ह्यावर जोर असतो. ३. *मारीफ़त*–यांत अनुभवावर जोर दिला जातो. तौबा (अनुताप) जहद (वैराग्य) सब्र (संतोष) शुक्र (कृतज्ञता) रिआज (इंद्रियदमन) तवक्कुल (परमेश्वरावरच पूर्ण भरंवसा) रजा (देव व व्यक्ति यांचें इच्छैक्य) या सात पायऱ्यांचा अभ्यास करावाच लागतो. ४. *हकीकत*–यांत ईश्वराशीं ऐक्यत्व हें तत्त्व अनुभवयाचें असते. (सूफीयों की 'उपासना रहस्य' श्रीकृष्णदत्त भट्ट).

इस्लामी मंत्रविधि व विधान : इस्लामी धर्मीयांत शिया व सुन्नी हे दोन मुख्य पंथ आहेत. शिया पंथी बहुसंख्य असून सुन्नी पंथी अल्पसंख्यांक आहेत. शिया पंथीयामध्यें उपपंथ आहेतच. मुहम्मद हा ईश्वराचा पैगंबर आहे, कुराण हा त्याचा मुख्य धर्मग्रंथ असून खुदा म्हणजे ईश्वर ज्याला ते 'अल्लाह' (याचा अर्थ 'सर्व श्रेष्ठ') म्हणतात. तो एकच असून त्याशिवाय इतर दुसरा कोणताही 'देव' नाहीं. (ख्रिस्ती-ईसाई पण 'येशू' हा एकच देव मानितात.) या गोष्टीबद्दल सर्व इस्लामीयांची एकवाक्यता आहे.

तसेंच प्रत्येक इस्लामी सहा सिद्धांत व चार कर्मकांडीय आज्ञा प्रमाण म्हणून मानितो. ते ६ *ईमान* म्हणजे सिद्धांत असे आहेत :—१ खुदा एकच आहे (२) मुहम्मद हा त्याचा एकच पैगम्बर, (३) त्याचे फरिश्ते—पंथ प्रचारक आहेत (४) कुराण हाच एक मुख्य आहे. धर्मग्रंथ (५) खुदा सर्वशक्तिमान आहे व (६) मृत्यूनंतर न्याय मिळण्याचा एक दिवस आहे. त्यांच्या 'दीन' म्हणजे कर्मकाण्डीय आज्ञा *चार आहेत*. त्या अशाः—(१) नमाज—म्हणजे उपासना, (२) रोजा—ठराविक काळांतील उपवास, (३) जकात व (४) हज-मक्केची यात्रा. प्रार्थनेला 'रकोह' म्हणतात. हिंदूंची जशी '*गायत्री*' तशी त्यांचा 'कलमा' म्हणजे गायत्री आहे. कलमाचीं पांच अंगे आहेत. नमाजातील '*अजाँ*' म्हणजे मंत्र सात आहेत. ते सात मंत्र (अजाँ) हे आहेत. (१) 'अल्लाहु अक्बर, अल्लाहु अक्बर' (अल्ला सर्व श्रेष्ठ आहे.) (२) 'अशादु अल्-ल्ला इलाह, इल्लाह' असें २ दां म्हणणें (अल्लाशिवाय दुसरा कोणीही तसा लायक नाही असा, माझा विश्वास आहे. (३) 'अशाहदु अन्न मुहम्मदुर रसूलल्लाह' असें २ वेळां म्हणणें. (मुहम्मद हा अल्लाचा रसूल—पैगम्बर आहे.) (४) 'हय्य अल्ला रसोलात'—असें २ वेळां (नमाजाला याच.) (५) 'हय्य अलल् फलाह' दोन वेळां म्हणणें (खऱ्या कर्मासाठीं एकत्र या.) (६) 'अल्लाहु अक्बर'–२ दां म्हणणें (७) 'ला इलाह इल्लाह' (अल्लाशिवाय इतर कोणीही लायक—मअब्बूद—नाही). पांच व सहा या मंत्रांमध्यें 'अस्सोलातु खैरुम् मिनन्नौम' (निद्रेपेक्षां नमाज चागला) असेंही म्हणतात.

विधिविधान : सर्व मत्र ठराविक पद्धतीनें व आवाजानेंच म्हटले पाहिजेत तर ते फलप्रद होतात. (हिंदु मंत्राचें असेंच आहे.) ते ठराविक जागीं व ठराविक वेळीं म्हणावे, तसेंच त्याची पद्धति म्हणजे नमाज पढण्याची रीत-प्रकार ठरावीकच आहे,—आठ प्रकारची ऊठ बस. देहशुद्धि, स्थानशुद्धि, आसन व मनशुद्धि करूनच उपासना केली पाहिजे. अशी त्यांची प्रथा आहे. मशीदी व बुद्धदेवालयें यांत प्रथमतः देहशुद्धीनें


सोय असते. व्यवहारोपयोगी हेतुसिद्धीसाठीं ताईत, दोरे, गंडे इत्यादि पद्धति मागाहून त्या धर्मांत आल्या. इतर धर्मीयांच्या 'यंत्रां'प्रमाणें ईशशक्तीचीं प्रतीकें इस्लामीयांत नाहींत. कारण ती एक प्रकारची मूर्तिपूजा होते. म्हणून इस्लाम हा मूर्तिपूजक धर्म नाहीं असें ते समजतात हें जरी खरें आहे तरी मक्का येथील 'काबा' हा काळ्यत्री दगड सुवर्णाक्षरलिखित स्तंभ किंवा लिंग असून तें सर्व इस्लामीयांचें एकच प्रतीक तरी आहेच. इस्लामी निशाणावरील चांद व तारा किंवा 'अल्लाहु अक्बर' हा लिखित मुद्रा हीं प्रतीकेंच आहेत, असें नव्हे का?

सारांश सर्व मानवांच्या धर्मांत मंत्र, तंत्र व त्यांचीं प्रतीकें हीं आहेतच हें स्पष्ट आहे.

(उ) याहुदी व नवख्रिस्ती (गो. प्र. भावे)

स्थूलमानानें बोलावयाचें म्हणजे याहुदी व नवख्रिस्ती हे सर्व एकेश्वरवादी उपासक व पूजक आहेत. फरक इतकाच कीं, याहुदी हे संत मूसाच्या विचारप्रणालीला शिरोधार्य मानून चालणारे व नवख्रिस्ती हे इतर संतांच्या विचारांना मान देऊन येशूच्या विचाराचें व आज्ञांचें पालन करणारे आहेत. याहुदी लोकांत इतर ख्रिस्तानुयायांपेक्षां पंथभेद वा सांप्रदाय फार कमी. नवख्रिस्तीयांमध्यें पुराणमतवादी, नवमतवादी, ल्युथरवादी, पूर्वीचे ख्रिस्तिवादी, इ. इ. सांप्रदाय आहेत. ते सर्व ख्रिस्ती जगद्गुरु जो मुख्य पोप (इटालीमधील 'व्हॅटिकन' या ठिकाणचा) याला मान देणारे व त्याच्या आज्ञा या मतें मानणारे आहेत. 'बायबल' हा यांचा वेदग्रंथ आहे.

ख्रिस्ति धर्मीयांचे



सामान्य प्रतीक-चित्र 'क्रॉसचें'

या सर्व ख्रिस्तानुयायांमध्यें मंत्र व जप या क्रिया काटेकोरपणानें पाळणारेही लोक आहेत. 'क्रॉस' हें चिन्ह सर्व ख्रिस्तपंथी पवित्र

मानितात, त्यांतील सनातनवादी लोक तें धारणही करितात 'प्रॉटेस्टंट' वा त्यांतील उपपंथ म्हणजे ठिकठिकाणचे धर्मपीठानुयायी (जसे बॅपटिस्ट, प्रेस्बिटेरियन, एपिस्कोपेलियन इत्यादि) 'क्रॉस" या येशू ख्रिस्ताच्या प्रतीकालाही पवित्र समाजात; तें 'चिन्ह' संकटनाशक व संरक्षक आहे असें समजून धारण करितात, प्रसंगविशेषीं त्या आकाराची हातांनीं मुद्राही करितात. एवढेंच नव्हे तर ख्रिस्ती माणूस मृत झाल्यावरही, त्याला पुरतात तेथेंही तें चिन्ह, तसा 'क्रॉस' उभा पुरून ठेवितात. निधर्मी समजल्या जाणाऱ्या देशांतही तसा क्रॉस मृताच्या जागेंत पुरण्याची प्रथा आहे. ख्रिस्ताची पवित्र माता 'मेरी' हिची प्रार्थना वा उपासना करितांना तें प्रतीक जवळ वाळगितात–सारांश, 'क्रॉस' हें *ख्रिस्तानुयायांच्या एकेश्वरीपंथाच्या देवतेचें प्रतीक आहे असें ठरते.*

याहुदी लोकांतही अनेक प्रकारचे व अनेक कारणांसाठीं—मुख्यतः व्यावहारिक अडचणींवरील उपाय म्हणून—अनेक मंत्र असून त्यांचीं प्रतीकें म्हणजे यंत्रें आहेत. सोबत दिलेलें हें एक त्यापैकीं महत्त्वाचें प्रतीक आहे. दुसरें प्रतीक आम्हां हिंदुधर्मीयांच्या त्रिशूलाप्रमाणें पण चतुःशूलात्मक असून तेंही संरक्षक प्रतीक मानिलें जातें. इस्रायल ही याहुदी लोकांची मातृभूमि असून 'जेरूसलेम'—येरूसलेम हें त्यांचेंही एक सर्वश्रेष्ठ यात्रास्थान व पवित्र ठिकाण आहे. हें ठिकाण इस्लामीयांचेंही एक महत्त्वाचें पवित्र ठिकाण आहे. 'War of Roses' हीं अनेक वर्षें चाललेलीं मध्ययुगकालीन युरोपियनांचीं धर्मयुद्धें याच 'जेरूसलेम'च्या मालकीसाठीं होतीं. आजही (१९७०) इस्रायल विरुद्ध लढ्यांत त्या ठिकाणावरील हक्क हें एक कारण आहेच.



याहुदी यहोवाह (Jehova) पंथीयाचें प्रतीक

याहुदी धर्म येशू ख्रिस्तापूर्वीपासून चालत आलेला धर्मसंप्रदाय आहे. यहोवाह (Jehova) हा त्यांचा मूळचा देव. त्यानें धार्मिक आज्ञा म्हणून

दहा धर्माचार म्हणजे आज्ञा मजपाशीं करार करून दिल्या आहेत. त्यांचेच तुम्ही आचरण करावें असे सांगून त्याचा प्रचार करणारा संत 'मूसा' हा पुढें आला व तोच याहुद्यांचा देव मानिला गेला व मानिला जातो. त्याच्या दहा आज्ञांना (Ten Commandments) 'जुना करार' म्हणतात. याहुदी या आज्ञा शिरोधार्य धर्म म्हणून मानितात. येशूच्या बायबलाचे उपदेशक आज्ञांना 'नवकरार' New Testament म्हणतात. याहुदी धर्मांत प्राणिपूजा (Totemism) व पितृपूजाही होती देव यहोवाह किंवा 'याहू' या नावावरून या पंथीयांना याहुदी (यहुदी) असे म्हणतात. त्यांचें सर्व वाङ्मय 'हिब्रू' या भाषेत आहे.

सारांश, पश्चिम आशिया या भौगोलिक विभागांत (ज्याला सर्व पाश्चिमात्य खिस्तानुयायी 'मध्यपूर्व' – 'Middle East' असें विशिष्ट राजकीय दृष्टीचें नांव देतात त्या भूभागांत) मूसा, येशू व मोहम्मद पैगंबर हे तीन मोठे धर्मसंस्थापक व प्रवर्तक होऊन गेले, ते सर्व परमेश्वराचे एकेरच प्रेषित म्हणून घोषवून त्यांनी महापरमात्म्याच्या अनेक विभूतिवादाविरुद्ध बंड पुकारून केवळ प्रेषितप्रेरित एकेश्वरी पंथ निर्माण करून त्या प्रत्येकानें प्रथमतः आशियाखंडाच्या पश्चिम भागांत आपापल्या प्रेषितप्रेरित एकेश्वरी पंथाचा प्रसार केला इस्लामी प्रेषितप्रेरित एकेश्वरी पंथानें, त्याचें उगमस्थान जें मक्का, त्याच्या पूर्वेकडील भूभागांतही प्रचाराचा धूमधडाका चालविला. त्याचे खालीं दिलेले परिणाम घडले –

(१) पश्चिमेकडील तीनही एकेश्वरी धर्मपंथीयांमध्यें अनेक शतकें-पर्यंत रक्तपातपरिणामी धर्मस्थानांमधें झगडे झाले व अजूनही होत आहेत.

(२) ते एकेश्वरीवादी असूनही प्रत्येकानें ईश्वरोपासनेला व निष्ठेला सहाय्यभूत असें परमेश्वराचें प्रतीक मात्र एकच न राहातां भिन्नभिन्नच राहिलें आहे.

(३) त्यांचे पूर्वींचे उपासनामंत्र व त्यांचीं तंत्रें हींपण एकच न होतां भिन्नभिन्न राहिलीं आहेत.

(४) इस्लामी धर्मप्रचाराची पद्धति इतर पश्चिमी एकेश्वरी पंथप्रचाराप्रमाणें शांतताप्रधान नसून दंडेलीप्रधान आक्रामक स्वरूपाची होती व अजूनही ती प्रवृत्ति मावळलेली आहे असें दिसत नाहीं.

(५) मक्केच्या पूर्वेकडील आशियाच्या भागांतील भारतवर्ष ह्या भागांत पश्चिमेकडील तीनही पंथापूर्वींपासून *'सनातन वैदिक धर्म'* नांवाचा महापरमेश्वराच्या अनेक विभूति मानून त्या सर्वांत एकच परमात्मा मानणारा *अद्वैतवादी धर्म*—एकांत अनतत्व व अनतांत एकत्व पाहाणारा, मानणारा व आचरणारा धर्म—चालू होता. त्याचे अंतिम ध्येय 'कृण्वंतु विश्वमार्यम्' असें होतें व आहे, तरी त्याचे व्यवहार 'आक्रामक' स्वरूपाचे मुळींच नव्हते व नाहींत. एवढेंच नव्हे तर धार्मिक बाबतीत प्रत्येक व्यक्तीला आचार, विचार व उच्चार ह्यांत पूर्ण स्वातंत्र्य होतें व आहे, याचा अर्थ धर्म-बाबतींत आम्ही भारतीय संपूर्ण लोकशाही वृत्तीचे (Democratic) होतो व आहों असें सिद्ध होतें. इतर एकेश्वरी धर्मीयांप्रमाणें अरेरावी वृत्तीचे Autocratic नाहीं.

यामुळें इस्लामी धार्मिक आक्रामक वृत्तीशीं झगडतांना—प्रारंभीं त्यांच्या हिंसात्मक प्रचाराशीं झगडतांना—दु:खें भोगावीं लागलीं तरी अखेरीस त्यानें इस्लामी प्रवृत्ति जिरवून पचवून टाकिली व पुन: वर भारतीयत्व शिल्लक ठेविलेंच! भारतीय सनातन वैदिकधर्म *जागतिक धर्म* होण्याला

१. गेल्या पन्नास वर्षांत इराणात "बाह-ओ-अल्ला" हा व्यापक—स्वरूपाचा एकेश्वरी पंथ उत्पन्न होऊन त्याचा प्रसार त्या भागांत थोडाफार झाला. तसा भारतांतही अल्पप्रमाणात झाला आहे. त्याचा मूळ प्रेषित प्रचारक 'बाह-ओ-उद्दिन—हा आहे. ते सत्पंथीय लोक आक्रमक व हिंसात्मक नाहींत. ह्या पंथाला "बहाइण" पंथ म्हणतात! (गो. प्र. भा.)

योग्य असा आहे. पण 'कृण्वन्तु विश्वमार्यम्' हें धोरण आक्रमक स्वरूपाचें नसल्यानें तें प्रसारक-प्रचारक होत नाहीं! त्यांतही दुःखाची गोष्ट ही कीं, आमची धार्मिकवृत्ति आत्मसंरक्षकही राहिली नाहीं! यामुळें आमचें संख्याबल कमी होत चाललें!!

○ ○

पूर्वार्ध–उपसंहार

प्रस्तुत कालीं 'राजा कालस्य कारणं' यामुळें अगर जीवनार्थ कलह उग्रतम झाल्यामुळें त्रैवर्णिकांपैकीं क्षत्रिय व वैश्य (मारवाडी वैश्य खेरीज करून) या वर्णांतील पुरुषांच्या ठायीं संस्कारलोपच झाला आहे. ब्राह्मण-वर्गांत निदान अजूनही लाजेकाजेस्तव विश्वास नसतांनाही व्रतबंध, विवाह व अंत्येष्टि हे संस्कार वैदिक विधीनें होत आहेत. व्रतबंध झाल्यानंतर यज्ञोपवीत गळ्यांत असावें लागतें व वर्षांतून 'श्रावणी' म्हणजे यज्ञोपवीत संस्कार तरी करावा लागतो. तोही संस्कार नकोसा झालेला आहे. त्या श्रावणींत 'उत्सृष्टा वै वेदाः' असें वाक्य येतें व नंतर सहा महिन्यांनीं अनध्याय संपल्यावर पुन्हां वेदपठण सुरू करावें असें विधान आहे. परंतु व्रतबंधाचे दिवशीं गायत्रीमंत्राचा उपदेश झाल्याबरोबर दुसऱ्या दिवसापासून गायत्री मंत्र, संध्या व उपनीत बटु यांची ताटातूट होते! गायत्रीमंत्र तर बरोबर म्हणतां येत नसतोच. परंतु गोत्र, प्रवर, शाखा व वेद यांचीही ओळख राहत नाहीं. अशा प्रकारची ब्राह्मणवर्णीय प्रजा आज दिसून येत आहे.

अशा वेळीं संध्या व गायत्रीजप करण्याची इच्छा असणारे थोडेच ब्राह्मण सांपडतील. अशा धार्मिक लोकांत आचारशास्त्राची माहिती नसल्यानें समुद्रयान, अग्निरथयान अथवा आशुयानरथ (मोटर), वायुयान (विमान) यांच्या साधनानें प्रवास करण्याचे प्रसंग वारंवार येत असतात, व संध्यादि कर्मांकरितां जलाभाव असल्यानें गायत्रीजप किंवा संध्यावंदन या क्रिया

तितक्या प्रवासाच्या काळात लोप पावतात. अशा वेळीं संध्याकाल प्राप्त झाला तर संध्यावंदन कसें करावें व गायत्रीजप कमी करावा ही माहिती भाविकास व्हावयास पाहिजे. काळ अनुकूल असून शारीरिक व मानसिक स्वास्थ्य असूनही आळसानें किंवा पाश्चिमात्य शिक्षणानें हिरण्यकशिपूचे अवतार म्हणजे ईश्वरास्तिक्याच्याबद्दल साशंक असलेल्याकरितां हा प्रयत्न नाहींच नाहीं.

असो. पाराशर स्मृतीमध्यें (कलौ पाराशर स्मृत) 'जलाभावे दक्षिण कर्णं स्पृश्येत्' असें वाक्य आहे. म्हणजे प्रवासांत संध्यावंदनाकरितां जलाभाव असल्यास दक्षिण कर्णाला स्पर्श करून तेथून जल आलें अशी भावना करून खालील श्लोक म्हणावे--

नमः शिवायै गंगायै शिवाय च नमोनमः ।
नमस्त्रिपथगामिन्यै त्रिदवमूर्त्यै नमोनमः ॥
इडा भगवती गंगा पिंगला यमुना नदी ।
तयोर्मध्यगता नाडी सुषुम्णाख्या सरस्वती ॥
ज्ञानहृदये ध्यानजले रागद्वेष मलापहे ।
यः स्नाति मानसे तीर्थे सः याति परमां गतिम् ॥

वरील श्लोक अर्थ समजून म्हटले म्हणजे स्नान झालें असें होतें. यानंतर सर्व संध्या, अर्घ्यप्रदान, जप, सूर्योपस्थान हीं सर्व कर्मे मानसिक करावीं. त्यामुळें स्पर्शादिक जलाभावादिक सर्व दोष नष्ट पावतात, व अशा प्रकारें कर्म करणाऱ्याचें सर्व कर्म सुव्यवस्थित शास्त्रासारखें वाटतें.

उपासनं स्नानसंध्या पूजापारायणादिकं ।
तेषु मुख्यतमस्त्वेष जप (गायत्रीजप) एवं न संशयः ॥
देहे प्राणो यथा मुख्यः तस्योपास्त्या ययं स्मृताः ।
साधकः सर्वदा तेन जपं कुर्यात् समाहितः ॥
अत आपत्सु जपतः एवं सर्वं कृतं भवेत् ।
आपत्स्वथ रोगेषु पथि कार्यान्तरेषु च ॥

यथाशक्ति जपं कुर्यात् तेन दोषो न विद्यते ।
कर्मलोपस्य दोषो न स्यादापत्तिमुखेषु ते ॥—श्रीभास्करराय

शेवटी जगन्नियंत्री आदिशक्ति वेदमाता गायत्री देवी इजला प्रार्थना कीं मागील चार ओळी वाचून वाचकांच्या मनांत धर्मश्रद्धा व आचार-तत्परता उत्पन्न व्हावी. भारतवर्षीयांची धार्मिक व राजकीय उन्नति व्हावी. व ती उन्नति होण्याकरितां आर्यपुत्र व आर्यकन्या यांच्या ठायीं पूर्वजांच्या सद्गुणांचें अनुकरण करण्याची प्रेरणा व्हावी, परंपरया आर्यसंस्कृति दृढमूल व्हावी व अंतीं ते तव पदरजीं मिलिंदायमान होऊन मोक्ष सुखानुभवी व्हावे हें वरदान द्यावें.

'सहनाववतु सह नो भुनक्तु सहवीर्यं करवावहै.'

समाप्त

० ०

मंत्र शास्त्र

उत्तरार्ध

(अनुभूत व अनुभाव्य
मंत्र-यंत्र-तंत्र प्रयोग संग्रह)

अनुक्रम

१ अनुभूत व अनुभाव्य वेदमंत्र

सदरहू प्रकरणात मुख्यत ऋग्वेद व अथर्वणवेद यातील अनुभाव्य मंत्र व त्यांचा उपयोग हे दर्शविले आहेत मंत्रशास्त्रपूर्वार्धांतही या दोन्ही वेदांतील काहीं अनुभूत मंत्र, त्यांचे विधि व विनियोग हे दिलेले असल्यानें ते येथें घेतलेले नाहींत यजुर्वेदातील काहीं मंत्र पूर्वार्धांत घेतलेले आहेत मंत्रशास्त्राच्या पूर्वीच्या एका आवृत्तींत यजुर्वेद व सामवेद यातील काहीं अनुभाव्य मंत्र दिलेले होते, पण त्यांतील स्वराची शुद्धाशुद्धता (अर्थात छापील प्रतींत) ठीक न वाटल्यामुळें, तसेंच त्यांच्या विनियोगाचा नीटसा उलगडा न झाल्यामुळें खुद्द ग्रंथकार श्री योगेश्वरानंद यांनीं ते मंत्र वगळले तरी हरकत नाहीं असें सांगितलें होतें सबब ते या प्रकरणात दिले नाहींत

पूर्वार्धांत मंत्र व उपासना या प्रकरणात मंत्र सिद्ध होऊन या करून त्याचा अनुभव येण्यासाठीं 'पुरश्चरणविधान' म्हणून माहिती दिलेली आहे ती वेदोक्त मंत्रासाठींच नसून इतर आगमोक्त या तंत्रशास्त्रातील मंत्रानाही थोड्याफार भेदानें लागू आहे देवदेवताच्या मंत्रानाही तें विधिविधान जरूर आहे देवीपुराण, देवी भागवत, अग्निपुराण इत्यादि ग्रंथात अनेक प्रकारचे मंत्र व त्यांची साधना सांगितलेली आहे तीच क्रिया वा पद्धति 'सप्तशती व श्रीसूक्त' इत्यादि ग्रंथातील मंत्राना-(ते सिद्ध होण्यासाठींहि) अवश्य व उपयोगी आहे तथापि सप्तशती व श्रीसूक्त (श्री विद्येसंबधाचें सूक्त) यातील मंत्राच्या उपयोगासाठीं हेतुभिन्न साधनानें

निरनिराळें विधिविधान सांगितलेलें आहे. तें पुढें त्या त्या प्रकरणांत दिलेले आहे.

(गो. प्र. भा.)

१ ऋग्वेदीय – अनुभाव्य मंत्र

पूर्वार्धामध्ये वेदमंत्र व त्याचे विनियोग ही माहिती दिली. त्याचप्रमाणे आणखी कांहीं अनुभाव्य मंत्र व त्याचा उपयोग ह्या गोष्टी येथें दिल्या आहेत

१ परान्नदोषनाश व अन्नवृद्धि

पितुं नु स्तोषं महो धर्माणं तविषीम् ।
यस्य त्रितो व्योजसा वृत्रं विपर्वमर्दयत् ॥

२ – ६ सुक्तें – ऋषि – अगस्त्य
२ – ६ सूक्ते
अन्नस्तुति – १ अनुष्टुप् – २ – ४ – ८ – १०

छंद — गायत्री

हीं सूक्तें ११ ऋचांचीं आहेत. त्यामुळे परान्नदोष नाहींसा तर होतोच पण उलट अन्नवृद्धि पण होते.

२ रोग व मृत्युपरिहार व वाक्सिद्ध

४ – ३ – १ सूक्त
प्रयुंजती – प्रतिरथ – विश्वेदेव – त्रिष्टुभ्
हें सूक्त सात ऋचांचें आहे –

करवीर पुष्पांनी एक हजार गायत्रीमंत्रांनी होम केला तर रोगाचा परिहार होतो व प्रत्यक्ष मृत्यु परत फिरतो.

३ ऋणनाश

१ – २ – १३ कस्येति मंत्र

शुनःश्येप प्रजापति – त्रिष्टुभ्

हा मंत्र ५ ऋचांचा आहे. तीन हजार होम – *ऋणनाश*

४ देवतावश

१ – १ – ३ वायवायादि सूक्त

मधुच्छंद – वायु – गायत्री

हें नऊ ऋचांचें सूक्त आहे. दररोज एक वेळ म्हटल्यास देवता वश होतात.

५ आयुष्यवृद्धि

५ – ६ – २५ त्रिर्देव मंत्र – वसिष्ठ – विष्णु – त्रिष्टुभ्

त्रिर्देवः पृथिवीमेष एतां वि चक्रमे शतर्चसं महित्वा।
प्र विष्णुरस्तु तवसस्तवीयान्त्वेषं ह्यस्य स्थविरस्य नाम ॥

विष्णुसन्निध म्हटल्यास आयुष्य वृद्धि होते; नुसतें म्हटल्यास डोकें दुखणें थांबतें.

६ सुखी जीवन

४ – ४ – २ वरुनो सूक्त

वरुणं वो रिशादसमृचा मित्रं हवामहे।
परि व्रजेव बाह्वोर्जगन्वांसा स्वर्णरम् ॥

आठ ऋचा आहेत. पहिला मंत्र.

आवळीचे मुळाशीं बसून दहा हजार वेळां जपावें. सर्व प्रकारच्या तापाचा उपशम होऊन सर्व रोग परिहार होऊन मनुष्य जगांत सुखी नांदतो.

७ पापमुक्ति

२–७–१६ आतपितर्अपेतसूक्त – गृत्समद – रुद्रत्रिष्टुभ्

आ ते पितर्मरुतां सुम्नमेतु मा नः सूर्यस्य संदृशो युयोथाः।
अभि नो वीरो अर्वति क्षमेत प्र जायेमहि रुद्र प्रजाभिः॥

पाच ऋचा आहेत. पहिला मत्र शिवालयात एक लक्ष वेळा जपावा. महानिपाचा परिहार होऊन सर्व पापापासून मुक्त होतो.

८ मातृभावोत्पत्ति

८–८–२४ प्रसूनवा – सूक्तम् – सूनुऋभु – अग्नि – गायत्रि अनुष्टुप्

प्र सूनव ऋभूणां बृहन्नवन्त वृजना।
क्षामा ये विश्वधायसोऽश्नन्धेनुं न मातरम्॥

चार ऋचा, पहिला मत्र. हा मत्र शिवालयात तीस हजार जपला असता सर्व स्त्रियांचे ठायीं मातृभाव राहील, अन्यबुद्धि उद्भवणार नाहीं.

९ कुस्वप्न सुस्वप्न

२–७–१० यो मे राजन् मत्र — गृत्समद-वरुण त्रिष्टुभ्

यो मे राजन् युज्यो वा सखा वा स्वप्ने भयं भीरवे मह्यमाह।
स्तेनो वा यो दिप्सति नो वृको वा त्वं तस्माद्वरुण पाह्यस्मान्॥

हा मत्र पाच ऋचाचा आहे त्यातील शेवटची ऋचा.

ह्या मत्राचा एक हजार आठ जप केला असता वाईट स्वप्न पडलें तर तें सुस्वप्न होतें.

१० भगंदर रोग परिहार

६–२–९ ईळिष्वाहि – मत्र – निश्वनमस् – अग्नि – उष्णिक्

विष्णुमदिरात तीस हजार जप करावा, भगदर रोग बरा होतो, पाण्यात उभें राहून जपावें.

११ निर्वैरता

८–८–३७ उत्तिष्ठ – मत्र – शिवि – प्रतर्दन – इंद्र – त्रिष्टुभ्

उत्तिष्ठताव पश्यतेन्द्रस्य भागमृत्वियम्।
यदि श्रातो जुहोतन यद्यश्रातो ममत्तन ॥

तीन ऋचा आहेत. पहिला मंत्र बोरीचे झाडाखाली तीस हजार जप केल्यास कार्य नष्ट होणार नाहीं व वैरीही होणार नाहीं.

अर्श (मूळव्याध रक्ति), रोगाघर मंत्र. (अनुभवसिद्ध)

मंत्रस्थल....तैत्तिरीय संहिता अष्टक ४ पाद (अध्याय २) अनुवाक ५ त्यात पन्नाशी १–२

मंत्र—'ॐ समितꣳ संकल्पेथाꣳ संप्रियो रोचिष्णू सुमनस्यमानौ।
इषमूर्जमभिसंवसानौ संवां मनाꣳसि संव्रतासमुचित्तान्याकरं ॥
अग्नेपुरीष्याधिपाभवात्वंनः ॥ इषमूर्जं यजमानाय धेहि ॥
पुरीष्यस्त्वमग्नेरयि ॥ मान्पुष्टिमाꣳ असि।
शिवाः कृत्वा दिशः सर्वाः स्वां योनिमिहासदः ॥
भवतनः समनसौ समोकसौ ॥ १ ॥
अरेपसौ। मायज्ञꣳ हिꣳ सिष्टं मायज्ञपतिं जातवेदसौ
शिवौ भवतमद्यनः ॥
मातेव पुत्रं पृथिवी पुरीष्यमग्निꣳ स्वेयोनावभारुखा ॥
तां विश्वेर्देवैर्ऋतुभिः संविदानः प्रजापतिर्विश्वकर्मा विमुंचतु ॥
यदस्य पारे रजसः शुक्रं ज्योतिरजायत। तेन पर्षदति द्विषोऽग्ने
वैश्वानरः स्वाहा ॥''

नमः सुते निर्ऋते विश्वरूपे ॥ २ ॥

२ अथर्वण वेदांतील मंत्र

विद्मा शरस्य पितरं पर्जन्यं भूरिधायसम्।
विद्मोष्वस्य मातरं पृथिवीम् भूरिवर्पसम्।
विषितं ते वस्ति बिलं समुद्रस्योदधेरिव।
एवा ते मूत्रं मुच्यतां बहिर्बालिति सर्वकम्।

अम्बयौ यन्त्यध्वभिर्जामयो अध्वरीयताम् ।
मुञ्चतीर्मधुना पयः । अप्स्वंतर मृते-मप्सु भेषजम् ।
अपामुत प्रशस्तिभिरश्वा भवथ वाजिनो गावो भवथ वाजिनीः ।
अस्मिन् वसुवसवो धारयत् त्विंद्रः पूषा वरुणो मित्रो अग्निः ।
इमामादित्या उत विश्वे च देवा उत्तरस्मिन् ज्योतिषि धारयन्तु ।
अयं देवानामसुरो विराजति वशा हि सत्या वरुणस्य राज्ञा ।
ततस्पदिव्रणा शासदान उग्रस्य मन्यो रुदिमं नयामि ।
अमूर्या यान्ति योषितो हिरा लोहितवाससः ।
अभ्रात इव जमयस्तिवतु हुतवर्चसः ।
सुकेपुते हरिमाणं रोपणाका सुदध्मसि ।
अथो हारिद्रवेपुसे हरिमाणं–निदेध्मसि ।
नक्तं जाता स्योषधे रामे कृष्णे असिक्निच ।
इदं रजनि रजय किलासं पलिसंचयत् ।
किलासं च पलितं च निरितो नाशया पृषत् ।
आत्वा स्वो विशतां वर्णः पराशुक्लानि पातय ।
नमः शीताय तक्मने नमोरूराय शोचिषे कृणोमि ।
यो अन्येद्युरुभयद्युरभ्येति तृतीयकाय नमोऽस्तु तक्मने ।
असितं ते प्रलयनमास्थानमसितं तव ।
असिक्न्यास्यो निरितो नाशया पृषत् ।
यदग्निरापो अदहत् प्रविश्य यत्राकृण्वेन् धर्मधृतो नमांसि ।
तत्र त आहुः परमं जनित्र सनः संविद्वान् परिवृङ्ग्धि तक्मन् ।
वेनस्तत् पश्यत परमं गुहा यद् यत्र विश्वं भवत्येकरूपम् ।
इदं पृश्निरदु हाज्जायेमानाः स्वर्विदो अभ्य नूष ते व्र ।
अग्निर्नः शत्रून्प्रत्येतु विद्वान् प्रेति-दहन्नभिशस्ति ।
ससेनां मोहयतु परेषा निर्हस्तांश्च कृणवज्जातवेदाः ।
इंद्रसेनां मोहयतु मरुतो घ्नन्त्वोजसा ।
चक्षूंष्यग्निरा दत्तं पुनरेतु पराजिता ।
मुञ्चामि त्वा हविषा जीवनाय कमज्ञातयक्ष्मादुतराजयक्ष्मात् ।
ग्राहिर्जग्राहयद्येतदेनं तस्या इन्द्राग्नी प्रमुमुक्तमेनम् ।

यदिक्षितायुर्यदि वा परेतो यदि मृत्योरन्तिकं नीत एव।
तमा हरामि निर्ऋते रूपस्थादस्पार्शमेनं शतशारदाय।
योगिरिष्वि जायथा वीरूधां बलवत्तमः।
कुष्ठे हितक्मन्तशन तक्मानं नाशयन्नितः
शीर्षामयमुपहत्या भक्ष्योस्तन्वो उरपः।
कुष्ठस्तत् सर्वं निष्करद्दैवं समहवृष्ण्यम्।
ददिर्हि मह्यं वरुणो दिवककविर्वचोभिरूग्रैर्निरिणामि ते विषम्।
खातमखातमुत सक्तमग्र भमिरेव धन्वन्ति जजास ते विषम्।
यत् ते अपोदकं विषं तन् तो एलस्तग्रभम्।
गृण्हामि ते मध्यममुत्तमंसेरसे-मुतावमं भियसो नेशादा हुते।
वृषामेरयो नमस्या न तन्य तुरुग्रेण ते वचसा बाध।
अहं तमस्य नृभिरग्रभं रसं तमेस इव ज्योतिरुदेतु सूर्यः।
अपेचितः प्रपतत सुपर्णो वसु-ते-रिव।
सूर्यः कुणोतु भेषजं चंद्रमावोपोच्छतुः।
एन्येका श्येन्येका कृष्णैका रोहिणी द्वे।
सर्वासामग्रभं नामावीरघ्नीरपेतन।
या बभ्रवो याश्च शुक्रा रोहिणीरुतपृश्नयः।
असिक्नीःकृष्णा ओषधी सर्वा अच्छावदामसि।
इंद्रस्य प्रथमो रथो देवानामपरो रथो वराणस्य तृतीयः इत्।
अनामपमा रथ स्थाणुमारदथार्षत्।
अयं मे हस्तो भगवानयं मे भगवत्तरः।
अयं मे विश्वभेषजोयं शिवाभिमर्शनः।
हस्ताभ्यां दश शाखाभ्यां जिन्हा वाचः पुरोगवी।
अनमयत्नुभ्यां हस्ताभ्यां ताभ्यां त्वाभिमृशामसि। अ ३।१२
ब्रह्मजज्ञानं प्रथमं पुरस्ताद् विसीमतः सुरूचो वेनआवः।
सबुध्न्या उपमा अस्य विष्ठा समश्च योमतश्च विवः॥
जांगिडोसि जंगिडो रक्षितासि जंगिडः।
द्विपाच्चतुष्पादस्माकं सर्वं रक्षतु जांगिडः।

यजुर्वेद मंत्र

चक्षुष्पा अग्नेसि चक्षुर्मे पाहि ध्रुवासि यं परिधिं पर्यधत्था
(संहिता प्रथमाष्टक अध्याय १ अनुवाक् १३)

त्र्यंबकं यजामहे सुगंधिं पुष्टिवर्धनं उर्वारूकमिव बंधनात्
(संहिता अष्टक १ अध्याय ८ अनुवाक् ६)

विष्णोरराटमसि विष्णोःपृष्ठमसि विष्णोःश्नप्त्रेस्थो विष्णोःस्यूरसि
(संहिता अष्टक १ अध्याय २ अनुवाक् १३)

मधुवाता ऋतायते मधु क्षरंति सिंधवः माध्वीर्नः संत्वोषधीः
(संहिता अष्टक ४ अध्याय २ अनुवाक् ९)

स्वस्तिन इंद्रो वृद्धश्रवाः स्वस्तिनः पूषा विश्ववेदाः
(नारायण उपनिषद)

अन्नपतेन्नस्य नो देहि अनमीवस्य शुष्मिणः
(संहिता अष्टक ४ अध्याय २ अनुवाक् ३)

ह्ँसः शुचिपद्वसुरंतरिक्षे सद्धोता वे
(त्रिसुपर्ण अथवा नारायण उपनिषद)

कांडात्कांडात्प्ररोहंति पुरुषः परुषः परि एवा नः
(संहिता अष्टक ४ अध्याय २ अनुवाक् ९)

अपां गर्भव्यदधात् पुरुत्रा चक्षुषःपितामनसाहि धीरो घृतमेने
(संहिता अष्टक ४ अध्याय ६ अनुवाक् २)

धन्वनागाधन्वनाजिं जयेम धन्वना तीव्राःसमदो जयेमा
(संहिता अष्टक ४ अध्याय ६ अनुवाक् ६)

यमेन दत्तं त्रितएनमायुनगिंद्र प्रथमो अध्यतिष्ठत्
(संहिता अष्टक ४ अध्याय ६ अनुवाक् ७)

गणनानां त्वा गणपतिं हवामहे कविं कवीनां
(संहिता अष्टक २ अध्याय ३ अनुवाक् १४)

केतुं कृण्वन्नकेतवे पेशोमर्या अपशसे समुषद्भिरजायत
(संहिता अष्टक ७ अध्याय ४ अनुवाक् २०)

आशुः शिशानो वृषभोत युध्मो घनाघनः क्षोभणश्चर्षणीनां
(संहिता अष्टक ४ अध्याय ७ अनुवाक् ४)

इमं जीवेभ्यः परिधिं दधामि। मानोनुगादपरो अर्थमेतं।
(अरण्यक परेयुवा)

अन्य वैदिक मंत्रप्रयोगाः

पल्लवोत्स्यागमे मंत्रे वैदिके नास्ति पल्लवः (बृ. ज्यो. धर्मस्कंध ६६)

१ अपमृत्युनिवारणे	पाठस्य आदावन्ते त्र्यंबकं यजामहे शतं जपः। संपुटित पाठेन शीघ्र फलप्राप्तिः।
२ ऋणमोचनार्थे	अनृणा अस्मिन्ननृणाः परस्मिन् तृतीये लोके अनृणाः स्याम। ये देवयानाः पितृयानाश्च लोकाः सर्वान् पथो अनृणा अक्षियेम। प्रत्येक अध्याय संपुटितः पाठः
३ कामनासिद्ध्यर्थे	पुनस्त्वादित्या इत्यादि सत्याः संतु यजमानस्य कामाः इत्यन्तं प्रत्येकाध्यायस्य संपुटितः पाठः
४ ग्रहबाधानिवारणार्थे	नमः कुप्याय च इत्यादि संपुटितः पाठः
५ राजयक्ष्मा रोगनिवारणार्थे	नमः सोमाय च इत्यादि संपुटितः पाठः
६ बालग्रहबाधा-निवारणार्थे	नमः जघन्याय च इत्यादि संपुटितः पाठः
७ व्रणादिपीडानिवारणार्थे	नमः सहमानाय निव्याधिन इत्यादि संपुटितः पाठः

८ अयाचित धनलाभार्थं	इमॉ॒ तपसे रुद्राय इत्यादि
९ सुखप्रसव हेतवे	याते रुद्र शिवा तनू
१० धनप्राप्ति हेत्वर्थे	नमोऽस्तु नीलग्रीवाय
११ शत्रुभयनाशार्थे	प्रमुंच धन्वनस्त्वमुभयो
१२ स्वजनाकर्षणे	मृडा नो रुद्रो तनो
१३ पातकादि मोचने	मानस्तोके
१४ शीतलाभयनिवारणार्थे	मा नो महान्तमुत मा नो
१५ वाक्सिद्ध्यर्थे	अग्नाविष्णू सजोपसे
१६ अक्षिरोगनिवारणार्थे	वाजश्च मे प्रसवश्च मे संपुटित पाठ
१७ व्याघ्रचोरभयनिवारणार्थे	आरात् ते गोघ्न उत पुरुषघ्ने
१८ राजभयनिवारणार्थे	निकिरिदविलोहित
१९ अक्षयवाससां प्राप्तये	द्रापे अंधसस्पते

संपुटित जपावे

काहीं वेदोक्त परतु तान्त्रिक पद्धतीचे मत्र बीजें लावून संपुटित करून खालीं दिल्याप्रमाणें उपयोगात आणितात.

अपमृत्यू निवारणे तथा आरोग्यार्थे 'ॐ जू सः' इति बीजैः प्रत्येक मंत्र संपुटितजपम्

२ कामनासिद्ध्यर्थे—'क्लीं'	,,	,,
३ विद्याप्राप्तौ —'ऐं'	,,	,,
४ धनप्राप्तौ —'श्रीं'	,,	,,
५ विवादे जयार्थे 'ह्रीं'	,,	,,
६ स्वष्टदेवताप्रीत्यर्थं —'स्वेष्टबीजं'		,,


२ बगलामुखी-बलातिबला-शाबर-कापालिकादि मंत्र

बगलामुखी मंत्र


१. *श्रीबगलामुखी मंत्र* – ‘नारदऋषि, उष्णिक्छंद, श्रीबगला देवता, ॐ ह्लरीं बगलामुखी सर्व दुष्टानां वाच मुख पद स्तंभय जिव्हा कीलय बुद्धिं विनाशय ॐ ह्लरीं स्वाहा’ ह्याच मंत्राच्या भागांनीं न्यास करावे ध्यान ‘जिव्हाग्रमादाय करेण देवीं वामेन शत्रु परिपीडयन्ति। कराल कालानलवत् त्रिनेत्रा भजेहमम्बा शरणार्तिहन्त्री’ जप २१०००० (२ लक्ष १० ह) ह्या मंत्राचा असा अनुभव चाळीस वर्षांपूर्वी आलेला आहे कीं, एका मोठ्या संस्थानिकाची वार्षिक दक्षिणा वंशपरंपरा येथील ब्राह्मणास राजाचें अभीष्टचिंतनाकरिता ठरलेली होती सदरहू संस्थानाच्या नवीन मालकानें ती कमी केली तेव्हा सदरहू ब्राह्मणानें ह्या मंत्राचा जप केला त्यामुळें त्या नव्या संस्थानिकाला स्वप्न पडलें कीं, आपली जीभ कोणी ओढीत आहे याचा परिणाम असा झाला कीं, तो संस्थानिक अगदीं घाबरून गेला पुढें दरबारातील दानाध्यक्षास विचारतां त्यानें सांगितलें कीं, ज्याच्या दक्षिणा कमी केल्या, त्यापैकीं कोणीतरी अनुष्ठान करीत आहे पुढें शोध करितां अनुष्ठानकर्त्या ब्राह्मणाकडे त्याची पूर्वीची दक्षिणा कायम केली व सरकारची रात्रींचीं स्वप्नें बंद पडलीं! अलीकडे ह्या मंत्राचा असा अनुभव आला आहे कीं, हायकोर्टांत एका

इसमाचा खटला चालू होता. त्यामध्यें विरुद्ध बाजूला यश मिळणार याबद्दल लोकांस खात्री वाटली. तो खटला आपल्या उलट होणार अशी खात्री वकिलांनीं दिल्यानंतर ह्या मंत्राचा जप सुरू करण्यांत आला. निकालाच्या तारखेला उलट बाजूच्या मंडळींनीं पान-सुपारी, सत्यनारायण वगैरे करण्याची तयारी केली. संध्याकाळीं सहा वाजतां तार आली कीं जप करवित्या वादीच्या बाजूचा निकाल झाला !

बगलामुखी पूजन यंत्र



बगलामुखी[1] स्तंभन यंत्र



---

१. या देवीची उपासना श्रीभगवतीची प्रसन्नता प्राप्त करण्यासाठीं नसून कोणाच्याहि अनहितासाठीं उपयोगी पडते. तसेंच केवळ सात्त्विक परमार्थप्राप्तीसाठीं ह्या देवतेची उपासना उपयोगी नाहीं. पण स्वतःच्या व्यावहारिक ध्येयपूर्तीसाठीं ह्या उपासनेचा उपयोग होतो. पण ह्यामध्यें क्लिष्ट मंत्र तंत्रयुक्त असल्यानें त्यांत थोडीही चूक झाल्यास विपरीत फल मिळतें, असें हिचे एक श्रेष्ठ उपासक श्री. यज्ञदत्त शर्मा, वानप्रस्थी वैद्य हे आवर्जून सांगतात. 'कल्याण' मासिकाच्या १९६७–६८च्या अंकात सविस्तर माहिती आलेली आहे. बनारस येथील "चौखांबा प्रकाशन" संस्थेंत या उपासनेबद्दल पुस्तकेंही आहेत. (गो. प्र. भा.)

२. या मंत्राचा जपप्रकार असा आहे. बगलामुखीच्या यंत्राची षोडशोपचार पूजा करून जप करावा. त्यामुळें मंत्र लवकर सिद्धिप्रद होतो. म्हणून श्रीबगलामुखी पूजायंत्राची आकृति दिली आहे. वाचा बंद करणें, बुद्धि नष्ट करणे, हस्तपादादिकांच्या क्रिया बंद करणे असा इष्ट संकल्प असेल तर दुसरें यंत्र दिलें आहे. पूजायंत्रावर पूजा झाल्यावर व जप ८४०००० (८ लक्ष ४० ह) पूर्ण झाल्यानंतर जेंव्हा जेंव्हा अभीष्ट कामनेकरिता जप करावयाचा असेल तेंव्हा उपयोगांत आणण्याकरिता म्हणजे पूजा करून जप करण्याकरिता स्थंभनयंत्रही सोबत दिलें आहे.

श्वेतपालाश काष्टाच्या पादुका श्वेतपालाशपत्राच्या रसांत एकवीस दिवस बुडवून ठेवाव्या व त्यावर तांबड्या रंगानें रंगवून त्यावर बगलामुखी मंत्राचा एक लक्ष जप केला तर त्या पादुका पायांत घातल्यानें अतिवेगानें जातां येतें.

विविध कामांकरितां बगलामुखी[१] मंत्र–अनुष्ठान

श्रीगणेशाय नमः । अद्य पूर्वोच्चारित–एवं गुणविशेषण विशिष्टायां शुभ पुण्य तिथौ । मम आत्मन । श्रुतिस्मृति पुराणोक्त फलप्राप्त्यर्थं । बगलामुखी

---

१. दशमहाविद्यामध्यें भगवतीचीं त्रिपुरभैरवी, धूमावती, बगलामुखी, मातङ्गी व कमला हीं पंचविधरूपें प्रसिद्ध आहेत. बगलामुखी उपासनेमध्यें सांख्यायन तंत्राप्रमाणें वडवामुखी, उल्कामुखी, ज्वालामुखी, जातवेदोमुखी, बृहद्भानुमुखी इत्यादिकांची साधना करून व प्रत्येकाचे चतुराक्षरी, शताक्षरी मंत्र व बगलास्त्र इत्यादि साधना मार्गही आहेत. पण ही सर्व साधना मोक्षफलदायी नसून व्यवहारिक विशिष्ट ध्येयें (जसें शत्रुनाश, दुर्जननाश वा पारिपत्य राजादि वशीकरण, लक्ष्मीप्राप्ति इत्यादि) साध्य करण्यासाठीं आहेत. हैदराबादचे निजाम ह्यांच्या राजवाड्यांत याच बगलामुखीची नित्य साधना व उपासना (केवळ राजहितार्थ) करणारें एक ब्राह्मण कुटुंब परंपरेनें पोषिलेलें होतें अशी किंवदंति होती। ही उपासनापद्धति व राज्यतंत्र यामुळे निजाम

अनुष्ठानमहं करिष्ये । अस्य श्री बगलामुखी स्तोत्रमंत्रस्य नारद ऋषिः । उष्णिक् छंदः । बगलामुखी देवता । ह्लीं बीजं । स्वाहा शक्तिः । क्लीं कीलकम् । मम विरोधी सकल प्रतिवादी वाग् मुख स्तंभन कारिणी जनसंमोहनादि विविध कामना सिद्ध्यर्थे जपे विनियोगः ।

नारदऋषये नमः शिरसि । उष्णिक् छंदसे नमः मुखे । ह्लीं बीजाय नमः हृदये । स्वाहा शक्तये नमः पादयोः । क्लीं कीलकाय नमः सर्वांगे । ह्लीं अंगुष्ठाभ्यां नमः । बगला मुखीं तर्ज० नमः । सर्व दुष्टाना वाचमुखम् पदं स्तंभय स्तंभय मध्य० नमः । जिव्हां कीलय कीलय अनामि० नमः । बुद्धिं नाशय नाशय कनि० नमः । ह्लीं ॐ करतलकरपृष्ठाभ्या नमः । एवं हृदयादि ।

ध्यानम्:—पीतांबरां त्रिनेत्रांच द्विभुजां दाहकोज्वलाम् । शिला पर्वत हस्तां च रिपु जिव्हांच बिभ्रतीम् ॥ एवं ध्यात्वा लं पृथिव्यादि मानसोपचारैः संपूज्य ॐ भूर्भुव स्वरोम् इति दिग्बंधः ।

मानसपूजा करून हातात पाणी घेऊन आसनाभोंवतीं टाकणें व नंतर जपास बसणें. मंत्रः—

अति धनवान होता असे म्हटल्यास गैर नाहीं.

गुरुचरित्रांतील रजक व त्याचा त्याच्या इच्छापूर्तीसाठीं नृसिंहसरस्वतींच्या आशीर्वादाप्रमाणें झालेला म्लेंच्छकुलीं जन्म, ह्या ऐतिहासिक घटनेचा संबंध ह्याच हैदराबादी निजामाच्या घराण्याशीं होता असें श्रीकामतकृत शुद्धीकृत पोथींतील पुरस्कारादि लिखाणावरून दिसतें.

दशमहाविद्यांतील 'बगला' देवी द्विहस्ताच गदा व खड्गधारी असुरमर्दिनी स्वरूपी आहे. धूमावती वृद्धा शुभ्र परिधानी निरायुधा आहे, पण मातङ्गी, त्रिपुरभैरवी व कमला ह्या चतुर्भुजा, निरायुधा, रक्तवर्णा, सात्विकरूपा अशा ध्यानाच्या वर्णिलेल्या आहेत. (गो. म. मा.)

ॐ ऱ्हीं (ह्लीं) बगलामुखी सर्व दुष्टानाम् वाचं मुखं पदम् स्तंभय स्तंभय जिव्हां कीलय कीलय बुद्धि नाशय नाशय ऱ्हीं ह्लीं ॐ ।

वरील अनुष्ठानाच्या पूर्वी सव्वा लक्ष गायत्रीमंत्राचा जप करून नंतर अनुष्ठानास सुरवात करावी.

पिवळा केशरी कंद, पिवळी कण्हेर, मोसमात पिवळा चाफा, पिवळी गोमुखी, पिवळ्या दोऱ्यात ओवलेली रुद्राक्षमाला, पिवळी खडीसाखर, केशरी दूध, केशरी बर्फी, (सोय असल्यास केशरी भात) तेल आणि तूप याचे निरनिराळे दिवे जप होईपर्यंत ठेवणे. पिवळे आसनावर बसणें. अनुष्ठानानंतर कुमारी पूजा व भोजन करणे गोकुळ अष्टमीनंतरच्या अष्टमीस ब्राह्मण भोजन करावें. महाशिवरात्रीला जप जितका होईल तेवढा करावा. वरील मंत्राचा जप रोज ४१ माळा करावा.

ब्रम्हयामले बलातिबला[1] विद्या-प्रकार : १

उत्साहनलयोर्वृद्धि परशास्त्रसहिष्णुता । न बाधा क्षुत्पिपासाभ्यां यत सा कथिता बला । यतः परस्मात् स्खालित्य दृङ्.मन कार्यकर्मणा ।। स्वोपायानाममोघत्व भवेत्सातिबलामता ।। इद विद्याद्वय ज्ञानमात्रे सिद्धिकर नृणा ।। विष्णुरेतत् द्वय सृष्ट्वा ।। जितवान्मधुकैटभाविति ।। तथा वाल्मिकी रामायणे ।। क्षुत्पिपासे न ते राम भविष्येते नरोत्तम ।। बलामतिबला चैव ।। पठत पथि राघव ।। इति ।। अस्य श्री बलातिबला महाविद्या महामंत्रस्य ।। विराट् पुरुषऋषि ।। गायत्री छंद ।। गायत्री देवता ।। अकार–उकार–मकार बीजाद्यः ।। क्षुधानिरसनादि महत्कार्य–सिध्यर्थे ।। असाध्यसाधने

---

१. हा मंत्र श्रीविश्वामित्रऋषीनें रामलक्ष्मणाना दिला होता. या मंत्रात गायत्री-मंत्रातील सर्व पदें वापरली असल्यानें गायत्रीमंत्राची व उपासनेची महत्ता ध्यानांत येण्याला मदत होते. शेवटीं म्हटल्याप्रमाणें हा मंत्र सावित्री उपनिषदातील आहे. प्रभुरामचंद्रानीं क्षुधानिरसन, दुर्धर्षतेज इत्यादि गोष्टी साध्य करून घेतल्या होत्या हें त्यातील बन्दोबस्त स्पष्ट होतें. (गो. प्र. भा.)

विनियोगः ॥ क्लामिति षडगन्यासः ॥ अथ ध्यानम् ॥ अमृतकरतलार्द्रौ सर्वसजीवनाढयौ ॥ अपहरणसुदक्षौ वेदसारौ मयूखौ ॥ प्रणवमयविकारौ भास्वराकारदेहौ ॥ सततमनुभवेऽहं तौ बलातीबलेशौ ॥ १ ॥ मानसपचोपचारैः सम्पूज्य मनुः ॥ "ॐ—ह्रीं बले महादेवी। ह्रीं महाबले। क्लीं चतुर्विधपुरुषार्थसिद्धिप्रदे। तत्सवितुर्वरदात्मिके ह्रीं वरेण्य भर्गो देवस्य। वरदात्मिके अतिबले। सर्वदयामूर्ते बले। सर्वक्षुद्भ्रमोपनाशिनी। धीमहि धियो योन प्रचुर्यः प्रचोदयात्मिके प्रणवशिरस्कात्मिके हु फट् स्वाहा" ॥ एव सहस्र मत्रजप प्रत्यहकुर्ते ॥ मडल त्रये (४८×३) सिद्धिर्भवति ॥ एव विद्वान् कृतकृत्यो भवति। सावित्र्या एव सलोकता ॥ जयतीत्युपनिषत्। आप्याय स्वेति शांतिः ॥

बला अतिबला वनस्पतीचा प्रयोग गोरक्षचर्पटी, स्वर्णमत्र लक्ष्मणा वनस्पति (पाटरी रिंगणी) ह्याबरोबर करावा लागतो.

श्री बलादेवी मंत्र शरीरारोग्यासाठी – २

श्रीबलादेवीमहामत्रस्य आदित्य ऋषि। गायत्री छद। श्रीबलादेवी देवता। श्रैं बीज। ह्रीं शक्ति। ह्रु कीलकम्। शरीरश्रमनिवृत्त्यर्थे जपे विनियोग। श्रीं श्रीं इति षडग।

ध्यान—वदे बला महादेवीं दिव्यामृतकरोज्ज्वलाम्। प्रसन्नवदना भोजां शरीरारोग्यसिद्धये। अथ मत्र –

तत्सवितुर्वरेणिय। भर्गो देवस्य धीमहि।

धियो यो न प्रचोदयात् 'ॐ क्लीं ऐं सौ बलायै नमः।'

जपसंख्या अष्टोत्तरशत, एकदर जप ५ लक्ष.

श्री अतिबला मंत्र-मृत्यू टाळण्याकरितां – ३

अस्य श्री अतिबलामहामत्रस्य कृशानो भगवान् ऋषि। गायत्री छद। अतिबलाऽमृतस्वरूपादेवी देवता। अ बीज। उ शक्ति। म कीलकम्। मम मृत्यु निवृत्यर्थे जपे विनियोग। क्लां क्लीं इति षडगः।

ध्यानं—मृतसंजीविनीं विद्यां देवीं पद्मासनस्थितां। दीर्घायुष्यप्रदां वंदे मातरं हेममालिनीम् ॥ अथ मंत्र :—

तत्सवितुर्वरेणियं। भर्गो देवस्य धीमहि।

धियो यो नः प्रचोदयात्। 'ॐ ह्रीं क्लीं अतिबले हुंफट्'

जपसंख्या १०८. एकंदर ५०००००. (पांच लक्ष.)

बलातिबला वैदिक मंत्र

ॐ नमो भगवते विष्णुचक्राय अमिततेजसे महाबलपराक्रमाय सकल लोक विध्वंसिने। भक्तेष्ट दायिने हुंफट् विधे। विष्णुतेजसे ॐ।

बलं धेहि तनूषु नो। बलमिंद्रा नलुसुवः।

बलं तोकाय तनयाय। जीवसे त्वं हि बलदा असि॥

शाबर[1] मंत्र

तंत्रग्रंथांतील मंत्र मागें सांगितले. ह्याशिवाय शाबर, कापालिक व गारुड नांवाचीं तंत्रें प्रसिद्ध आहेत. या तंत्रांतील मंत्र सर्वभाषांत

---

१. आद्य शंकराचार्यांनीं ही तपश्चर्या करून शाबरीमातेचा आशिर्वाद मिळविला होता. (ग. द. मुळे नगर, शाबरीकवचविद्या) नवनाथसंप्रदायांत ही शाबरी विद्या होती. पण कांहीं कारणांस्तव ती गुप्तच राहिली. कारण त्या विद्येमधील कांहीं भाग वाम पद्धतीचा आहे. तथापि कांहीं भागांतील मंत्र वैदिक व शुद्ध तांत्रिक बीजांवर आधारिलेले आहेत. तीं राशिपरत्वें व हेतुपरत्वें भिन्नभिन्न असून त्या साधनासाठीं लागणारीं पंचदशी यंत्रेंहीं भिन्नभिन्न आहेत. त्यांत न्यास, ध्यान, मुद्रा, मानसपूजा इत्यादि क्रिया वैदिक मंत्रजपपद्धतीच्या आहेत. एवढेंच नव्हे तर इतर पंचदशीयंत्रलेखनपद्धतीप्रमाणें शाबरीमंत्रयंत्रें ह्यांची लेखनपद्धति ठराविक आंकड्यानें व ठराविक स्थानापासूनच करावी लागते असा निर्बंध आहे.


ठराविक बीजमंत्र म्हटल्यानंतर "ॐ नमो शाबरी शक्ति मम अरिष्टं निवारय निवारय॥ मम अमुक कार्यं सिद्धं सिद्धं कुरु कुरु स्वाहा"॥ हा मंत्र म्हणून

आहेत. शाबर तंत्रें श्रीशिवांनीं उत्पन्न केलीं, अशाबद्दल खालीं दिलेलें वचन आढळतें.

शिवः शवररूपेण पार्थे जन्ये त्वजीजयत् ।
तेन प्रोक्ताश्च ये मंत्रा: शाबरा इति कथ्यते ।

जपपाठ सुरू करावयाचा असतो. लोकोपयोगी व व्यवहारोपयोगी अनेक कार्यें शाबरीमंत्र त्वरित फलदाई असल्यानें सिद्ध होतात. देवदेवतांच्या उपासना-पद्धतीमध्यें त्या त्या देवतेचें जसें 'कवच' हा पाठविधि असतो, तसा अशा शाबरीमंत्रांत 'शाबरी कवच' हा पाठविधि आहेच. वाममार्गी शाबरीमंत्र फारच लवकरच प्रत्यंतरित होतात, हें जरी खरें आहे तरी त्या जापकाची वा पाठकाची स्थिति अखेरीस वाईटच होते. कारण त्यांत शुद्धाचार, शौचाचारादि निर्बंध पाळण्यावर कटाक्ष नसतो. यामुळें जापक अधोगतीलाच जातो. तसें सत्याचारी या मंत्रजापकाचें होत नाहीं. तसेच शाबरी मंत्र हे आत्मसाक्षात्कार किंवा कोणत्याही आध्यात्मिक उन्नतीसाठीं उपयोगी नाहींत. हें तितकेंच खरें. (गो. प्र. भा.)

सोबत एक शाबरी यंत्र, त्यातील बीजें, अंक व त्याची लेखनपद्धति दिलेली आहे. सदरहू यंत्र धनुराशीच्या व्यक्तीसाठी 'ठराविक कामांत यश मिळावें म्हणून दिलेलें आहे. वैदिक वा आगमोक्त तंत्रांतील यंत्राप्रमाणें हे पंचदशी यंत्रच आहे (पंचदशी यंत्रासंबंधानें परिचयरूप माहिती पूर्वार्धांत मंत्र-तंत्र-यंत्र या प्रकरणांत दिलेली आहे.)



या यंत्रातील अंकलेखनपद्धति २-९-४, ३-५-७, ८-१-६ अशी असून बीजलेखन प्रथम ॐ-ह्रॅंक-ह्रौंक, नंतर क्लींक-ह्रींक व नंतर उरलेलीं तीन बीजें लिहावयाचीं. नंतर शेंदूर, हिंगुळ, गोरोचन, यांचें मिश्रण दुधांत मिसळून त्यांत चंदन उगाळून तें गंध उपयोगावें. समोर व्याघ्रवाहिनी देवीचें प्रतीक असावें. (सिंहवाहिनी देवीचें प्रतीक 'सप्तशती' पाठांत असावें)

व नंतर शाबरी संकल्प, कवच, जपादि, अनुष्ठान करावयाचें असतें.

'नवनाथ भक्तिसार' या अनुष्ठानयोग्य प्रासादिक ग्रंथामध्यें नवनाथांनीं

शाबरें १२ प्रकारचीं आहेत. त्यांचीं नावें खालीं लिहिल्याप्रमाणें आहेत.

कुमार, सिद्धशाबरीशाबर, विजयाशाबर, कालिकाशाबर, कालशाबर, दिव्यशाबर, घोरशाबर, श्रीनाथशाबर व योगिनीशाबर, तारिणीशाबर, शंभुशाबर, अघोरशाबर. कांहीं शाबरमंत्र सिद्ध होण्यापूर्वी त्यानंतरही शुद्धीकरण म्हणून मागे पूर्वार्धांत सांगितल्याप्रमाणें बाह्य संस्कार व्हावे लागतात. तेव्हां ते मंत्र शापमुक्त होऊन जागृत होतात. तथापि बहुतेक शाबरमंत्र शापमुक्तच आहेत.

म्हणजे नवनारायणानीं केलेलीं कार्यें, प्रताप व पराक्रम आणि दाखविलेले चमत्कार (सामान्य जनांच्या दृष्टीनें) ह्या गोष्टी सव्याचारी (वैदिकी व आगमोक्त) सबीज मंत्राच्या सिद्धतेमुळें केल्या असें त्याच ग्रंथांतील माडणीवरून स्पष्ट होतें. नवनाथ शाबरी विद्येमध्यें पूर्ण सरवेज होते हें ऐतिहासिक सत्य आहे. श्रीदत्त हें दैवत तीनही शक्तींचें (उत्पत्ति–स्थिति व लय) एकत्रित प्रतीक असून शाबरीविद्येचें जनकच आहे. नवनाथांना त्यानीं विद्या शिकविली.

शाबरीपद्धतीच्या उपासनेला उपयुक्त अशी कांहीं माहिती सोबत दिलेली आहे.

सव्य किंवा दक्षिणचारी शाबरी उपासनेमध्यें उपासकाला त्याच्या राशीला जरूर व उपयोगी अशीं बीजें असून तीं प्रथम म्हणून मग इष्टहेतूसाठीं शाबरी देवीचा संकल्परूपी मंत्र म्हणून मग जप करावयाचा असतो. ती बीजें पुढें दिली आहेत:—

राशीपरत्वें बीजें

मेष – ॐ ऐं, क्लीं, सौं,	तूळ – ॐ ह्रीं, क्लीं, श्रीं
वृषभ – ॐ ह्रीं, क्लीं, श्रीं	वृश्चिक – ॐ ऐं, क्लीं, सौः
मिथुन – ॐ श्रीं, ऐं, सौः	धन – ॐ ह्रीं, क्लीं, सौः
कर्क – ॐ ऐं, क्लीं, श्रीं	मकर – ॐ ऐं, क्लीं, ह्रीं, श्रीं, सौः
सिंह – ॐ ह्रीं, श्रीं, सौः	कुंभ – ॐ ह्रीं, ऐं, क्लीं, श्रीं
कन्या – ॐ श्रीं, ऐं, सौः	मीन – ॐ ह्रीं, क्लीं, सौः

कापालिक

यातील भेद १२ आहेत. त्याचीं नावें खालीं लिहिल्याप्रमाणे आहेत.

आदिनाथ, अनाथ, काल, अतिकाल, कराल, विकराल, महाकाल, कालभैरव, बटुक, मूलनाथ, वीरनाथ, श्रीकंठ.

वरील शाबर व कापालिक मंत्राचे १२ प्रचारक होऊन गेले त्याचीं नावें खालीं लिहिल्याप्रमाणे आहेत :—

नागार्जुन, जडभैरव, हरिश्चंद्र, सत्यनाथ, भीमनाथ, गोरक्ष, चर्पटी, (अडबंग) अवघडनाथ, वैराग्य, कंथाधारी, जलंधरी व यमलार्जुन. शाबरमंत्रापैकीं कांहीं मंत्रोक्त देवतेचे प्रत्यक्ष सगुण व स्थूल देहरूप दर्शन कलियुगात होतें. तें मंत्र खालीं दिले आहेत.

ह्या बीजाना अनुरूप व हेतुसाध्य होण्यासाठीं जरूर अशीं यंत्रें राशिपरत्वें निरनिराळीं आहेत. तीं पण येथें दिलीं आहेत.

राशिपरत्वें पंचदशी यंत्रें

४	९	२
३	५	७
८	१	६

मेष
सिंह
धन

पुरुषांनी वापरावीं

बायकांनी उपयोगी

मिथुन
तूळ
कुंभ

६	७	२
१	५	९
८	३	४

२	७	६
९	५	१
४	३	८

वृषभ
कन्या
मकर

पुरुषांनी वापरावीं

बायकांनी उपयोगी

कर्क
वृश्चिक
मीन

८	१	६
३	५	७
४	९	२

जास्त माहिती व विधि विधान ह्यासाठीं लवकर प्रसिद्ध होणारें 'वैदिक नवग्रह विधान' हें पुस्तक पहावें.—नवज्योति प्रकाशन–दादर, मुंबई २८
(गो. प्र. भा.)

तारा काली छिन्नमस्ता सुंदरी बगलामुखी ।
मातंगी भुवना (भुवनेश्वरी) धूमा (धूमावती)।
सिद्धलक्ष्मी तु अरधति ।
एता शाबरमंत्राश्च कलौ प्रत्यक्षदर्शना ।

तसेंच आशु सिद्धिदायक शाबर मंत्र पुढें दिले आहेत :

'बटुकाद्या महामंत्रा शाबरास्तूर्णसिद्धिदाः'

महाकापालिक मंत्र

ॐ आदेश गुरुको महाचीन देवी जटा महाप्रे तारादेवी तहा वसे। चोलसर तहा बैठे । अक्षोभ्य नाग निराजय शिव के माथे तारा बसे । भक्तके साथे कालीतारा महातारा छिन्नमस्ता त्रितारा ह्रीं । आव २ कह २ घह २ मेरी भक्ति गुरुकी शक्ति, फुरो मंत्र, ईश्वरी वाचा, फट् स्वाहा ।

'ॐ नमो भगवति विरूपाक्षि विकृतवदन घोररूपे जिवजनशिव जालंधरी सर्वोच्चाटनीय घरचारू छुडावे, कालभैरवके आण छुडावे, मेरी भक्ति गुरुकी शक्ति, स्फुरो ईश्वर तेरी वाचा.'

भूत प्रेत बाधा—हरण

—कै. वा. रा. रा. सिताराम गुरुजी, पुणें.

○ ○

३ देव देवता मंत्र यंत्र विधान

(गो. प्र. भा.)

स्थूल परिचय : या प्रकरणामध्यें मुख्यत मुख्य मुख्य देवदेवतांचे मंत्र व त्याचें विधिविधान दिलेलें असून मधून त्याचीं उपयुक्त अशीं यंत्रेंही दिलेलीं आहेत. कांहीं यंत्राकृति केवळ अनुभान्य आहेत. त्यांना मंत्र वा जप नाहीं.

१) गणपति या देवतेचे निरनिराळ्या हेतूसाठीं व उपभोगासाठीं योग्य असे मंत्र दिलेले असून त्याचें विधान संस्कृत भाषेंतच आहे. पण तें सहज समजण्याजोगें आहे. उच्छिष्ट गणपतिसारखे कांहीं काम्य हितार्थी मंत्राची उपासना सिद्ध झालेले गृहस्थ, त्यामुळें प्राप्त झालेल्या वैभवामुळें आत्मोन्नति वा लोकोपयोगी कार्यपराङ्मुख झाले व होतात अशीं उदाहरणेंही माहीत आहेत. गणपति अथर्वशीर्ष म्हणजे या देवासंबंधीं सर्व कांहीं आहे.

२) सप्तशती व त्यातील मंत्रांचें विधिविधान हे स्वतंत्र प्रकरणच दिलेलें आहे. देवीच्या विविध स्वरूपाच्या अनेक पण भिन्नभिन्न पद्धतीच्या उपासना करणारे—सात्त्विक वा तामसिक-वामाचारी व सव्याचारी—उपासक भारतभर व भारताबाहेरहि आहेत. त्यांचे परिणाम इत्यादि गोष्टींचा ऊहापोह करण्याचें हें स्थळ नव्हे व तसा हेतु खुद्द 'मंत्रशास्त्र' केव्हाच्याही नव्हता. गणपति व देवी हीं दैवतें व्यष्टि वा समष्टि, अभ्युदय व निःश्रेयस यासाठीं त्वरित फलदायी होत असल्यानें त्याचा उपासक वर्ग आपल्या भारतात फार मोठा आहे. देवीच्या उपासनेसाठीं, सप्तशतीच्या

पाठासाठीं अत्यंत उपयुक्त पण दुर्मिळ असें 'सप्तशती महायंत्र' या ग्रंथाच्या या नवीन आवृत्तींत दिलेलें आहे.

३) **हनुमंत** ह्या दैवतासंबंधानें मात्र असें म्हणता येईल कीं, त्याची वामाचारी स्वरूपाची उपासना नाहींच असें म्हटल्यास गैर नाहीं. हें दैवत अनेक व्यावहारिक कार्यांसाठीं (भूतबाधा – विषबाधा निवारण – जादुटोणा प्रतिबंध, मृत्यु दुरावणें इ. कामांसाठीं) खास उपयोगी पडते. 'रामरक्षा' व 'हनुमानस्तोत्र' ह्यांच्या पाठाचे अनुभव दिलेले आहेत.

४) **दत्तोपासनेचे**[1] मंत्र या ग्रंथात थोडे आहेत. ब्रह्मा, विष्णु व महेश ह्या तीन शक्तींचे 'दत्त' हे प्रतीक आहे त्या तीन शक्ति म्हणजे अखिल ब्रह्मांडाचा व्याप, विस्तार व त्यातील चेतना म्हणजे दत्त स्वरूप – (मग त्याचें प्रतीक एकमुखी असो वा त्रिमुखात्मक असो) – म्हणजे विश्व, अर्थात तें प्रकट व अति विस्तृत असेंच आहे. 'अवधूत' हे दत्त देवतेचें अतिव्यापक स्वरूप आहे, असें म्हणणे बरोबर व वास्तविक आहे. नवनाथ व त्यांचे पंथोपपंथ त्यांचेच हे स्वरूप आहे. विशिष्ट सांप्रदायी दत्तोपासना जशी कडक काटेकोर पद्धतीची आहे, तशी अवधूत सांप्रदायाची आहेच असें नाहीं अवधूत परिवार फार मोठा आहे. नर्मदा ते कावेरी ह्यामधील भूविभागातील दत्तसंप्रदाय व त्यातील अवतारी व्यक्ति यांची उपासनापद्धति ही मुख्यतः कडक व काटेकोर आढळते, पण तसें स्वरूप या व्यतिरिक्त भारताच्या इतर भागातील अवधूत संप्रदायाच्या उपासनेचे व मंत्रतंत्राचे नाहीं.

५) **श्रीविद्या :** श्रीविद्या हें एक अखिल ब्रह्मांडव्यापी अनंत व

---

१. दत्तदैवताक (प्रसाद प्रकाशन – पुणें १९६८–६९) यात दत्तमंत्र व अनुष्ठान ह्यांची (गुरुचरित्रासारख्या सांप्रदायिक ग्रंथाची सोडून) अत्यल्प माहिती आहे. तसेंच ह्यात व दत्तात्रेय ज्ञानकोश प्र. म. जोशी. सुरेखा प्रकाशन, पुणें १९७०, यातही अवधूत संप्रदायाचे फक्त दिग्दर्शन आहे. (गो. प्र. भा.)

अचिंतनीय म्हणजे चित्तचिंतनाच्या पलीकडील असें एक गूढ आहे. यांत काय नाहीं? असें हें गूढ आहे. 'सकेतविद्या गुरुवक्त्रगम्या' असेंच त्याचें वर्णन आहे. श्रीविद्या ही वेद व आगम ह्यांत पूर्ण निर्देशित आहे.

'अग्निमीळे, ईषेत्वोर्जेत्वा, अग्ने आयाहि' वेदमंत्रांत श्रीविद्योपासनेंतील अ, इ, ए, व ऐं हीं बीजें आहेत.

'प्रकृतिस्त्वं च सर्वस्य' 'परमा प्रकृतिस्त्वमाद्या' (दुर्गा. १-७८,४-७)

'त्वं श्रीस्त्वमीश्वरी' (दुर्गा १-७९) 'आधारभूता जगतस्त्वमेका' 'सर्वाश्रयाखिलमिदं जगत्' (दुर्गा ११-४-४-७)

अशा स्वरूपाचीं वर्णनें श्रीविद्यासंबधानें आहेत.

श्रीविद्या विचार : मंत्रशास्त्र या ग्रंथात दक्षिण कालिकामंत्र व श्री यंत्रें, लक्ष्मीविधान, इत्यादि विषय असल्यानें त्याच्याशीं संबंधित अशा श्रीविद्ये-संबंधीं विचार व त्या विद्येची व्याप्ति ह्याची थोडीतरी कल्पना यावी म्हणून सोबतची माहिती दिली आहे.

श्रीविद्या ह्या शब्दाचीं दोन पदें आहेत. एक श्री व दुसरें 'विद्या'. ह्याच्या अर्थाचा विचार करू लागलों असता (१) श्रीस्वरूपा विद्या (२) श्री व विद्या (३) श्रीची म्हणजे श्रीविद्येची विद्या (४) श्रीप्रदाहारी विद्या (५) श्रीप्राप्तीची विद्या, या प्रकारचे अर्थविचार मनांत येतात. त्याचा जरूर तेवढा विचार करू.

'श्री' या शब्दाचे प्रसंगानुसार भिन्न भिन्न अर्थ आहेत. लोकमान्य टिळक ह्यांनीं 'श्री' या शब्दाचे तेरा निरनिराळे अर्थ असल्याचें सांगितलें आहे. तदनुसार श्री म्हणजे लक्ष्मी, सरस्वती, संपत्ति, शोभा इत्यादि अर्थ होतात. हें सर्वांना माहीत आहे. धात्वर्थानें 'श्री' म्हणजे आश्रय करणें, 'श्रियते सर्वैरपि श्रीः' श्री सर्वांचे आश्रयस्थान आहे, अशी असे अर्थ होतात. वेदान्तदृष्ट्या 'श्री' म्हणजे आदिशक्ति होय (जसें :—'या देवी सर्वभूतेषु लक्ष्मीरूपेण संस्थिता' मार्कंडेय पुराण).

'विद्या' यातील 'विद्' या धातूचा अर्थ 'जाणणें', संपादन करणें, मिळविणें, इत्यादि. विद्या म्हणजे ज्ञान, विद्या म्हणजे सरस्वती, विद्या म्हणजे ज्ञान मिळविण्याचें शास्त्र, असा अर्थ असून वेद व आगम शास्त्रामध्यें विद्या म्हणजे मंत्रवर्णात्मक देवता असा अर्थ असल्यानें विद्या म्हणजे आदिशक्ति व परब्रह्म असें सिद्ध होतें. सारांश, शब्दार्थाच्या मदतीनें 'श्रीविद्या' या शब्दाकडे वर दिलेल्या अर्थानें पाहूं या :—

१) *श्री स्वरूपा विद्या :* म्हणजे आदिशक्तीचे यथार्थ ज्ञान. यात भेद नाहीं. ती दोन्हीं एकरूपच आहेत. म्हणजे मंत्रवर्णात्मक चिन्मयी आदिशक्ति असा अर्थ श्रीस्वरूपा विद्या याचा होतो.

२) *श्री आणि विद्या :* श्री म्हणजे श्री, सुंदरी, व विद्या म्हणजे विद्याराज्ञी व 'दक्षिणकाली' ह्या दोन्ही म्हणजे 'त्रिपुरसुंदरी. 'कालयति जगत्सर्वं' म्हणजे 'काली' ही काली. ती शामा व रक्ता अशा दोन स्वरूपाची आहे व त्याची उपासना थोड्या फरकाची आहे 'श्रीमहा-त्रिपुरसुंदरी, म्हणजे या दोन कालींचें ऐक्य.

३) *श्री विद्येची विद्या :* श्री विद्येचा अर्थ, तिचे मंत्र व उपासना-विधी म्हणजे श्री विद्येची विद्या.

४) *श्रीप्रदात्री विद्या :* उपासकाला लक्ष्मी, संपद्, विद्या, विभूति, शोभा, इत्यादि देणारी विद्या असा श्रीप्रदात्री विद्या याचा अर्थ होतो. 'आराधिता सैव नृणां भोगस्वर्गापवर्गदा' (दुर्गा १३-५) अशी विद्या. .

५) *श्री प्राप्तीची विद्या :* चारी पुरुषार्थ प्राप्त करून देणारी विद्या वरील चार व पाच यांचा जवळजवळ एकसारखाच अर्थ आहे. श्री. विद्येचे पंचदशी, षोडषी, दीपनी, वा कामराज इत्यादि जे भेद आहेत ते मंत्रवर्णमूलक किंवा उपासनामूलक आहेत. सारांश, श्रीविद्या म्हणजे महाविद्या, महादेवी, महामाया, महामोहा, ब्रह्मविद्या इत्यादि नावांची वर्णिलेली विद्या असा अर्थ आहे.

विष्णुपुराणात श्रीविद्येबद्दल पुढें दिलेलें वर्णन आहे. 'यज्ञविद्या,

महाविद्या, गुप्तविद्या, च शोभने। आत्मविद्या च देवित्व विमुक्तिफलदायिनी।'
'वामकेश्वर तंत्राप्रमाणें' श्री विद्येला 'शोडषार्णा महाविद्या' असें म्हटलें आहे.

श्री विद्या उपासना : श्रीविद्येच्या उपासनेचे मुख्य तीन प्रकार क्रम आहेत ते असे –

प्रकार	भिन्न नांवें	स्वरूप
१) *कालिक्रम :*	कुंडलिनी क्रम वा 'कादिविद्या'	सत्वगुणप्रधान आहे.
२) *सुंदरीक्रम :*	हंसक्रम वा 'हादि विद्या'	रजोगुणप्रधान आहे.
३) *ताराक्रम :*	समवरोधिनी क्रम 'सादि विद्या'—	तमोगुणप्रधान आहे.

ह्या सर्वांना 'दीक्षाक्रम' हे सामान्य नाव आहे.

हे सर्व क्रम म्हणजे प्रकार सर्व आम्नायामध्यें आहेत ह्या आम्नायदर्शित उपासना दिशाशीं संबंधित आहेत, व त्याप्रमाणे प्रत्येकाचें विधि-विधान निरनिराळे आहे, पूर्व, पश्चिम, उत्तर, दक्षिण, उर्ध्व व अधराम्नाय, हीं त्यांचीं नावें असून याशिवाय चार उपदिशाशीं निगडित असे वायव्य, ईशान्य, आग्नेय, व नैऋत्याम्नाय असे दहा आम्नाय भेद आहेत.

उपासनेमध्यें बाह्योपासना व अन्तरोपासना असून नित्य, नैमित्तिक, काम्य इत्यादि ध्येयाप्रमाणें भिन्न भिन्न विधि व त्याची मांडणीही निराळी आहे.

उपासनेचे संप्रदाय : श्रीविद्येच्या उपासनेचे हयग्रीव, आनंदभैरव व दक्षिणामूर्ति असे तीन संप्रदाय आहेत. त्याप्रमाणे पूजाविधि पण निरनिराळे आहेत. एवढेंच नव्हे, तर ब्रह्मचारी. गृहस्थ, वानप्रस्थी

१. काली, श्रीसुंदरी, त्रिपुरसुंदरी इत्यादि नावें तन्त्रशास्त्रातील असून त्याचे अर्थ निरनिराळ्या आम्नायातील उपासनापद्धतीप्रमाणें भिन्न भिन्न आहेत.
(गो. प्र. मा.)

इत्यादिकांसाठींही उपासनाक्रम अलग आहे. या श्रीविद्येचा संबंध समष्टिरूप वैश्विक विज्ञानाशी आहे (जास्त खुलासा उपसंहारात आहे).

श्रीविद्येचा मूलमंत्र व प्रतीक : अखिल ब्रह्मांडाला म्हणजे ज्ञात अज्ञात विश्वाला व्यापून असणाऱ्या व उरणाऱ्या आणि त्याला प्रचोदना देणाऱ्या शक्तीला वैदिक किंवा तांत्रिक उपासना पद्धतींमध्यें 'महात्रिपुरसुंदरी' असे नाव आहे. त्या उपासनेचा मूलमंत्र 'क ए ई ल ह्रीं, ह्रीं, ह स क ह ल स क ल ह्रीं' अशा पंधरा बीजांवर आधारित असल्यामुळें या विद्येला 'पंचदशी विद्या' असेंही म्हणतात. या विद्येच्या प्रतीकाला 'श्रीचक्र' आणि 'श्रीयंत्र' असें म्हणतात. या यंत्रातील आकृती व त्याची मांडणी वर दिलेलीं बीजें, बीजाप्रमाणें अधिष्ठात्री देवता व मंत्र यांची पूर्ण एकवाक्यता व समन्वय असतो व असावाच.

श्रीयंत्राचे प्रकार व साहित्य : श्रीयंत्राची बनावट कशी असावी व तशी कां असावी, तसेंच श्रीयंत्र कोणत्या वस्तुसाहित्याचें असावें व तें कां याची माहिती रुद्रयामल, गौरीयामल, तांत्रिक उपासना दर्पण इत्यादि ग्रंथांत दिलेली असून त्यामागील वैज्ञानिकदृष्टि आधुनिक पाश्चिमात्य विज्ञानवाद्यांना माहीत नसलेली पण त्यांना उपयुक्त आहे.

बनावटीच्या दृष्टीनें श्रीयंत्राचे तीन प्रकार सांगितलेले आहेत. ते असे—(१) भूपृष्ठ स्वरूपी–हे समतल म्हणजे सपाट असतें (२) कच्छपृष्ठ–म्हणजे कासवाच्या पाठीप्रमाणे थोडेसे उठलेलें आतून पुगीर म्हणजे वरचा भाग अल्पबहिर्गोल असे आणि (३) मेरुपृष्ठ – म्हणजे मेरुपर्वताप्रमाणें वर क्रमबद्ध उंच उभारिलेलें असतें. पण गौरीयामलमध्यें 'पद्मपृष्ठ' हा ४ था प्रकार सांगितला आहे.

---

१. कादि, हादि व सादि संप्रदायाप्रमाणें या बीजाचा जपादि विनियोग किंवा श्रीयंत्रावरील मांडणी, बीज व मंत्र यांच्या धोरणा नेंठरविलेला असतो.

(गो. प्र. भा.)

उपासनेच्या दृष्टीनें संकल्प, हेतु व ब्रह्मचर्यादि आश्रम यांचा विचार करून मगच कोणतें श्रीयंत्र वापरावें ह्याचे निर्णय श्रीनिघार्णव तंत्र यांत दिलेले आहेत. त्याप्रमाणें तज्ज्ञाच्याच मदतीनें ते समजावून घ्यावे

श्रीयंत्र हें सोनें, चांदी वा तांबें ह्याचें अथवा पुष्पराज, मरकत, वज्रमणि, वैडूर्य, नीलम्, स्फटिक, पाचू इत्यादि रत्नापासून केलेलें असावें असें सांगितलें असून पाट, फळी, भिंत इत्यादिकावर ते कधींच काढू नये. असें स्पष्ट बजाविलें आहे तसेंच वजनाचाही निर्बंध आहे. तें धातूचें बनविल्यास एक ते सात तोळ्यापर्यंतच वजन असावें पण रत्नमयी यंत्राला वजनाचा निर्बंध नाहीं.

आकृति उठाव का खोदीव ? – श्रीयंत्रावरील आकृति (त्याचप्रमाणे इतर कोणत्याही ग्रहाच्या वा कार्यासाठीं केलेल्या यंत्रावरील आकृति) तें धातुमय असल्यास उठावच असाव्या, पण रत्नमयी असल्यास त्यावरील आकृति क्वचित आंत खोदलेल्या असल्या तरी चंदन कुंकुम किंवा अर्चना ह्यांना भरून उठावदार करून मगच तें यंत्र पुजावें असा स्पष्ट खुलासा आहे

देवदेवता आवाहन, प्राणप्रतिष्ठा व यंत्रधारण— या दृष्टीनें पुढें दिलेला शास्त्राचार आहे अचर प्राणप्रतिष्ठा केलेली असल्यास तें यंत्र स्थानावरच ठेवावें लागतें चर प्राणप्रतिष्ठा केलेली असल्यास तें यंत्र जरूर त्या पवित्र व्यवस्थेनें स्थानांतरित करितां येतें, आणि धारणेच्या दृष्टीनें प्राणप्रतिष्ठा केलेली असल्यास तें पूजेच्या वेळीं शरीरावरून काढून पूजेंत देवतेचें आवाहन करून, पूजा संपल्यावर देवता विसर्जन करून ('गच्छ गच्छ सुरश्रेष्ठ पुनरागमनायच' या मंत्रानें) मगच तें शरीरावर धारण करावें 'श्रीचक्र' कसें असतें याची कल्पना यावी म्हणून आकृति सोबत आहे 'श्रीयंत्र' हें गुरुद्वाराच मिळायाचें असतें. तें ज्या पद्धतीचे असेल, त्याप्रमाणे त्याची पूजा त्रिशती, खड्गमाला

किंवा श्रीललिता सहस्रनाम या ग्रंथाच्या पठनानें कुंकुमार्चनयुक्तही असते.[1]

(१) अथ मंत्रयंत्र निग्रह कवच प्रारंभः

श्रीगुरुगणपतिइष्टकुलदेवताभ्यो नम । ॐ श्री देवी उवाच । भगवान देवदेवेश भक्तानुग्रहकारक । यदुक्त मे महादेव कवच सुंदरीप्रिय ॥ १ ॥ तन्मे कथय देवेश यदि स्नेहोस्ति मा प्रति । ईश्वर उवाच-शृणु देवि प्रवक्ष्यामि कवच सुंदरीप्रिय । सर्वार्थसाधक देवि सर्वसंपत्तिकारक ॥ २ ॥ ऋषि स्याद्दक्षिणा मूर्तिः । छंदोनुष्टुप् प्रकीर्तित । सुंदरीदेवताप्रोक्ता । नियोगः कायरक्षणे ॥ ३ ॥ ॐ ह्रीं श्रीं ककार पातु मे शीर्षं । एकार पातुभालक । ईकार पातु मे वक्त्र । लकार' पातु कंठक । श्रीं ह्रीं ॐ॥ ४ ॥ ॐ ह्रीं श्रीं ह्रींकार पातु हृदय वाग्भव तु सदावतु । हकारः पातु जठर सकारः नाभिदेशक । श्रीं ह्रीं ॐ ॥ ५ ॥ ॐ ह्रीं श्रीं ककारः पातु लिंग च हकारो मूलदेशक । लकारो जानुनी पातु ह्रींकारो जंघयुग्मक ॥ श्रीं ह्रीं ॐ ॥ ६ ॥ ॐ ह्रीं श्रीं कामराज सदा पातु जठरादि प्रदेशक ।

---

१. सर्व साधक, उपासक व वाचक याना या अमोल श्रीयंत्राची (व इतर यंत्राचीही माहिती) स्थूलरूपानें तरी असावी म्हणून एवढाच अतित्रोटक विस्तार येथे दिला आहे. त्यातील काहीं माहिती खुद्द प्र. भूत श्री योगेश्वरानंद यानीं सांगितलेली असून काहीं तान्त्रिक माहिती प. श्रीकृष्णप्रसाद भट्टराई –काठमांडू-नेपाळ यांचे ग्रंथ व लेख ह्याच्या सहाय्यानें दिलेली आहे. आश्चर्याची गोष्ट ही कीं, धातुमय वा रत्नमय श्रीयंत्र करणारा गृहस्थ (खुद्द काशी येथें रहाणारा) एक वृद्ध मुसलमान होता असें खुद्द ग्रंथलेखक शंकराचार्य यानीं सांगितलें होतें ! भारताप्रमाणें हिंदुधर्मी नेपाळातही वज्रमार्गी उपासक, काठमांडू येथें, तसेंच भटगाव इतर काहीं गावींही चांगले उपासक सर्य संहिता वा रावणसंहिता याच्या आधारानें उत्कृष्ट जाणकार ज्योतिषी पण आहेत. (गो. प्र. भा.)

सकारो मे कटिं पातु ककारः पातु पृष्टकं। ॐ श्रीं ह्रीं ॐ ॥ ७ ॥ ॐ ह्रीं श्रीं लकारोऽप्यालितंवश्च ह्रींकारः पातुंधकं शक्तिवीजं सदापातु पातु त्रिपुरसुंदरी। त्रिपुरा वासिनी पातु त्रिपुराश्रीसदावतु ॥ श्रीं ह्रीं ॐ ॥ ८ ॥ ॐ ह्रीं श्रीं त्रिपुरमालिनी पातु त्रिपुरा सिद्धिदावतु। त्रिपुरांवा सदापातु महात्रिपुरसुंदरी। श्रीं ह्रीं ॐ ॥ ९ ॥ ॐ ह्रीं श्रीं आणिमाद्या सदापातु महाद्या पांतु सर्वदा। नवमुद्रा सदापातु कामाकर्पिणीरूपिका। श्रीं ह्रीं ॐ ॥ १० ॥ ॐ ह्रीं श्रीं पातु मां पोडशदले अनंगकुसुमादिकाः। पातु मामष्टपत्रेषु सर्वाभरणदायकाः। श्रीं ह्रीं ॐ ॥ ११ ॥ ॐ ह्रीं श्रीं पातु मां रात्रकोणेषु सर्व संक्षोभिणी तथा। पातु मां वाह्यदिङ् कोणे सर्वसिद्धिप्रदा तथा। श्रीं ह्रीं ॐ ॥ १२ ॥ ॐ ह्रीं श्रीं मध्यदिक् कोणके देवि सर्वज्ञा पांतु सर्वदा। सर्वामीष्टप्रदाचार्या वशिन्याद्याश्च सर्वदा। श्रीं ह्रीं ॐ ॥ १३ ॥ ॐ ह्रीं श्रीं वसुकोणे सदापातु। कामेश्वर्यादिकारतया। श्रीं ह्रीं ॐ ॥ १४ ॥ ॐ ह्रीं श्रीं त्रिकोणमध्यतो देवी बिंदुरूपप्रकाशिनी। विंदुचक्रे सदा पातु श्रीमत् त्रिपुरसुंदरी। श्रीं ह्रीं ॐ ॥ १५ ॥ इत्येतत्कवचं देवि कथितं मूलमंत्रकं। यस्मै कस्मै न दातव्यं न प्रकाश्यं कदाचन ॥ १६ ॥ यस्त्रिसंध्यं पठेद्देवि लक्ष्मी स्तस्य प्रजायते। अष्टम्यां च चतुर्दश्यां यः पठेत् प्रयतः सदा ॥ १८ ॥ प्रसन्ना सुंदरी तस्य सर्व संपत्तिदायिनी। इति श्रीरुद्रयामले भरुचंद्रसंहितायां त्रिपुरारहस्ये ईश्वरपार्वतीसंवादे मंत्र यंत्र विग्रहकवचं संपूर्णम्।

(२) अन्नपूर्णा महामंत्र

श्रीगणेशाय नमः अस्य श्री अन्नपूर्णा महामंत्रस्य। सदाशिव ऋषिः। जगती छंदः। श्री अन्नपूर्णा देवता। ह्रीं बीजं। श्रीं शक्तिः। क्लीं कीलकं। श्री अन्नपूर्णा प्रसादसिद्ध्यर्थे जपे विनियोगः। अथ न्यासः ह्रां अंगुष्ठाभ्यां नमः। ह्रीं तर्जनीभ्यां नमः। ह्रूं मध्यमाभ्यां नमः। ह्रैं अनामिकाभ्यां नमः। ह्रौं कनिष्ठिका०। ह्रः करतलकरपृष्ठाभ्यां नमः। एवं हृदयादि ॥

अथ ध्यान · तप्तस्वर्णनिभाशशाङ्कमुकुटा रत्नप्रभाभासुरा। नानावस्त्रविराजिता त्रिनयना भूमीरमाभ्यायुता। दर्वीहाटकभाजन च दधती रम्योच्चपीतस्तनी। नृत्य त शिवमाकलय्य मुदिताध्येयाऽन्नपूर्णेश्वरी ॥ १ ॥ इति ध्यात्वा मानसपूजया सपूज्य। मालाप्रार्थनादि कृत्वा। यथाशक्ति जपेत्। जपाते माला सप्रार्थ्य। गुह्यातिगुह्यगोप्त्री त्व गृहाणास्मत्कृत जप। सिद्धिर्भवतु मे देवि त्वत्प्रसादान्मयि स्थिरा। अनेन जपेन श्रीअन्नपूर्णा प्रीयता। इति जप निवेदयेत। पुरश्चरणार्थं सपाद लक्ष जपः। दशाशमानेन घृताक्तान्नहोम। यथाशक्ति ब्राह्मणसुवासिनीकुमारकुमारीभोजन कर्तव्य। अथ मत्र-श्रीं ह्रीं क्लीं नमो भगवति अन्नपूर्णे ममाभिलषितमन्न देहि देहि स्वाहा। दर्शनेसिद्धिर्भवति। (अनुभूत—गो प्र. भा.)

गृहे अक्षयअन्नपूर्णा यंत्र व मंत्र

अशीं ९ यत्रें पिंपळाच्या पानावर लिहावीं त्याचे ऋषि, छद, देवता देठाजवळ लिहावेत ते असे—विश्वामित्र ऋषि, विराट छद, अन्नपूर्णा देवता मत्र 'ॐ अमृतोद्भव अन्नपूर्णे प्लु ॐ' वरील ९ यत्रे धान्याच्या कोठारात ठेवावीत. व कोठीसहित पूजा करावी कोठीच्या पूर्व दिशेला ताब्याच्या पणतींत तेलाचा दिवा लावून ठेवावा. आणि कोठीचें तोंड झाकणाने झाकून टाकावें व कोठीकडे पाठ करून उत्तराभिमुख बसून मत्र ३६० वेळ जपावा. हे सर्व रविवारीं उपास करून करावें व प्रहर रात्रीं नतर जेवावें. आणि दुसऱ्या दिवशीं पूजा करून जेवढें अन्न (धान्य) पाहिजे असेल तेवढे काढावें.

यत्र

४	३	८
९	५	१
२	७	६

(३) अग्निमत्र : 'स्रा स्रीं स्र स्रा ह्री स सर्वतक प्रज्वल स्रौ' हा मत्र १५३ वेळा जपावा. याचे यत्र व तत्रप्रत्यय ह्याचें विधिविधान 'व्यवहारोपयोगी मत्र' या प्रकरणात 'अन्य विविधमत्र' ह्या भागात पहावें

(४) कामदेव दर्शन यत्र व मत्र : प्रथम कोठ्यात ४ हा अक आहे

याप्रमाणे भुर्जपत्रावर ३ यंत्रें लिहावींत नंतर ती यंत्रे चारगावर ठेवून त्याचें पूजन करावें यंत्राचे मागें क्लीं क्लीं क्लीं लिहावें
यंत्र

८	३	४
१	५	९
६	७	२

या मंत्राचा 'ब्रह्मा ऋषि, बृहती छंद। अनिरुद्ध देवता। हे अशोकाचे पानावर लिहून यंत्राजवळ ठेवावें नंतर साधकानें रक्त ची केशर, कस्तुरी चंदनानें पूजा करून उसाचा नैवेद्य दाखवावा तेलाचे दोन दिवे लावावेत मग मंत्र जपावा मंत्र-"क्लीं क्लीं क्लीं कमला पुत्राय नमः" हा मंत्र ११० वेळ जपावा. हा विधी अशोक वृक्षाखालीं केला असता, अशोक वृक्षावर कामदेवदर्शन होतें.

(५) कार्तवीर्यार्जुन मंत्र

"ॐ क्रों (वा क्रों) व्रीं भ्रूं आ ह्रीं फ्रों (क्रो) श्रीं हुफट् कार्तवीर्यार्जुनाय नमः ॥ १ ॥ कार्तवीर्यार्जुनो नाम राजा बाहुसहस्रवान्। तस्य संस्मरणादेव हृतं नष्टं च लभ्यते ॥ २ ॥ दत्तात्रेय ऋषि अनुष्टुप् छंद ।

या मंत्राचे प्रयोग अलीकडे झालेले असून त्यामुळे नष्ट वस्तु कोठें आहे व कोणाजवळ आहे हे सांगता आले

वे मू-रा रा गंगाधर शास्त्री बाविसे, नसिराबाद-भुसावळ

कार्तवीर्यार्जुनस्तोत्र

अस्य श्री कार्तवीर्यार्जुनस्तोत्रमंत्रस्य दत्तात्रेय ऋषि । अनुष्टुप् छंद । श्री कार्तवीर्यार्जुनो देवता। ह्रीं बीज। क्लीं स्वाहा शक्ति । सद्य मम अभिष्टसिद्ध्यर्थं जपे विनियोग । ॐ दत्तात्रेयो हरि कृष्णो मुकुंदो नन्ददायक ' मुनिर्दिगंबरो बालो पिशाचो ज्ञानसागर । एतानि दश नामानि दत्तात्रेयस्य य पठेत् । । सिद्ध्यति तस्य कार्याणि सत्य सत्य न संशय । ॐ फ्रो कार्तवीर्य सर्वदुष्ट निवारण । सर्वत्र सर्वदातिष्टदुष्टान्नाशय पाहि माम्। दक्षे पंचशतान्बाणान्सव्ये पंचशत धनु । यो बिभर्ति सपाल्वसाक्षीभव्यालसक्षाकुलान् उत्तिष्टदुष्टदमन सप्तद्वीपैकपालक। त्वमेव

शरणं प्राप्तः सर्वतो रक्षरक्ष माम् । दुष्टघ्नः किं त्वं स्वपिषि । किं त्वं तिष्ठस्य चिरादपि । पाहिनः सर्वदा सर्व भयेभ्यो नः स्तुतानिध । गात्रभंगं स्वरैर्हीनं मुखं भंजय शत्रुणाम् । रिपूणांच सभामध्ये सर्वत्र विजयं कुरु । कार्तवीर्य खलं द्वेपि कृतवीर्य सुतो बली । सहस्रबाहुः शत्रुघ्नो रक्तवासा धनुर्धरः । रक्तगंधो रक्तमाल्यो राजास्मर्तुरभीष्टदः । द्वादशैतानि नामानि कार्तवीर्यस्य यः पठेत् । संपदस्तस्य जायंते जनः सत्रे वृशंगतः । राजानो दासतां यांति स्त्रियोऽपि वशतां ततः । आनयत्याशु दूरस्थं क्षेमलाभसुतं प्रियं । सर्वसिद्धिकरं स्तोत्रं जप्तृणां हितकामदं ।

इति श्रीदत्तात्रेयसंहितायां कार्तवीर्यार्जुनस्तोत्रं संपूर्णम्

श्री कुबेरमंत्र–अ

अस्य श्रीकुबेर महामंत्रस्य श्रीविश्रवा ऋषिः श्रीबृहता छंदः शिवमित्रं श्री धनेश्वरो देवता मम श्रीधनेश्वर प्रसाद सिद्ध्यर्थे जपे विनियोगः । ॐ श्रीविश्रवसे नमः शिरसि । बृहती छन्दसे नमः मुखे । श्रीधनेश्वर देवतायै नमः हृदि । ध्यानम् । मनुजवाह्यविमानवरस्थितं गरुडरत्ननिभंनिधिनायकं । शिवसखं मुकुटादिविभूषितं । वरगदे ददंतं भज तुन्दिलम् । धनपूर्णं स्वर्णकुम्भं तथा रत्नकरण्डकं हस्ताभ्यां विप्लुतं स्वर्णकरपात्रं च तुन्दिलं । वटाधस्ताद्रत्नपीठे प्रविष्टं सुस्मितानन्म् । यक्षाय कुबेराय वैश्रवणाय धनधान्याधिपतये धनधान्य संमृद्धिं मे देहि द्रापय स्वाहा ।

२ ॐ वैश्रवणाय स्वाहा ॐ श्रीं ॐ ह्रूं श्रीं ह्रीं क्लीं श्रीं क्लीं श्रीं वित्तेश्वराय नमः ।

अथ कुबेरमंत्र व यंत्रदर्शन–आ

हें यंत्र आंवळीच्या पानावर लिहावें. पांढऱ्या उत्पलाचीं ५ फुलें वहावीं. चंदनानें पुजा करून दुधाच नवैद्य दाखवावा. कृष्णागरुची (काळ्या चंदनाची) माळ जपाला घ्यावी. मंत्र-ॐ श्रीं क्लुं ॐ धनद

धन देहि मा' हा मत्र १०८ वेळ जपाना. गच्चीवर बसावें. श्वेतवस्त्र नेसून तोंडात सोन्याची गोळी धरून जप करावा. तेव्हा शुक्लपक्ष ९ व्या तिथीला कुबेराचें दर्शन होतें. (नित्याच्या पूजासमाप्तीच्या प्रार्थनेतील 'ॐ राजाधिराजाय प्रसह्यसाहिने महाराजायनम' येथें हा कुबेरमत्रच असून त्याचे अनुष्ठानहि आहे (गो. प्र. भा.)

यत्र

६	७	२
१	५	९
८	३	४

(७) श्रीकृष्ण मंत्र व यंत्र—धनधान्य प्राप्ति

अस्य श्री धनधान्याधिपति श्रीकृष्णमत्रस्य नारदऋषि अनुष्टुप् छदः मम धनधान्यप्राप्त्यर्थे जपे विनियोग । मत्र—

१ ॐ श्रीकृष्ण अन्नाधिपते । मम धन धान्य प्रयच्छ स्वाहा ॥

२ दुसरा मत्र—श्रीकृष्ण हरे कृष्ण सर्वज्ञ त्व प्रसीद मे ।


रमारमण विश्वेश धन धान्य प्रयच्छ मे ॥

जप सागितला असेल तेवढा करणे


श्रीकृष्णयंत्र—मनःशांत्यर्थ

ॐ नमो भगवते वासुदेवाय, नमो भगवते. १२ लक्ष जप करून रोजनिशींत लिहिणें

श्रीकृष्ण यत्र न १



श्रीकृष्ण यत्र न २



(८) श्रीगणपति मंत्र

१ अथ त्वरितमहागणपतिमंत्रसिद्धिविधानम्

श्रीगणेशाय नम.॥ द्विराचम्य। प्राणानायम्य। देशकालौ स्मृत्वा। सकलोपात्तदुरितक्षयद्वारा श्रीमहागणपतिप्रीत्यर्थं श्रीमहागणपतिप्रसादसिद्ध्यर्थं सकलसंकटत्वरित निवारणार्थं एभिर्ब्राह्मणैः सह हवनतर्पणमार्जनादि जपसंख्यासमाहित श्रीमहागणपतिप्रेरितबुद्ध्यानुसारेण संक्षेपत· कीलककवचपाठपूर्वक सुमुखादिषोडशनामघटितमहामंत्रस्य यथाशक्ति जपमहं करिष्ये। तत्रादौ निर्विघ्नतासिध्यर्थं महागणपतिस्मरण मूलमंत्रेण षडंगन्यासाश्च करिष्ये। मुख्यजपाधिकारप्राप्त्यर्थं अष्टोत्तरशतं वा अष्टाविंशतिगायत्रीजपमहं करिष्ये। ऋग्वेदमंत्रोय-आपस्तंबमंत्रो वा। ॐ गणानां त्वा ॐ शौनको गृत्समदो गणपतिर्जगती। गणपतिस्मरणे विनियोग। ॐ गणानां त्वा गणपतिं हवामहे कविं कवीनामुपमश्रवस्तमम्। ज्येष्ठराजं ब्रह्मणां ब्रह्मणस्पत आ न श्रृण्वन्नूतिभि सीद सादनम्। यजुर्वेदमंत्रोयम्। गणानां त्वा गणपतिं ँ हवामहे। प्रियाणां त्वा प्रियपतिं ँ हवामहे। निधीनां त्वा निधिपतिं हवामहे। वसो मम। आहमजानि गर्भधमा त्वमजासि गर्भधम्। श्री विघ्नहर्तृ महागणपतये नमोनमः। अविघ्नमस्तु। अथ आसनविधि। ॐ पृथिवीति मंत्रस्य० पवित्रं कुरु चासनं। ॐ भूर्भुवः स्वः। इति आसनविधि। अथ संक्षेपतः कीलकम्। ॐ गणेशाय नमस्तुभ्यं हेरंबायैकदंतिने। स्वानंदवासिने तुभ्यं ब्रह्मणस्पतये नम। ॐ गं योगाय स्वाहा ॐ गं इति २१ जप इति संक्षेपत कीलक। अथ संक्षेपत कवच। ॐ आपादमस्तकं देहं पातु सर्वत्र मे सदा। गणेशकवचं चैतद्भक्त्या य प्रपठेच्छुचि। सर्वांगानि मयूरेशो विश्वव्यापी सदाऽवतु। अनुक्तमपि यत्स्थानं धूम्रकेतु सदावतु। इति संक्षेपत कवच। ततो गायत्रीजप कुर्यात्। ॐ अस्य श्रीसुमुखादिषोडश नामघटितमहामंत्रस्य श्रीवेदव्यासऋषि। अनुष्टुप छंदः। श्रीविघ्नहर्तृमहागणपतिर्देवता।

श्रीमहागणपतिप्रीत्यर्थं जपे विनियोग । ॐ वेदव्यासाय नम शिरसि । ॐ अनुष्टुप् छंदसे नम मुखे । ॐ श्रीविघ्नहर्तृमहागणपतिदेवताये नम हृदये । ॐ श्री महागणपतिप्रीत्यर्थं जपे विनियोगाय नम सर्वांगे । ॐ सुमुखश्चैकदंतश्च अंगुष्ठा० । ॐ कपिलो गजकर्णक तर्जनी० । लंबोदरश्च विकटो मध्यमा० । ॐ विघ्ननाशो गणाधिप अनामिका० । ॐ धूम्रकेतु गणाध्यक्षो कनिष्टिका० । ॐ भाल० करतलकरपृष्ठाभ्या नम । एव हृदयादि । ॐ वक्रतुंड शूर्पकर्णो हेरंब स्कंदपूर्वज । इति दिग्बंधन । अथध्यानम् शुक्लांबरधर देव शशिवर्णं चतुर्भुज । प्रसन्नवदन ध्यायेत्सर्व विघ्नोपशातये । अथ मानसपूजा० । ॐ श्री विघ्नहर्तृमहागणपतये नम (ल) पृथिव्यात्मक गंध परिकल्पयामि नम । ॐ श्री विघ्न० पूजार्थे (ह) आका शात्मक यथा ऋतुकालोद्भवपुष्पाणि शमीपत्राणि मन्दारपुष्पाणि दुर्वांकुराश्च परिकल्पयामि नम । ॐ श्री विघ्न० आघ्राणार्थे (य) वाय्वात्मक धूप परिकल्पयामि । ॐ श्री विघ्न० प्रकाशार्थे (र) तेजात्मक दीप परि० । ॐ श्री विघ्न० तृप्त्यर्थे (व) अमृतात्मक पायसमोदकादि पक्वान्नमहानैवेद्य परि० । ॐ श्री विघ्न० सर्वोपचारार्थे (स) सर्वात्मक तांबूलदक्षिणादि सर्वोपचारान् परि० । इति मानसपूजा । जपमाला प्रार्थना ॐ महामाले महामाये सर्वशक्तिस्वरूपिणि । चतुर्वर्गस्त्वयि न्यस्तस्तस्मान्मे सिद्धिदा भव । ॐ ह्रीं सिध्यै नम । मालामध्यदेवताभ्यो नम । सर्वोपचारार्थे नमस्कार समर्पयामि ।

जपमंत्र अथ सुमुखश्चैकदंतश्च कपिलो गजकर्णक लंबोदरश्च विकटो विघ्ननाशो गणाधिप धूम्रकेतुर्गणाध्यक्षो भालचंद्रो गजानन । वक्रतुंड शूर्पकर्णो हेरंब स्कंदपूर्वज । इति ॐ जपांते माला शिरसि निधाय । त्व माले सर्वदेवाना प्रीतिदा शुभदा भव । शुभ कुरुष्व मे भद्रे यशो वीर्यंच देहि मे । माल विसृज्य । पुन पूर्वादिन्यासध्यानादिपूजन कृत्वा । प्रार्थना (गुह्यातिगुह्य० त्वत्प्रसादात् गणेश्वर) अबुद्धमतिरिक्त वा द्रव्यहीन मयाकृत । तत्सर्व पूर्णता यातु विघ्नराज नमोस्तुते । यस्य स्मरणमात्रेण जपयज्ञादिक्रि

क्रिया: । भवंति संपूर्णास्तं देवं ब्रह्मणस्पतिम् । अनेन श्रीसुखमुखादिषोडशनामग्रथितमहामंत्र अमुक संख्याजपाख्येन कर्मणा भगवान् श्री विघ्नहर्तृमहागणपतिः प्रीयतां न मम । ॐ तत्सत् ब्रह्मार्पणमस्तु ॥

(२) अथ श्रीप्रणवरूप गणेश मंत्र

अस्य श्री प्रणवरूप एकाक्षर मंत्रस्य । ब्रह्मा ऋषिः । अनुष्टुप् छंदः । एकाक्षरो देवता । अकार बीजम् । उकार शक्तिः । मकार कीलकम् सर्वाभीष्टसिद्ध्यर्थे जपे विनियोगः । अथ न्यासः अकारो अंगुष्ठाभ्यां नमः । हृदयाय नमः ॥ उकारो तर्जनीभ्यां नमः । शिरसे स्वाहा ॥ मकारो मध्यमाभ्यां नमः । शिखायै वषट् ॥ अकार अनामिकाभ्यां नमः । कवचाय हुं ॥ उकारः कनिष्ठिकाभ्यां नमः । शिखायै वौषट् ॥ मकारः करतलकरपृष्ठाभ्यां नमः । अस्त्राय फट् ॥




प्रणवरूप गणपति म्हणजे ॐ कार गणपति

ध्यानम् : गणेशं प्रथमाधीशं निर्गुणं सगुणं शिवम् । योगिनो यत् पदं यान्ति तं गौरीनन्दनं भजेत् ॥

अथ मंत्रः 'ॐ गं ॐ'


फलम् : ऱ्हस्व, दीर्घ, प्लुत, उच्चाराने तीन फले मिळतात. ऱ्हस्व उच्चारानें अ-मृतत्न, दीर्घ उचारानें श्री-प्राप्ति आणि प्लुत उचारानें ज्ञानप्राप्ति.[1]

गणेशयंत्र



(तर्पणाचें.)

गणेशयंत्र



(उपासनेचें)

(३) उच्छिष्ट गणपती मंत्रः

अस्य श्रीउच्छिष्ट गणपतिमन्त्रस्य। गणेश ऋषि। गायत्री छंद। उच्छिष्ट गणपतिर्देवता। ममाभीष्ट सिद्धयर्थे जपे विनियोग ॥

ध्यानं :—शराधनुः पाशसृणी स्वहस्तैर्दधानमारक्तसरोजहस्त विरक्त पत्न्यासुरतप्रवृत्तम् उच्छिष्टमम्बासुतमाश्रयेऽहं ॥ अथ मंत्रः

"ॐ नमो भगवते एकदंष्ट्राय हस्तिमुखाय लंबोदराय उच्छिष्ट-महात्मने आं क्रों ह्रीं गं घे घें स्वाहा" (वा नो ग्रीं ह्रीं उच्छिष्टाय स्वाहा —गो. प्र. भा)

गणेश बलिमंत्र १. गं हं क्लौं ग्लौं उच्छिष्टगणेशाय महायक्षायाय बलि।

२. ॐ ह्रीं गं हस्ति पिशाचि लिखे स्वाहा।

---

१. 'शिक्षा' नावाच्या वेदग्रंथात मंत्रशब्दोच्चार कसे व का करावे आणि तसे न केल्यास अनर्थ कसे ओढवतात हे आधुनिक विज्ञानवाद्यांना चकित करणारे वर्णन अवश्य वाचावें—(गो. प्र. भा)

३. ॐ गं हस्ति पिशाचि लिखे स्वाहा।
४. ग हस्ति पिशाचि लिखे स्वाहा।
५. ॐ नमो उच्छिष्टगणेशाय हस्तिपिशाचिलिखे स्वाहा।

(४) शक्ति विनायक गणपति मंत्रः

अस्य श्री शक्तिगणाधिपमंत्रस्य भार्गव ऋषि.। विराट् छंदः। शक्तिगणाधिपो देवता। ह्रीं शक्तिः। ग्री बीज। ह्रीं कीलकम् ममाभीष्टसिद्धयर्थे जपे विनियोगः।

ॐ ग्रा हृदयाय नम.। अंगुष्ठाभ्यां नम।
ॐ ग्रीं शिरसे स्वाहा। तर्जनीभ्या नम.।
ॐ ग्रूं शिखायै वषट्। मध्यमाभ्या नम'।
ॐ ग्रै कवचाय हुं। अनामिकाभ्या नम.।
ॐ ग्रौ नेत्रत्रयाय वौषट्। कनिष्ठिकाभ्या नमः।
ॐ ग्र. अस्त्राय फट्। करतलकरपृष्ठाभ्या नमः।

ध्यानं :— विशानांकुशाक्षसूत्र च पाश दधानं करैर्मोदक पुष्करेण स्वपत्न्यायुतं हेमभूषाभराढ्य गणेश समुद्यद्दिनेशाममीडे। मत्रः ॐ ग्री ह्रीं

(५) कामना सिद्धये वेचन गणेशमंत्राः

दीक्षित गुरूकडून गणेश मत्र घ्यावा. गायत्रीमंत्राचा दहा हजार जप करावा. नंतर इष्ट मंत्राचा दहा हजार जप करावा. तसेच पूर्वी सांगितल्याप्रमाणे पुरश्चरणविधि करावा.

(अ) आयुःकामार्थे हरगौरीसहित श्रीगणेशतर्पणम्

शुद्ध प्रतिपदमारभ्य एकविंशतिदिनानि यावत् पयसा मीलितैर्द्रव्यैः प्रतिदिन ४४ तर्पणानि कार्याणि।

ॐ ग गणपतिं पुष्टिसहित तर्पयामि। चतुर्वारम्
ॐ ग तर्पयामि ॥ ४ ॥ ॐ ह्रां ह्रीं हरसहिता गौरीं तर्पयामि ॥ ४ ॥
ॐ क्लीं श्रीं मनोभवसहिता रतिं तर्पयामि ॥ ४ ॥
ॐ ग्लौं वराहसहिता भुवं तर्पयामि ॥ ४ ॥
ॐ ग सिद्धिसहित सुमुख तर्पयामि ॥ ४ ॥
ॐ ग दुष्टदलनसहित दुर्मुख तर्पयामि ॥ ४ ॥
ॐ ग क्षेमसहित विघ्नराज तर्पयामि ॥ ४ ॥
ॐ ग अभयासहित विद्याकर्तारं तर्पयामि ॥ ४ ॥
ॐ श शंखनिधिं तर्पयामि ॥ ४ ॥
ॐ प पद्मनिधिं तर्पयामि ॥ ४ ॥ हे सर्व तर्पण ११ वेळा करावे.

(४ तर्पणं चतुर्वारम्।)

(आ) विद्यार्थे–हरगौरी गणेशतर्पणम् ।

चतुर्दशीमारभ्य एकादशीपर्यंत नद्यावर्ते पुष्पै प्रतिदिनं ४४ तर्पणानि कार्याणि म्हणजे वरील तर्पण ११ वेळा करावें

(१) वरार्थे–रतिसहित कामराज गणेश तर्पणम् । चतुर्थीमारभ्य चतुर्दशीपर्यंत एकादशदिन अलर्कपुष्पै प्रतिदिन १४४ वार 'ॐ श्री रतिसहित कामराज तर्पयामि' । पूजांग तर्पणम्

(२) वरार्थे कन्यार्थे वा मूलमंत्र (अष्टाविंशत्यक्षरगणेशमंत्र)[1] शुद्ध प्रतिपदमारभ्य शुद्धद्वितीयापर्यन्त दिनद्वय कार्येनौषधी योगेन पूजांग तर्पणवत् तर्पणम् । प्रति मासे द्वादश मास पर्यन्तम् ॥

(३) क्लेश निवारणार्थे रोगोपशांतये मृत्युंजय तर्पणम् । प्रतिपदमारभ्य

---

१. अष्टाविंशत्यक्षर गणेशमंत्र. 'ॐ श्रीं ह्रीं क्लीं ग्लौं ग गणपतये वरवरद सर्वजन मे वशमानय स्वाहा.' कोणताही मंत्र गुरुमुखातून घेतल्यासच अनुष्ठान वा साधना फलद्रूप होत असते हें विसरू नये.

(गो. म. भा.)

चतुर्दशीपर्यन्तं जातिपुष्पैर्दूर्वांकुरैर्वा मृत्युंजय जप–'त्र्यंबकं यजामहे' इति संपूर्ण मन्त्रान्ते गिरिजेशं तर्पयामि इति प्रतिदिनं २३५ मितानि तर्पणानि कार्याणि एवं चतुर्वारं ।

(४) उपकारार्थं ग्रामे वा अन्य प्रदेशे-शुद्ध प्रतिपदमारभ्य वा यस्मात् कस्माद्दिनादारभ्य सप्तदिनावधि 'ॐऋद्धिसहितमामोदं तर्पयामि' बिल्वैर्वादूर्वांकुरैः शुद्ध जलेन वा प्रतिदिनं ४४४० वारं तर्पणं। अनेक लाभो भवति।

(५) क्षेत्रस्य मूषकादकाटकोपद्रवनाशार्थं-मूलमंत्र तर्पणम्। मूलमंत्र (अष्टविंशत्यक्षरात्मकः) चतुर्थीमारभ्य पंचविंशतिदिनपर्यन्तं प्रतिदिनं शुद्धजलेन मूलेन ५२१ वारं तर्पणम्। उपद्रवदिनमारभ्य दिनसप्तकं अष्टकं वा यावत् शान्तिपर्यन्तं प्रतिदिनं कर्तव्यम्।

(इ) पुत्रप्राप्तये उमापुत्रतर्पणम्

कृष्णचतुर्थीमारभ्य त्रिंशद्दिनपर्यंतं प्रतिदिनं 'ॐ उमापुत्रं तर्पयामि' चूतवृक्षपुष्पैर्वा दूर्वांकुरैर्वा शुद्धजलेन प्रतिदिनं ४४४ तर्पणानि कृत्वा तेन तर्पणोदकेन भार्यामभिषिंचेत्। गणेशप्रीत्यर्थं दशब्राह्मणान् भोजयिष्ये। दीर्घायुः पुत्रो भवति। एवं चतुर्वारं कर्तव्यम्।

(ई) पर्जन्यार्थे मेघतर्पणम्

आर्द्रानक्षत्रदिनमारभ्य विशाखापर्यन्तं द्वादशदिनम् नाभिमात्रोदके स्थित्वा अष्टोत्तरसहस्रचत्वारिंशतसंख्याकं वा (१४०) जपं कृत्वा कर्पूरसुवासजलेन शुद्धजलेन वा 'ॐ गजेन्द्रसहितं मेघं तर्पयामि' एवं (११४) वारं तर्पयामि। प्रतिदिनम् महावृष्टिर्भवति।

(उ) वश्यार्थे

शुद्धचतुर्थीमारभ्य अन्यशुद्धचतुर्थीपर्यन्त प्रत्यह ४४४ वार 'ग्लौं ग्लं। गणपते सर्वजन मे वशमानय स्वाहा' इति मन्त्रेण तर्पण कार्यं। इष्टोपि वश्यता याति अन्येषा च का कथा'

(ऊ) स्तंभनार्थे

प्रतिपदमारभ्य द्वादशीपर्यन्त ४४६६ वार 'ॐ ग्लौं श्रीं विष्णुसहिता श्रिय तर्पयामि' इति मन्त्रेण श्रीवृक्षपत्रर्वा दूर्वांकुरर्वा शुद्धजलेन तर्पयेत। गजादय सर्वेपि पशवा स्थिता भवन्ति।

(ऋ) दुष्टनिर्दलनार्थे

प्रतिपदमारभ्य अमावास्यापर्यन्त (३०) श्रीवृक्षपत्रैं दुर्वांकुर्वा शुद्धजल 'ॐ सिद्धिसहितमामोद तर्पयामि'। इति प्रत्यह ४४४ वार तर्पण कृत्वा दुर्जनोच्चाटन भवति।

(ॠ) क्षेमार्थे

शुद्धचतुर्थीमारभ्य पूर्णिमापर्यंतम् दूर्वांकुरैर्दुग्धेन वा शुद्धजलेन प्रत्यह 'क्षेमदायिनिसहित विघ्नराज तर्पयामि' इति (२४४) वार तर्पण कारयेत।

(ऌ) संकटविनाशार्थे बंधनमुक्त्यर्थे

चतुर्थीमारभ्य त्रिंशत् दिनावधिपर्यन्त दूर्वांकुरै शुद्धजलेन प्रत्यह (४२१) वार 'ॐ अभयासहित विघ्नकर्तार तर्पयामि' इति कृत्वा बंधमुक्तो भवति।

(ॡ) नष्टनिधिक्षेपादिद्रव्यप्राप्त्यर्थे

रक्तप्रसून-(पिवळी कोराटी)-दूर्वांकुरैर्वा शुद्धजलेन चतुर्थीमारभ्य

पचचत्वारिंशत् दिनपर्यंत प्रत्यह (४४२) वार 'ॐ श शखनिधि तर्पयामि'। इति तर्पयेत्। नष्टद्रव्य आशु प्राप्नुयात्।

(ए) नष्टद्विपदचतुष्पदार्थ प्राप्त्यर्थे

शुक्लचतुर्थीमारभ्य सार्धमास यावत् प्रत्यह रक्तोत्पलनीलोत्पलदूर्वांकुरै वा 'ॐ आ ह्रीं क्रो य र ल व श ष स ह ळ क्षं हस सोह पद्मनिधि तर्पयामि' इति ४४४४ तर्पणानि कुर्यात्। मनुष्याणि चतुष्पदानि यानि नष्टानि तानि शीघ्र गृहमागत्य गृहद्वारे तिष्ठन्ति।

(ऐ) उत्कटतेजः प्राप्त्यर्थे

शुक्लचतुर्थीमारभ्य कृष्णचतुर्थीपर्यन्त गिरिकर्णिकापुष्पैः त्रिलोमदूर्वांकुरैर्वा शुद्धजलेन ४२१ वार 'ॐ म मदद्राविणीं तर्पयामि' इति तर्पण चतुर्वार कुर्यात।

(ओ) राजसभायां प्रतिवादी दिव्यघट स्तंभनार्थे

प्रतिपदमारभ्य सप्तदिनपर्यन्त 'ॐ ध वक्रतुडाय नम' इति मत्र विपरीत (उलटा) अयुत जप कृत्वा दूर्वांकुरैर्वा गोरोचनोदकेन शुद्धजलेन वा प्रत्यह भगवत ५४२ वार तर्पयेत्। एव चतुर्वार कृत्वा यशस्वी भवति। सर्वदुष्टा पराङ्मुखा भवन्ति।

(औ) भार्याव्यसनकाले तथा नानाव्यसननिवारणार्थे

एव नानाकार्यसिद्ध्यर्थे साधारण प्रतिबीज तर्पणम्। दूर्वांकुरै शुद्धजलेन वा चतुर्थीमारभ्य एकविंशतिदिनपर्यन्त 'ॐ ग गणपति तर्पयामि' इति ४४४ वार तर्पयेत्। सर्वकार्याणि सिध्यन्ति॥

(क) अथ काम्यप्रयोगाः

विजयार्थं श्वेतार्कमूलेन गजदन्तेन वा अंगुष्ठपर्वमात्र गणेश कारयेत्। तस्याग्रत कुशापिण्डिकोपरि उपविश्य चन्द्रग्रहणे पर्वकाले वा अष्टाविंशति अक्षररूप मंत्र जपेत्। सकृत् पुरश्चरण भवति। त गणेश शिखाया बन्धेत्। वृद्धस्य अल्पशिखाचेत् तन्मूर्ति पेटिका निधाय सा पेटिका गले वा दण्डे बध्नियात्। राजसभाया व्यवहारे च अजयश्चेत् जयो भवति।

(ख) वश्यार्थे

दधिमधुघृताक्ततिलाना अष्टाविंशत्यक्षरगणपतिमंत्रेण जुहुयात् अवश्योपि वश्यो भवति।

(ग) वस्तुलाभार्थे

चतुर्थीप्रारभ्य चतुर्थीपर्यंत एक मास यावत् बृहतीपुष्प पूजयेत्। बृहती पुष्प (श्वेतार्कपुष्पाणि वा पारिजातकपुष्पाणि) यत्र यत्रोपगच्छेत् तत्र तत्र ईप्सितवस्तुलाभो भवति।

(घ) स्तंभन बंधन मोहन बंधमोक्ष मेघ वर्षण शोषण पश्वाद्यर्थ


तिलाना घृताक्ताना अष्टाविंशत्यक्षरमंत्रेण अष्टोत्तरसहस्र जुहुयात् यद्यद् ईप्सित तदात्मक विनियोग कृत्वा।

राजान स्तम्भयति, परसैन्य स्तम्भयति, पडितान्मोहयति, शृंखला च त्रोटयति, मेघान्वर्षयति, अतिवृष्टिं शोषयति, राजान वश्य करोति॥

(च) विद्यार्थे

मोदकाना अष्टसहस्र पूर्वकथितमनुना जुहुयात्। महान् विर्भवति।

सिद्ध गणेश यंत्र[1]



१. सदरहू यंत्र ब्र. भू. नारेश्वरवासी रंगावधूत महाराजांकडून मिळालें. अलीकडे १९६९–७० मध्यें हेंच यंत्र 'सिद्धसाहित्य संशोधन प्रकाशन मंडळ–पुणें ४ यांनीं प्रसिद्धिलें आहे.

'ॐ' या प्रणवाचें वर्णन व उत्पत्ति ही माहिती शिवपुराणात असून त्याची उत्पत्ति 'प्र'–प्रकर्षेण, 'न' नयेत, 'वः'–युष्मान् मोक्षम् 'इति' 'प्रणवः' अशी आहे. (गो. प्र. भा)

(छ) गणेश बीजांचा विनियोग

दुर्भाग्य–शमनार्थं रोग–शमनार्थं च

क्षीरवृक्ष शाखा (मांदारपुष्प) अष्टोत्तर सहस्रमंत्रेण अभिमंत्रयेत् गणेश तान् समर्पयेत्। अनंतर अभिषेकं कुर्यात्। दौर्भाग्य नश्यति। सर्वे रोगा प्रणश्यन्ति। अलक्षण नश्यति। लक्ष्मीर्मेधा शरीरकान्तिश्च सुलभा भवति।

(ज) क्षेत्रप्राप्त्यर्थे (शेती) गणेशमंत्रे

दूर्वांकुराणां दधि मधु घृताक्तानां गणेश मनुना अष्टसहस्र जुहुयात् क्षेत्रलाभो भवति।

आकर्षणार्थं–अधमपुरषाकर्षणे गम्, उत्तमपुर० कर्षणे गाम्, मध्यम पुरष० कर्षणे गीम्, कलहशमनार्थे गोम्, धनार्थे गेम्, स्तंभनार्थे गम्,

---

१. ‘कलौ चण्डीविनायकौ’ ह्या वचनाप्रमाणें कलियुगामध्यें गणपति व देवी ह्या दोन देवतांची उपासना सद्य फलदायी म्हणून महत्त्वाची समजली जाते व तसा अनुभवही येतो. सर्व भारतभर ह्या दोन देवतांचे उपासक सर्वांत जास्त आहेत असे आढळतें. संकटग्रस्त व्यवहारी जगात ह्याच दोन देवता लवकर पावून मदत करतात, संकटमुक्त करितात वा रस्ता दाखवितात, असे आढळत गणेश कोश (१९६८) ह्या ग्रंथात व देवीखंड ह्यात त्या त्या देवतांच्या मंत्राची पण माहिती दिलेली आहे, पण विधिविधान कमी दिलेलें आहे. देवीकोश (आदिशक्तीचें विश्वस्वरूप) ह्या खण्डचतुर्थात्मक ग्रंथात देवींच्या मंत्रतंत्राची माहिती नाहीं। पण सप्तशति या प्रसिद्ध ग्रंथातील प्रत्येक मंत्र वा श्लोक हा एक अद्वितीय मंत्रच असून त्याचा विनियोग व साधना ह्या गोष्टींची इतरत्र क्वचितच मिळणारी अधिक माहिती याच ‘मंत्रशास्त्र’ ग्रंथात पुढे दिलेली आहे. तसेच अलीकडे (१९६९) प्रसिद्ध झालेल्या ‘श्रीगणेश उपासना’—द. श. केळकर— या ग्रंथात काहीं दुर्मिळ मंत्र दिलेले आहेत. पण चुका असून विधी नाहींत गणपती व देवी ह्या प्रत्येक देवतेची उपासनापद्धति भारतात निरनिराळ्या पद्धतीनें चालते. (गो म मा)

उच्चाटनार्थं गः अनेन प्रकारेण बीज प्रयुक्तस्य मूल मंत्रस्य कार्यानुसारेण सुसाध्य दुःसाध्यादि विचार विमर्शन पुरःसरं एकायुनमारम्य पंच लक्ष पर्यंनम् सम्यक् पुरश्चरणेन कार्यसिद्धि. ॥

(६) चिंतामणी मंत्र

अस्य श्रीचिंतामणी मंत्रस्य । कश्यप ऋषिः । अनुष्टुप् छंदः । उमा-महेश्वरो देवता । रेफो बीजं । उकार शक्तिः । क्ष्म्यौ कीलक । चिंतामणि प्रसादसिद्धये जपे विनियोगः ।

मंत्र—'रकारमरय ॐ उं ॐ क्ष्म्यौं' लक्ष पुरश्चरणं । त्रिमधु (दधि, घृप, मधु) युक्त तंदुलेन अयुत हवनं (१०,००० मंत्रः)

चिंतामणि हें गणेशाचेंच नांव आहे. नागपूर-यवतमाळ ह्या मोटारीच्या रस्त्यावर यवतमाळपासून जवळ कळंब ऊर्फ कदम्बपूर हें गांव आहे. तेथें पायविहिरींत चिंतामणीचें देऊळ आहे. हा गणपति स्वयंभू आहे. असे स्वयंभू गणपति भारतांत एकवीस आहेत. गौतम ऋषीच्या शापामुळे इंद्र 'सहस्रभग' बनला होता. शापमुक्त होण्यासाठीं या चिंतामणि गणेशाची इंद्रानें स्थापना करून त्याची उपासना केली. तो प्रसन्न झाला व त्याच्या अंगाला पडलेल्या भगाचे नेत्र बनले! व इंद्राला 'सहस्र नेत्र' हे नांव मिळालें! ती शेंदूरचर्चित चिंतामणिमूर्ति सुमारें तीन फूट उंचीची आहे. मोटारीनें जाणारे प्रवासी येथें उतरून दर्शन घेऊन जातात.

असा दुसरा स्वयंभू गणपति नागपूर जिल्ह्यातील सावनेर या तालुका गावापासून ५ मैल अंतरावर अदासा या गावीं आहे. हें डोंगरावरील देऊळ '*शमी विघ्नेशाचें*' स्वयंभू देऊळ आहे. (गो. प्र. भा.)

(९) श्रीगौरी मंत्र

अस्य श्रीभुवनेश्वरी बीज मंत्रस्य । शक्ति ऋषिः । गायत्री छंद. । सुरमंत्र-सेविता जगद्धात्री श्रीभुवनेश्वरी देवता । मम श्रीभुवनेश्वरीप्रसादसिद्ध्यर्थे जपे

विनियोग । ॐ शक्ति ऋषये नम शिरसि । गायत्री छन्दसे नम मुखे । श्रीभुवनेश्वर्यै नम हृदि ।

ध्यान —उद्यदिनद्युतिमिन्दुकिरीटां तुङ्गकुचां नयनत्रययुक्ताम् स्मेरमुखीं वरदाङ्कुशपाशाभीतिकरां कलये भुवनेशीम् । अथ मंत्र ॐ श्रीं गायै नम ।

(१०) दत्तात्रेय मंत्राणि

(अ) अस्य श्रीदत्तात्रेय मंत्रस्य । शबर ऋषि । गायत्री छंद । श्री दत्तात्रेयो देवता । द्रां बीज । ह्रीं शक्ति । क्रों कीलकम् । मम दत्तात्रेय प्रसादार्थं जपे विनियोग । द्रां द्रीं द्रूं द्रैं द्रौं द्रः इति षडंगम् ।

ध्यान —रविमण्डलमध्यस्थं रक्तरक्ताब्जसंस्थितम् ।
योगारूढं ज्ञानघनं दत्तात्रेयमहं भजे ॥

मंत्र—ॐ द्रां ह्रीं क्रौं दत्तात्रेयाय विद्महे योगीश्वराय धीमहि । तन्नो दत्त प्रचोदयात् । (दत्त गायत्री)

(आ) दत्तात्रेय मंत्र

अस्य श्रीदत्तात्रेयमंत्रस्य । ब्रह्मा ऋषि । गायत्री छंद । दत्तात्रेयोदेवता । आं बीज । ह्रीं शक्ति । क्रौं कीलकम् । 'आं ह्रीं क्रौं आं ह्रीं क्रौं' इति षडंगम् । ध्यान पूर्वोक्तच ध्यावें

मंत्र १ ला—ॐ आं ह्रीं क्रां एहि दत्तात्रेयाय स्वाहा ।

मंत्र २ रा—दत्तात्रेयाय नम ।

मंत्र ३ रा—श्रीं ह्रीं क्लीं दत्तात्रेयाय स्वाहा ।

मंत्र ४ था—द्रां दत्तात्रेयाय नम ।

मंत्र ५ वा—द्रां आं दत्तात्रेयाय नम ।

श्री एकाक्षरी दत्तमंत्र—द्रां ॥

दत्त षडक्षर मंत्र—द्रां ओं दत्तात्रेयाय नम ।


(इ) षोडषाक्षरी दत्तात्रेय मंत्र

ॐ ऐं क्रों क्लीं क्लूं ह्रां ह्रीं ह्रूं सौं दत्तात्रेयाय स्वाहा ।
एतन्मत्रस्य सदाशिव ऋषि गायत्री छंद दत्तात्रेयोदेवता ॥

ॐ बीज । स्वाहा शक्ति । दत्तात्रेयाय कीलकम् । चतुर्विध पुरुषार्थे जपे विनियोग । अथन्यास । ॐ हृदयाय नम । क्रो शिरसे स्वाहा । क्ला क्लीं क्लूं इति शिखाया । सौ इति कवचाय हु । दत्तात्रेयाय इति नेत्रत्रयाय वौषट् । स्वाहा इति अस्त्राय फट् । सर्व मत्रेषु ध्यान उपरिनिर्दिष्ट ग्राह्य ।

(ई) श्रीदत्त यंत्र व मंत्र

बिंदुत्रिकोण षट्कोणद्वारचतुष्टय एव यत्रविधानेन दत्तात्रेयश्च देवता




मध्ये सर्वशक्ति कमला सनाय नम । पूर्वद्वारे ह्रीं । पश्चिमद्वारे श्रीं । उत्तरे वृदावृद क्लीं । दक्षिणे वृदावृद आ । ईशानकोणे क्लीं । आग्नेयकोणे श्रीं ।

मत्र—'आ ह्रीं क्रौं ह्रीं श्री आ दत्तात्रेयाय स्वाहा' (१० लक्ष जप)

(उ) श्रीदत्त यंत्र व मंत्र

अथ ध्यानं.—केनोपमा० मानसोपचारै सपूज्य योन्या प्रणम्य तार, नवार्णं, 'का सोस्मिता' ऋच तार रमा माया पु० कामादिबीज। दुर्गे स्मृतेत्यर्धं।ताररमा माया कामादि वदति ऋच दारिद्र्य दु खे एतत्यर्धमते तार रमा माया। कामपुटा 'कासोस्मिति' ऋच तार रमा माया कामपुटा 'चामुण्डायै विच्चे' इति यथाकार्यलक्षमयुत सहस्र शत वा जपेत्। कार्यसिद्धिर्भवति। दाशाश क्षीराज्य हवन। तद्दशाश तर्पणं। मार्जन। सुवासिनी ब्राह्मण भोजनम्।

॥ अथ श्रीसूक्त प्रारम्भः ॥ (श्रीरंगावधूतमहाराजात् प्राप्तम्)

॥ श्रीगणेशाय नम ॥ हिरण्यवर्णामितिपचदशर्चस्यसूक्तस्यआनद कर्दमश्चिक्लीतेदिरासुताऋषय ॥ श्रीर्देवता ॥ अनुष्टुप् छद ॥ ऐं बीजम्॥ ॥ सो शक्ति ॥ क्लीं कीलकम् ॥ ममदारिद्र्य परिहारार्थं ऐश्वर्यप्राप्त्यर्थं श्रीसूक्तजपेविनियोग· ॥ अथ न्यास ॥ आनदः कर्दमश्चिक्लीतेंदिरासुता— ऋषिभ्योनम शिरसि। अनुष्टुप छदसे नम मुखे। श्रीर्देवताये नम हृदये॥ ऐं बीजाय नम दक्षिण स्तने॥ सौ शक्त्यै नम वामस्तने। क्लीं कीलकाय नम नाभौ। ऐं अगुष्ठा०। ह्रीं तर्जनीभ्या०। श्रीं मध्य०। ऐं अना०। ह्रीं कनिष्ठिका०। श्रीं करतलकर०॥ एव हृदयादि॥ भूर्भुव स्वरोम् इति दिग्बध ॥ अथ ध्यानम् अरुणकमलसस्था तद्रज पुञ्जवर्णा करकमलधृतेष्टा भीतियुग्माम्बुजा च। मणिमुकुटविचित्रालङ्कृता कल्पजातैर्भवतु भुवनमाता सन्तत श्री श्रियै न ॥ मानसोपचारे सम्पूज्य॥ श्रीसूक्त जपे विनियोग ॥ ॥ ॐ ऐं ॐ हिरण्यवर्णां हरिणीं सुवर्णरजतस्रजा। चन्द्रां हिरण्मयीं लक्ष्मीं जातवेदो म आवह ॥ १ ॥ ॐ ऐं ॐ ह्रीं ॐ ता म आवह ह्रीं जातवेदो लक्ष्मीमनपगामिनीम्। यस्या हिरण्य विन्देय गामश्व पुरुषानहम् ॥ २ ॥

ॐ ऱ्हीं ॐ श्रीं ॐ अश्वपूर्वां रथमध्या हस्तिनादप्रबोधिनीम्। श्रियं देवीमुपह्वये श्रीर्मादेवीर्जुपताम् ॥ ३ ॥ ॐ श्रीं ॐ क्लीं ॐ का सोस्मिता हिरण्यप्राकारामार्द्रां ज्वलन्तीं तृप्तां तर्पयन्तीम्। पद्मे स्थितां पद्मवर्णां तामिहोपह्वये श्रियम् ॥ ४ ॥ ॐ क्लीं ॐ वदवद ॐ चन्द्रां प्रभासां यशसा ज्वलन्तीं श्रियं लोके देवजुष्टामुदाराम्। तां पद्मिनीम् शरणमहं प्रपद्ये। अलक्ष्मीर्मे नश्यतां त्वां वृणे ॥ ५ ॥ ॐ वदवद ॐ वाग्वादिनी ॐ आदित्यवर्णे तपसोऽधिजातो वनस्पतिस्तव वृक्षोऽथ बिल्वः। तस्य फलानि तपसा नुदन्तु मायान्तरा याश्चबाह्या अलक्ष्मी ॥ ६ ॥ ॐ वाग्वादिनी ॐ ऐं ॐ उपैतु मां देवसखः कीर्तिश्च मणिना सह। प्रादुर्भूतोऽस्मि राष्ट्रेऽस्मिन् कीर्तिमृद्धिं ददातु मे ॥ ७ ॥ ॐ ऐं ॐ सौं ॐ क्षुत्पिपासामलां ज्येष्ठमलक्ष्मीं नाशयाम्यहम्। अभूतिमसमृद्धिं च सर्वां निर्णुद मे गृहात् ॥ ८ ॥ ॐ सौं ॐ हंसः ॐ गन्धद्वारां दुराधर्षां नित्यपुष्टां करीषिणीम। ईश्वरीं सर्वभूतानां तामिहोपह्वये श्रियम् ॥ ९ ॥ ॐ सोहं ॐ आ ॐ मनसः काममाकूतिं वाचः सत्यमशीमहि। पशूनां रूपमन्नस्य मयि श्रीः श्रयतां यशः ॥ १० ॥ ॐ आ ॐ ह्रीं ॐ कर्दमेन प्रजा भूता मयि संभव कर्दम। श्रियं वासय मे कुले मातरं पद्ममालिनीम् ॥ ११ ॥ ॐ ह्रीं ॐ क्रों ॐ आपः सृजन्तु स्निग्धानि चिक्लीत वस मे गृहे। निचं देवीं मातरं श्रियं वासय मे कुले ॥ १२ ॥ ॐ क्रों ॐ क्रीं ॐ आर्द्रां यः करिणीं यष्टिं सुवर्णां हेममालिनीम्। सूर्यां हिरण्मयीं लक्ष्मीं जातवेदो म आवह ॥ १३ ॥ ॐ क्रीं ॐ ब्लीं ॐ आर्द्रां पुष्करिणीं पुष्टिं पिङ्गलां पद्ममालिनीम्। चन्द्रां हिरण्मयीं लक्ष्मीं जातवेदो म आवह ॥ १४ ॥ ॐ ब्लीं ॐ हुं तां म आवह जातवेदो लक्ष्मीमनपगामिनीम्। यस्यां हिरण्यं प्रभूतं गावो दास्योऽश्वान्विन्देयं पुरुषानहम् ॥ १५ ॥ ॐ हुं ॐ स्वाहा ॐ यः शुचिः प्रयतो भूत्वा जुहुयादाज्य-

मन्वेहम् । सूक्तं पञ्चदशर्चं च श्रीरामे सततं जपेत् ॥ १६ ॥ ॐ स्वाहा ॐ ॥ इति श्री सूक्त विधानम् ॥ ॐ ऐं सौं क्लीं ऐं ह्रीं श्रीं क्लीं वदवद् वाग्वादिनी ऐं सौं हस आ ह्रीं क्रो क्री खीं हु स्वाहा ॥ इति विद्यारण्यभाष्यत ॥ श्रीसूक्तविधानम् समाप्तम् ।

ॐ पद्मानने पद्मऊरू पद्माक्षि पद्मसंभवे । तन्मे भजसि पद्माक्षि येन सौख्य लभाम्यहम् । ॥ १७ ॥ पद्मानने पद्मिनी पद्मपत्रे पद्मप्रिये पद्मदलायताक्षि । विश्वप्रिये विश्वमनोनुकूले त्वत पादपद्म मयि सन्निधत्स्व ॥ १८ ॥ अश्वदायि गोदायै धनदायै महाधने धनं मे जुषता देवि सर्व कामाश्च देहि मे ॥ १९ ॥ पुत्रपौत्र धन धान्य हस्त्यश्वाश्वरी रथम् । प्रजाना भवसि माता आयुष्मंत करो तु मे ॥ २० ॥ धनमग्निर्धन वायुर्धन सूर्यो धन वसु धनमिंद्रो बृहस्पतिर्वरुणो गोधनमश्विना ॥ २१ ॥ वैनतेय सोमं पिब सोमं पिबतु वृत्र हा । सोम धनस्य सोमिनो मह्य ददातु सोमिनः ॥ २२ ॥ न क्रोधो नर्च मात्सर्य न लोभो नाशुभा मति· भवन्ति कृतपुण्याना भक्त्या श्रीसूक्तजापिनाम् ॥ २३ ॥ सरसिजानिलये सरोजहस्ते धवलतराशुक गधमाल्यशोभे । भगवति हरिवल्लभे मनोज्ञे त्रिभुवनभूतिकरि प्रसिद् मह्यम् ॥ २४ ॥ श्रीर्वर्चस्वामायुष्यमारोग्यमाविधाच्छोभमान महीयते । धान्य धन पशु बहुपुत्रलाभ शतसंवत्स दीर्घमायु ॥ २५ ॥ ॐ महालक्ष्मी चं विद्महे विष्णुपत्नीचं धीमहि । तन्नो लक्ष्मी प्रचोदयात ॥ २६ ॥ ॐ महादेव्यै चं विद्महे विष्णुपत्न्यै चं धीमहि । तन्नो लक्ष्मी· प्रचोदयात ॥ (ही लक्ष्मी गायत्री तन्त्रग्रथानून आहे आणखी गायत्री आहेत,) इति पचविंश्यत्यर्चं श्रीसूक्त ॥ ॐ महालक्ष्मीचं विद्महे महाश्रियै चं धीमहि । तन्न श्री प्रचोदयात् ॥ आनद कर्दम श्रीदश्चिक्लीते इति विश्रुता । ऋषयश्च श्रियै पुत्रा श्रीर्देवीर्देवतामेता ऋणरोगादि दारिद्र्यपाप क्षुमदपमृत्यव । भयशोक मनस्तापा नश्यन्तु मम सर्वदा ॥

७ श्रीमद्भगवद्गीता-भागवत-ज्ञानेश्वरी मंत्र विधान


भगवद्गीता सप्ताह पद्धति व यंत्रपूजा

श्री मद्भगवद्गीता अनुष्ठान : सर्व भगवद्गीता हा एक सिद्धमन्त्रच आहे. त्यातील कांहीं मन्त्र विशेष उपयोगी आहेत. त्याचा विनियोग पुढें दिला आहे.

गीतायन्त्राचा उपयोग : पृष्ठ ३५६ वर दिल्याप्रमाणें ताम्र्याचें यन्त्र तयार करून त्याची यथासाग (अर्घ्य-पाद्य, आचमन, स्नान, चंदन, तुलसीपत्र, पुष्प, धूप, दीप, नैवेद्य, शुद्धाचमन व ताम्बूल) पूजा करून रोज सातशें श्लोक वाचन असे ७ दिवस करावें प्रारंभीं संकल्प करून उदक सोडणे असें केल्यास सर्व *कार्यसिद्धी* होते. सांगता ब्राह्मण–सुवासिनी भोजनानें करावी.

१) *मनुष्य वा प्राणिमात्र याचा रोगनाश* : अकराव्या अध्यायाचा ३६ वा श्लोक, "स्थाने हृषीकेश सघा." याने पाणी अभिमन्त्रित करून रोग्यास पाजावें २) यानें *भूतबाधाहि निरसन* होते. दर्भ वा कडुनिंबाच्या काडीनें अभिमन्त्रित पाण्याने झाडल्यास पिशाच्च उतरतें. ३) *लक्ष्मीप्राप्ति*—अध्याय ११ श्लोक ४० वा रोज १०८ वेळा जपण्याने लक्ष्मी प्राप्त होते ४) *सर्वसमृद्धि व दारिद्र्यनाश* : अध्याय ११ श्लोक ३९ 'वायुर्यमोऽग्नि-नमस्ते' याचा रोज १०८ वेळा पाठ करावा.

अध्याय	श्लोक संख्या	साप्ताहिक क्रम	त्र्यहिक क्रम	द्व्यहिक क्रम	नैत्यिक क्रम
१	४७	प्रथम दिन	प्रथम दिन २३३	प्रथम दिन ३७२	रोज संपूर्ण गीतापठन ३ तासांत पूर्ण होतें.
२	७२	११९			
३	४३	द्वितीय दिन			
४	४२	११४			
५	२९				
६	४७	त्रितीय दिन	द्वितीय दिन २३६		
७	३०	१०५			
८	२८				
९	३४	चतुर्थ दिन		द्वितीय दिन ३२८	
१०	४२	७६			
११	५५	पचम दिन	तृतीय दिन २३१		
१२	२०	१०९			
१३	३४				
१४	२७	षष्ठ दिन			
१५	२०	७१			
१६	२४				
१७	२८	१०६			
१८	७८	सप्तम दिन			
		७००	७००	७००	७००



गीता यंत्र

गीतायन्त्र मनोपासना : रोज गीतेचा १५वा अध्याय भोजनापूर्वी म्हणावा. १८ दिवस पाठ खंड न पडता म्हणावा. कार्यसिद्धी होते.

५) श्रीकृष्णदर्शन व कृपा :—अध्याय २ रा श्लोक ७ "कार्पण्यदोषो— त्वां प्रपन्नम्" काम्य इच्छा वा दर्शनेच्छा इत्यादि मनसंकल्प करून आषाढ शु. ११ ते कार्तिक शु १२ पर्यंत फक्त दर एकादशीच्या दिवशी (म्हणजे ४ महिन्यात आठ वेळा) रात्री शुद्ध होऊन श्रद्धेनें परमेश्वराचे स्मरण करून वरील श्लोक १०८ वेळा म्हणणें म्हणजे पुढें एकादशीलाच कार्यसिद्धी होते. परमेश्वरदर्शन होते. पण सुरू करण्यापूर्वी केव्हाही ह्या वा कोणत्याही इतर हेतुविषयक श्लोकाचें अनुष्ठान सुरू करण्यापूर्वी तो श्लोक सपुटित करावा. तो असा ३ हजार जप करण्यापूर्वी सर्व गीतेचा १ पाठ मध्यें ११ व्या अध्यायाचे ११ पाठ असे ९ दिवस करावें. म्हणजे विशेष फायदा होतो (कल्याण-उपासनांक १९६८)—गो. प्र. भा.

श्रीभगवद्गीतेतील श्लोक मार्कंडेयपुराणातील सप्तशतीप्रमाणे ७०० सातशें आहेत. सप्तशतीप्रमाणे हे सातशें श्लोक सातशें मंत्रच आहेत. मंत्रशास्त्रात जसे अभिचारमंत्र आहेत, तसे श्रीगीतेत अभिचाराचे श्लोक आहेत. व त्याचा यथाक्रम जप केल्यास इष्ट फल मिळतेही अभिचारविधेचे सहा भाग आहेत —

शान्तिकरण, वशीकरण, स्तंभन, विद्वेषण, उच्चाटण व मारण. याच्याच पोटात आणखी सहा भेद आहेत

भक्षण, जारण, आकर्षण मोहन, जृंभण व क्लेशन.

मंत्रातील अदृष्ट सामर्थ्य जागृत करून त्याचा उपयोग अस्त्रविद्या उपयोगात आणण्याकडे पूर्वी होत असे मंत्रोच्चार करून मंत्रस्थित शक्ति जागृत करून तिचा निरनिराळ्या कार्याकरिता उपयोग करिता यावा, याकरिता मंत्रावसानी निरनिराळ्या शब्दाची योजना तंत्रग्रंथात सांगितली आहे, ती अशी —

स्तंभन कार्यार्थ मंत्राचे शेवटीं ' नमः ' असावें वशीकरणार्थ मंत्राचे शेवटी ' हुंकार '

आकर्षणार्थ ,, " स्वाहा " उच्चाटनार्थ ,, ' वौषट् '

मारणकर्म ,, " फट् "

प्रत्येक मंत्राला ऋषि, छंद, देवता, ध्यान, न्यास, अशी पांच अंगे अवश्य आहेत कारण यांचेशिवाय जप केला, तर त्याचा परिणाम चांगला होत नाहीं. असे म्हटले आहे कीं, ' ऋषिच्छंदो देवताभि परित्यक्तो भुजंग ' तो मंत्र भुजंगाप्रमाणे मारक होतो यापैकीं मंत्राच्या पांचव्या अंगाचे म्हणजे न्यासाचे महत्त्व साधकास कळावें, म्हणून थोड विवरण केलें आहे.

न्यास म्हणजे ठेवणे अंगन्यास, करन्यास, मातृकान्यास इत्यादि न्यासामध्यें आपल्या स्वरूप भावनेच्या व सामर्थ्यभावनेच्या साहाय्याने ध्यानकर्त्याने आपल्यातील सुप्त सामर्थ्याची जागृति करून त्या शक्तीची स्थापना शरीरातील विवक्षित भागावर करणे, व अशा तऱ्हेनें जागृत

झालेल्या शक्तीनें मंत्रस्थित इष्ट कार्याला ती प्रवृत्त करणे, ह्याच न्यास या शब्दाचा अर्थ होय ह्या अदृष्टशक्तिसामर्थ्याच्या योगानें मनुष्याने फल साध्य करून घेणे ही '*अभिचारिणी विद्या*' होय.

श्रीविष्णु भागवत ग्रंथात पुष्कळ मंत्र आहेत, त्यापैकीं ज्याचा अनुभव आजमितीस आहे असा मंत्र खालीं दिला आहे

'सचिन्तयेत् भगवतश्चरणारविंद' *अर्धशिशी बरी होते.*

'कतिपयस्य शिरोगुरुवेदना शमयता सहजामपि दु सहा
सन्निपिने विजने मुखवायुना श्रवणगोचरितेन कदाचन'

या मंत्राने डोकेंदुखी रहाते.

रा. रा. शं रा. रानडे, नंबर १७ वाळकेश्वर, मुंबई.

भागवतांतील व गीतेंतील मंत्र आणि त्यांचा विनियोग

अविनाशि तु तद्विद्धि तेन सर्वमिद ततम्। (संरक्षण प्रयोग)
भोक्तार यज्ञतपसा सर्वलोकमहेश्वर। (शांतिकरण)
तमस्त्वज्ञानज विद्धि मोहन सर्वदेहिना। (मोहन)
न च तस्मात् मनुष्येषु कश्चिन् मे प्रियकृत्तम। (वशीकरण)
इंद्रियाणि मनोबुद्धिरस्याधिष्ठानमुच्यते। (जारण)
रुद्रादित्या वसवो येच साध्या। (स्तंभन)
ईश्वर. सर्वभूताना हृद्देशेऽर्जुनतिष्ठति। (जृंभण)
वक्त्राणि ते त्वरमाणा विशन्ति। (मारण)
ममैवांशो जीवलोके जीवभूत सनातन। (आकर्षण)
धूमेनाव्रियते वन्हिर्यथादर्शो मलेन च। (विद्वेषण)
द्यावा पृथिव्योरिदमंतर हि। (उच्चाटन) क्रेशन
स्थाने हृषिकेश तव प्रकीर्त्या जगत् प्रहृष्यत्यनुरज्यते च।
रक्षांसि भीतानि दिशो द्रवन्ति सर्वे नमस्यन्ति च सिद्धसंघा।
(भूतबाधानिवारण)

—श्री. आनंदघनराम, तासगांवकर.

यत्र योगेश्वरः कृष्णस्तत्र पार्थो धनुर्धरः ।
तत्र श्रीर्विजयो भूतिर्ध्रुवा नीतिर्मतिर्मम ॥

रोज ३ हजार प्रमाणे ५० दिवस जप-ईश्वरप्राप्ति व ईशकृपा होते. याप्रमाणें अकरा वेळा केल्यास सिद्धि प्राप्त होते.

—प्रो. रामचंद्र दामोदर करमरकर
बी. ए. एस. टी. सी. डी.
प्रिन्सिपाल रिसर्च ऑकल्ट कॉलेज ५९१ बुधवार, पुणे

'यो मामेवमसंमूढो जानाति पुरुषोत्तमम् । स सर्वविद्भजति मा सर्वभावेन भारत ।' रोज ३ हजारप्रमाणे ५० दिवस करणें—वैभव प्राप्ति.

बेलाचे झाडाखालीं तुपाचा दिवा लावून ११ दिवस शिवलीलामृताचें ११।११ पाठ केल्यानें घर सोडून गेलेला मुलगा परत आला.

तसेंच शिवलीलामृताचे ११ दिवस रोज अकराव्या अध्यायाचे ११ पाठ केल्यानें भूतबाधा नष्ट झाली.

श्रीसमर्थ रामदासस्वामींच्या त्रयोदशाक्षरी मंत्राच्या एक लक्ष जपानें भूतबाधा नष्ट होते.

श्रीसमर्थांच्या मारुती स्तोत्राचे १०० पाठ केले तर भूतबाधा नष्ट होते.

श्री एकनाथ महाराजाच्या रुक्मिणी स्वयंवराचा तीन महिने रोज एक पाठ केल्यास विवाहेच्छु मुलींचा विवाह होतो.

व्यंकटेश स्तोत्राचे मध्यरात्रीं २० पाठ १०० दिवसात केले तर स्वप्नात श्री महाविष्णूचे दर्शन होते.

'अशक्य ते तुम्हा नाहीं नारायण निर्जिवा चेतना आणावया.'

ह्या श्रीतुकाराम महाराजाच्या अभंगाचा एक लक्ष जप केल्यास

सर्व प्रकारच्या आध्यात्मिक, आधिदैविक व आधिभौतिक चिंता नष्ट होतात.

श्रीज्ञानेश्वर महाराजांनी आपल्या भावार्थ दीपिकेंत जागोजागीं मंत्र सांगितले आहेत

श्रीज्ञानेश्वरीतील मंत्र

एक मंत्र ११ व्या अध्यायात आहे तो असाः—

पैं त्रिभुवनींचेया राक्षसा, महाभय तू हृषीकेशा, म्हणोनि पळताती दाही दिशा, पैलीकडे । भूतप्रेतपिशाच्चनिवारण होतें.

कार्पण्य दोषोपहतस्वभाव पृच्छामि त्वा धर्मसम्मूढचेत

यच्छ्रेयस्यान्निश्चितं ब्रूहि तन्मे शिष्यस्तेऽहं शाधि मां त्वां प्रपन्नम् ।

इष्ट गोष्ट स्वप्नात सांगतात. चार लक्ष जप.

एक मंत्र १२ व्या अध्यायात आहे —

म्हणोनि गा भक्ता । नाहीं एकही चिंता ।
तेयातें समुद्धर्ता । आथि मी सदा ।
एया कारणें गा भक्तराया । हा मंत्र तुज धनंजया ।

शीजे जें यया मार्गा भजिये । याने अखिल संकट निवारण होते.

ते हे मंत्र रहस्य गीता । मेळवी जो माझिया भक्ता ।
अनन्य जीवना माता । बाळका जैशी ।

मुलाचे दृष्टि वगैरे विकार नाहीसे होतात

मज ईश्वराचेनि लोभें । हे गीता पढता अक्षोभें ।
जो मंडन होय सभे । सज्जनांचिये ।

ज्ञात्यानाही वश करण्याची युक्ति.

तोचि प्रकृतीचा वागोरा । करी त्वचेचिया मोहरा ।
आणि स्पर्शाचिया घोरा । वना जाये ।

आकर्षण प्रयोग.

नाममंत्र महात्म्य[1]

मन्त्र व त्याचें मनन याबद्दल पूर्वी विवरण केलेलेंच आहे. श्री समर्थ व श्री तुकाराम महाराज याचे मन्त्र अगर मन्त्रमय वाक्ये याचेंही विवरण केलें आहे. मंत्रानी शारीरिक व मानसिक रोग बरे होतात त्याचींही उदाहरणें दिलेलीं आहेत.

श्री धन्वंतरी महर्षीनीं आपल्या वैद्यकीय ग्रंथात रोगनिवारणार्थ वनस्पतीचे प्रयोग दिलेले आहेत. तसेच त्यानी नामोच्चारणानें व नामोच्चारण सातत्यानेंही रोग बरे होतात, असे आपले अनुभवपूर्ण मत दिलेले आहे. ते म्हणतात-

अच्युतानंत गोविंद नामोच्चारण भेषजम् ।
नश्यन्ति सकला रोगाः सत्य सत्य वदाम्यहम् ॥

एफ्. टी. ब्रुक्स यानीं टेनिसन् कवीचें उदाहरण दिले आहे. ते म्हणतात कीं, टेनिसन् कवी आपले 'ऑल्फ्रेड' नाव म्हणत म्हणत समाधि दशेत जात असे.

भगवन्नाम संकीर्तनानें ध्वनीच्या लहरी उठत असतात व त्यामुळें मनुष्याच्या अंतश्चेतना व सुप्तचेतना जागृत होऊन त्याचा परिणाम मनुष्याच्या स्नायुजालावर होतो. आधुनिक मनोविज्ञानवेत्त्याची प्रयोग प्रक्रिया अन्तश्चेतनेपर्यन्त गेली आहे. सुप्तचेतनेपर्यन्त पोचली नाहीं व या अंतश्चेतना जागृतीनें नाना प्रकारचे रोग बरे होण्याचा संभव आहे.

---

१. नामचिंतामणि भाग २ रा. आवृत्ति ३ सन १९६९—रा. कृ. कामत तसेच 'नामयोग रहस्य' भाग १ आवृत्ति २ री. हे दोन ग्रंथ प्रस्तुतच्या विषयावर उत्कृष्ट असे ग्रंथ आहेत. त्यात अनुभूत व अनुभाव्य अशीं अनेक मार्गदर्शने आहेत. 'धर्मकल्पद्रुम' भागवत धर्म महामंडळ-काशी हा ग्रंथ मन्त्र व नाममन्त्र यासाठीं प्रसिद्ध आहे. हिंदी 'कल्याण' गोरखपूर (उ. प्रदेश) हें मासिक चाळीस वर्षांपासून 'मुमुक्षूंचा जणु कल्पतरु' अशा विचारधारेचा आदर्श आहे. (गो. प्र. भा.)

एक दारुबाज रामनाम उच्चार सतत केल्यानें दारूच्या व्यसनापासून मुक्त झाला. त्याचप्रमाणें एक गांजेकसही व्यसनापासून मुक्त झाला. एक राजयक्ष्मा झालेला मनुष्य 'सीताराम' या नामसंकीर्तनानें बरा झाला. एक अर्धशिशीनें पीडित झालेला मनुष्यही बरा झाला.

साहित्योपाध्याय श्री बटुकनाथजी शर्मा,
एम्. ए. कल्याण, मार्च महिना १९४०

□ □

८ नवग्रहोपासना

(वैदिक तांत्रिक व पौराणिक)

(गो. प्र. भा.)

ब्रह्मा मुरारिस्त्रिपुरांतकारी भानुःशशी भूमिसुतो बुधश्च ।
गुरुश्च शुक्रः शनिराहुकेतवः सर्वेग्रहाः शांतिकरा भवन्तु ॥

ग्रहोपासनेचें महत्त्व : आमच्या भारतीय संस्कृतीमध्यें सूर्य, चंद्र, मंगळ, बुध, गुरु, शुक्र, शनी, राहू, केतू या ग्रहांना देवदेवतांइतकेंच महत्त्व दिलेलें आहे. भारतीयांच्या सर्व पूजाविधींमध्यें, जन्मापासूनच्या महत्त्वाच्या सर्व संस्कारांमध्यें (जसें जन्म, शांति, उपनयन, विवाह इत्यादि) तसेंच सर्व प्रकारच्या यज्ञ अथवा हवन कार्यांमध्यें स्थानरक्षण व कार्यरक्षण यांसाठीं, क्षेत्रपाल व आवरण देवता यांबरोबरच नवग्रहो-पासना करावी लागते.

आम्हां मानवी जीवनांतील सुखदुःखादि अनेक घटनाचा वरील नवग्रहांशीं बराच संबंध असल्याचें अनुभवास येतें. जीवनदाता सूर्य व त्याच्या कक्षेतील ग्रह त्यांच्या भ्रमणामुळें दिवस, रात्र, ऋतु इत्यादि गोष्टी घडतात. व त्या घटनांचा जन्मल्यापासून सर्व मानवी जीवन व व्यवहार ह्यांशीं संबंध आहे, असें आपण अनुभवितों. म्हणून ज्योतिषशास्त्र व मुख्यतः मानवी जीवन, ह्यांचा संबंध जोडण्यात आला.

ज्योतिष शास्त्राप्रमाणें सूर्य व चंद्र यांना नक्षत्रस्वामी असें मानितात. कारण त्यांच्या प्रकाशाचा मानवी जीवनाशीं घनिष्ठ संबंध आहे. मंगळाला पृथ्वीपुत्र, बुधाला चंद्रपुत्र, बृहस्पतीला देवगुरु (दिव् प्रकाश देणें,

गुरु मोठा किंवा श्रेष्ठ) शुक्राला दैत्यगुरु, शनीला सूर्यपुत्र आणि राहु केतू यांना पृथ्वीछायापुत्र असें म्हणतात. त्यात बराच अर्थ व तथ्य आहे. या ग्रहांची वर्णनें मुद्‌गल, ब्रह्मांड, पद्म इत्यादि पुराणामध्यें तसेंच रुद्रयामल ह्या ग्रंथांत दिलेलीं आहेत. फार काय, खुद्द व्यास महर्षींनी नवग्रह स्तोत्रही रचिलें आहे. यावरून इतक्या प्राचीन काळांत भारतीयांनी अवकाशस्थ ग्रहांचा पूर्ण दृष्टीचा विचार केलेला होता असें कबूल करावें लागतें.

नवग्रह व आधुनिक विज्ञान : पौर्वात्य समाजांत ग्रहांचें विज्ञान मुख्यत भारतीय सांस्कृतिक-विज्ञान विचारधारेच्या आधारावर आहे. पौर्वात्यांचे समष्टिमय पंचभौतिक जगाच्या पलीकडे म्हणजे पंचमहाभूतें त्यांचा व त्यांच्या ग्रहोपग्रहयुक्त असा ब्रह्मांडाचा अथांग पसाराहि निबंधक ठराविक शिस्तीनें चालविणारी चिच्छक्ति ही काय वस्तु आहे, आणि त्या शक्तीचा व्यष्टिविशिष्ट जीवाशीं काय व केवढा संबंध आहे, ह्याचें पूर्ण आनुभविक ज्ञान म्हणजे पौर्वात्य विज्ञान होय. त्या दृष्टीनें पहाता पाश्चिमात्य शास्त्रज्ञांचें विज्ञान केवळ पंचमहाभूतांचे स्वरूप व त्यांची हालचाल, त्यांची कार्यकारी शक्ति ह्यांचे भौतिक म्हणजे पंचमहाभूतजन्य वस्तूंच्या सहाय्यानें मिळणारें व मिळविलेलें ज्ञान आणि विश्वावकाश, त्यांतील ग्रहगण व तारागण आणि त्यांच्या हालचाली त्यांचेंही भौतिक वस्तूंच्या मदतीनेंच मिळविलेलें ज्ञान हें पाश्चिमात्य विज्ञानाचें स्थूल स्वरूप आहे. विश्वचालक अशी विश्वशक्ति म्हणून कांहीं शक्ति आहे याची अत्यल्प जाणीव त्यांना अलीकडे होऊं लागली आहे, पण तिचा मानवी जीवनाशीं कांहीं श्रेष्ठ संबंध असून, मानव आपल्यांतील अतींद्रिय शक्तीच्या मदतीनें ती वैश्विक शक्ति व तिचें कार्य पूर्णपणें जाणूं शकतो ह्याची त्यांना अधुनही कल्पना नाहीं.

कलियुगीन माणसानें चंद्रावर पाऊल ठेऊन तेथून कांहीं दगड आणिले हा कलियुगांतील पराक्रम कौतुकार्ह आहे हें खरें. पण त्या दगडा-वरूनच त्यानें भ्रामक अनुमानें काढण्याची सुरवात केली, हे चूक. चक्षुर्वै

सत्यम् ही इंद्रियदृष्टि झाली; म्हणजे अधिभौतिक दृष्टि झाली. पण याशिवाय माणसाला हृदयोद्भूत भावदृष्टि-म्हणजे आधिदैविक दृष्टि आणि विचार दृष्टि-म्हणजे आध्यात्मिक दृष्टि अशा तीन दृष्टि आहेत. जशी चंद्रासंबंधाची सध्यां केवळ भौतिक दृष्टि आहे, तशीच इतर ग्रहगोलासंबधाचीही आहे. त्यांचीं अनुमानें सांगितलीं जातील, पण तीं अनुमानें व तें विज्ञान हीं भारतीय ज्योतिर्विदांच्या दृष्टीनें अपुरीं व एकतर्फी आहेत. सद्दर्शनीं तीं जरी सत्य असलीं व वाटलीं, तरी तीं एकांतिक व दोषपूर्ण आहेत, असें भारतीय आर्य व ज्योति-विज्ञानाच्या दृष्टीनें ठरते तें कसें ते पाहू:—

ग्रहांचीं भौतिक व दिव्य स्वरूपें : अलीकडील संस्कारविहीन व म्हणून श्रद्धा व निष्ठाविहीन भारतीय मनात पुराणादिकांतील वर्णनें काल्पनिक वा अतिशयोक्तीचीं असल्यानें थोतांड आहेत, व म्हणून त्याज्य आहेत, उपहास्य आहेत, असे विचार येतात, ही दुर्दैवाची स्थिति आहे! कारण तीं वर्णनें किंवा विधानें आजच्या इंद्रिय दृष्टीशीं म्हणजे आधिभौतिक दृष्टीशीं तर जुळतातच, पण तीं भावदृष्टीशीं म्हणजे आधिदैविक दृष्टीशीं पण जुळतात, असें विचारांतीं पटेल. याकरिटीं पुढे दिलेल्या पौराणिक गोष्टी विचारात घेणें बरें :

१) एकदा रावण उपासना न करिता शंकराच्या दर्शनाकरिता कैलास पर्वतावर गेला, तेव्हा तेथें त्याला केवळ बर्फ व दगड आढळले. पण ब्रह्मदेवाच्या सांगण्याप्रमाणे तो ठराविक उपासना केल्यावर पुन गेला तेव्हां त्याला तेथें उत्कृष्ट रत्नमय भूभाग, अनेक प्रकारचे कल्पवृक्ष व कामधेनु अशी स्थिति आढळली.

२) तसेंच एकदा रावण चंद्रलोकी केवळ इंद्रियदृष्टीनेंच गेला व तेथें त्यानें बाणाचा वर्षाव केला, त्याला तेथें दगड पाषाण दिसले होते, तेव्हाही ब्रह्मदेवानें पूर्ववत् सूचना दिली[१]

१ अपोलो १२ च्या मानवसहित (कॉनरॅड, बीन व गॉर्डन) चंद्रयानात चंद्रावर

३) सप्तशतीमध्येंही महिषासूर राक्षसानें अग्नि, वायु, चंद्र, सूर्य व इंद्र ह्या सर्वांचे अधिकार आपल्याकडे घेतले होते, असें वर्णन आहे. यातील चंद्र, सूर्य, अग्नि, पृथ्वी आदि 'स्थूल' म्हणजे इंद्रिय दृष्टीगम्य (आधिभौतिक दृष्टिगम्य) पदार्थ समजणे भाग व योग्य.

४) भारतातील गंगा, भौतिक दृष्टीनें जलमयीच आहे. परंतु आधि-दैविक दृष्टीस जें गंगामाईचें दिव्यत्व दिसतें, तें पश्चिमेकडील इंद्रिय दृष्टिवाल्या जीवांना दिसत नाहीं व दिसणारही नाहीं. याचा अर्थ आम्हा भारतीयांची ती दृष्टि खोटी असा नाहीं.

अवकाशांत आकाशगंगा (Galaxy) आहे, तीमध्ये आपल्या सूर्य व त्याचे ग्रहोपग्रह ह्यासारख्या अनेक ग्रहमालिका आहेत, असे आम्हा प्रमाणें ते पाश्चिमात्य वैज्ञानिकही मानितात. पण आम्ही भारतीय त्या आकाशगंगेचें दिव्यत्व निराळें मानितों. तें का? तें खरें का खोटें? दृष्टिदृष्टीमधील भेद तो हाच.

५) अकबर कालीन गोष्ट ' वृंदावन येथील केशीघाट अधिभौतिक दृष्टिवाल्या अकबराला पत्थरमयच दिसला परंतु हरिदासस्वामींच्या कृपेनें त्याच अकबराला तोच केशीघाट रत्नमय दिसू लागला !

६) आम्ही भारतीय संध्याविधीमध्ये ज्या गायत्री देवीचे म्हणजे सवितृमंडलस्थित तेजाचे ध्यान करितो, तें पाश्चिमात्य समजतात, त्या भौतिक दृष्टीला दिसणाऱ्या सूर्याच्या अधिभौतिक स्वरूपाचे नसून, तन्मध्यस्थित अशा सूक्ष्म पण प्रभावी दैवी तेजाचे आहे हे त्या चर्मचक्षूशिवाय अन्यचक्षू नसलेल्या पाश्चिमात्यांना कसे दिसणार?

७) अर्जुनाच्या समोर प्रत्यक्ष भगवान् श्रीकृष्ण होता व त्यानेच आपलें दिव्यरूप अर्जुनासमोर उभें केलें असतानाही, तें त्याच अर्जुनाला

मनुष्यकृत भूकंप करण्याचें व परिणाम पहाण्याचें साहित्य नेलेलें होते. (८-४-१९७० चें 'अमेरिकन वार्ताहर' (Reporter) हें पाक्षिक)

दिव्यदृष्टि दिल्याशिवाय दिसूच शकले नाहीं. "दिव्य ददामि ते चक्षुः पश्य मे योगमैश्वरम्"

८) "अग्निषोमात्मकं जगत्" यातील अग्नि म्हणजे सूर्य व षोम-सोम म्हणजे चंद्र हे कोणते? श्रीमद् भागवतात त्याचे वर्णन आहे. तो सोम म्हणजे सोममंडल म्हणजे-चंद्रमंडल, विशुद्ध रूपाने सूर्यमंडलाच्या वर अतिदूर आहे. तें सर्व व्यापक शांत व दिव्य असून तेथें सर्व प्रकारचे वैभव असल्याचे आध्यात्मिक दृष्टीला दिसून अनुभविता येतें. पण तेथें गेलेल्या पाश्चिमात्य माणसांना प्राणिसृष्टीही न दिसता ज्वालामुखीच आहेत असे दिसले व दिसतें. त्यांना दिसलेला व तसाच आहे असा त्यांनीं मानिलेला चंद्राचा तो अर्धा भागच आहे त्या चंद्राचा उर्वरित अर्धा भाग अजून अज्ञातच आहे. पण अशा चंद्र भागावर "शांतिसागर" (Sea of Tranquility) नावानें ओळखिल्या जाणाऱ्या भागावर काय आहे व इतरत्र काय आहे याचे शोध पुढें घेतले जातील पण दृष्टि मात्र भौतिकी. अपोलो १३ चंद्रावरील 'फ्रा मौरो' (Fra Mauro) हा भाग शांतिसागरजवळ आहे. ह्या शांतिसागराच्या दक्षिणेस (नकाशातील दिशेप्रमाणे) 'अमृतसागर' (Sea of Nector) आहे.

९) महाभारत कालीन अर्जुनादि लोक इंद्रलोकीं जात येत असत व तेव्हा तेथें त्यांना दिव्य देवदेवताचे वास्तव्य असल्याचें वर्णन आहे.

१०) वसिष्ठानें सांगितलेल्या ठराविक मांत्रिक विज्ञानाच्या सामर्थ्यानें रघुराजाचा रथ समुद्र, पर्वत, नद्या व आकाश ह्यांतून अनिरुद्ध असा जात असे, असें वर्णन आहे

११) तसेंच कर्दमानें तयार केलेल्या "पुष्पक' विमानाला सर्वच अनिरुद्ध गति होती असेंही वर्णन आहे.

वरील सर्व वर्णनाचा सारांश असा निघतो कीं, भारतीयांच्या प्राचीन ग्रंथातील आपल्या सूर्यमंडळनिगडित नवग्रहांशीं पृथ्वीवरील मानव संपर्क ठेवीत असत. (२) तो संपर्क ठेवण्याचें विमान हे एक साधन असे.

(३) चद्र, सूर्य, गुरु, शुक्र या ग्रहावर त्या त्या भौतिक परिस्थित्यनुरूप जीवसृष्टी होती व (४) ती सृष्टि पृथ्वीवरील मानवापेक्षा निराळ्या अशा वियत् वा तेजसादि प्रकारची शरीरधारी जीव असून त्या त्या ठिकाणीं पृथ्वीपेक्षाही जास्त सुखी, सतोषी व आनददायक अशी स्थिति आहे. (५) म्हणून तशा त्या त्या ग्रहाची प्रचोदक, सरक्षक, व अधिष्ठात्री अशी जी शक्ति आहे व असते, त्या त्या देवतेचें निवासस्थान म्हणून त्या त्या ग्रहाला आधिदैविक दृष्टीने भारतीय आर्यांनी देव, दैवत, समजून कृतज्ञतापूर्वक सवर्क स्मरण म्हणून आपल्या पचदेवत पूजेमध्ये समाविष्ट करून घेतलें.

१२) पौर्णिमेला दिसणारा पूर्ण चद्र हा त्या सूर्याच्यावर असलेल्या महान सोममडळाचें स्थूलरूप आहे

१३) वाळवटी प्रदेशात जे सूर्यकिरण अतीशय दाहक असतात तेच सूर्यकिरण त्याच वाळवटी भागात रात्रीच्यावेळीं बर्फासारखे थडगार होतात. ही वस्तुस्थिति आधुनिक विज्ञानवादी वास्तविक असल्याचें कबूल करितो; पण

१४) बर्फ हजारों वर्षांचें झाले व तसेंच राहिलें तर त्याचा 'नीलमणि' बनतो, हे मात्र अजून त्या नवविज्ञानाला पटत नाहीं !

१५) सूर्याला 'सहस्ररश्मि' नाव आहे तसेंच सूर्य हा द्वादश कलात्मक आहे म्हणजे त्याचे किरणपुज[१] बारा प्रकारचे असून त्या त्या बारा नावाप्रमाणे त्या किरणपुजाचे प्रभावही आहेत. "जगीं

१. सूर्याला चद्राप्रमाणें व चद्राइतक्या कला नसतात, पण त्या बारा असतात. त्या अशा (१) ज्वालिनी, दाहिनी, किरणी, दीपिनी, तेजिनी, विद्युत्तेजा, शंखिनी, तापिनी, वर्षणी, चाल्का, शोचिप्रिया व स्फुलिंगा अथवा (२) ज्वालिनी, कीरणी, दाहिनी, दीपनी, ज्योतिनी, तेजिनी, विद्या, मोहिनी, जीवनी, शलिनी, प्रकाशिनी, दीपकलिका अशीं नावें 'मूळस्तम' या ग्रथात दिलीं आहेत. (गो. प्र. भा)

द्वादशादित्य' ते रुद्र अकरा" (रामदास) हे संशोधन कोणाचे व ते खरे का? नवशास्त्रज्ञ याबद्दल काय सांगू शकतील? नवविज्ञानाच्या स्थूल म्हणजे अधिभौतिक दृष्टीनें सूर्यावर जे डाग येतात, ते त्याच्या तेजात होणारे स्फोट आहेत, असें ते आधुनिक वैज्ञानिक सांगतात. यापेक्षा जास्त खुलासा त्यांना सांगता येत नाही[1]. पण वर सांगितलेल्या द्वादश कलांच्या नावावरून सूर्याचे किरणपुंज त्या त्या प्रकारचे म्हणजे गुणधर्मांचे आहेत असें स्पष्ट होतें. आधिभौतिक दृष्टीनें सूर्यबिंब व त्याचे किरण ह्या वस्तु निरनिराळ्या आहेत.

१६) शाकटायन ऋषींच्या "*वायुतंत्र*" या ग्रंथात सूर्य व बुध, शुक्र, गुरु, शनि, इत्यादि ग्रह ह्यावरील जीवन व जीवसृष्टि, त्यांच्या प्रकाशाचे परस्परावर होणारे परिणाम, वातावरणाचे ८४ हजार प्रकार व त्यांचे भिन्न भिन्न वर्ण इत्यादि माहिती आहे.

१७) महर्षि भरद्वाज यांच्या '*अंशुबोधिनी*' या ग्रंथात ग्रहोपग्रहांची परस्पराकर्षणशक्ति, सूर्यकिरणात असणारी निरनिराळी शक्ति व तिच्या मदतीनें निरनिराळ्या ग्रहावरच नव्हे तर त्यापेक्षाही पलीकडे असणाऱ्या विश्वावकाशात कसें जावें इत्यादि अधिभौतिक दृष्टीची नानाविध माहिती आहे, तशी अधिदैविक दृष्टीची त्या ग्रहावरील जीवनाची पण माहिती आहे.[2]

---

१. द्वादशादित्य :–मित्र, रवी, सूर्य इत्यादि सूर्यांचीं नावें, किंवा श्रीमद्भागवतांत विवस्वान, अर्यमा, पूषा, त्वष्टा, सविता, भग, धाता, विधाता, वरुण मित्र, शक्र व उरुक्रम हीं नावें अथवा सूर्यरश्मींतील पुढें दिलेली नावें हीं सूर्यबिंबाशीं संबंधित असून तीं सार्थ आहेत, अशी तेथें ग्वाही दिलेली आहे. तीं अशीं–शक्र, विष्णु, अर्यमा, धाता, त्वष्टा, पूष, विश्वावसु, मित्र, वरुण, अंशुमान, भग, व अतितेज.

२. याबद्दल आधुनिक पाश्चिमात्य विज्ञानाला माहीत झालेल्या गोष्टींची अल्प कल्पना मन शास्त्र या ग्रंथाच्या उपसंहारात दिलेली आहे.

१८) तसेंच भरद्वाज ऋषीचा "आकाशतंत्र" हा ग्रंथ, अंगिरसाचा "मेघोत्पत्ति प्रकरण" आणि नारदऋषींचा "धूम्रप्रकरण" इत्यादि ग्रंथांत विश्वाच्या अधिभौतिक दृष्टीची त्याचप्रमाणें त्यांतील परिस्थितीचा आधिदैविक विचार फार विस्तृत रीतीनें केलेला आहे.

१९) बृहस्पतीला म्हणजे गुरूला 'द्वादशकर' असें नांव आहे. कर म्हणजे किरण व हात. गुरूला आधुनिक विज्ञानाप्रमाणें बारा चंद्र असून ते त्याच्या सभोंवतालीं फिरणारे प्रकाशमान उपग्रह आहेत. इतके चंद्र इतर कोणत्याही ग्रहाला नाहींत.

२०) आधुनिक विज्ञानवादी शुक्रावरील मानवसदृश जीव अवकांशातून आल्याचा उल्लेख करितात; पण पुढें त्याबद्दल कांहींच बोलत नाहींत. पृथ्वीकडे येणाऱ्या उडत्या तबकड्या (Flying Sauccers) इत्यादि गोष्टींसंबंधीं अजून अनिर्णित वृत्तीचे ते नवविज्ञानवादी आहेत. कारण अधिभौतिक दृष्टीला दिसणाऱ्या पण अधिदैविक दृष्टीला पटणाऱ्या अशा विश्वांतील जीवनासंबंधी समस्या निश्चितपणें खोट्या वा भ्रामक असेंही ठांसून सांगण्याची त्या नवविज्ञनवाद्यांची अजून तरी छाती होत नाहीं.

२१) आधुनिक पाश्चिमात्य शास्त्रज्ञांना अवकाशांत–आयानोस्फिअर (Ionosphere) लोहकणीय मूलद्रव्य–विभागापलीकडे[1] काय आहे तो विभाग किती उंचीपर्यंत आहे, त्यांत विद्युत्संचारी कण कां व कोठून

---

१. आज जरी चंद्रापर्यंतचा सुमारें २ लक्ष मैलांचा प्रवास करून मानव आला, तरी त्याला पुढें दिलेल्या गोष्टींची नेमकी कल्पना आलेली नाहीं. (१) पृथ्वी-समोंवार असलेलें 'वातावरण' किती उंचीनंतर संपतें. (२) निरनिराळ्या ग्रहांवर जीवन आहे का नाहीं. (३) पृथ्वीवरील वातावरणांत अथवा त्या पलीकडील अवकाशीय 'आवरणांत' जीव सृष्टी आहे का नाहीं इ. इ. याबद्दल जास्त उहापोह या ग्रंथाच्या वैज्ञानिक उपसंहारांत आढळेल. अवकाश व [मचें भवितव्य (space and your future १९६८). यांत पहा.

येतात ह्याचे अल्पही ज्ञान नाहीं. पण भारतीय विज्ञान शास्त्रज्ञाना त्याही पलीकडील गोष्टींचे ज्ञान झालेले होतें व ते त्याच्या ग्रंथांत नमूद केलेले आहे.

सारांश : वरील माहितीवरून खालील गोष्टी स्पष्ट होतात.– (१) भारतीयाचे भौतिकी विज्ञान आधुनिक नवविज्ञानापेक्षाही जास्त प्रगत होते. (२) पाश्चिमात्य मानव केवळ भौतिकी म्हणजेच अधिभौतिक दृष्टीलाच प्राधान्य देऊन वावरतात व तीच दृष्टि म्हणजे 'खरें विज्ञान' असे समजतात–मानितात व आचरतात. (३) पण भारतीय संस्कृती-प्रमाणे मानवामध्ये आधिदैविक व आध्यात्मिक ह्या आणखी दोन दृष्टी असून त्या वाढविणे, मानणें व आचरणे यालाच खरें विज्ञान म्हणतात. असे सांगते.[१]

नवग्रहाचे जीवनावरील परिणाम : (१) चंद्र या ग्रहाच्या शक्तीचा परिणाम पृथ्वीवरील पाणी व वनस्पति ह्यावर होतो, हें भारतीयाप्रमाणे पाश्चिमात्य शास्त्रज्ञही कबूल करितात. (२) पण तेच पाश्चिमात्य विज्ञान-वादी, भारतीय विज्ञान शास्त्राप्रमाणे ग्रहाच्या किरणांचे व इतर शक्तींचे परिणाम मनुष्यजीवनावरही होतात असें उघड व निःसंदिग्धपणे कबूल करीत नाहींत. चंद्रावरून परत आलेल्या वीरांना ते पृथ्वीवर येताच नाहीं

१. वरील १६,१७,१८ या स्तंभांतील माहिती या मंत्रशास्त्र ग्रंथकर्त्यांच्या (श्री. योगेश्वरानंदतीर्थ शंकराचार्य ह्यांच्या) "स्वर्गदर्शन" (व्हीनस प्रकाशन– ३८१ क, पुणें –२ सन १९५९) या ग्रंथावरून घेतलेली आहे. या ग्रंथात ऋषींच्या त्या त्या संहितामध्ये आधुनिक नवविज्ञानवाद्यांना चकित करणारी अशीही बरीच माहिती स्थूल रूपानें दिलेली आहे. ती मुद्दाम पहावी. त्या माहितींत तेथें निर्देशिलेल्या संस्कृत ग्रंथात सूर्यकिरणांचा दूर संभाषण, दूर ग्रहभ्रमण व त्यासाठीं लागणारी यंत्र सामुग्री कशी करावी इत्यादि माहिती दिलेली आहे. (गो. प्र. भा.)

तास मानवी स्पर्शापासून दूर ठेवण्याचा उद्देश तरी ग्रहाचा मानवी जीव-नावरील परिणाम पहाणें हाच होता. (३) भारतीय विज्ञानवादी शास्त्रज्ञांनी मानवी जीवनावर होणाऱ्या ग्रहाचा परिणामपरिहार व लाभ कसा करावा ह्याबद्दल अनेक उपाय व तोडगे पूर्ण विचार करून शोधून काढिले. एवढेंच नव्हे तर त्या उपायाचे एक विशेष प्रकारचे अनुभूत व अनुभाव्य असे 'शास्त्र' ही बनविले.

ग्रहपरिणामाचें भारतीय शास्त्राचें स्वरूप : ग्रहाचे मानवीजीवनावर इष्टानिष्ट परिणाम झाल्याशिवाय रहात नाहीत हे अनुभविताना भारतीय शास्त्रज्ञानी ग्रहाच्या अवकाशस्थ गति, त्याचीं आकर्षणे व शक्ति ह्याचा परिणाम तसेंच अवकाशातील तारकापुंज व नक्षत्रपुंज ह्याशीं येणारा संबंध लक्षात घेऊनच उपाय व तोडगे ठरविले. भारतीय ज्योतिषशास्त्राच्या ग्रहाच्या दशा, महादशा व अंतर्दशा या परिभाषेनें मनुष्याच्या जन्माच्या वेळच्या आकाशस्थ ग्रहाचा (पिंडी ते ब्रह्मांडीं ह्या आधिदैविक व आध्यात्मिक दृष्टीच्या आधारावर) संबंध जोडून उपाय सुचविले.

उपायाचें स्थूल स्वरूप : (अ) ग्रहाचें आधिभौतिक स्वरूप लक्षात घेऊन मनुष्यानें त्या त्या ग्रहासाठीं ठराविक पदार्थाचीं दानें व ठराविक धातूचीं व पदार्थाचीं धारण योग्य रत्नें, ह्याची योजना शास्त्रबद्ध करून सुचविली

(आ) आणि सर्व विश्व व त्यात समाविष्ट असलेली तत्त्वे व किरण हीं दुसरे तिसरें काहींच नसून केवळ स्पंदनेंच आहेत, असे अनुभवून त्या त्या ग्रहासाठीं यंत्र, मंत्र व त्याचे तंत्र हीं ठरवून दिलीं, त्याचा आराखडा पुढे दिलेला आहे

एकेका राशीवरील ग्रह भ्रमण काल व स्वामित्व पुढे दिल्याप्रमाणें आहे.

ग्रहाचे नाव	सूर्यप्रदक्षिणा काल	भ्रमणकाल	स्वामित्वाची रास	मानवी आयुष्यातील दशेचा काल	ग्रह जप
रवि	— —	१ महिना	सिंह	६ वर्षे	सात हजार
चंद्र	२७.३ दिवस	२¾ दिवस	कर्क	१० वर्षे	अकरा हजार
मंगळ	१.९ वर्षे	११¾ महिने	मेष व वृश्चिक	७ वर्षे	१० हजार
बुध	८८ दिवस	१ महिना	कन्या व मिथुन	१७ वर्षे	९, हजार
गुरु	११.९ वर्षे	१३ महिने	धनु व मीन	१६ वर्षे	१९ हजार
शुक्र	२२४ दिवस	१ महिना	वृषभ व तूळ	२० वर्षे	६ हजार
शनि	२९.४ वर्षे	३० महिने	मकर व कुंभ	१९ वर्षे	२३ हजार
राहू		१८ महिने		१८ वर्षे	१८ हजार
केतु		१८ महिने		७ वर्षे	१७ हजार

टीप : प्रत्येक ग्रहाची त्या त्या राशीवरील स्थिरीभवन अथवा वक्रीभवन वा ग्रहयुति त्यामुळें त्या राशीच्या व्यक्तीवरील त्या ग्रहाचे परिणाम आणि तो ग्रह पृथ्वीपासून किती अंशांवर दूर व जवळ आहे याहि गोष्टी समजाव्या म्हणून सूर्य परिभ्रमणाचा काल येथे दिला आहे. हर्षल, वरुण, व प्लुतो ह्यांना सूर्यप्रदक्षिणा करण्यास अनुक्रमें ८४,१६४ ८ व २४७ ७ इतकीं वर्षे लागतात. ही कालगणना पृथ्वीवरील मनुष्यानें उपयोजिलेल्या ३६५ दिवसाच्या सौरमानिक वर्ष गणनेची आहे 'प्लूतो' ह्या नूतनशोधित ग्रहाचे किरणही परिणामकारी स्थितींत अजून पोचलेले नाहींत. (गो. प्र भा)

नवग्रहोपासनेचा व्यावहारिक भाग (अ)

ग्रह	आराधना	वस्तुधारणा	दान
रवि	हरिवंशपुराण श्रवण	माणिक	गहूं, गाय, गूळ, तांबें, सोनें, लाल वस्त्र.
चंद्र	शिवस्तुति	मोती	तांदूळ, कापूर, साखर, दहीं, मोती, चांदी, श्वेत चंदन, श्वेत वस्त्र, श्वेत बैल, शंख, इत्यादि.
मंगळ	,,	प्रवाळ	ताम्रवस्तू, लाल वस्त्र, लाल फूल, गूळ, लाल चंदन, केशर, मसूर पृथ्वी, विद्रुम, गहूं, लाल बैल.
बुध	अमावास्या व्रत	पन्ना	कासें, हस्तिदंत, हिरवे पदार्थ, वस्त्र, मूग, पन्ना, सुवर्ण, तूप, शस्त्र, फळे, षड्रस भोजन.
गुरु	,,	पुष्कराज,	पिवळे पदार्थ, सोनें, पीतवस्त्र, हळद, पिवळें अन्न, अश्व, पुस्तक, मध, मीठ, साखर, भूमी, छत्र, पुष्कराज.
शुक्र	गोपूजा	हिरा	चांदी, सोनें, तांदुळ, दूध, दहीं, तूप, चंदन. पांढरा घोडा, भूमी, पांढरी गाय, गंध द्रव्य.
शनि	मृत्युंजय जप	नीलमणि	तीळ, उडीद, तेल, लोखंड, काळें वस्त्र, म्हैस, कुळीथ, कपिला गाय, काळीं फुलें, पादत्राण, कस्तुरी, सोनें.

ग्रह	आराधना	वस्तुधारण	दान
राहू	मृत्युंजय जप	पिरोजा	अभ्रक, लोखंड, तीळ, निळें वस्त्र, ताम्रपात्र, सप्त धान्य, उडीद, गोमेद, काळीं फुलें, तेल, ध्वजा, शस्त्र, घोडा, खड्ग
केतू	,,	लसणिया	कस्तुरी, तेल, छाग, काळे वस्त्र, सप्तधान्य, ध्वजा, कांबळ, उडीद, वैडूर्य, काळीं फुलें, लोखंड, शस्त्र.

रत्नें-दान पदार्थ व विज्ञान : धारण करावयाचे पदार्थ व दानपदार्थांतील धातु ह्यांतील किरणांचा व शरीर प्रकृतीचा घनिष्ठ संबंध आहे. निरनिराळ्या प्रकाशकिरणांनीं रोग बरे होतात, तशीं तीं तीं रत्नें सोन्यांत मढवून आंगावर धारण करण्यांत, शरीरांतील रुधिराभिसरणाशीं, त्वचेंतील सूक्ष्म केशवाहिन्यांशी नित्य एकसारखा संबंध येऊन, त्या त्या प्रकारचीं स्पंदनें शरीरावर कार्य करीत असतात, आणि अशा रीतीनें त्या त्या ग्रहाच्या किरणांचा परिणाम घडविण्यास मदत होते हें त्यामागील भारतीय विज्ञानाचें रहस्य होय. नवरत्नांची आंगठी वापरावयासाठीं तयार करितांना धारण करणाराच्या जन्म कुंडलींतील ग्रहाच्या स्थितीप्रमाणें व क्रमानें त्या आंगठींतील रत्नें, दिवस नक्षत्रादि विचार करून बसविणें व धारण करण्याचा दिवस, वेळ हीं विचारांत घेण्याचीहि शास्त्राज्ञा यासाठींच आहे एवढेंच नव्हे, तर युद्ध, शिकार, द्यूत, इत्यादि कार्यांच्या वेळीं कोणतीं रत्नें कोणत्या शरीरभागावर धारण करावीं, अग्निविषप्रयोगपरिहार व घाव, आघात इत्यादि प्रसंगांत कोणतें रत्न कोठें धारण करावें, कोणती आंगठी कोणत्या बोटांत घालून वापरावी, ह्या सर्व गोष्टींचें पूर्ण शास्त्रीय विज्ञान भारतीय शास्त्रज्ञांनी स्पष्ट केलेलें आहे. ही प्राचीन भारतीय दूरदर्शी

परंपरा आजच्या नवविज्ञानाशीं तुलना करून पहा व मग अभिमानास्पद कोणतें विज्ञान तें ठरवा व तें अधिक सूक्ष्म विचार करून ताकद असेल तर वाढवा. अन्यथा बालिशपणा ठरेल.

(आ) **ग्रहोपासनेचे मंत्र, तंत्र व विज्ञान :** आवाज–शब्दोच्चार–नाद, नादाच्या लहरी–लहरींचीं स्पदनें, किरणोत्सर्ग व त्याच्या आघात प्रत्याघाताची निरनिराळ्या दार्ढ्याचीं स्पदने हीं अनवकाशात एकसारखी सुरूच असून सर्व विश्व स्पदनमयच आहे व त्याचा सबध प्राण्याच्या (मनुष्य व मनुष्येतर प्राण्याच्या) तसेच वनस्पति जीवनाच्या पंचभौतिक स्वरूपाशीं, शरीराशीं घनिष्ट सबध आहे, हें पश्चिमेकडील विज्ञानवाद्याना आता कळू लागून, पटू लागलें आहे. विश्वानकाशातील लहरी–निरनिराळ्या दार्ढ्याच्या व जोराच्या लहरी, एक सारख्या चालूच होत्या व आहेत, पण त्याचे आघात परिणामकारी होतात ह्याचें आकलन अलीकडे त्या शास्त्रज्ञाना झालें व तो नवीन लागलेला शोध म्हणून आनदानें व दिमाखानें इतर जगाला ते शास्त्रज्ञ सागू लागले आहेत! मूळचें होतेंच तें समजण्याची अक्कल आली–जाणीव झाली–हा त्याचा त्यानाच नवीन शोध एवढाच त्याचा अर्थ.

पण भारतीय विज्ञानाला हे शोध फार पूर्वीच लागले होते यामुळें त्यानीं इंद्रियदृष्टि, भावदृष्टि व विचारदृष्टि–आधिभौतिक, आधिदैविक, आध्यात्मिक दृष्टि–अशा तीनही दृष्टींचा मेळ घालून त्याचें एक व्यवहारोपयोगी शास्त्र बनविलें. तें असे –

आवाजाचें प्रतीक बीज–म्हणजे वर्ण–त्याचा जोड म्हणजे शब्द व शब्दाचा जोड म्हणजे वाक्य व त्याचेंच नाव मत्र. मत्राचें चित्र म्हणजे रेखाकृति व त्या रेखाकृति सबधानें कार्य व त्याची पद्धति इष्टफलदायी कशी होईल अशा रीतीनें त्याची माडणी केली व त्याचें शास्त्र बनविलें. **हीच प्राचीन भारतीयांची विज्ञान किमया.**

सामान्यत प्रचारात असलेली नवग्रहोपासना, त्यातील पूजा स्तोत्रें व

जपमंत्र हे पौराणिकच असतात-जपसंख्या बहुश पौराणिक व वैदिक ही सारखीच आहे. त्या ग्रहाचीं प्रतिकें म्हणजे यंत्रे हीं जाणणार 'गुरुजी करून' माहिती असलेल्या शास्त्रोक्त पद्धतीनें ताव्याचीं करून उपयोगात आणावीं पण सोबत दिलेली वेदिक बीजें, तदनुसार आवाहन पद्धति व बीजमंत्र जप आणि त्याचा जपकाल ही माहिती यामलादि ग्रंथातून येथें घेतली आहे नवग्रह कवच हे पण यामल ग्रंथातून घेतलेले आहे आणखी म्हणजे त्या त्या ग्रहाचीं प्रतीकात्मक अंकयुक्त पंचदशी यंत्रें हींपण अशाच तांत्रिक ग्रंथातून घेतलेली आहेत.

(इ) **यंत्रें व त्यांचे प्रकार :** पूर्वी मंत्र व यंत्रें याच्या परस्परसंबंधाची कल्पना दिलेली आहे. येथें थोडा अधिक उहापोह करण्याची जरूरी वाटते. तो अधिक खुलासा असा मंत्रात्मक यंत्रें (जसें त्रिकोणात्मक त्रिकोणी मंगल यंत्र, श्रीसूक्त यंत्र), बीजात्मक यंत्रें (जसे सूर्य-शिव-राम इत्यादि यंत्रे) बीजयुक्त अंकात्मक पंचदशी वा बीसा यंत्र (जसे देवी यंत्रे आणि केवळ अंकात्मक यंत्रें असे) यंत्राचे प्रकार आहेत हीं सर्व यंत्रे भूपुर पद्धतीचें यंत्रें होत नवग्रह शांतीसाठीं वा नवग्रह उपासनेसाठीं त्रिंशति, त्रयस्त्रिंशति, षट्[1] त्रिंशति, एकविंशति, चतुर्विंशति इत्यादि अंकयुक्त अशीं पण यंत्रें आहेत. पण त्यापैकीं पंचदशीं यंत्रे हीं श्रेष्ठ समजलीं जातात. अंक, देवदेवता, व वैश्विक चिच्छक्ति ह्याचा जीवशिवैक्य दृष्टीचा संबंध आहे. ह्या विषयाचें एक स्वतंत्र शास्त्रच आहे. त्याचप्रमाणें वाममार्गीय शाबरी अघोरी विद्योपयोगी (जसें स्मशानजागृति भूतबाधा-निरसन, इंद्रजाल, भुतावळ, कठपुतळी, मेणपुतळी इ. इ. अंकयुक्त यंत्रेंही आहेत. या ग्रंथात काहीं नमुने आहेत)

---

१. पण प्रतीक अशा पंचदशी यंत्रामार्फत उपासना करणें असेल तेव्हांसाठीं जरूर त्या जपसंख्येचा अंकडा निराळा दिला आहे. तसेच प्रत्येक ग्रहाचे बीजमंत्र व उपासना ह्यांनीं ताव्याचीं यंत्रें, त्या यंत्रावरील मंत्र व यंत्राचे आकारही निरनिराळे आहेत. हें ध्यानात ठेवावें. (गो. प्र भा.)

सोबतच्या नवग्रह विधानामध्यें त्या त्या ग्रहाची उपासना म्हणजे अनिष्ट असताना करावयाची आराधना करिताना, त्या त्या ग्रहाची पूजा करिताना त्या त्या ग्रहाला 'आपण या, आपण यावे' असे म्हणताना "आवाहने विनियोग" असा संस्कृत शब्दप्रयोग असून त्या ग्रहाचा जप संपूर्ण झाल्यानंतर त्याचे पूर्ण फल मिळण्यासाठीं 'हवन' करावयाचें असतें. त्यावेळीं 'हवने विनियोग.' असा शब्दप्रयोग असतो. तसाच जप करिताना '–प्रीत्यर्थं जपे विनियोग" असा शब्दप्रयोग असतो. "

ग्रहपूजा मंत्र : ग्रहाना आवाहन करिताना म्हणजे बोलाविताना म्हणावयाचे मंत्र वेदातील आहेत, तसेच ते ब्रह्मकर्मसमुच्चयातील वा आन्हिक सूत्रावलींतील आहेत. तथापि त्यातील आवाहनें भिन्न भिन्न असल्याचे आठवल्यानें तीं 'अथवा' असें म्हणून लेखक शंकराचार्य यानीं दिलेल्या आवाहनाबरोबर दिलीं आहेत.

ग्रहाचीं ध्यानें व चित्रें : ब्रह्मकर्मसमुच्चयादि ग्रंथात दिलेलीं ध्यानें 'मंत्रशास्त्र' लेखकानें दिलेल्या ध्यानापेक्षा भिन्न स्वरूपाचीं असल्यानें तीं पण दिलीं आहेत. सामान्यत प्रचारात असणारीं ग्रहाचीं चित्रें ध्यानमंत्राशीं पूर्णांशानें सुसंगत असल्याचे दिसत नाहीं. तथापि प्रस्तुत ग्रहचित्रें मुख्यत रूढ व विशिष्ट हेतुदर्शक अशीं दिलीं आहेत भगवान् सहस्ररश्मि सूर्य हा आधार असून सर्व ग्रह त्याचा परिवार आहे आणि त्याचा संबंध आकाशस्थ राशिपुंजाशीं आहे ह्या दुहेरी हेतूनें प्रस्तुतचे चित्र दिलें आहे

ग्रहाचीं प्रतीक यंत्रें : 'मंत्रशास्त्र' लेखकानीं दिलेलीं यंत्रें अंकाङ्कित अशीं पंचदशी यंत्रे (अंकाची बेरीज पंचदश म्हणजे पंधराच येते) हीं असामान्य तंत्रोपासनेंतील आहेत तसें शुक्र ग्रहाचें पंचदशीयंत्र उपलब्ध न झाल्यानें 'कल्याण' या मासिकातील त्रिंशति यंत्र येथें दिलें आहे. त्या मासिकातील ग्रहाची अंकात्मक यंत्रें एका विशिष्ट पद्धतीचीं नाहीत येथें घेतलेलें सर्वरोगहर यंत्र हें पण कल्याण मासिकांतील आहे तंत्रशास्त्रात

'पंचदशी' यंत्रानां असामान्य महत्त्व आहे. म्हणूनच त्यावर 'मंत्रशास्त्र' लेखकांनीं विशेष जोर दिला आहे. तथापि प्रत्येक ग्रहाचे मंत्रयुक्त यंत्र व त्या यंत्राचा आकार हे मात्र निराळे आहेत. तीं तशीं तांब्याच्या पत्र्याचीं यंत्रें सामान्यतः उपयोगिलेलीं आढळतात.

ग्रहबीजें : ग्रहांचीं प्रतीकरूप बीजेंही भिन्न भिन्न आहेत तीं येथें दिलेलीं आहेत.

तांत्रिक पंचदशी यंत्राप्रमाणें करावयाची जपसंख्या ही पण निराळी आहे.

तसेंच ग्रहाचीं प्रतीकरूप यंत्रें उपयोगात आणितांना प्रथम त्या यंत्रांत देवदेवता यावी म्हणून ठराविक पद्धतीनें व ठराविक मंत्र म्हणून विधि आहे. त्याला "प्राणप्रतिष्ठा" – देवदेवतेचा अस्तित्वदर्शक विधि – असें म्हणतात. तो विधि झाल्यानंतरच त्या यंत्राची नित्य पूजा करून मंत्र जप करावा. असा दंडक आहे. येथें तांत्रिक पद्धतीची --- 'इहागच्छ इह तिष्ठ' हा मंत्रानें आवाहनात्मक प्राणप्रतिष्ठाच आहे.

(गो. प्र. भा.)

(अ) नवग्रहोपासना विधानम् (वैदिक बीजें व पंचदशी यंत्रें)

(योगेश्वरानंदतीर्थ)

प्रारंभींचा सामान्य पूजाविधि : नवग्रहासाठीं यंत्रकोष्टयात सुचविलेला अंक प्रथम लिहून मग ५, ६, ७. ८, ९, १. ३, २, ४ याप्रमाणे अंक यंत्रलेखन डाळिंबाच्या काडीनें अष्टगंधानें भूर्जपत्रावर करावें. यंत्र लेखन सामान्यतः डावीकडून उजवीकडे नित्य लिखाणाप्रमाणें करावयाचें असतें. भांड्यात वा डाव्या तळव्यात अक्षता घेऊन उजव्या बोटांनीं त्या ग्रहांचा पूजन मंत्र म्हणत यंत्रावर सोडणें व मग बीज मंत्र जपणें. ग्रहदोष निवारणासाठीं अनुष्ठान करण्यापूर्वी तांब्याच्या ताम्हनांत ग्रहयंत्रें आखून वाहून पूजा करणें व पंचदशीयंत्र काढून त्याची पण पूजा करावी.



नवग्रह

(१) **सूर्य** : (वर्तुळात मध्यें लाल गोल काढणें व त्यावर अक्षता पुढील **पूजा मंत्र** म्हणत टाकणे.) 'ॐ आकृष्णेन रजसा वर्तमानो निवेशयन्नमृतं मर्त्यंच । हिरण्ययेन सविता रथेनाऽऽदेवो याति भुवनानिपश्यन् । (ऋग् १–३५ व यजु–३३–४३) भूर्भुवः स्वः सूर्य इहागच्छ, इह तिष्ठ, सूर्याय नमः' **सूर्याचें ध्यान** : 'जपापुष्पोपमाद्युते द्विभुजपद्माभयहस्तसिंदूरवर्णांबरमाल्यानुलेपनज्वलन्माणिक्यखचित सर्वांगाभरण भास्करतेजोनिधे त्रिलोकप्रकाशक त्रिदेवतामयमूर्ते नमस्ते' (सन्नद्धा-

रणध्वजपताकोप शोभितेन सप्ताश्वरथवाहनेन मेरु प्रदक्षिणी कुर्वन्नागच्छ। नवग्रहसमुच्चया प्रमाणे.) असे म्हणून पूजा करावी

बीजमंत्र : ॐ ह्रां ह्रीं ह्रौं स सूर्याय नम '

एकुण जप ७ हजार करावा वेळ—उदयकाळ याप्रमाणे नित्य १२ यंत्रे लिहून श्वेत चंदनानें यंत्रपूजा मंदारफूल वाहून तांदुळाची खीर वा दुधाचा नैवेद्य दाखवून कापूरार्तीनें करावी मंत्र १४४ वेळा जपावा रविवारीं सर्व यंत्रें व १ शेर तांदूळ, सव्वा शेर साखर,

४	३	८
९	५	१
२	७	६

सूर्य यंत्र

५ पैसे रुप्याचा ८ किंवा १२ रती तुकडा द्यावा नाहीं तर १ पैसा ब्राह्मणाला दान द्यावा. असें चार रविवारीं करावें. सूर्यनारायण प्रसन्न होतो. यंत्र लेखन पद्धति :- प्रथम ५ हा अंक लिहावा नंतर ६, ७, ८, ९, १, ३, २, ४ याप्रमाणें लिहावें. या पुढील भागात 'नवग्रह कवच' देताना दिलेलें सूर्योपासनेचें दुसऱ्या प्रकारचे पंचदशी यंत्र दिलेले असून इतरत्र अष्टदलीय यंत्रही दिले आहे त्याचे मंत्र व उपासनापद्धति व हेतु हीं निराळीं आहेत. (गो. प्र. मा.)

(२) **चंद्र** : (चौकोनात आग्नेय बाजूस पांढरा अर्धचंद्र काढणे) पूजा मंत्र ॐ इमं देवा असपत्नं॰ । सुवध्वं महते क्षत्राय महते ज्येष्ठ्याय, महते जानराज्यायेंद्रस्येन्द्रियाय । इममसुष्य पुत्रममुष्य पुत्रमस्यै विशऽएष वोऽमि राजा सोमोऽस्माकं ब्राह्मणानां॰ राजा' (यजु ९-४०) 'ॐ भूर्भुव स्व चंद्र इहागच्छ, इहतिष्ठ सोमाय नम ' जपाचा बीजमंत्र : 'ॐ श्री अत्रिनेत्र संभवेनम ' किंवा 'ॐ श्रां श्रीं श्रौं स चंद्राय नम '' अथवा २ रें विधान 'अस्य श्री चंद्र मंत्रस्य ब्रह्मा ऋषि । पंक्ति छंद । श्री सोमो देवता । सों बीज । आपेनिशक्ति । चंद्र प्रीत्यर्थे जपे विनियोग । सों सोमाय नम । **जपमंत्र** : 'ॐ चात्रा चंद्राय नम '

ध्यान : (१) श्वेत श्वेतांबरधरो दशाश्वश्वेतभूषण गदापाणिर्द्विभुजश्च कर्तव्य वरद शशि अथवा (२) 'ॐ अप्सुमे सोमो अब्रवी—

दुर्तानिश्वानिभेषुजा । अग्निर्च त्रिश्वशंभुनम् । ॥ १ ॥ जपकाल: संध्याकाळ. जप १ लक्ष, दशांश हवन. अंक लेखन : प्रथम अंक ६ भरणे मग इतर अंक लिहिणे

बीजमंत्र : रोज १३५ वेळा जपणें. यंत्र रोज ९ वेळा असें २७ दिवस लिहावें. धूप दीप नैवेद्य इत्यादि सूर्य यंत्राप्रमाणे पूजा करावी नंतर हीं यंत्रें एकत्र करून शुक्ल द्वितीयेच्या दिवशीं चंद्राची पूजा करून त्याला वहावीं नंतर चंद्राच्या निमित्तानें ब्राह्मणास दक्षिणा द्यावी. जप ११ हजार करावा.

८	१	६
३	५	७
४	९	२

चंद्र यंत्र

(३) **मंगळ** : (दक्षिण बाजूस लाल त्रिकोण काढणे) **पूजा मंत्र**— 'ॐ अग्निर्मूर्धा दिव ककुत्पति पृथिव्या अयम् ॥ अपा' रेतांसि जिन्वति'। (ऋग् ८–४४–१६ यजु १३–१४) ॐ भूर्भुवः स्वः भौम इहा गच्छ, इह तिष्ठ मंगलाय नमः ।

बीजमंत्र 'ॐ क्रां क्रीं क्रौं सः भौमाय नमः' जप ७ लक्ष रोज ७ माळा वेळ २ वाजता हे यंत्र ८ दिवस रोज लिहून पूजा करावी मग गाईच्या शेणात तीं टाकावी रोज गुळाचा नैवेद्य व शेवटल्या दिवशीं चुरम्याचा लाडू करून ब्राह्मणाला भोजन द्यावें व आपण प्रसाद घ्यावा दक्षिणा ताम्रनाणकं. यंत्र लेखन ' ८, ९, १, ३, २, ४, ५, ६, ७

६	१	८
७	५	३
२	९	४

मंगळ यंत्र

ध्यान : 'रक्त मालाम्बरधर शक्तिशूल गदाधर । चतुर्भुजो मेषगणोवरद श्रीधरासुत ' जप १० हजार जपकाल-दोन घटिका दिवसास सकाळीं

(४) **बुध** : (ईशान्य कोनात हिरवा किंवा केशरी बाण काढणे) पूजामं 'ॐ उद्बुध्यस्वसमनस सखाय समग्निमिंध्व बहव नीळा दधिकामग्निमुषमच देवीमिंद्रावतोवसेनिह्वयेव ॥ अथवा ॐ उद्बुध्यस्वाग्ने

प्रति जागृहि त्वमिष्टापूर्ते स ५ सृजेथामयं च अस्मिन्त्सधस्थे अध्युत्तरस्मिन् विश्वेदेवा यजमानश्च सीदत (यजु १५-५४) ॐ भूर्भुवः स्वः बुध इहागच्छ इह तिष्ठ ॥ बुधाय नमः

६	१	८
७	५	३
२	९	४

बुध यंत्र

बीजमंत्र 'ॐ ब्रां ब्रीं ब्रौं सः बुधाय नमः' किंवा ॐ ब्रां ब्रीं ब्रौं सः बुधाय नमः' **ध्यान** "पीतमाल्यांबरधरः सर्पाकार समद्युति । खड्ग चक्र गदा पाणि सिंहस्थो वरदो बुधः" जप ७ लक्ष वेळ ५ वाजता यंत्रलेखन ८, ९, १, ३, २, ४, ५, ६, ७ याप्रमाणे हे यंत्र रोज १५ वेळा असं ५ दिवस लिहावें पूजा सूर्य मंगळ याप्रमाणे करून रोज यंत्र मिष्टान्न टाकावें नंतर ७ वे दिवशीं सर्व यंत्रें खोल पाण्यात टाकावीं सुवासिनीला लुगडें, ग्वण, भोजन, व अलंकार द्यावे

(५) **गुरु** (उत्तर दिशेस पिवळें अष्टदल काढणे) **पूजामंत्र** 'ॐ बृहस्पते अति यदर्यो अर्हाद्द्युमद्विभाति क्रतुमज्जनेषु यद्दीदयच्छवस ऋतप्रजात तदस्मासु द्रविणं धेहि चित्रम् (ऋग् २ । २३ । १५ । यजु २६ । ३) 'ॐ भूर्भुवः स्वः बृहस्पते इहागच्छ इह तिष्ठ बृहस्पतये नमः'

ध्यान देवगुरुस्तद्वत्पीतवस्त्रश्चतुर्भुजो दण्डीच वरदः कार्यः साक्षसूत्र कमण्डलु ।

बीजमंत्र ॐ ग्रां ग्रीं ग्रौं सः गुरवे नमः' किंवा 'ॐ ज्ञां ज्ञीं ज्ञौं गुरवे नमः' **काळ** मध्यरात्र रोज ७ माळा जप १९ हजार रोज ९ वेळा हे यंत्र लिहावें असं १५ दिवस करावें नंतर तीं यंत्रें जलप्रवाहात सोडावीं गुरुवारीं आरंभ करून गुरुवारीं समाप्ति करावी–ब्राह्मण भोजन, पीतवस्त्र दान व दक्षिणा द्यावी

६	१	८
७	५	३
२	९	४

गुरु यंत्र

(६) **शुक्र** (पूर्वेस श्वेत पंचकोण काढणे) **पूजा मंत्र** 'ॐ अन्नात्परिस्रुतो रसं ब्रह्मणा व्यपिबत्क्षत्रं पयः सोमं प्रजापतिः । ऋतेन सत्यमिंद्रियं विपान ५ शुक्रमन्धस इन्द्रस्येन्द्रियमिदं पयोऽमृतं मधु' (यजु

१९-७५) अथवा 'ॐ शुक्र तें अन्यर्यजुत तें अन्यद्विपुरपे अह नीवौरिवासि। विश्वाहि मया अरसिस्वधारो भद्राते- पूपन्निहरातिरस्तु।'

अथवा 'ॐ शुक्र शुशुक्रा उपोन जारएमासमीवी दिवो न ज्योर्ति। मत्र· "ॐ भृ भुव स्व शुक्र इहागच्छ, इह तिष्ठ शुक्राय नम"

११	६	१३
१२	१०	८
७	१४	९

त्रिंशति शुक्र यत्र'

ध्यान 'ध्याय श्वेतावरकिरीटी चतुर्भुज। दत्यगुरू प्रशातस्य साक्षमृत्र कमडलु॥"

बीजमत्र · ॐ द्रा द्रीं द्रौं स शुक्राय नम" जप १६ हजार, वेळ—सूर्योदय

(७) **शनि** (पश्चिमेस काळ्या माणसाची आकृति काढणे, **पूजा मत्र** 'ॐ शन्नो देवीरभिष्टय आपो भवतु पितये। श यो रभि स्रवतु न। (ऋग् १०-९-४ यजु ३६-१२) "ॐ भू भुर्व स्व शनैश्चर इहागच्छ इह तिष्ठ शनैश्चराय नम"

८	३	४
१	५	९
६	७	२

शनि यत्र

ध्यान इद्रनाल द्युति शूली वरदो धृतवाहन नानाबाणासनधर कर्तव्योर्कसुत सदा"

बीजमत्र 'ॐ प्रा प्रीं प्रौं स शनैश्वराय नम।' किंवा "ॐ श्रा श्रीं श्रू शनैश्चराय नम"

जप ७ लक्ष रोज ७ वेळा यत्र काढून पूजा करावी ७ माळा ७ दिवस नतर सर्व यत्रे एकत्र करून पिंपळाच्या मुळावर समर्पण करावी पिंपळाला ४९ प्रदक्षिणा घालून ब्राह्मणाला १० पसे भार तेल, उडीद सव्वा शेर व लोखडाची सुरी द्यावी शनिदर्शन होतें

---

१ त्र्यबकेश्वर येथील उपाध्ये यांजपाशी शुक्र पचदशीयत्र असूनही ते उपलब्ध झालें नाहीं तथापि सोबत दिलेले 'त्रिंशति' यंत्र प श्रीरामस्वरूपजी शास्त्री ह्यांच्या संकलनातून घेतलेलें आहे (गो प्र भा)

(८) राहू : (नैऋत्य कोनांत काळी मगराकृति काढणें). **पूजा मंत्र :** "ॐ कयानश्चित्र आ भुवदूती सदावृधः सखा। कयाशचिष्ठया वृता। (ऋग् ४–३१–१ यजु २७–३९) 'ॐ भू र्भुवः स्वः राहो, इहागच्छः इह तिष्ठ। राहवे नमः।

बीजमंत्र : 'ॐ भ्रां भ्रीं भ्रौं सः राहवे नमः।" किंवा 'ॐ क्ष्मां क्ष्मीं क्ष्मौं राहवे नमः।' **जपसमय :** रात्रौ. जप ७ लक्ष.

६	७	२
१	५	९
८	३	४

राहू यंत्र

ध्यान : कराल वदन खड्ग चर्म शूली वरप्रदः। नीलसिंहासनस्थश्च राहुरत्र प्रशंस्यसे। रोज सात माळा. मंत्र : 'ॐ नमो सूर्यपुत्राय, ह्रां,' यंत्रें रोज बारा वेळां बीजमंत्र म्हणत लिहावीं. तीं रोज गव्हाच्या पिठांत मिसळून गाईला खावयावीं. ब्राह्मणांस वस्त्र, मीठ व दक्षिणा देणें.

२	९	४
७	५	३
६	१	८

केतू यंत्र

(९) केतु : (वायव्य कोनांत काळा ध्वज काढणें). **पूजा मंत्र** ॐ केतुं कृण्वन्नकेतवे पेशो मर्या अपेशसे। समुषद्भिरजायथाः"। ॐ भूर्भुवः स्वः केतो इहागच्छ, इह तिष्ठ। केतवे नमः॥ (ऋग् १६–३ यजु २९–३७)

ध्यानं : धूम्रद्विबाहुवश्चैवगाहनो विकृताननः। गृध्रासन गतो नित्य नित्य केतुः सर्व वरप्रदः।

टीप : नवग्रहपूजेमध्यें ग्रहांना जें आवाहन केलेलें आहे तें मंत्र जसें : 'बुध, सूर्य इहागच्छ' इत्यादि शब्द हे मापेनें थोडेसे कमी औचित्यपूर्ण वाटतात. परंतु त्यांत अनादरदर्शाचा भाग नाहीं. जें संबोधनात्मक आवाहन आहे. तसेंच पुराणोक्त ग्रहशांत्यर्थ करावयाची पुराणोक्त मंत्र जपसंख्या आणि तंत्रोक्त पंचादशी यंत्रयोग्य जपसंख्या ही निराळी असून ती येथें दिलेली आहे. त्याचप्रमाणें पुराणोक्त नवग्रह मंत्रही खोल दिलेले आहेत.

बीजमंत्र : 'ॐ स्रां स्रीं स्रौं सः केतवे नमः' अथवा 'ॐ क्रां क्रीं क्रूं केतवे नमः'। जपसमय रात्रौ. जप १७ हजार. रोज १ यंत्र याप्रमाणे ११ दिवस यंत्रें काढून पूजा करून यंत्रें आकाशवायूमध्यें उडवावीं. बेलफळ वहावें. ब्राह्मणाला कंबलदान द्यावें.

दिवस, तिथी, नक्षत्र, दिशादि वार : गुरु, शुक्र, बुधवार उत्तम, रवि, सोम मध्य, शनि, मंगळ, अधम. *नक्षत्रें* : पूर्वा, रोहिणी, उत्तरा भाद्रपदा वाईट इतर नक्षत्रें चांगली. *लग्न* : मेष, मिथुन, मीन, मकर हीं लग्नें उत्तम इतर वर्ज्य

दिशा : पूर्व उत्तम, उत्तर मध्यम, दक्षिण वाईट त्याज्य, पश्चिम. म्लेंछाचें काम करावें. *दीप* : तुपाचा उत्तम, तेलाचा मध्यम. *आसन* : मृगचर्म धनकामना. व्याघ्रचर्म देवता साधना, वृषचर्म वशीकरण, उष्ट्रचर्म मारण मोहन.

भोजन : पुरश्चरणवेळीं जव, तांदूळ, मूग, गहूं, तूप, साखर, दूध, दहीं, फळे, सैंधव चालेल.

महिने : उत्तम मार्गशीर्ष, चैत्र, वैशाख, श्रावण. मध्यम : पौष, ज्येष्ठ, भाद्रपद, अधम : इतर, कार्तिक सामान्य, फाल्गुन वर्ज्य

पक्ष-तिथि : शुक्ल पक्ष १, ६, ११ नंदा २, ७, १२ भद्रा ३, ८, १३ जया ४, १४, ९ रिक्ता ५, १०, १५ सन्यासी वा अग्निहोत्र्यानें अनुष्ठान करावें

ग्रह जपसंख्या व आकृति : सूर्य सात हजार, चंद्र ११ हजार, मंगळ १० हजार, बुध १९ हजार, गुरु १९ हजार, शुक्र ६ हजार, शनि २३ हजार, राहू १८ हजार केतु १७ हजार ह्या संख्या सामान्य नवग्रह शांतिसाठीं आहेत. पण पत्रिकेमध्यें अनिष्ट ग्रह असतांना एवढ्या जपानें भागत नाहीं म्हणून वर दिलेली जपसंख्या व यंत्र पूजादि सुचविलेल्या आहेत 'कलौचतुर्गुणित' या न्यायानें जप करावा.

६	२	८
७	५	३
२	९	४

रवि यत्र

सर्व सुरक्षित उपासना : यासाठीं प्रथम गायत्री जप करून पुढील यत्र रविवारीं लाल गधानें लिहून धूप दीप दाखवून, ताम्याच्या ताईतात बद करून पुरुषानें उजव्या दडात व स्त्रीनें डाव्या दडात बाधावें तें यत्र मगळ यत्राप्रमाणे आहे

नवग्रह कवच : हे यामलतत्र ग्रथातील आहे, रोज १ पाठ करावा. सर्व कवच ताईतात ठेवून दण्डात बाधावें

'ॐ शिरो मे पातु मार्तण्ड कपाल रोहिणी पति । मुखमगारक पातु कठच शशिनदन ॥ १ ॥ बुद्धिं जीव सदा पातु हृदय भृगुनदन । जठरच शनि पातु जिव्हा मे दितिनदन ॥ २ ॥ पादौ केतु सदा पातु वारा सर्वांगमेवच । तिथयोऽष्टो दिश पान्तु नक्षत्राणि वपु सदा ॥ ३ ॥ असा राशि सदा पातु योगश्च स्थैर्यमेव च । सुचिरायु सुखी पुत्री युध्येच विजयी भवेत् । रोगात्प्रमुच्यते रोगी बधो मुच्येत बधनात् ॥ ४ ॥ श्रियच लभते नित्य रिष्टिस्तस्य न जायते । य करे धारयेन्नित्य तस्या रिष्टिर्न जायते ॥ ५ ॥ पठनात्कवचास्यास्य सर्व पापात्प्रमुच्यते । मृतवत्सा च या नारी काकवन्ध्याच या भवेत् ॥ ६ ॥ जीववत्सा पुत्रवती भवत्येव न सशय । एता रक्षा पठेद् यस्तु अग स्पृष्ट्वापि वा पठेत् ॥ ७ ॥

(आ) नवग्रहोपासना विधानम्—पौराणिक (गो प भा)

प्रत्येक व्यक्तीला कालातरानें एक व अनेक ग्रह अनिष्ट किंवा बाधा करण्याच्या स्थितींत असतातच यामुळें ती अनिष्टता कमी भासावी ह्यासाठीं योग्य व जाणत्या माणसाकडून त्या अनिष्ट ग्रहाची शाती करवून त्या ग्रहाचे पुढें दिलेले पौराणिक मत्र म्हणून ठरानिक सख्येइतका जप (हा आकडा पूर्वीच्या भागात दिलेला आहे) करावा जपही ठरानिक वेळीं ठरानिक एकाच ठिकाणीं बसून स्नानोत्तर शुचिर्भूतपणे करावा इष्ट फलदायी होण्यासाठीं ती जपसख्या चौपट करावी जप सपल्यानतर

त्या मंत्राचें हवन (जप संख्येच्या दशांश वा शतांश) ग्रह योग्य अशा ठरविक हवनीय द्रव्यांनी करावें व त्यानंतर ब्राह्मण भोजनादि विधि उरकावे. ग्रहानिष्टता कमी करण्यासाठी दानवस्तु व शरीरधारण वस्तु ह्यांचा उल्लेख पूर्वी केलेलाच आहे. तसेच त्या मागील शिक्षणाची कल्पनाही दिलेली आहे.

ग्रहपरत्वें पुराणोक्त मंत्र

रवीचा मंत्र—जपाकुसुमसंकाशं काश्यपेयं महद्युतिम्। तमोरिं सर्वपापघ्नं प्रणतोऽस्मि दिवाकरम्॥ **चंद्राचा मंत्र**—दधिशंखतुषाराभं क्षीरोदार्णवसंभवम्। नमामि शशिनं सोमं शंभोर्मुकुटभूषणम्॥ **मंगळाचा मंत्र**—धरणीगर्भसंभूतं विद्युत्कांतिसमप्रभम्। कुमारं शक्तिहस्तं च मंगलं प्रणमाम्यहम्॥ **बुधाचा मंत्र**—प्रियंगुकलिकाश्यामं रूपेणा प्रतिमं बुधम्। सोम्यं सौम्यगुणोपेतं तं बुधं प्रणमाम्यहम्॥ **गुरूचा मंत्र**—देवानां च ऋषीणां च गुरुं कांचनसंनिभम्। बुद्धिभूतं त्रिलोकेशं तं नमामि बृहस्पतिम्॥ **शुक्राचा मंत्र**—हिमकुंदमृणालाभं दैत्यानां परमं गुरुम्। सर्वशास्त्र प्रवक्तारं भार्गवं प्रणमाम्यहम्॥ **शनीचा मंत्र**—नीलांजन-समाभासं रवि पुत्रं यमाग्रजम्। छायामार्तंडसंभूतं तं नमामि शनैश्चरम्॥ **राहूचा मंत्र**—अर्धकायं महावीर्यं चंद्रादित्य विमर्दनम्। सिंहिकागर्भसंभूतं तं राहुं प्रणमाम्यहम्॥ **केतूचा मंत्र**—पलाशपुष्पसंकाशं तारकाग्रह-मस्तकम्। रौद्रं रौद्रात्मकं घोरं तं केतुं प्रणमाम्यहम्॥

(इ) नवग्रहविधानम् (तांत्रिक)

(१) श्रीसूर्य—ॐ अस्य श्री चतुरक्षर सूर्यनारायणस्वामि महामंत्रस्य। श्री अज ऋषि। गायत्री छंद। श्री सूर्यो देवता। मम श्री सूर्यनारायण भुवनाधीश प्रसादसिद्धिद्वारा चिंतितफलावाप्त्यर्थं जपे विनियोग। ॐ श्री अजाय ऋषये नमः मूर्ध्नि। गायत्री छंदसे नमः मुखे

वराहतीर्थ, चक्रतीर्थ, त्रिलतीर्थ, गोगर्भपाण्डवतीर्थ, पापनाशान्तर्गङ्गानागतीर्थ,
स्वर्णमुखीकपिलतीर्थ, सरस्वतीतीर्थ, जाबालघटतीर्थ, वैकुण्ठतीर्थ, ब्रह्मतीर्थ,
शेषतीर्थ, सीतातीर्थ, भीमतीर्थ, तुल्यतीर्थ, अनन्ततीर्थ, नारदतीर्थ, द्वादशा-
दित्यतीर्थ, सनक सनन्दनसनातनसनत्कुमारतीर्थ, कुमारधाराष्टोत्तरशततीर्थ,
रामकृष्णतीर्थ, तुम्बुरतीर्थ, सिद्धतीर्थ, गोतीर्थ, कल्यतीर्थ, कश्यपमार्कण्ड-
गरुडतीर्थ, षण्मुखतीर्थ, शिवतीर्थ, तारणतीर्थ, पद्मकोशतीर्थ, पोरुषतीर्थ,

पद्मतीर्थ, इन्द्रतीर्थ, सर्वतीर्थनिवासाय, इन्द्राद्यष्टपालकसेविताय, जय जय व्यङ्कटेशसर्वेशानन्दभरितपद्मनाभ। हरे नारायण गोविंद कृष्ण राम मुरारे। वासुदेव सङ्कर्षणअच्युतानन्तपुरुष। महाविष्णो उपेन्द्र सर्वलोकाधीशसर्वस्वतन्त्रनिराकारनिष्कलङ्कनिर्द्वंद्व। निःसङ्गनिष्प्रपञ्चगुणातीतब्रह्मप्रलयमहाप्रलयकुक्षिचरवटपत्रशायिन् उत्पत्तिस्थितिलयादिकारण। शङ्खचक्रगदापद्माकृत्वाणखड्गपाशकमण्डलकमलपूरणनागपाशलाङ्गलमुसलवैतानि कल्पवृक्षस्थायिन् शक्तितोमरजरायुधवैष्णवज्वरमाहेश्वरब्रह्मास्त्रादि नानायुधधर ॐ नमो भगवते मम पापक्षयकण्ठमालापस्मारशीतज्वरैकाहिक द्वाहिक त्र्याहिक चातुर्थिक सतत ज्वर अस्थिगतज्वर सन्निपातज्वर उदररोगमूत्रकृच्छ्रमहाव्यसनप्रमेहोष्णादिरोग विस्मृतिज्वर तापज्वर पित्तज्वर कपालशूल कर्णशूलाक्षिशूलकुक्षिशूल कटिशूल हस्तशूल पादशूल सर्वाङ्ग देहकालमहाशूलादि सर्वव्याधीन् क्षणेन भिन्धि भिन्धि। छिन्धि छिन्धि। नाशय नाशय। निकृन्तय निकृन्तय। भेदय भेदय। जम्भय जम्भय। महावीर व्यङ्कटेश्वरस्मरणमात्रेण महादुःखदुष्टदर्शनमहापातकनिवारण कुरु कुरु। स्त्रीपुत्रपशुकादीन् सर्ववैरिण सेवकान् परित्रान् कुरु कुरु। सर्वे शत्रूणि नाशान् विध्वंसय विध्वंसय। सर्वग्रहानुच्चाटय उच्चाटय। भूतप्रेतपिशाचयक्षराक्षसब्रह्मराक्षसकूष्माण्डवेतालादिभ्यो भय निवारय निवारय। यमदूतशाकिनीडाकिनीमोहिनीमहिषासुरसर्ववृकादिभ्यो भय निवारय निवारय।

'ॐ नमो भगवते श्रीनिवासाय महाविष्णुरूपाय महालक्ष्मीसहित श्रीव्यङ्कटेशाय नमः ॥

इत्येतत्कवचं पुण्यं सर्वाघध्वंसनाशनम्।
सर्वसम्पत्प्रदं नृणां सर्वमङ्गलदायकम्॥
पुत्रपौत्रं समृद्धिं च पशून् धान्यं तथैव च।
आयुष्यं लभते सौख्यं सर्वपापैः प्रमुच्यते॥
त्रिसन्ध्यमेतत्कवचं भक्तितो यः पठेन्नरः।
प्राप्नोति परमारोग्यं भुक्तिं मुक्तिं च विन्दति॥

इति व्यसदेशकवचस्तोत्र सम्पूर्णम्। ॐ शान्ति शान्ति शान्ति। ॐ तसत्

आरती शेषाची

भुधर सुखकर शेषा, जय जय नागेश, मृगजल समदल वेषा तत्त्रय मूषा कर्ण वर्ण विनचक्षु श्रवणेशा, मणिमय गणना नाहि मणिमंडळ केशा॥ जयदेव जयदेव जय आदीरूपा नारायणा अवतारा ब्रह्मचिद्रूपा ॥ १ ॥

ऋद्धिसिद्धिला निरीक्षण त्वा केलें, विनतातनया इच्छित अमृत त्वा दिधले दयितानिन नादसी तु स्वरूपिं निज धाले शंकरप्रेमे भूषण सर्वांगीं ल्याले ॥ २ ॥

विष्णुशयनि तुझ्या सुखनिद्रित क्षीरार्णवतीरीजा कमला युत वाहे॥ सुरवर किन्नर महिमा सप्रेमें गाये प्रेमाद्भुत करुणान्वित धुडिजपद ध्यावें ॥ ३ ॥

श्रीगुरु समर्थ

आत्मज्योतिदर्शनाचें साधन

श्रीभगवद्गीतांतर्गत श्रीगुरूपदिष्टमार्ग

सूर्योदयापूर्वी अगर सूर्योदयानंतर रात्रीसुद्धा ठराविक वेळी व ठराविक स्थळीं सुसुस्नून शुचिर्भूत होऊन आपल्यापुढें अग्निकुंड ठेऊन, त्यात अग्नि प्रज्वलित करावा

आचम्य अस्य श्री अग्निउपासनकर्मण
श्रीब्रह्माग्निनारायणो देवता। श्री गोपालकृष्ण ऋषि ।
उष्णिक् छंद आत्मज्योतिर्दर्शनार्थे जपे विनियोग
मंत्र—‘असतो मा सद्गमय तमसो मा ज्योतिर्गमय स्वाहा’
ध्यान—यज्ञनारायण देव यज्ञज्वालासमुद्भव
चतुर्भुज शान्तमूर्तिं नमामि सकलार्थदम्।

नंतर प्रज्वलित कुंडामध्ये श्री भगवद्गीतेच्या चवथ्या अध्यायातील खालीं लिहिलेला प्रत्येक श्लोक म्हणून चंदनाच्या चारीक घृताक्त दलप्याच्या आहुती द्याव्या.

ब्रह्मार्पणं ब्रह्म हविर्ब्रह्माग्नौ ब्रह्मणा हुतं ।
ब्रह्मैव तेन गंतव्यं ब्रह्मकर्मसमाधिना ॥ स्वाहा ॥
दैवमेवापरे यज्ञं योगिनः पर्युपासते ।
ब्रह्माग्नावपरे यज्ञं यज्ञेनैवोपजुह्वति ॥ स्वाहा ॥
श्रोत्रादीनीन्द्रियाण्यन्ये संयमाग्निषु जुव्हति ।
शब्दादीन् विषयानन्य इंद्रियाग्निषु जुव्हति ॥
सर्वाणींद्रियकर्माणि प्राणकर्माणि चापरे ।
आत्मसंयमयोगाग्नौ जुव्हति ज्ञानदीपिते ॥
द्रव्ययज्ञास्तपोयज्ञा योगयज्ञास्तथापरे ।
स्वाध्यायज्ञानयज्ञाश्च यतयः संशितव्रता ॥ स्वाहा ॥
अपाने जुव्हति प्राणंऽप्राणे पानं तथापरे ।
प्राणापानगती रुध्वा प्राणायामपरायणा ॥
अपरे नियताहारा प्राणान् प्राणेषु जुव्हति ।
सर्वेऽप्येते यज्ञविदो यज्ञक्षपितकल्मषा ॥
यज्ञशिष्टामृतभुजो यान्ति ब्रह्म सनातनं ।
नायं लोकोस्त्ययज्ञस्य कुतोऽन्यः कुरुसत्तम ॥ स्वाहा ॥
एवं बहुविधा यज्ञा वितता ब्रह्मणो मुखे ।
कर्मजान् विद्धि तान् सर्वान् एवं ज्ञात्वा विमोक्षसे ॥ स्वाहा ॥
श्रेयान् द्रव्यमयाद्यज्ञात् ज्ञानयज्ञः परंतप ।
सर्वं कर्माखिलं पार्थ ज्ञाने परिसमाप्यते ॥ स्वाहा ॥

नंतर

अग्ने नय सुपथा राये अस्मान् ।
विश्वानि देव वयुनानि विद्वान् ॥


हा मंत्र १२ वेळ म्हणावा व अशा प्रकारानें अग्निनारायणाची प्रार्थना करावी.

नंतर अग्निदेवतेला पुष्प गंध अक्षता वहाव्या, व धूपदीप दाखवावा व घृताच्या ३ पळ्या नैवेद्य समर्पण करावा.


नंतर देवापुढील नीराजनाच्या दीपकलिकेकडे त्राटक (टक लावून पहाणे) करावा. असा अभ्यास अर्धा तास (मध्यें १० मिनिटें झाल्यावर थांबावें. नीराजनाच्या प्रज्वलित ज्योतीकडे पहावें. ती हालता उपयोगी नाही) सहा महिनेपर्यंत करावा. आत्मज्योतिदर्शन होत राहील.

श्री ११०८ स्वामी योगेश्वरानंदतीर्थ
शंकराचार्य पुरी

□ □



पृ. ३४० वरील टीपेप्रमाणें यंत्र



पृ. ३५० वरील टीपेप्रमाणें यंत्र

मंत्र शास्त्र

उपसंहार

प्राचीन भारतीय ब्रह्मांडशास्त्र
व आधुनिक नव विज्ञान

१० प्राचीन भारतीय 'ज्ञान' व आधुनिक विज्ञान

(गो. प्र. भावे)

१. आधुनिक विज्ञान व प्राचीन भारतीय 'ज्ञान'

पाश्चिमात्यांची आधुनिक विज्ञानशास्त्रांतील प्रगती अजून बाल्यावस्थेंत आहे. मानवी शरीरांतील चिच्छक्तीची त्यांना अजून जाणीव झालेली नाहीं. मग ती कशी आहे, तिचें कोणतें कार्य असते व ते ती कसें करिते, ह्याची त्यांना थोडी देखील कल्पना नाहीं व नसावी हें उघड सत्य आहे.

अखिल विश्व म्हणजे ब्रह्मांड व त्यातील लहान मोठीं जगे, त्याचे अनंत अवकाशांतील स्थान, त्याचे व्यवहार व त्यांची हालचाल ह्या गोष्टी ज्यामुळें घडतात, हीं कार्यें ज्या शक्तीच्या सामर्थ्यानें वा प्रचोदनेनें होतात, तिला भारतीय विज्ञानशास्त्रात 'चिच्छक्ति' असें म्हणतात. पाश्चिमात्य विज्ञानशास्त्रज्ञ तिला संकुचित अर्थानें सृष्टि, सृष्टशक्ति असे नांव देतात. सृष्टि, सृज् उत्पन्न करणें, प्रसार करणें, प्रसरण पावणे एवढाच अर्थ सृष्टि शब्दानें गर्भित आहे असें ते मानितात. पण उत्पन्न करणें वा प्रसार करणें हे कार्य सृष्टीमध्ये कसें होतें वा घडतें, ती प्रचोदना त्यात कां संभवते, ह्याचा खोल विचार न करितां तो सृष्टीचा सहज धर्म आहे असें ते मानितात, बाह्यतः मृत दिसणाऱ्या तृणकाष्ठा-दिकांमध्यें ठराविक काळानंतर पुनः जिवंतपणा कसा, कां व कोठून येतो,

हिरवेपणा म्हणजे ताजेतवानेपणा म्हणजे जें 'जीवित' आहे, त्याचा प्रकाश वा तेज ह्याशीं काय संबंध आहे, ह्याचा त्यांना अजून पत्ता लागला नाहीं.

तसेंच अनंत अवकाशांत एकसारख्या लहरी म्हणजे लाटा उत्पन्न होत असून त्या सर्व स्पंदनमय आहेत. ह्या वस्तुस्थितीची, अधुक कल्पना मात्र त्यांना अलीकडे होऊं लागली आहे, ही आनंदाची गोष्ट आहे. पण त्या स्पंदनाच्या मदतीनें मानवी शरीरांतील पंचप्राणांना चालना देणाऱ्या शक्तीचा, विश्वांतील अनंत अवकाशांतील लहरींशीं म्हणजे स्पंदनांशीं कांहीं संबंध आहे का नाहीं ह्याची त्यांना अल्पही जाणीव नाहीं. याच्या उलट भारतीय विज्ञान शास्त्रज्ञांनी 'पिंडीं तें ब्रह्मांडीं' या सूत्र वाक्यानें तो संबंध सहज लीलेनें अनुभवून सांगूनही टाकिला!

स्पंदन-ध्वनि – शब्द व त्यांचें सामर्थ्य

जीवित ही एक शक्ति आहे. शक्ति ही स्पंदनमय आहे. स्पंदनें पाहातां येतात, ऐकतां येतात, व लिहितां येतात. अणुरेणू हे स्पंदनमयच आहेत. अनंत अवकाशांत निःस्तब्धता नाहीं. चलनवलन म्हणजे स्पंदनें सारखीं सुरू आहेत. विश्व म्हणजे काय, त्याचें स्वरूप व विचार म्हणजे काय, कसा व केवढा आहे हें सांगतांना भारतीय आर्य विज्ञानशास्त्रज्ञांनीं ब्रह्मांड, प्रकृत्यंड, मायांड, शाश्वतांड इत्यादि शब्द योजून वर्णन केलें आहे. अंड हें मध्यें फुगीर व दोन्ही टोकाकडे निमूळतें चपटें असतें ही उपमाही फार अर्थगर्भित आहे.

ते शब्द अर्थगर्भित आहेत.

स्पंदनें सुरू असलीं म्हणजे त्यांतून म्हणजे त्यांच्या समुच्चयांतून ध्वनि उत्पन्न होतो. ध्वनि म्हणजे आवाज. तो व्यक्त करण्याचें साधन म्हणजे शब्द (वर्ण किंवा अक्षरांचा समुदाय). या समुदायाला शब्द

असेही म्हणतात. शंकर डमरू वाजवीत असताना 'अ-इ-उ ण-ऋ ऌ क् घट-झ-भ-वें' अशा प्रकारचे आवाज उत्पन्न होऊन त्यापासून अकार-उकार व मकार म्हणजे 'ॐकार' व इतर सर्व वर्ण उत्पन्न झाले असेंही पुराणांतरीं वर्णन आहे.[१]

'एकोऽहम् बहुस्याम्' अशी वृत्ति, असें स्फुरण वा स्पंदन ब्रह्मांडाधीशाच्या अंतर्भागात, अंतःकरणात-उत्पन्न होताच ती सिसृक्षा म्हणजे सृजन करण्याची, उत्पन्न करण्याची, म्हणजेच प्रसृत होऊन विस्तारण्याची इच्छा होताच जो कंपनजनित आवाज झाला तोच 'ॐ' हा होय. याचा अर्थ 'ॐ' कार व परमात्मा (थोरला देव) ह्याचा अधिदैव संबंध आहे. असें सिद्ध होतें. जसें-एका मोठ्या भांड्यांत पाणी भरून ठेवून मग त्या भांड्यास धक्का दिला, तर आंतील सर्व पाण्यास एकदम धक्का पोंचून पाण्याच्या सर्व भागांत कंपनें सुरू होऊन सर्व भांडेभर तरंग उठू लागतात. तशी स्थिति अखिल ब्रह्मांडाच्या म्हणजे विश्वाच्या मूल साम्यावस्था प्रकृतियुक्त निष्क्रिय स्थितीत सृष्टिसंकल्परूपी (उत्पन्न करण्याची इच्छारूपी) कंपन सुरू झालें, तें 'ॐ' ह्या शब्दानें व्यक्त झालें. सारांश, जेथें कार्य आहे, तेथें कंपन आहे व कंपन आहे, तेथें आवाज म्हणजे शब्द आहेच असें सिद्ध होतें.'

'कार्यं यत्र विभाव्यते किमपि तत्स्पंदेन सव्यापकम् ।
स्पंदश्चापि तथा जगत्सुविदित शब्दान्वयी सर्वदा ॥
सृष्टिश्चापि तथादिप्रकृतिविशेषत्वादभूत्स्पंदिनी ।
शब्दश्चोद्भवत्तदा प्रणव इत्योंकारस्वरूपः शिव '

असें योग्यशास्त्रांत सांगितलें आहे, तें खरें आहे

---

१. व्याकरणकार 'पाणिनी' ह्याचा 'अष्टाध्यायी' हा संस्कृत व्याकरणाचा मूळ ग्रंथ व त्यांतील भाषेच्या व्याकरणाची मूलतत्त्वें 'सूत्र' रूपानें ग्रथिलेलीं आहेत. त्याचा प्रारंभ भगवान् शंकराच्या डमरूच्या वर दिलेल्या आवाजातून आहे.

पाश्चिमात्य विज्ञानाचें ईषद्दर्शन

पाश्चिमात्य शोधित आधुनिक विज्ञानशास्त्राप्रमाणे रेडिओ लहरीरूपानें उत्पन्न झालेले आवाज म्हणजे शब्दच आहेत. हे शब्द, ह्या लहरी, हा स्पंदने, हीं सर्वाहूने आपल्या सूर्यमालिकेंतील ग्रहोपग्रहाच्या आजूबाजूस, आसपास व सभोंवती होतीच व आहेत. आपला सूर्य व मालेतील लहान मोठे ग्रहोपग्रह आणि त्यातील अवकाश याचें स्वरूप, ह्याचे ज्ञान मिळविण्यात पाश्चिमात्य विज्ञानशास्त्रज्ञ गुंतलेले आहेत. हे काय ते करीत असताना त्यापलीकडे अनंत असा विश्वावकाश म्हणून काहा आहे, एवढीच अधुक कल्पना त्याना आलेली आहे. त्यातील घटक, त्याची स्थिति, त्यातील चेतनत्व वा अचेतनत्व इत्यादि गोष्टीची अधुक कल्पनाही त्याना नाहा. विश्वांतरीय अवकाश – 'Cosmic space, Cosmos' – इत्यादि शब्द वापरून ते शास्त्रज्ञ पुढें जाऊ म्हणतात. आइनस्टाइनच्या विचाराचा मागोवा घेत घेत चतुर्मात्रात्मक (Four Dimensions) जगतात जाण्याचा प्रयत्न करून सध्या तरी ते अपयशी व कुंठितमति झालेले आहेत[1].

पाश्चिमात्याच्या विज्ञानाच्या प्रगतींत आणखीं थोडें खोल जाऊन ते शास्त्रज्ञ कोठपर्यंत पोचले आहेत, ते काय करीत आहेत, ते हे शोध वा

---

१. एस् के. जेसप S K Jessop and Allende Letters by Riley Crab The strange case of Dr Jessop-Grey Barker (U S A) ही इ. स. १९४३ ची अमेरिकेन तयार केलेल्या अदृश्य जहाजाची दुर्दैवी कहाणी—ही हकीगत अमेरिकी नौदलान दडपून अप्रसिद्ध ठेवण्याचीही फार खटपट केली ! कारण ते विज्ञानवादी अजूनही (१९७०) या अतर्क्य घटनेबद्दल काहींच उत्तर देऊं शकत नाहींत. Chapters of life -by Lama T L Rampa 1967 ह्या ग्रंथात विश्वावकाशात ज्या घटना घडत आहेत, त्याच्या परिणामाची इ. स. २००२ ची भविष्य दिलेली आहेत. शदरहू लामा क्यानडाच्या उत्तर ध्रुवप्रदेशाच्या वर्फाळ भागात काही वर्षे फिरून सध्या—इ. स. (१९७० जून—) लंडन येथ आले आहेत. त्याशीं सहवास झालेले महाभाग आज महाराष्ट्रात आहेत.

प्रयत्न कशा हेतूनें करीत आहेत आणि त्यात त्याना कितपत यश आलें आहे, ते समजण्याचा प्रयत्न करू.

(अ) **तेज म्हणजे किरण संशोधन कार्य** : अनंत अवकाशात अनंत वस्तू किंवा पदार्थ वा द्रव्यें असून तीं सहज न समजण्याइतकीं अफाट व अथांग आहेत. त्यात तेज – प्रकाश व त्याचे किरण ही वस्तु आहे. तिचे पृथक्करण करून त्यात काय आहे हे पहात असताना त्या शास्त्रज्ञाना पुढील गोष्टी ज्ञात झाल्या. Analysis of Radio Wav

(१) किरणशलाकेंत रंग असतात. ते का व कसे उत्पन्न होतात, ते कसे व कोणत्या कारणानें प्रतिसारित होतात, त्यातील प्रतिसारक शक्ति कोणती, कोठें आहे, कोठून निघते व उत्पन्न होते कोठे जाऊन थांबते इत्यादि गोष्टींचें अल्पज्ञान त्याना झालें आहे.

(२) आल्फा (Alfa) बीटा (Beeta), गामा[1] (Gama) अल्ट्रा व्हायोलेट (Ultra Violet) इन्फ्रारेड (Infra Red) या नावाचे किरण सामान्यतः अदृश्य असतात. पण विशेष प्रकारचीं साधनें असतील तरच ते दिसू शकतात. लेसर बीम (Leser Beam) इत्यादि किरणाचे ज्ञान त्याना झालें, पण त्या किरणाची आद्य जननी कोण व त्या किरणाचें कार्य तसें कां घडतें हे अजून त्याना अज्ञात आहे. तसाच श्रवणातीत (Ultra-Sonic) ध्वनीचाही शोध लागला. भारतीय शास्त्रज्ञाना सूर्यकिरण व अवकाशकिरण आणि सूर्याच्या षोडशकला ह्याचें पूर्ण ज्ञान व परिणाम अवगत होते, हें पुढें ओघाने येणारच आहे. निरनिराळ्या ग्रहावर ग्रहाच्या दिशेने अवकाशयाने पाठवून तद्वारें लागणारे पाश्चिमात्यांचे शोध अजून उपयोगाच्या व ज्ञानाच्या वा अस्तित्वाच्या कसोटीवर घासले जावयाचे आहेत.


विश्वावकाशातून अतिसूक्ष्मतम वस्तू—याना ते पाश्चिमात्य शास्त्रज्ञ सध्या तरी particles म्हणजे 'सूक्ष्माणू' म्हणतात. ते सूक्ष्माणू आपल्या

---

१. आल्फा, बीटा, गामा ही ग्रीक भाषेतील अक्षरांचीं नावें आहेत.

सूर्यमालिकेच्या अवकाशात येतात, त्यात चेतना असते, एवढेच नव्हे तर, त्यात Matter, Anti Matter वस्तू किंवा द्रव्य व त्याची 'प्रतिकृति' अशी कांही तरी व्यवस्था वा रचना विश्वावकाशात असली पाहिजे, असेंही मानण्यापर्यंत त्या शास्त्रज्ञाचा कल होत चालला आहे.

(आ) अवकाश वस्तु संशोधन कार्य : त्या शास्त्रज्ञाना अणु म्हणजे काय व त्याचे कांहीं घटक आहेत काय? तसेंच अणु विभाजन कसे करावें इत्यादि महत्त्वाचे शोध लागले. त्या ज्ञानातून पुढील गोष्टी त्याना समजल्या. हे शोध पदार्थविज्ञान शास्त्रज्ञांनी (Physicist) मिळविलेल्या ज्ञानाच्या मदतीनेच झाले.



आधुनिक अणु

(१) विश्व (Cosmos) वा विश्वावकाश (Cosmic space) ही अणूंनी भरलेली आहेत. म्हणजे त्यात अनंत अणू आहेत. त्यात अनेक मूलतत्त्वें आहेत व आणखी कांहा असावे एवढें ज्ञान त्याना होत आहे.

(२) अणूमध्ये अत्यंत प्रभावी अशी शक्ति आहे. त्यात विद्युत्संचारी घटकही आहेत. निरनिराळ्या पदार्थांतील अणु निरनिराळे असतात.

(३) अणूमध्ये धनाणु (Protons) ऋणाणु (Electrons) व शून्याणु किंवा शून्यकण (Neutrons)—धनकण व ऋणकण मिळून बनलेला घटक. यावर विद्युद्भार मुळींच नसतो) हे भाग असतात. पण इलेक्ट्रॉन हा प्रोटॉनभोंवतीं द्रुततम गतीने फिरतो आणि तो कां फिरतो एवढें आकर्षण व गति कां व कोठून आली हें त्याना समजत नाहीं.

(४) धनाणूवर विद्युद्भार असतो. ऋणाणु हे अणुगर्भाच्या भोंवतीं सतत फिरत असतात. त्याचे एक आकर्षण केंद्र बनत असतें.

(४अ) अमेरिकेतील 'लोवे' वेधशाळेतील शास्त्रज्ञ प्रो. लारेन स्पष्टपणें म्हणतो, 'या अत्यंत सूक्ष्मातिसूक्ष्म विद्युत्परिमाणूत खचितच ज्ञानशक्ति असली पाहिजे.'

(५) विश्व हे अन-अंत आहे. त्यांत कांहीं मूलतत्त्वें[1] (Elements) आहेत.

(६) अवकाशांत अनंत व्यहाणु (Molecules) असून ते अवकाशांत व अवकाशांतील ग्रहांवर व ग्रहगोलकांवर एकसारखे येत असून अवकाशभर प्रसृत होत आहेत. 'व्यहाणू' म्हणजे स्वतंत्र अस्तित्व असणारा मूलतत्त्वाचा सर्वात भाग.

(७) अनंत अवकाशांतून इतस्ततः प्रसृत होणारे कण (Particles) ह्याचें कां, कोठून व कसें प्रसरण होतें हें त्या शास्त्रज्ञांना अजून समजत नाहीं[2].

(८) Molecules व Particles हे जवळजवळ एकाच प्रकारचे पदार्थ आहेत, पण या अनंत अवकाशांत या प्रत्येकाची वा प्रत्येक तत्त्वाची प्रतिकृति म्हणून कांहीं तरी आहेच. ह्याची अंधुक कल्पना त्यांना अलीकडे होऊं लागली आहे. कारण Matter व Anti matter, Puppet व Anti Puppet इत्यादि प्रतिकृतिरूपी गोष्टी असल्याचा भास त्यांना होऊं लागला आहे.

---

१. हीं स्वतंत्र व परतंत्र असून त्यांत मूलभूत अशीं बरीच तत्त्वें असून त्यांच्या अंतर्गतही अनेक उपतत्त्वें व मूल द्रव्योपद्रव्यें आहेत असें त्यांना वाटूं लागलें आहे. लहान कण असून त्यांत मूलतत्त्वाचे सर्व गुणधर्म असूं शकतात. पण असतातच असें ठामपणें त्या शास्त्रज्ञांना सांगता येत नाहीं. मूलतत्त्वाचे दोन कण मिळून एक 'व्यूहाण' बनलेला असतो.

२. या कणाचें वर्गीकरण ते शास्त्रज्ञ Baryons, Mesons, Leptons अशा भागांत आज करितात. त्याच्या यथार्थ स्वरूपाचें ज्ञान त्यांना अजून अवगत झालेलें नाहीं. (New Image of Matter-Fortune— जून १९६८) तसेंच फोटॉन, आयॉन वा पोझिट्रॉन ह्या घटकाचें निश्चयक ज्ञान त्या शास्त्रज्ञांना नाहीं. एवढेंच नव्हे तर Electrons ची अमर्याद गति आहे, ती का? कोठून आली आणि ती गति कशी वाढ्यांत ठेवारी हें पण त्यांना अद्यापि समजलेलें नाहीं.

(९) अजून ते शास्त्रज्ञ त्रिमात्रात्मक (लांबी, रुंदी, उंची ही परिमाणे म्हणजे मापें म्हणजे वेदांती भाषेत 'मात्रा') जगतातच वावरत असून त्यांचे शोधही त्या मर्यादेपलीकडे अजून जात नाहींत. अवकाशात त्या त्या ग्रहाच्या गुरुत्वाकर्षणकक्षेच्या बाहेर जाऊन निर्वजन स्थितीत मनुष्य तरंगू शकतो. पण हे असे का घडू शकते, ह्याचा नीटसा उलगडा त्यांना अजून झालेला नाहीं तसेच पार्थिव (पृथ्वीविषयक) गुरुत्वाकर्षणात असताना एका अवकाशयानातून दुसऱ्या अवकाशयानात मनुष्य प्रवेश करू शकतो[1] ह्या अनुभवाप्रत ते शास्त्रज्ञ येऊन ठेपले आहेत.

(१०) त्रिमात्रात्मक जगतापलीकडे चतुर्मात्रात्मक व आणखी अनेक[2] मात्रात्मक (मापात्मक) जगत् म्हणजे व्यवहार अनंत अवकाशात आहेत किंवा

---

१. रशियानें सोयूज ४ व सोयूज ५ या अवकाशयानांतील आश्चर्य वाटणारी गोष्ट (जानेवारी १९६९) म्हणजे चंद्रावर Luna हें मानवरहित यान पाठविले तर अमेरिकेन आपले आपोलो–१२ हें मानवसहित यान चंद्रावर उतरून तेथील खडक व माती घेऊन मानवासहित तें यान परतही आणिलें (१९६९ जुलै) झोंड ६–७ हें पण अवकाशयान पाठवून चंद्र–सूर्यकिरण व मंगळावरील व शुक्रावरील वातावरण ह्यासंबंधाचे काहीं ज्ञान मिळविले. रशियानें सूर्यावरील डाग हें काय आहे याचें संशयित अल्प ज्ञान मिळविलें ते डाग वा स्फोट आहेत का? ते ठराविक म्हणजे अकरा वा बारा वर्षांच्या अवधीनंतरच होतात, ते का ह्याबद्दल अजून ज्ञान मिळाले नाहीं. अमेरिकेचा अपोलो १३ चा प्रयोग फसला, तरीही अपोलो १४ चा प्रयोग करण्याचे घोषित झाले आहे ही कर्म तत्परता 'ज्ञान प्र सोसाटींच अथाग ज्ञानलालसा' असे मात्र नव्हे, ती दुर्दम्य, अशात जीवाचो दुर्दम्य हाव आहे रशियाचें सोयूझ ९ हे मानव सहित यान पृथ्वी भोंवतालच्या वातावरणातील शोध घेऊन व पृथ्वीला एकूण २७३ प्रदक्षिणा घालून सुखरूप खाली उतरले (१९ जून १९७०)

२ 'तिबटी भविष्य, तिबेटी ज्ञान व भारतीय विज्ञान' ह्या १९६८ डिसेंबर १९६९ जानेवारी या काळात 'नवाकाळ' या वर्तमानपत्रात प्रसिद्ध झालेली एतद्विषयक भारतीय मंत्रद्रष्ट्या ऋषींची विज्ञान प्रगति किती उच्च दर्जाची होती ह्याबद्दल माझी लेखमाला वाचल्यास ध्यानात येईल गो प्र भावे)

असणें शक्य आहे, ह्या गोष्टीवर विश्वास ठेवण्यालाही ते धजत नाहींत. आईन-स्टाइनच्या सापेक्षवादाच्या तत्त्वाच्या (Theory of Relativity) कल्पनेंत त्रिमात्रात्मक जगतापलीकडे अनेक मात्रात्मक जगत् आहे असें ध्वनितही केलें असून तसा भीत भीत केलेला, मनाला घोटाळ्यांत ठेवणारा म्हणून चमत्कारिक वाटणारा प्रयोग झाला, पण तसें कां घडलें हें अजूनही त्यांना गूढच आहे.

Time and Space

(११) वेळ व अवकाश (म्हणजे काल व दिक्) ह्या दोन मात्रा म्हणजे परिमाणें किंवा मापें सापेक्ष अशींच आहेत, हें त्यांना अजून समजत नाहीं.

(१२) पार्थिव इंद्रियगम्य ज्ञानाच्या पलीकडे श्रेष्ठ असें 'अतींद्रिय ज्ञान' ही वस्तुस्थिति असून ती अनुभवगम्य आहे, ही गोष्ट ते विज्ञान-शास्त्रात 'यत् दृष्टं तत्सत्यम्' ह्याच विचारधारणेचे असल्यानें सर्वसाधारण पणें कबूल करण्यास तयार नाहींत.

(इ) अंतरिक्ष विज्ञानांतील अत्याधुनिक प्रगतीचें दर्शन[1]

(अ) विश्व हें केवढें-कसें व किती अफाट आहे ह्याची त्याना मुळींच

---

१. वरील माहिती पुढील ग्रंथाधारें दिली आहे : 1) Rockets and your Future- रॉकेटस व तुमचें भवितव्य—Stanley Beitter १९६१ (2) Images of space अंतरिक्षाचें स्वरूप व दृश्यें Harold L. Goodwin १९६५ (३) Our Space Environment-Phillip D.Stern-१९६३ (४) Maththamatics of Space Exploration-Myrl H. Ahrendt १९६२ व १९६४ (५) Guidance and Control of Space-craft-Enward Hymoff १९६६. या शिवाय अवकाशातील व इतर सूर्यमालिकेतील ग्रहांवरील जीवसृष्टी, अवकाशांतील घटक द्रव्यें इत्यादि फार मोठें वाङ्मय प्रसिद्ध होत आहे. त्या सर्वांत आधिभौतिक ज्ञानावर भर असून विश्वरूपी अतर्क्य घटनेमागें कांहीं शक्ति आहे काय किंवा अशाी काय? याबद्दल कांहींच कळत नाहीं 'न इति-नेति' ह्या सूत्रांचा उदयमात्र त्या शास्त्रज्ञांच्या मनांत झालेला दिसतो. (गो. प्र. भा.)

कल्पना नाहीं. त्याचा शोध घेण्याचे दीर्घ प्रयत्न मात्र चालू आहेत. त्याप्रमाणे खालीं दिलेल्या गोष्टी ज्ञात झाल्या आहेत.

(१) सूर्य व त्याचे उपग्रह हे कसे उत्पन्न झाले ह्याबद्दल दोन कल्पना असून त्यात ऐकमत्य नाहीं. (इ. स १९२९ सालची सर जेम्स जीन्सची याबाबतची कल्पना महत्त्वपूर्ण आहे.)

(२) राष्ट्रांतरीय भू-भौतिक वार्षिकीय शोध (International Geo-physical year-IGY-1957-1958) ह्या शोधप्रयोगात जगातील सासष्ट राष्ट्रांतील वीस ते तीस हजार तज्ज्ञ शास्त्रज्ञाच्या 'ज्ञानासाठींच ज्ञान' ह्या वृत्तीच्या सहकार्याने जे शोध लागले त्यापैकीं काहीं पुढे दिले आहेत.

(i) ज्याला आपण पृथ्वीसभोंवारचे वातावरण (Atmosphere) असें म्हणतो व मानितो ते पृथ्वीभोवतीं व वर किती मैलापर्यंत पसरलेले आहे ह्याचा त्याना मुळीच थाग लागत नाहीं. तथापि ते साठ हजार मैलापेक्षा जास्त उंचीपर्यंत असतें असे अदाजाने वाटतें. या वातावरणातून विद्युत्कण सारखे येत असतात. व ते कोठचे व काहीं पृथ्वीसभोवती किरणोत्सर्जन व किरण परावर्तन करणारा एक अगदीं (ii) लगतचा व दुसरा त्याच्या बाहेरचा असे दोन पट्टेच्या पट्टे आहेत. त्याना 'व्हॅन ॲलन किरणपरावर्तक (Van Allen Radiation Belts) पट्टे' असे त्या संशोधकाच्या नावावरून म्हणतात. इ. स. १९५८ मध्ये प्रेषित केलेल्या 'एक्सप्लोअरर[१]', 'पायोनिअर[३]' व पायोनियर[४]' ह्या रॉकेटमार्फत वरील शोध लागला.

(iii) त्या शोधाप्रमाणे पृथ्वी सभोवतालचा पहिला पट्टा म्हणजे विभाग पृथ्वीपासून वर अवकाशात सुमारे १३०० ते तीन हजार मैल उंचीपर्यंत पसरला आहे.

(iv) या विभागाची उत्तर ते दक्षिणध्रुवामधील रुंदी अनुक्रमे चार हजार व वीस हजार मैलपर्यंत रुंद वा जाड आहे.

(V) सूर्याच्या किरणांपासून प्रसारित व उत्सारित मोठे शक्तिशाली (High Energy) कण पृथ्वीपासून १० हजार मैल उंचीच्या आत येनाच पृथ्वीच्या चुंबकीय क्षेत्रात (Magnetic Field) सांपडून अडकतात ! हीच श्रेष्ठ शक्ति असलेले विद्युत्संचारी कण संशोधक मानवरहित वा मानवसहित यंत्राना (रॉकेटना) फार मोठा व अति जोराचा अडथळा आणितात.

(VI) पुढे दिलेले पृथ्वीवरील वातावरणाचे संशोधनदृष्टीने टप्पे मानितात. ते व त्यातील सशोधन साधने सोबतच्या (पृ. ४८९-९० पहा) तक्त्यात दिली आहेत. आपल्या संस्कृत भाषेचे उत्कृष्ट ज्ञान त्या पाश्चिमात्याना झालें तर ते जास्त चागले शोध खास लावतील. ते सध्यां तरी ज्ञानपिपासू कर्मयोगी पण असुर आहेत. इंद्रजिताची गोष्ट ध्यानात घ्या.

(VII) सूर्यापासून प्रसृत होणाऱ्या किरणात ८० ऐंशीं हजार ईलेक्ट्रॉन व्होल्टस् (Electron ॲटममधील ऋणविद्युत्कण Volt धक्का देण्याच्या शक्तीचें मापक) असून सौर वातावरणात १० (दहा) कोटी सेंटिग्रेड इतकी उष्णता असते.

←अवकाश (Space)—पृथ्वीवरील वातावरणा (ह्याची उंची अद्यापि अनिश्चित) पलीकडील स्वर्गीयतारागणाचा भाग याचे मोघम नाव Space. जवळील अवकाश (Near Space) — म्हणजे सूर्यग्रहमालेमधील अवकाश. बाह्यावकाश (Outer Space) — म्हणजे ग्रहांतरीय अवकाश असे शब्द-प्रयोग ते शास्त्रज्ञ उपयोगितात.

वरील माहिती मुख्यतः लेखकाने Rockets and your Future Our space Environment या ग्रंथाधारें दिली आहे. 'Even man himself is a Space craft--a body housing a brain or a guidance system and still is the guidance system itself—"Hymoff 'मनुष्य हा एक जणु असा अवकाश गमन पटिका आहे की ज्यामध्ये मेंदु नावाची ज्ञानपेटिका असून मानव हा स्वतःच मार्गदर्शक रचनापद्धतीच आहे.' या उद्गाराचा आशय काय?

अनंत अवकाशीय शोध परिचय

(ऊर्ध्वदिशेतील समुद्र सपाटीपासून अंतरें सुमारें मैल)

अवकाशीय विभागाचें नांव	संशोधक यानें	संशोधनाचें स्वरूप
२ लक्ष मैलांपर्यंत चांद्रीय अवकाश Cislunar space –Meso sphere	Apollow १२, १३ इत्यादि	
४००० मैल पृथ्वीय अवकाश (जवळचा अवकाश) १००० मैल लोहकणीय अवकाश ५०० मैल	व्हँगार्ड, एक्सो २ एक्सप्लोअरर, १,१ स्पुट्निक, २ ICBM यंत्र क्यारिअर, १८ AIRBM यंत्र, ल्युटनिक, टिरॉस १ ट्रँझिट १८, मिडॉस २, डिस्कव्हरर २, मारिनोनाट, मर्क्युरी ज्येमिनी २	अशीं अवकाशयानें पाठवून हवामान, उष्णता इत्यादि माहिती मिळविली. लोहकणीय अवकाशात सोयूझ ९ सारखी मानवसहित यानें पाठवून रशिया अनेक प्रकारची माहिती गोळा करीत आहे. एक प्रवासी फिरतें व स्थायी अवकाशयान स्थानक तयार करावें असाही हेतु आहे सोयुझ ९ मधून परत आलेल्या माणसाची प्रकृती तपासता माणूस वजनरहित अवस्थेत फार दिवस जगणार नाही असे आढळले (जून १९७०)
१०० मैल Chemo Sphere ५० मैल स्ट्रॅटोस्फियर – Stratosphere १० मैल ट्रोपोस्फियर – Troposphere समुद्रसपाटी		

अवकाशीय विभागाचे नांव	संशोधक यानें	संशोधनाचें स्वरूप
पलीकडील अवकाश आकाशगंगीय अवकाश (Galactic space) राशिपुंजांतरीय अवकाश (Inter Galactic space) (महाकाश)		या बाह्यावकाशात सौरशक्तीचा मोठा साठा असून त्या सौरशक्तीचा उपयोग करणें अशक्य नाही. पृथ्वीवर रेडिओचें दळणवळणाचें जाळ्यांचे जाळें प्रस्थापित करणें सोपें आहे. तसे प्रयत्न सुरू आहेत. १० वर्षे लपून जगात सर्वांत मोठी अशी सौर भट्टी फ्रान्समध्ये पिरनीज पर्वतात बांधली आहे. त्यातील सूर्यकिरण एकवटणारा परावर्तक ८ मजली इमारती इतका उंच आहे. भट्टीचा उपयोग अवकाशयान योग्य असे श्रेष्ठ शुद्धतेचे धातुयुक्त पदार्थ-पत्रे करणें व हवेंत इतर इंधन दूषित वायु न येऊं देणे हा आहे.
५० लक्ष मैल ग्रहग्रहांतरीय अवकाश (Inter Planetary space) (बाह्याकाश)	(१) मरिनर ४ व ५ (२) मेस्टा (ल्यूनिक) (३) व्हीनस (रशियन)	
१० लक्ष मैल Exso sphere (एक्सो स्फिअर) चंद्रपार अवकाश Translunar space २ लक्ष मैल	Lunik १-२ मानवरहित यानें	

(VIII) अवकाशवेधी साधनांची यंत्रें, पार्थिव (पृथ्वीच्या) वातावरणातून सहीसलामत जावीं व यावीं, तीं कोणत्या पदार्थांचीं बनविणे व तशीं का बनवावी इत्यादि बाबतींत थोडीशी अनुभूत माहिती मिळाली, पण ती सदासर्वदासाठीं निरनिराळ्या ग्रहाकडे जाण्यासाठीं अचुक आहे असे नाहीं.

(XI) चंद्रवेधी अपोलो १३ (४ मानवासह जाणारे रॉकेट) याची यंत्राची घडण व रचना पूर्वीच्या अनुभवाप्रमाणे जास्त सुधारित होती पण कांहीं दोष अपयशाला कारण झाला.

(X) इतर ग्रहाकडे पाठविण्यात येणाऱ्या रॉकेट्सना अवकाश मध्यात मदत देणारे फिरते व तरंगणारे यंत्रसमूह इत्यादि गोष्टी सुसाध्य वा सहजसाध्य नाहात.

(आ) अजून अज्ञात असलेल्या गोष्टी

(१) सूर्यादि ग्रहात असणारी आण्विक शक्ति कोठून मिळते व ती कशी उत्पन्न होते ?

(२) ज्याला सूर्यावर येणारे 'डाग' असे मानितों व ज्यात सूर्यगर्भापेक्षा सातपट उष्णता असावी असे वाटते ते रूसे व कितपत खरे आहे.

(३) पृथ्वीच्या वातावरणाशीं येताच सूर्यकिरणांतील अवाढव्य आण्विक शक्तीचे कार्य काय होते ?

(४) सूर्याभोंवतालचे वातावरण किती, केवढे व कसे आहे याचे निश्चित स्वरूप काय आहे ?

(५) पृथ्वीच्या चुंबकीय शक्तींत व क्षेत्रात चढउतार होण्याचे मूळ कारण काय ?

(६) पावसाचें मूळ उगमस्थान किंवा मूळ कारण कोणते ? पाऊस ढगातूनच वा ढगापासून उत्पन्न होतो ? किंवा उच्च वातावरणातील काहीं अन्य कारणामुळे होतो ?

(७) ढगाचे प्रकार किती ? त्याचा व वादळाचा काय संबंध आहे ? निश्चित संबंध असल्यास त्याचें प्रमाण व प्रत्यंतर काय ?

(८) अवकाशातील अनंत पोकळींत पृथ्वीसभोवतालचे वातावरण हळुहळू नष्ट होत आहे काय ?

(९) पृथ्वीप्रमाणे इतर ग्रहांवर जीवनसृष्टि आहे किंवा नाहीं वा नसावी ह्याचा पुरावा काय ?

१०) पृथ्वीच्या वातावरणात किंवा त्या पलीकडील अवकाशात जीवन सृष्टि आहे का ?

(११) युरेनियममधील (Radio Active) किरणोत्सारी द्रव्यें अखेरीस नष्ट का होतात ? तीं तशीं नष्ट झाल्यावर त्या युरेनियमचें शिसेंच का बनते ? इ. इ.

(ई) **जीवनशास्त्र विषयक शोधः**—उद्भिज्ज, खनिज व प्राणिज पदार्थ ह्या वस्तूंचा मानवी जीवनासाठीं कसा व केवढा उपयोग होईल हे कार्यही पाश्चिमात्य शास्त्रज्ञ सुमारें चारशें वर्षांपासून करीत आले आहेत. गेल्या पन्नास वर्षांत पदार्थविज्ञान, किरणविज्ञान म्हणजे तेजविज्ञान आणि अवकाशविज्ञान ह्यांत बरीच प्रगति झाली असे म्हणतात. यामुळें त्या ज्ञानाच्या मदतीनें जीवनशास्त्रविषयक ज्ञानात बरीच प्रगति झाली आहे. औषधाच्या मदतीनें मनुष्य दीर्घजीवी तसाच जराविरहित कसा होऊ शकेल या दिशेनें प्रयत्न सुरू आहेत. मनुष्य मृत होताना शरीरातील प्राणज्योती कशी असते ती पाहून तिला पकडण्याचे आश्चर्यकारक प्रयत्नही कल्पित करण्यात आले व येतात. पण ते सफल झाले नाहींत.

कृत्रिम रेताधान करून मनुष्येतर प्राणिसृष्टि उत्पन्न करण्याचे प्रयोग सुरू आहेत. पण त्या सर्वांचा आधार मात्र पंच महाभूतें व त्यांच्या तन्मात्रा ह्या केवळ भौतिक गोष्टी आहेत. त्यात आवश्यक असणारी प्राणशक्ति म्हणजे चैतन्य ही वस्तु काय आहे, ती कोठें आहे, कशी

आहे, कोठून येते, ती निरनिराळ्या वस्तुजातांत कशी व किती कार्यकारी स्थितींत वावरते, इत्यादि गोष्टी त्यांना अजून अज्ञात आहेत.

(२) आम्याच्या झाडाला आंबाच लागतो, त्याला पेरू लागत नाहीं. असें का, कसे व कोठून होतें ह्याचें उत्तर आजच्या भौतिक विज्ञानाजवळ नाहीं. डार्विनचा उत्क्रांति विज्ञानवाद पुढें असाच कुंठित होतो.

(३) उद्भिज्ज सृष्टींत जीव म्हणजे चैतन्य आहे ही गोष्ट पाश्चिमात्य शास्त्रज्ञांना अलीकडेच कळली. नव्हे भारतीय शास्त्रज्ञानेंच (जगदीशचंद्र बोस) सप्रमाण सिद्ध करून त्यांच्या नजरेस आणिली हे ध्यानांत घेणें भाग आहे.

एवढेंच काय पण देवदेवतांना वहावयाचीं वा अर्पण करण्यासाठीं उपयोगांत घ्यावयाचीं फुलें व पानें (जसें तुलसीदलें वा बिल्वदलें) हीं त्या त्या झाडापासून खुडण्यापूर्वी वा तोडण्यापूर्वी त्यांची संमति मिळावी, होणाऱ्या त्रासाबद्दल क्षमा मागावी यासाठीं प्रार्थना मंत्र आमच्या ऋषींनीं सांगून ठेविले आहेत. तसेंच औषधोपचारासाठीं लागणाऱ्या वनस्पतींना उपयोग ग्रहण करणें वा त्याचा जरूर तो जीवनरस त्यांनीं स्वेच्छेनें देण्यास तयार होणें या कार्यांसाठीं दिवस, रात्र, वार, नक्षत्र व मुहूर्त ह्यांची निश्चित योजना व पद्धति भारतीय धन्वंतरींनें करून ठेविली आहे. त्यासाठीं मंत्र, पूजा, तंत्रें व यंत्रें हीं पण अनुभवून सिद्ध करून तीं सिद्ध करण्याच्या प्रक्रियेसह शास्त्रांत नमूद केलेलीं आहेत.

एवढेंच नव्हे तर ज्यांना पाश्चिमात्य शास्त्रज्ञ जीवरहित वा चेतन्यरहित असें समजतात त्या खनिजपदार्थांवर करावयाचे संस्कार मृत म्हणजे दुर्गुणरहित करून जिवंत ठेवण्याचे संस्कार, विधि व प्रक्रिया ह्या गोष्टीही प्राचीन भारतीय ऋषींनीं म्हणजे तत्त्वज्ञान तज्ज्ञांनीं वा विज्ञानवाद्यांनीं प्रयोग करून बारीकसारीक फेरबदलासह नमूद करून ठेविल्या आहेत !

रस[१] या संस्कृत शब्दाचा अर्थ पारा असा आहे. तो पा-र-द भेदून जाऊन, प्रभावी उपयोग देणारा असा आहे. रस, म्हणजे जीवनसत्त्व वा चैतन्य असाही त्या शब्दाचा अर्थ आहे. त्याचा उपयोग जसा बल, तेज व वीर्य वाढविण्यासाठींच दीर्घायु वा अमरत्व प्राप्त करण्यासाठीं आहे, तसा अनेक प्रकारच्या चमत्कार म्हटल्या जाणाऱ्या गोष्टी घडवून आणण्यासाठीं, वा आकाशगमनासारख्या अद्भूत गोष्टी करण्यासाठीं त्याचा उपयोग कसा करिता येतो ह्या गोष्टी सांगणारे अनेक ग्रंथ आज उपलब्ध आहेत.[२]

(उ) **प्राचीन भारतीय 'ज्ञानाचा' परिचय** : येथें 'प्राचीन भारतीय ज्ञान' या शब्दसमूहात मुख्यतः ब्रह्मांडविषयक ज्ञान-ब्रह्मांड म्हणजे काय व कोणते त्याचा विस्तार, त्यात काय काय भरलेलें आहे व त्यांतील वस्तुजात व परिस्थिति ह्याबद्दल माहिती, मुख्यतः अशा अर्थानें प्राचीन आर्यांचे विचार मांडण्याचा प्रयत्न केला आहे.

---

१. ग्रंथ रसेश्वर सिद्धांत, रसरत्नाकर (हे सिद्धनागार्जुनाचे ग्रंथ) रसहृदय हा (गोविंद पादाचार्यांचा) साकार सिद्धि (श्रावण माधवाचार्यांच्या 'सर्व दर्शनसंग्रह' या ग्रंथाचा भाग), रसेंद्रसार संग्रह, (श्रीमद्गोपालकृष्ण भट्ट विरचित) रसरत्नसमुच्चय (वाग्भटाचार्य विरचित) रसार्णव तथा रसतंत्रम् तारादत्त पंतकृत) 'रस मंजरी वैद्यक' (पं. शालीनाथ विरचित) 'रस पद्धति' (यादवजी त्रिकमजी) Home and Villge Doctor (सतीशचंद्र दासगुप्त) इत्यादि. कल्याण-उपासनांक १९६८)

२. 'रसो वै सः' 'रसं ह्येवायं लब्ध्वा नंदी भवति'-(तैती उप. २-७-१) "अभ्रकस्तव बीजं तु मम बीजं तु पारदः अनयोर्मेलनं देवी मृत्युदारिद्र्य नाशनम् (रसेश्वरदर्शन ४) अभ्रक हा पार्वतीचें बीज व पारद हें शंकराचें वीर्य ; याच्या मिलाफानें मृत्यु व दारिद्र्य हीं नष्ट होतात असें वर्णन आहे. आजही उत्तराखंड यात्रेंतील 'गौरीकुंड' ह्या ठिकाणच्या अतिथंड पाण्याच्या कुंडातील पिवळी माती पार्वतीचें रज म्हणून अपत्य संभवासाठीं स्त्रियांना दिली जाते. (गो. प्र. भावे)

ज्ञान म्हणजे पराअपरा विद्यांचें ज्ञान म्हणजे वेदान्तशब्दाभिप्रेत ब्रह्मज्ञान ह्याचा येथें विचार टाळलेला आहे. कारण सध्या तरी आमचा नवभारत (भारतातील तरुण सामाजिक मन, तरुण समष्टि मन) त्याकडे पाठ फिरवून बसलेला आहे. तो पश्चिमेकडून येणाऱ्या आसुरी संपत्तीच्या अधिभौतिक दृष्टीवर भाळलेला आहे. यामुळे ज्या भौतिकी मोहिनीवर भाळलेला आहे, ती तरी आमच्या प्राचीन ऋषिमुनीजवळ होती का नाही, ती असेल तर तिचें स्वरूप व पराक्रम कोणते, केवढे हे स्थूल रूपाने पण नेत्रदीपक अशा स्वरूपाचे ज्ञान त्याला दिले तर तो निदान जागा होऊन माझें 'जुने ठेवणे' काय होतें हे पाहू असे म्हणेल तरीही ह्या लिखाणाचा उद्देश सफल झाल्यासारखें वाटेल! एकदा विचारक्रांतीच्या लहरी उठल्या कीं त्याचे रूपांतर उच्चार क्रांतींत होईल. नंतर त्यातून आचार क्रांतीचा जन्म होईल. तसे घडले म्हणजे व्यष्टि व समष्टि ह्या दोघानाही ज्ञान म्हणजे ब्रह्मज्ञान (म्हणजे नवीन भाषेंत देव बनण्याचे दिव्य ज्ञान) समजेल, तो देवच बनेल

(ऊ) **अनंत विश्व व त्याचे भारतीय ज्ञान** :– अनंत विश्वाचा एक अत्यंत अल्प भाग म्हणजे सूर्य व त्याभोवतीं फिरणारे बुधापासून प्लुतो (यरुण) पर्यन्तचे ग्रहगोल व त्यातच असणारे-फिरणारे व चमकणारे असंख्य तारे ह्याच्या माहितीसाठीं 'अवकाशज्ञान' ह्या नावाखालीं पश्चिमेचे शास्त्रज्ञ जिवापाड मेहेनत घेऊन अब्जावधी रुपयांचा चुराडा करून धडपडत आहेत. ही त्यांची धडपड कौतुकास्पद तर खरीच, ते खरे कर्मप्रवण, कर्मठ हे खरें, पण कीव व चीड येते ती आमच्या दिङ्मूढ खऱ्या विज्ञानासाठीं पश्चिमाभिमुख बनलेल्या त्या मंत्रद्रष्ट्या ऋषींच्या आम्हा भारतीय वंशजाची, 'काखेत कळसा गावाला वळसा,' हे विश्वज्ञान स्वतः जवळ पूर्वजानीं ठेऊन दिलं आहे. त्यात कितीतरी पट प्रगत असे ज्ञान व विज्ञान साठविलेले आहे ते पाहण्याची देखील बुद्धि होत नाही म्हणून!

विश्व, महाविश्व व अधिविश्व हे शब्द आमच्या ऋषींनीं उपयोगिले. त्याचा अर्थ त्याची कल्पना आणि माहिती देणारे कोण होते या आमच्या ऋषींच्या ज्ञानाची कल्पना पुढील गोष्टींवरून येईल. आमच्या सूर्योपासनेच्या मत्रात, 'ॐ भू. भुः स्व. मह जन तप व सत्य' ह्या सात व्याहृतींचा उल्लेख आहे. ह्याना सप्तलोक असे म्हणतात. ह्या सप्त लोकात आमच्या अनत विश्व व त्याचा विस्तार, स्थिति, रचना वा घटना ह्याचा विचार ग्रथित आहे, त्याचा विचार करू.

नादलहरी हे पाच भौतिक सृष्टीचे घटक द्रव्य आहे. तें या विश्वात सदैव व सर्वत्र असतें. तें फक्त भूलोकावरच आहे असे नसून त्यापेक्षा विरलतर व विरलतम द्रव्यानी बनलेल्या भूवर्लोकादि सप्त लोकापर्यंत असतें. 'लोक' याचा धात्वर्थ 'प्रकाश' असा आहे. जेथें प्रकाश तेथें नाद व कपनेंही आहेतच. म्हणून त्याच्या आधारावर **सिद्ध पुरुष पाहिजे त्या ठिकाणाची पाहिजे ती वस्तु सहज आणूं शकतात. हा चमत्कार नसून नियमबद्ध नादसिद्ध प्रक्रियेचा परिणाम आहे.**

व्यासपुत्र शुक अथवा हनुमान हे सदेह अंतरिक्षामध्ये भ्रमण करीत असत. अजूनही असे महात्मे व योगी हिमालयीन भागात आहेत. तसे तिबेटातही आहेत. असे त्याच्या सध्या प्रचलित ग्रथात लिहिलेले आहे. टी. लॉबसग राम्पा या लामाचीं पुस्तकें पहावीं (इ. स. १९६७, ६८ व १९६९), हे लामा क्यानडाच्या ध्रुवप्रदेशीय, वास्तव्य सपवून सध्या (१९७० मे) लडन येथें आलेले आहेत. ते पूर्वी भारतात येऊन गेले होते. त्याचेबरोबर भारतात फिरलेले गृहस्थ आजही भारतात आहेत. हे वर सागितलेंच आहे.

सूर्यग्रहमालेचा सूक्ष्म व सपूर्ण अभ्यास करून सिद्धात माडणारे 'आश्वलायन' हे ऋषि होते. ज्योतिर्मडलाचा अभ्यास करून एक लक्ष गणितबद्ध कुडल्या तयार करणारे 'भृगु' नावाचे ऋषी होते. तसच काल-पुरुषाच्या महाविश्वाचें सशोधन करून मगच सिद्धात माडणारे 'गर्ग' नावाचे ऋषि होते. **त्याचे आश्रम ह्या त्याच्या प्रयोगशाळा व सिद्धात वा**

निष्कर्ष काढून त्याचें प्रतिपादन करणाऱ्या कर्मशाला वा कृतिशाला होत्या. गर्ग, पराशर, देवल, वराहमिहीर इत्यादिकांनी विश्वावकाशात दृग्गोचर होणारे अनेक स्वरूपाचे शेंकडों 'दिव्यकेतु' त्याचे उदय, अस्त, स्थान, त्याचे भ्रमणवेग (दर सेकंदाला २५० मेल) इत्यादि माहिती दिली आहे. हे शोध किती सूक्ष्म आहेत? का त्या साऱ्या कविकल्पना?

ब्रह्मांड, जगत्–महाविश्व व अतिविश्व : गर्गऋषि हे या गोष्टींचें पुढें दिल्याप्रमाणे प्रतिपादन करितात. 'सूर्य आत्मा जगतस्तस्थुष' भूतलाला प्रकाश देणारा सूर्य व त्याचे सातआठ उपग्रह हे सर्व म्हणजे केवळ एक **लघुब्रह्मांड** असून अशीं सात ब्रह्मांडें मिळून एक '**जगत्**' बनते. अशा एक सहस्र जगताचे एक '**विश्व**' बनते, अशा दीड कोटी विश्वाचे एक '**महाविश्व**' तयार होते. दोन शकु (गणिती आकडा) महाविश्वे मिळून एक '**लोक**' होतो. एक शकू लोक म्हणजे एक '**महालोक**' होतो आणि असे १०० पद्म महालोक मिळून एक '**अतिविश्व**' तयार होते. (देवीकोश भाग-१) गर्गमुनींच्या विचारवैनतेयाची ही अचूक व नेमकी प्रज्ञाक्षेप कोणीकडे आणि आधुनिक कालविज्ञानवादाची पृथ्वी सोडून चंद्रावर गेल्याची चिमुकली उडी कोणीकडे? गर्गाचार्याचे ते गणित कोणत्या साहित्यानें वा उपकरणानें केलेलें होतें?

महाविश्वाची चौदा भुवनें असल्याची ग्वाही व मांडणी आर्य ऋषींना पुढें दिल्याप्रमाणे केली आहे[१]. तिची अगदीं त्रोटक माहिती अशी •

१. अग्निपुराणाचा १३२ वा अध्याय 'भुवनकोशवर्णन' या नावाचा आहे. त्यात पृथ्वीसह सूर्य मंगल यांचीं पृथ्वीपासूनचीं अंतरें, नक्षत्रें, सप्तर्षि, ध्रुव तारा, शिशुमार नावाचा तेजस्वी तारका पुंज इत्यादिकांचीं अंतर, तसेंच पृथ्वीचा विस्तार व उंची इत्यादि वर्णनें, तसेच सप्त लोकादिकाची अंतरें व वर्णनें दिलेलीं असून तीं आज नवविज्ञानाला माहीत असलेल्या अंतरापेक्षा जास्त सूक्ष्म शोधांनीं लाविलेलीं आहेत. सर्व ग्रहांच्यांची कर्पनें पण सांगितलेलीं आहेत. तीं सत्य का मनाच्या मराऱ्या!

१) भूलोक म्हणजे मानव प्राणी रहात असलेली सृष्टि.

२) भुवर्लोक–गंधर्व, सिद्धचारण रहातात ती सृष्टि.

३) स्वर्लोक–देवाचे वसतिस्थान, हे भुवर्लोकापासून ऐंशी हजार योजनावर असलेली सृष्टि.

४) महर्लोक–स्वर्लोकाच्या वर एक कोटी योजनें असलेली सृष्टि.

५) जनलोक–महर्लोकाच्या वर दोन कोटी योजने.

६) तपलोक–जनलोकाच्या वर साडेतीन कोटी योजने.

७) सत्यलोक–तपोलोकाच्या वर २१ कोटी लक्ष योजनावर असलेली सृष्टि. ह्या अंतरात निरनिराळ्या पुराणात थोडाफार फरक आहे. तथापि त्या त्या ठिकाणची परिस्थितीविषयक व जीवनविषयक वर्णनेही दिलेली आहेत.

उरलेले अतल, वितल, सुतल, तलातल, रसातल, महातल व पाताल, ही सात भुवनें मृत्युलोकाच्या खालची.

ही मोजमापें कल्पित होती का? ही वैदिक गणितें आहेत. व तीही हजारो वर्षांपूर्वीची आहेत. अलीकडील विज्ञानाची गणिती अंतरे फक्त सूर्य व त्याची ग्रहमालिका यासंबंधाची आहेत.

आईन्स्टाइनच्या सिद्धातातून उत्पन्न झालेले दोन महत्त्वाचे सिद्धांत म्हणजे वस्तूची अक्षय्यता (कॉन्झर्वेशन ऑफ मॅटर) व शक्तीची अक्षय्यता (कॉन्झर्वेशन ऑफ एनर्जी) हे होत. याचाच अर्थ वस्तूचे शक्तींत व शक्तीचे वस्तूंत रूपांतर घडून येतें असा होतो. याच मूलभूत आधारावर अणुबाँबची निर्मिती झाली.

स्थिर स्थितीचा विश्वावर परिणाम : आज डॉ. हॉइल व डॉ. नारळीकर हे संशोधक स्थिरस्थिति किंवा स्फोटस्थिति याचा विश्वावर काय परिणाम होतो किंवा होईल याचा अभ्यास करीत आहेत! तो असा.

आज आपण मृत्युलोकचे सजीव प्राणि, गतिमान पृथ्वीवर मात्र स्थिर आहों–पृथ्वी स्वतःभोवती फिरते ही एक गति, ती तरी सूर्याभोवती

फिरते ही २ री गती. सूर्य सर्व ग्रहोपग्रहांसह तारामंडलाभोवतीं (अभिजित् किंवा कृत्तिकामंडळ) फिरतो ही तिसरी गति, ते तारामंडळ आकाशगंगेभोवतीं फिरते ही चवथी गति, आकाशगंगाही एका महानक्षत्रपुंजाभोवतीं (ग्यॅलॅक्सीभोवतीं) फिरते, ही पांचवी गति आणि पुढें कांहीं समजत नाहीं. पण इतक्या प्रकारच्या गतींच्या चक्रव्यूहात असूनही आम्ही स्थिर आहों याचें आश्चर्य वाटतें. पण हे कार्य कोणती महाशक्ति करिते ह्याचा पूर्ण थांग पत्ताही आर्यऋषींना घेतला होता.

(ऊ) **आर्यऋषींचे संख्याशास्त्र :** शून्य ते नऊ ह्या अंकाचा शोध घेऊन त्याच्या परिगणनेची कमाल मर्यादा गाठण्याची क्रिया सर्वप्रथम आर्य ऋषींनीच केली. त्या शास्त्राच्या बिनचूक व नेमक्या आधारावर त्या ऋषींनी पृथ्वीवरील संवत्सरादि कालमर्यादा ठरवून त्याच्या आधारावर ब्रह्मदेवाचा एक दिवस म्हणजे पृथ्वीचीं लक्षावधी वर्षे, ब्रह्मांडाची अमुक वर्षे इत्यादि कालगणना पुराण्यानिशीं सिद्ध केल. सारांश, त्या पुराणातील अतिशयोक्तींच्या कपोलकल्पित गप्पा नसून अनुभवून सिद्ध केलेले निश्चित सिद्धांत आहेत. केवळ अनुमानें नव्हेत. याचा आज आम्ही विचार करणे, त्याचे सत्यासत्य नवीन दृष्टीने व भाषेने समजावून घेणे ह्याची आज जरूर आहे. यासाठीं वेदरूपी ज्ञानभांडारात पूर्ण अवगाहन करणें हा एकच उपाय आहे. 'ब्राह्मणो, आप सीख लो विद्या,' हा स्वामी रामतीर्थांचा संदेश हेंच सांगत आहे.

आणखी एक पुरावा : नित्यनैमित्तिक कर्मे करताना आम्ही भारतीय 'श्रीमद्भगवतो महापुरुषस्य विष्णोराज्ञया प्रवर्तमानस्य अद्य ब्रह्मणो द्वितीय परार्धे विष्णुपदे श्री श्वेतवाराहकल्पे, वैवस्वत-मन्वंतरे कलियुगे प्रथमचरणे, जंबुद्वीपे इ. इ. या सकल्पात विश्वोत्पत्ति होऊन किती मानवी वर्षे लोटलीं हे सांगतों. ह्या विश्व व ग्रहगोलशास्त्र याचा हिशोब पुढें दिल्याप्रमाणे आहे.

६० अहोरात्र = १ ऋतु, ६ ऋतु = १ वर्ष मानवी. ६० वर्षे = १ संवत्सर, ६ संवत्सरें = १ वर्ष देवाचे (दिव्य वर्ष) वा ३६० मानवी वर्षे = १ दिव्य वर्ष, १२ हजार दिव्य वर्षे = १ दिव्य युग, १ हजार दिव्य युगें = १ दिवस (ब्रह्मदेवाचा) तेवढाच काळ म्हणजे ब्रह्मदेवाची रात्र, ब्रह्मदेवाची १ अहोरात्र = १ कल्प, ब्रह्मदेवाचें आयुष्य = १०० ब्रह्म वर्षे, म्हणजे ८ अब्ज ३२ कोटी मानवी वर्षे = ब्रह्माची अहोरात्र. ब्रह्मदेवाच्या १ दिवसात म्हणजे कल्पात १४ मन्वतरे व १५ मध्यतरें, १ मध्यतर = १७ लक्ष २८ हजार मानवी वर्षें, अशी मन्वतरें १४. युगविचार = १ सत्ययुग = १४४०००० मानवी वर्षे, (४० हजार दिव्य वर्षें) त्रेतायुग व द्वापार युग आणि कलियुग हीं क्रमाक्रमाने कमी काला-वधींचीं आहेत. कलियुग = ४ लक्ष ३२ हजार मानवी वर्षे म्हणजे १२०० दिव्य वर्षें. साराश १ दिव्य युग, महायुग वा चतुर्युग म्हणजे ४३ लक्ष २० हजार मानवी वर्षे असे ठरते.

हे अफाट पण नेमके गणित करणारे आर्य विश्वोत्पत्ति व त्यातील कालाचे पोट विभाग व उपपोटविभाग, त्या विश्वाची व त्यातील अगणित गोलकाची वेधपूर्ण माहिति घेतल्याशिवायच त्या काव्य कल्पनाच असे म्हणता येईल का?

(ऋ) आधुनिक विज्ञानाचा मागोवा कां? : आम्हा भारतीयाचें ब्रह्मज्ञान हें अद्वितीय अशा विज्ञानाच्या नियमावर आधारिलेले, त्या नियमाचें काटेकोरपणानें पालन करून, त्याच्या परिणामाचा प्रत्यक्ष

*. आधुनिक नरवशन्याशाशी सामान्यतः नित्य उपयोगात असलेला काल गणनेचा अल्पतम भाग म्हणजे 'सेकंद' हा समजला जातो. पण आम्हा प्राचीन भारतीयाना अत्यल्प कालदर्शक शब्द 'निमिष' हा आहे. तो सेकंदा-पेक्षा फार लहान आहे! या निमिषाचे म्हणजे 'क्षण'चें माप कोण ठरविलें ही व अशा प्रकारच्या ज्ञानाची (हें भारतीय ऋषींनें अत्यल्प गतीचें ज्ञान आहे) माहिती मिळवा व नतंर आधुनिक विज्ञानाचे गोडवे गा!

अनुभव घेऊन मगच सिद्ध असें मानिलेलें व ठरविलेलें म्हणून शास्त्र या मंत्रेस सर्वांनी पात्र ठरलेलें अनुभूत व अनुभाव्य असें त्रिकालाबाधित विज्ञान आहे. तें पंचमहाभूतें, त्यांचे नियम व त्यांचे अनुभव घेऊन ते अपूर्ण व संदेहरूप नाहींत असें स्पष्टपणें मांडणारें जगांतील प्राचीनतम असें एकमेव भारतीय विज्ञानशास्त्र आहे. ही वस्तुस्थिति आम्हा सद्यःकालीन, हतप्रज्ञ, परप्रज्ञ, परधार्जिणे बनलेल्या पूर्वकालीन मंत्रद्रष्ट्या आर्य ऋषींच्या वंशजांना पटवून देण्याची व मग आचार करावयास लावणारी प्रचोदना येण्यासाठीं मंत्रशास्त्र ग्रंथ हा एक प्रयत्न आहे.

(ल) पाश्चिमात्यांचें गणित—पाश्चिमात्य शास्त्रज्ञ कोपर्निकसचे गणित प्रमाण मानितात. त्याप्रमाणें पृथ्व्यादि गोल उत्पन्न होऊन ४ खर्व ६ अब्ज वर्षे झालीं व इतर तारागण व पुंज (पृथ्वी ज्या ग्यालाक्सींत-Galaxy or Milky way) तारकापुंजात आहे, त्यात १ शंकू व ५ निखर्व तारे आहेत. अशा अगणित 'ग्यालाक्सी' अंतराळात आहेत. ह्याचें गणित आपल्या गणिताशीं जुळतें आहे. तें मात्र खरें आणि आमच्या आर्यांच्या कल्पना मात्र कविकल्पनाच असें समजणें हा आमचा अति हिमालयीन अधःपात नव्हे का?

(ळ) भगवद्‌गीतेतील पुरावा—सर्वभूतानि कौन्तेय .. कल्पक्षये विसृजाम्यहम् (९-७), सहस्रयुगपर्यंतम्. . रात्रिं युगसहस्रां ता तेऽहो रात्रविदो जना (८-१७) मानवी अनुभवाच्या अहोरात्रीय हिशोबानें आमचें गणितशास्त्र असें आहे ब्रह्मदेवाचा १ दिवस सहस्र दिव्य युगाचा व त्याची रात्रही तशीच आहे. हे ब्रह्मांडलयविलयाचें ज्ञान—अव्यक्त अदृश्य स्वरूपात विलीन होणें (नष्ट न होणे) हे ज्ञान—(अध्याय आठ श्लोक १६-१७-१८ इत्यादि) गॅलेक्सी, ग्रहगोल व विश्वोत्पत्ति, लय व प्रलयाचें ज्ञान, कृष्णद्वैपायन व्यासांना म्हणजे तत्कालीन व तत्पूर्वकालीन भारतीय आर्य ऋषींना होतें असें सिद्ध होतें. एवढेंच नव्हे तर, पुरुषार्थ—

ऑगस्ट १९६९. यात दिव्यज्ञानाचे व गणिताचे अनेक पुरावे दिलेले आहेत. त्याची सत्यासत्यता आम्ही केव्हा अजमावणार ?

(ए) **ग्रहगोलकाचे परस्पराकर्षण** : हे पण माहीत होते. कारण सूर्यचंद्रादि तारकापुंज मेषादि बारा राशींमधून परस्पराकर्षण कक्षेतूनच फिरतात. इतकेंच नाही तर त्याच्या आकर्षणाचे परिणाम पृथ्वीवरील सर्व वस्तुजातावर होतात, हे 'गामाविश च भूतानि धारयाम्यह- मोजसा। पुष्णामि चौषधी सर्व सोमो भूत्वा रसात्मक (१५ १३) या श्लोकावरून समजते.

(ऐ) **पृथ्वीचा गोलाकार व भ्रमण** : आर्यभट्ट नावाचा ज्योतिषी पाचव्या शतकात होऊन गेला. वयाच्या तेविसाव्या वर्षी पृथ्वी स्वत भोवती फिरत फिरत सूर्याभोवतीही फिरते हा शोध त्याने लाविला. तो म्हणतो ... 'भूपंजरस्थिरो भूरेवावृत्यावृत्य प्रतिदिवसको — उदयास्तमया संपादयति नक्षत्र ग्रहाणाम्'

ऐतरेय ब्राह्मणात सूर्योदयाबद्दल असे म्हटल आहे — 'स वा एष न कदाचनास्तमेति नो देति' म्हणजे सूर्याला उदय वा अस्त ह्या क्रिया नसून पृथ्वी गोल असून ती अवकाशात आधाराबाचून आहे ऋग्वेदातही पृथ्वी सपाट नसून गोल आहे म्हणूनच सूर्यकिरण तिजवर एकाच वेळीं सर्वत्र पडत नाहीत, असे स्पष्ट सांगितलेलें आहे.

(ओ) **गुरुत्वाकर्षणाचा शोध**[1] : वरील एका स्तंभात सूर्यमंडला- मधील ग्रहाग्रहात परस्पराकर्षण असून त्यामुळेच ते ठराविक काळात व

---

१. समुद्रगुप्ताच्या काळात पृथ्वीच्या गुरुत्वाकर्षणाची व नवग्रहांची परस्परा- कर्षणशक्ति सर्वसामान्य लोकानाही माहीत होती. तसच मय संस्कृतीच्या इतिहासांत पृथ्वीचे एक वर्ष ३६५.२४२० दिवसाचें आहे व आज पाश्चिमात्य गणितप्रमाणें हे वर्ष ३६५.२४२२ दिवसाच समजतात. मय संस्कृति १० हजार वर्षांपूर्वीची समजतात (Ariel-Febr १९७० हें इस्रायल Tel Aviv येथून निघणार त्रैमासिक आहे.)

ठराविक पद्धतीनेच सूर्याभोवतीं फिरतात असे सांगितलें पण पुनः भास्कराचार्यांनी बाराव्या शतकात तेंच स्पष्ट शब्दात सांगितलें. 'आकृष्ट शक्तिश्च मही तयायत् स्वस्थे गुरू स्वाभिमुख स्वशक्त्या, आकृष्यते तत्पततीव भाति समे समन्तात् क्व पतत्विय खे.' यानतर पाचशे वर्षांनी म्हणजे सतराव्या शतकात न्यूटनने गुरुत्वाकर्षणाचा शोध (?) लाविला. कोणाचा शोध व कोणाचा उदो उदो आम्ही करितो ?

(औ) **कणादाचे कण विज्ञान** : कणाद नावाचे एक दर्शनकार मुनि (ऋषि) होते. ते कण–वादाचे अध्वर्यु. त्याचे शोध अनन्यसाधारण होते. म्हणून त्याच्या ज्ञात दृष्टीच्या विचारसरणीला 'वैशेषिक दर्शन' पद्धति म्हणतात. जगात दिसणाऱ्या अनत पदार्थांचे वर्गीकरण करून ६ भावरूप पदार्थ १ अभावरूप पदार्थ असे सातच पदार्थ ठरविले. ते असे – १. द्रव्य, २. गुण ३. कर्म सामान्य समवाय व विशेष हे सहा व अभाव हा सातवा. या सात पदार्थांपैकीं 'द्रव्य' याचीं नऊ द्रव्यें आहेत. तीं अशीं –पृथ्वी, आप, तेज, वायु व आकाश ही पचमहाभूतें, व काल, दिशा, मन आणि आत्मा अशीं मिळून नऊ. यापैकीं 'आकाश' हे द्रव्य सर्वव्यापी म्हणजे 'विभु' आहे या विभु द्रव्याशी सबध असणारीं काल व दिशा हीं दोनही सर्वव्यापी तत्त्वे म्हणजे द्रव्ये आहेत. गति निर्माण झालेली ही दोन द्रव्ये एकाच शक्तीचीं दोन रूपे आहेत. म्हणजे 'आकाश' हेच सर्व पदार्थमात्राचे आश्रयस्थान आहे. 'दिक्काला-धनवच्छिन्न' हे आत्म्याचे नाव किंवा स्वरूप, पण ते दिक्कालाशीं सबधित असूनही, आकाशाच्या पलीकडे म्हणजे त्यापेक्षा श्रेष्ठ असें आहे. याचा स्पष्ट अर्थ आत्मतत्त्व म्हणजे चैतन्यशक्ति हाच जगाचा, विश्वाचा, वा अतिविश्वादिकाचा आधार आहे **एवढ्या मोठ्या ऋतंभरा प्रज्ञेची झेप कणाद मुनीच्या आण्विक तत्त्वज्ञानाची होती.** ही गोष्ट आधुनिक अल्पबुद्ध, अल्पचेतस, विज्ञानवाद्यांना समजणेही कठीण. सारांश, आधुनिक विज्ञानवादी काजव्यांची भारतीय

विज्ञानरूपींच्या विज्ञान सूर्याशीं तुलना किती हास्यास्पद आहे याचा विचार करा.

आधुनिक पाश्चिमात्य विज्ञानवाद्याचा अणु Atom म्हणजे कणादमुनीचा 'कण' नव्हे. त्याचा कण म्हणजे परमाणु म्हणजे ज्याचे पुढें विभाजनच होऊ शकत नाहीं तो 'परम-अणु' होय. आधुनिक ॲटमचें विभाजन होतें. पण कणादाच्या परमाणूचें तसें होत नाहा अशी ही शेवटची स्थिति! केवढ्या सूक्ष्मतम तत्त्वाचा शोध हा! प्रत्येक पदार्थ अणूचा मिळून बनलेला असतो. पण सर्व पदार्थांतील अणू एकाच प्रकारचे नसतात. यामुळे पदार्थ, वस्तु किंवा मनुष्य हीं वस्तुजात म्हणून एकच असलीं, तथापि त्या प्रत्येकातील अणुजात ही निरनिराळी असते. त्या त्या प्रत्येकाचे पृथक्त्व निरनिराळे असतें. यामुळें ते निरनिराळे *ओळखिता* येनात. हाच तो विशेषपणा. म्हणूनच कणादानी शोधून काढिलेला या तत्वपद्धतीतीला 'वैशेषिक मीमासापद्धति' म्हणतात—हा परमाणू अविनाशी असतो. परमाणूचा सयोग होतो तसा वियोगही होतो. पण परमाणू नष्ट न होता तो अव्यक्तात लीन होतो. परमाणूच्या घटना-विघटनाचे चक्र हे सयोग-वियोगचक्र नित्य सुरूच असतें, म्हणून परमाणू हे नित्य व अविनाशी असतात हा क्रांतिकारक अद्वितीय शोध वैशेषिक कणादमुनींनीं सुमारें पचवीसशें वर्षांपूर्वी लाविला. नैय्यायिकाचेही सोळा पदार्थ हीं मूल तत्त्वें नसून तीं वस्तुज्ञानाची सोळा साधने मात्र आहेत, असें वैशेषिक कणाद मानितात.

२ भारतीय अस्त्रविद्या व आधुनिक अणुविज्ञान

भारतीय अस्त्रविद्या : अभ्युदयनिःश्रेयसप्रवणता हे वैदिक धर्माचे मुख्य लक्षण आहे. यामुळें भारतीय ऋषि व मुनि वेदपठण व यजन याजन अथवा परमेश्वराच्या साधननच जीवन व्यतीत करीत असत हे खरें नसून ऋषि नेटका प्रपच करीत. ऐवढेंच नसून अथर्ववेदात

सांगितल्याप्रमाणे यजमान, यजमानपत्नि, यज्ञीय कुंडाच्या तीनही बाजूस बसणाऱ्या ऋत्विजायाचें रक्षण करणें आणि यज्ञविध्वंसक वा उपद्रव देणाऱ्या दैत्य-दानवादिकांचें पूर्ण पारिपत्य करणे याची जबाबदारी त्याजवर व त्याचप्रमाणे मुलकीर समाजाचे घटक म्हणूनही असे यासाठीं ते मंत्र, तंत्र, यंत्र, ओषधि आणि मणि तयार करण्याचें कार्य ह्यात गुंतलेले असत. यावरून राजगुरु हा अथर्ववेदीय ब्राह्मणच असावा असा दंडक का होता, त्यातील रहस्य सहज ध्यानात येईल. सारांश, तत्कालीन ऋषिमुनि हे आधुनिक शास्त्रसंशोधकाप्रमाणें निरनिराळे प्रयोग करून त्यासंबधाचे शास्त्रग्रंथ विधिविधानासह लिहून ठेवीत. तसेच लायक शिष्यांना ते ज्ञान शिकवीतही एवढेंच नव्हे, तर ती परंपरा चालू राहील अशी योजनाही करीत. विश्वामित्र, वसिष्ठ, अगस्ति,[१]

---

१. अस्त्रविद्या—

भारतीय अस्त्रांचें संशोधन व त्याचे ग्रंथ ह्याची खालीं दिलेली माहिती वाचून त्यांच्या कामगिरीची कल्पना येईल.

(१) शक्तितंत्र (अगस्त्य महर्षि)—मूळ प्रकृतीपासून ३२ प्रकारच्या शक्ति उत्पन्न करिता येतात. जसे—विद्युच्छक्ति, आकर्षणशक्ति, उष्ण पाण्यापासून उत्पन्न होणारी अग्निकणशक्ति, वायुकण भेदनापासून उत्पन्न होणारी शक्ति, इत्यादि.

(२) अंशुबोधिनी (महर्षि भारद्वाज)—ग्रह व त्याचे प्रकाश आणि आकर्षण मोजण्याचीं यंत्रें, सूर्यकिरणात असणाऱ्या निरनिराळ्या शक्तींचें मापन, सूर्यकिरणातील शक्तिद्वारा परस्परांत दूर अंतरावरून भाषण करणें, (हा टेलिव्हिजनसारखा प्रकार नव्हे ना? त्याच्या पुढील प्रगतीचा प्रकार तर नसेल ना?) व दूरच्या जगांत सूर्यकिरणशक्तीनें जाण्याची यंत्रसामग्री तयार करणें, इत्यादि. तसेच याच ग्रंथात शेकडों वर्षे टिकणारा वज्रलेप करणें, परलोकस्थ जीवाच्या प्रतिकृति करून ठेवणें, इतर ग्रहावरील वायुलहरी व प्रकाशकिरण कसे शोधून काढावे इत्यादि माहिती आहे

(३) सौदामिनीकला (मातंग महर्षि)—यांत नादलहरी व प्रकाशलहरी याच

नारद, (कळीचे नारद नव्हेत,) भारद्वाज इत्यादि ऋषि तसेंच परशुराम हे सर्व मंत्र तंत्र व यंत्र शास्त्रांत प्रवीण होते. त्यांना अस्त्रविद्या अवगत होती. ऐतिहासिक कालातील नवनाथ हे पण अस्त्रविद्याप्रवीण होते.

ही अस्त्रविद्या मंत्राधिष्ठित होती याचा अर्थ ती विद्या मंत्रजनित, शब्दजनित स्पंदनांनी उत्पन्न केलेली तारक व मारक वस्तुजात किंवा पदार्थ होते. म्हणजे ही वस्तुजात स्थूल भौतिक म्हणजेच पंचभौतिक पदार्थगत होती असेंच नाही, ती व्यक्तिगत होती म्हणजे स्वावलंबी होती.
उलट शस्त्र हें परावलंबी असतें. अस्त्र स्वावलंबी असतें.

या सर्व अस्त्रविद्येच्या मंत्राचा, त्यातील शब्दसमुच्चयाचा अर्थानुलक्षी विचार केला म्हणजे तेज, त्याची विविध प्रकारची व दार्थ्यांची कंपनें-स्पंदनें व लहरी, तसेंच वायु व त्याची कंपनें हीं त्याची दोन मुख्य

संशोधन व त्यापासून अनुभविलेले दृश्य व अदृश्य देखावे ह्याचे वर्णन आहे.

(४) वैश्वानर तंत्र (नारद ऋषि)–यांत जगांतील १२८ प्रकारचे अग्नि व त्यांचीं कार्यें ही माहिती आहे.

(५) वायुतंत्र (शाकटायन)–या ग्रंथात वातावरणाचे ८४ हजार प्रकार, त्याची विरलता व घनता, सूर्यमालिकेतील प्रत्येक ग्रहावरील वातावरणाचें वर्णन, त्याचे परस्पर जीवसृष्टीवर होणारे परिणाम व त्याचें निराकरण करण्याचीं विधिविधानें, त्या त्या ग्रहावर जाण्याचीं साधन, व तेथ गेल्यावर होणाऱ्या परिणामाचें निवारण व त्याची प्रक्रिया ह्याचीं साधनें, इत्यादि वर्णनें आहेत. याशिवाय दिव्यसृष्टि (दत्तादन ऋषि), धूम्रप्रकरण (नारदऋषि), लोहतंत्र (शाकटायन), यंत्रसर्वस्व (भारद्वाज), धातुवाद (नौधायन), शिल्पशास्त्र (मय), मेघोत्पत्ति (आंगिरस), अर्थशास्त्र (व्यासमहर्षि), परकायाप्रवेश (वालखिल्य) इत्यादि अनेक ग्रंथ अनेक ऋषींनीं लिहिले, –स्वर्गदर्शन १९०९ या ग्रंथावरून), प्राचीन हिंदी शिल्पशास्त्र भाग १० (कै. रावसाहेब कृ. वि वझे १९२८) ह्या अमोल ग्रंथात अशा अनेक ग्रंथाची व साहित्याची माहिती दिलेली आहे ..(गो. प्र. भावे).

आधारभूत विरलतर तत्त्वें असून, त्याचा आकाश या विरलतम-सर्वव्यापी आणि म्हणून विभु-तत्त्वाशीं संयोग झालेला आहे, असें दिसतें. तेज, वायु व आकाश हीं तत्त्वें जरी पंचमहाभूतापेक्षांच आहेत, तरी तीं तीक्ष्णतम तीक्ष्णता व सूक्ष्मतम मारकता व तारकता उत्पन्न करणारीं, त्वरित प्रभावी व सर्वव्यापी अशा तत्त्वापासून तद्गुणविशिष्ट शक्ति उत्पन्न करणारीं उपादान साधनें आहेत असें स्पष्ट होतें. अशीं अस्त्रे शंभरापेक्षा जास्त होतीं अशीं वर्णनें आहेत. मंत्रशास्त्र ग्रंथात ज्या अस्त्राचे मंत्र दिलेले आहेत, त्यावरून वरील विधानाची सत्यता ध्यानात येईल. तीं अस्त्रे ज्या कारणासाठीं वा निराकरणासाठीं व ज्याच्याविरुद्ध उपयोगिलीं जात, तीं फक्त त्या विरुद्ध पक्षीयावरच परिणाम करीत, इतराना त्याचे सुपरिणाम वा दुष्परिणाम भोगावे लागत नसत. हा त्या अस्त्राचा व त्या अस्त्रविद्येचा दुसरा महत्त्वाचा विशेष आहे. तिसरा विशेष म्हणजे तीं अस्त्रे अक्षय्य, स्वयसिद्ध व नित्य सिद्ध अशीं होतीं. चवथा विशेष म्हणजे काही अस्त्रें वैश्विक शक्त्याधाराधिष्ठित होती. जसे ब्रह्मास्त्र, ब्रह्मदंडास्त्र, पाशुपतास्त्र इत्यादि पाचवा पण गौण विशेष म्हणजे तीं कधीं कधीं बाणासारख्या शस्त्राशीं संयोजून उपयोगिलीं जात.[१]

---

१. ऑस्ट्रेलियातील प्राचीन पण आधुनिक रहाणीच्या दृष्टीने मागासलेले असे समजल्या जाणाऱ्या लोकात अजूनही 'बूमरँग' नावाचे अस्त्रवजा शस्त्र शत्रूवर प्रहार करून प्रक्षेपकाकडे परत येत असे तेथील वसाहतवाले श्वेतवर्णीय युरोपियन लोक सांगतात. भारतीय अस्त्राच्या विविध प्रकारामध्ये यंत्रमुक्त, मंत्रमुक्त, मुक्तामुक्त इत्यादि प्रकार तेव्हा प्रचारांत होते.' यावरून यंत्रमुक्त प्रकारामध्यें भौतिक आण्विक शक्ति संयोगजन्य अस्त्रें होतीं असें दिसत. पण त्यासाठीं सुद्धा प्रचोदक, व शक्त्योत्पादक मंत्रही होते. ज्याला यंत्रमुक्त असें वर म्हटलें आहे, ती विद्या ऐतिहासिक कालात भारतात उपयोगिली गेली होती असे साधार प्रतिपादणें शक्य आहे. त्याचे पुरावे पुढें दिल्याप्रमाणे आहेत. (१) इ. स. १७९२ मध्यें हैदरअलीच्या सैन्यानें १० फूट उंचीच्या बांबूवरून मैल दूर असलेल्या ब्रिटिश सेनेवर श्रीरंगपट्टण येथें ६५ पौंडी रॉकेट्स

भारतीय अस्त्रें व आण्विक शस्त्रें. आजच्या अर्थशास्त्रीय व्यवहारदृष्ट्या अस्त्राचा विचार केला तर भारतीय अस्त्रें सर्वांत कमी खर्चाचीं व त्याच्या उत्पादनाशीं व सिद्धतेशीं फक्त ती सिद्ध करणाऱ्या एकाच व्यक्तीचा संबंध येतो. याच्या उलट आधुनिक अण्वास्त्राचे स्वरूप आहे वास्तविक विचार करिता आधुनिक अणुजनित मारक शक्तीला 'अस्त्र' हा शब्द लावणे अयोग्य आहे. त्याना अणुशस्त्र असे म्हणणे जास्त सयुक्तिक वाटते. कारण तीं अनंतपटीनें खर्चाचीं व सहस्रावधि यंत्राच्या आणि

सोडून त्याचा पराभव केला. (पुनः इ. स. १७६९ साली भारतीय सैन्यानें पुन: त्याच भागात उपयोगून शत्रूचा त्याच भागात पराभव केला.)

(२) चिनी लोकाना 'अग्निबाण' (Arrows of Flying Fire) सोडण्याची क्रिया माहीत होती. इ. स. १२३२ मध्यें मोंगल लोकानी 'काईफंग' हल्लीचें (pien-king) ह्या शहरावर हल्ला केला तेव्हा त्या मोंगल सैन्यावर सोडिले होते. बंदुकीची दारू त्यात वापरली होती. चिन्यांनीं ही दारू इ. स. १२०० सालींच शोधून तयार केल्याचें ऐतिहासिक सत्य आहे.

(३) इ. स. १९०२ सालीं मुंबई येथे चौपाटीवर लो. टिळक व इतर मंडळींच्या देखत भारतीय यंत्राच्या मदतीनें श्री. तळवलकर (?) ह्यांनीं आकाशात बऱ्याच उंचीवर विमान उडवून दाखविले होते! पण लगेच त्याच माणसाचा खून झाल्याचाही प्रवाद ऐकिवात आहे. त्यानंतर कोठें 'राइटबंधू' इंग्लंड-यांचा विमानप्रयोग इंग्लंडात झाला! (१) व (२) ही माहिती पृ. ४८६ वरील ग्रंथात आहे

(४) अलीकडे 'थुंबा' (केरळ) येथून हवामान शोधक प्रयोगाचीं रॉकेट्स—पण तीं पाश्चिमात्य पद्धतीचीं—तयार झाल्याचें प्रसिद्धच आहे.

(५) 'नवनाथ' हे अस्त्रविद्येंत प्रवीण होते याचे ऐतिहासिक पुरावे 'गोरखनाथ और उनका युग'—हजारीप्रसाद द्विवेदी—याच्या ग्रंथात पहावे. मंत्रशास्त्र ग्रंथाच्या पूर्वार्धातही भारतात अस्त्रविद्या ऐतिहासिक कालात जिवंत असल्याचीही माहिती दिली आहे.

प. सातवळेकर यानी 'पुरुषार्थ' मासिकात विमानसदृश वायुवाहनें व त्याचे आकार, गति व त्याचे साहित्य ह्याच सचित्र वर्णन दिलेलें आहे.

माणसाच्या संयुक्त पराक्रमानें उत्पन्न होणारीं असतात. एवढेंच काय पण हीं अणुशस्त्रें आत्मिक शस्त्र–दृष्ट्या मारकच असतात. तसेंच तीं एकट्या म्हणजे एखाद्या स्वाधीनतळ ठेवण्याजोगीं वा वापरण्याजोगीं असतातच असें नाहीं. आणि तें या नीं असलीं म्हणजे त्या धारकाचें रक्षण होईलच असें नाहीं. याच्या उलट भारतीय अस्त्र ही वस्तु वापरण्यासाठीं वा बाळगण्यासाठीं म्हणजे संग्रहासाठीं स्वतंत्र जागा अशी लागतच नाहीं. कारण भारतीय अस्त्र हें मंत्रजनितच–म्हणजे शब्द – आवाज – स्पंदन – जनित असल्यानें त्याला स्वतंत्र जागेची जरूरीच लागत नाहीं, तसेंच तें जसें मारक वा नाशक आहे, तसें तें उत्पन्नकर्त्याचें रक्षकही आहे. अस्– असणें, ज्याच्या केवळ अस्तित्वामुळेंच रक्षण होतें, तें अस्त्र व ज्या शक्तीमुळें रक्षण होतें तें शस्त्र असा शस्त्र व अस्त्र यांतील फरक आहे. शस्त्र हें साधन परतंत्र असतें तर अस्त्र हें स्वतंत्र असतें हेंच खरें.

ध्वनींच्या स्पंदनामुळें पदार्थाला आकार प्राप्त होतो, हें आधुनिक विज्ञानानें अलीकडे सिद्ध केलें आहे. पण तें भारतीय ऋषींनीं फार पूर्वींच सिद्ध केलेलें होतें. त्याअर्थीं विशिष्ट स्पंदनांनीं विशिष्ट पदार्थ तयार होतो हें सिद्ध झालेलें आहे, त्याअर्थीं भारतीय वैदिक मंत्रांतील शब्दोच्चारापासून विशिष्ट स्पंदन उत्पन्न होऊन तो तो विशिष्ट पदार्थ उत्पन्न होत असे, तसा आताही होऊं शकेल, हें उघडच आहे म्हणजे आजही तीं व तशीं अस्त्रें उत्पन्न करणें अशक्य नाहीं ही शक्ति वैदिक मंत्रांतच असल्यानें ते व त्यापासून करिता येणारीं अस्त्रें हीपण स्वयंभू आहेत. आधुनिक काळांत कोणतीही वस्तु तयार करण्याचें टेक्निक तंत्र असतें, तसें वैदिक मंत्राचेंही आहे. ते मंत्र टेक्निक पद्धतीनेंच उच्चारणें हें त्या तंत्राचें एक मुख्य अंग आहे. गायनशास्त्रांतील तान, आलाप, अस्ताई ही जशीं तंत्रें आहेत व तीं तशीं गाइलीं तरच जरूर तो परिणाम त्या गायनद्वारें होतो हें सत्य, तद्वतच मंत्रोच्चाराचें तद्रूपरिणामी तंत्र आहे. यावरून असें ठरतें कीं, त्या मंत्रांतील सामर्थ्य अर्थापेक्षा मुख्यतः

प्रभावी परंतु परमोदात्त शांतिप्रधान छायेत विलीन होण्यास लागले. **उग्रबलतेजोवर्चसी मारकत्व व प्रशांत प्रभावी चिरतारकत्व ह्या दोन्ही शक्ति भारतीय अस्त्रांत होत्या.** अजून आहेतच आहेत. एवढेच नव्हे तर चिरंतनच आहेत. सध्या वाण आहे, ती साधकप्रवण जीवात्म्याची. याच विश्वामित्रानें प्रभु रामलक्ष्मणांना बलातिबला नावाची दुर्धर्ष तेज, अप्रतिहत गति, क्षुत्पिपासाविजय इत्यादि सामर्थ्य प्राप्त करून देणारी विद्या म्हणजे मंत्र सांगून त्याचा यथाविधि यथाशास्त्र जप करावयास लाविला. तेव्हा तसें सामर्थ्य रामलक्ष्मणांना मिळालेही. महाभारतकाळातही भीष्मद्रोणादिकांपाशी अशी अस्त्रविद्या होती व तिचा उपयोग भारतीय युद्धांतील कौरव व पांडव सेनांनी ह्यांनी केलाही अलीकडील इतिहासकाळांत नवनाथांपैकी गोरक्षादि नाथांनीं अस्त्रविद्येचा प्रभाव दाखविला. अल्लाउद्दीन खिलजीनंतरच्या पठाणवंशीय इस्लामियांना नालंदापीठांतील साधूंनी कांहीं मंत्रमुक्त अस्त्रप्रयोग करून मगध स्वारीचा बेत व चाचणीप्रयोग रद्द करण्यास लाविला. असें ही इतिहास सांगतो.[1]

ही अस्त्रविद्या सावित्री विद्या (सवितृ–सविता–सूर्य) या नावानें ओळखिली जाते. ऋग्वेद मंडल ५–८२–१ यामध्ये सावित्री विद्या मंत्र आहेत. गुप्त सांप्रदाय यातील सावित्री विद्येचा ऋषि विश्वामित्र असून, तो सावित्रीमंत्र 'ॐ भूः सावित्रीं प्रविशामि धियो यो नः प्रचोदयात् ॐ' असा संपुटित आहे. सारांश, प्रारंभीं सांगितल्याप्रमाणे अस्त्रविद्येचे मूलाधार तेज केवळ सौरतेज नसून वैश्विक, तेज–प्रकाश व त्यातील अविभाज्य ऋणाग्नीय अणु हे आणि त्याच्या जोडीला वैश्विक वायुमंडलांतील कंपनांत अनुस्यूत असणारे अणु आणि त्यांना संयोजन व नियोजन

१. इतिहासप्रकाश–योगी नरहरि नाथ–चौदावा ग्रन्थ अथ प्रकाशन–वाराणसी व नाथसंप्रदाय–डॉ. हजारीप्रसाद द्विवेदी–चौदावा ग्रंथ.

पद्धतीने प्रचोदित करणारी व्याहृतींमधील चिच्छक्ति हेच आधार आहेत असे सिद्ध होते.[1]

आमची आजची गरज– मागे उल्लेखिलेली यंत्रमुक्त जातीची भारतीय अस्त्रे ह्यांची जी वर्णने अंशुबोधिनी, वायुतंत्र अगस्ति संहिता, इत्यादि संहितादि ग्रंथात आहेत, त्या माहितीप्रमाणे आधुनिक अण्वस्त्रे (?) अणुशस्त्रे यापेक्षाही ती यंत्रमुक्त अस्त्रे जास्त सामर्थ्यवान असून ती मंत्रशक्तीची जोड घेऊन केलेली आणि म्हणून बऱ्हशी स्वतंत्र होती असे दिसते. हिमालय व विंध्य ह्यामध्ये असलेला गोडा समुद्र हा अगस्ति-ऋषींनीं विमानानें ओलांडिला असे वर्णन आहे. अगस्त्यऋषींचा काळ ख्रिस्तपूर्व सहा हजार वर्षांचा होता (प्राचीन व हिंदी शिल्पशास्त्र कृ. वि. वझे इ. स. १९२८) म्हणजे सुमारे आठ हजार वर्षांपूर्वीची गोष्ट. त्यावेळीं अस्त्रविद्या भर तारुण्यात होती.

पाश्चिमात्य शास्त्रज्ञाची आजची तयारी त्या मानाने अत्यल्प असून ती त्यानाच भस्मासुर मोहिनीची आठवण करून देईल–पृथ्वीवर बसून ते अवकाशात सोडिलेलीं अस्त्रें वा क्षेपणे पृथ्वीवरूनच ताब्यात ठेवितात ही तयारी तुलनात्मक अल्प प्रगतीला फार मोठी वाटते हें खरें, पण ही

१. नवग्रहोपासनेतील 'सूर्य' याच्या ध्यानातील पुढील श्लो. ६. श्लोकार्ध 'विश्वाकाशावकाश' ग्रस्तदतिरुचिर धर्तुराशाकुशाभीतीनाम्' ह्यावरून विश्वावकाशातील सौर तेजाची कल्पना दिलेली आहे. अर्थात् आमची सध्यो प्रथित अशी 'सूर्य व त्या भोवती फिरणारे नवग्रहादिमालिका' एवढ्यापुरता विचार नसून विश्वावकाशातील अशा अनेक सूर्यमालिका व त्याचे तेज व सामर्थ्य याचा अंतर्भाव आहे. वरील ज्ञान ज्ञात असल्याशिवाय तसा उल्लेख ही कवि कल्पना का ? ह्या बाबतात 'जगताचा संघर्ष' 'Worlds in Collision' Immanuel Velikovky १९५१–V Gollarz–London ह्या रशियन ग्रंथकाराचा ग्रंथ आर्य, बौद्ध, ग्रीक, इजिप्त, हिब्रु इत्यादि ग्रन्थांमधील विश्वोत्पत्ति व जगदुत्पत्ति आरंभधी पुराव्यांसह उत्कृष्ट माहितीचा ग्रंथ सर्वविज्ञानवाचकांना वाचनीय असा संदर्भ ग्रंथ आहे.

त्याचीं अणुशस्त्रें एकदा हातातून सुटल्यानंतर त्यावर सोडणाऱ्याचें जराहि नियंत्रण असत नाहीं. उलट तींच सोडणाऱ्यांना हात दाखवू शकतात. तशी स्थिति भारतीय अस्त्राची मुळींच नाहीं. तीं, तो सोडणाराच्या पूर्ण ताब्यात असतात. आमची अस्त्रविद्या मानवाचा देव बनविणारी आहे, तर आधुनिक विज्ञानाची अणुविद्या मानवाचा दानव बनविणारी आहे.[१] याची जाणीव पाश्चिमात्त्यां पैकीं दूरदृष्टीच्या मानवी वृत्तीला होऊं लागली, म्हणून ती मानवी वृत्ति धारक जीव त्या वृत्तीचा पण सव्यसाची अवतारी पुरूष केव्हा येणार याची मार्गप्रतीक्षा करीत आहेत. पौर्वात्यापैकीं आम्ही भारतीय 'जुन्या ठेवण्याला' पारखे झाल्यानें हतवीर्य, हतपराक्रम व हतज्ञान झालों आहों. आम्हामधील ब्राह्मणत्व म्हणजे ब्रह्म जाणण्याची अभ्युदय नि:श्रेयस्करी प्रज्ञा-नष्ट झाल्याने 'जीते तुम थे ऋषी थे जब', मभी मुर्दे बन गये हो अब' हें जाणून स्वामी रामतीर्थांनी "ब्राह्मणो, आप सीख लो विद्या' असे आम्हा भारतीयांना आर्जवून सांगितलें आहे. पण अजूनही आम्ही 'मृत कीं जिवंत' अशा स्थितींत आहों. भारतीय धर्म-शास्त्राप्रमाणे त्रैवर्णिकांना व्रतबंध दीक्षेत प्रथम दंड व मगच गायत्री दीक्षा

१. हेच शब्द डेन्मार्कमधील हॅन्स शरफिग, (Hans Scherfig) हा New times १ जानेवारी १९७० ह्या वर्तमानपत्रात 'नवीन वर्षाची चिंतनिका' (New Year's Reflections) ह्या लेखात लिहितो. मानवाचा व मानव्यतेचा नाश करणाऱ्या गुंगी आणणाऱ्या अनेक रसायनाचे कारखाने, कर्णबधिरता व भीति उत्पन्न करणारे वायुयुक्त आवाज, सर्व सृष्ट पदार्थ व पिकें नष्ट करणारीं 'जतुघ्न औषधे' या नावाने उत्पन्न करून त्याचा प्रसार करणाऱ्या द्रव्याचे अनेक कारखाने पाश्चिमात्य देशात किती झपाट्यान वाढत आहेत हें सांगताना 'चंद्रविजय मोहिमेच्या' यंत्रोत्पादनापासून चंद्रावरून माणूस परत आणीपर्यंतच्या सर्व घटनाचा चालक व सूत्रधार "वर्नहर व्हॉन् ब्रान (Werner Von Braun) हा हिटलरच्या 'रॉकेट Rocket' या भयंकर यंत्राचा मुख्य होता व तोच अमेरिकेत सध्या मानवतानाशक वरील कारखा-याचा सूत्रधार आहे.' आणखी भयंकर माहिती 'New Times' पहा.

देण्याचा दंडक व आदेश आहे. तो दंडही पळसाचाच असतो, ह्यातही मोठे वैज्ञानिक रहस्य आहे यामुळे तो ब्राह्मण अस्त्रवर्चस्वी व ब्रह्मवर्चस्वी असाच बने व बनावा ह्या हेतूनेंच ती दीक्षा दिली जाई. रावण स्वतः ब्रह्मवंशोद्भूत होता, त्याच्या राज्यात ब्राह्मण नव्हते असे नाहीं, पण ते आसुरी, अमानवी, तामसी विद्येचे होते इंद्रजित ह्या रावणपुत्राने 'दिव्य रथ' सिद्ध करून तो मिळविण्याचा प्रयत्न मंत्राच्या साधनेच्या मदतीने केलाच, पण मानवी वृत्तीच्या अस्त्रप्रवीण, म्हणण्यापेक्षा अस्त्रातील सामर्थ्यसंपन्न, वायुसुतानेच इंद्रजिताची ती तम प्रधान सिद्धि धुळीला मिळविली! आधीं बडगा–दंड–मग साधन हीच आजही जरूर. यासाठीं पाश्चिमात्याच्या धिट्या व सर्वतोपरी परावलंबी विज्ञानाच्या मागें न लागता स्वाधीन स्वतंत्र आणि कमी खर्चाच्या सावित्रीविद्येच्या अस्त्रविद्येच्याच मागे आम्ही का लागू नये? आम्ही अण्वस्त्रें बनविणार नाहीं, ही 'दंडेन सर्वे वश' ह्या दृष्टीने मूर्खपणाची व कमकुवत असलेल्या नपुंसक निधर्मीवृत्तीची द्योतक आहे मानव्य टिकविणाऱ्या अस्त्रविद्येचा मागोवा घेत तरूण भारतीय वीरांनीच पुढें यावें, असे वाटत नाहीं का? ती दीक्षा देणारे गुरूही आहेत, पण त्याचा ठावठिकाणा अन्यत्र आहे. भारतीय अस्त्रविद्याच अखेरीस मानव्य मानवता–टिकवील व प्रस्थापित करील हेच निश्चित

२ भारतीय कर्मकांड–विज्ञान–अल्पदर्शन

(१) देवदेवता मंत्रोपचार विधिविचार–कोणत्याही देवाची वा देवतेची उपासना करिताना मग ती उपासना सकाम, निष्काम, नित्य वा नैमित्तिक असो–प्रत्येकात देवदेवतेची (मूर्ती–तसबीर वा प्रतीक–यंत्र) पूजा ही करावीच लागते. अशा पूजेचे प्रकार, पद्धती व साहित्य ह्याचेही अनेक प्रकार आहेत. त्यात चतुःषष्टि (६४) अष्टादश, षोडश, दश व पंच असे उपचार आहेत. महायज्ञयागादिकामध्यें म्हणजे नैमित्तिक

पूजनामध्ये चतुःषष्टि प्रकारचे पूजोपचार करितात. विशिष्ट नैमित्तिक किंवा अनुष्ठानिक पूजेमध्यें सामान्यतः षोडशोपचार पूजा करण्याची पद्धत आहे. पण नित्य पूजेमध्ये मात्र पचोपचारी पूजा केली जाते. ते पंचोपचार म्हणजे गंध, पुष्प, धूप, दीप, व नैवेद्य हे उपचार केले जातात. दशोपचारी पूजेमध्यें—पाद्य, अर्घ्य आचमनीय, मधुपर्क, गंध, पुष्प, धूप, दीप, व नैवेद्य असे दहा उपचार असतात. आणि षोडशोपचारी पूजेमध्ये पाद्य, अर्घ्य, आचमनीय, स्नानीय, वस्त्र, आभूषण, गंध, पुष्प, धूप, दीप, नैवेद्य, आचमनीय, ताम्बूल, स्तवनपाठ, तर्पण व नमस्कार असे सोळा उपचार असतात.

आपल्या दूरदर्शी ऋषिमुनींनीं आदेशिलेल्या प्रत्येक कर्मांत प्रथम व्यवहार व त्याबरोबर विज्ञान म्हणजे पंचभौतिकाचें ज्ञान व नंतर पलीकडील अतींद्रियानाच आकलन होणारें अनुभूत व म्हणून अनुभाव्य असें ज्ञान ह्या दोहोंचा उत्तम समन्वय केलेला आहे हें विसरू नये. सूक्ष्म विचार करून त्याबद्दल आदर व अभिमान बाळगावा वा वाटावा अशी वस्तुस्थिति आहे. केवळ भौतिकी विज्ञानाच्या अल्प आधारावर असें का ? तें आमच्या बुद्धीला पटत नाहीं असें विचारण्याचें धाडस केलें जातें; पण त्यावेळीं तसें विचारण्याचा वास्तविक अधिकार आपल्याला आहे तरी का ? असा विचार त्या जीवातील मनाला शिवतदेखील नाहीं. असें का होतें ? याचें उत्तर त्या जीवाला चित्तचतुष्टयाची (मन-बुद्धि-चित्त-अहंकार) याची ओळखही नसल्याने त्या जीवाचे ते प्रश्न म्हणजे विचार नसून विकारच असतात ! यामुळे 'असें का' म्हणण्याचें धाडस होतें ! याबद्दल घृणा वाटते. या सर्व मन स्थितीचा व वस्तुजाताचा आधुनिक दृष्टीच्या अल्पजीवाच्या विज्ञानाचा विचार करणे हे येथें अप्रस्तुत असल्यानें प्रथम त्या त्या आचाराची रास्त माहिती असणे योग्य. कारण ती माहितिदेखील आधुनिक अल्प जीवांना नसते, म्हणून ती प्रथम द्यावयाची एवढेंच या ठिकाणीं करावयाचें आहे. प्रथम व्यावहारिक

माहिती व मगच निशान. एवढी क्रिया झाल्यानंतरच आचारक्रांति सध्यां तरी समजनीय वा शक्य आहे.

(२) कांहीं पूजोपचाराचा खुलासा : अष्टादशोपचारामध्ये 'आसन समर्पयामि' असे आहे. देवतेच्या स्वागतासाठीं आसन म्हणून निदान पाच फुलं, स्वागतासाठीं पुन. सहा फुले द्यावीं. पाद्य म्हणजे चार पळ्या पाणी अधिक दुर्वा वा दर्भाचीं टोकें, कमळ, तांदुळ, विष्णुक्रांत नामक वनस्पति इत्यादि. अर्घ्य म्हणजे चार पळया पाणी, त्यात गंध, फळ, फूल, अक्षता (न तुटलेला तांदूळ) यव, श्वेत तीळ, दर्भाचीं टोकें वा तुलसीपत्र, आचमनीय म्हणजे सहा पळ्या पाणी, त्यात जायफळ, कंकोळ व लवंग याचें थोडें चूर्ण असावें, मधुपर्कांत कांस्यपात्रात तूप, मध, दहीं – आचमन यात एक पळी शुद्ध पाणी, स्नानासाठीं पन्नास पळ्या पाणी. वस्त्र म्हणजे चारा अंगुळापेक्षा थोडें जास्त सूत वा दोरा, उपवस्त्र यज्ञोपवीताचा जोडा (दोन वा तीन वा पाच जानवीं), आभरणें सोनें, मोतीं, इत्यादि वस्तु. गंध म्हणजे चंदन, अगरू, कापूर इत्यादि सुवासिक पदार्थांचे मिश्रण वा अष्टगंध (प्रत्येक देवतेचे अष्टगंध निरनिराळ्या पदार्थांचे असते) पुष्प – निदान वरीच देखणीं, सुवासिक रंगीत फुलें, प्रत्येक देवदेवताचें अष्टगंध निरनिराळ्या सुवासिक वस्तूंचें मिळून केलेले असतें. तसेच प्रत्येक देव देवतेला प्रिय असें फूल म्हणून अर्पण करण्यास – वहाण्यास योग्य असें. शारदातिलक आचारेंदुसारख्या अनेक ग्रंथात सांगितलें असून त्या प्रत्येक फुलाच्या देवताप्रियतेमागे आयुर्वेदीय व भौतिकीविज्ञान भरलेलें आहे, हें ध्यानात घ्यावें शिवपुराणातील सृष्टिखंडात एक संपूर्ण अध्यायच या विषयावर आहे. धूप मुख्यत गुग्गुळचा असावा – नैवेद्यामध्ये माणसाला भोजन योग्य वस्तु – यात चोष्य, लेह्य, चर्व्य, व पेय असे पदार्थ असावेत. दीप – कापूरमिश्रित कापसाची तुपान भिजवलेली वात एक नसून दोन निदान चार अंगुळें लांब असावी, – या दीपावरोवर सुवासिक शिलापिष्टिका असावी तीसह दीप सात वेळा मूर्तिसमोर मान वा डोळे ह्याच्या खालील

भागासमोर ओंवाळणे—यालाच 'धूपार्ती' म्हणतात. व देवाला ओवाळिल्यानंतर तीजवरून हातनोटं फिरवून त्या आर्तीचे कण आपले कपाळ, डोळे, तोंड ह्या भागावरून फिरवून चोळावयाचे असतात. नमस्कार, प्रदक्षिणा विसर्जन. **अक्षता**—यात अनेक न तुटलेले तांदुळ वा ज्वारी, गहू, दाणे, असावे. एवढें साहित्य असावें. हे पूजोपचार होत; पण त्यात 'यथामिलितोपचारद्रव्यैः;' अशी सर्व परिस्थितींना लागू पडणारी सोय करून ठेविलेली आहे. हे विशेष. हा खरा चतुर व्यवहारूपणा, वरील वर्णनात प्रत्येक पदार्थाबद्दल जे जे आकडे सांगितलेले आहेत, त्या प्रत्येकामध्ये विशेष अर्थ म्हणजे विज्ञान आहे त्याच्या स्पष्टीकरणाचे हें स्थळ नव्हे.

(२) **मानसपूजादि उपचार** : मानसिक ऊर्फ उपांशु, जप हा जसा श्रेष्ठ आहे, तशी मानसपूजाही आहे. हा विधि सामान्य साधकीय धारणेच्या कक्षेत न बसणारा विधि आहे. ही मानसपूजा अतींद्रिय शक्ति केंद्रांना जागृत करून पंच भौतिक सर्वस्वाचा (त्या त्या महाभूताच्या प्रतीकात्मक बीजांना आवाहन करून) न्यास म्हणजे परमेश्वरार्पणात्मक कृतीनें करण्याची क्रिया आहे. आद्य शंकराचार्यांची 'नाहं देहो नेंद्रियाण्य' ही न्यासतत्त्वात्मक मानसपूजा प्रसिद्ध आहे 'लं' पृथिव्यात्मकं गंधम्

१ मानसपूजा—'लं पृथिव्यात्मकं गंधं कल्पयामि (अर्पयामि)। हं आकाशात्मकं पुष्पं अर्प०।—यं—वायव्यात्मकं धूपं कल्प०। रं—तेजोतत्वात्मिकं दीपं कल्प०। वं—अमृत तत्वात्मकं नैवेद्यं अर्प०। यरलवहं सर्व तत्वात्मकं तांबूलं अर्प० वा पुष्पांजलिं कल्प०॥ ह्या पूजेंतही पंचमहाभूत मध्ये असणाऱ्या देव देवतेची सगुणरूपाची मानस पंचोपचार मानसपूजा या नावानें वर्णिलेली आहे. आमच्या प्राचीन भारतीय ऋषिमुनींच्या 'ज्ञाना'ची व त्यामागील चिरंतन टिकणाऱ्या बिनचूक अमोघ व म्हणून अद्वितीय दूरदृष्टीच्या कल्पनेची श्रेष्ठ प्रचीत तरी घेऊन पहा! तांत्रिक मंत्राचें पुरश्चरण करितांना मानसपूजेतील प्रत्येक बीजापूर्वी ॐकार लावणें जरूर आहे (जसें ॐ लं पृथिव्यात्मकं)

कल्पयामि—अर्पयामि' ही पचमीजालक पचोपचार मानसपूजा सांगितली जाते. ती प्रसंगोपात्त आपत्कालींही करावी असाही शास्त्राधार आहे. याचा अल्प खुलासा 'मंत्रशास्त्र' या पुस्तकात आलेला आहे.

भारतीय पूजोपचार व विज्ञान : पृथ्वीवरील प्रत्येक धर्मांत 'पूजा' हा विधि आहेच. पूजा म्हणजे सत्कार करण्याची कृति. सत्कार या शब्दातही 'सत्' म्हणजे चांगले एवढाच उत्तानार्थ नसून नित्य चिरंतन व अविनाशी असा अर्थ अभिप्रेत आहे. या सत्कारकार्यांत प्रथम व्यवहार म्हणजे पंचभौतिकी शक्तीच्या स्थानापेक्षी (पृथ्वीवरील त्या त्या भूभागाचे स्थान व परिस्थिति) परिस्थितीचा विचार व मगच त्या भौतिकीपलीकडील वैश्विक परिस्थितीचा विचार करूनच पूजोपचाराचे शास्त्र बनविलेले आहे. पश्चिम आशियातील इस्लाम, ख्रिस्ती व यहुदी धर्मांतील पूजोपचारामध्ये पाण्याचा वापर कमी, फुलेही थोडीं व फळांमध्ये मुख्यत: द्राक्षें आहेत; धूपदीप सर्वधर्मीयात आहेतच. पण आपल्या सनातनधर्माप्रमाणे धूप वा उदबत्ती ह्याच्या घटकद्रव्याचे स्थल, काल व हेतु भिन्नत्वाप्रमाणे अनेक प्रकार सांगितलेले आहेत. समिधा व हवनद्रव्यें हीं जशीं हेतु भिन्नत्वाप्रमाणे भिन्न आहेत, तशीच योजना पूजोपचारामागें आहे. एवढेंच नव्हे तर तिचा 'जीवशिवैक्य' या वैश्विक शक्तिशीं संबंध आहे. हे ध्यानात ठेवूनच आमच्या धर्माचाराचा व संस्कृतीच्या अंगोपांगाचा उघड्या डोळ्यानी विचार करा म्हणजे खऱ्या विज्ञानरवीचा उदय पूर्वेकडेच होतो पश्चिमेस अस्तच म्हणजे ज्ञानाधकारच दिसणार हेच सत्य आहे असे पटेल.

मुद्रा, न्यास व विज्ञान : 'पिंडीं ते ब्रह्मांडीं' हे भारतीय तत्त्व-ज्ञानाच्या विचारधारेचे व भारतीय धारणेचे महत्त्वाचे सूत्रवाक्य आहे. यामुळें त्याच्या प्रत्येक कर्मामध्ये व विधिविधानामध्ये व्यष्टिसमष्टि दृष्टीनें किंवा व्यक्ति हा वैश्विक समष्टीचा एक महत्त्वाचा एक घटक आहे ह्या धोरणाचें व दृष्टीचे विज्ञान भरलेलें आढळते.

देवदेवतांचें आवाहन : त्यांची पूजा सामग्री तसेंच व्यक्तीच्या जीवातील चित्शक्ति आणि विश्वचेतन्यातील शिवशक्ति यामध्ये एकात्मकतेचा संपर्क उत्पन्न करण्यासाठीं करावयाच्या, अगें व इंद्रियें यावर करावयाच्या, कृतिरूप हालचाली, यास मुद्रा व न्यास म्हणतात. ह्यामध्यें विशिष्ट पद्धतीचें व विशिष्ट प्रकारचें विज्ञान, भरलेलें आहे. तें कसे व कोणतें ह्याचे अल्प दिग्दर्शन केलें म्हणजे पुरे असें वाटतें.

मुद्रा – मानेच्या विशिष्ट हालचालीनें होकार अथवा नकार, पसंति वा नापसंति दाखविली जाते. अंगुष्ठ व तर्जनी ह्यांचीं टोकें एकत्र टेकून हाताच्या पंजाची विशिष्ट हालचाल करून उत्कृष्टत्व' उत्तमपणा वा पसती व्यक्त केली जाते. अशा अनेक प्रकारच्या अवयवाच्या वा अंगाच्या हालचाली ह्या विशिष्ट हेतुदर्शक अशा मुद्राच आहेत. मुद्रा ही कृति जगातील सर्व देशात, त्यातील सर्व मनुष्य मात्रात पूर्वापार प्रचलित आहे. म्हणजे मुद्रा ही कृति सर्वदेशिक व सर्वलोकसामान्य आहे. नृत्य-गायन इत्यादि कलात त्या आहेतच. जपानात तर 'नो'नावाची अगें व इंद्रियें ह्याच्या हालचालीने मनोभाव व अतिरिक्त विचार व्यक्त करण्याची तासानुतास चालणारी नाट्यकृति आहे. नेत्रपल्लवी व करपल्लवी कृति वा भाषा ह्या मुद्राच आहेत. एवढेंच काय पण मुद्रा ही कृति सर्व प्राणिमात्रातही आहेच. सिंह, वाघ, इत्यादि प्राण्याकडे न डगमगता स्थिर दृष्टि ठेवून पाहणें ही एक हेतु साध्यकारी मुद्राच आहे डोळे वटारणें, स्मित हास्यकरणें इत्यादि इंद्रियें व अवयव याच्या हालचाली ह्या मनोविकार व्यक्त करण्याच्या मुद्राच आहेत. अशी वस्तुस्थिति असताना ठराविक मंत्राचारामध्यें अथवा पूजोपासनेमध्ये जर ठराविक मुद्रा म्हणजे हालचाली करण्याची नितांत आवश्यकता आहे असा आग्रह धरिला तर त्या कृतीला कर्मकांडीय थोतांड असें का म्हटलें जावें याचे सखेद आश्चर्य वाटतें.

मुद्रा व न्यास ह्या दोन क्रिया मनुष्य सह-ज व प्राणि सह-ज असून आवश्यकही असतात, म्हणून त्या घडतात व केल्या जातात. मग

धर्मविधींत त्या क्रिया आवश्यक म्हणून जर सांगितल्या, तर त्यात गैर असें काय आहे? अन्यधर्मीय लोकही अशा प्रकारच्या क्रिया करितातही. जसें स्नानानंतर या शरीरशुद्धीनंतर पारशीलोक 'कस्ती' (जानवें) झटकतात व मंत्र म्हणतात तो न्यास असतो. नमाज पडतांना मुसलमान लोक जी उठबसादि शरीरक्रिया करितात त्या मुद्रादि प्रकार आहेत.

तसेंच खिस्तानुयायामध्येंही प्रार्थनेत गुढघे टेकणे, स्वस्तिकाकार स्वरूपाचे दोन हात करणें व भीतीच्या वेळींही तसे हात करणें ह्या क्रिया, न्यास व मुद्राच आहेत.

मन्त्रशास्त्रात अनेक वेळच्या अनेक मुद्रा संस्कृत श्लोकरूपानें दिलेल्या आहेत. त्यांपैकीं गायत्री जपाच्या आदिअंतीं करावयाच्या मुख्यमुद्रांच्या, त्याचप्रमाणे नित्याच्या पूजाविधींत जरूर असणाऱ्या मुद्रा ह्यांच्या आकृति दिल्या आहेत. कृति करणाऱ्या तज्ज्ञाकडून त्या मुद्रा एकदा तरी समजावून घेऊन करणे हे चांगलें.

(५) **मुद्रामागील निरीक्षण दृष्टि व विज्ञान** : पूजादि विधींतील भारतीय मुद्रांच्या कृतीचा विचार करिता पुढें दिलेल्या दोन गोष्टी ध्यानात येतात त्या अशा – (१) भारतीय ऋषिमुनींनी केलेलें सूक्ष्म पण सहज पटून ध्यानात राहील, असें सृष्टिनिरीक्षण व बोध आणि त्या कृतीमागें मानवी शरीराची रचना (Anatomy) यातील स्थूल व सूक्ष्म ग्रंथी व नसनाड्या, त्या प्रत्येकाला चेतनावस्थेंत ठेवणारी चिच्छक्ति आणि तिचा वैश्विक चिच्छक्तीशीं असणारा संबंध ह्या गोष्टींचें संपूर्णज्ञान (नवविज्ञाना-प्रमाणे केवळ यंत्रजनित व यंत्रस्पर्शित ज्ञान नव्हे. त्या पलीकडील अतींद्रियशक्तिमार्फत मिळविलेलें ज्ञान) आहे, हे कसे? त्याचे अल्पदिग्दर्शन पुढें दिलें आहे

मुद्रा	निरीक्षण व रचना	कृति व विज्ञान
(१) मृगी मुद्रा—	मृग म्हणजे हरीण, त्याचे लांबट चिंचोळें तोंड व उभी दोन शिंगें. देवाला नैवेद्य दाखवितांना ही मुद्रा करितात, अगदीं लहान मुलाला अन्न भरवितांना अशाच कृतीनें अजाणता आई अन्न थोडें थोडें बोटांनीं भरविते (iii) पश्चात इस्नाहुती घेण्याचे मापही याच मुद्रेवर वसविलें आहे	कृति—अंगुली व तर्जनी ही दोन बोटें सरळ उभी करून इतर तीन बोटांची टोकें त्या दोन बोटांमध्ये एकत्र जोडल्यानें मृगी मुद्रा होते. विज्ञान—त्या रचनेमुळें बोटें व तत्संबंधी शरीरावयव व इंद्रियें त्यांशीं जडित असलेल्या प्रथांवरील दाब या ताण आणि तद्द्वारें मेंदुभागाशीं साधिलेला व होणारा चैतन्य जागृतीकारक संपर्क ही गोष्ट साध्य होते.
(२) शकट मुद्रा—	शकट म्हणजे लाकडी गाडी. यात २ चाकें व मध्ये आस हे दर्शित	(२) यात कोणत्या इंद्रियावर ताण पडत नाहीं ?
(३) योनी मुद्रा—	या मुद्रेतील बोटांच्या रचनेचा आकार स्थूलमानानें योनीसारखा होतो.	विज्ञान—या मुद्रेमुळें नाभिस्थित अवयांशीं संबंध येतो.

मुद्रा	निरीक्षण व रचना	कृति व विज्ञान
(४) सुरभि मुद्रा—	पाचही बोटाची विशेषरचना चित्रात पहा.	**विज्ञान**—या मुद्रेचा पचन शक्ति नीट ठेवण्याशीं संबंध आहे. शरीरातील पृथ्वी व जलतत्त्व किंवा वायु व आकाशतत्त्व यांचे मीलन साध्य होते. या मुद्रेच्या मदतीने पित्तविकार शमतात. मूत्रविकार नष्ट होतात म्हणून पटचक्र भेदनक्रियेला ही मुद्रा सहाय्यक होते. परंतु अव्यवस्थित क्रियेने मृत्यूचा धोकाही संभवनीय होतो.
(५) वेणु मुद्रा —	कृष्ण 'वेणु' नावाची स्वरनलिका (अलगुजें, बासरी) वाजवीत असताना तो एक पाय वक्र व दुसरा पाय सरळ टेकितो ह्या निरीक्षणाच्या आधारावरील मुद्रा.	**कृति**—'अगनकअधरीं धरि पावा' ह्या प्रकारची पाय, हात, बोटें व शरीर ह्यांच्या रचनेनें सुषुम्ना नाडी स्थिरावण्याची तयारी होते. व तद्द्वारें कुंडलिनी जागृतीची पूर्व तयारी होते तें **योग विज्ञान** यात आहे.

पंकज (कमळ) शंख, लिंग, अंकुश, धनुष्य, बाण, परशु इत्यादि प्रत्येक मुद्रेमध्ये वस्तु व कार्य ह्याचे सूक्ष्म निरीक्षण करून ती वृत्ति प्राप्त करून घेण्यासाठीं जरूर त्या शरीरावयवाच्या रचना करावयाच्या असतात. योगामध्ये शेंकडों मुद्रा असून व त्या साध्य होण्यासाठीं क्वचित् प्रसंगीं अल्प पण केशवत् तीक्ष्ण शस्त्रक्रियाहि करण्याचा आदेश आहे. (जसे— मस्तकातून स्रवणारें अमृत प्राशन करिता यावें म्हणून जिभेखालची नस कापून करावयाची **खेचरी मुद्रा**—व ही सिद्धकरण्यासाठीं '**शक्ति-शालिनी** मुद्रेची आवश्यकता आहेच व ती करावयाची असते. ह्या सर्व मुद्रांचा तसेच **चौऱ्यांशीं आसनांचा मूळजनक भगवान शंकर हाच आहे.** 'मुद ददाति देवाना द्रावयति असुरानपि' **देवाना** (म्हणजे शरीरस्थ शक्तिकेंद्राना) **आनंद देणारी व असुरांना** (जडलेल्या रोगाना वा अनिष्टवृत्तींना) **पळवून लावणारी जी अवयाची हालचाल, तिचे नांव मुद्रा.**

(७) **न्यास**–'नि'+अस्=न्यास. याचा अर्थ ठेवणे स्थापना करणे असा आहे. मग कोणाला, कोठें व का बसवावयाचा? स्थापना कोणाची व का करावयाची? न्यासाचे प्रकार अनेक आहेत. ते विचारात घेतले म्हणजे वरील प्रश्नाचीं उत्तरें मिळतात. करन्यास, हृदयादिन्यास, प्रणवन्यास, व्याहृतिन्यास, अ-क्षर न्यास, अंगन्यास, मातृकान्यास, व्यापकन्यास इत्यादि अनेक नावाचे व प्रकारचे न्यास धर्मकार्यांत सर्वत्र सांगितलेले आहेत.

(८) **न्यासा मागील भारतीय दृष्टि**[1]—असंख्य स्वयंसक्त व स्वयंप्रचोदित अणु असलेल्या एका रेतबिंदूपासून वाढून तयार झालेल्या शरीराचा खरा मालक जो आहे, **त्याचेच हें शरीर आहे,** 'माझें

१. अप्रसिद्ध राहू इच्छिणाऱ्या बंगाली महात्म्यानें लिहिलेल्या व हिंदींत रूपांतरित झालेल्या 'पूजातत्त्व', 'यज्ञतत्त्व' या ग्रंथातील विचारधारेंतून सुचलेले विचार वर दिले आहेत. (गो. प्र. भा.)

आहे असें मानणारा व म्हणणारा 'अहं' त्याचें नव्हे ('देह हे राउळ। आत्मा हा पढरी।' ही तुकारामोक्ति) ह्याची जाणीव लहानपणापासून असावी, व्हावी व निरहंकार वृत्ति, हें शरीर म्हणजे मी नव्हे वा हें 'माझें' नव्हे ही निरासक्त वृत्ति व्हावी, हा न्यास करण्यातील भारतीय दृष्टिकोनाचा एक पैलू आहे. दुसरा महत्त्वाचा अंतर्गाभ्याचा पैलू आहे त्यामध्ये पुढील गोष्टी येतात.

या देहरूपी राऊळाच्या मालकानें आपल्या घरात किती व कोठें शक्तिकेंद्रें (Power Houses) ठेविलीं आहेत (सप्तचक्रें), तसेंच त्या त्या शक्तिकेंद्राशीं नित्य संपर्क ठेवून, न बिघडणारीं, स्वयंचलित व स्वयंशक्त्युत्पादनक्षम अशीं यंत्रस्थानें (Glands– ग्रंथिसमुच्चय जसें– अग्निग्रंथी, ब्रह्मग्रंथी, विष्णुग्रंथी, रुद्रग्रंथी इत्यादि) त्या त्या ठिकाणचे गणपति, ब्रह्मदेव, विष्णु, शिव इत्यादि अधिकारी आणि त्या सर्वांची नियंत्रक सहस्रदलीय कमलात स्थानापन्न झालेली आदिशक्ति ह्या सर्वांची ओळख करून त्या त्या स्थानीं नतमस्तक होऊन आशीर्वाद मागण्यासाठीं फक्त स्पर्श करण्याची क्रिया हस्तांगुलिकांकरवी करून निर्हेतुक त्यागपूर्ण सेवा अर्पण करणें हा न्यासाचा दुसरा पैलू होय. हा पैलू फार महत्त्वाचा आहे. त्याचा खोल विचारण्याचें हें स्थळ नव्हे, तरी एवढें खरें कीं आपल्या शरिराची ठेवण, घडण व बनावट ह्याचा पूर्ण माहिती आपल्या पूर्वजाना होती. एवढेंच नव्हे तर ह्या देहाला नीट सुस्थितींत कसें ठेवावें व या देहाचा कोणकोणत्या कार्याकरिता कसा उपयोग करावा हेंही माहीत होतें. यामुळें या देहातील जीवाला 'थोरल्या देवानें'—त्या चिच्छक्तीनें उपयोगांत आणावयाची देह ही वस्तु त्या जीवाची नाहीं. म्हणून निजवरील खोटें ममत्व स्वामीत्व सोडून द्यावें, त्या ममत्वाचा 'स-न्यास' घेण्यास विसरू नये, हा न्यासाचा दूरदर्शी हेतु आहे. त्या ग्रंथी, त्याची शक्ति, त्याशीं निगडित अशा हजारो केशवाहिन्या, मेंदूतील क्रियाशील स्थानें व त्याचें सामर्थ्य ही माहिती, हे ज्ञान हा योगशास्त्राचा विषय

आहे. तथापि त्याचा निरनिराळ्या प्रकारच्या न्यासक्रियाशीं घनिष्ठ संबंध आहे. एवढे तरी ध्यानात असावे.

'गायत्री मंत्र' हा तेजोबलवर्चसी असा सर्व श्रेष्ठ मंत्र आहे, हा का व कसा ह्याचा सर्वांगीण विचार पुढे योग येईल तेव्हा केला जाईल. पण त्या मंत्रातील २४ अक्षरें, त्याच्या देवता, त्यातील तत्वे व त्याच्या तन्मात्रा, त्यासाठीं करावयाच्या २४ मुद्रा आणि देहातील २४ न्यासस्थानें ह्यात महत्त्वपूर्ण असें नवविज्ञानापलीकडील 'ज्ञान' म्हणजे ब्रह्मज्ञान—ब्रह्माण्डज्ञान भरलेले आहे. एवढाच निर्देश करणे येथें पुरे आहे.[1]

(७) **जपसाहित्य विज्ञान** : कोणताही जप करिताना त्यासाठीं म्हणजे जपसंख्येची मोजणी करण्यासाठीं 'माळ' उपयोगात आणितात. इतर सर्व धर्मीयातही 'माळ'च उपयोगितात. अशी माळ, तिचे घटक पदार्थ, तिची लांबी, तिचा उपयोग करण्याची पद्धति, इत्यादि बाबतींचें आमच्या ऋषिमुनींनी एक शास्त्रच बनविलेले आहे. तितका सर्वांगीण विचार या बाबतींत अन्यधर्मीयांच्या प्रवर्तकांनी केलेला नाही.

माला साहित्य–प्रकार व परिणाम : माळेतील मणि (त्या त्या पदार्थाचे मणि) सामान्यत शास्त्रशुद्ध पद्धतीप्रमाणे २७,५४ किंवा १०८ असावे, अन्य संख्या[2] अशास्त्रीय. हे अंक ठरविण्यात अंक शास्त्रातील (Science numerology) ९ ह्या अंकाची महती, परिणाम ह्याबद्दल विज्ञान भरलेले आहे. वरील संख्येत ९ हीच बेरीज येते.

१ गुरु चरित्राच्या ३६ व्या कर्मकांडीय अध्यायात वरील माहितीचा उल्लेख आहे. याशिवाय अन्य अनेक ठिकाणी आहे.

२. तथापि मोक्षार्थ जपासाठीं २५, ५० किंवा १०० मण्यांची, धनार्थ ३०, ६०, १०० मण्यांची व पुष्टिकामार्थ २७, ५४–१०८ मण्यांची असावी असा शास्त्राधार आहे.

माला साहित्याचे नाव	उपयोग	जप परिणाम[१] व देहावर परिणाम
१ पोवळे	देवी गणपति या मगळ ह्याना प्रिय.	सहस्रपट—पित्तशामक
२ मोती	सद्य फलदायी—सपत्ति समृद्धि कारक—मोक्षलाभार्थ	लक्षपट—पित्तशामक वाजीकर
३ स्फटिक	भोगप्रद, विद्यासिद्धिसाठीं	१० हजारपट— गडमाला दायक
४ चादी		चादी—दशलक्षपट.सुवर्ण—शामक—कोटि पट
५ सुवर्ण (अष्टापद)	कामना पूर्तीसाठी	पित्तनाशक—क्षयग्रंथी दायक
६ हीरक पाच इत्यादि	सिद्धी प्राप्तीसाठी—तान्त्रिक कामात उपयोगी	रत्नमणि १० हजार पट. हृद्रोग शामक. पाचक
७ शख	लक्ष्मी प्राप्त्यर्थ, धर्मसिद्ध्यर्थ	वात नाशन, यकृत् पुष्टिदायक
८ कमळ बीज (पद्माक्ष)	सर्व कार्योपयोगी—कृष्णप्रिय	दशलक्षपट. वीर्यवर्धक
९ रुद्राक्ष	सर्वसिद्धिप्रद—शकरप्रिय	अनत पट. रक्तदाहहारक
१० तुलसी काष्ठ वा चदन	विष्णुप्रिय—सर्वकर्मोपयोगी स्त्रिया व शूद्र ह्याना चालणारी	तुलसी काष्ठ—त्वरित इच्छित चदन—शतपट—शामक—क्षुधावर्धक
११ कुशग्रथी	पापविनाशक	शतकोटी पट—रक्तग्रथीवर्धक
१२ पुत्रजतीचे मणि	पुत्रपशुधान्यसमृद्धिकारक	दशपट. वाजीकर
१३ हत्तीचे दात	सर्व प्रकारच्या आकर्षण प्रयोगासाठीं	अस्थि शक्तिवर्धक.

१. रुद्राक्ष १ ते १४ मुखापर्यंतचे असतात. त्याचे महत्त्व मुखपरत्वे भिन्न आहे.

२. मालसाहित्याचे शरीर व आरोग्य ह्याच्या दृष्टीने अनेक उपयोग आयुर्वेदात सागितलेले आहेत.

वरील साहित्याची माला कोणत्या पद्धतीनें बनवावी, आंतील सूत्र कोणत्या धातूचें असावें, दोन मण्यामध्यें ग्रंथी कां असावी, त्यांतील मेरुमणि व त्याचें महत्त्व, माला कोणत्या बोटावर धारण करून कोणत्या बोटांनीं मणि फिरवावे, माला शरीराच्या कोणत्या भागाशीं धरावी इत्यादि इत्यादि अनेक गोष्टींचा बारकाईनें विचार केलेला आहे व त्यांचा शरीरस्थ शक्तिकेंद्राशीं कसा संबंध येतो ह्या सर्व गोष्टी विशद करणारी माहिती शारदातिलक, मंत्रमहार्णव, रुद्राक्षोपनिद् इत्यादि ग्रंथांत व अन्य पुराणांत दिलेली आहे.

एवढेंच नव्हे तर माला तयार झाल्यानंतर तिजवर करावयाचे संस्कार कोणत्या द्रव्यानें करावे, त्यानंतर, तिची इष्टफलदायित्वासाठीं करावयाची प्रार्थना, जपानंतरची प्रार्थना इत्यादि अनेक गोष्टी सांगितलेल्या आहेत. या सर्व खटाटोपाचीं कारणेंही त्या त्या मंत्रांत ग्रथित केलेलीं आहेत.

प्रारंभीं माला प्रार्थना—ॐ ह्रीं माले महामाले सर्वशक्तिस्वरूपिणी। चतुर्वर्गस्त्वयि न्यस्तस्तस्मान्मे सिद्धिदाभव ॥ १ ॥ नंतर 'अविघ्नं कुरु माले त्वं गृह्णामि दक्षिणे करे। जपकाले (किंवा च) सिद्धयर्थे प्रसीद मम सिद्धये ॥ २ ॥ आणि जपाच्या शेवटीं—'त्वं माले सर्व देवानां प्रीतिदा शुभदा भव। शिवं कुरु त्वं मे भद्रे यशोवीर्यंच देहि मे ॥ ३ ॥ ही मालेची थोरवी कां? **जपमंत्रस्पंदनानें मण्यांच्याद्वारें वाहणारें कंपनें नाभिस्थित सर्व नाड्यांच्याद्वारें शरीरांतील त्या त्या शक्तिकेंद्रांतून प्रसृत करून सर्व शरीर मंत्रोद्भूत सामर्थ्यानें बलशाली, व तेजोमय करून कार्यसिद्ध करावयाचें हा हेतु. खुद्द समर्थ रामदास स्वामींनीं पण वरील स्वरूपाचें विधान सांगितलेलें आहे**'

विनसाहित्याची माला—हिला अ-क्ष माला म्हणतात. कोणत्याच वस्तुचें साहित्य हिला लागत नाहीं. अक्षरें म्हणजे बीजें हेंच हिचें साहित्य.

---

१. सज्जनगड मासिकाच्या मार्च १९६७ व नंतरच्या अंकात पहावें.

अ पासून क्ष पर्यंतचीं पन्नास अक्षरें–बीज–मातृका–ह्याच्या सहाय्यानेच इष्ट मंत्र जपावयाचा. जसे – 'अं हरि ॐ नमः शिवाय' श्रीराम राम राम "अं" असे अक्षर इष्ट संख्या लवकर संपविण्याच्या दृष्टीने चार वेळ म्हणून मग पुन: 'आं हरि ॐ नमः शिवाय—आं'. पूर्ववत् चारदा म्हणत क्रमानें इं, 'इं ऊं' क्षं पर्यंत त्या त्या बीजानं मंत्र संपुटित करावयाचा. अशा अं–क्षं मालेत 'ळं' हा मेरुमणि समजावयाचा असतो. याच पद्धतीनं कोणत्या बीजापर्यंत येऊन जप थांबविला एवढे ध्यानात ठेविलं म्हणजे झालेल्या मंत्राची मोजणी सहज सुलभ होते. पण तांत्रिक मंत्र किंवा देवदेवताचे विशिष्ट मंत्र ह्या पद्धतीनें जपिता येत नाहात. कारण त्या प्रत्येकाचीं बीजें असतातच. सदरहु पद्धति सामान्यतः सिद्धनाम मंत्राच्या पुरश्चरणाला जास्त सोईची असते. भारतीय कर्मकांड फार मोठे आहे त. व त्यामागील 'विज्ञान' येथे देणे हा हेतु नसून त्या कर्मकांडामागं भरलेलं विशेषज्ञान – विकृतज्ञान नव्हे, ह्याची अल्प कल्पना, थोडीशी चुणुक आमच्या नवभारताला देणे, दाखविणे हा हेतु आहे. अगदीं बारीकसारीक कृती विशिष्ट पद्धतीनं करावयाची असा दण्डक आहे. व त्याचे कारणही आहे. जसे देवाला नैवेद्य दाखवितांना पात्राखालीं चाकोनी मंडल करावयाचे, पिंडदानादि श्राद्धकर्मीय नैवेद्यात पिंडाखाली त्रिकोणी मंडल करावयाचं, काही कर्मांत वर्तुळाकार मंडळ करावयाचे, भस्म लावितांना भस्माचे तीन तीन पट्टे ओढावयाचे, वहन कार्यात कुंडाभोवता देव देवता स्थापितांना दर्भानाच व तेही उभे खाली वर अशा रेषा ओढावयाच्या व त्याही ठराविक दिशेकडूनच प्रारंभ करूनच काढावयाच्या इत्यादि प्रत्येकाच्या कर्मामागे काही हेतु असून तद्सिद्धयर्थ अशी कृति का करावयाची ह्याच 'विज्ञान' आहे. हा कृतीचा

१ अशा प्रकारचा मंत्र जप सांगणारे सांगलीचे एक गृहस्थ व गुरुदेव रानडे य च्यासारख्या निंबाळ सांप्रदायातील उपासक मला माहीत होते. (गो. प्र. भा.)

खटाटोप प्राचीन मंत्रद्रष्ट्या व मंत्रकर्त्या ऋषींनीं उगाच मूर्खपणानें करून ठेविला का? एवढाही विचार आमच्या नवभारतानें करू नये का? आमचे मंत्र व त्याबरोबर त्यांची कृति (जसें वेणु धमन्या प्रज्वाल्य, अथ अपउपस्पृश्य) ही पण त्या मंत्राबरोबर जोडून पाठ करण्याची प्रथा ठेविली म्हणूनच हजारो वर्षांनंतर अजून तें कर्मकांड, ती कृति टिकून तरी राहिली! 'हा केवढा दूरदर्शीपणा.' मंत्र हे टेपरेकार्ड करणें व त्या बरोबर कृतिमंत्रही रेकॉर्ड करणें हें काम केलें तरीही मंत्रोच्चार करणाऱ्याच्या आवाजामधील व आवाजामागील जिवंतपणा त्या यंत्रातील आवाजात येईल का? येतो का? गाणें प्रत्यक्ष ऐकण्यात व रेडिओ ग्रेट ऐकण्यात हा फरक नाहीं का लक्षात येत? इत्यादि गोष्टींवर केव्हा विचार करणार? सर्व मंत्रोद्गाते गुरुजी दिवंगत झाल्यावर का?

४ भारतीय 'ज्ञाना'चें गौरीशंकर

वरील सर्व विवेचनावरून असें ध्यानात येईल कीं, आम्हा भारतीयांचें प्राचीन 'विज्ञान' हे अनंत विश्वासबंधाचें सांगोपांग असें 'ज्ञान' होतें. त्या सर्व ज्ञानाचा भर अखिल विश्वाची धारक व चालक अशी जी 'चिच्छक्ति' ती आणि व्यक्तीमधील 'जीव' रूपानें वावरणारी चिच्छक्ति हीं एकच असल्यानें तो संबंध प्रत्येक मानवानें जोडणें, एवढेंच नसून त्याचा अनुभव घेणें हे प्राचीन भारतीयांचें खरें व्यापक 'ज्ञान' होतें.

श्रीकृष्णानें भगवद्गीतेत अध्याय सातमध्ये अर्जुनाला पुढे दिल्याप्रमाणे सांगितलें.

'ज्ञानं तेऽहं सविज्ञानमिदं वक्ष्याम्यशेषतः ।
यज्ज्ञात्वा नेह भूयोऽन्यज्ज्ञातव्यमवशिष्यते ॥ २ ॥

हा 'ज्ञानविज्ञानयोग' होय. याचें स्पष्टीकरण ज्ञानेश्वरांना

ज्ञानेश्वरीत फारच समर्पकपणे केलेले आहे. ते असे ' तुज ज्ञान' सांगेन तेसे । विज्ञानेसी[1] ॥ २ ॥

एथ विज्ञान काय करावें । ऐसे घेसी जरी मनोभावें । तरी पै आधीं जाणावें । तेचि लागे ॥ ३ ॥ मग ज्ञानाचिये वेळे । झाकती जाणिवेचे[3] डोळे । जैसी तीरीं नाव न ढळे । टेकली सातीं[4] ॥ ४ ॥ तैसी जाणीव जेथ न रिघे[5] । विचार मागुता पाउलीं निघे । तर्क आयणा[6] नेघे । आंगीं जयाच्या[7] ॥ ५ ॥ अर्जुना या नाव ज्ञान । येर प्रपंच हे विज्ञान । तेथ सत्यबुद्धि ते अज्ञान । हेंही जाण ॥ ६ ॥ आता अज्ञान अवघें हारपे । विज्ञान करपे । आणि ज्ञान तें स्वरूपें । होऊनि जाइजे ॥ ७ ॥

येथे 'येर प्रपच ते विज्ञान ' याचा अर्थ पुढे भगवंतानीच स्पष्ट केला आहे तो असा 'भूमिरापोऽनलो वायु ख मनो बुद्धिरेव च । अहकार इतीय मे भिन्ना प्रकृतिरष्टधा' ॥ ४ ॥ ही अष्टधा प्रकृति म्हणजे भूमि, उदक, तेज, वायु, आकाश, व मन, बुद्धि आणि अहकार ही माझी आठ प्रकारची प्रकृति होय. हा 'प्रपचाचा' पसारा आहे. प्र-पंच म्हणजे **पंचमहाभूतांचा [पृथ्वी–आकाश] मोठ्या प्रकर्षाने (प्र) विश्वात जो खेळ म्हणजे व्यवहार सुरू असतो, तो होय.** हा 'प्रपच' ह्या शब्दाचा अभिप्रेतार्थ आहे

पश्चिमेकडील आधुनिक नवविज्ञान अजून घोंटाळ्यातच आहे, त्याना या पचमहाभूताच्या पसाऱ्याचे थोडेसे आकलन झाले असून बरेच वा पूर्ण आकलन व्हावयाचेच आहे असे असून 'नवीन शोध, मानवाचा पचमहाभूतावरील अजय विजय' इत्यादि बालिश वल्गना ते नवविज्ञान-वादी करीत आहेत. आणि आम्ही भारतीय म्हणजे त्या प्रपच विज्ञानाचे वारसदार, आश्चर्यचकित होऊन त्या नवविज्ञानाच्या अत्यल्प प्रगतीच्या

---

१ ब्रह्मज्ञान. २ व्यावहारिक ज्ञान. ३ बुद्धीचे. ४ असता. ५ शिरत नाही. ६ हुरूप. ७ ज्या ब्रह्माच्या.

मागे लागले आहों ही फार खेदाची गोष्ट नव्हे का? विचाराच्या रितीखालच्या पायरीवर आपण आलेले आहो ह्याची सिंहावलोकनी जाणीव आम्हाला व्हावयास नको का?

ह्या 'प्रपंचा'च्या 'मन, बुद्धि व अहंकार' या तीन अंगाचा आणखी विचार नवविज्ञानाला करावयाचाच आहे. तो असा? या तीन अंगाचा व्याप, शक्ति व पंचमहाभूताशी त्याचा कोणता कसा संबंध आहे हे जाणावयाचे आहे इंद्रियगम्य ज्ञानाशिवाय, त्याच्या पलीकडे अतींद्रिय ज्ञान' म्हणून काही 'वस्तु' आहे ह्याचा त्या नवविज्ञानाला निनपतसा परिचय झाला व अनुभव आला आहे ह्याचा आम्ही वारसदार भारतीयांना नको का विचार करावयाला?

भगवान श्रीकृष्ण अर्जुनाला पुढे सांगतात, हे अर्जुना अपरा इयमितिस्त्वन्यां प्रकृतिं विद्धि मे पराम्। जीवभूतां महाबाहो ययेदं धार्यते जगत् ॥ ५ ॥

ही अष्टधा प्रकृति म्हणजे माझा–माझ्या "चिच्छक्तीचा" गौण भाग आहे. हिच्याहून निराळी अशी माझी 'परा' म्हणजे सर्वश्रेष्ठ अशी 'जीवभूता' नावाची प्रकृति आहे याचा खुलासा ज्ञानेश्वर असा करितात. "या आठाची जे साम्यावस्था[1]। ते माझी परम[2] प्रकृति पार्था। तिये नाम व्यवस्था। जीव ऐसी ॥ १९ ॥ जे जडातें जीववी। चेतनेनें[3] तें चेतवी। मनाकरवीं मानवी। शोकमोहो ॥ २० ॥ 'जीवभूता' प्रकृति ती ही तिचे हें स्वरूप, तिचे हे कार्य पुन भगवान् सांगतात

"एतद्योनीनि भूतानि सर्वाणीत्युपधारय।
अहं कृत्स्नस्य जगतः प्रभवः प्रलयस्तथा" ॥ ६ ॥ (भ. गी. अध्याय)

अखिल विश्व त्याचे स्वरूप व कार्य ह्याचे वर्णन भगवंतांनी अर्जुनाला

अर्थ टीपा : १ एकीकरण. २ चेतन-चेतना. ३ स्पंदनानें, चालिवेनें.

सांगितलं. त्याचा किती उत्कृष्ट खुलासा ज्ञानेश्वरांनी कुमारनयातील ज्ञानेश्वरांनी–केला, त्याचा आम्ही विचार नको का करावयाला? ते ज्ञान 'परा' प्रकृतीचें ज्ञान हे प्राचीन भारताचें खरे विज्ञान आहे व होते. पण त्याला ते 'विज्ञान' 'वि–ज्ञान' 'वि' या उपसर्गाच्या कनिष्ठ अर्थाप्रमाणे कमी दर्जाचे ज्ञान असे ठरवून 'येर प्रपंच हे विज्ञान' असे प्राचीन भारतीय समजतात व मानितात असे समजतात. पण त्या 'परा'ला 'ब्रह्म' म्हणणेच योग्य व 'विज्ञान' असे म्हणणे खास चुकीचे व खोटं नव्हे का? याचा आता तरी विचार करा'

इतक्या उच्च वा श्रेष्ठतम प्रतीचे आमचे प्राचीन ज्ञान असताना (आजच्या भाषेत त्याला 'विज्ञान' हे हीनत्वदर्शक नाव देणे चूक आहे.) आम्ही अशा मन स्थितींत का आहो वा का असावें याचे स्पष्ट उत्तर दूर नाही. ते उत्तर असे आहे.

---

१. स्वामी रामतीर्थांचे पट्टशिष्य नारायणस्वामी ह्यांना रामतीर्थांच्या तोंडून ज्या भगवद्गीतेचा अर्थ ऐकून (स्वतः तितकेच शिक्षित असूनही) लगेच सन्यास घेऊन रामतीर्थांबरोबर अखेरपर्यंत असताना त्यांनीं 'भगवदाशयार्थ दीपिका' नावाचा २१०० पानाचा ग्रंथ हिंदींत लिहिला. त्यात भाग २ पृ. ७२२ ह्यावर ज्ञानेश्वराप्रमाणेंच भारतीय ज्ञानाचा खुलासा केला आहे.
प. सातवळेकर यांना तर आपल्या 'पुरुषार्थबोधिनी' गीताग्रंथात ज्ञान-विज्ञानासंबंधाचें केलेले विवरण राष्ट्र व समाज बलवर्धक कसे आहे ते अवश्य पहावें (आवृत्ति २ री) सोहिरोबा नाथ 'आनिये' या सत्पुरुषाने (मालवण गोमातकाकडील) गीतेवर अठरा अध्यायात ज्ञानेश्वराच्या पद्धतीचा हजारपानी टीकाग्रंथ (सध्या अनुपलब्ध) लिहून अभंग 'ओवी ज्ञानेश्वरी' 'भगवद्गीतार्थ बोधिनी' लिहून त्यातही 'विज्ञान व ज्ञान' ह्याची उत्कृष्ट उकल केली आहे.
टीप : 'ऐसा नियता सर्वांमाजी। अलिप्तत्वें राहून सहजीं। प्रेरणा करी होणार जी जी। ब्रह्मादि कीटकांत ॥ १४०५ ॥ पहाणाराचे ज्ञान त्यागावें। पोकळीचे जडपण विसर्जावें। उर्वरित तें ज्ञान स्वभावें। तें परब्रह्म दोन्हीकडे ॥ १४०१ ॥ (लघुवाक्यवृत्ति इ. स. १९६६)

गेल्या शतकात 'मॅकॉले' या धूर्त व शत्रेबाज मुत्सद्यानें आम्हा भारतीयांना 'सु-धारण्या'चा जो कूट प्रयत्न केला, त्याला कै. चिपळूणकर 'वाघिणीचें दुध पाजण्याचा प्रयत्न' असें म्हणतात, त्या शिक्षणानें आमच्या प्राचीन भारतीय 'ज्ञानी' रक्तांतून सूक्ष्मतम प्रमाणांत ज्वलज्जहाल विष कालविण्याचा यशस्वी प्रयोग केला. त्याचा हा परिणाम आहे. त्या प्रयत्नामुळे आमच्या 'ज्ञान' वाङ्मयाचा पूर्ण विसर पाडण्याची विलक्षण मोहिनीची सोय केली!

जगातील सर्वश्रेष्ठ, सर्वपूर्ण व अत्युच्च कोटींचे अ-क्षय अ-मृत असे वाङ्मय ज्या 'संस्कृत'[1] (सर्वश्रेष्ठ अशा संस्कारांनी शुद्ध होऊन तेजस्वी व तेजोत्पादक अशा) भाषेला ती 'मृत भाषा' आहे असे ठरविण्याची हीन बुद्धि उत्पन्न करण्याची योजना आखली. भारतातील सर्व भाषा संस्कृतोद्भवच आहेत हे माहीत असूनही तीमुळे आजही आम्ही संस्कृत ही राष्ट्रभाषा करू इच्छित नाही, एवढेच नव्हे तर शिक्षणक्रमातही तिला त्रिभाषात्मक योजनेत 'आवश्यक' शिक्षणीय भाषेचे स्थानही देऊ इच्छित नाही!!

वेद याचा अर्थ ज्ञान. ते कोणते? कसे? व केवढे? याचे उत्तर 'जे ज्ञान मिळविल्याने किंवा झाल्याने 'जाणावयाचे व ज्ञातव्य असे काहीच शिल्लक उरत नाही ते, तसे व तेवढे. हे संस्कृत भाषेइतके ज्ञान जगावरील दुसऱ्या कोणत्याच भाषेत नाही. तसेच जगावरील कोणत्याही भाषेत

1. संस्कृत ही भारताची भाषा करण्यास 'लिपी' शिवाय आणखीही अडचणी आहेत हें जरी खरें आहे, तरी दूर होण्याला विशेष वेळ लागणार नाही. आज भारतामध्यें संस्कृत भाषेतून चालणारी साप्ताहिक, पाक्षिक व मासिके यांची संख्या मोठी आहे. प्रत्येक प्रांतातील विद्यालयांत शिक्षणक्रमांत 'संस्कृत' ही आवश्यक भाषा म्हणून ठरविली गेली तर आम्ही फार लवकर 'सुसंस्कृत' झाल्याशिवाय रहाणार नाही. (गो. २. भा.)

संस्कृत भाषेइतके वर्णोच्चार नाहीत. याचा अर्थ असा की, संस्कृतभाषाभिज्ञ माणूस जगातील इतर कोणत्याही माणसापेक्षा जास्त, प्रकारचे आवाज-उच्चार-वर्णोच्चार-शब्दोच्चार छन्दोच्चार करू शकतो, एवढेच नसून ते तो यथातथ्येन लिपिगत करू शकतो! वेदमंत्रोच्चारातील उदात्त अनुदात्त स्वरोच्चाराची पद्धति (अर्थवाही उच्चारपद्धति) तर जगात अद्वितीय आहे. भारतीय ऋषींच्या खऱ्या विज्ञानाचे-विशेष ज्ञानाचें 'गौरीशंकर' ते हें. मंत्र 'टेपरेकॉर्ड' करून ते आवाज जिवंत टेवितां येणार नाहीत. मग त्यांतील आचारविधि कसे टिकविणार? आचारविधींचे शब्द यंत्रगत होऊ शकतील पण विधींची हालचाल म्हणजे कृति कशी यंत्रगत करणार? हें वर सांगितले आहेच. म्हणून 'गुरुसंस्था' हवीच. पाश्चिमात्यही भौतिकी ज्ञानासाठीं म्हणून तरी ती टिकवीत नाहीं का?

विश्वज्ञान विज्ञानाचे सूक्ष्मस्वरूप : संस्कृत भाषेंत बावन वर्ण आहेत आणि त्यातच विश्व व त्यातील चिच्छक्ति ह्यासंबंधें सर्व ज्ञान विज्ञान सूक्ष्मरूपानें बीजरूपानें, साठविलेलें आहे. ते कसे ते पहा. स्कंदपुराणाच्या कुमारिका खंडातील तिसऱ्या अध्यायातील गोष्ट. ती अशी :—

मिथिला नगरीत कौथुम नावाचा अति गाढा पंडित होता. पण त्याचा मुलगा मात्र पक्का मठ्ठ असा वडिलांना व इतरांनाही वाटे. त्यावेळच्या पद्धतीप्रमाणे विद्याभ्यासांत तो मुलगा मुळींच लक्ष घाली ना! यामुळे त्याच्या वडिलांना अति वाईट वाटून दुःख होई. त्याला शिकविण्याचे प्रयत्न करितांना एकदा त्याचे वडील त्याला म्हणाले 'बाळ, मी सांगतों ते तू शिकत का नाहीस?' त्यावर मुलगा उत्तरला "बाबा, जें शिकायाचें ते केव्हाच शिकलो, यामुळे आणखी कांहीं शिकावयाचें उरलेंच नाहीं. बाबा, हे कसे ते सांगतो. ते ऐका. "बाबा, मला आरंभीं बावन वर्ण म्हणजे 'मातृका' शिकविल्यात. त्यात सर्वच ज्ञान आहे. त्याच्या बाहेर कोणते ज्ञान आहे ते सांगा.

यावर कोणुमानें (मुलाच्या वडिलांनी) मोठया आनंदानें व कुतूहलानें विचारलें "हे कसें?" त्यावर मुलगा म्हणाला "बाबा ऐका. ॐ हे विश्वाचें पहिलें स्फुरण-बावन वर्णांतील पहिली मातृका म्हणजे वर्ण 'ॐ'-ॐ हें परब्रह्माचें प्रतीक. त्याच्या लहरींना अखिल विश्व संपृक्त-पणें भरलेलें आहे. त्यातूनच सर्व ब्रह्म व्यक्त झालें. त्यानंतर त्यात 'अ, आ, इ, ई, इत्यादि चौदा स्वर आहेत. ते स्वर म्हणजे चौदा मनु होत. 'क ते ह' पर्यंतची तेहतीस अक्षरे म्हणजे ३३ देवता, त्या अशा-'क ते ठ'-बारा आदित्य 'ड ते व' पर्यंत ११ रुद्र, 'भ ते प' हे आठ वसु, 'स य ह' ही दोन अक्षरें म्हणजे दोन अश्विनीकुमार. देहातही ३३ मणके म्हणजे ३३ देव आहेत आणि अनुस्वार, विसर्ग, जिव्हामूलीय व उपाध्मानीय चार अक्षरे हे चार जीवकोटींतील जीव. बाबा, आणखी ऐका, कोणत्याही कोटीतील जीव कोणत्याही एका मन्वंतरात ३३ प्रकारच्या देवतांच्या चिंतनानें ॐकार रूप म्हणजे परब्रह्म होऊं शकतो. म्हणून बाबा, आता सांगा, कोणतें ज्ञान शिकावयाचें राहिलें?" कोणुम आश्चर्यचकित झाला हे सांगावयास नकोच.

वरील उत्तरात विश्वाचें संपूर्ण ज्ञान 'मायक्रो फिल्म' (Micro-Films) च्या रूपानें ध्वनित केलेलें नाही का? आधुनिक नवविज्ञानाची मजल कोठपर्यंत पोंचलेली आहे याचा ज्याचा त्यानेच विचार करावा.

रामायणातील 'लक्ष्मण रेषा' हे काय गूढ आहे? संध्येमध्यें आच-मन करितांना पंजाचा विशिष्ट आकार करूनच पाणी कां घ्यावयाचें? ॐ म वा मुद्रा हें काय गूढ आहे इत्यादि बाबतींचा शोध घेणारे पश्चिमेकडील कांहीं नवविज्ञानेच्छु इकडे येऊन शोध घेत असतात. याचा अर्थ काय! प्राचीन भारतीयांचें तें 'ज्ञान' श्रेष्ठ का पश्चिमेकडून येणारें मानवाचा दानव बनविणारें 'नवविज्ञान' श्रेष्ठ याचा आम्ही भारतीय संस्कृतीच्या वारसदारांनी केव्हा विचार करावयाचा? मनाचीन

जगत्सर्वम्' हें अजूनही अशक्य नाहीं. श्रद्धापूर्वक जिद्द हवी. 'उठो तारा तुम्हारा पूरा करो! ब्रह्मविद्या चली है यावत् करो।' हा स्वामी रामतीर्थांचा आदेश ध्यानात घेऊन त्वरित कार्यप्रवण व्हा म्हणजे 'God is no where परमेश्वर नाहींच असें न वाटतां 'God is now here' परमेश्वर येथेंच आहे असें अनुभवास येईल.

सूची

(नावापुढील अंक पृष्ठाचा)

जगासर्वम्' हें अजूनही अशक्य नाहीं. श्रद्धापूर्वक जिद्द हवी. 'डूबा तारा तुमारा पूज्य का । ब्रह्मविद्या चली है यांम्प्र को । हा स्वामी रामतीर्थांचा आदेश ध्यानात घेऊन त्वरित कार्यप्रवण व्हा म्हणजे 'God is no where परमेश्वर नाहींच असें न वाटतां 'God is now here' परमेश्वर येथेंच आहे असें अनुभवास येईल.

सूची

(नावापुढील अंक पृष्ठांचा)

(३) यंत्रसूची

शुद्धिपत्र

पृष्ठ	ओळ	अशुद्ध	शुद्ध
१७	१०	नादचिशाची	नादचित्राची
९४	११		अत्यग्निहोम
९५	टीप	ॐ ह्रीं श्रीं	ॐ ह्रीं श्रीं
११९	७	चित्तमान्वेहि	चित्तमन्वेहि
१५१ / १५२		सर्व बीजावर अनुस्वार हवा	
१८८	१	तुष्टामा	तृष्टामा
२१६	१०	सहृनो	सह्नौ
२४३	१७	श्रीमप्रदात्री	श्रीप्रदात्री
२४६	६	ह्रीं ह्रीं	एकच ह्रीं
२५६	१९	शिखायै	नेत्रत्रयाय
२६०	७	मूपकादकटको	मूपकादिकीटको
२८९	८	शेवटचा 'लोका' शब्दाबद्दल	शेवटचा 'लोक' शब्द हवा
२८९	१६	मुकलीयन	मुकुलीयन
२९०	१४	त्वामिम	त्नामह
३१६	१४	महामन्त्र	महायन्त्र
३[illegible]२	१५	कदेमन	कर्दमेन
३[illegible]३	२०	गायश्री	गायत्री
३६३	२४	नश्यन्तु	नश्यन्तु
३६९	टीप	विस्वान	विवस्वान
३८०	७	आकृष्णेना	आकृष्णेन
३८३	१३	ऋतुजनेषु	ऋतुमजनेषु
३८५	१४	नित्य	नित्यं
३८९	१९	नित्य कृतु	कृतु

JAMNADAS THAKKAR
18 NANDANVAN,
269 SION WEST,
BOMBAY 400022.

पृष्ठ	ओळ	अशुद्ध	शुद्ध
३९०	१३	वस्त्रा	वस्त्र
३९०	१५	लंकारसंभूषितं	लंकारसंभूषितम्
३९०	१६	प्रथम	प्रदम्
	२२	करेणा	करेण
३९१	२३	विनतानः	विहृतानन:
३९५	१९	Mageretic	Magnetic
४०३	१२	तारो	तारा
५२७	१९	Sciencе	Science of
५३१	१८	चिन्हांकित	चिन्हांकित